# प.पू. सद्‌गुरू श्रीगुंडुबुवामहाराज

जन्म
इ.स. १९०२

निर्याण
चैत्र शु.१ (गुढीपाडवा)
इ.स.१९४४

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील तुरची या गावी चव्हाण घराणे नांदत होते. या घराण्यात भिवा, रघुनाथ व तुकाराम असे तीन सख्खे भाऊ होते. यापैकी रघुनाथ चव्हाण व जनाबाई या दांपत्याचे पोटी इ.स.१९०२ साली एक पुत्ररत्न जन्माला आले. बारशा दिवशी या पुत्राचे नांव 'गुंडु' असे ठेवण्यात आले. हा गुंडू म्हणजेच विदेही संत 'श्रीगुंडुबुवामहाराज' होत. त्यांच्या वडिलांचा शेती व्यवसाय होता. महाराजांचे त्यांच्या आईवर आत्यंतिक प्रेम होते.

लहानपणापासून महाराजांना परमार्थाची आवड होती. ते विठ्ठलाचे परमभक्त होते. लहानपणपासूनच ते विरक्त होते. ते सदा विठ्ठलाच्या अनुसंधानात असायचे. प.पू.श्रीकेशवस्वामी भागानगरकर म्हणतात, ''**ज्याच्या दृष्टीस दृष्टी नाही । देही असोनि पूर्ण विदेही ।।**'' या उक्तीप्रमाणे ते देहात असून पूर्ण विदेही अवस्था भोगत होते. त्यामुळे लोक त्यांना वेडा समजायचे. पण ते वेडे नव्हते, तर जगाला वेड लावणारे होते. ''**जगात पिशाच्च अंतरी शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ।।**'' या श्रीतुकाराममहाराजांच्या उक्तीप्रमाणे ते अंतरी पूर्ण ज्ञानी होते. सदैव ब्रह्मभावात निमग्न असायचे.

इ.स.१९२० च्या सुमारास महाराज बुधगावला आले. त्यावेळी बुधगावला श्रीमंत माधवराव पटवर्धन हे संस्थानिक होते. बुधागांवमध्ये आल्यावर बुधगावातील लोकांना महाराज जे बोलतील ते सत्य होते, अनेक अडीअडचणी दूर होतात असे दिसताच त्यांच्या भोवती भक्तजनांचा मेळावा जमू लागला. त्यातील एक भक्त श्री. कल्लाप्पा एरंडोले यांनी महाराजांना कफनी घातली. आऊताई नर्स यांनी घोंगडे दिले व एका पोलीस भक्ताने त्यांना त्यावेळची पोलीसांची उंच टोपी दिली. तेंव्हापासून कफनी, घोंगडे व उंच टोपी हाच त्यांचा पोषाख झाला.

बुधगांव संस्थानचे अधिपती श्रीमंत माधवराव पटवर्धन हे केडगाव येथे प.पू.सद्‌गुरू श्रीनारायणमहाराज केडगावकर यांचेकडे उपदेश घेणेसाठी गेले होते. तेथे गेल्यावर श्रीनारायणरावमहाराजांनी विचारले,'का आला आहात?' तेव्हा श्रीमंत माधवराव म्हणाले, 'आपला उपदेश घेण्यासाठी आलो आहे.' हे ऐकून श्रीनारायणमहाराज म्हणाले, 'अरे तुमच्या बुधगावातच प्रत्यक्ष महापुरूष असताना, तुम्ही इथपर्यंत का आलात?' हे ऐकून श्रीमंत माधवरावांनी प्रश्न केला, 'कोण महापुरूष?' तेव्हा श्रीनारायणमहाराज म्हणाले, 'आहे, गुंडुबुवा. ते पंढरपूरचे विठोबाच आहेत.' हे ऐकून माधवरावांना फारच आश्चर्य वाटले आणि त्यांना गुंडुबुवांची योग्यता कळून, त्यांची श्रद्धा दृढ झाली.

श्रीगुंडुबुवा हे विदेही साधु होते. ते बुधगावकर सरकारांच्या वाड्यावर जात. हातात पडेल ते खाऊन

रहावे अशा पद्धतीने ते रहात. एकेदिवशी बुधगावातील कांही लोक बुधगावकरसरकारांकडे आले व म्हणाले, 'सरकार, हा वेडा इथे कशाला पाहिजे? याला चांगले लांब पोहोचते करा.' हे ऐकून बुधगावकरसरकारांनी आपल्या शिपायांना सांगितले की, 'या गुंडुबुवांना पंढरपूरला सोडून या.' हे ऐकून गुंडुबुवा म्हणाले, 'अरे तुझा वाडा सोडून कुठेही जाणार नाही.' पण शिपाई त्यांना पंढरपूरला सोडून आले आणि आश्चर्य असे की गुंडुबुवांना पंढरपूरला सोडून शिपाई बुधगावला परत येतात तो गुंडुबुवा कफनीवर करून त्यांचेपुढे उभेच होते. हे जेव्हा बुधगावकर सरकारांनी पाहिले तेव्हा त्यांची खात्री पटली की हा कोणीतरी अवलिया आहे.

श्रीमंत माधवरावांना शिकारीचा छंद होता. ते अरण्यात जाऊन वाघाची शिकार करायचे. त्यांनी तिकडे वाघ मारला, की इकडे बुधगावात श्रीगुंडुबुवा, 'राजाने वाघ मारला' असे म्हणून नाचू लागायचे.

एकदा बुधगावचे सरकार हे आपल्या बग्गीतून बाहेर निघाले होते, हे गुंडुबुवांनी पाहिले आणि 'बग्गी थांबव, मी येणार आहे' असे म्हणाले. हे ऐकून बग्गीवाल्याने बग्गी जोरात हाकली. तेव्हा गुंडुबुवा म्हणाले, 'अरे, मला घेतल्याशिवाय जातोस कुठे? मला घेतल्याशिवाय तुला जाता येणार नाही.' असे म्हटले असतील तोपर्यंत बग्गीच्या घोड्यांचे पायच आखडले. बग्गी पुढे जाईना. हे पाहून सरकार गुंडुबुवांना शरण आले. त्यांनी गुंडुबुवांना बग्गीत घेतले मात्र, लगेच बग्गीचे घोडे  धावू लागले.

श्रीमंत बुधगावकर सरकारांच्या मुलाचे ठरलेले लग्न फिसकटले. त्यामुळे मुलीचे वडील त्या मुलीला घेऊन राजवाड्याबाहेर आले. तेव्हा तेथे असलेले गुंडुबुवा त्या मुलीला म्हणाले, 'जा जा जा, आत जा' व तिला आत घ्या, आत घ्या असे आतील लोकांना म्हणाले आणि आश्चर्य असे की त्याच मुलीशी पुन्हा लग्न ठरले व थाटात पार पडले. बुधगाव संस्थानातील मोठी मोठी अधिकारी माणसेही त्यांच्याकडून काही अपराध घडला असेल तर गुंडुबुवांच्या समोर जाण्यास धजावत नसत, कारण असा माणूस समोर आला तर त्याच्यावर शिव्यांचा भडिमार होत असे व त्याच्या अपराधाचा पाढा सर्वांसमोर वाचला जाई.

श्रीगुंडुबुवांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात अनेक चमत्कार केले. याचा अर्थ चमत्कार करणे हा त्यांचा व्यवसाय नव्हता. संतमहात्मे हे चमत्कार करत नसतात, तर ते त्यांचेकडून घडत असतात. भगवंतावरील, परमार्थावरील आपली श्रद्धा दृढ व्हावी, बळकट व्हावी, विश्वास दृढ व्हावा यासाठी संतमहात्मे असे चमत्कार घडवत असतात. चमत्काराचे दोन प्रकार आहेत १) सापेक्ष चमत्कार  २) निरपेक्ष चमत्कार. सापेक्ष चमत्कार हे वैयक्तिक असतात. हे चमत्कार मूलतः भावनाप्रधान असतात. त्याचे महत्व ज्याचे त्यालाच असते. म्हणजे काय? तर मला ज्या गोष्टींचा चमत्कार वाटेल, त्या गोष्टीचा दुसऱ्याला तसा वाटेलच असा नियम नाही. निरपेक्ष चमत्कार म्हणजे सामुदायिक चमत्कार. असे चमत्कार हे सर्व जगाला कबूल करावे लागतात, कारण यात असंभाव्य गोष्टही संभाव्य झालेली असते. असे दोन्ही प्रकारचे चमत्कार श्रीगुंडुबुवांनी घडविले.

इ.स. १९३२ साली श्रीगुंडुबुवा कर्नाळ गावी गेले होते. तेथे सौ. चंद्राबाई पिराजी माने या नावाची तेलीण मृत झाली होती. घरात रडारड सुरू होती. लोक पुढच्या तयारीला लागले होते. गुंडुबुवा तेथे गेले व त्यांना एकदम काय वाटले कोणास ठाऊक, ते त्या बाईंना म्हणाले, 'मरायला काय धाड भरली, सोंग करते

नुसती!' असे म्हणून श्रीगुंडुबुवांनी त्या बाईच्या पेकाटात जी लाथ मारली, तो काय आश्चर्य ती बाई उठून बसली. ती पुढे अनेक वर्षे जगली.

मालगावच्या एका गृहस्थाने विहिरीला पाणी लागले तर श्रीगुंडुबुवांना कफनी घालेन असा नवस केला. त्याप्रमाणे विहिरीला हत्तीच्या सोंडेसारखे पाणी लागले. आनंदी आनंद झाला. पण या आनंदात तो गुंडुबुवांना कफनी घालायची विसरला. कालांतराने गावातील इतर विहिरी पाण्याने तुडुंब भरल्या होत्या, पण याच्या विहिरीचे पाणीच नाहिसे झाले. हे पाहून तो सचिंत झाला. मग त्याला एकाने विचारले, 'तू देवाला काही मागून घेतले होतेस का? व ते द्यायचे राहिले आहे कां?' हे ऐकून त्या गृहस्थाच्या लक्षात आले की आपण गुंडुबुवांना नवस बोललो होतो व तो पूर्ण केला नाही. मग तो गृहस्थ गुंडुबुवांना कफनी घालण्यासाठी बुधगावला आला. पण तीन दिवस गुंडुबुवांनी त्याची गाठच घेतली नाही. तो गृहस्थ गुंडुबुवांपर्यंत येई, तोपर्यंत गुंडुबुवा तेथून नाहिसे व्हायचे. शेवटी श्रीगुंडुबुवा ज्या एका घरी नेहमी असायचे तेथे तो गृहस्थ आला व त्याने त्या बाईला विचारले, मला गुंडुबुवांना कफनी अर्पण करायची आहे. ते कोठे भेटतील? तेव्हा ती बाई म्हणाली, 'ते एका झाडाखाली बसतात, त्या झाडावर कफनी घाला.' याप्रमाणे तो इसम त्या झाडाला कफनी घालणार, इतक्यात गुंडुबुवा मागे येऊन उभे राहिले आणि म्हणाले, 'काय लेका, मला विसरलास काय?' हे वाक्य ऐकताच तो गृहस्थ त्यांना शरण आला. त्यांचे पाय धरले. गुंडुबुवांनी त्याला मालगावी जा म्हणून सांगितले. त्याप्रमाणे तो मालगावी येऊन पहातो तो त्याने विहीर पाण्याने तुडुंब भरली होती. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे श्रीगुंडुबुवांना कफनी घालेपर्यंत तो गृहस्थ व त्याची बायको, मुले तीन दिवस उपाशी होती.

श्री. रामभाऊ गायकवाड या नावाचे एक गृहस्थ सांगलीत होते. त्यांचेकडे एकदा श्रीगुंडुबुवा आले व म्हणाले, राम, चल येतोस काय? तेव्हा रामभाऊ म्हणाले, चला येतो. गुंडुबुवा त्यांना घेऊन बाहेर पडले. त्यांना त्यांनी चांगले १०-२० मैल फिरविले. संध्याकाळी ते दोघे हरिपूरच्या बागेत झाले. गुंडुबुवा रामभाऊंना म्हणाले, अरे तू माझ्याबरोबर इतका हिंडलास, तुला भूक लागली आहे नां रे ? तेव्हा रामभाऊ म्हणाले, होय महाराज भूक लागली आहे. तेव्हा गुंडुबुवा म्हणाले, 'जरा थांब, खायला येत आहे' आणि आश्चर्य म्हणजे एक गृहस्थ चिवडा आणि मेवामिठाई घेऊन गुंडुबुवांकडे आला आणि म्हणाला, 'महाराज, मी आपल्यालाच शोधत होतो. हे मी आणले आहे, त्याचा स्वीकार करा.' तेव्हा गुंडुबुवा म्हणाले, 'हा (रामभाऊ) दमला आहे, त्याला भूक लागली आहे. त्याला खायला घाल.' त्याप्रमाणे त्या गृहस्थाने रामभाऊंना खायला दिले व राहिलेले गुंडुबुवा व तेथे असणाऱ्यांनी थोडे थोडे खाल्ले.

श्रीगुंडुबुवा सांगलीला आले की, एका गरीब माणसाचे घरी जात आणि खायला भाकरी मागत. हा गरीब माणूसही परिस्थिती कशीही असली तरी गुंडुबुवांना दररोज एक भाकरी देई. असे १२ वर्षे चालले होते. एक दिवस गुंडुबुवा त्या गृहस्थास म्हणाले, 'अरे, १२ वर्षे तुझी भाकरी खाल्ली, तुला आता काही तरी दिले पाहिजे. तू आता असे कर, तू तुझ्या एका नातेवाईकाकडे जा. तुला तो पैसे देईल.' या गृहस्थाची हा वेडा (गुंडुबुवा) काय देणार हीच भावना होती. तरीही तो गृहस्थ एका नातेवाईकाकडे गेला आणि पैसे मागितले.

काय आश्चर्य असे, त्या नातेवाईकाने या गृहस्थास दहा हजार रुपये दिले व काही धंदा सुरू कर असे सांगितले. ज्याने पैसे दिले, तो नातेवाईक काही धर्मराज नव्हता. पण त्याने पैसे दिले. या दहा हजार रुपयांच्या भांडवलावर हा गरीब गृहस्थ कालांतराने लखपती झाला. त्याच्या दुकानात गुंडुबुवाचा फोटो लावलेला आहे.

सौ. सोनूबाई माने या श्रीमामामहाराज केळकरांच्या शिष्या होत्या. गुंडुबुवा त्यांचेकडे वरचेवर येत असत. त्यांना गुंडबुवांनी पायातल्या खडावा, कफनी दिलेली आहे. या मानेबाईंकडे गुंडुबुवा एकदा भोजनास आले. गुंडुबुवा आले आहेत म्हटल्यावर मानेबाईंनी भोजनाची उत्तम तयारी केली व महाराजांना भोजनास चला म्हणून बोलावणेस आल्या. गुंडुबुवा म्हणाले, 'आज मी जेवणार नाही. चाललो बघ. पण तुला अन्न कधीच कमी पडणार नाही. तुझ्या हातून अन्नदान होईल.' हे शब्द अक्षरशः खरे ठरले. गुंडुबुवांची कफनी, खडावा, टोपी या बाईंच्याकडे आजही पूजेत आहे. या मानेबाई म्हणजे 'माने ॲण्ड सन्स' या दुकानपेढीच्या मालकांच्या मातोश्री होत.

याबरोबरच त्यांनी एकाच वेळी हरिपूर, नरसोबाची वाडी, औदुंबर अशा ठिकाणी भक्तांना दर्शन देणे, भक्तांना भविष्यातील अनिष्ट गोष्टींची सूचना देणे, भक्तांवरील संकटांना व दुष्ट वृत्तीला शिव्या शाप देणे, लोकांना भक्तीमार्गाला लावणे, व्याधी निवारण, संतान प्राप्तीसाठी आशीर्वाद, गोरगरीबांना गरजूंना संकटात मदत करणे व त्यांना संकटातून पार करणे अशा अनेक लीला आयुष्यभर केल्या.

प्रसिद्ध मल्ल गामा व गुंगा यांना गुंडुबुवांचा आशीर्वाद प्राप्त होता. तसेच त्यांच्या भक्तांमध्ये श्री. जाखोटीया, धनी वेलणकर, श्री. शंकरराव पोळ या सारख्या अनेक मान्यवर प्रसिद्ध व्यक्ती होत्या.

अशा या गुंडुबुवांची गुरूपरंपरा पुढीलप्रमाणे होती - १) अक्कलकोटस्वामी समर्थ महाराज २) श्रीधोंडीमहाराज, इस्लामपूर ३) श्रीधोंडीराममहाराज, पलूस ४) श्रीमहादूबुवामहाराज, तासगांव ५) श्रीअण्णाबुवा, मिरज.

श्रीगुंडुबुवा, श्रीनारायणमहाराज मळणगावकर व श्रीशंकरमहाराज मिरीकर हे समकालीन होते. त्यांची कधीही एकमेकांशी भेट नसायची. पण ते तिघेही एकमेकांना पूर्ण जाणून होते. ''**साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले । अवघे मिळोनी एकचि झाले । देहातीत वस्तु ।।७.२.३१।। दासबोध**''

संतमहात्मे देहाने वेगळे दिसत असले तरी, अंतर्यामी स्वरूपी मिळून गेलेले असल्याने एकच असतात. हे तिघेही अक्कलकोट स्वामी समर्थांच्या परंपरेतील होते. श्रीगुंडुबुवा एखाद्याला म्हणत की, 'नाऱ्या, (नारायणमहाराज) पंढरपूरच्या विठोबासमोर नाचतोय बघ' आणि नारायणमहाराज हे सांगलीत मठात व पंढरपूरच्या विठोबापुढेही नाचत आहेत हे दृश्य भाविकांनी पाहिले आहे. इकडे श्रीनारायणमहाराज म्हणत, गुंडुबुवाला त्रासून बुधगावकर सरकारनी त्याला कुठेही नेऊन कोंडले तरी तो पुन्हा बुधगावात येणारच. याप्रमाणे गुंडुबुवांना सरकारांनी पंढरपूर, पाटगाव वगैरे कोठेही नेऊन सोडले तरी ते पुन्हा बुधगावला येऊन राजवाड्यासमोर नाचल्याचे लोक श्रीनारायणमहाराजांना सांगत. तेव्हा ते हसायचे आणि म्हणायचे, 'अरे तो अवलिया आहे., तुम्हाला कळणार नाही.'

कर्नाळला श्री.बिडूबुवा गोसावी यांचेकडे श्रीशंकरमहाराज मिरीकर यायचे. हे गुंडुबुवांना कळायचे. गुंडुबुवा बुधगावात म्हणाले, 'अरे, शंकऱ्याने आज कर्नाळला सगळ्या गावाला जेवण दिले, पण मला बोलावले नाही.' असे म्हणून हसले. इतक्यात श्री. बिडू गोसावी गुंडुबुवांना कर्नाळला भोजनास बोलावण्यासाठी आले. तेव्हा गुंडुबुवा त्यांना म्हणाले, 'येतो, जा पुढे!' काही वेळा श्रीशंकरमहाराज हे गुंडुबुवांना भेटण्यासाठी बुधगावला येत असत.

औरवाडचे प्रसिद्ध साधू वजीरबाबांचे काही काळ बुधगावात वास्तव्य होते. वजीरबाबा व गुंडुबुवा एकमेकांना चांगले ओळखत होते. एक दिवस गुंडुबुवा वजीरबाबांजवळ गेले आणि म्हणाले, 'वजीरा, तू बी खुळा आणि मी बी खुळा.' अशा वजीरबाबांची भाविक लोक वर्षातून एकदा वरात काढत. अशी वरात माझीपण काढा असे गुंडुबुवा गावातील लोकांना म्हणाले. तेव्हा लोकांनी विचारले, गुंडुबुवा, केंव्हा वरात काढू? तेव्हा गुंडुबुवा म्हणाले, 'चैत्र पाडव्या दिवशी काढा.' मग तेंव्हापासून चैत्र पाडव्याला बुधगावात गुंडुबुवांची मिरवणूक लोक काढू लागले.

प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर हे काही कामानिमित्त बुधगावला निघाले होते. हे श्रीगुंडुबुवांनी पाहिले आणि गुंडुबुवांनी पांडुरंगमहाराजांना, 'पांडुरंग' म्हणून हाक मारली. पांडुरंगमहाराजांचा गुंडुबुवांशी अद्याप परिचय झाला नव्हता. गुंडुबुवांनी आपल्या नावाने हाक मारली, पण त्यांना आपले नाव कसे माहित असा प्रश्न पांडुरंगमहाराजांना पडला. ते टांग्यातून खाली उतरून गुंडुबुवांचे पाय धरणार तोच, गुंडुबुवा नाहिसे झाले. हे पाहून पांडुरंगमहाराज म्हणाले, 'माझे नाव घेऊन हाक मारली, यातच माझा भाग्योदय आहे.' पुढे ते पांडुरंगमहाराज म्हणून प्रसिद्ध झाले.

असे हे पांडुरंगमहाराज बुधगाववरून पुढील गावी भजनाला जाण्यासाठी आपल्या लोकांसह गाडीची वाट पहात थांबले होते. इतक्यात गुंडुबुवा तेथे आले आणि म्हणाले, 'अरे, पुढे काय आहे? येथेच शंकराच्या देवळात भजन कर.' त्याप्रमाणे पांडुरंगमहाराजांनी पुढील गावी न जाता बुधगावच्या शंकराच्या मंदिरातच भजन केले. दुसरे दिवशी पांडुरंगमहाराजांना कळले की ज्या वाटेने आपण भजनाला जाणार होतो, त्या वाटेवर काल मोठा अपघात झाला. हे समजताच काल आपल्याला गुंडुबुवा येथेच भजन कर का म्हणाले याचा खुलासा झाला.

कुंडलला भागवतमहाराज म्हणून रहात होते. त्यांना मुलगा होत नव्हता. त्यांनी गुंडुबुवांना नवस केला की, 'मला जर मुलगा झाला तर कफनी वाहीन' आणि आश्चर्य म्हणजे गुंडुबुवा नवसाला पावले. भागवतांना मुलगा झाला. त्यांनी गुंडुबुवांना कफनी वाहिली व मुलाचे नांव 'गुंडु' असेच ठेवले.

श्रीगुंडुबुवांचा आमच्या श्रीरामनिकेतनशी अत्यंत घनिष्ट, प्रेमाचा, जिव्हाळ्याचा संबंध होता. श्रीगुंडुबुवा व आमचे पणजोबा श्रीमामामहाराज केळकर हे एकमेकांना फार मानत असत. ते एकमेकांचा पारमार्थिक अधिकार पूर्णपणे जाणून होते. गुंडुबुवा हे आमच्या मामांच्या कीर्तनात वरचेवर येत असत. आले की कफनी

वर करुन आनंदाने उड्या मारत, नाचत असत. असेच एकदा श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवात श्रीमामांचे कीर्तन चालू असताना श्रीगुंडुबुवा आले. कीर्तनात मोठा रंग भरला होता, हे पाहून गुंडुबुवा कीर्तनात आनंदाने नाचू लागले. हे बघून श्रीमामांनी गुंडुबुवांची कीर्तनात स्तुती करताना म्हटले, 'गुंडुबुवांनी बुधगावला एक मेलेला मुलगा उठविल्याचे आपणास माहित आहे. गुंडुबुवा हे मोठे अधिकारी सिद्धपुरुष आहेत. त्यांना आपण वंदन करुया. त्यांना कोणीही वेडे समजू नका.' हे ऐकताच गुंडुबुवा मामांचेकडे हात वर करून 'हा वेडा काय सांगतो आहे, यावर विश्वास ठेवू नका' असे म्हणाले व लगेच निघून गेले.

बुधगावचे श्री.फडके हे श्रीगोंदवलेकरमहाराजांचे शिष्य होते. त्यांचा गुंडुबुवांशी चांगला परिचय होता. ते एकदा श्री. फडकेंना म्हणाले, 'सांगलीचे मामा केळकर हे पूर्णावस्थेला पोहोचलेले आहेत आणि नाऱ्या (श्रीनारायणमहाराज मळणगावकर) सिद्धपदापर्यंत पोहोचलेला आहे.' श्री. फडके आपल्या घरी नामसप्ताह साजरा करीत. एका सप्ताहात त्यांनी श्रीमामांचे कीर्तन ठेवले. कीर्तन खूप रंगले व या कीर्तनात गुंडुबुवा खूप नाचले.

एकदा श्रीपांडुरंगमहाराज बिसूर या गावी भजनाला निघाले असता, वाटेत बुधगावी त्यांना गुंडुबुवा भेटले. गुंडुबुवांना पहाताच पांडुरंगमहाराजांनी टांगा थांबवला व खाली उतरून नमस्कार केला आणि सहजच गुंडुबुवांना विचारले, 'या पंचक्रोशीत परमार्थात पुरा कोण आहे?' त्यावर चटकन् गुंडुबुवा म्हणाले, 'अरे, आपला गोंद्या (गोविंदमामा केळकर) तेवढा परमार्थात पुरा आहे.' त्या प्रसंगाला अनुलक्षून श्रीपांडुरंगमहाराजांनी 'पुरा गोंदा म्हणुनी गुंडा सांगे मजला ।' हे पद केले. ते पद मुळातून वाचण्यासारखे आहे. ते पद खालीलप्रमाणे आहे :-

**पुरा गोंदा म्हणूनी गुंडा सांगे मजला ।।ध्रु।।**

**म्हणुनिया दर्शना आलो । पाहुनी समाधान पावलो । आनंदात रंगुनी गेलो । दिन चांगला ।।१।।**

**गुंडुबुवा विदेही साधू । शक्ती विलक्षण अगाधू । परि हा तो सुखसंवादू । कैसा घडला ।।२।।**

**गुंडुबुवा आणि हा गोंदा । त्यांनी केले परमानंदा । पांडुरंग रामानंदा । ठायी जडला ।।३।।**

यातून मामामहाराजांचा अधिकार कळून येतो.

श्रीमामामहाराजांचे हनुमान समाधी मंदिरात श्रीतात्यासाहेबमहाराजांचे पुण्यतिथी निमित्त कीर्तन व्हायचे. असेच एके दिवशी, मामांबरोबर श्रीदादा (दासराममहाराज) घरी येत असताना गावभागात मराठी शाळा नं.२ पाशी त्यांना श्रीगुंडुबुवा भेटले. श्रीदादांना पाहून गुंडुबुवांनी 'हे प्वार लई ग्वाड आहे' असे तीनदा म्हणून दादांचे डोक्यावर आपल्या अंगातली कफनी झाडली आणि 'लई ग्वाड' म्हणून गुंडुबुवा हसले. हे पाहून दादांनी गुंडुबुवांचे पाय घट्ट धरले व दर्शन घेतले व नंतर गुंडुबुवा तेथून निघून गेले.

असे आमचे हे गुंडुबुवा विदेही, वैराग्यसंपन्न, प्रसिद्धीपराङ्मुख सर्वसामान्यांच्या हितासाठी झटणारे, तळमळ असलेले वाचासिद्ध असे अवलिया संत होते.

**'पंचांग हे कल्पित ज्यास झाले । दशांग त्याचे सहजी निमाले । त्रयांग हे ज्यासी समूळ नाशी । विनांग ते वर्तती मुक्त देही ।।'** (संतवचन). पंचमहाभूतांचे बनलेले शरीर म्हणजेच पंचांग हे ज्याला कल्पित झाले, ज्याने दशांग म्हणजे दश इंद्रियांचा एकमेळ केला आहे, त्यामुळे त्यांची इंद्रियेही समाधानाला आलेली आहेत, इंद्रिये विषय विसरलेली आहेत. त्रयांग म्हणजे स्थूल, सूक्ष्म, कारण हे देह ज्याला नाहितच असे विनांग म्हणजेच आत्म्याचे अंग असणारा असा महात्मा मुक्तावस्था भोगत असतो.

अशी मुक्तावस्था भोगणारे श्रीगुंडुबुवा आपले भूतलावरील कार्य संपले आहे असा विचार करून इ.स. १९४४ मध्ये एकदा संध्याकाळी श्रीहनुमान समाधी मंदिरात आले व श्री. गंगाधरसिंग दीक्षितांना म्हणाले, 'गंगाधर, भूक लागली आहे. जेवायला वाढतोस का?' त्यावेळी गंगाधरसिंगाचे लग्न झालेले नव्हते. ते गुंडुबुवांना म्हणाले, 'आपण बसा, मी भोजनाची व्यवस्था करतो. श्री. गंगाधरसिंग गुंडुबुवांना म्हणाले, महाराज, जेवणास काय करु? तेंव्हा गुंडुबुवांना म्हणाले, 'भाकरी आणि वांग्याची भाजी कर.' गंगाधरसिंगांनी वेलणकर मावशींना बोलावून आणले. वेलणकर मावशींनी चांगला स्वयंपाक केला. गुंडुबुवा त्यादिवशी यथेच्छ जेवले. एरवी जेवण झाल्यावर ते हात धूत नसत. आपल्याच कफनीला पुसत. पण त्या दिवशी त्यांनी आपले हात धुतले व गंगाधरसिंगांना म्हणाले, 'गंगाधर, चल येतो आता.' असे म्हणून ते गावाकडे न जाता, खाली नदीकडे जाऊ लागले. गंगाधरसिंग त्यांचे मागे मागे गेले. गुंडुबुवा वाळवंटात गेले आणि नदीकाठावरून पुलाकडे जाऊ लागले, तेव्हा गंगाधरसिंगांनी त्यांना विचारले, 'अहो महाराज, इकडे कुठे निघालात?' तेव्हा गुंडुबुवा म्हणाले, 'उगमाकडे चाललो आहे' असे म्हणून गुंडुबुवा पुढे निघाले आणि पहाता पहाता अदृश्य झाले. त्यानंतर ते कोणासही, कधीही दिसले नाहीत. गुंडुबुवांना शोधून काढण्यासाठी त्यावेळी बुधगावकर सरकारने रु.५०००/- चे इनाम जाहीर केले होते, पण ते कधीच कुणाला सापडले नाहीत, कारण ते वयाच्या ४२ व्या वर्षी सदेह वैकुंठाला गेले होते. चैत्र शु.१, गुढीपाडवा या दिवशी श्रीगुंडुबुवा यांची पुण्यतिथी बुधगाव येथील त्यांच्या समाधीमंदिरात परंपरेने गेली अनेक वर्षे साजरी केली जाते.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीगुंडुबुवा यांची आरती**

आरती गुंडुबुवा । जय महानुभावा ।
दिगंत कीती तुझी । जय जय महानुभावा ।।धृ।।
वसती तुमची झाली । बुधगांवा माझारी ।
तेथेचि राहुनिया । चमत्कार केले भारी ।।१।।
गुंडुबुवा तुम्ही धन्य । तुमचे पायी अनन्य ।
निरंतर सेवा घडो । हे मागतसे मागणे ।।२।।
मामांच्या संकीर्तनी । गुंडुबुवा नाचती ।
विदेही साधु म्हणूनी । तयालागी वाखाणती ।।३।।
दासराम पाहुनिया । जगी थक्क झाला ।
म्हणोनिया **दासरामे** । पदी ठेविले भाळा ।।४।।

# प.पू. सद्गुरू श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज

जन्म
शके १७५१ इ.स.१८२९

निर्याण
चैत्र शु.०३ शके १८०१
शुक्रवार इ.स.१८७९

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचा जन्म द्रविड देशात शके १७५१ (इ.स. १८२९) साली झाला. यांचे वडील मोठे व्यापारी होते. श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराजांनी बालपणीच म्हणजे अदमासे १४-१५ वर्षांचे असतानाच वैभवसंपन्न घरदाराचा त्याग केला आणि घराबाहेर पडले. त्यांनी हिंदुस्थानभर यात्रा केल्या. या यात्रेमध्ये ते रामेश्वरास जाण्यास निघाले. वाटेत त्यांना निंबरगी गावाजवळील सोनगी हे गाव लागले. त्या गावातील मारुतीच्या देवालयात ते येऊन राहिले. ते लंगोटी नेसून भगवी कफनी घालत असत. ते वाचासिद्ध आणि अजानबाहू होते. सोनगीमध्ये त्यांनी त्यांच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे भजनाचा सप्ताह सुरू केला. तेथे अन्नछत्र सुरू केले. सिद्धीच्या सामर्थ्याने ते लोकांचे रोग बरे करीत. त्यामुळे साहजिकच तेथील जनता त्यांना साधु म्हणू लागली. त्यामुळे साधुमहाराजांचा सगळीकडे लौकिक वाढत चालला. हा लौकिक शेजारील निंबरगी गावापर्यंत पसरला.

श्रीनिंबरगीकरमहाराजांचे श्री. आत्मारामबाबा नावाचे एक निकटवर्ती गृहस्थ होते. हे जातीने जैन होते. त्यांना श्रीसाधुमहाराजांचे दर्शन घेऊन येण्याची इच्छा निर्माण झाली. ते श्रीनिंबरगीकरमहाराजांना म्हणाले, 'महाराज, शेजारच्या सोनगी गावात एक मोठे साधुपुरूष आले आहेत असे कळते. आपण त्यांच्या दर्शनाला जाऊया.'

याप्रमाणे श्रीनिंबरगीकरमहाराज स्वतः व त्यांचे चिरंजीव श्रीभीमाण्णामहाराज, श्रीलक्ष्मीबाईअक्का, श्रीआत्मारामबाबा इ. मंडळी सोनगीला गेली. यावेळी श्रीसाधुमहाराजांच्या पायाला नारू झाला होता. त्यामुळे ते देवळात निजून होते. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांना पाहून नमस्कार केला. पण श्रीसाधुमहाराजांनी उलट नमस्कार केला नाही. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांना प्रश्न केला की, 'साधुबुवा तुम्ही हे काय आरंभिले आहे?' तेव्हा श्रीसाधुमहाराजांनी उत्तर दिले, 'हा पुण्याईचा मार्ग आहे.' तेव्हा महाराजांनी त्यांना 'पुण्य कसले असते?' असा प्रश्न केला. तसेच 'पुण्य हे हलके असते का जड? पुण्य हे काळे असते का पांढरे? पुण्य हे उष्ण असते का थंड ?' असे अनेक प्रश्न केले. या प्रश्नांची उत्तरे श्रीसाधुमहाराजांना देता आली नाहीत. श्रीसाधुमहाराजांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांचे पायावर लोळण घेतली व त्यांचे पाय धरले आणि क्षमा मागितली. श्रीनिंबरगीकरमहाराज हे आहेत तरी कोण हे त्यांच्या बरोबरच्या माणसांकडून समजून घ्यावे या उद्देशाने, 'आपल्या बरोबरच्या मंडळींना आज सायंकाळी आपण येथे ठेऊन जावे' अशी महाराजांना विनंती केली. याप्रमाणे आत्मारामबाबा आणि लक्ष्मीबाईअक्का तेथे राहिल्या. श्रीसाधुमहाराजांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांना आपण कृपा करावी व मला आत्मज्ञान द्यावे अशी विनवणी केली. तेव्हा श्रीमहाराज बोलले, 'साधुबुवा, तुमचा सध्या भजनाचा सप्ताह चालू आहे, तो होऊ दे. त्यानंतर तुम्ही निंबरगीला या, मग बघू.' असे बोलून श्रीमहाराज व श्रीभीमाण्णा हे निंबरगीला परतले.

श्रीनिंबरगीकरमहाराज व त्यांचे परमार्थ साधन याबद्दल श्रीसाधुमहाराजांना उत्कंठा निर्माण झाली. महाराजांचा दिनक्रम प्रत्यक्ष पाहण्याचा त्यांनी निश्चय केला. सप्ताह संपल्यावर साधुमहाराज निंबरगीस आले व त्यांनी महाराज कोठे आहेत? याबाबत विचारपूस केली. तेव्हा महाराज हे मेंढ्या घेऊन रानात गेलेले त्यांना कळले. महाराज एका घनदाट वृक्षाच्या छायेखाली साधनमग्न होऊन बसलेले होते. त्यांना बघून श्रीसाधुमहाराज हे जवळच्याच एका लिंबाच्या झाडावर चढून बसले. श्रीनिंबरगीकरमहाराज संध्याकाळपर्यंत नेमातून उठलेच नाहीत. तोपर्यंत श्रीसाधुमहाराज त्या झाडावर बसून होते. महाराज उठून घरी जाणेस निघाले, तेव्हा साधुमहाराज झाडावरून खाली उतरले आणि त्यांनी महाराजांना नमस्कार केला. तुम्ही इतका वेळ कोठे होता? असे महाराजांनी विचारताच मी शेजारच्या झाडावर बसून होतो, असे श्रीसाधुमहाराजांनी उत्तर दिले. यावर श्रीनिंबरगीकरमहाराज म्हणाले, 'साधुबुवा, इतका वेळ उपाशी होता का?' यावर आपण लिंबाचा पाला खाल्ला व लिंबाचा पाला खाऊन राहण्याची मला सवय आहे असे उत्तर दिले. यावर महाराज हसून म्हणाले, 'साधुबुवा लिंबाचा पाला खाऊन देव भेटला असता, तर तो प्रथम उंटांना अथवा आमच्या मेंढ्यांना भेटला असता.' हे वाक्य ऐकून श्रीसाधुमहाराजांनी महाराजांच्या चरणावर मस्तक ठेऊन 'आपण माझा उद्धार करावा' अशी प्रार्थना केली. याप्रमाणे श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांचेवर अनुग्रह केला. त्याप्रमाणे श्रीसाधुमहाराज सकाळी सहा वाजता एक हात जमीनीला टेकून साधन सुरू करायचे ते दुपारी सूर्य डोक्यावर येईपर्यंत त्यानंतर दुसरा हात जमीनीवर टेकायचा तो संध्याकाळी सूर्यास्तापर्यंत असे दररोज १२ तास साधन करीत असत. याप्रमाणे त्यांनी कष्टाचे साधन साधून अवघ्या सहा वर्षात साधनसिद्धता प्राप्त करुन घेतली. याचा श्रीनिंबरगीकरमहाराज यांना खूप आनंद झाला. असेच एकदा श्रीनिंबरगीकरमहाराजांना साधुमहाराजांनी नमस्कार केला. त्यावेळी श्रीनिंबरगीकरमहाराजांनी साधुमहाराजांना विचारले, 'साधुबुवा, काय इच्छा आहे?' त्यावर श्रीसाधुमहाराज म्हणाले, 'महाराज, मरावे परी कीर्तीरूपे उरावे एवढीच इच्छा आहे.' मग श्रीनिंबरगीकरमहाराज म्हणाले, 'उठा साधुबुवा, तुमच्या समाधी समोर हत्ती झुलतील व माझ्या समाधीवर छप्परही राहणार नाही.' निंबरगीकरमहाराजांचा हा आशीर्वाद पुढे तंतोतंत खरा ठरला.

श्रीसाधुमहाराज हे सोनगी येथे बाळव्वा बगली यांचेकडे बरेच दिवस राहिले होते. त्यानंतर ते उमदी येथे बरेच दिवस वास्तव्यास होते. याठिकाणी श्रीसाधुमहाराज व श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर या दोघांची गाठ पडली. दोघांचा चांगला परिचय झाला. श्रीसाधुमहाराजांनी स्विकारलेला भक्तीमार्ग व साधनाभ्यास पाहून चिमडचे महाराज त्यांचेकडे अनुग्रह मागू लागले. तेव्हा श्रीसाधुमहाराज त्यांना निंबरगीस घेऊन आले व श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या पायावर घातले. महाराजांच्या आज्ञेने श्रीसाधुमहाराजांनी चिमडच्या महाराजांना अनुग्रह दिला. चिमडचे महाराज विटे येथे मुक्कामास होते. त्यांचेकडे काही दिवस श्रीसाधुमहाराज मुक्कामास राहिले. त्यानंतर श्रीसाधुमहाराज हे चिमड गावी श्रीगुराप्पा औरसंग या अनुग्रहित शिष्याकडे येऊन राहिले. श्रीसाधुमहाराजांनी आपल्या अनुग्रहित मंडळींना विट्यास जाऊन श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर यांना चिमडास आणून ठेवावे असे सांगितले. त्याप्रमाणे महालिंगपूर आणि चिमड येथील भक्तमंडळी विट्यास गेली. श्रीरामभाऊमहाराजांना नोकरी सोडण्यास सांगितले. गुरूआज्ञेनुसार विटा येथील नोकरीचा त्याग करून

आपल्या पत्नी व मुलासह श्रीरामभाऊमहाराज चिमडला येऊन राहिले.

श्रीसाधुमहाराजांना ४९ वे वर्ष लागले. आता भूतलावरील आपले कार्य संपले आहे असे वाटून त्यांनी देहत्यागाचा विचार केला व तो आपल्या शिष्यांजवळ बोलून दाखविला. तेव्हा महाराज, आपण आणखी काही दिवस या भूमीवर रहावे अशी विनंती भक्तमंडळींनी केली. या विनवणीप्रमाणे त्यांनी 'यापुढे मी फक्त एक वर्ष या भूतलावर राहीन, नंतर मी कुणाचे ऐकणार नाही.' असे सांगितले.

याप्रमाणे एक वर्ष होऊन गेले. चिमड येथे त्यांना देह ठेवायचा होता. ते चिमड येथील श्री. गुरूनाथ बाळाजी तथा गुराप्पा औरसंग या अनुगृहिताकडे रहात होते. त्यांनी आपल्या निर्याणाचा दिवस सांगितला. त्यांनी देह ठेवायच्या आदल्या दिवशी गुराप्पाच्या मातोश्री श्रीसाधुमहाराजांना म्हणाल्या, 'महाराज, आपण तर उद्या जाणार, मग मला आपल्या सगुण मूर्तीचे दर्शन कसे होणार?' हे ऐकल्यावर श्रीसाधुमहाराज म्हणाले, 'माई, मी गेल्यावरही माझे दर्शन तुम्हाला होत राहिल. काळजी करू नका.' आणि आश्चर्य असे की श्री. गुराप्पांच्या घरातील एका भिंतीवर श्रीसाधुमहाराजांची आसनस्थ छाया उमटली. ती आजही चिमड येथे आहे.

अशा श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराजांनी चैत्र शु. ३ शके १८०१ शुक्रवार इ.स. १८७९ साली सायंकाळी ४.४५ वाजता चिमड येथे वयाच्या ५०व्या वर्षी निर्याण केले. श्रीसाधुमहाराजांचे ज्या स्थानी दहन केले, त्याठिकाणी वटवृक्ष लावणेत आला. आज तो वृक्ष प्रचंड मोठा झाला आहे.

श्रीसाधुमहाराजांनी देह ठेवल्यावर त्यांची समाधी बांधण्याचे श्रीचिमडमहाराजांनी ठरविले. त्याप्रमाणे पाया खोदला जाऊ लागला आणि काही अंतरावरच वैशाख व. ३ शके १८०२ (इ.स.१८८०) या दिवशी पांढऱ्या शुभ्र स्वच्छ पाण्याचा झरा लागला. ही गोष्ट त्यांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांचे कानावर घातली. तेव्हा महाराज म्हणाले, 'रामभाऊ, साधुमहाराजांच्या दर्शनाला साक्षात गंगा आली आहे. या पाण्याला विटाळ न झाल्यास या गंगोदकाने सर्व व्याधी दूर होतील व ते तापनाशीतीर्थ आहे' असे सांगितले. तेथे चांगली औरस चौरस विहीर बांधा व मधोमध श्रीसाधुमहाराजांचे मंदिर बांधा. त्याप्रमाणे विहीर बांधून मधोमध श्रीसाधुमहाराजांचे देवालय उभे केले. यामध्ये श्रीकाडसिद्धांचा बाण, श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या नावे पिंडी आणि श्रीसाधुमहाराजांच्या पादुका अशी त्रिमुर्तीची स्थापना मार्गशीर्ष कृ. ७ शके १८०३ इ.स.१८८१ साली श्रीचिमडमहाराजांचे हस्ते झाली. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीसाधुमहाराजांना देवच करुन बसविले. या संदर्भात श्रीदासराममहाराज म्हणतात, '**निंबरगीमहाराजे देव करुनी बैसविले । चिमडमहाराजे तापनाशी स्थापियेले ।।... आरती साधुराया**' श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेनुसार गुरुद्वादशी ते पांडवपंचमी असा १० दिवसांचा उत्सव श्रीक्षेत्र चिमड येथे सुरू झाला. या उत्सवाच्या शेवटच्या मुख्य दिवशी म्हणजेच पांडवपंचमीस श्रीचिमडमहाराजांनी श्रीसाधुमहाराजांच्या रथोत्सवाचा कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमाला श्रीनिंबरगीकरमहाराज हे स्वतः चिमडला येत असत. या रथोत्सवास भक्तगणांची खूप गर्दी होत असते. श्रीसाधुमहाराज हे चिमडचे दैवतच झाले. या दिवशी घरा घरातून श्रीसाधुमहाराजांना नैवेद्य आणला जातो. हे वैभव पाहून श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीसाधुमहाराजांना दिलेल्या आशीर्वादाची सत्यता दिसून येते. ✻✻✻

# प.पू. श्रीसोहिरोबानाथ आंबिये

जन्म
शके १६३६ इ.स.१७१४

निर्याण
चैत्र शु.९ शके १७१४
(रामनवमी) इ.स.१७९२

पूर्वी सावंतवाडी हे संस्थान होते. या संस्थानातील पेडणे महालात पालये या नावाचे गाव होते. या गावात श्री. अनंतराव संझगिरी या नावाचे सात्विक, धर्मशील व शुद्ध चारित्र्याचे गृहस्थ रहात होते. हे संझगिरी घराणे मूळचे कुट्ठाळी या गावचे, पण नंतर ते पालये या गावात स्थलांतरीत झाले. श्री. अनंतराव ज्या घरात रहात होते, त्या घराच्या सभोवताली आम्रराजी (आंब्याची झाडी) होती. म्हणून श्री. अनंतराव यांना आंबिये हे उपनाव मिळाले. श्री. अनंतराव हे शेती करीत असत. त्यांचेकडे गावाचे कुळकर्णीपण होते.

अशा या श्री. अनंतरावांच्यापोटी इ.स. १७१४ साली पुत्र जन्मला. याचे नाव अच्युत (सोहिरोबानाथ) ठेवणेत आले. योग्यांची साक्षात लक्षणे घेऊनच हे अलौकिक बाळ जन्माला आले होते. सामान्य बाळाप्रमाणे हे बाळ जन्मतः रडले नाही. जन्माला येताना डोळे उघडे व बुबळे ऊर्ध्वदिशेला होती. हे सगळे बघून बाळामध्ये काही तरी दोष आहे, असे घरच्या मंडळींना वाटले. पण भिक्षेसाठी आलेल्या एका नाथपंथी जोग्याने भविष्य सांगितले की, 'हा अवतारी पुरूष होणार आहे, तुम्ही घाबरू नका.'

अच्युताला लहानपणापासूनच देवपूजेची आवड होती. अभ्यासातही तो हुशार होता. लहानपणीच त्याने धार्मिक वाङ्मय व संस्कृतभाषेचे पूर्वपाठ तयार केले. अशा या अच्युताने प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. वडिलांच्या आग्रहाखातर त्याने वडिलोपार्जित कुलकर्णीपणाचा स्वीकार केला. त्यांच्या गावाजवळील पेडणे, साखळी, डिचोली इत्यादी भागांचे कुलकर्णीपद त्यांने चांगले सांभाळले. लग्नाचे वय झाल्यावर त्याचे लग्न झाले व ते अच्युतराव झाले. यथावकाश त्यांना दोन मुलगे झाले. अनुक्रमे अनंत व शंकर अशी त्यांची नावे ठेवण्यात आली. मुले मोठी झाल्यावर अच्युतराव हे बांदे येथे रहाण्यास गेले. अच्युतरावांचा बराच काळ हा देवपूजा, धर्मग्रंथांचे वाचन व काही पदरचना करणे यात जात होता. त्यांचे परमार्थाकडेच जास्त अनुसंधान होते. यामुळे त्यांच्यात हळूहळू संतत्व उदयास येऊ लागले.

सावंतवाडी संस्थानामध्ये सोमसावंत ऊर्फ आबा सावंत हे राजे होते. हे राजे मद्य प्यायचे व गावातील प्रजेला छळण्याचे काम करावयाचे. कोणी कुलकर्ण्याने जमाबंदी केली नाही तर, त्याला सराफकट्टयावर उभे करून फटके मारणे हा त्यांना छंद होता. श्री. अच्युतरावांची कीर्ती त्यांच्या कानी आली होती. हे त्यांना सहन होईना. त्यांनी एकदा श्री. अच्युतरावांना सरकारी कामासाठी बोलावले आणि त्यांना म्हणाले, 'तू संत म्हणून मिरवितोस, तो तू देव पाहिला आहेस काय?' हे ऐकून श्री. अच्युतराव शांत बसले. परत ते राजेसाहेब भडकले. यांनी मनात विचार केला की, देव ही पहाण्याची वस्तू नसल्याने, खोटे बोलल्याचे पाप लागेल आणि नाही म्हणावे तर त्यांना प्रचिती आली होतीच. त्यांनी राजेसाहेबांना खरे उत्तर दिले की, 'महाराज, देव दाखवता येत नसतो, तो अंतर्यामी ज्याचा त्याने पहावयाचा असतो.' हे ऐकून राजेसाहेबांना राग आला आणि त्यांनी त्यांना फटकार लगावला. हे बघून श्री. अच्युतरावांना थोडे दुःख झाले आणि त्यांनी भगवंताची प्रार्थना केली.

आश्चर्य असे की, तेथे आत्मतेजाचा साक्षात्कार झाला आणि श्री. अच्युतराव म्हणतात, 'महाराज, तो पहा देव.' वाड्याच्या भिंतीतून भयंकर अग्निज्वाळा प्रगट झाली होती. ही ज्वाळा बघून राजेसाहेब शुद्धीवर आले. त्यांनी श्री. अच्युतरावांचे पाय धरले आणि 'मी चुकलो, मला क्षमा करा' म्हणाले. तेव्हा श्री. अच्युतराव म्हणाले, 'हा देव आता प्रगट झालाच आहे, तो तुझ्यासारख्याचा नाश केल्याशिवाय रहाणार नाही.' ही श्री. अच्युतरावांची भविष्यवाणी खरी ठरली. या राजेसाहेबांनी दारूच्या पिंपावर बसून आग लावून आत्महत्या केली.

असे असणारे श्री. अच्युतराव यांना परमेश्वराच्या चिंतनाखेरीज दुसऱ्या कशात गोडी वाटेना. सारखे ते आत्मचिंतनात असायचे. असेच एकदा श्री. अच्युतराव देवपूजेत मग्न होते. एवढ्यात सावंतवाडीहून राजेसाहेबांचे तातडीचे निमंत्रण आले. श्री. अच्युतरावांना अतीव दुःख झाले. मनाप्रमाणे देवपूजा करता येत नसेल, तर ती नोकरी कशाला हवी? असा विचार मनात आला. शेवटी तशीच देवपूजा सोडून, श्री.अच्युतरावांनी अंगात बाराबंदी घातली आणि निघाले. पत्नीने जेवून जायचा आग्रह केला, पण त्यांनी ऐकले नाही. शेवटी त्यांच्या आईने एक रसाळ फणस दिला आणि म्हटले, 'वाटेत कोठेतरी पाणवठा दिसला की थांब आणि हा फणस खा.' तो फणस घेऊन श्री. अच्युतराव निघाले. वाटेत त्यांना विश्रांतीसाठी एका वडाच्या झाडाखाली एक मोठा दगड दिसला. शेजारीच झरा होता. त्यांनी हात-पाय धुतले आणि फणस फोडला. एवढ्यात त्या वनातून एक आवाज आला, 'बाबू, हमको कुछ देता है?' श्री. अच्युतरावांनी ओळखले की हा कोणी भुकेलेला आहे. त्यांनी जोडल्या हातांनी प्रार्थना केली आणि आश्चर्य असे, आवाज गुप्त झाला आणि आकृती प्रगट झाली. भव्य पुरूष, नाथपंथी वेष बघून श्री. अच्युतरावांनी नमस्कार केला आणि तो फोडलेला फणस त्या योग्यासमोर ठेवला. योग्याने त्यातील ५-६ गरे श्री. अच्युतरावांच्या हातावर ठेवले आणि मस्तकावर हात ठेवला आणि सांगितले की, 'मी गहिनीनाथ - गैबीनाथ, तुझे वैराग्य पाहून मी संतुष्ट झालो आहे. तू यापुढे अच्युत आंबिये नाहीस, तू 'सोहिरोबा'. तू सोऽहं मंत्राचा जप कर. तू अमर होशील.' असे बोलून ती आकृती अदृश्य झाली.

हा प्रकार घडल्यावर त्यांच्या मनात विरक्ती निर्माण झाली आणि ते सावंतवाडीला दरबारात पोहोचले. गेल्या गेल्या त्यांनी कुलकर्णी पदाचा राजीनामा म्हणून सगळे दप्तर व लेखणी राजेसाहेबांच्या समोर ठेवली आणि म्हणाले, 'महाराज, आजवर वेडीवाकडी सेवा झाली. यापुढे होणार नाही.' तेव्हा राजेसाहेबांनी असे न करण्याबाबत विनंती केली. पण श्रीसोहिरोबानाथ आपल्या निर्णयावर ठाम राहिले व नोकरी सोडून घरी आले.

यानंतर श्री सोहिरोबानाथांना अंतःस्फूर्तीने अनेक पदे स्फुरली. पण ती त्यांनी लिहून ठेवली नाहीत. पण ही पदे लिहिणेचे काम त्यांच्या भगिनींनी केले. त्या नेहमी नाथांच्या बरोबर असायच्या. त्यामुळे त्या ती पदे लिहून घ्यायच्या. यानंतर सोहिरोबानाथांनी गृहत्याग करणेचे ठरविले. तोपर्यंत त्यांच्या दोन्ही मुलांची लग्ने होऊन नातवंडेही झालेली होती. श्रीसोहिरोबानाथांनी त्यांच्या अनंत व शंकर या दोन मुलांना गुपचुप जवळ बोलावले आणि उद्या आपण तीर्थयात्रेला जाऊ, तुम्ही माझ्या सोबत या असे सांगितले. मुलांनीही होकार दिला.

याप्रमाणे श्रीसोहिरोबानाथ, आपल्या दोन मुलांसह तीर्थयात्रेसाठी बाहेर पडले. सुरवातीला कोल्हापूरला येऊन त्यांनी श्रीअंबाबाईचे दर्शन घेतले. नंतर ते पंढरपूला गेले. पुढे ते अक्कलकोटला आले. तेथे आल्यावर मठस्थापना करून, काही लोकांना नाथपंथी दीक्षा दिली. तेथून ते मजल दरमजल करीत गुजरात येथील सुरत येथे आले. तेथेही त्यांनी मठस्थापना केली. तेथून ते गिरनार पर्वत व अबूचा पहाड या स्थानावर पोहोचले. हे स्थान नाथांनी तपस्येकरिता पसंत केले. या स्थानावर राहूनच नाथांनी सर्व सिद्धी प्राप्त केल्या. नंतर ते मध्यप्रदेशातील उज्जैयनीला आले. तेथील शिवालयात बरेच दिवस राहिले. तेथे त्यांची सरदार महादजी शिंदे यांची गाठ पडली. त्यांनाही त्यांनी अनुभव दिला. श्रीसोहिरोबानाथांची निस्पृह वृत्ती पाहून श्रीमहादजी शिंदेंनी श्रीसोहिरोबानाथांना उज्जैयनी क्षेत्रात क्षिप्रा नदीच्या तीरावर मठ बांधून दिला व 'श्रीनाथ' अशी राजमुद्राही बनविली.

अशा या उज्जैयनीच्या मठात रामनवमीचा उत्सव सुरू होता. दुपारी रामजन्माचा सोहळा झाला. कीर्तन झाले. रात्र झाली. शिष्यवर्ग झोपी गेला. नाथांनी नित्याप्रमाणे ध्यान-धारणा सुरू केली. एकाएकी नाथांच्या खोलीत लख्ख प्रकाश पडला आणि या प्रकाशात तीन आकृती दिसू लागल्या. मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ आणि जालंदरनाथ असे नाथत्रयी प्रगट झाले. त्यांनी नाथांना साक्षात् दर्शन देऊन आदेश दिला की, 'तुझे येथील कार्य संपले आहे, आमच्या समवेत चल.' याप्रमाणे श्रीसोहिरोबानाथ चैत्र शुद्ध नवमी (रामनवमी) शके १७१४ म्हणजे इ.स. १७९२ रोजी स्वरूपाकार झाले. श्रीसोहिरोबानाथांनी आपल्या आयुष्यात, १. सिद्धांतसंहिता, २. महदनुभवनेश्वरी, ३. अद्वयानंद, ४. पूर्णाक्षरी आणि ५. अक्षण बोध इत्यादि ग्रंथ लिहिले. तसेच त्यांनी अनेक मराठी पदे व हिंदी पदे रचली.

श्रीसोहिरोबानाथांनी आपण निर्याण कशाप्रकारे व केव्हा करणार हे एका अभंगाद्वारे देह ठेवण्यापूर्वी सूचित केले होते. तो अभंग पुढीलप्रमाणे :-

**दिसणे हे सरले । अवघे प्राक्तन हे मुरले ।।ध्रु।।**
**आलो नाही गेलो नाही । मध्ये दिसणे हे भ्रांती ।**
**जागृत होता स्वप्नची हरपे । कपुरन्याये जग हरले ।।१।।**
**दिसणे हाचि जन्म योगिया । ना दिसणे हा मृत्यू म्हणा ।**
**गैबी प्रसादे गैबचि जाहले । आप आपणामध्ये लपले ।।२।।**
**मच्छिंद्र गोरख जालंदर हे । न्याया आले स्वस्वरूपी ।**
**जाता जाता गमन ग्राम ते । समूळ कोठे ना गमले ।।३।।**
**म्हणे सोहिरा सतरा चौदा । मधुमासाचे नवमदिनी ।**
**सगुण स्वरुपी निर्गुण ठेले । अनुभव हरले स्वरूप कळे ।।४।।**

***

## प.पू.श्रीसाधुमहाराज खंदारकर

निर्याण
चैत्र शु.११ शके १८१२
दि.०८.१०.१९७४

पूर्णानदीकाठी परभणी जिल्ह्यात कानखेड यागावी श्री. रामजीपंत या नावाचे सदाचारसंपन्न गृहस्थ रहात होते. त्यांचा प्रपंच हा परमार्थरूप होता. त्यांच्या पत्नीचे नांव रमाई. या महान पतिव्रता होत्या. या दांपत्याला परमार्थाची अत्यंत आवड होती. पण बरेच दिवस यांना पुत्रसंतान नव्हते. त्यामुळे रमाईमाता कायम दुःखी असायच्या.

काही कृपा आपल्यावर व्हावी या हेतूने हे दांपत्य माहूरगडला आले. तेथे त्यांनी श्रीदत्तप्रभूंचे आणि श्रीरेणुकामातेचे दर्शन घेतले आणि त्यारात्री भगवान दत्तप्रभू बटू वेषात आले आणि त्यांनी रमाईमातांच्या ओटीत श्रीफळ /नारळ घातला. यावेळी रमाईमाता एका वेगळ्या अवस्थेत गेल्या आणि दत्तप्रभूंनी आशीर्वाद दिला की, 'तुला या प्रसादाने पुत्रप्राप्ती होईल आणि तो माझा परमभक्त होईल. एकनाथमहाराजच यारुपाने तुझ्या पोटी जन्म घेतील.'

या कृपाप्रसादाने यथावकाश रमाईमाता गर्भवती राहिल्या आणि त्यांना पुत्रप्राप्ती झाली. ज्या खोलीत पुत्र जन्माला आले, त्या खोलीत प्रकाश दाटून राहिला होता. बाराव्या दिवशी बारसे झाले आणि या मुलाचे नांव 'हनुमंत' ठेवणेत आले. यथावकाश हनुमंताची ७व्या वर्षी मुंज झाली आणि विद्यार्जनाला प्रारंभ झाला. वयाच्या १२ व्या वर्षी हनुमंतांनी सगळ्या विद्या प्राप्त केल्या. लहानपणापासूनच हनुमंताला दत्तभक्तीचा छंद होता. यथावकाश अनुरूप वधू बघून रामाजीपंतांनी हनुमंताचा विवाह लावून दिला. हा हनुमंत म्हणजेच आमचे श्रीसाधुमहाराज खंदारकर.

उपजतच दत्तभक्ती असलेने साधुमहाराजांना दत्तदर्शनाची तळमळ लागली. त्यांनी दत्त उपासना अत्यंत निष्ठेने सुरू केली, दत्ताचा धावा सुरू केला. एक दिवस दुपारच्या वेळी श्रीरामजीपंत ओसरीवर बसले होते, एवढ्यात एक यतीपुरुष आले आणि त्यांनी साधुमहाराज (हनुमंत) घरात आहे कां? असे विचारले. तेव्हा हनुमंत बाहेर गेला आहे असे श्रीरामजीपंतांनी सांगितले. तेव्हा ते यतीपुरुष म्हणाले, 'माझा हनुमंताला निरोप द्या, मी सह्याद्री शिखरवासी आहे, गौतमीतीरी जात आहे. गोदावरीतीरी असणाऱ्या सिद्धेश्वर लिंगापाशी त्याला पाठवून द्या.' थोड्यावेळात हनुमंत (साधुमहाराज) आले. श्रीरामजीपंतांनी त्यांना झालेला प्रसंग सांगितला. हनुमंतांना आत्यंतिक आनंद झाला आणि हनुमंताने घर सोडले. मजल दरमजल करता करता, ते गोदावरीकाठी सिद्धेश्वर लिंगापाशी आले आणि साक्षात् दत्तगुरूंनी दर्शन दिले. हनुमंताला अत्यंत आनंद झाला. दत्तगुरूंनी मस्तकावर हात ठेवला आणि आपलेसे केले.

गोदावरीतीरी असताना हनुमंताच्या मनात आले की आपण परत माहूरगडास जावे. याप्रमाणे ते माहूरगडी आले आणि एका एकांतस्थळी ध्यानस्थ बसले. त्यांना ध्यानसमाधी लागली. यावेळी एका शेषाने

हनुमंताच्या मस्तकावर छाया धरली. बराचकाळ हनुमंत या अवस्थेत होते. यावेळी तेथे त्या देशीचा राजा ज्योतसिंह नृपनाथ आला होता. त्याने हनुमंताला बघितल्यावर या हनुमंताचे पाय धरले आणि आपल्या नगरीमधे येण्याची विनंती केली. याप्रमाणे विनंतीला मान देऊन हनुमंताने येणेस होकार दिला. राजाने या हनुमंतांना घोड्यावर बसविले आणि आपण त्या घोड्याचा लगाम घेऊन चालत निघाला. या नगरीत हनमुमंत बराच काळ होते. या हनुमंतांना राजा, 'साधुमहाराज' म्हणून संबोधू लागले व पुढे त्यांचे 'साधुमहाराज' हेच नाव रूढ झाले.

साधुमहाराज एकदा जोतसिंह राजासमवेत शिकारीसाठी वनात गेले. शिकार करता करता ते दोघे एका नदीकाठी आले. नदी दुथडी भरून वहात होती. राजाने नदीमधे प्रवेश केला आणि पोहायला सुरू केले. या राजाबरोबर साधुमहाराजांनीही पाण्यामध्ये प्रवेश करून, पाण्यावर चालायला सुरवात केली. पाण्याने त्यांचे घोटेही भिजले नाहीत. हे दृश्य जेव्हा राजाने बघितले, तेव्हा राजा त्यांचेवर बेहद्द खूष झाला. त्याने साधुमहाराजांना पाच गावांची सनद लिहून दिली. पण साधुमहाराजांनी नम्रपणे या सनदेला नकार दिला. हे बघून राजाने साधुमहाराजांचे पाय धरले आणि कृपा करा असे म्हणाला. याप्रमाणे साधुमहाराजांनी राजावर कृपा करून दिव्य बोध प्रदान केला. सारा वेदांत कथन केला आणि सगुण भजनाचा मार्ग दाखविला. याप्रमाणे साधना करून तो राजा ब्रह्मनिष्ठ झाला.

यानंतर कालांतराने श्रीसाधुमहाराजांनी अन्य स्थळी जावे असे ठरविले. एवढ्यात ज्योतसिंह राजाकडे सेवकाकरवी एक लखोटा आला. ज्योतसिंहचा जयसिंह नावाचा परममित्र होता. तो पांचाळपुरीचा राजा होता. त्या जयसिंहाने ज्योतसिंहाला भेटीसाठी बोलावले होते. ज्योतसिंह राजा या साधुमहाराजांसमवेत पांचाळपुरी आला. खंदारच्या सीमेवर आपल्या मित्राचे व साधुमहाराजांचे स्वागत केले. योग्य तो सन्मान केला. त्यानंतर जयसिंह या राजाने ज्योतसिंहाला मागणी घातली की,''मला तुमचे साधुमहाराज पाहिजेत'' ज्योतसिंहाची अडचण निर्माण झाली. त्याने साधुमहाराजांनाच तू विचार असे सांगितले. याप्रमाणे विचारले असता, साधुमहाराजांनी रहाण्यास होकार दिला. याप्रमाणे साधुमहाराज खंदारगावी राहू लागले. तेथे त्यांनी बरीच साधना केली.

एकदा तडसी ब्राह्मणीचा राजा तिमारावने खंदार नगरीला, राज्यविस्ताराच्या आसुरी आकांक्षेने वेढा दिला. चार हजार सैन्यासह तो आला होता. अकस्मात आलेल्या संकटामुळे राजा जयसिंह चिंताक्रांत झाला आणि साधुमहाराजांचेपाशी आला. साधुमहाराज म्हणाले, 'जयसिंहा मी काय ते बघतो.' स्वतः साधुमहाराज पाचशे सैनिकांसह त्या तिमाराव राजाच्या सैन्यावर चालून गेले आणि विजय खेचून आणला. खंदारी असताना साधुमहाराज नित्य कीर्तन - प्रवचनाद्वारे तेथे प्रबोधन करत होते. या दरम्यान साधुमहाराजांचे वडिलांनी देह ठेवला. आई रमामाता अत्यंत शोकविव्हल झाल्या. साधुमहाराजांनी त्यांना बराच बोध करून समजावण्याचा प्रयत्न केला. तो बोध ऐकून रमामाता अत्यंत धन्यता पावल्या.

खंदार नगरीत बरेच दिवस मुक्काम केल्यावर त्यांनी हे स्थान सोडायचे ठरविले आणि ते पंढरपूरला आले. त्यानंतर मातोश्रींसमवेत ते काशी यात्रेला गेले. तेथून ते प्रयाग, गया इ. क्षेत्रस्थळी आले. याठिकाणी

काही दिवस थांबून ते नागपूरला आले. त्यानंतर ते श्रीनृसिंहसरस्वतींच्या जन्मगावी, कारंजा गावी आले. कारंजा येथे दुष्काळ पडलेला होता. लोक अन्न पाण्याविना मरायला लागले होते. हे बघून साधुमहाराजांचे मन द्रवले आणि त्यांनी सावकार कोण आहे का? याबद्दल चौकशी केली. लोकांनी एक जैन सावकाराचे घर दाखविले. पण सावकाराकडे गहाण काय ठेवावे असा प्रश्न पडला. त्यांनी आपली पत्नी सौ.राधामाता यांना विनंती केली की, 'तुम्ही सावकाराकडे गहाण रहाल का?' त्यावेळी सत्वशील राधामातेने एका क्षणाचाही विलंब न करता गहाण रहाणेस होकर दिला. त्याप्रमाणे पत्नीला गहाण ठेऊन साधुमहाराज १०००/- रुपये घेऊन आले व महिन्याच्या आत रक्कम परत करून पत्नीस सोडवून नेईन असे सांगितले.

पत्नीस गहाण ठेऊन साधुमहाराजांनी गावात यथेच्छ भोजन घातले. तीन दिवस अन्न संतर्पण सुरू होते. अन्नसंतर्पण झालेवर सावकाराचा निरोप घेऊन साधुमहाराजांनी कारंजा गांव सोडले.

माझ्या भक्ताने लोकांच्या करता बायकोला ओलीस ठेवले म्हणून विठूरायाला चैन पडेना. पांडुरंगाने वेशांतर केले. हातात पैशांची थैली घेतली आणि ते सावकाराचे घरी आले. त्यांनी सावकाराला सांगितले की, 'मी साधुमहाराजांचा सेवक आहे. विठू माझे नांव आहे. मी पंढरपूरचा राहणारा आहे. अशी ओळख सांगून, विठूने साधुमहाराजांचे पत्र आणि रु.१०००/- सावकाराच्या स्वाधीन केले.' साधुमहाराजांचे हस्ताक्षर बघून सावकारास ओळख पटली व त्याने पैसे जमा केल्याची पावती त्या विठूस दिली. सावकाराने या राधेमातेस भगिनी या नात्याने चोळी-बांगडी वगैरे दिली आणि म्हणाला, 'माते, मला क्षमा करा. आता लवकरात लवकर तुम्ही साधुमहाराजांना जाऊन भेटा.' निरोप घेऊन विठू सेवक आणि राधामाता यांनी सावकाराचे घर सोडले आणि साधुमहाराज ज्या गावी मुक्कामाला होते, तेथे आले. साधुमहाराजांची वस्ती जवळ येताच शौचाला जाण्याचा बहाणा करून ती पैसे जमा पावती राधामातेजवळ दिली आणि तो वेषधारी परमात्मा अंतर्धान पावला. पत्नीला साधुमहाराजांनी पाहिले मात्र आणि म्हणाले, 'तू आत्ता कशी परतलीस. माझ्या वाचेला तू बट्टा लावलास.' हे ऐकून पत्नी म्हणाली, 'पतीदेवा, तुम्हीच विठू नावाच्या सेवकाला पैसे घेऊन पाठवले होते ना! त्यानेच मला सोडवून आणले.' सावकाराची पैसे भरलेली पावती पाहताच साधुमहाराजांना गहिवरून आले आणि म्हणाले, 'तो विठू नसून, तो नाटकी विठ्ठल परमात्माच असणार आहे.' एवढे उद्‌गार बाहेर पडतात तोच राजस सुकुमार मदनाचा पुतळा असणारे रूप समोर प्रगट झाले आणि देवाने साधुमहाराजांना आलिंगन दिले व परमात्मा अंतर्धान पावला.

पंढरपूराहून साधुमहाराज परत खंदारगावी आले. दरवर्षी साधुमहाराज आषाढी वारीस जात असत. खंदार गावात एक श्रीमंत माणूस रहात होता. तो कायम साधुमहाराजांची निंदा करीत असे. हे साधु भजनी नव्हे, तर भोजनभाऊ आहेत असे तो म्हणे. या निंदकाने एके दिवशी साधुमहाराजांना पावशेर तपकीर आणून दिली आणि 'हे घ्या आयचित अन्न', असे तो कुचेष्टेने म्हणाला. साधुमहाराजांनी त्या तपकिरीचा नैवेद्य दाखवून ती भक्षण केली. पाणी पिऊन ढेकर दिली. इकडे त्या निंदकास वांत्या होऊ लागल्या. मुखावाटे आणि गुदद्वारावाटे तपकीर पडू लागली. जीव हैराण झाला. पश्चात्ताप झाला आणि त्याने साधुमहाराजांची क्षमा मागून चरण पकडले. 'अपकाऱ्या उपकार करिती । याचि नाव परमशांती । त्या शांतीची निजप्रिती । दावी

लोकाप्रती आचरोनी ।।' या नाथोक्तीप्रमाणे साधुमहाराजांनी त्या निंदकास श्रीहरीचे चरणतीर्थ दिले आणि तो पूर्ववत झाला. असे अनेक चमत्कार साधुमहाराजांनी केले.

साधुमहाराजही कीर्तन करीत. कीर्तनात नमनाला दत्तात्रयांवर अभंग असायचा. त्यांची थोडी अभंग संपदा आहे. अभंगात त्यांनी 'रामात्मज' ही मुद्रिका वापरलेली आहे.

साधुमहाराज हे देह ठेवायच्या अगोदर काही दिवस पंढरपूरला राहिले. एक दिवस पांडुरंगाच्या पायावर दर्शन घेत असताना श्रीपांडुरंगाच्या कंठातील पुष्पमाला साधुमहाराजांच्या गळ्यात पडली. हे बघून साधुमहाराज म्हणाले, 'देवानी मला आता निरोप दिला आहे.' यानंतर ते परत खंदारला आले. काही दिवसांनी आपण आता माहूरगडावर जावे आणि दत्तगुरूंच्या चरणी देह समर्पित करावा असा त्यांचा विचार स्थिर झाला. साधुमहाराजांना एक मुलगी होती. ती घरी बाळंतपणासाठी आल्याने पत्नी राधामाता साधुमहाराजांचेबरोबर माहूरगडला गेल्या नाहीत. साधुमहाराजांनी खंदार सोडताना खंदारच्या भूमीला वंदन केले आणि परत या भूमीचे दर्शन होणार नाही या विचाराने त्यांच्या डोळ्यांमधून अश्रू येऊ लागले. ते खंदारच्या सीमेवर आले. खंदारच्या राजाला, 'जो बोध केला होता तो विसरू नको' असे सांगितले आणि उपस्थित लोकांनाही बोध केला. विठ्ठलनामाचा गजर करीत काही लोकांसह साधुमहाराजांनी खंदार सोडले व सायंकाळपर्यंत ते औदुंबर क्षेत्री आले. ऐनाथाच्या मंदिरात सगळे उतरले आणि त्याचरात्री साधुमहाराजांच्या अंगात ताप भरला. त्यावेळी त्यांचेबरोबर शिष्य संताचार्य होते. त्यांचेकडे बघून साधूमहाराज म्हणाले, 'आता दत्तदर्शन होण्याची शक्यता दिसत नाही. ना पंढरी ना माहूर, इथेच आमचे काही घडते की काय?' तो रात्री स्वप्नात ऐनाथांनी दृष्टांत दिला की, ''माझिया वामभागी निश्चित । सखया समाधीस्त पै व्हावे ।।'' म्हणजे माझ्या डाव्या बाजूला समाधीस्थ व्हावे. त्यांचे दर्शनाला गर्दी झाली होती. साक्षात् श्रीदत्तगुरू साधुमहाराजांचे समोर प्रगट झालेले बघून साधुमहाराजांनी श्रीदत्तगुरूंच्या चरणांना मिठी मारली. हे पाहून दत्तगुरूंनी साधुमहाराजांचे अंगावर तीर्थ सिंचन केले. त्यांच्या भौतिक व्याधीचा निरास केला आणि दत्तमहाराज म्हणाले, 'साधुबाबा मी तुझ्या पाठीशी कायम आहे, पण बाळा संन्यासदीक्षा घे.' साक्षात् दत्तगुरूंनी साधुमहाराजांना संन्यास दीक्षा दिली.

साधुमहाराजांचे प्रयाण जवळ आले होते. त्यांच्या दर्शनासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊ लागल्या. नामाने सगळा परिसर दुमदुमून केला. विप्रवेशात साक्षात् पांडुरंग आले. त्यांना बघून साधुमहाराजांनी त्यांना नमस्कार केला. पांडुरंगाने त्यांना पोटाशी धरले. भगवान पांडुरंगानी साधुमहाराजांच्या प्रयाणाची तयारी केली. कृष्णाजिन भूमीवर अंथरले. त्यावर पवित्र चैलासन घालून त्यावर धूतवस्त्र अंथरले. त्यावर साधुमहाराज सहजासन घालून बसले. समोर पांडुरंग परमात्मा आणि पाठीशी दत्तगुरू होते. मुखाने नामोच्चार सुरू होता आणि देवांच्या सानिध्यात साधुमहाराजांनी अक्षय समाधी घेतली. तो दिवस होता चैत्र शुद्ध एकादशी श्रीमुखनाम संवत्सर शके १७३४ इ.स. १८१२. सूर्य मध्यान्ही आला होता.

यावेळी सारे देव साधुमहाराजांवर पुष्पवर्षाव करत होते. श्रीदत्तगुरूंनी साधुमहाराजांना समाधी स्थानी बसविले. स्वतः शिळा झाकली. वर तुळशीदल वाहिले. सगळे उमरखेड व्याकुळतेत विलीन झाले.

***

# प.पू. श्रीगुरूलिंगजंगममहाराज नीलवाणी, निंबरगीकर

जन्म
चैत्र शु.पौर्णिमा (हनुमान जयंती)
शके १७१२ इ.स.१७९०

निर्याण
चैत्र शु.१२ शके १८०७
इ.स.१८८५

कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यात कुप्पेनूर म्हणून गाव आहे. या गावात श्री. सिद्दप्पा मिसलकर हे रहात होते. ते या गावाचे पाटील होते. काही कारणाने ते गदग-बेट्टिगेरी व तेथून ते मंगळवेढे या गावी जाऊन राहिले. यांच्या कुळातील श्रीलक्ष्मणप्पा मिसलकर हे देवर निंबरगी या गावी वास्तव्याला आले. या वंशात कोष्टीपण, निराळीपण (सूत रंगवायचे काम) आणि शेती हे व्यवसाय होते. लिंगायत धर्मात 'नीलवाणी' म्हणून जातीभेद आहे. हाच जातीभेद यांच्या वंशाने निवडल्याने यांचे आडनाव 'नीलवाणी' असे पडले. श्रीलक्ष्मणप्पा यांना नागप्पा नावाचे पुत्र होते. ते सात्विक व हरिभक्त होते. यांना गावात मान होता. यांच्या उदरी श्री भिमण्णा म्हणून जन्मास आले. या श्रीभीमण्णा व सौ. अंबाबाई यांच्या पोटी सोलापूर येथे चैत्र शु. पौर्णिमा (हनुमान जयंती) शके १७१२ म्हणजेच इ.स. १७९० साली पंचपंच उषःकाली एक पुत्र जन्माला आला. हा ज्ञानसूर्याचा उदयच होता. यावेळी सुतिकागारात बराचकाळ प्रकाशाचा लखलखाट झाला होता. या मुलाचे नांव 'श्रीनागाप्पा' ठेवणेत आले आणि जन्म टिपणावरून त्यांचे 'नारायण' हे नाव ठेवणेत आले. पुढे लोक त्यांना 'भाऊ' अथवा 'भाऊसाहेब' म्हणू लागले. हेच भाऊसाहेब म्हणजे आमचे श्रीनारायणराव तथा भाऊसाहेब उर्फ श्रीगुरूलिंगजंगममहाराज निंबरगीकर होत.

महाराज जन्माला आलेनंतर पाचवे दिवशी सिद्धगिरीचे श्रीकाडसिद्धमहाराज हे विरक्त जंगमाचा वेष घेऊन सोलापूरला मातुलगृही आले आणि लिंगायत जातीधर्माप्रमाणे लिंग धारणा केली. त्यामुळे श्रीकाडसिद्धमहाराज हेच श्रीनिंबरगीकरमहाराजांचे दीक्षागुरू व मोक्षगुरू होत. महाराज शाळेला थोडेच दिवस गेले. महाराज ५ वर्षाचे असताना त्यांच्या मातोश्री सौ. अंबाबाई या कैलासवासी झाल्या. त्यामुळे महाराजांचे पालनपोषण वडील भीमाण्णा आणि त्यांच्या चडचण येथील आत्या सौ. देवकाबाई यांनी केले.

महाराजांना वयाच्या ५व्या दिवशी श्रीकाडसिद्धांचा मंत्रोपदेश झाला होता. पण पुढे देहाच्या संबंधामुळे आणि प्रपंचामुळे महाराजांना या उपदेशाचा विसर पडला होता. हे श्रीकाडसिद्धांना चालले नाही. श्रीकाडसिद्ध हे एका वृद्ध (वयातीत) पुरुषाच्या रूपात घोड्यावर स्वार होऊन महाराजांच्या घरी आले. घोड्याला पाणी पाजण्यास त्यांनी घंगाळ व घागर मागितली. एका हातात घंगाळ धरून त्या वयस्क पुरुषाने, दुसऱ्या हाताने पाण्याने भरलेली घागर घंगाळात ओतणेस सुरवात केली. ही अचाट शक्ती पाहून हे श्रीकाडसिद्धच आहेत याची खात्री झाली. महाराजांनी श्रीकाडसिद्धांना नमस्कार केला. तेव्हा श्रीकाडसिद्ध म्हणाले, 'आम्ही सांगितलेल्या गोष्टींचा विसर पडला काय? ' हा प्रश्न ऐकताच महाराज म्हणाले, ''आपण माझी साधनसिद्धता करून देतो असे वचन देत असाल तर सांगिल्याप्रमाणे साधन सुरू करतो.'' हे ऐकताच श्रीकाडसिद्ध 'तथास्तु' म्हणाले आणि तेथून घोड्यासहित अदृश्य झाले.

साधन करण्याची कबुली महाराजांनी श्रीकाडसिद्धांना दिली खरी, पण त्यांना उपदेशाची विस्मृती झाली होती. म्हणून ते सिद्धगिरीला गेले. सिद्धगिरीला श्रीकाडसिद्धांची गुहा प्रसिद्ध आहे. तेथे गेले. गुहेच्या तोंडाला प्रचंड शिळा होती. ती शीळा तशीच असताना श्रीकाडसिद्ध हे गुहेतून बाहेर आले आणि श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या हाताला धरून आत गेले व तेथे त्यांना पुनः अनुग्रह केला. श्रीकाडसिद्धांनी सांगितलेप्रमाणे महाराजांनी ३६ वर्षे दृढनिश्चयाने साधन केले आणि साधनसिद्धता प्राप्त करून घेतली. साधनसिद्धता बघून श्रीकाडसिद्धांनी महाराजांना शरणागत मुमुक्षूंना साधनमार्ग सांगण्याची अनुज्ञा दिली. याप्रमाणे श्रीनिंबरगीकरमहाराज अनुग्रह देऊ लागले. यात प्रामुख्याने श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज, श्रीआद्य रघुनाथाचार्य, महायोगिनी लक्ष्मीबाईअक्का हे त्यांचे प्रमुख शिष्य होत. त्यांनी परमार्थातील परमोच्च पदवी प्राप्त करून घेतली.

श्रीमहाराज हे संध्याकाळी भीमरायाच्या देवळात बिळेनसिद्धाच्या ओवरीत पुराण, पोथी सांगायचे. एक दिवस प.पू. सद्‌गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर हे महाराजांच्या दर्शनाला भीमरायाच्या मंदिरात गेले. तेव्हा त्यांच्या हातात दासबोध होता. महाराजांनी विचारले, हातात  कोणता ग्रंथ आहे. तेव्हा हे म्हणाले, दासबोध आहे. तेव्हा तो दासबोध महाराजांनी हातात घेतला आणि आजपासून मी दासबोध सांगायला सुरू करतो असे म्हणाले आणि आश्चर्य, तेव्हापासून ‘दासबोध’ हा आपल्या संप्रदायाचा प्रमाणग्रंथ झाला.

श्रीनिंबरगीकरमहाराजांचे श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज हे प्रमुख शिष्य होते. या साधुमहाराजांचे प्रमुख दोन शिष्य झाले. एक म्हणजे चिमड येथील प.पू. सद्गुरू रामचंद्रमहाराज यरगट्टीकर आणि दुसरे म्हणजे प.पू. सद्गुरू श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर. या दोन महात्म्यांपैकी श्रीरामभाऊमहाराजांनी चिमड येथे मठ स्थापन केला आणि श्रीभाऊसाहेबमहाराजांनी हिंचगेरी येथे मठ स्थापन केला. या दोन गावांच्या नावावरून चिमड संप्रदाय व हिंचगेरी संप्रदाय अशी नावे पडली. परंतु हे संप्रदाय दोन नसून एकच आहेत, कारण दोघांचेही मूळ स्थान हे श्रीनिंबरगीकरमहाराज आहेत.

श्रीनिंबरगीकरमहारीजांनी आपला निर्याणकाळ ओळखला होता. त्याआधी श्रीनिंबरगीकरमहाराजांना चिमडास यावयाचे होते. श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्रीचिमडचेमहाराजांनी चिमडहून श्री.आल्लाप्पा, श्री.माधवराव भिडे इ. लोकांना गाडी देऊन पाठविले. मंडळी निंबरगीला येताच महाराज गाडीत बसले. तोच पंढरीनाथ व इतर मंडळी तेथे आली. या मंडळींना भीमाबाई नावाच्या बाईने महाराजांना जाऊ देऊ नका अशा शपथा घालून, त्यांना राहते करा असे शिकवून पाठविले होते. एवढ्यात तेथे महाराजांचे अनुग्रहित श्री.भाऊराव देशपांडे आले. त्यांना ‘’ ‘चिमडास मी जाऊ, का नको’ असे श्रीमहाराजांनी विचारले. तेव्हा तेही ‘जाऊ नका’ म्हणाले. या सर्व मंडळींच्या आडकाठीने महाराजांनी चिमडला जाणे रद्द केले. इतक्यात महाराजांच्या अंगात अतोनात ताप भरला. हे पाहून घरची मंडळीही त्यांना जाऊ देईनात. शेवटी महाराजांनी चिमडहून आलेल्या मंडळींना ‘तुम्ही परत जा’ म्हणून सांगितले. त्यावेळी महाराजांना जो ताप आला, तो पुढे कमी झालाच नाही. पुढे महाराज थोडेच दिवस राहिले. महाराजांना कोणी विचारले तर हा ‘चिमडचा ताप’ आहे असे म्हणत.

श्रीनिंबरगीकरमहाराजांना ९५ वे वर्ष लागले. आता कार्य संपले असलेने निजधामी जाण्याचे ठरवून त्यांनी निरवानिरवीस प्रारंभ केला. श्रीमहाराजांनी आपल्या भीमण्णा नावाच्या चिरंजीवांना जवळ बोलाविले आणि 'प्रपंच पाहिजे की परमार्थ पाहिजे' असे विचारले. तेव्हा श्रीभीमण्णामहाराज म्हणाले, 'मी संसारात आहे ते बरे आहे. परमार्थाचे ओझे मला झेपणार नाही.' हे ऐकल्यावर महाराजांनी त्यांना आशीर्वाद दिला.

इ.स.१८८४ च्या पौष महिन्यात चिमडचेमहाराज निंबरगीवारीला आले. तेव्हा श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीलक्ष्मीबाईआक्कांना आज्ञा केली, 'तुम्ही रामभाऊंकडे जा. माझ्यावतीने त्यांच्याकडे परमार्थ सोपवा, परमार्थाने तुमचा लखलाभ होऊ दे. असा आशीर्वाद देऊन, परत या.' आक्कांनी तसे केले. निंबरगीहून परतताना चिमडचे महाराज श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या दर्शनास आले. आक्कांनी महाराजांना विनंती केली की, 'महाराज, रामभाऊंच्या मस्तकावर वरदहस्त फिरवून, ते, त्यांची मुले, नातू व त्यांच्या पिढीला 'परमार्थाचा लखलाभ होऊ दे' असा आशीर्वाद देऊन, नारळ द्या.' याप्रमाणे श्रीनिंबरगीकरमहाराजांनी आशीर्वाद देऊन नारळ दिला.

निर्याणाचा बेत कायम होताच महाराजांनी हविनाळच्या गुरुसिद्धप्पा जाड या नावाच्या आपल्या शिष्यास चिमडला जाऊन तापनाशीतीर्थाचे पाणी आणणेस सांगितले. याप्रमाणे हा शिष्य चिमडला गेला, तीर्थ घेतले व निंबरगीच्या वाटेला लागला. निंबरगी अगदी थोड्या अंतरावर राहिली होती. रात्र झाली म्हणून तो एका धर्मशाळेत वस्तीला राहिला. एवढ्यात एक तहानलेला मनुष्य त्याचे जवळ आला आणि त्याने प्यायला पाणी मागितले. तेव्हा 'हे पाणी मी निंबरगीकरमहाराजांसाठी आणले आहे' असे त्याने सांगितले. परंतु हा मनुष्य, सारखा पाणी मागायला लागलेने नाईलाजाने या श्रीगुरुसिद्धप्पाने ते पाणी त्या मनुष्याला दिले. सकाळी उठून तो निंबरगीस पोहोचला. पहातो तो श्रीनिंबरगीकरमहाराजांनी निर्याण केले होते. त्याला अतोनात वाईट वाटले. मी सरळ निंबरगीस आलो असतो तर महाराजांना तीर्थ मिळाले असते. अशा स्थितीत त्याच दिवशी रात्री त्याला दृष्टांत झाला की, 'धर्मशाळेत ज्या गृहस्थास त्याच्या आग्रहाला मान देऊन पाणी दिलेस तो मीच होतो.' असे आमचे श्रीनिंबरगीकरमहाराज, पार्थिव नाम संवत्सर शके १८०७ (इ.स.१८८५) शुक्रवार चैत्र शु. द्वादशी रात्री १०.४५ वा., 'भजन पूजन साधुनी बळे' हा श्रीतुकाराममहाराजांचा अभंग उच्चारून वयाच्या ९५व्या वर्षी भगवान शिवस्वरूप झाले. लिंगायत धर्मानुसार मुखात लिंग ठेवायचे असते. त्याप्रमाणे मुखात लिंग ठेवतेवेळी महाराजांचे मुख आपोआप उघडले आणि लिंग आत ठेवल्यावर बंद झाले.

***

# छत्रपती श्रीशिवाजीमहाराज

जन्म
फाल्गुन व.३ शके १५५२
दि.१९.०२.१६३०

निर्याण
चैत्र शु.१५ शके १६०२
रविवार दि.५.४.१६८०

छत्रपती श्रीशिवाजीमहाराजांना औरंगाबाद येथील लष्कराच्या खर्चासाठी मोठी रक्कम दिल्लीहून येत आहे अशी बातमी लागली. त्यासरशी त्यांनी आपले निवडक घोडेस्वार बरोबर घेतले आणि बाहेर पडले. कोणालाही कळू न देता रक्कम घेऊन येणाऱ्यांवर महाराजांनी हल्ला केला आणि ते सगळे द्रव्य हस्तगत करून ते रायगडावर पोहोचले. या सर्व कामगिरीमुळे त्यांना अतिशय थकवा आला आणि त्यांच्या छातीत दुखू लागले. थुंकीतून रक्त पडू लागले आणि अंगात ताप भरला. हे दुखणे दिवसेंदिवस वाढतच गेले. अनेक वैद्यांनी उपचार केले. अनेकांनी देवांना नवस बोलला. अनेक प्रकारची अनेकांनी अनुष्ठाने केली, पण तब्येतीला उतार पडेना.

आपण आजारी पडून अत्यवस्थ झाल्याची बातमी बाहेर कळू देऊ नये अशी सक्त ताकीद त्यांनी आपल्या कारभाऱ्यांना दिली होती. आपला अंतकाळ जवळ आला असे त्यांना वाटलेने महाराजांनी आपल्या सर्व कारभारी आणि आप्तजनांना जवळ बोलावले. त्यावेळी त्यांचेजवळ प्रामुख्याने मोरोपंत पेशवे, बाळाजी चिटणीस, रामचंद्रपंत अमात्य, सूर्याजी मालुसरे इ. गृहस्थ होते. या सगळ्यांना अनुलक्षून महाराज म्हणाले, ''आमच्या आयुष्याची मर्यादा संपली. आता आमचा निधन समय दिसतो आहे. अतःपर आमचा देह रहात नाही. आमच्या वडिलांची चाळीस हजार होनांची जहागिरी होती. ती वाढवून एक कोट होनांचे राज्य आम्ही मिळविले. ऐशी हजार पागा केली. हे राज्य आमच्या मागे मर्दुमकीने, हिंमतीने आणि हुशारीने रक्षण करणारा असा पराक्रमी पुत्र नाही.''

अशाप्रकारचे निरुत्साहाचे भाषण महाराजांनी केले. हे ऐकून सर्वांचे कंठ दाटून आले. सगळयांच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या. सगळयांना आत्यंतिक झालेले दुःख पाहून महाराज बोलले, ''तुम्ही अणुमात्र श्रमी होऊ नका. ह्या मानवी देहास ईश्वराने मृत्यू नेमिला आहे. हा मृत्यूलोक आहे. जितके उत्पन्न झाले तितके जावयाचे. चिरंजीव असा कोणीच नाही. धन, सूत, जाया, वीरश्री, पराक्रम, अहंता ही सर्व मिथ्या आहे. त्यास लुब्ध होऊन मोहवश झाल्याने चित्तास नसती तळमळ लागते. तुम्ही सर्व पराक्रमी आहात. कळेल तसा प्रयत्न करून स्वराज्याचे रक्षण करा. सर्वजण एका विचाराने वागा. आमच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून तुम्ही करावयाचे तेवढे प्रयत्न केले. आता प्रयत्न करू नका. आमची आयुष्याची मर्यादा संपली. आम्ही स्वर्गानुभवास जावयास सिद्ध झालो. आता तुम्ही सावध रहा. आमच्यामागे क्रियापूर्वक राज्य रक्षण करा. विवेकाने चित्ताचे समाधान करावे.'' याप्रमाणे महाराजांनी उपस्थितांचे सांत्वन केले व सगळ्यांना महालाबाहेर जाणेस सांगितले.

मग त्यांनी भागीरथीचे उदक आणून प्रायश्चित्त विधियुक्त स्नान केले. सर्व अंगास अग्निहोत्राचे भस्मलेपन करून त्यांनी रुद्राक्ष आणि तुळशीमाळा धारण केल्या. दर्भासनावर बसून मोठ्मोठ्या पंडितास व

संन्याशांना जवळ बोलविले आणि त्यांचेबरोबर आत्मनात्मविचार चालविला. अशी विरक्तता धारण करून ते सर्वकाळ भगवद्भजन करू लागले. शत गोप्रदाने आपल्या समक्ष करवून, त्यांनी सहस्रगोप्रदानांचा द्रव्यद्वारा संकल्प केला आणि भगवद्गीता व सहस्रनाम यांचे पाठ म्हणणेस सांगितले. असा आसमंतात ब्रह्मवृंदांच्या वाणीचा घोष चालला असतानाच रौद्रनाम संवत्सर, उत्तरायणी, चैत्र शु. पौर्णिमा शके १६०२, रविवार दिनांक ०५.०४.१६८० रोजी, दोन प्रहरी मुखाने 'श्रीराम श्रीराम श्रीराम' असा उच्चार करून श्रीशिवाजीमहाराजांनी आपला देह ठेवला.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत शिवाजीमहाराज यांची आरती**

क्षत्रिय-कुलावतंसा जय जय शिवराया ।
आरती ओवाळितो वंदुनी तव पाया ।
गोब्राह्मण-प्रतिपाळा छत्रपती सदया ।
समर्थ श्रीतुकयाची तुम्हावरी छाया ।।१।।
जयदेव जयदेव जय जय शिवराया ।
प्रेमे आरती करिता पुलकित ही काया ।।ध्रु।।
सर्व मराठा तितुका कैचा मेळविला ।
महाराष्ट्रा जागवुनी धर्म उभा केला ।
भगवा झेंडा गगनी फडफड फडकविला ।
रामराम भेटीचा संकेतची घडला ।।२।।
समर्थ चरणी तन मन राज्यही अर्पियले ।
ऐसे नाही कोठे आजवरी घडले ।
मातेसम पर नारी कवतुक दावियले ।
विश्वबंधुभावे विश्ववंद्य ठरले ।।३।।
रामराज्य हे कैसे भूवरी प्रगटविले ।
अष्टप्रधान नेमुनी लोकराज्य केले ।
व्यवहारी परमार्थी सुराज्य नांदविले ।
शिवराया तव चरणी **दासराम** लोळे ।।४।।

# प.पू. भगवान श्रीधरस्वामीमहाराज

जन्म
मार्गशीर्ष शु.१५, शके १८३०
(दत्तजयंती) दि.७.१२.१९०८

निर्याण
चैत्र व.०२, शके १८९५
दि.१९.०४.१९७३

मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात देगलूर हे गाव आहे. सदरचे गाव श्रीधुंडामहाराज देगलूरकर यांच्यामुळे प्रसिद्ध आहे. या देगलूर गावात श्री. नारायणराव पतकी रहात होते. त्यांना श्री. गोविंदराव या नावाचे वडीलबंधू होते. हे दोघे लहानपणी आपल्या चुलत्याकडेच रहायला होते. लहानपणी खूप त्रास व कष्ट सहन करावे लागले म्हणून ते गाव सोडून, ते दोघे हैद्राबाद येथे आले. तेथे एका श्रीमंताची भेट झाली. परिचय वाढला आणि या श्रीमंतानेच या दोघांचे विवाह करून दिले. श्री. गोविंदराव यांना मूलबाळ झाले नाही. श्री. नारायणराव यांच्या प्रथम पत्नी निवर्तल्या. त्यामुळे त्यांनी दुसरा विवाह केला. द्वितीय पत्नीचे नाव कमलाबाई होते.

या श्री.नारायणराव व सौ. कमलाबाई या दांपत्याला त्रिंबक, गोविंद आणि गोदावरी ही तीन अपत्ये झाली. यातील त्रिंबक व गोविंद या दोन मुलांचे अकाली निधन झाले. याबाबत त्यांनी त्यांच्या पुरोहितांशी विचारणा केली. तेव्हा त्या पुरोहितांनी सांगितले की, 'तुमच्या घराण्याला सर्पशाप आहे. त्यामुळे तुमची दोन्ही मुले अल्पायुषी ठरली आहेत.' तेव्हा पुरोहितांनी या दांपत्याला गाणगापूरला जाऊन तपश्चर्या करणेस सांगितले. याप्रमाणे श्रीनारायणराव व त्यांच्या पत्नी हे दोघे गाणगापूरला गेले. तेथे त्यांनी श्रीदत्तात्रेयांची उग्र तपश्चर्या केली. त्यांची तपश्चर्या बघून श्रीदत्तमहाराज प्रसन्न झाले आणि त्यांनी मीच तुमच्या पोटी अंशरूपाने अवतीर्ण होणार आहे असे सांगितले. श्रीदत्तात्रेयांच्या आशीर्वादानुसार श्री.नारायणराव यांच्या पोटी मार्गशीर्ष शु. १५ दत्तजयंती, शके १८३०, दि.०७.१२.१९०८ साली सायं. ७.३० वाजता गाणगापूर जवळील लाड चिंचोळी या गावात पुत्र जन्माला आला. त्याचे नाव 'श्रीधर' असे ठेवणेत आले. हा 'श्रीधर' म्हणजेच आमचे श्रीश्रीधरस्वामीमहाराज होत.

श्रीधरस्वामींच्या वयाच्या तिसऱ्या वर्षी वडील आणि बाराव्या वर्षी आईचे देहावसान झाले. त्यामुळे श्रीधरस्वामी आपले मावशीकडे रहाण्यास गेले. त्यानंतर ते इंग्रजी शिकणेसाठी पुणे येथे आले. माधुकरी मागून ते तेथे शिक्षण घेत होते.

श्रीधरस्वामींना प्रभू रामचंद्रांविषयी फारच प्रेम होते, वैराग्यवृत्ती होती आणि ते एकांतप्रिय होते. वयाच्या १८व्या वर्षी म्हणजेच इ.स.१९२६ साली त्यांनी पुणे सोडले आणि त्यांनी सज्जनगडावर समर्थांच्याकडे जाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणे ते सज्जनगडावर आले. सज्जनगडावर आल्यावर त्यांच्या पारमार्थिक जीवनाला प्रारंभ झाला. सज्जनगडावर त्यांनी अतोनात सेवा केली. समर्थांच्या समाधीच्या पूजेसाठी लागणारे साहित्य ठेवणे, पूजेनंतर काढलेली वस्त्रे स्वच्छ धुणे, पूजेसाठी लागणारी फुले वगैरे सर्व आणणे इ. सेवा ते नित्यनेमाने करीत असत. याव्यतिरिक्त दासबोध वाचन, करुणाष्टके म्हणणे, जप व उपासना करणे हा त्यांचा

नित्यक्रम सुरूच होता. तसेच अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे जे कोणी सज्जनगडावर दर्शनाकरिता येतील, त्यांचे सामान आपल्या खांद्यावर घेऊन वर गडावर ठेऊन यायचे आणि परत खाली येऊन उभे रहायचे अशी सेवा त्यांनी केली. हा क्रम त्यांचा सलग तीन वर्षे सुरू होता. श्रीधरस्वामी यांची सेवा बघून इस.१९३० च्या दासनवमीला समर्थांची त्यांना कृपा प्राप्त झाली. समर्थांनी त्यांना प्रत्यक्ष दर्शन दिले आणि समर्थांनी स्वतः त्यांना 'भगवान' नावाने संबोधले. समर्थांच्या आज्ञेनुसार सज्जनगडावरून ते दक्षिणेस संचाराकरिता बाहेर पडले. सुरवातीला गोकर्ण, नंतर शिगेहळ्ळी येथे राहिले. तेथे त्यांची शिवानंदस्वामी यांचेशी भेट झाली. त्यांच्या मठात श्रीधरस्वामी राहिले. तपःसाधना केली. पुढे ते कोडसाद्री पर्वतावर साधनेकरिता गेले. तेथे तपसाधना केली. तेव्हा त्यांना आद्य जगद्गुरू श्रीशंकराचार्यांनी दर्शन देऊन ब्रह्मासनावर बसविले आणि आशीर्वाद दिला. इ.स. १९३५ साली ते परत सज्जनगडावर आले. सज्जनगडावर आल्यावर तेथे त्यांनी मराठी, संस्कृत, कानडी इ. भाषेमध्ये गद्य व पद्य रचना केली. इ.स. १९४० साली भक्तमंडळींच्या आग्रहाखातर ते पुन्हा कर्नाटक राज्यात संचाराकरिता गेले. १९४३ साली विजयादशमी या दिवशी त्यांनी ब्रह्मचर्य आश्रमातून एकदम संन्यास आश्रम स्विकारला. अंगी विरक्ती असलेने हे शक्य झाले.

यानंतर श्रीधरस्वामी हे भारतातील अनेक मोठमोठ्या शहरात गेले व तेथे त्यांनी चातुर्मास केले. समर्थांची ३५० वी जयंती मोठ्याप्रमाणात साजरी केली. १९४९ साली गुरूपौर्णिमेला श्रीधरस्वामी सज्जनगडावर आले. त्यांनी 'समर्थ सेवा मंडळाची' स्थापना केली आणि या माध्यमातून त्यांनी समर्थ वाङ्मयाचा, तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला. सज्जनगडावर आज ज्या सोयी सुविधा दिसतात, त्यामागे श्रीधरस्वामींचे मोठे योगदान आहे. १९५३ साली कर्नाटकातील सागर जिल्ह्यात वरदपूर येथे त्यांनी 'श्रीधराश्रम' स्थापन केला आणि तेथेही कार्य सुरू केले. अशा या श्रीधरस्वामींनी १९६७ सालापासून एकांत साधना सुरू केली आणि चैत्र वद्य द्वितीया, शके १८९५ दि. १९.०४.१९७३ रोजी सकाळी ९ वाजता ''ॐकाराचा'' तीन वेळा उच्चार करून, वयाच्या ६५ व्या वर्षी, वरदपूर येथे आपला देह ठेवला.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीधरस्वामी यांची आरती**

आरती श्रीधरा । जय तेजोभास्करा ।
अपार साधन केले । नमीतसे गुरूवरा ।।ध्रु।।
सद्गुरू रामदास । दावी आत्मप्रकाश ।
समाधीसी प्रगट झाले । तेणे ओळला जगदीश ।।१।।
अंतरी जपमाळ । मौन सकळ साधले ।
नामरूप एक होता । दत्तरूपी प्रगटले ।।२।।
श्रीधरस्वामी राया । करीतसे प्रार्थना ।
**दासराम** मागतसे । नामी वेड लावी मना ।।३।।

# ब्रह्मीभूत प.पू. श्रीनानामहाराज तराणेकर तथा श्रीचैतन्यानंद सरस्वती

जन्म
श्रावण शुद्ध ५ शके १८१८ गुरुवार
दि.१३.०८.१८९६

निर्याण
चैत्र वद्य १०, शके १९१५ शुक्रवार
दि.१६.०४.१९९३

मध्यप्रदेशातील तराणे गावी वेदमूर्ती श्री. शंकरशास्त्री तराणेकर रहात होते. ते उत्तम वैदिक, याज्ञिक आणि आदरणीय शास्त्री होते. सहा शास्त्रांचे अध्ययन आणि कर्मकांडावर भर असणारे गृहस्थ होते. शिस्तीला अत्यंत करडे पण मनाने अत्यंत प्रेमळ होते. यांच्या पत्नीचे नाव सौ. लक्ष्मीबाई. याही अत्यंत प्रेमळ, सात्विक आणि श्रेष्ठ साधक होत्या. श्री.शंकरशास्त्रींना श्रीतात्याजी या नावानेही लोक संबोधत असत. यांचे घरात पिढ्यान्‌पिढ्या दत्त भक्ती होती. श्रीशंकरशास्त्री यांची प.पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंब्ये स्वामी महाराजांवर अपार श्रद्धा होती. त्यांच्या केवळ स्मरणाने श्री.शंकरशास्त्रींचे ठिकाणी अष्टसात्विकभाव निर्माण होत असत. इ.स.१८७८ साली शंकरशास्त्रींना प.पू.श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचा अनुग्रह प्राप्त झाला.

अशा या श्रीशंकरशास्त्री आणि सौ.लक्ष्मीबाई या दांपत्याचे पोटी तराणा (मध्यप्रदेश) येथे श्रावण शु.पंचमी, गुरूवार शके १८१८ दिनांक १३ ऑगस्ट १८९६ रोजी पुत्ररत्न अवतीर्ण झाले. पुत्ररत्न झालेची वार्ता श्री. शंकरशास्त्री यांना कळताच त्यांचा चेहरा आनंदाने फुलून गेला. त्यांनी सहाणेवर मधातुपाच्या मिश्रणात सुवर्णाचे चार वेढे उगाळून ते मिश्रण या नवजात शिशूला चाटवीत, पुत्राचे मुखावलोकन केले. यथाशास्त्र जातकर्म विधी केला. बाराव्या दिवशी या मुलाचे बारसे करणेत आले व बाळाचे नांव ‘मार्तंड’ असे ठेंवणेत आले. हा मार्तंड म्हणजेच आमचे ‘ब्रह्मीभूत श्रीनानामहाराज तराणेकर’ होत.

श्रीनानांचे लौकिक शिक्षण हे तराणा येथील मराठी शाळेत झाले. पण हे शिक्षण थोडेसेच झाले. श्रीनाना शाळेत असताना शाळेच्या हेडमास्तरांना भेटण्यासाठी एक गृहस्थ आले. या गृहस्थांना भेटण्याची हेडमास्तरांची इच्छा नव्हती. म्हणून हेडमास्तरांनी श्रीनानांना बोलावले आणि सांगितले की तू त्या बाहेर आलेल्या गृहस्थांना सांग की, हेडमास्तर शाळेत नाहीत. ते बाहेर गेले आहेत. आपल्या हेडमास्तरांनी आपल्याला खोटे बोलण्यास सांगितले म्हटल्यावर श्रीनाना हेडमास्तरांना म्हणाले, हा निरोप मी बाहेर देणार नाही. खोटे बोलणार नाही. तेव्हा हेडमास्तर श्रीनानांवर डोळे वटारून ओरडू लागले. हे बघून श्रीनाना म्हणाले, सर, तुम्ही ओरडू नका ज्या शाळेत खोटे बोलायला शिकवतात, त्या मास्तरांना आणि शाळेला माझा रामराम असे म्हणून त्यांनी शाळेला एक साष्टांग नमस्कार घातला आणि पाटी-पेन्सील घेऊन ते शाळेच्या बाहेर पडले, ते कायमचेच. वयाच्या आठव्या वर्षी म्हणजे इ.स. १९०४ साली माघ महिन्यात श्रीनानांची मुंज झाली. यानंतर आपले पिताश्री श्रीशंकरशास्त्री यांचे देखरेखीखाली त्यांचे नित्यकर्म सुरू झाले. पहाटे तीन वाजता श्रीनानांचा दिवस सुरू होत असे. दररोज १२०० गायत्री जप श्रीनाना करीत असत. हा जप रोज व्हायलाच पाहिजे असा श्रीनानांचे वडिलांचा दंडक होता. ज्या दिवशी आळसामुळे हा जप पुरा झाला नाही, तर त्या दिवशी श्रीनानांना दुपारचे जेवण मिळत नसे. तसेच दररोज औदुंबर वृक्षाला ४०० प्रदक्षिणा घालत असत. दुपारचे जेवण झाले की त्यांचे वडील श्रीनानांकडून निरनिराळ्या पोथ्या वाचून घेत. १९०४ साली श्रीटेंब्ये

स्वामी काही काळ तराण्यास होते. तेथे त्यांची प्रवचने होती. ही प्रवचने ऐकण्यास श्रीनाना वडिलांबरोबर जात असत. श्रीनानांवर टेंब्येस्वामींचे फार प्रेम होते. ते श्रीनानांना आपल्या जवळ बसवून घेत. त्यामुळे नकळत श्रीनानांच्या अंतःकरणात गुरूप्राप्तीचे बीज रुजले गेले.

एक दिवस श्रीनाना आपल्या वडिलांना म्हणाले, 'बाबा, मला आपणाकडून अनुग्रह पाहिजे.' तेव्हा वडील म्हणाले, 'अरे मी तुझा गुरू नाही. तुझे गुरू वेगळे असून, ते योग्य वेळी तुला दर्शन देतील. आता तू गुरूचरित्राचे पारायण कर.' त्याप्रमाणे श्रीनानांनी १९०४ साली आई-वडिलांना नमस्कार करून गुरूचरित्राचे पारायण सुरू केले. लागोपाठ सात सप्ताह केले. (त्यातील काही केवळ पाणी पिऊन) पण दर्शन होईना. त्यांच्या भावनेचा बांध फुटला आणि ते ओक्साबोक्शी रडू लागले. इतक्यात एका प्रकाशझोतात ब्रह्मावर्ताहून वायूवेगाने श्रीटेंब्येस्वामींचे आगमन झाले. श्रीटेंब्येस्वामींनी श्रीनानांच्या मस्तकावरून हात फिरवला आणि जवळ घेतले. श्रीनानांनी यथासांग श्रीटेंब्येस्वामींची पूजा केली. आपली छाटी श्रीनानांच्या अंगावर पाघरून स्वामींनी श्रीनानांना मंत्रोपदेश केला आणि 'चैतन्यानंद सरस्वती' असे नामकरण केले. यावेळी श्रीनानांना समाधी लागलेली होती. हा अनुग्रह कार्तिक पौर्णिमा १९०४ साली झाला. यावेळी श्रीनाना हे केवळ नऊ वर्षांचे होते.

इ.स.१९१४ साली इंदूरचे श्रीशंकरराव डाकवाले यांची कन्या भीमा हिच्याबरोबर श्रीनानांचखा विवाह झाला. लग्नात त्यांचे नांव 'म्हाळसाबाई' ठेवणेत आले. इ.स.१९१३ साली महाराजांचे वडिल श्रीशंकरशास्त्री यांचे देहावसान झाले आणि त्यांचेनंतर बरोबर ३ महिन्यांनी मातोश्रींचे देहावसान झाले. श्रीनानांचे मातृपितृछत्र हारपले. इ.स. १९१६ साली श्रीनानांनी पहिली काशीयात्रा केली. त्यानंतर श्रीटेंब्येस्वामींच्या आज्ञेने त्यांनी नर्मदा परिक्रमा पूर्ण केली. त्यानंतर त्यांनी भारतभर तीर्थक्षेत्र दर्शनासाठी भ्रमण आरंभिले. बद्रीनाथ व केदारनाथ येथे शिवदर्शन घेऊन ते हिमालयात गेले. हिमालयात एक गुहेत त्यांची एका योगीपुरुषाशी गाठ पडली. या योगीपुरुषाने श्रीनानांना योगसाधनेतील गोष्टी सांगितल्या. योगाचे अनेक प्रकारही शिकवले. आपण महाभारत काळापासून समाधी लावून बसल्याचे व साक्षात भगवान गोपाळकृष्णाने आपल्याला दीक्षा देऊन योगसाधना सांगा असा आदेश दिल्याचे सांगितले. नंतर या योगीपुरुषाने श्रीनानांना पुढील प्रवासाबाबत विचारणा केली. तेव्हा श्रीनाना म्हणाले, 'मला आमच्या महाराजांनी गंगातीरी गंगानदीचे दर्शन घेण्यास जाणेस सांगितले आहे.' हे ऐकून तो योगी म्हणाला, 'तू आता माझे पाय घट्ट पकडून ठेव व डोळे मिटून घे. मी सांगितल्याशिवाय तू डोळे उघडू नको. डोळे उघडलेस तर कोठेतरी मधे पर्वतामध्ये पडशील.' त्याप्रमाणे श्रीनानांनी त्या योग्याचे पाय घट्ट पकडले आणि डोळे मिटून घेतले. काही क्षणाने योग्याने डोळे उघडण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्रीनाना डोळे उघडतात तो, गंगानदीच्या घाटावर ते होते. पण तो योगी तेथून अदृश्य झालेला होता.

इ.स.१९१७ साली श्रीनाना गुरूचरित्राची २१ पारायणे करणेकरता श्रीक्षेत्र गाणगापूर येथे गेले. पारायण सुरू केले आणि एकवीस पैकी एक पारायण पूर्ण होताच रात्री श्रीदत्तात्रेयांनी आदेश दिला की, 'आमची छाटी धुणे, मठ झाडणे, पूजेला नदीवरून पाणी आणणे इ. सेवा तुम्ही करा. हीच तुमची पारायणे आहेत आणि हीच

आमची सेवा आहे.' इकडे श्रीदत्तात्रेयांनी याबाबत पुजाऱ्यांनाही दृष्टांत दिला. श्रीनानांनी गिरनार यात्राही केली. या यात्रेत त्यांना श्रीगिरीनारी, श्रीअवधूत दर्शन, नाथ दर्शन इ. अनेक देवदेवतांचे दिव्य दर्शन झाले. महत्वाचे काय असेल तर या यात्रेत श्रीनानांना अश्वथाम्याचे दर्शन झाले.

इ.स.१९२० साली श्रीनानांना पुत्रप्राप्ती झाली. मुलाचे नांव शंकर असे ठेवणेत आले. त्यांनाच पुढे दादा/भैय्यासाहेब म्हणत असत. इ.स.१९२३ साली श्रीनानांच्या पत्नी सौ. म्हाळसाबाई यांना देवाज्ञा झाली. यामुळे श्रीनानांनी दुसरा विवाह केला. याही पत्नीचे नाव त्यांनी म्हाळसाबाई ठेवले. इ.स.१९२६ साली श्रीवामनबुवा ब्रह्मचारी या योगीराजांनी श्रीनानांना योगदीक्षा दिली आणि अवघ्या १५ दिवसात बुवांनी श्रीनानांना समाधीपर्यंतचे पूर्ण शिक्षण दिले. इ.स.१९२९ साली साक्षात् श्रीदत्तप्रभू चांदीच्या अंगुष्ठमात्र मूर्तीच्या रूपात श्रीनानांच्या घरी रहावयास आले.

श्रीनानांनी आपल्या आयुष्यात अनेक यज्ञ याग केले, करविले. प्रमुख आचार्य म्हणूनही त्यांनी अनेक यज्ञ संपन्न केले. मुहूर्त टळू नये म्हणून केवळ आपली प्रेरक, प्रखर दृष्टी स्थंडीलावर (यज्ञासाठी तयार केलेली जमीन/ओटा) रोखून यज्ञात अग्नि प्रगट केला. इंदूरचे महाराज श्रीमंत तुकोजीराव होळकर यांना श्रीनानांनी व्याधीमुक्त केले. यामुळे होळकर परिवारात श्रीनानांना मान होता. श्रीनाना काही वर्षे या होळकरांच्या राजवाड्यात रहायला होते. जवळ जवळ ते तेथे ३ वर्षे वास्तव्याला होते. पण ते केवळ फलाहारावरच राहिले. श्रीनाना हे भक्ताधीन होते. ते कोणालाही कधीही लागेल असे बोलत नसत. ते सर्वांशी अत्यंत प्रेमाने, जिव्हाळ्याने वागत. श्रीनानांना मराठी, हिंदी, संस्कृत, अर्धमागधी इ. भाषा येत असत. श्रीनानांना संगीताची उत्तम जाण होती. खड्या आवाजात ते वेगवेगळ्या रागात भजने म्हणत असत. ज्योतीषाच्या सर्व अंग-उपांगाची त्यांना जाण होती. व्यक्ती समोर येताच त्यांना त्याच्या पूर्व जन्माची आणि विद्यमान जन्मासह पुढील जन्माची क्षणार्धात जाणीव होई. श्रीनानांच्या मार्गदर्शनाखाली त्रिपदी परिवाराची निर्मिती झाली. त्रिपदी म्हणजे वैदिक प्रार्थना, मंत्रपाठ आणि जप यांचे एकत्रित रुप आहे.

श्रीनानांच्यावर प.पू.श्रीगुळवणीमहाराजांचा प्रभाव होता. एक दिवस श्रीगुळवणीमहाराज श्रीनानांच्या घरी आले. आल्या आल्या श्रीगुळवणीमहाराजांनी श्रीनानांना खाली वाकून नमस्कार केला. हे बघून श्रीनानांनी त्यांना थोपवण्याचा प्रयत्न केला आणि म्हणाले, 'अहो, वामनराव हे काय करीत आहात?' तेव्हा गुळवणीमहाराज म्हणाले, 'नानाजी मी योग्यच केले. आम्हाला येताना पाहताच आपण उभे राहिलात, पुढे येऊन आमचे अगदी मनापासून स्वागत केलेत. त्यामुळे आम्ही खूप भारावून गेलो.' हे ऐकून श्रीनाना म्हणाले, 'अहो हे करायलाच पाहिजे.' हे ऐकून श्रीगुळवणीमहाराज म्हणाले, 'अहो नानाजी आपला अधिकार फार मोठा आहे. आम्ही आपले स्वागत करून वंदन केले पाहिजे. तसे केले नाही तर थोरल्या स्वामीमहाराजांच्या (टेंब्येस्वामींच्या) रोषास पात्र होऊ.' हे ऐकून श्रीनाना म्हणाले, 'असे कसे म्हणता वामनराव? आपण आमच्यापेक्षा १० वर्षांनी मोठे (वडील) आहात. हे आम्हाला विसरता येणार नाही.' हे ऐकून गुळवणीमहाराज म्हणाले, 'हे अगदी खरे आहे. पण हा झाला लौकिक व्यवहार. पण खरे सांगू का? नानाजी, तुम्हाला श्रीटेंब्येस्वामींनी माझ्या आधी ६ वर्षे अनुग्रह दिलेला आहे. त्यामुळे आपण गुरूबंधू म्हणून माझ्यापेक्षा ६ वर्षांनी मोठे आहात.' त्यासाठी हा

नमस्कार केला. हे ऐकून श्रीनाना सद्‌गदित् झाले.

असे श्रीनाना सांगलीला श्री. ग. वा. परांजपे सर यांचेकडे यायचे. एक दिवस ते श्री. परांजपे यांना म्हणाले, की उद्या सकाळी ७.०० वाजता आपल्याला श्रीमामामहाराज केळकर यांचे दर्शनाला जायचे आहे. याप्रमाणे श्री. परांजपे यांनी रिक्षा ठरविली. पण रिक्षेला यायला थोडा वेळ लागला. ७ वाजले म्हटल्यावर पायात वहाणा न घालता श्रीनानांनी घर सोडले आणि काही अंतर चालत पुढे गेले. एवढ्यात रिक्षा आली, रिक्षात ते बसले आणि श्रीमामामहाराजांच्या वाड्यात (श्रीरामनिकेतन) येथे आले. मंदिरात आल्यावर श्रीनाना, श्रीमामामहाराजांच्या समाधीसमोर बसले. तेव्हा त्यांना अर्धा तास समाधी लागली आणि त्यानंतर ते एक वाक्य बोलले, 'इथले (श्रीरामनिकेतनमधील) वायुमंडल अतिशय शुद्ध आहे.'

श्रीनानांनी समक्ष तसेंच स्वप्नदृष्टांत देऊन अनुग्रहित केले. अनेक लोकांना मार्गदर्शन केले. गुरूकृपेइतके काहीही श्रेष्ठ नाही, नामस्मरण सोडू नका, असे ते वारंवार सांगत. कोणाचेही मन दुखवू नका, सर्वांशी गोड बोला. कोणाला लागेल असे बोलले तर बोलणाऱ्याची साधना, तपस्या संपुष्टात येते, असे ते नेहमी सांगत. सद्‌गुरूंनी दिलेली उपासना प्रेमाने, निष्ठेने व नियमितपणे करा. केवळ गुरूसेवेमुळेच अष्टसिद्धी, नवविधी आणि सगळ्या विद्या या गुरूसेवा करणाऱ्याच्या दास बनून राहतात हे विसरू नका, असे श्रीनाना नेहमी सांगत.

अशा श्रीनानांचे दिवसेंदिवस शरीर थकत चालले होते. इ.स. १९९२ पासून आपण आपल्या मूळ स्वरूपात विलीन व्हावे अशी ओढ त्यांना लागली होती. त्यांनी आपला आहार कमी केला आणि मौन धारण केले. त्यांना चमच्याने पातळ आहार देणेत येत होता. त्यांच्या जवळ श्रीअरविंदकाका आगाशे या नावाचे निष्ठावान भक्त होते. त्यांनी श्रीनानांची अतिशय सेवा केली. बिछान्यावर पडून श्रीनाना हे मागील अनेक प्रसंग आठवत होते. आपल्या ९७ वर्षातील अनेक प्रसंग त्यांच्या डोळ्यापुढे येत होते. श्रीनानांच्या चेहऱ्यावर थोडेसे हास्य उमटले हे पाहून श्रीअरविंदकाका त्यांना म्हणाले, 'नाना, काय हवयं? बरे वाटतयं ना?' त्यावर 'काहीही नको' म्हणून श्रीनानांनी हातानेच खूण केली. शुक्रवार दि.१६ एप्रिल १९९३ चा दिवस उजाडला. कोमट पाण्याने श्रीनानांचे शरीर श्री. अरविंदकाकांनी पुसले. त्यांना विचारले, नाना आता कसं वाटतंय!. श्रीनाना किंचित हसले. त्यांना त्यांच्या सुनेने चहा आणला होता. तो चार पाच चमचे ग्रहण केला. शेवटी श्रीनानांचे समोर श्रीटेंब्येस्वामीमहाराज प्रगट झाले. श्रीनानांनी त्यांना वंदन केले. कालपर्यंत आपल्या आज्ञेनुसार अनुग्रह देण्याची सेवा केली. यथाशक्ती श्रीदत्तसंप्रदाय वाढविला. आता मी मनस्वी थकलो आहे. आपल्या चरणाशी लीन होण्यास आपण आशीर्वादासह अनुज्ञा द्यावी. हे ऐकून श्रीटेंब्येस्वामींनी दोन हात वर करून अनुज्ञा दिली. हे बघून श्रीनानांच्या डोळ्यातून अश्रू आले. श्रीअरविंदकाकांनी श्रीनानांच्या मुखात एका भक्ताने आणून दिलेली गंगा घातली आणि काही क्षणातच श्रीनानामहाराजांनी चैत्र वद्य दशमी शके १९१५, शुक्रवार दि.१६ एप्रिल १९९३ रोजी सकाळी सव्वासात वाजता वयाच्या ९७ व्या वर्षी, नागपूर येथे महानिर्वाण केले आणि श्रीदत्तसंप्रदायाचा प्रभावी प्रसार आणि प्रचार करणारा 'मार्तंड' मावळला. श्रीनानांचे नंतर त्यांचे नातू श्रीबाबामहाराज तराणेकर यांनी अखिल भारतीय त्रिपदी परिवाराची धुरा समर्थपणे सांभाळून अध्यात्मिक कार्य आजपर्यंत मोठ्या जोमाने सुरू ठेवलेले आहे.

# प. पू. श्रीवेणास्वामी

जन्म
आषाढ शु.१५,शके १५५०
(गुरूपौर्णिमा) इ.स.१६२८

निर्याण
चैत्र व.१४, शके १६००
इ.स.१६७८

श्रीगोपजीपंत देशपांडे हे कोल्हापूरातील मान्यवर गृहस्थ होते. त्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. राधिकाबाई होते. या दांपत्याला सुरवातीला तीन अपत्ये झाली. पण ती सर्व लवकरच निवर्तली. यथावकाश श्री. गोपजीपंतांना आषाढ शु. १५ (गुरूपौर्णिमा) इ.स.१६२८ रोजी एक कन्या झाली. तिचे बारशा दिवशी 'वेणा' असे नामकरण करणेत आले. ही वेणा म्हणजेच आमच्या श्रीवेणास्वामी.

लहानपणापासूनच वेणास्वामी या सात्विक, सोज्वळ आणि सोशिक वृत्तीच्या होत्या. वेणास्वामींच्या घरात परंपरेने रामोपासना चालत आलेली होती. त्यामुळे लहानवयातच वेणास्वामींवर रामभक्तीचे संस्कार झाले होते. रामकथा ऐकणे हा वेणास्वामींचा आवडता विषय होता. श्री. गोपजीपंतांनी श्रीवेणास्वामींची शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था केली. त्यांच्या घराजवळ पत्की नावाचे आचार्य रहात होते. ते वेणास्वामींना घरी येऊन शिकवू लागले. गुरुजी (आचार्य) घरी येण्याआधीच वेणास्वामी पूर्ण तयारी करून ठेवत असत. आचार्यांनी वेणास्वामींना तासन्‌तास शिकवले. आचार्य म्हणायचे, हे बघ वेणा, श्रीएकनाथांचे भागवत आणि भावार्थ रामायण हे दोन ग्रंथ तुला वाचायला आले तर, तुला मी शिकविल्याचे सार्थक झाले.

वेणास्वामींना १० वे वर्ष लागले. त्यांच्या आई-वडिलांनी वरसंशोधन सुरू केले. परंतु वेणास्वामींच्या मनात मात्र लग्न करायचे अजिबात नव्हते. त्यांच्या संमतीशिवायच आई-वडिलांनी त्यांचे लग्न ठरविले. मिरजेच्या श्री. दत्तात्रय देशपांडे या नावाच्या मुलाशी त्यांचे लग्न ठरले. श्री. दत्तात्रय हे त्यावेळी १५ वर्षांचे होते. घरची श्रीमंती होती. मुलाचे वडील मिरजेतील मोठे सावकार होते. मार्गशीर्ष शु. पंचमीला वेणास्वामींचे लग्न झाले. यावेळी प्रथमच आपल्या पतीला वेणास्वामींनी पाहिले होते. लग्नानंतर वेणास्वामी मिरजेला आल्या आणि पहिल्या माहेरपणासाठी म्हणून ४-५ दिवसातच कोल्हापूरला आल्या. त्याच दिवशी रात्री त्यांच्या वाड्यातील कुत्रा रडत होता. पहाटे गोठ्यातील गाय सारखी हंबरडा फोडत होती. खरे तर तिचे वासरू जवळच होते. एवढ्यात एक घोडागाडी वेणास्वामींच्या कोल्हापूर येथील वाड्यासमोर येऊन थांबली. गाडीवान खाली उतरला आणि दत्तात्रयबाबूंची तब्येत फारच बिघडली आहे म्हणून सांगण्यासाठी आलो आहे, असे तो म्हणाला. वेणास्वामींचे पती श्रीदत्तात्रय यांना खरेतर उत्तम पोहायला येत होते. पण त्या दिवशी विहिरीतील गाळात फसून त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे वेणास्वामींना फारच लहान वयात वैधव्य आले. त्या विधवा झाल्या.

आता लहानपणी वैधव्य प्राप्त झालेने वेणास्वामी या सासरी अंगणातील तुळशीवृंदावनापाशी एकनाथी भागवत वाचत असत. पहाटे ५ ला उठून घरातील गाय धुणे, गोठा स्वच्छ करणे, सडा, रांगोळी, धुणे-भांडी इ. सर्व कामे ही वेणास्वामी करीत असत.

असेच एकेदिवशी वेणास्वामी मिरजेतील घराच्या अंगणात सडा शिंपीत होत्या. तेवढ्यात त्यांच्या कानावर मधुर आवाजातील प्रश्न आला, 'तुंबाभर दूध मिळेल का?' हा प्रश्न वेणास्वामींच्या सासूबाईंच्या कानावर गेला. त्यांनी आतूनच उत्तर दिले, 'दूध मारुतीच्या नैवेद्यासाठी ठेवले आहे. पुढच्या घरी विचारा.' तो आवाज एका गोसाव्याचा होता. वेणास्वामींना तो गोसावी साक्षात्कारी महात्माच वाटला. मारुतीचा अवतार वाटला. अंगात हुरमुंजी रंगाची मेखला, गळ्यात तुळशीमाळ, उजव्या हातात कुबडी आणि तुंबा, कपाळावर मोठे आवाळू, दाढी-जटा वाढलेल्या, असा त्याचा अवतार होता. ते दुसरे तिसरे कोणी नव्हते, तर ते समर्थ श्रीरामदासस्वामी होते.

परत दुसरे दिवशी समर्थ भिक्षेसाठी वेणास्वामींच्या घरासमोर येऊन उभे राहिले. समर्थांनी श्लोक म्हटला, - 'अहिल्या शिळा राघवे मुक्त केली । पदी लागता दिव्य होऊनी गेली । जया वर्णिता सीणली वेदवाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।।१।।' जयजय रघुवीर समर्थ. ओम् भवति भिक्षां देहि । असा पुकारा केला. दुपारचे १२ वाजले होते. अंगणात वेणास्वामी भागवत वाचत बसल्या होत्या. समर्थ अचानक परत आपल्या दारी येतील हे त्यांच्या ध्यानीमनीही नव्हते. समर्थांनी वेणास्वामींना विचारले, बाळ, हे तू काय वाचतेस? तेव्हा वेणास्वामींनी सांगितले, 'मी एकनाथी भागवत वाचते.' समर्थ म्हणाले, जे तू वाचत आहेस त्याचा अर्थ तुला समजतो का? भागवत वाचताना वेणास्वामींच्या मनात अनेक शंका होत्या. वेणास्वामींनी समर्थांना एकापाठोपाठ २५ प्रश्न विचारले. हे प्रश्न ऐकून समर्थ थक्कच झाले. तेव्हा समर्थ विचारतात, 'बाळ, तुझे नांव तरी काय?' तेव्हा या सांगतात की, 'माझे नाव वेणाबाई'. समर्थांनी वेणास्वामींना त्यांच्या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली आणि समर्थांनी वेणाबाईंना 'रामराय तुमचे कल्याण करील हो' असा आशीर्वाद दिला. पुढे समर्थांनी वेणाबाईंना अनुग्रह दिला. समर्थ मिरजेला आणि कोल्हापूरला नेहमी जात. तिथे त्यांची नेहमी कीर्तने होत. या कीर्तनाला वेणास्वामी आवर्जून जायच्या. कालांतराने वेणास्वामी समर्थांच्या बरोबर चाफळला गेल्या. एका रामनवमीच्या उत्सवाची संपूर्ण जबाबदारी समर्थांनी वेणास्वामींचेवर टाकली. उत्सवाची सर्व कामे जबाबदार व्यक्तीने स्वतः करायची असत आणि ऐन उत्सवाच्या १५ दिवस आधी वेणास्वामी तापाने आजारी पडल्या. राममंदिरातील खांबाला धरून त्यांनी रामाजवळ प्रार्थना केली. ही प्रार्थना ऐकून चाफळमधील राममूर्तींच्या डोळ्यातून अश्रू आले आणि प्रत्यक्ष प्रभू रामचंद्राने, 'रामाबाई' या स्त्रीचे रूप घेतले आणि उत्सवाची सर्व तयारी केली.

श्रीसमर्थांनी वेणाबाईंना बाहेर जाऊन उभ्याने कीर्तन करण्याचा अधिकार दिला होता. स्त्री शिष्यांपैकी त्याच एकट्या अधिकारी होत्या. समर्थांनी श्रावण वद्य प्रतिपदेला मिरजेच्या मठात वेणास्वामींची मठपती म्हणून नेमणूक केली. त्यांनी ती समर्थपणे पेलली. श्रीवेणास्वामींनी आपल्या आयुष्यात उपदेश रहस्य (रामायणी प्रकरण) कौल (२६ श्लोक), पंचीकरण (वेदांतावरील गद्य टीका) रामगुहक संवाद किंवा नावेचे श्लोक, रामायणाची कांडे (१५०० श्लोक), सिंहासन, सीतास्वयंवर (१५६ श्लोक) व स्फूट अभंग व पदे रचली.

समर्थ अचानक एक दिवस उद्धवस्वामींना म्हणाले, ''उद्धवा, जा समस्तांना सांग की, वेणी आता माहेरी जाणार आहे. म्हणून दुपारी ४ वाजता मठाच्या प्रांगणी कीर्तन करेल आणि कीर्तन झाल्यावर वेणी माहेरी

जाणार.'' हा हुकूम समर्थांनी चैत्र व. चतुर्दशी दिवशी सकाळी सोडला. शिष्यांनी विचार केला की, कित्येक वर्षे झाली वेणास्वामींनी माहेर बघितलेले नाही, मग ती आता माहेरी कशासाठी जाणार? शिष्यांना समर्थांच्या बोलण्याचा अर्थ कळला नाही. दुपारी झाली. दुपारचा १२ चा नैवेद्य स्वतः वेणास्वामींनी समर्थांना देऊन दिला. बाहेर आल्या आणि त्यांनी शेजघरात जाऊन विश्रांती घेतली. दुपारचे ४ वाजले. मठाच्या प्रांगणात सर्व शिष्य व भक्त जमा होऊ लागले. शिवथरघळीत असताना श्रीसमर्थांनी वेणास्वामींना मेखला (बाह्या नसणारी कफनी) दिली होती. ती मेखला अंगावर घालून वेणास्वामी त्यावेळी कीर्तनास उभ्या राहिल्या आणि हातात झांज घेऊन अभंग म्हटलाः-

'बंध विमोचन राम । माझा बंध विमोचन राम ।।ध्रु।। सकलहि ऋषिमुनी भजती तयासी । एकचि तो सुखधाम।।१।। सद्गुरूकृपया ओळखिला जो । कौसल्येचा राम ।।२।। भावभक्तीच्या सुलभ साधनी। पुरवी सकलही काम ।।३।। शरण ही वेणा आत्मारामा । पावली पूर्ण विराम ।।४।।'

कीर्तनाचा पूर्वरंग आटोपला. वेणाबाईंना स्वतः समर्थांनी हार अर्पण केला. आक्काबाईंनी सगळ्यांना बुक्का लावला आणि कीर्तनाचा उत्तररंग सुरू झाला. वेणास्वामींनी तुकाराममहाराज सदेह वैकुंठाला कसे गेले याचे आख्यान कथन केले. जणु त्या आख्यानाद्वारे त्या आपले महाप्रयाणच सुचवित होत्या. शेवटी वेणास्वामींना कीर्तनातच उन्मनी अवस्था लागली आणि त्या धावत धावत समर्थांच्या जवळ आल्या. समर्थांचे चरणावर त्यांनी डोके ठेवले आणि अखेरचा श्वास घेऊन त्या सद्गुरूंच्या माहेरी लीन झाल्या. अशा वेणास्वामींनी चैत्र वद्य चतुर्दशशी शके १६०० म्हणजे इ.स. १६७८ रोजी म्हणजे वयाच्या ५० व्या वर्षी देह ठेवला आणि त्या समर्थ स्वरूपामध्ये विलीन झाल्या.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीवेण्णास्वामी यांची आरती**

आरती वेणाबाई । काय सांगू नवाई ।
दिगंत कीर्ती तुझी । हीच असे अपूर्वाई ।।ध्रु।।
समर्थ हातियेचा । प्रसाद जो मेळविला ।
तोचि वेणाबाई । संतोषाने दिधला ।।१।।
समर्थ हातियेचा । असे प्रसाद मारुती ।
बाबूरावाकरवी । तो स्वये आणून देती ।।२।।
नवल झाले हो । बोलवेना माये ।
कथियेले काय कैंचे । वर्णवेना माये ।।३।।
श्रीराम निकेतनी । आला असे मारुती ।
पुरश्चरण होता क्षणी । घेतलीसे विश्रांती ।।४।।
ऐसे पाहोनिया सर्वा । आश्चर्य वाटले ।
प्रेमेची **दासरामे** । पाय शिरी वंदिले ।।५।।

# प.पू.श्री स्वामी अमलानंद

जन्म
पौष शु.०८ शके १८२५
दि.०७.०१.१९०३

निर्याण
वैशाख शु.०१ शके १९१०
दि.१७.०४.१९८८

श्री. रामचंद्रपंत विश्वनाथ फडके हे पेण गावी रहात होते. ते अत्यंत हुशार आणि कर्तबगार होते. ते प्रिन्सेस डॉकमध्ये हेड ऑफिसर म्हणून मुंबईत नोकरी करत होते. त्यांच्या पत्नीचे नाव सौ. जानकीबाई. श्री. रामचंद्रपंत हे गणेशाचे उपासक होते. गणेशोपासना केल्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. या दांपत्याला सुरवातीला तीन कन्यारत्ने झाली. परंतु पुत्रप्राप्ती होत नव्हती. म्हणून सौ. जानकीबाईंनी व्रतवैकल्ये, उपासना, उपवास इ. भरपूर केले. त्याचे फळ त्यांना मिळाले. या दांपत्याचे पोटी पौष शु. ८ शके १८२५ दि.०७.०१.१९०३ रोजी पुत्ररत्न जन्माला आले. बारशादिवशी या मुलाचे नाव 'लक्ष्मण' ठेवणेत आले. हे लक्ष्मण म्हणजेच आमचे 'लक्ष्मण रामचंद्र फडके ऊर्फ स्वामी अमलानंद' होत.

स्वामी अमलानंदांच्या जन्मानंतर अवघ्या तीन महिन्यातच त्यांची मोठी बहीण कृष्णाबाई प्लेगने निवर्तली व त्यानंतर पुढे आठ दिवसातच स्वामींचे वडिल श्रीरामचंद्रपंत यांना देवाज्ञा झाली. परंतु यांच्या मातोश्री सौ. जानकीबाई यांनी स्वामी व त्यांच्या दोन बहिणी यांचा धीराने सांभाळ केला. स्वामी लहानपणी रामरक्षा, अथर्वशीर्ष, व्यंकटेश स्तोत्र हे रोज म्हणत असत. स्वामींनी पेणमधील सरकारी शाळा नं.१ या प्राथमिक शाळेत पहिली ते पाचवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर स्वामींनी वैदिक शिक्षण मिळावे म्हणून वेदपाठशाळेत प्रवेश घेतला. स्वामींना खेळाबरोबरच गायनाची आवड होती. माध्यमिक शालेय शिक्षणासाठी त्यांनी पेणच्या प्रायव्हेट हायस्कूलमधे प्रवेश घेतला. त्यांची अभ्यासातील हुशारी बघून शाळेतील मुख्याध्यापकांनी त्यांना फ्रिशिप दिली होती.

पुढे स्वामींना श्रीगजाननमहाराज गुप्ते यांचा आशीर्वाद प्राप्त झाला. श्रीगजाननमहाराजांनी स्वामींना आपल्या जवळ बसवून पाठीवरून हात फिरवला व त्यांच्या मातोश्री श्रीमती जानकीबाई यांचेकडे बघून म्हणाले, 'आपण भाग्यवान आहात, चिंता कशासाठी करता? मंगलमूर्ती पाठीशी आहे. याचे सगळे उत्तम होईल'. यानंतर स्वामी मॅट्रिक परीक्षा पास झाले. पुढे ते हायकोर्टाची प्लीडरची परीक्षा पास झाले. नंतर स्वामींनी १ ऑगस्ट, १९२३ रोजी भांडूप येथे कस्टम खात्यातील सरकारी नोकरी पत्करली. ही नोकरी त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे केली. त्यामुळे त्यांना वरचेवर बढती मिळाली. या काळात स्वामींना गीता, उपनिषदे, ज्ञानेश्वरी, दासबोध इ. ग्रंथांची आवड निर्माण होऊन, त्यांनी त्याचा अभ्यास केला.

लग्नाचे वय झाल्यावर स्वामींचा दि.९.१२.१९२५ साली 'दुर्गा' नामक कन्येशी विवाह झाला. पण दुर्दैव असे की या त्यांच्या पत्नी लग्न होऊन दीड महिन्यातच प्लेगने निवर्तल्या. याचे स्वामींना फार दुःख झाले. त्यानंतर त्यांनी 'शांता' नामक कन्येशी दुसरा विवाह केला. परंतु या दांपत्यास सात-आठ वर्षे

अपत्यलाभ झाला नाही, याचा त्यांना विषाद वाटे. या काळात स्वामींनी ज्योतीषशास्त्राचा अभ्यास केला. स्वामींनी अनेक सत्पुरुषांकडे नाम मिळावे म्हणून प्रयत्न केला. या दरम्यान श्रीगुरूदेव रानडेसाहेब यांचेकडे ते नाम मिळावे म्हणून गेले. तेव्हा श्रीगुरूदेव म्हणाले, 'थांबा, अद्यापी वाट पहावी लागणार आहे.' स्वामींना सद्गुरू प्राप्तीची तळमळ लागली होती. यातच इ.स.१९४७ साली त्यांच्या मातोश्रींचे देहावसान झाले. या दरम्यान त्यांचा श्री.भालचंद्र नारायण तुळापुरकर ऊर्फ श्रीभारतीशास्त्री यांचेशी परिचय झाला. या श्रीभारतीशास्त्रींनी त्यांना पुण्यातील प्रसिद्ध संत श्रीरावसाहेब सहस्रबुद्धे यांचेकडे नेले. श्रीअमलानंदस्वमींनी श्रीरावसाहेबांचे दर्शन घेतले. नंतर स्वामी वरचेवर त्यांचेकडे जाऊ लागले. श्रीरावसाहेब सहस्रबुद्धेंनी सांगितले, 'प्रपंच करून परमार्थ कर, वेळ येताच सद्गुरू भेट होईल.' स्वामींनी मनाशी ठरविले की आता सद्गुरू भेट जेव्हा व्हायची तेव्हा होवो, तोवर आपण संतवाङ्‌मयाचा अभ्यास करावा. याप्रमाणे त्यांनी एकनाथी भागवताचा अभ्यास केला.

दि.२५.०९.१९५२ रोजी एक विलक्षण घटना घडली. श्री. विठ्ठलराव जोशी नामक गृहस्थ स्वामींना हुडकत आले. श्रीविठ्ठलरावांनी स्वामींनाच विचारले की, 'इथे लक्ष्मण फडके म्हणून कोणी गृहस्थ आहेत का?' यावर स्वामी म्हणाले, 'तो मीच आहे.' तेव्हा श्री. विठ्ठलरावांनी स्वामींना बाहेर बोलावले आणि शांतपणे सांगितले, 'मी पावसहून आलो आहे. रत्नागिरीजवळ पावस गाव आहे. तिथे स्वामी स्वरूपानंद म्हणून राहतात. त्यांनी आपल्याला अनुग्रहाचा कागद दिला आहे.' असे म्हणून श्री.विठ्ठलरावांनी तो अनुग्रहाचा कागद स्वामी अमलानंदांच्या मस्तकी ठेवला. कागद मस्तकावर ठेवताच स्वामी अमलानंदांना भावसमाधी लागली.

यानंतर स्वामी अमलानंदांची १९५३ साली बेळगावला बदली झाली. ते कामावर रुजू झाले. त्या दरम्यान श्रीगुरूदेव रानडे बेळगावला आले होते. त्यांच्या दर्शनास स्वामी अमलानंद गेले. दर्शन घेतल्यावर श्रीगुरूदेव म्हणाले, 'काय लक्ष्मणराव काम झाले ना!'

स्वामी अमलानंदांना आपल्या सद्गुरूंचे म्हणजेच स्वामी स्वरुपानंदांचे दर्शन केव्हा होते अशी ओढ निर्माण झाली होती. याप्रमाणे ते १९६० साली पावसला स्वामी स्वरूपानंदांच्या दर्शनास गेले. स्वरूपानंदांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला व कृपेचा वर्षाव केला आणि सोहंसाधना सांगून अनुभूती दिली. असेच एकदा स्वामी अमलानंद हे स्वामी स्वरूपानंदांच्या दर्शनास आले, तेव्हा स्वामी स्वरूपानंदांनी त्यांना सोऽहं समाधी लावली. काही वेळानंतर स्वामी अमलानंद हे देहावर येताच आशीर्वाद दिला आणि 'ही परंपरा आता आपण पुढे चालवा. सारे काही सद्गुरूच करतात. मला सद्गुरूंनी जे जे दिले, ते ते मी तुम्हाला पूर्ण दिले आहे. ते तुम्ही पुढील पिढीस द्या' अशी आज्ञा केली. पुढे स्वामी स्वरुपानंदांनी १५ ऑगस्ट, १९७४ ला देह ठेवला.

अशा स्वामी अमलानंदांचा माझे आजोबा ती. प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचेबरोबर स्नेह होता. कोल्हापूरला स्वाध्याय केंद्र काढायचे होते आणि त्यानिमित्त आमच्या ती. श्रीदादांचे कीर्तन ठेवले होते. श्रीदादांनी कीर्तनात 'सोहं स्वरूप ते जाण । न कळे सद्गुरू वाचून ।।' हा श्रीतुकाराममहाराजांचा अभंग घेतला

होता. श्रीदादांनी दीड ते दोन तासात खऱ्या अर्थाने सोहंचे स्वरूप सांगितले. हे कीर्तन ऐकायला स्वतः स्वामी अमलानंद उपस्थित होते. ते शेजारीच बसले होते. त्यांनी कीर्तन झाल्यावर श्रीदादांना घालण्यासाठी दरबारी हार आणला होता. तो घालण्यास ते दादांचे जवळ गेले तेव्हा श्रीदादा म्हणाले, 'स्वामी, मी हार घालून घेत नाही.' तेव्हा स्वामी अमलानंद म्हणाले, 'अहो रामभाऊ, हा तसला हार नाही. आज मला स्वामींची आज्ञा झाली आहे की तुम्हाला हार घाला.' स्वामींनी आणि श्रीदादांनी एकमेकांना आलिंगन दिले. या अवस्थेत ते अर्धा तास होते. दोघांच्या नेत्रातून अश्रुधारा वहात होत्या. स्वामी अमलानंद म्हणतात, 'रामभाऊ, तुम्ही आज खऱ्या अर्थाने सोहंचे स्वरूप प्रगट करून दाखविलेत.'

अशा स्वामी अमलानंदांनी वैशाख शु. १, शके १९१० दि.१७.०४.१९८८ रोजी, वयाच्या ८५व्या वर्षी महानिर्वाण केले आणि ते स्वामीस्वरूपात विलीन झाले.

***

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत स्वामी अमलानंद यांची आरती**

आरती अमलानंदा । स्वरूपी या अभेदा ।
साकार जगी जहाला । धन्य धन्य सोहंनादा ।।ध्रु.।।
नादरूप तुम्ही स्वामी । जय जया सत्य नामी ।
नाम नामी एक झाले । जेथ नुरल्या उर्मी ।।१।।
आनंद संप्रदाय । आनंदाचे स्वरूप ।
पहाता पहाताचि । जीव होय तद्रुप ।।२।।
जगद्गुरू जगन्नाथ । गिरनारी प्रभू दत्त ।
आलिंगन दिले असे । पहाताची रेवणनाथ ।।३।।
**दासरामालागी** कैचा । स्वरूपाचा सोहळा ।
दाविला जीव तेथे । गुंतोनिया राहिला ।।४।।

## प.पू. सद्‌गुरू श्रीविश्वनाथ नारायण तथा पंडितरावमहाराज यरगट्टीकर

जन्म
फाल्गुन शु.७, शके १८४६
बुधवार दि.२७.०२.१९२४

निर्याण
अधिक वैशाख शु. ५, शके १९३२
सोमवार दि.१९.०४.२०१०

कर्नाटक राज्यातील बागलकोट जिल्ह्यामध्ये जमखंडी तालुका आहे. या तालुक्यामध्ये रबकवी-महालिंगपूर मार्गावर चिमड हे गाव आहे. या गावामध्ये प.पू.सद्‌गुरू श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर हे सद्‌गुरूंच्या आज्ञेने रहावयास आले. त्यांच्या परमाधिकारसंपन्न पत्नीचे नांव सौ. सीताबाई ऊर्फ श्रीमाईसाहेबमहाराज असे होते. या श्रीरामचंद्रावजी महाराजांना 'चिमडचे महाराज' या नावाने लोक संबोधत होते. या श्रीचिमड महाराजांना प.पू.श्रीनिंबरगीकरमहाराजांनी, प.पू.श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांकरवी अनुग्रह देवविला. श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज हे चिमड गावीच शेवटी रहावयास आले आणि तेथेच त्यांनी देह ठेवला. त्यांची समाधी चिमड येथे विहिरीमध्ये स्थापित केलेली आहे.

या श्रीचिमडमहाराजांचे पोटी ज्येष्ठ शु.१० शके १८०७ इ.स. १८८५ रोजी श्रीनारायणमहाराज अवतीर्ण झाले. हे साक्षात् शंकराचे अवतार होते. श्रीनारायणमहाराजांचे दोन विवाह झाले. श्रीनारायणमहाराजांच्या पहिल्या पत्नी अकाली निवर्तल्या, म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला. यांचे नांव गंगाबाई असे होते. या दांपत्याला सुरवातीला दोन अपत्ये झाली, पण दोन्ही अपत्ये अल्प वयात देवाघरी गेली. यानंतर श्रीनारायणमहाराज आणि सौ. गंगाबाई या दांपत्याच्या पोटी फाल्गुन वद्य ७ शके १८४६, बुधवार दि.२७.०२.१९२४, शबरी जयंती/ जानकी जयंती, अमृतसिद्धी योग व सर्वाथसिद्धीयोगावर पुत्ररत्न जन्माला आले. या मुलाचे बारश्या दिवशी (१२व्या दिवशी) श्रीविश्वनाथ असे नांव ठेवणेत आले. हा विश्वनाथ म्हणजेच आमचे 'प.पू.सद्‌गुरू श्रीविश्वनाथ ऊर्फ पंडितरावमहाराज' होत.

श्रीपंडितरावमहाराजांचे प्राथमिक शिक्षण हे चिमड येथे झाले व माध्यमिक शिक्षण (१०वी पर्यंत) सांगली येथील सिटी हायस्कूलमध्ये झाले. वयाच्या ८व्या वर्षी त्यांचा उपनयन संस्कार झाला. लहानपणापासूनच महाराजांना पारमार्थिक गोडी होती. पूजाअर्चा करणे, साधन करणे इ.ची त्यांना विशेष आवड होती. त्यांना वयाच्या १२व्या वर्षी म्हणजे इ.स. १९३६ मध्ये आश्विन शु.१०, विजयादशमीच्या मुहुर्तावर सकाळी १०.४५ वाजता, त्यांचे पिताश्री प.पू.सद्‌गुरू श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचा मंत्रानुग्रह झाला. प्राथमिक अभ्यासापासून तुर्या अवस्थेपर्यंत व पुढे उन्मनी अवस्थेपर्यंत श्रीनारायणमहाराजांनी त्यांना अनुभूती दिल्यानंतर कपाळी गंधाचा टिळा लावला. अनुग्रह झालेवेळी ते देही असूनही पूर्ण विदेही अवस्था अनुभवत होते. श्रीनारायणमहाराजांनी जे साधन सांगितले, ते त्यांनी निष्ठेने सुरू ठेवले. श्रीपंडितरावमहाराज हे चिमड येथील पोस्टखात्यात नोकरीस लागले. श्रीमहाराजांचे लग्नाचे वय होताच त्यांचा विवाह किर्तीकोल्हार या गावातील

श्री.कृष्णाजी पुरोहित यांची कन्या सौ. भागिरथी यांच्याशी झाला. पण शारीरिक व्याधीमुळे त्यांच्या पत्नीने लवकरच म्हणजे भाद्रपद शुद्ध अष्टमीस देह ठेवला. पत्नीचे निधन झालेने श्रीपंडितरावमहाराजांनी गोठे या गावातील श्री. प्रल्हाद सदावर्ते यांची कन्या सौ. शकुंतला यांचेशी दुसरा विवाह केला. विवाहानंतर या कन्येचे नांव 'प्रभावती' असे ठेवणेत आले.

प.पू.श्रीपंडितरावमहाराजांनी चिमड येथील प्रभूस्वामीचे डोंगरावर रुद्राचे अनुष्ठान केले. यानंतर त्यांनी विविध अनुष्ठाने केली. श्रीमहाराज हे दरवर्षी हनुमान जयंतीपासून पुढे एक महिना नावलगी (कर्नाटक) या गावी, रामायण/महाभारत इत्यादि ग्रंथांवर प्रवचन करणेकरिता जात असत. वयाच्या ६० व्या वर्षी श्रीमहाराजांची साठीशांत करणेत आली. श्रीमहाराज हे परदेशातील त्यांच्या शिष्यांना पत्राद्वारे प्राथमिक अभ्यासापासून समाधीपर्यंतची प्रक्रिया व माहिती कळवित असत. प.पू.श्रीनारायणमहाराजांना १९५३ सालापासून प्लूरसी हा रोग झाल्याने, बोलायला येत नव्हते. त्यामुळे त्यांच्या खाणाखुणा व शब्द हे श्रीपंडितरावमहाराज ओळखत असत आणि हेच त्यांच्या शिष्यांना मार्गदर्शन करीत असत. श्रीपंडितरावमहाराजांच्या प्रमुख शिष्यांमध्ये प्रामुख्याने श्री. मधुसूदन भिडे, मुंबई, सौ. शरदिनी गोळे, पुणे, श्री. विष्णुपंत म्हसकर सर, सांगली, सौ. स्नेहा व विवेक जोशी, सांगली, श्री.कुरूळकर बंधू कोल्हापूर, श्री. विजयराव व श्री. जयंतराव गाडगीळ, सांगली, श्री. नंदकुमार ढवळीकर, कराड इत्यादिंचा समावेश आहे. श्रीमहाराज हे चिमड येथील पोस्टातून इ.स. १९८३ साली रिटायर झाले. त्यांचे जागी त्यांचे सुपुत्र, चिमडमठाचे विद्यमान मठाधिपती प.पू.सद्गुरू श्रीजनार्दनमहाराज रुजू झाले. श्री. पंडितरावमहाराज हे दरवर्षीचा गुरूद्वादशी ते पांडवपंचमीपर्यंत असणारा उत्सव अत्यंत निष्ठेने पार पाडत असत. पांडवपंचमी दिवशी चिमड येथील विहिरीतील श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे समाधीला पाण्यामध्ये रथाच्या तीन प्रदक्षिणा होतात. यावेळी श्रीमहाराज त्या विहिरीतील पायऱ्यांवर पगडी घालून उपस्थित असत. त्यावेळी एक विशिष्ट वातावरण निर्माण झालेले असायचे. ती मौज वेगळी आहे.

इ.स. १९७०चे दरम्यान श्रीमहाराजांनी धर्मस्थळ, उडपी, तिरूपती इ. तीर्थयात्रा केली. त्यावेळी त्यांचे बरोबर त्यांचे चौघे बंधू, तसेच ज्येष्ठ साधक श्री. तात्यासाहेब देशमुख, श्री. आठले इत्यादि होते. तिरुपती येथे दर्शनासाठी श्रीमहाराज गेले असता, तेथे भरपूर गर्दी होती. ही गर्दी बघून श्रीमहाराज म्हणाले, 'आता काही आत जायला नको, उशीर होईल.' पण आश्चर्य असे की, श्रीनारायणमहाराजांची योजना बघा की, 'एक गृहस्थ पोलीसी ड्रेसमध्ये आला आणि म्हणाला, 'चला, मी तुम्हाला आत नेऊन दर्शन घडवून आणतो.' त्याचे बरोबर आत जाऊन श्रीमहाराजांसह सगळी मंडळी तिरुपतीचे दर्शन घेऊन आली. पुढे काही काळानंतर श्रीमहाराजांनी नाशिक, त्र्यंबकेश्वर, देहू, आळंदी, सज्जनगड, श्रृंगेरी इत्यादि तीर्थयात्राही केल्या.

शेवटी श्रीमहाराजांचे वयोमानाप्रमाणे शरीर क्षीण होत गेले. पण साधना निरंतर सुरू होती. अखेरीस

त्यांना महालिंगपूर येथील डॉ. अजित कनकरड्डी यांचे दवाखान्यात सायंकाळी ५ वाजता दाखल केले व उपचार सुरू केले. डॉक्टरांनी सांगितले, महाराज जास्तीत जास्त तीन तास राहतील. रात्री १२ वाजता त्यांचे ब्लडप्रेशर पूर्ण कमी झाले. पण आश्चर्य असे की, लगेचच १२.१५ नंतर ब्लडप्रेशर नॉर्मल झाले. यावेळी त्यांचे जवळ त्यांचे सुपुत्र प.पू.सद्‌गुरू श्रीजनार्दनमहाराज हे होते. श्रीपंडितरावमहाराज सकाळी नेहमीप्रमाणे उठले, थोडी हळीवाची खीर प्राशन केली. थोड्या वेळाने ते प.पू.श्रीजनार्दनमहाराजांना म्हणाले, ‘आता मला मठात घेऊन जा.’ त्याप्रमाणे ते सकाळी मठात आले. सगळ्या समाधींसमोर कापूर लावण्यात आला आणि त्यांना मठामध्ये आणून ठेवणेत आले. तोपर्यंत निंबरगीचे प.पू.श्रीअशोकमहाराज मंगळवेढे हे श्रीमहाराजांची तब्येत बघणेसाठी मठात आले. त्यांनी तापनाशी तीर्थाचे पाणी घेतले आणि श्रीमहाराजांच्या मुखात घातले. आणि आश्चर्य असे की, तापनाशी तीर्थ ग्रहण करताच, अधिक वैशाख शुद्ध पंचमी, आद्य शंकराचार्य जयंती, मृग नक्षत्र, अमृतसिद्धी योग दि.१९.०४.२०१० रोजी सकाळी बरोबर ११.४५ वाजता, वयाच्या ८६व्या वर्षी श्रीपंडितरावमहाराजांनी महाप्रयाण केले. यावेळी श्रीमहाराजांनी निंबरगी गुरूपीठाप्रती आपली गुरूनिष्ठा दाखवून दिली आणि श्रीनिंबरगीकरमहाराजांचे पूर्ण आशीर्वाद व त्यांची विद्या अजूनही या मठात जिवंत आहे, हे दाखवून दिले. यावेळी तेथे उपस्थित रहाण्याचे भाग्य मला प्राप्त झाले. आणि आश्चर्य असे की, महाराजांनी सांभाळलेली एक देशी गाय, महाराजांनी देह ठेवतेवेळी जोरात हंबरली, याचा मी साक्षीदार आहे. यावेळी मठामध्ये श्रीतात्यासाहेब बार्शीकर, स्वतः जातीने हजर होते. सायंकाळी श्रीमहाराजांचेवर वटवृक्षा शेजारी, दहनभूमीवर दहन संस्कार करणेत आले. त्याच दिवशी प.पू.सद्‌गुरू श्रीजनार्दनमहाराज यरगट्टीकर यांची मठाधिपती म्हणून सगळ्यांचे साक्षीने नेमणूक करण्यात आली. यावेळीही श्री. तात्यासाहेब देशमुख हजर होते.

***

# प. पू. योगीराज श्रीशंकरमहाराज मिरीकर

प्रकट दिन
कार्तिक शु.८ शके १७०७
इ.स.१७८५

निर्याण
वैषाख शु.०८ शके १८६९
सोमवार दि.२४.४.१९४७

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात सटाणा नावाचा तालुका आहे. त्या तालुक्यात अंतापूर नावाचे एक छोटे गाव आहे. तिथे चिमणाजी नावाचे सद्गृहस्थ रहात होते. ते विवाहित होते. ते दोघे श्रीशंकराची उपासना करीत. परंतु त्यांना संतान प्राप्ती नव्हती. एकदा त्यांना स्वप्नात दृष्टांत झाला. त्यांच्यासमोर एक तेजःपुंज साधू येऊन बोलू लागला. उठ, तू गावाबाहेर थोड्या अंतरावर जा. तिथे तुला एक बाळ मिळेल. त्याला तू घरी घेऊन ये व त्याचा सांभाळ कर. चिमणाजींनी हा दृष्टांत आपल्या पत्नीस सांगितला. त्यानंतर ते दोघे उठून गावाबाहेर गेले. थोडे अंतर पुढे गेल्यावर एका निर्जन जागी त्यांना लहान बाळ रडत असल्याचा आवाज आला. त्या दिशेने दोघे गेले असता, तिथे त्यांना दोन वर्षांचा बाळ मिळाला. त्या दिवशी शके १७०७ मधील कार्तिक शु. ८ तिथी होती. शंकराची उपासना केली म्हणून हा प्रसाद मिळाला आहे या भावनेने त्यांनी त्या बाळाचे नांव 'शंकर' असे ठेवले. शंकर काही काळ या माता पित्यांसोबत राहिला आणि या शंकरानेच चिमणाजीस, ''तुम्हाला संतान प्राप्ती होईल'' असा आशीर्वाद दिला आणि शंकर तेथून बाहेर पडला. हा शंकर म्हणजेच आमचे शंकरमहाराज.

श्रीशंकरमहाराज हे मजल दर मजल करीत सुरवातीलाच हिमालयात पोहोचले. त्यांनी केदारेश्वर येथे काही काळ वास्तव्य केले. नंतर ते प्रयागला आले. त्यानंतर ते सोलापूरला आले. नंतर त्यांनी भारतभर भ्रमण केले. श्रीशंकरमहाराजांना एकच-एक नाव नाही. ते अनेक वेगवेगळ्या नावांनी वावरत होते. त्यांना शंकर या नावाबरोबरच, खानदेशात कुमारस्वामी व गौरीशंकर, सातपुडा परिसरात सुपड्याबाबा, गुजरातेत देवीयाबाबा, मध्यभारतात लहरीबाबा, इस्लाममध्ये रहिमबाबा, अरबस्थानात नूरमहंमदखान, तर आफ्रिकेत टोबो या नावाने ओळखले जात होते. श्रीशंकरमहाराज हे देहधारी रूपात आठ ठिकाणी वाकडे होते म्हणून त्यांना अष्टावक्र असे म्हणत. ते अजानबाहू होते. श्रीशंकरमहाराजांना अक्कलकोटच्या श्रीस्वामीसमर्थांचा अनुग्रह होता.

श्रीशंकरमहाराज हे योगीराज होते. ते नेहमी म्हणत की, 'सिद्धीच्या मागे लागू नका. जे प्राप्त आहे त्याचा आनंद घ्या.' ते म्हणत की, 'मला जातीधर्म काही नाही.' ते सर्व धर्मातील लोकांशी समभावाने वागत. श्रीशंकरमहाराजांना सर्व भाषा अवगत होत्या. एका रशियन दांपत्याशी त्यांनी रशियन भाषेत संवाद साधला होता.

श्रीशंकरमहाराजांनी अनेक लीला केल्या. श्रीशंकरमहाराज हे अत्यंत कमी जेवायचे. भोजनामध्ये अनेक वेळा मटार घातलेली खिचडी असायची. कधी कधी लहर आली तर महाराज सिगरेट ओढत असत. पण माझ्यासारखी सर्वांनी सिगरेट ओढावी किंवा मला आणून द्यावी असा त्यांचा बिलकूल आग्रह नसे.

श्रीशंकरमहाराजांची पुण्यामध्ये बरीच भटकंती चालू असे. पुण्यात आप्पाबळवंत चौकात मेहेंदळे वाडा आहे. पानिपतच्या लढाईत अपूर्व पराक्रम गाजवलेले श्री. आप्पा बळवंत मेहेंदळे हे पेशवाईतील मोठे सरदार होते. त्यांचाच हा मेहेंदळे वाडा. पुढे या चौकाला 'आप्पा बळवंत चौक' असे नाव दिले गेले. या सरदारांचे वंशज श्री. रावसाहेब मेहेंदळे हे होते. त्यांच्या पत्नीचे नाव ताईसाहेब असे होते. ताईसाहेब एकदा घरातून विमनस्क मनःस्थितीत बाहेर पडल्या. कशातही त्यांचे मन लागेना. थोड्यावेळाने त्या उद्विग्न मनाने परत घरी आल्या. एवढ्यात श्री. प्रधानांच्या घरी श्रीशंकरमहाराज आले आहेत, त्यांच्या दर्शनाला चला असा निरोप आला. त्याप्रमाणे श्री. रावसाहेब व ताईसाहेब दोघेजण महाराजांच्या दर्शनाला गेले. ताईसाहेबांनी दर्शन घेताच, महाराजांनी ताईसाहेबांच्या कंठाला अनामिकेने स्पर्श केला. स्पर्श केल्या केल्या त्यांच्या अंगात तीव्र स्पंदने सुरू झाली आणि डोळ्यातून प्रेमाश्रू वाहू लागले. दुसरे दिवशी एकादशी होती. श्री.दादामहाराज सातारकर यांच्या ज्ञानेश्वरीवरील प्रवचनास हे दोघे गेले. प्रवचन संपले आणि श्री. दादामहाराजांनी ज्ञानेश्वरी उचलून ती ताईसाहेबांच्या हातात दिली आणि 'तू सर्वांना ज्ञानेश्वरी सांगत जा' असा आशीर्वाद दिला आणि आश्चर्य असे की, ताईसाहेब मेहेंदळे या कालांतराने अस्खलितपणे ज्ञानेश्वरीवर प्रवचने करू लागल्या. पण त्या सांगायच्या की ही सगळी श्रीशंकरमहाराजांची कृपा आहे.

श्रीशंकरमहाराजांनी १९३० साली देह ठेवण्याचा मनोदय व्यक्त केला. ही बातमी महाराजांच्या भक्तांना कळली. सर्व भक्तगण हवालदिल झाले आणि सर्वांनी आपण देह ठेवू नये अशी विनवणी केली. महाराज म्हणाले, दर १७ वर्षांनी देह ठेवण्याची चांगली वेळ येते. ती आज आली आहे, म्हणून मी देह ठेवण्याचा विचार केला आहे. हे ऐकून भक्तमंडळी म्हणाली की, महाराज, १७ वर्षांनी पुन्हा अशी वेळ येईल की. आता देह ठेवण्याची गरजच काय? हे शब्द ऐकून व भक्तांची सद्‌गदित अवस्था पाहून त्यांनी देह ठेवण्याचा बेत रद्द केला.

श्रीशंकरमहाराज म्हणायचे, 'माझी शिकार खाणारा कोणी भेटला नाही.' म्हणजे माझ्याकडील पूर्ण ज्ञान कोणीच घेतले नाही. मी सर्वभावे देणेचा प्रयत्न केला, पण संपूर्ण ज्ञान घेणारा कोणी आजपर्यंत भेटला नाही.

श्रीशंकरमहाराज हे सांगलीला आमच्या घरी आले होते. आमच्या वाड्यात श्री. बिडुबुवा गोसावी या नावाचे एक बिऱ्हाड होते. त्यांचेकडे ते आले होते. यावेळी ते आमचे मंदिरात आले. आल्या आल्या ते म्हणाले, **'हे नाथांचे घर आहे. मला येथे आल्याने फार आनंद झाला.'**

इ.स. १९४६ मध्ये श्रीशंकरमहाराज आपल्या काही भक्तांना बरोबर घेऊन पुण्यातील सहकार नगरयेथील पद्मावतीच्या मंदिरात आले. सर्वांनी दर्शन घेतले. अचानक महाराज मंदिरातून उठले आणि सातारारोडकडे चालू लागले. थोड्या वेळात ते मालपाणी यांच्या शेतात येऊन थांबले. तेथे आल्यावर महाराज सर्व भक्तांना म्हणाले, 'ही जागा फार छान आहे. गावापासून लांब आहे आणि पद्मावतीच्या जवळही आहे. येथेच मी समाधी घेणार.' असे बोलून त्यांनी समाधी कोठे घेणार हे भक्तांना आधीच दाखवून दिले.

शेवटी श्रीशंकरमहाराज हे पुण्यात श्री. ढेकणेमामा म्हणून त्यांचे एक भक्त होते, त्यांच्या घरी आले आणि तेथे काही भक्तांना त्यांनी बोलावून घेतले. भक्तलोक येत होते, पण महाराज कुणाशी काही बोलत नव्हते. त्यांनी मौन धारण केले होते. वैशाख शु. सप्तमी शके १८६९ चा दिवस उजाडला. महाराज उठले. त्यांनी थोडा चहा पिला आणि त्यांनी मौन सोडले. ते ढेकणेमामींना म्हणाले, मला बसायला एक छोटी गादी घाला. एक तक्या ठेवा. आता मला कोणाशीही बोलणेचे नाही आणि माझ्या खोलीचे दार लावून घ्या. श्रीशंकरमहाराजांनी स्नान केले आणि ते अंथरलेल्या गादीवर जाऊन बसले व दार लावून घेतले. बाहेर ढेकणे दांपत्य हे उभेच होते. त्यांना खोलीतून संदेश आला, 'पुढील सोय करा. ही आत्मज्योत आता बाहेर पडत आहे.'

वैशाख शु. अष्टमी, शके १८६९, सोमवार दि.२४.०४.१९४७ हा दिवस उजाडला आणि महाराजांनी पहाटे ५ च्या सुमारास देह ठेवला. महाराजांनी सुचविल्याप्रमाणे त्यांचा पार्थिव देह त्यांनी एक वर्षापूर्वी दाखविलेल्या जागी आणला गेला व तिथेच त्यांनी विश्रांती घेतली. (श्रीशंकरमहाराजांचा कार्यकाळ विचारात घेतला तर शंकरमहाराजांना १६२ वर्षे आयुष्य लाभले होते).

***

# प.पू.श्रीधोंडिराजमहाराज, पलूस

**निर्याण**
**वैशाख शु. नवमी, शके १८३०**
**इ.स. १९०८**

प.पू.श्रीधोंडीराममहाराज यांचा जन्म मिरज तालुक्यातील कांचनपूर (पूर्वीचे खरकटवाडी) या गावी इ.स.१८२० चे दरम्यान झाला. त्यांच्या वडिलांचे नांव श्रीबाबाजी व आईचे नांव सौ.जीजाई होते. श्रीधोंडिराममहाराजांची आत्या सौ. सखुबाई मोरे या पलूसला रहात असत. लहानपणी महाराज हे, 'मी पलूसला तुझ्या बरोबर येणार' असे म्हणून आत्याच्या मागे लागत. त्याप्रमाणे ते पलूसला गेले. आत्याच्या घरी राहिले आणि गुरे राखण्याचे काम करु लागले. श्रीमहाराजांचे मन पलूस या गावातच रमलेने, ते त्यांचे जन्मघरी परत गेले नाहीत.

श्री.धोंडिराममहाराज हे विदेही सत्पुरुष होते. 'जगात पिशाच्च अंतरी शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निगग्न तो ।।' या तुकोक्तिप्रमाणे ते कायम ब्रह्माशी निमग्न असायचे. त्यामुळे त्यांना देहाचे भान नसायचे. अंगावर फक्त लंगोटी, अंगात बाराबंदी घातलेली असे. पण त्या बाराबंदीचे बंद बांधलेले नसत. डोक्याला कानटोपीसारखे कापड बांधलेले  से. खांद्यावर झोळी असे व भिक्षा मागून खायचे. जवळ अंथरूण-पांघरूण नसायचे, पण खांद्यावर कांबळी असायची. त्यांच्या जवळपास दोन-चार कुत्री असायची.

सकाळी लवकर उठायचे, ओढ्यावर किंवा पाणवठ्याच्या जागी स्नान करायचे. दुपारी भिक्षा मागायची. कुणाच्या दारात जाऊन त्यांनी भिक्षा मागितली नाही. चालत चालतच ते 'धोंड्याला भाकरी वाढा' असे म्हणायचे. यांचा मुक्काम बहुदा दावलमलिकचा दर्गा किंवा मंदिरात असे. श्रीमंत लोकांपेक्षा सामान्य गरीब लोकांबद्दल त्यांना फार आपुलकी होती. अन्नदानाची महाराजांना आवड होती. 'दारी आलेल्याला तुकडा तरी द्यावा, नाही म्हणू नये' अशी महाराजांची शिकवण होती. श्रीमहाराजांचे एकंदरीत वागणे लोकांना विक्षिप्तपणाचे वाटे. त्यामुळे लोक त्यांना वेडाधोंड्या म्हणत असत. लहान मुले त्यांच्या अंगावर खडे मारत असत. श्रीमहाराज खरेतर वेडे नव्हते, ते अंतर्यामी पूर्ण ब्रह्मज्ञानी होते. पण लोकांना तसे वाटत नसे.

कालांतराने श्रीमहाराज हे एकटेपणाने राहू लागले. बाहेरगावी निर्जन वस्तीत ते राहू लागले. जरुरीपुरतेच ते पलूस या गावी किंवा एखाद्या वस्तीवर येत असत. मुखामध्ये कायम रामनाम असायचे. श्रीधोंडीराम महाराजांना अक्कलकोटच्या श्रीस्वामी समर्थ महाराजांचा अनुग्रह होता असे म्हणतात. कारण स्वतः श्रीमहाराज ''अक्कलकोट दर्या आहे'' असे म्हणत. श्रीमहाराज हे स्वतःचे पंचायतन सांगायचे. त्यांत श्रीस्वामीसमर्थ, हरिबुवा फलटणकर, अण्णाबुवा मिरजकर, श्रीकृष्णसरस्वतीमहाराज व ते स्वतः असे पंचायतन होते. श्रीधोंडीरामहाराज अनेकदा असंबद्ध व न कळणारी वाक्ये बोलून जात. त्यामुळे सामान्य लोकांना ते कळत

नसे. पण ती वाक्ये असंबद्ध नव्हती. त्या वाक्यात महाबोध दडलेला असायचा. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीतील १८व्या अध्यायात म्हटले आहे, '**जयाचे पिसाट शब्द । सुखे म्हणो येती वेद । सदेह सच्चिदानंद। कां न व्हावे ते ।।१८-१६४५।।**.' ज्या महात्म्याचे वेडेवाकडे शब्द हे वेद ठरतात, मग ते स्वतःच सदेह सच्चिदानंद का होणार नाहीत? याप्रमाणे श्रीमहाराज हे सदेह सच्चिदानंद स्वरूप होते.

सातारा येथे एक चिंतुबुवा नावाचा गृहस्थ रहात होता. त्याला मूळव्याध झाली होती. पुण्यामध्ये त्याने यावर शस्त्रक्रिया करुन घेतली, तरीपण गुण येईना. शेवटी तो कंटाळला आणि जीव द्यायचा विचार करू लागला. आणि खरेच एक दिवस डोंगरावरून उडी मारावी म्हणून तो घरातून निघाला. तेव्हा त्याची पत्नी त्याला म्हणाली, 'अहो असे करु नका. एखाद्या सत्पुरुषाकडे जावा आणि त्यांना याबाबत विचारा आणि त्यांचा आशीर्वाद घ्या.' त्याच्या मित्राने या गृहस्थाला श्रीधोंडीमहाराजांचे नांव सांगितले. त्याप्रमाणे तो गृहस्थ पलूसला आला आणि महाराजांना भेटला. त्याने महाराजांना नमस्कार केला. एवढ्यात महाराज बोलले, 'अरे तू इकडे कशाला आलास? मी असल्या भानगडीमध्ये पडत नाही. त्यामुळे नसती लचांडे मागे लागतात आणि शेवटी आपल्यालाच ते सगळे निस्तरावे लागते. तू गोंदवल्यास जा. गणुबुवांनी (गोंदवलेकरमहाराज) तिथे रामाच्या नावाने बाजार मांडला आहे. त्यांच्या बाजारात माल खरा आहे. तिकडे तुझे नक्की काम होईल.' याप्रमाणे चिंतुबुवा तडक गोंदवल्यास गेले. श्रीगोंदवलेकरमहाराजांची भेट घेतली. श्रीगोंदवलेकरमहाराजांनी जणु काही त्यांची अगोदरच माहिती असल्याप्रमाणे त्याला योग्य उपदेश/मार्गदर्शन केले आणि चिंतुबुवांना कायमचे व्याधीमुक्त केले.

श्रीधोंडीमहाराजांचे अनेक शिष्य होते. पण त्यात प्रामुख्याने पुसेसावळीचे संत श्रीकृष्णदेवमहाराज (श्रीगोविंदकाका उपळेकर यांचे सद्‌गुरू), चाफळचे श्री. सखाराम गणेश फणसे तथा देवमास्तर, कोल्हापूर संस्थानमधील जहागीरदार श्री. हणमंतराव गो. खर्डेकर तथा देवसरकार इ. शिष्य होते.

श्रीमहाराज कायम एकांतात वसती करून असत. प्रामुख्याने ते पलूस जवळील दावलमलिकच्या माळावर किंवा कुंडलरोडच्या मायाप्पा मंदिराच्या बाजूस असत. तिकडे सहसा कोणी जात नसे. दावलमलिकच्या माळाबद्दल बोलताना एकदा महाराज म्हणाले, ''मला इथे चिमण्यांची किलबिल ऐकू येते.'' आणि खरेच पुढे ६० वर्षांनी त्या जागी विकासमंदिर (सध्याचे लक्ष्मणराव किर्लोस्कर विद्यामंदिर) उदयाला आले. तसेच मायाप्पाच्या माळाबद्दल ते म्हणाले होते, 'इथे गोकूळ उतरेल, जागेचा महिमा होईल. टोपीचा साहेब येईल, दिवसा दिवे लागतील.' पुढे त्या जागेवर श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांनी कारखाना उभारला आणि या उजाड माळरानाचा उद्धार झाला.

श्रीमहाराजांकडे दर्शनाकरता माणसे येत असत. पण ते कुणाकडून पाया पडून घेत नसत. श्रीमहाराजांचे हातात सोटा असायचा. तो सोटा पाठीवर खाण्याकरता लोक तेथे मुक्काम करून असायचे. ज्याच्या पाठीत

सोटा बसायचा, त्याचे मनातील काम पूर्ण व्हायचे. असा महाराजांचा अधिकार होता. त्यांनी अनेक लोकांना सन्मार्गाला लावले. अनेक लोकांचा उद्धार केला. महाराजांकडे येणाऱ्या भक्तमंडळींची गर्दी पाहून इंग्रज सरकारने पलूस हे रेल्वेस्टेशन केले.

श्रीमहाराज असतानाच त्यांच्या भक्तांनी मठाच्या इमारती बांधल्या. त्यात प्रामुख्याने पलूस येथील गादीमठ व खर्डेकरांचा मठ (सध्याचे समाधीमंदिर), महादेवमठ, मालती मठ यांचा समावेश होतो. पण या मठांपैकी गादीमठातच महाराजांची उठबस होती. श्रीमहाराजांनी समाधी घ्यायचे ठरविले आणि याबाबत स्वतः ते श्री. खर्डेकरांना पूर्व कल्पना देत होते. १९०५-१९०६ साली महाराज खर्डेकरांना म्हणाले, 'एक - दोन सुग्या पाहून आम्ही जाणार' आणि महाराजांनी म्हटल्याप्रमाणे वैशाख शु.९ शके १८३०, म्हणजेच इ.सन १९०८मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी पलूस येथील गादीमठात देह ठेवला. पण श्रीमहाराजांच्या इच्छेनुसार महाराजांना खर्डेकर मठात समाधीस्त करणेत आले.

***

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीधोंडिराममहाराज यांची आरती**

आरती धोंडीबाबा ।
जय महानुभावा ।
गोविंदा भेटलासे ।
चमत्कार सदैवा ।।ध्रु।।
धोंडीबुवा तुमची कीर्ती ।
जगी जहाली अगाध ।
पाहुनिया तुमचा महिमा ।
संता जहाला आनंद ।।१।।
गोविंदपंत तुवा ।
जहाले अनन्य ।
पाहुनिया महिमा हा ।
**दासराम** जहाला धन्य ।।२।।

# प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर

निर्याण
वैषाख शु.१३ शके

श्रीरघुनाथमहाराज पाटील खटावकर हे खटाव या गावी रहात होते. त्यांनी काशीचे श्रीसद्‌गुरू काशीनाथमहाराज या मुकुंदराज पंथातील अधिकारी सत्पुरुषांकडून अनुग्रह घेतला होता. श्रीकाशीनाथमहाराजांची या रघुनाथमहाराजांवर पूर्ण कृपा होती. रघुनाथमहाराज यांची साधनसिद्धता पूर्ण झाल्यावर सद्‌गुरूंनी त्यांना जगदोद्धार करण्याची आज्ञा केली.

अशा या श्रीरघुनाथमहाराजांचे पोटी श्रीरामानंदमहाराज यांचा जन्म झाला. श्रीरघुनाथमहाराजांनी श्रीरामानंदांचे लहानपणी चांगल्याप्रकारे संगोपन करून कोडकौतुक पुरविले. श्रीरामानंदमहाराजांचे बालपण हे अज्ञानातच गेले. त्यांचे शिक्षणाकडे विशेष लक्ष नव्हते. आपल्या उदरनिर्वाहाची चिंता रामानंदमहाराजांनी कधीच केली नाही. श्रीरघुनाथमहाराज हे पुराण फारच उत्तम सांगत असत. हे पुराण श्रीरामानंदमहाराजांच्या कानावर नित्य पडत असे. त्यामुळे त्याची गोडी श्रीरामानंदांना लागली. महाराज, माझ्या अज्ञानपणाचा मला पश्चात्ताप झाला आहे. 'माझे सर्व अपराध क्षमा करा आणि मला पदरात घ्या' असे विनविताच, श्रीरघुनाथमहाराजांनी श्रीरामानंदांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना अनुग्रह केला. त्यांनी सांगितलेप्रमाणे श्रीरामानंदांनी साधन केले. साधनसिद्धता होऊन स्वरूपसिद्धी साधण्यासाठी त्यांनी १८ वर्षे जवळजवळ अहर्निश भगवन्नामसाधनात घालविली व पूर्ण सिद्धता प्राप्त करून घेतली.

श्रीरामानंदमहाराजांनी श्रीरघुनाथमहाराजांचे चरणाजवळ स्वात्मार्पण केले होते. अहंकाराचा लेशही उरला नाही असे पाहून व श्रीरामानंदमहाराज काही विचारमग्नस्थितीत आहेत असे पाहून श्रीरघुनाथमहाराजांनी 'काय इच्छा आहे' म्हणून विचारले. तेव्हा श्रीरामानंदमहाराजांनी दोन्ही हात जोडून 'देवा इतुकेचि मागणे । न्यावे मज उद्धरून ।।१।।' यारितीने प्रार्थना केली. श्रीरघुनाथमहाराजांनी मस्तकावर हात ठेवला आणि 'बघ' म्हणून सांगितले. जिकडे तिकडे कोटी सूर्य तळपावेत याप्रमाणे प्रकाश दिसू लागला. श्रीरघुनाथमहाराजांनी श्रीरामानंदमहाराजांना मुक्तस्थिती तर दाखविलीच, पण जन्ममरणाच्या अतीत होऊन रहाण्याची साधनक्रियाही सांगितली.

यानंतर श्रीरामानंदमहाराज यांचे ठिकाणी स्वानुभवजन्य ज्ञान परिपूर्णरितीने बाणले आहे असे पाहून आणि पुढे संप्रदाय-परंपरा चालविण्यास हे परम अधिकारी आहेत हे जाणून, श्रीरघुनाथमहाराजांनी माघ शुद्ध १३, शके १७९६ गुरुवार या दिवशी रात्री समाधी घेतली. लवकरच श्रीरामानंदमहाराजांनी त्यांची खटाव येथे समाधी बांधली.

श्रीरामानंदमहाराजांचे श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, श्रीमामामहाराज केळकर व श्रीदासराममहाराज केळकर यांचेवर अनुपम प्रेम होते. प.पू. श्रीमामांना ते निळोबारायांचा अवतार म्हणत होते. तसा त्यांचा अभंग आहे.

श्रीरामानंदमहाराज हे सांगलीस आले की श्री. बाबाण्णा सोनार यांचे घरी येत असत. तेथे आले की ते दासबोध, परमामृत, विवेकसिंधू इ. ग्रंथावर प्रवचने करीत. श्रीदादा हे लहान असलेने, जरीची टोपी घालून प्रवचन ऐकण्यास जात असत. श्रीदादांना बघितल्यावर श्रीरामानंदमहाराज पोथी गुंडाळून ठेवत व 'ये प्रल्हादा, तू कीर्तन कर' असे ते श्रीदादांना म्हणत. असेच एकदा कीर्तन सुरू असताना एकदम सुगंध दरवळला, तेव्हा श्रीरामानंदमहाराज म्हणाले, आत्ता येथे निंबरगी संप्रदायाचे मूळपुरूष श्रीनिंबरगीकरमहाराज प्रगट झाले आहेत. असा यांचा अधिकार होता.

श्रीरामानंदमहाराजांना, झाले येवढे कार्य पुरे, आता आपण देह ठेवावा, असे वाटू लागले. दिवा जाऊ लागला की तो जसा भडकतो, त्याप्रमाणे संतांचा देहावसानकाळ जवळ आला की त्यांच्या उर्वरित आयुष्यात त्यांची कीर्ती अमर्याद पसरू लागते. याप्रमाणे श्रीरामानंदमहाराजांची कीर्ती दिगंतरात अमर्याद पसरली. श्रीरामानंदमहाराजांनी आपल्या आयुष्यात अनेकांना अनुग्रह दिला. पण त्यापैकी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील परब्रह्म सद्गुरू श्रीमहादबामहाराज पाटील धुळगांवकर हे त्यांचे प्रमुख शिष्य होते.

श्रीरामानंदमहाराजांनी शेवटी विठ्ठलास आपले दृष्टीसमोर उभे रहाण्यास विनविले आणि विठ्ठलाचे मुखावलोकन करून पदकमलावर मस्तक ठेवले. विठ्ठलाने श्रीरामानंदमहाराजांच्या मस्तकावर हात ठेवला आणि श्रीरामानंदमहाराजांना निजधामास येण्याविषयी आज्ञा केली. यानंतर त्यांनी आपला निर्याणकाळ आपल्या भक्तजनांना वारंवार सुचविला आणि श्रीरामानंदमहाराजांनी वैशाख शु. त्रयोदशी रोजी आपला देह ठेवला.

***

# आद्य शंकराचार्य

जन्म
वैशाख शु.५ शके ७१०
इ.स.७८८

निर्याण
वैषाख शु.१५ शके ७४२
(वैषाख पौर्णिमा) इ.स.८२०

केरळ राज्यातील कलाटी या गावामध्ये शिवगुरू आणि आर्यांबा या ब्राह्मण दांपत्याचे पोटी वैशाश शु. ५ इ.स. ७८८ मध्ये श्रीशंकराचार्यांचा जन्म झाला. आद्य शंकराचार्य हे तीन वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. श्रीशंकराचार्यांच्या वाणीवर साक्षात सरस्वती विराजमान होती. त्यांच्या आईने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शंकराचार्यांचे पालनपोषण केले. त्यांची बुद्धिमत्ता अफाट होती.

वयाच्या ७ व्या वर्षीच चार वेदांचे अध्ययन त्यांनी पूर्ण केले. वेदांत, दर्शन, पुराणे, इतिहास इ. विषयात त्यांनी पांडित्य मिळविले. वयाच्या ८ व्या वर्षी श्रीशंकराचार्यांच्या मनात संन्यास दीक्षा घ्यावी असा विचार प्रबळला. विवाहापूर्वी संन्यास दीक्षा घ्यायची असेल तर आईची अनुमती लागते. परंतु आर्यांबांना हे एकटेच पुत्र असलेने, आर्यांबा त्यांना संन्यास दीक्षा घ्यायला परवानगी देईनात. म्हणून ते नदीवर स्नानाला गेले असताना त्यांनी मायेने मगर निर्माण केली आणि या मगरीला आपला पाय पकडायला सांगितला. त्याप्रमाणे मगरीने त्यांचा पाय पकडला. मगरीने पाय पकडला ही बातमी त्यांचे आईचे कानावर गेली. आई आर्यांबा धाय मोकलत आल्या. आई दिसल्यावर शंकराचार्य म्हणतात, 'आई, तू संन्यास दीक्षा घ्यायला परवानगी देत असशील तर ही मगर पाय सोडते असे म्हणते आहे.' हे ऐकल्यावर आई आर्यांबा म्हणतात, 'तुला संन्यास दीक्षा घ्यायला माझी परवानगी आहे. शंकरा, जगाच्या पाठीवर कुठेही रहा, पण सुखी रहा.' याप्रमाणे श्रीशंकराचार्य गुरूशोधार्थ बाहेर पडले, ते थेट नर्मदेच्या तीरावर तपश्चर्या करणाऱ्या श्रीगौडपादाचार्यांच्या श्रीगोविंदभगवद्पाद या शिष्याच्या पायाजवळ आले. त्यांच्याकडून त्यांनी दीक्षा घेतली.

त्यानंतर त्यांनी अद्वैतमताचा प्रसार करण्यासाठी भारतभर पदभ्रमण सुरू केले. या यात्रेचा समारोप त्यांनी काशी विश्वनाथ येथे केला. आद्य श्रीशंकराचार्यांनी 'ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या' हे तत्त्वज्ञान मांडले. त्यांनी शैव व वैष्णव हा वाद संपविण्याचे मोठे काम केले. श्रीशंकराचार्य हे हिंदू धर्मातील सर्वोच्च आचार्य मानले जातात. आद्य श्रीशंकराचार्यांनी द्वारका, जगन्नाथपुरी, शृंगेरी आणि बद्रीकेदार येथे चार पीठे निर्माण करून, त्यावर प्रत्येकी एकाची आचार्य म्हणून नेमणूक केली.

आद्य श्रीशंकराचार्यांनी ब्रह्मसूत्र, उपनिषदे व भगवद्गीता या प्रस्थानत्रयींवर तसेच अन्य विषयांवर अनेक भाष्य लिहिले. त्यांनी तत्त्वज्ञानविषयक अनेक ग्रंथ, संस्कृत स्तोत्रे, आणि काव्ये केली आहेत. त्यांचे लेखन प्रचंड आहे. 'शांकरभाष्य' हे त्यांचे प्रसिद्ध लिखाण आहे.

श्रीशंकराचार्यांना आपले अवतारकार्य संपले आहे असे वाटले व ते आत्मचिंतनात निमग्न झाले. शेवटी ते उत्तराखंड राज्यातील केदारनाथ येथे आले. तेथे सर्व देव, ऋषी-मुनी आले होते. आकाशात देवांच्या विमानांची गर्दी झाली होती. सर्वांनी श्रीशंकराचार्यांची पूजा केली व सर्व देवदेवतांनी त्यांना प्रार्थना केली की 'ज्या कार्यासाठी आपण येथे अवतीर्ण झाला, ते कार्य आता झालेले आहे. तेव्हा आपण लवकर कैलासी चला.' श्रीशंकराचार्यांनी हे मान्य करताच साक्षात् भगवान शंकर तेथे अवतीर्ण झाले. त्यांनी श्रीशंकराचार्यांना आपल्या वाहनावर घेतले आणि दिव्य वाद्यांच्या गजरात श्रीशंकराचार्यांना कैलासाला घेऊन गेले. तो दिवस वैशाखी पौर्णिमा शके ७४२, इ.स. ८२० म्हणजे अवघ्या वयाच्या ३२ व्या वर्षी श्रीशंकराचार्यांनी आपले अवतारकार्य संपविले.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत आद्य श्रीशंकराचार्य यांची आरती**

आरती शिवशंकरा ।
जय तेजोभास्करा ।
दिगंत कीर्ती तुझी ।
जय जयाजी कृपा करा ।।ध्रु।।
आवळ्यांचा पाऊस पाडला ।
ख्याती झाली दिगंती ।
**दासराम** शरण आला ।
पायी जडली प्रीती ।।१।।

# गौतमबुद्ध

**जन्म**
**इ.स.पूर्व ५६३**
**वैशाखी पौर्णिमा**

**निर्याण**
**वैशाख शु.१५ इ.स.पूर्व ४८३**
**वैशाखी पौर्णिमा**

महामानव भगवान गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पूर्व ५६३ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शुद्धोधन असे होते. ते राजे होते. शुद्धोधन राजाला दोन राण्या होत्या. एकीचे नाव महामाया आणि दुसरीचे नाव महाप्रजापती होते. या दोघी सख्या बहिणी होत्या. यापैकी राणी महामाया हिच्या पोटी भगवान गौतमबुद्धांचा जन्म झाला. गौतमबुद्धांचे मूळ नाव 'सिद्धार्थ' होते.

आई महामायेला एक दिवस स्वप्न पडले आणि स्वप्नात सुमेध नावाच्या बोधीसत्त्वाने दृष्टांत दिला की, 'मी तुझ्या पोटी जन्म घेणार आहे.' तसेच भविष्य या संदर्भात वर्तविण्यात आले की, 'या मुलाने ऐहिक गोष्टीत रस घेतला तर हा चक्रवर्ती सम्राट होईल आणि ज्ञानमार्गाने गेला तर ज्ञानतेजाने जग उजळून टाकणारा बुद्ध होईल.' असे हे गौतमबुद्ध वैशाखी पौर्णिमेला अवतीर्ण झाले. वयाच्या १६ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला व यथावकाश त्यांना मुलगा झाला.

गौतमबुद्ध हे २७ वर्षांचे होते, त्यावेळी ते राजवाडा सोडून फेरफटका मारणेसाठी बाहेर पडले. बाहेर पडताच त्यांना एका म्हाताऱ्या मनुष्याचे प्रेत जाताना दिसले. हे बघून त्यांच्या मनात विचार आला की, 'सगळा संसार, वृद्धापकाळ, आजारपण हे सगळे दुःखाने वेढले आहे.' त्यामुळे त्यांच्या वृत्तीत एकदम फरक पडला. त्यांना वैराग्य निर्माण झाले. ते परत राजवाड्यात आले. आपल्या मुलाकडे व बायकोकडे एकदा पाहिले आणि ते सगळे सोडून ज्ञानाच्या शोधार्थ बाहेर पडले. तीर्थयात्रा केल्या आणि वयाच्या ३५ व्या वर्षी ते बोधगया येथे आले. तेथे आल्यावर एका वृक्षाखाली बसले आणि त्यांनी शपथ घेतली की जोपर्यंत मला ज्ञान प्राप्त होणार नाही तोपर्यंत मी या वृक्षाखालून उठणार नाही. याप्रमाणे त्यांनी ७ वर्षे कठोर तपश्चर्या केल्यानंतर त्यांना खऱ्या ज्ञानाची प्राप्ती झाली. बोध झाला. म्हणून ज्या वृक्षाखाली बोध झाला, त्या वृक्षाला 'बोधीवृक्ष' म्हणतात. ही जी ज्ञानाची प्राप्ती झाली, तो दिवसही वैशाख पौर्णिमेचाच होता.

समता, स्वातंत्र्य, बंधुता, प्रज्ञा, शील आणि करुणा ही गौतम बुद्धांची मूळ तत्त्वे होती. गौतमबुद्धांना भगवान विष्णूंचा नववा अवतार मानतात. अनेकांना या तत्त्वांद्वारे बोध करून स्वयंप्रकाशित व्हा असा संदेश दिला. अशा या गौतमबुद्धांनी वयाच्या ८० व्या वर्षी महानिर्वाण केले. तो दिवसही वैशाखी पौर्णिमेचाच होता. म्हणून या पौर्णिमेला 'बुद्ध पौर्णिमा' असेही म्हणतात.

✻✻✻

# प.पू.सद्‌गुरू श्रीदिगंबरदासमहाराज जोशी

**जन्म**
**आश्विन शुद्ध ८ शके १८३४**
**दि.१७.१०.१९१२**

**निर्याण**
**वैशाख व. १, शके १९११**
**रविवार दि.२१.०५.१९८९**

रत्नागिरी जिल्ह्यातील, रत्नागिरी तालुक्यामधे गणपतीपुळे गावाजवळच पोमेंडी (बु.) गाव आहे. या गावी श्रीविष्णुपंत जोशी या नावाचे सत्‌शील गृहस्थ रहात होते. त्यांनी सुरवातीला काही काळ मुंबई येथे रेल्वेखात्यात नोकरी केली. कालांतराने ही नोकरी सोडून ते परत आपल्या पोमेंडी या मूळ गावी आले. आल्यावर शेतीची व्यवस्था ते बघू लागले. याबरोबरच गावचे खोतपण सांभाळू लागले. श्री विष्णुपंत यांच्या पत्नीचे नांव सौ. लक्ष्मीबाई. या महान पतिव्रता होत्या. या दांपत्याला श्री. गणेश व श्री.लक्ष्मण अशी दोन मुले होती. यापैकी श्री.गणेश विष्णु जोशी हे अत्यंत श्रद्धाळू आणि आचारसंपन्न गृहस्थ होते. श्री. गणेशपंत हे वंशात एकटेच असलेने वडिल व चुलते यांनी सर्व मालमत्तेची व मिळकतीची व्यवस्था श्री.गणेशपंतांवर सोपवली. ती जबाबदारी त्यांनी अत्यंत चोखपणे पार पाडली. श्री.गणेशपंतांचा विवाह सोमेश्वरच्या श्री.नारायण दाजी सोवनी यांच्या गंगू नामक मुलीशी झाला. लग्नानंतर तिचे नांव 'जानकी' असे ठेवणेत आले. या दांपत्याच्या पोटी चार अपत्ये झाली. १. कृष्णाबाई, २. विठ्ठल, ३. गोदावरी व ४. केशव. यापैकी कृष्णाबाई, गोदावरी व केशव ही तीन अपत्ये काही ना काही कारणाने निवर्तली. त्यामुळे विठ्ठल हा एकच पुत्र होता. या विठ्ठलचा जन्म आश्विन शु. ८, शके १८३४ दि.१७.१०.१९१२ रोजी पोमेंडी येथे झाला. हा विठ्ठल म्हणजेच आमचे 'प.पू.श्रीसद्‌गुरू श्रीविठ्ठल गणेश जोशी तथा श्रीदिगंबरदासमहाराज' होत.

लहानपणापासूनच श्रीमहाराजांना परमार्थाची आवड होती. जोशी कुटुंबाची उपास्य देवता प्रभू श्रीराम व श्रीहनुमंत असलेने, त्यांनाही याची आवड होती. श्रीमहाराजांना लहानपणापासून व्यायामाची आवड होती. सूर्यनमस्कार, बैठका, अशाप्रकारचे व्यायाम ते रोज करीत. कालांतराने श्रीमहाराजांनी श्रीदत्ताचीही उपासना करायला सुरवात केली. श्रीमहाराजांचे शिक्षण इयत्ता सहावी पर्यंत रत्नागिरी येथील हायस्कूलमध्ये झाले. श्रीमहाराजांचा शिक्षणाकडे फारसा कल व ओढा नसलेने, त्यांनी सहावीनंतर शाळेकडे पाठ फिरविली व ती कायमचीच.

लहानपणापासूनच महाराजांना रोज यथासांग पूजा-अर्चा करणे, संतांची चरित्रे वाचणे, गीता-ज्ञानेश्वरी, भागवत यासारखे ग्रंथांचे वाचन करणे याची फार आवड होती. त्यामुळे त्यांना लहान वयातच भगवद्‌भेटीची ओढ निर्माण झाली. वयाच्या १२-१३ वर्षी श्रीनारायणमहाराज केडगांवकर यांच्या दर्शनाचा त्यांना लाभ झाला. त्यानंतर रत्नागिरी येथे श्रीगाडगेमहाराज आले होते. त्यांच्या दर्शनाचाही त्यांना लाभ झाला. श्रीगाडगेमहाराज कोणालाही आपल्या चरणांना स्पर्श करू देत नसत आणि तशातून कोणी प्रयत्न केला

तर, लाठीचा मार देत असत. श्रीगाडगेमहाराज ज्या घरात उतरले होते, त्या घराच्या मागच्या बाजूने श्रीमहाराजांनी प्रवेश केला आणि श्रीगाडगेमहाराजांचे पाय धरले. यावेळी गाडगेमहाराज हे विश्रांती घेत होते. आपले पाय कुणीतरी लहान मुलाने धरलेत हे कळताच गाडगेबाबांना राग आला आणि त्यांनी काठी उगारली आणि म्हणाले, 'ठार मारून टाकीन'. हे ऐकल्यावर श्रीमहाराज म्हणाले, 'मारलेत तर आपल्या चरणीच मला मोक्ष मिळेल.' हे वाक्य ऐकताच श्रीगाडगेमहाराज सद्‌गदीत झाले. श्रीगाडगेमहाराजांनी विचारले, 'बाळ, हे तुला कोणी शिकविले?' तेव्हा महाराज मर्यादा न सोडता पण स्पष्ट शब्दात म्हणाले, 'मला हे कोणी शिकविले नाही, हे मूळचेच आहे.' हे ऐकल्यावर श्रीगाडगेबाबांना कौतुक वाटले आणि त्यांनी महाराजांना विचारले, 'बाळ, तुला काय पाहिजे?' तेव्हा महाराज म्हणाले, 'मला दुसरे काही नको, बाबा, कापसाचा दोरा झाला आहे, त्याला फारच पीळ पडला आहे. तो पीळ काढून, त्याचा पूर्ववत कापूस करता येईल का? ही विद्या मला शिकवा. मला दुसरे काही नको.' हे ऐकल्यावर श्रीगाडगेबाबांनी महाराजांना जवळ घेतले आणि म्हणाले, 'बाळा, त्या दोऱ्याचा पूर्ववत कापूस होईल हे निश्चित आहे. तुझ्या भाग्यातच ते आहे. तू काळजी करू नको. योग्यवेळी तुझी व त्यांची गाठ पडेल.'

श्रीमहाराज हे अधूनमधून श्रीगाडगेमहाराजांच्या दर्शनाला जात असत. असेच एकदा श्रीमहाराज हे गाडगेमहाराजांच्या दर्शनाला गेले असता, महाराजांना बरोबर घेऊन गाडगेमहाराज हे वरळी येथील समुद्र किनाऱ्याजवळलील टेकडीवर एकांतात गेले व ते श्रीमहाराजांना म्हणाले, 'मी तुला एक गंमत दाखवतो, बघ मी तुझ्या समोरच आहे.' श्रीमहाराज कुतुहलाने त्यांचेकडे पाहू लागले असता, त्यांना श्रीगाडगेमहाराज हे हा हा म्हणता उंच उंच होत गेलेले दिसले आणि काही वेळातच गाडगेमहाराजांचे ठिकाणी भव्य दिव्य असे मारुतीराय दिसू लागले. हे मारुतीरायांचे रूप पाहून श्रीमहाराजांना समाधी लागली व समाधीतून उत्थापन होताच, त्यांना आपले मस्तक श्रीगाडगेमहाराजांच्या मांडीवर विसावलेले दिसले आणि गाडगेमहाराज आपल्याला कुरवाळत आहेत असे दिसले.

श्रीमहाराजांच्या मनात सद्‌गुरूशोध आपण घेतला पाहिजे हा विचार सतत बळावत गेला आणि त्यानुसार त्यांनी घर सोडणेचा विचार पक्का केला. वयाच्या १३ व्या वर्षी एकवीस रुपये बरोबर घेऊन व तशा अर्थाची चिठ्ठी घरी ठेऊन, महाराजांनी रत्नागिरी सोडली आणि मजल दरमजल करत मुंबईमार्गे नाशिकला श्रीसद्‌गुरू बीडकरमहाराजांच्या दत्तमंदिरात आले. नाशिकच्या गंगाकाठी फिरत असताना महाराजांना एक यतीपुरूष गाठ पडले. सुमारे ७ फूट ३ इंच उंच, लंगोटी परिधान केलेली व तेजःपूंज, अंगावर व्याघ्रचर्म, जटा वाढलेल्या व खांद्यावर जळके लाकूड असा त्यांचा अवतार होता. या यतीमहाराजांनी श्रीमहाराजांचा हात पकडला आणि ओढतच आपल्याबरोबर एका बाजूला नेले आणि महाराजांच्या मुखात प्रसाद कोंबला. 'पूरा हो जायेगा पूरा हो जायेगा! वक्त आनेपर पूरा हो जायेगा! मत डरो, मेरी पूर्ण कृपा है, आशीर्वाद है' असे म्हणून यतीमहाराजांनी श्रीमहाराजांना आलिंगन दिले.

यानंतर श्रीमहाराज हे पुण्याच्या बीडकरमहाराजांच्या मठात आले. श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे हे दिवसातून २ वेळा तरी श्रीबीडकरमहाराजांच्या मठात दर्शनासाठी येत असत. श्रीमहाराज मठामध्ये आल्यानंतर दोन-तीन दिवसांनी श्रीबाबामहाराज हे दुपारी १२ वाजता मठात आले आणि त्यांनी अचानक श्रीमहाराजांना हाक मारली आणि म्हणाले, 'काय विठोबा, वडिलांना न सांगताच रत्नागिरीहून पळून आलास कां?' यानंतर श्रीबाबामहाराजांनी तिथे उपस्थित असणाऱ्या बापूअण्णा भागवतांकडे पाहिले आणि म्हणाले, 'हा विठोबा मला अक्कलकोट स्वामींच्या स्वरूपात पाहतो' हे ऐकून श्रीमहाराजांनी मान वर करून त्यांच्याकडे पाहिले असता, श्रीमहाराजांना अक्कलकोटस्वामींचीच मूर्ती पाटावर उभी असलेली दिसली. बाबामहाराज दिससलेच नाहीत. हे दृश्य बघितल्यावर श्रीमहाराजांचे भानच हरपले. एक विशिष्ट अवस्था प्राप्त झाली. श्री. भागवतांनी श्रीमहाराजांना प्रेमाने उठवले आणि श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांच्या त्यांच्या चरणांवर घातले. यावेळी श्रीबाबामहाराजांनी श्रीमहाराजांच्या मस्तकावर हात ठेवला आणि अनुग्रह केला. श्रीबाबामहाराज सांगतील त्याप्रमाणे आपण करायचे हा नेम श्रीमहाराजांनी आचरला.

यानंतर पुण्यामध्ये लष्कर विभागात बाबाजान नावाच्या वयाने सुमारे १२७ वर्षांच्या अध्यात्मिक अधिकारसंपन्न स्त्री रहात होत्या. त्यांच्या दर्शनाला महाराज गेले, तेव्हा बाबाजाननी श्रीबाबामहाराजांची ओळख पटल्याची खूण दाखविली आणि महाराजांना आशीर्वाद दिला.

यानंतर श्रीमहाराज हे आपल्या जन्मगावी म्हणजे रत्नागिरीला परत आले. त्यानंतर परत त्यांनी आपले शालेय शिक्षण सुरू केले. शाळेत शिक्षण सुरू असतानाच राष्ट्रभक्तीचे व धर्मभक्तीचे बीज श्रीमहाराजांच्या मनात रुजले. रत्नागिरीच्या मुक्कामात ते स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांचेकडे जात असत. त्यांच्या प्रेरणेने त्यांनी क्रांतीकारी चळवळीत भाग घेतला. चळवळीत भाग घेतल्यामुळे पोलीस त्यांच्या मागे लागले. हे चुकवण्यासाठी ते गगनगिरी पर्वतावर श्रीगगनगिरी महाराजांकडे आले.

इ.स.१९३७-३८ मधे श्रीमहाराज परत घरातून बाहेर पडले आणि ते कल्याणला आपले मावशीकडे आले. तेथे त्यांनी केमिस्टचा व्यवसाय शिकला. हा व्यवसाय अत्यंत प्रामाणिकपणे करुन पैसे मिळविले. यानंतर ते इ.स.१९३७ ते १९४६ या कालावधीमध्ये डॉ. बोस या बंगाली गृहस्थाच्या 'इंडियन ड्रग ॲण्ड फार्मासुटिकल्स' या कंपनीत मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून नोकरीस लागले. १९४६ नंतर त्यांनी नोकरी सोडली आणि ते रत्नागिरीस परत आले. परत आल्यावर महाराजांनी प्रखर साधना सुरू केली. त्यांचा अध्यात्मिक अधिकार जाणून त्यांच्या कृपाप्रसादासाठी लोक भेटायला येऊ लागले. लोकांच्या खाजगी, व्यवहारिक, कौटुंबिक व अध्यात्मिक समस्यांचे ते निवारण करीत. महाराजांना दुसऱ्याच्या मनातील विचार समजत असत. कधी कधी अचानक आपल्या सहकार्यांना म्हणत की, अमका आज गेला, त्याने देह ठेवला.

यानंतर १९४२ च्या सुमारास श्रीमहाराजांची गाठ श्रीदिगंबरबाबा वहाळकर या विदेही सत्पुरुषाशी पडली. श्रीदिगंबरबाबा हे चिपळूण तालुक्यातील सावर्डे या गावी रहात असत. ते श्रीअक्कलकोट स्वामींचे

शिष्य श्री. गोपाळबुवा केळकर यांचे शिष्य होते. या दिगंबरबाबांचा श्रीमहाराजांना ५ ते ७ वर्षे सहवास लाभला. प्रथम भेटीतच श्रीदिगंबरबाबांनी श्रीमहाराजांना त्यांचे सद्‌गुरू श्रीरावसाहेबमहाराज सहस्रबुद्धे यांची खूण पटवली आणि म्हणाले, 'तुझे सद्‌गुरू फार मोठे आहेत, पण मी तुला आईची माया देईन'. आणि त्याप्रमाणे श्रीदिगंबरबाबांनी श्रीमहाराजांवर मातृवत् प्रेम केले.

श्रीमहाराजांचे आपले सद्‌गुरू हेच सर्वस्व होते. त्यांची सेवा आपले हातून घडावी यासाठी ते वारंवार त्यांच्या दर्शनासाठी पुण्याला जात असत. इ.स. १९५३ मध्ये श्रीरावसाहेबमहाराज सहस्रबुद्धे हे देह ठेवणार होते. हे ऐकून श्रीमहाराज व्यथीत झाले. श्रीमहाराज व्यथित झालेचे पाहून श्रीरावसाहेबमहाराज म्हणाले, 'मी देहत्याग करायचा बेत पुढे ढकलतो,' पण त्यांनी महाराजांना विचारले, 'मी थांबू म्हणतोस, पण किती काळ थांबू?' यावर श्रीमहाराज अचानक बोलले,'एक वर्ष थांबा.' त्याप्रमाणे श्रीरावसाहेबमहाराज म्हणाले, 'तुझ्या इच्छेनुसार मी एक वर्ष थांबतो, पण तिथून पुढे तुला माझ्या कार्यासाठी रहाणे भाग आहे.' हे ऐकून महाराज म्हणाले, 'हो, मी राहीन.' यानंतर श्रीरावसाहेबमहाराजांनी बरोबर एक वर्षांनी म्हणजे श्रावण व.४, शके १८७६ दि.१८.०८.१९५४ रोजी देह ठेवला. यानंतर श्रीमहाराजांनी चतुश्रृंगीरस्ता, शिवाजीनगर, पुणे येथे श्रीरावसाहेबमहाराजांची समाधी बांधली. यानंतर या जागेत वेगवेगळ्या सुधारणा स्वतः श्रीमहाराजांनी केल्या. यानंतर श्रीमहाराजांनी डेरवण येथे ट्रस्ट स्थापन करुन त्यामार्फत अनेक सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविले. डेरवण येथे शिवसृष्टी निर्माण केली., डेरवण येथील लोकांना पाण्यासाठी विहिरी खोदून देणे, अपुरा पाणी पुरवठा झाला तर, ट्रस्टमार्फत टँकरने सगळ्या गावाला पाणी पुरवठा करणे, शेतीची साधने पुरविणे इत्यादी कामे श्रीमहाराजांनी केली. डेरवण येथे शिवजयंती उत्सव व श्रीदासनवमी उत्सव आजही अत्यंत थाटात होतो. पुणे येथील उत्सवाचे नियोजन श्रीमहाराज हे स्वतः करीत. श्रीमहाराजांचा हात हा 'दात्याचा हात' होता. असंख्य लोकांना अन्नदान आणि वस्त्रदान केले. श्रीमहाराजांची वेदावर अत्यंत श्रद्धा होती. वैदिक धर्माचे ते अभिमानी होते.

श्रीमहाराजांनी आपले उत्तराधिकारी म्हणून श्रीअशोक रघुनाथ जोशी तथा श्रीकाकामहाराज यांनाच नेमायचे हे निश्चित केले होते. प.पू.श्रीकाकामहाराज हे १९७६ साली बाबामहाराज मंदिरात महाराजांच्या दर्शनास आले असताना श्रीमहाराज म्हणाले,'ध्यानाला बस रे!' त्याप्रमाणे श्रीकाकामहाराज अर्धा ते पाऊण तास ध्यानाला बसले. ध्यान झालेवर त्यांनी श्रीमहाराजांची भेट घेतली. तेव्हा श्रीमहाराजांनी विचारले, 'काय बघितलंस ध्यानात?' तेव्हा श्रीकाकामहाराजांना एक गृहस्थ खुर्चीत बसलेले आहेत, दुटांगी धोतर, शर्ट, काळी टोपी असे दृश्य ध्यानात दिसलेचे सांगितले. हे ऐकून श्रीमहाराज खूष झाले व म्हणाले की, ''ते' तुला दिसले नां! मग तुझे काम झाले म्हणून समज. मी असेपर्यंत तुला मदत करीन व माझे पश्चात् तुला अडचण आल्यावर, तू त्यांचेकडे जा. ते तुला मदत करतील.' याप्रमाणे श्रीमहाराजांनी देह ठेवलेनंतर श्रीकाकामहाराज २२-२३ जूनला सांगलीला श्रीरामनिकेतन या श्रीदासराममहाराज यांचे घरी आले. श्रीदासराममहाराजांना बघितल्यावर १९७६ साली ध्यानाचे वेळी ज्यांचे दर्शन झाले ते हेच सत्पुरुष आहेत, ही खूण श्रीकाकामहाराजांना

पटली आणि त्यांनी श्रीदासराममहाराजांना साष्टांग दंडवत घातले. श्रीदिगंबरदासमहाराज एक दिवस श्रीकाकामहाराजांना म्हणाले की, 'तुझ्यावर आलेल्या सर्व अरिष्टांचे निवारण मी केलेले आहे. अजून एक अरिष्ट आहे. तुझा पाय मोडणार आहे.' हा विषय तिथेच संपला होता. पण श्रीदादामहाराज केळकर हे शौचाला जाताना पडले व त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला. हे श्रीकाकामहाराजांना श्री. रेगोडकर यांनी कळविले. त्याप्रमाणे श्रीकाकामहाराज हे श्रीदासराममहाराजांना भेटायला आले. तेव्हा श्रीदासराममहाराज म्हणाले, 'तुम्हाला पुष्कळ काम करायचे आहे, मोडक्या पायाने तुम्हाला फार त्रास होईल, म्हणून मीच तो भोग भोगून संपवतो.' संतच संतांना जाणतात हेच शेवटी खरे आहे. श्रीदिगंबरदासमहाराज व श्रीदासराममहाराज यांची प्रत्यक्ष भेट कधीच झाली नाही, पण ते दोघे एकमेकांना पूर्ण जाणून होते. '**साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले । अवघे मिळोन येकचि जाले । देहातीत वस्तु ।।**' हेच शेवटी खरे आहे.

श्रीदिगंबरदासमहाराज हे खरे दाते होते. सगळ्यांना भेदभाव न करता दान देणे ही फार अवघड बाब आहे. पण श्रीमहाराज हे उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, आपला-परका, लहान-थोर हा भेदभाव न करता, सगळ्यांना भरभरून देत असत. मंदिरात उत्सवप्रसंगी महाराज हे वस्त्रदान करत असत. पण मी हे देतो, हा भाव त्यांचे ठिकाणी नसे. ते म्हणत, 'अरे माझ्या जवळ काय आहे? मी फकीर, बाबा देतात ते मी तुम्हाला देतो.'

श्रीमहाराज हे वैदिक धर्माचे अभिमानी होते. वेदांवर त्यांची आत्यंतिक निष्ठा होती. त्यामुळे त्यांनी प.पू.श्रीबाबामहाराज समाधी मंदिरात वेदपाठशाळा सुरू केली. श्रीमहाराजांनी मंदिरामध्ये अनेक यज्ञ-याग केले. राष्ट्रभक्तीची प्रेरणा जागृत करण्यासाठी त्यांनी डेरवण येथे शिवसृष्टी, शिवसमर्थ मंदिर स्थापन केले. श्रीमहाराज हे स्थापत्य शास्त्र, शेती शास्त्र, गायन शास्त्र, भाषा शास्त्र, यातील अत्यंत जाणते- ज्ञाते होते. संस्कृत, मराठी, इंग्रजी, हिंदी, कानडी, कोकणी, गुजराती आणि बंगाली भाषेचे जाणकार होते. श्रीमहाराज हे प्रसंगोपात उत्तम कीर्तन करायचे. असे श्रीमहाराज हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. श्रीदिगंबरदासमहाराजांनी श्रीरामहृदय, सद्‌गुरू मानसपूजा, मनोबोध, ज्योतिर्वेद तुळजाभवानी, अभंग, आरत्या इ. लेखन केले.

इ.स.१९८६ सालानंतर श्रीमहाराजांची प्रकृती बिघडू लागली. त्यांना रक्तदाब व मधुमेह होता. श्रीमहाराज हे विदेही अवस्थेत होते. जे देही असतात तेच विदेही होतात. 'तुका म्हणे देही । संत जाहले विदेही ।।' अशी तुकोक्ती आहे. विदेही अवस्थेत असताना महाराजांना त्यांच्या तब्येतीची चौकशी केलेली आवडत नव्हती. अशी चौकशी करणाऱ्याच्या समोर श्रीमहाराज ताडकन उभे राहायचे आणि चौकशी करणाऱ्यालाच स्वतःच्या प्रकृतीची काळजी घ्यायला सांगायचे. त्यालाच औषधोपचार सुचवायचे.

श्रीमहाराजांच्या शेवटच्या आजारात अनेक शिष्यांनी त्यांची सेवा केली. श्रीमहाराजांनी देह ठेवण्यापूर्वी दोन महिने पुढील दुश्चिन्हे दाखवण्यास सुरवात केली. देवाच्या खोलीतील कालभैरवाची तसबीर काढून ठेवली. बाहेर खुर्चीवर बसणेही सोडून दिले. श्रीमहाराजांच्या तब्येतीला आराम पडण्याची चिन्हे दिसेनात. वेगवेगळ्या गावात असणाऱ्या भक्तजनांना बोलावून घेतले. शेवटच्या चार दिवसात श्रीमहाराज त्यांच्या पुतण्याला

म्हणाले, 'तुमच्यासाठी आजवर बरेच वेळा मागेपुढे केले. रामनवमीच्या दिवशीच मी देह ठेवणार होतो. पण श्रीबाबामहाराजांनी परवानगी दिली नाही. आता मात्र मी या देहात राहणार नाही. मी केव्हा जाईन हे तुम्हाला कळणार देखील नाही.' हे श्रीमहाराजांचे उद्गार अक्षरशः खरे ठरले.

रविवार दि.२१.०५.१९८९ चा दिवस उजाडला. २४ तास भक्तमंडळी त्यांच्या पलंगाभोवती बसलेली होती. कुणाच्याही पोटात अन्नाचा कण नव्हता. घोटभर चहासुद्धा पिलेला नव्हता. सगळी भक्तमंडळी स्वामींचा धावा करीत होती. डॉ. श्रीपाद बाणावली व डॉ. सुधीर जोशी हे श्रीमहाराजांचेवर उपचार करत होते. डॉक्टरांनी श्रीमहाराजांना 'महाराज' म्हणून हाक मारली, तो महाराजांच्या पापणीची उघडझाप झाली. हे बघून सगळ्यांना आनंद झाला. आता चिंता दूर झाली. आता महाराजांच्या तब्येतीला आराम पडेल असे सगळ्यांना वाटले. सगळेजण तोंडावर पाणी मारुन थोडे ताजेतवाने होणेकरता उठले. श्रीमहाराजांचे पुतणे श्री.विनायकराव जोशी हे श्रीमहाराजांच्या पायाशीच बसून राहिले. ते गेले नाहीत. महाराजांच्या तब्येतीला आराम पडेल आणि श्रीमहाराज आपल्याकडे डोळे उघडून बघतील या आशेवर ते होते. चहा पिऊन डॉक्टर परत आले आणि त्यांनी श्रीमहाराजांची परत तब्येत तपासली. पण त्यांना श्रीमहाराजांची हालचाल दिसली नाही. 'संपलं सारं' एवढेच दोन शब्द डॉक्टरांच्या तोंडावाटे बाहेर पडले.

अशा श्रीदिगंबरदासमहाराजांनी वैशाख व. प्रतिपदा, शके १९११, रविवार दि.२१.०५.१९८९ रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांच्या अखंड स्मरणात महाप्रयाण केले. श्रीमहाराजांनी महाप्रयाण केलेनंतर प.पू.सद्गुरू श्रीकाकामहाराज जोशी हे उत्तराधिकारी म्हणून आहेत. श्रीकाकामहाराजांनी त्याच तोलामोलाने ही सद्गुरू परंपरा समृद्ध केली आहे.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीदिगंबरदासमहाराज यांची आरती**

आरती दिगंबरा । जय तेजोभास्करा ।
दिगंत कीर्ती तुझी । जय कृपाभास्करा ।।ध्रु।।
बाबांनी कृपा करूनी । स्वये धरिली सावली ।
दिगंबरदास धन्य । गुरुमूर्ती शोभली ।।१।।
दिगंबर नाथपंथी । जगी जहाली कीर्ती ।
अशोक पुत्रालागी । स्वये प्रेमे कुरवाळिती ।।२।।
काय तव कीर्ती वानू । नामेची भीतरी ।
**दासराम** वंदितसे । तयावरी कृपा करी ।।३।।

## संत श्रीचोखामेळा

निर्याण
वैशाख व.०५ शके १२५०
इ.स.१३३८

संत चोखा मेळांचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात देऊळगावराजा तालुक्यातील मेहूणपुरी या गावी झाला. संत चोखामेळांचे कुटुंब हे जातीने महार होते. उदरनिर्वाहासाठी ते शके १२०० मध्ये म्हणजे इ.स.१२७८ साली पंढरपूरला आले.

संत चोखामेळा हे संत ज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रभावळीतील संत होते. श्रीनामदेवमहाराज हे त्यांचे गुरू होते. त्यावेळच्या सामाजिक विषमतेमुळे चोखोबा हे होरपळून निघाले. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ होते. ते उदरनिर्वाहाकरता मोलमजुरीचे काम करत असत, पण ते सतत विठ्ठल नामात दंग असत. गावातील विषमतेमुळे आणि दारिद्र्य व वैफल्य यामुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. जातीभेद असलेने त्यांना पांडुरंगाच्या मंदिरात प्रवेश नव्हता. पांडुरंगाला आपण जवळून पहावे, भेटावे, त्याच्या पदकमलावर मस्तक ठेवावे असे त्यांना सारखे वाटत असे. जातीभेदामुळे त्यांना भगवंताला महाद्वारातूनच पहावे लागे. परंतु साक्षात् पांडुरंगाने त्यांना जवळ केले.

चोखामेळांच्या पत्नीचे नांव सोयराबाई होते. सोयराबाई गरोदर होत्या. प्रसूत व्हायचा दिवस उजाडला, तेव्हा त्यांनी चोखोबांना प्रसुतीकरता जे काही साहित्य लागते ते घेऊन या असे सांगितले. याप्रमाणे चोखोबा बाहेर पडले आणि बहिणीच्या गावाला गेले. ५-६ तास आलेच नाहीत याची सोयराबाईंना चिंता लागून राहिली. मी कुठनं त्यांना साहित्य आणा म्हणून सांगितले असे त्यांना झाले. संध्याकाळ झाली. प्रसूतीची वेळ आली. ही तिची अवस्था बघून पांडुरंगाने चोखोबांच्या बहिणीचे रूप धारण केले आणि तो चोखोबांच्या घरासमोर आला. त्याने दाराची कडी वाजवली आणि म्हणाला, 'वहिनी दार उघडा.' सोयराबाई दार उघडून जो बघतात तो नणंद आलेली दिसली. त्यांना फार आनंद झाला. त्या म्हणाल्या तुम्हाला माझ्यासाठी देवानेच पाठविले आणि थोड्यावेळात सोयराबाई प्रसूत झाल्या. त्यांना मुलगा झाला. याचा पांडुरंगाला फार आनंद झाला. चोखोबाला मुलगा झाला म्हणून भगवंताने सर्व जमातीला साखर वाटली. सोयराबाईंना उटणे लावून न्हावू घातले. आनंदाने पाचवीची पूजा केली आणि स्वतः पांडुरंगाने १३ व्या दिवशी या बाळाला पाळण्यात घातले. त्या बाळाचे अंगडे, टोपडे स्वतः भगवंताने केले आणि भगवंताने त्या मुलाचे नाव कर्ममेळा असे ठेवले. इकडे चोखामेळा १ महिना प्रपंचाला घाबरून बहिणीकडे राहिले. त्यांच्या मनात विचार आला की प्रपंचाच्या भीतीने बायकोला सोडून आलो, पण त्यामुळे देवाचे पाय अंतरले आणि त्यांनी आपल्या बहिणीचा निरोप घेतला व निघाले.

इकडे पांडुरंगाने बहिणीचे रूप घेतले होते. त्यामुळे ती बहिण म्हणते, 'वहिनी मी आता आपल्या गावाला जाते, नाहीतर माझे मालक रागावतील.' याप्रमाणे बहिणीचे रूप घेतलेला पांडुरंग त्यांच्या घरातून

बाहेर पडला आणि चोखामेळा घरी आले. हे आलेले बघितल्यावर सोयराबाई म्हणतात, अहो आत्ताच नणंदबाई बाहेर पडल्या. वाटेत भेटल्या कां? हे वाक्य ऐकल्यावर चोखोबा सद्‌गदीत झाले आणि त्यांना कळले की साक्षात पांडुरंगाने आपल्या बहिणीचे रूप घेऊन आपल्या पत्नीचे बाळंतपण केले. संत चोखामेळांचा हा मुलगा कर्ममेळा, हाही संत परंपरेतील आहे. या सोयराबाई आणि कर्ममेळा यांच्याही अभंग रचना आहेत. संत चोखामेळांचे मेव्हणे बंका महार व बहिण निर्मळा यांचेसुद्धा काही अभंग आहेत. संत चोखामेळांचेसुद्धा अंदाजे ३५० अभंग उपलब्ध आहेत. त्यांचे अभंग लिहून घेणेचे काम 'अभ्यंग अनंत भट्ट' हे करत असत असे संशोधक सांगतात.

संत चोखामेळांचे अभंग आपण जर बघितले तर त्यातून त्यांना झालेल्या आंतरिक वेदना प्रगट होतातः-

**हीन याती माझी देवा  कैसी घडेल तुझी सेवा ।।१।।**<br>
**मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रिती ।।२।।**<br>
**माझा लागताचि कर । सिंतोडा घेताती करार ।।३।।**<br>
**माझ्या गोविंदा गोपाळा । करुणा भाकी चोखामेळा ।।४।।**

आणखी एका अभंगात चोखामेळा सांगतात की पंढरपुरची वाट जर आपण आक्रमण केली तर कितीही माणूस वाईट, दुष्ट असू दे, तो शुद्ध होऊन जाणारच आणि हे मी दवंडी पिटून सांगतो :-

**टाळी वाजवावी गुढी उभी रहावी । वाट हे चालावी पंढरीची ।।१।।**<br>
**खटनट यावे शुद्ध होऊन जावे । दवंडी पिटी भावे चोखामेळा ।।४।।**

संत चोखोबांचे मेहुणे संत बंका हे आपल्या अभंगातून चोखामेळा कसे होते ते वर्णन करतातः-

**चोखा चोखट निर्मळ । तया अंगी नाही मळ ।।१।।**<br>
**चोखा प्रेमाचा सागर । चोखा भक्तीचा आगर ।।२।।**<br>
**चोखा प्रेमाची माऊली । चोखा कृपेची साऊली ।।३।।**<br>
**चोखा मनाचे मोहन । बंका घाली लोटांगण ।।४।।**

तसेच श्रीनामदेवमहाराज एका अभंगात चोखोबांचे वर्णन करतात :-

**चोखा माझा जीव चोखा माझा भाव । कुळधर्म देव चोखा माझा ।।१।।**<br>
**काय त्याची भक्ती काय त्याची शक्ती । मोही आलो व्यक्ती तयासाठी ।।२।।**<br>
**माझ्या चोखियाचे करिती जे ध्यान । तया कधी विघ्न पडो नेदी ।।३।।**<br>
**नामदेवे अस्थि आणिल्या पारखोनी । घेत चक्रपाणी पितांबरी ।।४।।**

एक दिवस पांडुरंगाच्या गळयातील नवरत्नांचा हार गायब झाला. चोखामेळा पंढरपूरच्या वाळवंटात

भजन करीत बसले होते आणि हार त्यांच्या गळ्यात घातलेला दिसला. चोखामेळा रेडहॅण्ड सापडले. खरे तर तो हार साक्षात् पांडुरंगाने त्यांच्या गळ्यात घातला होता. चोखामेळा सापडले आणि त्यांना पंचायतीपुढे बोलावण्यात आले. याबद्दल त्यांना बैलगाडीला जुंपून, मागे बांधून फरपटत नेण्याची शिक्षा फर्मावली गेली. दिवस ठरला, वेळ ठरली. चोखामेळांना बैलगाडीला जुंपले आणि बैल पळण्याकरता बैलाच्या पाठीवर आसूड ओढण्यात आले. कितीही आसूड ओढले तरी बैल एक पाऊलही पुढे टाकेनात. हे बघितल्यावर पंचायतीतील लोक त्यांच्या पत्नीला - सोयराबाईंना म्हणाले, 'काय गं रांडे , चेटूक वगैरे केलेस काय?' तेव्हा सोयराबाई म्हणतात, 'अहो भगवंत बैलाची शिंगे धरून उभा आहे, मग बैलाची काय टाप आहे पुढे पाऊल टाकायची.' यासंदर्भात श्रीचोखामेळा म्हणतात, 'काय रांडे चेटूक केलेस सांग आम्हाला । येरी म्हणे शिंगे धरुनी उभा ऋषीकेषी ।।' तेव्हा चोखामेळांचा अधिकार सर्वांना कळला.

मंगळवेढे ही त्यावेळी मोठी नगरी होती. शके १२६० रोजी मंगळवेढ्यातील वेशीच्या तटाची भिंत कोसळली होती. त्या भिंतीचे बांधकाम करण्यासाठी पंढरपूरहून मजूर आणण्यासाठी दूत पंढरपुरात आला आणि त्या मजुरासोबत या तटाच्या भिंतीच्या बांधकामासाठी चोखामेळा हे सहकुटुंब मंगळवेढ्याला आले. बांधकाम सुरू झाले. चार महिने बांधकाम झाले आणि पुढील बांधकाम करता करता ती भिंत एकदम कोसळली आणि त्याखाली चोखामेळा व अनेक कामगार हे गारद झाले. ही घटना घडली तो आजचा दिवस होता, म्हणजे वैशाख व. पंचमी इ.१३३८. ही गोष्ट श्रीनामदेवमहाराजांना कळली. श्रीनामदेवमहाराजांना वाटले की आपल्या चोख्याची समाधी व्हायला पाहिजे. म्हणून ते मंगळवेढ्याला आले. जागेवर आले पण त्यांना प्रश्न पडला की या भिंतीखाली चोखामेळांबरोबर अनेक गारद झाले आहेत. त्यामुळे या सर्वांतील चोखोबांची हाडे कोणती? परत ते पंढरपुरला आले आणि भगवंताला म्हणाले, 'भगवंता, या सर्वातील चोखोबांची हाडे कोणती? हे कसे ओळखायचे?' तेव्हा भगवान सांगतात, 'नाम्या, हाड घ्यावं कानाला लावावं, ज्या हाडातून विठ्ठल ध्वनी निघेल ते हाड चोख्याचे.' भगवंताचा चोखामेळांच्या बाबतीत काय भाव होता हे या वाक्यातून प्रतीत होते. याप्रमाणे श्रीनामदेवमहाराजांनी ज्या हाडातून विठ्ठल ध्वनी निघाला अशी हाडे गोळा केली आणि पंढरपूरला आले. स्वतः भगवंताने त्या अस्थी स्वतःच्या पितांबरात घेतल्या आणि त्यावेळी विठ्ठल नामाचा गजर सुरू झाला, अनेक संत सत्पुरुष जमा झाले. भगवान म्हणतात, 'नाम्या, माझ्या चोख्याची समाधी माझ्या महाद्वारात झाली पाहिजे.' याप्रमाणे नामदेवमहाराजांनी भगवंताच्या महाद्वारात चोखोबांची समाधी बांधली आणि या समाधीवरून स्वतः रुक्मिणीबाईंनी कुर्वंडी ओवाळून टाकली आणि सत्यभामाबाईंनी स्वतः चोखोबांची आरती केली. ही चोखोबांची समाधी वैशाख व. चतुर्दशी, शुक्रवार या दिवशी स्थापन झाली.

म्हणून याबाबत आमचे आजरेकर फडाचे श्रीकाळेमहाराज म्हणतात, 'पंढरपुरात दर्शनाला जायचे असेल तर आधी चोख व्हायचे (चोखोबांच्या समाधीचे दर्शन घ्यायचे), मग नाम घ्यायचे (नामदेव पायरीचे दर्शन घ्यायचे), मग पुढे पांडुरंगाचे दर्शन ठरलेले आहे.'

अशा या चोखोबांनी वैशाख व. पंचमी इ.स.१३३८ रोजी समाधी घेतली.

***

# प.पू. श्रीगोविंदपंत घोसरवाडकर

**जन्म**
**कार्तिक शु.११, शके १७७९**
**शुक्रवार दि.१८.११.१८५७**

**निर्याण**
**ज्येष्ठ शु.०३ शके १८६४**
**दि.०५.०६.१९४२**

श्रीचिमणाजीपंत कुलकर्णी हे घोसरवाड येथे रहात होते. त्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. श्रीचिमणाजीपंतांच्या पोटी कार्तिक शु. ११ शके १७७९ शुक्रवार दि.१८.११.१८५७ साली दुपारी १२ वा. पुत्र जन्माला आला. त्याचे बारशादिवशी 'गोविंद' हे नाव ठेवणेत आले. हा गोविंद म्हणजेच आमचे श्रीगोविंदपंत घोसरवाडकर.

श्रीगोविंदपंतांची लहानपणापासूनच ईश्वरभक्तीकडे ओढ होती. शिक्षणाकडे त्यांचे फारसे लक्ष नव्हते. कारीकोळ या गावी श्रीहालसिद्धनाथांचे स्थान आहे. या कारीकोळ गावातील देवाची पालखी एकदा घोसरवाड येथे आली होती. ही पालखी पाहून श्रीगोविंदपंतांना श्रीहालसिद्धनाथांचे आकर्षण निर्माण झाले. या पालखीचा घोसरवाड गावात मुक्काम होता. या मुक्काम काळात हे पालखीजवळच बसून राहिले. पालखीचा मुक्काम संपला, पालखी परत निघालेली बघून श्रीगोविंदपंतांना अतिशय वाईट वाटले. ''देवा, आता तू मला कसा भेटणार?'' असे म्हणून ते रडू लागले. त्यावेळी श्रीहालसिद्धनाथांनी त्यांना दृष्टांत दिला आणि सांगितले की, ''मी येथे देवळातच आहे. रोज दर्शनाला येत जा.'' याप्रमाणे श्रीगोविंदपंत न चुकता वाड्यातील देवळात दर्शनाला जाऊ लागले. या कालावधीतच म्हणजे अंदाजे १० व्या वर्षी श्रीगोविंदपंतांना संचारावस्था प्राप्त झाली आणि त्यांना श्रीहालसिद्धनाथांचा संचार सुरू झाला.

एकदा श्रीगोविंदपंत आपल्या मित्रमंडळींसह 'देवास पहावयास जाऊया' असे म्हणून रानावनातून भटकू लागले. भटकत असताना त्यांना रानातच अचानक संचार झाला. समोर एका वारुळामध्ये भला मोठा नाग प्रवेश करीत होता. संचारावस्थेत श्रीगोविंदपंतांनी त्या नागाला वारूळातून बाहेर ओढून काढले. ओढल्यामुळे त्या नागाने त्यांच्या हाताला विळखा घातला. यावेळी अचानक त्यांचा संचार थांबला. श्रीगोविंदपंतांना कळले की आपल्या हाताला नागाने विळखा घातला आहे. त्यावेळी त्यांनी श्रीहालसिद्धनाथांची प्रार्थना केली. त्याक्षणी नाग वेटोळे काढून निघून गेला.

श्रीहालसिद्धनाथांच्या समोर किंवा त्यांच्या पालखीसमोर श्रीगोविंदपंत हे काही प्रसंगी गुंडाचे व हत्याराचे खेळ खेळत असत. त्यावेळी त्यांना संचार झालेला असे. हा संचार आणि हा खेळ पाहून श्री चिमणाजीपंतांच्या मनात शंका येई. हा काय प्रकार आहे? म्हणून वडिलांनी या श्रीगोविंदपंतांना एका खोलीत डांबून ठेऊन बाहेरून कडी घातली. आत त्यांना जोराचा संचार झाला आणि ते दाराला टक्कर देऊ लागले, त्यामुळे आपोआप दाराची कडी निघून दार उघडले आणि तेथून ते धावत जाऊन देवासमोर गुंडाने खेळू लागले.

श्रीगोविंदपंतांचे लग्नाचे वय झाले म्हटल्यावर घरातील आई-वडिल लग्नाचा आग्रह करू लागले. परंतु लग्न करून संसारचक्रात आपण अडकू नये असे त्यांचे मत होते. पण आई-वडिलांच्या आग्रहास्तव श्रीगोविंदपंत हे लग्नास तयार झाले. घोसरवाड येथीलच श्री. अनंतभटजी यांच्या मुलीशी त्यांचे लग्न ठरले. लग्नाचे आदले दिवशी श्रीगोविंदपंतांना एकाएकी धनुर्वात झाला. हे बघून घरातील मंडळी घाबरली. विशेषतः मुलीचे आई-वडिल चिंतेत पडले. पण यावेळी श्रीगोविंदपंतांना एकदम संचार झाला आणि श्रीहालसिद्धनाथ म्हणाले, 'अरे माझ्या भक्ताला संकटातून मुक्त करण्यासाठी आलो रे' आणि श्रीहालसिद्धनाथांनी या श्रीगोविंदपंतांच्या अंगावर बुक्या मारून धनुर्वात काढला. थोड्या वेळात संचार थांबला आणि दुसरे दिवशी ठरल्याप्रमाणे मुहूर्तावर त्यांचे लग्न पार पडले.

असेच एकदा श्रीगोविंदपंत हे आपल्या स्वतःच्या घरापुढे हत्याराचा खेळ खेळत असताना त्यांना एका विटाळशी बाईचा चुकून स्पर्श झाला. त्यामुळे हातातील तलवारीचे पाते खस्सदिशी त्यांच्या पोटात घुसले, आतडी बाहेर आली. हे दृश्य बघून त्यांच्या आईने हंबरडाच फोडला. श्रीगोविंदपंतांनी एका हाताने आतडी सावरली आणि 'मला विटाळशीचा स्पर्श झाला आहे, ताबडतोब माझ्या डोक्यावर पाणी ओता' असे म्हणाले. लोकांनी दोन घागरी पाणी ओतले. त्यावेळी त्यांना पूर्वीपेक्षाही जोरात संचार झाला आणि भंडारा मागितला. त्यांनी आतडी आपल्या पोटात कोंबून, त्यावर त्यांनी भंडारा फासला. आश्चर्य असे की पोट पूर्वीप्रमाणे झाले. पण त्यांच्या पोटावर तलवारीचा मोठा वण अखेरपर्यंत होता.

कोर्ट ऑफ वॉर्डस् यांचे ताब्यात घोसरवाडकर सरकारांची इस्टेट होती. या इस्टेटीच्या व्यवस्थेकरिता श्रीदत्तोपंत कुंभोजकर यांची व्यवस्थापक म्हणून नेमणूक केलेली होती. श्रीदत्तोपंत कुंभोजकर हे प.पू.सद्गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज यांचे अनुग्रहित होते. एकदा श्रीगोविंदपंतांना संचार झाला आणि संचारात श्रीहालसिद्धनाथांनी सांगितले की, 'नुसते संचारावर भागत नाही, याच्या जोडीला गुरूपदेशही पाहिजे. म्हणून तू श्री. दत्तोपंत कुंभोजकरांना घेऊन चिमडला जा आणि गुरुपदेश घे.' या आदेशानुसार श्रीगोविंदपंत हे श्री. दत्तोपंत कुंभोजकर व श्री. मल्हारपंत घोसरवाडकर यांचेबरोबर चिमडला गेले. त्यावेळी चिमड येथे प.पू.सद्गुरू श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर हे पीठाधीश होते. त्यांचेकडून श्रीगोविंदपंतांना अनुग्रह (गुरूपदेश) मिळाला.

गुरूपदेश घेतल्यानंतर श्रीगोविंदपंत हे वरचेवर चिमडला जात असत. त्यावेळी प.पू.सद्गुरू श्रीनारायणमहाराजांना मूलबाळ नव्हते. श्रीगोविंदपंत हे एकदा चिमडास गेले असताना तेथे त्यांना संचार झाला. त्यावेळी चिमड येथील भक्तमंडळींनी श्रीनारायणमहाराजांना मूलबाळ नाही, पुढे ही परंपरा कोण चालवणार? असा प्रश्न देवास विचारला. तेव्हा देवाने संचारात, ''महाराजांना मुलगा होईल'' असे सांगून, श्रीगोविंदपंतांनी ओट्यात नारळ घातला आणि त्याप्रमाणे पुढे वर्षभरातच श्रीनारायणमहाराजांना मुलगा झाला. असे होते अधिकारी गुरू आणि शिष्य!

श्रीगोविंदपंत हे घोसरवाड येथे सरकारांचे वाड्यात कारकून म्हणून काम करीत होते. श्रीगोविंदपंतांना एकूण ६ अपत्ये झाली. १९१४ साली जुलै महिन्यात श्रीगोविंदपंतांच्या पत्नी निवर्तल्या. श्रीगोविंदपंतांच्या पलूस येथील श्रीधोंडीराममहाराज, श्रीटेंब्येस्वामी इ. संतमहात्म्यांच्या भेटी झाल्या.

श्रीगोविंदपंत हे मुलांच्या शिक्षणासाठी इ.स.१९१८ मध्ये सांगलीस रहायला आले. त्यांनी सांगली येथील पांजरपोळात नोकरी पत्करली. सांगलीस असताना ते दर गुरुवारी आणि रविवारी भजन करीत. श्री.दत्तोपंत कुंभोजकर हे सांगलीत असताना अकस्मात आजारी पडले आणि त्यांनी, ''मला गोविंदपंतांची भेट घडवा'' हाच ध्यास घेतला. त्याप्रमाणे निरोप दिल्यावर श्रीगोविंदपंत आले, तेथे त्यांना संचार झाला आणि संचारावस्थेत, 'अरे, कैलासाला जाऊन २ वर्षे तुझे आयुष्य वाढवून आणले आहे रे' असे सांगून त्यांना भंडारा दिला आणि आश्चर्य, २ वर्षे श्री.दत्तोपंतांच्या प्रकृतीस काहीही अपाय झाला नाही.

आमच्या वाड्यात चंद्राताई उदगावकर म्हणून बिऱ्हाडाने रहात होत्या. त्यांचे घरी श्रीगोविंदपंत वरचेवर येत. त्यामुळे श्रीगोविंदपंत आणि आमचे प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा चांगला परिचय झाला होता. असे श्रीगोविंदपंत आमच्या मंदिरात आले असता त्यांना संचार झाला आणि संचारात ते म्हणाले, ''अखंड कीर्तन आणि नामस्मरणाने केळकर मामा हे संप्रदायातील अधिकारी पुरूष ठरतील'' हे उद्गार संपूर्णपणे खरे ठरले. यावेळी आमचे प.पू.श्रीदासराममहाराज केळकर हे श्रीगोविंदपंतांना नमस्कार करायला गेले, तेव्हा श्रीगोविंदपंत म्हणाले, 'अरे तू मला नमस्कार करू नको. आम्हाला केव्हातरी संचार होतो, पण मला तुझ्या डोळ्यात कायमचा संचार दिसतोय.'

इ.स. १९२९ साली श्रीगोविंदपंत हे मधुमेहाच्या आजाराने ग्रासले गेले. मधुमेह वाढत गेला. पाय सुजले, गँगरीन झाले. त्यामुळे ते बेशुद्ध पडले आणि घोर लागला. त्यावेळी श्री. बाळासाहेब नणदीकर सरकार तेथे आले आणि त्यांनी श्रीगोविंदपंतांच्या हातात भंडाऱ्याची पिशवी दिली आणि त्यांनी श्री गोविंदपंतांना भंडारा लावला. एकदम त्यांना संचार झाला आणि देवाने त्यांना १४ वर्षे आयुष्य वाढवून दिले आहे असे सांगितले. त्याच रात्री गँगरीन फुटून त्यातील सर्व रक्त वाहून गेले आणि त्यांना आराम पडला.

याप्रमाणे १९४२ साली श्रीगोविंदपंतांना त्या आजारातून उठून १३ वर्षे पूर्ण झाली होती. देवाची पालखी खोतांच्या घरापुढे आल्यावर श्रीगोविंदपंतांना संचार झाला आणि ते म्हणाले, 'अरे ह्या झाडाचे शेवटचे वर्ष आहे. यापुढे या झाडाची मुले आणि तू (खोत) मिळून ही यात्रा चालवायची.'

देह ठेवायला फक्त आठवडा उरला आहे हे कळल्यानंतर श्रीगोविंदपंत हे निरवानिरवीची भाषा करू लागले. त्यांनी आपल्या सर्व नातेवाईकांना पत्रे लिहून बोलावून घेणेस सांगितले आणि 'उद्या ५ जून रोजी दुपारी बरोबर ३ वाजता मी जाणार', असे तेथे जमलेल्या मंडळींना सांगितले.

५ जून रोजी सकाळीच सगळी गडबड सुरू झाली. श्रीगोविंदपंतांनी सकाळी भटजींना बोलावून त्यांना दान वगैरे दिले आणि त्यांच्या पायाचे तीर्थ घेतले. तुळशीची पाने कानात घातली आणि सर्वांना सांप्रदायिक

भजन आणि पूजन अखंडितपणे करणेचा आदेश दिला. दुपारी दीडच्या सुमारास ते अंथरूणावर उठून बसले. हातात माळ घेऊन नामस्मरण करू लागले. त्यावेळी त्यांचे चुलतबंधू इचलकरंजीहून आले. त्यांना हाक मारुन म्हणाले, 'अरे जेवण करून घे आधी. मी कुणाचे जेवणाचे आड येणार नाही.' याप्रमाणे ते चुलत बंधू जेवायला बसले. त्यावेळी पंचाग काढून वेळ तरी पहावी या विचाराने त्यांचे चिरंजीव श्रीशंकरराव हे पंचाग पाहू लागले. त्यांना उद्देशून श्रीगोविंदपंत म्हणाले, 'अरे मी पंचकात जाणार नाही, काळजी करू नकोस.' दुपारी अडीचला पंचक संपणार होते, पावणे तीन वाजले. जप करता करता हातातील माळ एकदम खाली गळून पडली. नंतर ते बोटावर जप करू लागले. इतक्यात तीन वाजलेचा पहिला ठोका पडला. त्याचबरोबर त्यांची मान मागे तक्याला टेकली. दुसऱ्या ठोक्याला त्यांनी आपला श्वास ऊर्ध्वगती केला आणि तिसऱ्या ठोक्याला म्हणजे बरोबर ३ वाजता ज्येष्ठ शु. ३ शके १८६४ दिनांक ०५.०६.१९४२ रोजी त्यांनी वयाच्या ८५ व्या वर्षी महाप्रयाण केले आणि ते हालसिद्धरुप झाले.

***

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांची आरती**

आरती गोविंदा । हालसिद्धप्पा मुखी सदा ।
संचार होय अंगी । नुरवी भक्तांची आपदा ।।ध्रु।।
सिद्धांची आज्ञा होता । आपण चिमडासी आला ।
नारायण महाराजे । हस्त मस्तकी ठेविला ।।१।।
नित्य चाले पंचपदी । वृत्ती मुरे आनंदी ।
भंडारा हाती येता । नाचतसा ब्रह्मानंदी ।।२।।
अप्पाची वाडी तैशी । घोसरवाडी यात्रा ।
**दासराम** आठविता । सुख होय सर्वत्रा ।।३।।

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांचा निर्याणाचा अभंग**

शालिवाहन शके अठराशे पासष्ठ । तृतिया ते जेष्ठ शुद्धाचिये ।।१।।
गोविंदपंतांनी केलेसे निर्याण । दोन प्रहरी तीन झाले जेव्हा ।।२।।
गरजले तीन ऐकती ते कान । तुळशीचे पान कानी ठेवी ।।३।।
घातले आसन केले निरोधन । झाले ब्रह्मी विलीन तीन म्हणता ।।४।।
ऐसे हे नवल करोनि दाविले । कीर्तीरुपे उरले दासापाशी ।।५।।

# प.पू.सद्‌गुरू श्रीतुकाराममहाराज ऊर्फ श्रीतुकामाई (येहळेगाव)

जन्म
फाल्गुन व.५ शके १७३४
इ.स.१८१३

निर्याण
ज्येष्ठ शु. ८, शके १८०९
इ.स. १८८७

महाराष्ट्र राज्यातील मराठवाड्यामध्ये हिंगोली जिल्हा आहे. या हिंगोली जिल्हात कळमनुरी तालुक्यात येहळेगाव आहे. या गावात श्री. काशिनाथपंत उन्हाळे या नावाचे यजुर्वेदी सत्पात्र ब्राह्मण रहात होते. ते स्वभावाने निःस्पृह असलेने त्यांना गावामध्ये मान होता. त्यांनी आजन्म कोणाकडूनही दान घेतले नाही आणि कधीही ते खोटे बोलले नाहीत. त्यांची वडिलोपार्जित शेती होती. त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असे. योगाचेही त्यांना ज्ञान होते. ते दररोज २-३ तास साधनेला बसत असत. त्यांच्या पत्नीचे नांव पार्वतीबाई. विवाह होऊन १०-१५ वर्षे झाली तरी या दांपत्याला अपत्यप्राप्ती होईना. म्हणून पार्वतीबाईंनी यासाठी दिवसातून ३ वेळा स्नान, उपास-तापास व जप यासारखी खडतर उपासना सुरू केली. दत्तगुरू हे त्यांचे आराध्य दैवत होते. ३ वर्षे या पद्धतीने उपासना झाल्यावर एक दिवस त्यांना स्वप्नदृष्टांत झाला. श्रीगुरूदेव दत्तगुरू हे अंशरूपाने तुझे पोटी जन्म घेणार असा साक्षात्कार झाला. याप्रमाणे सौ. पार्वतीबाई यथावकाश गर्भवती राहिल्या आणि फाल्गुन वद्य पंचमी (रंगपंचमी) सोमवार शके १७३४ इ.स. १८१३ या दिवशी सूर्योदयास सौ. पार्वतीबाईंचे माहेरी सुकळी या गावी पुत्ररत्न अवतीर्ण झाले. जन्मतःच हे मूल तेजस्वी, अजानबाहू होते. बाराव्या दिवशी या बाळाला पाळण्यात घालणेत आले आणि 'तुकाराम' हे नांव ठेवणेत आले. हा तुकाराम म्हणजेच 'प.पू.श्रीतुकामाई महाराज' होत.

श्रीतुकामाईंच्या अवतारानंतर धनगरणींनी काशिनाथपंतांना न्हाणी (स्नानगृह) खोदण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी कुदळ घेऊन खड्डा काढणेस सुरवात केली. खड्डा काढता काढता एक मोठा अवजड दगड लागला. तो काही केल्या काशिनाथपंतांना बाजूला करता येईना. म्हणून ते गावातील लोकांना मदतीसाठी बोलावण्यास गेले. ही घटना श्रीतुकामाईंना कळली. श्रीतुकामाई आईच्या कुशीतून उठले आणि तो अवजड दगड लीलया त्यांनी बाजूला केला. ही वार्ता सुकळी गावात हा हा म्हणता पसरली आणि श्रीतुकामाईंना बघणेस खूप गर्दी जमली.

श्रीतुकामाई तीन-चार वर्षांचे असतानाच त्यांच्या मातोश्रींचे काही आजाराने देहावसान झाले. मातृछत्र हरपले. त्यामुळे काशिनाथपंतांचेवर सगळी जबाबदारी आली. श्रीतुकामाई दिवसभर खेळत असायचे. पण यांचे खेळ जगावेगळे होते. एक दिवस सुकळी गावातील नदीकाठी तुकामाई सर्व मित्रांसह खेळायला गेले. नदीला पाणी थोडेच होते. सर्व मुले पात्रातील वाळूत खड्डे काढून त्यात लपून बसायचा खेळ खेळत होती. इतक्यात एक पाण्याचा ओघ आला. हे बघून बाकीची मुले सावध होऊन पळून गेली, पण श्रीतुकामाई पाण्यामध्येच बसून राहिले. संध्याकाळ झाली तरी आपला मुलगा घरी आला नाही, हे बघून श्री. काशिनाथपंतांना

चिंता वाटू लागली. बरोबरच्या मुलांकडे चौकशी केली असता श्रीतुकामाई पात्रातील खड्ड्यातून बाहेर आले नाहीत असे कळले. काशिनाथपंत त्या मुलांना घेऊन नदीवर आले आणि ज्या ठिकाणी श्रीतुकामाई खड्ड्यात बसले होते, त्या ठिकाणी जाऊन जोरात हाक मारली. वडिलांची हाक ऐकू येताच श्रीतुकामाईंनी ''ओ'' दिली आणि ते त्या पाण्यातून सुखरूप बाहेर आले. हा सर्व प्रसंग पाहून काशिनाथपंतांनी आपल्या मुलाचा अधिकार जाणला आणि त्यांनी तुकामाईंना विचारले, 'अरे तुकाराम, तुला भीती वाटली नाही का? तुझा आत जीव गुदरला नाही कां?' हा प्रश्न ऐकल्यावर श्रीतुकामाई म्हणाले, 'बाबा मी एका विशिष्ट आनंदात होतो. प्राणाचा निरोध केल्याने मला भीती वाटली नाही.'

श्रीतुकामाईंची शरीरयष्टी चांगली धष्टपुष्ट होती. तेजस्वी होती. वयाच्या सहाव्या -सातव्या वर्षी तुकामाईंनी २ वर्षे मौन धारण केले होते. त्यानंतर वयाच्या ८ व्या वर्षी त्यांचे मौजीबंधन झाले. श्रीतुकामाई हे कायम एका विशिष्ट अवस्थेत असायचे. कायम एका अनुसंधानात असायचे. त्यामुळे त्यांचे देहाकडे लक्ष असायचे नाही. त्यामुळे गावातील लोक हा वेडा आहे म्हणून 'वेडा तुका' म्हणायचे. जगाच्यादृष्टीने ते वेडे असले तरी ते पूर्णपणे अंर्तज्ञानी होते. त्यांना परमार्थाचे वेड लागले होते.

येहळेगावापासून ३० मैलावर यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड नावाचे गांव आहे. तेथे नाथ संप्रदायाचे अधिकारी श्रीचिन्मयानंदस्वामी होते. हे स्वामी पंढरपूरची वारी करून परतीच्या वाटेला असताना त्यांचा मुक्काम येहळेगाव येथे झाला. पहाटे ते नदीवर स्नानाला गेले असताना त्यांना नदीकाठावर एक १०-१२ वर्षाचा मुलगा डोळे मिटून ध्यान करत बसलेला दिसला. तो मुलगा म्हणजे श्रीतुकामाई होते. श्रीतुकामाईंनी डोळे उघडले तर समोर श्रीचिन्मयानंदस्वामी उभे होते. दोघांची दृष्टादृष्ट झाली मात्र, अंतरीची खूण अंतरी पटली आणि दोघांच्याही डोळ्यातून प्रेमाश्रू वहायला लागले. चिन्मयानंदस्वामींनी आपला हात श्रीतुकामाईंच्या मस्तकावर ठेवला आणि ''रामकृष्णहरि'' या षडाक्षरी मंत्राची दीक्षा दिली आणि स्वामी म्हणाले, 'तुझे नांव आजपासून ''श्रीतुकाराम चैतन्य'' ठेवणेत आले आहे.' आता माझे येथील काम झाले. असे म्हणून स्वामी उमरखेडला गेले.

अंगात बंडी, डोक्याला टोपडे, हातात बांगड्या भरलेल्या आणि जवळ चिलीम अशी तुकामाईंची मूर्ती होती. चिलिमीमध्ये कधी ना तंबाखू, ना अग्नि पण 'जय गुरुमाय' म्हणून मोठ्याने झुरका मारला की चिलिमीतून ज्वाळा निघायच्या. तुकामाई अत्यंत निस्पृह होते. पण जरा स्वभावाने कडक होते. ते भारी शिव्या देत, पण वरून कठोर दिसणारे तुकामाई मनाने मात्र अत्यंत कोमल अंतःकरणाचे होते. दुसऱ्याचे दुःख, वेदना त्यांना पहावत नसत. एखादा गृहस्थ मनामध्ये एखादे काम व्हावे म्हणून हेतू धरून आला असेल, तर ते श्रीतुकामाईंना कळायचे व ते म्हणायचे, 'जा, तुझे काम होईल!'.

उमरखेड येथील श्रीचिन्मयानंद यांच्या उत्सवामधे श्रीतुकामाई गेले होते. त्यावेळी त्यांचे गुरूबंधू श्रीसहजानंदस्वामी (गोचरस्वामी) मठाधिपती होते. मठात ब्राह्मण भोजन सुरू होणार होते. इतक्यात

श्रीतुकामाई तेथे आले. श्रीतुकामाईंना बघितल्यावर त्या ब्राह्मण लोकांच्या मनात आले की हा भ्रष्ट आचरी कोणाचेही अन्न खातो, कोठेही रहातो, तो आपल्या पंक्तित येऊन बसला तर शास्त्राविरुद्ध होईल, म्हणून ब्राह्मण उठून जावू लागले. हे श्रीतुकामाईंनी ओळखले आणि तेथून ते बाहेर पडून एका जैन गृहस्थाच्या घरी गेले आणि तेथे आनंदाने कांदा भाकरी खात बसले. हा जैन गृहस्थ श्रीचिन्मयानंदांचा शिष्य होता. पण इकडे वेगळा प्रकार घडला. पंक्तीत वाढलेल्या सर्व पानांवर अन्नाऐवजी कृमी, किटक व अस्थी दिसू लागल्या. हा प्रकार बघितल्यावर मात्र ब्राह्मण मंडळी आश्चर्यचकित झाली. हा प्रकार त्यांनी श्रीगोचरस्वामींचे कानावर घातला. तेव्हा ते म्हणाले, 'श्रीतकामाईंच्या बाबतीत कोणाच्या तरी मनात विकल्प आला आहे, त्यामुळे हे असे झाले आहे. तुम्ही सर्वजण तुकामाईंना शरण जावा आणि आदराने त्यांना मठात घेऊन या.' त्याप्रमाणे सर्वजण तुकामाईंचेकडे आले आणि त्यांचे पाय धरले व क्षमा मागितली आणि त्यांना घेऊन परत मठात पंक्तित आणले. श्रीतुकामाई आत येताच पानावर असलेले कृमी, कीटक व अस्थी नाहिशा होऊन, सुग्रास अन्न दिसू लागले.

श्रीतुकामाईंच्या दर्शनास येणाऱ्या लोकांची संख्या वाढू लागली. त्यांच्या त्रासामुळे तुकामाई रानोमाळ पळत. पण लोक त्यांच्या मागे धावत जात. मग ते लोकांना शिव्या देत, दगड मारीत. पण भक्त त्यांची पाठ सोडत नसत. श्रीतुकामाईंच्या आशीर्वादाने अनेकांना संतान प्राप्ती, निर्धनांना धन, उद्योग, नोकरी प्राप्ती इ. होऊ लागली. अनेक हिंदु-मुसलमान त्यांच्या दर्शनास येऊ लागले. एकदा दक्षिण हैद्राबाद येथील साई बीरभान गीरजी नावाच्या योगाभ्यासी बैरागी महंताने श्रीतुकामाईंची परीक्षा घेण्यासाठी आपल्या दोन शिष्यांना येहळेगावला पाठविले. ते दोघे येहळेगावाला पोहोचले. त्यांनी तुकामाईंना आव्हान दिले आणि म्हणाले, आपण तिघेही खड्डे खणून त्यात समाधी लावून बसू. याप्रमाणे तिघेही वेगवेगळे खड्डे काढून समाधी लावून बसले आणि वरून खड्डा बंद करणेस सांगितले. तिसऱ्या दिवशी श्रीतुकामाई त्या खड्यातून बाहेर आले. आणि उर्वरीत दोन खड्यात पहाता तो ते दोन बैरागी मरून पडले होते. तुकामाई आता काय करतात हे पहाण्याकरिता लोकांची गर्दी जमली., इतक्यात तुकामाईंनी एकाच्या हातातील काठी घेऊन त्या दोन्ही बैराग्यांच्या मेलेल्या देहावर दोन दोन छड्या लगावल्या. छड्या लागताच ते दोघे उठून बसले आणि तत्काळ त्यांनी तुकामाईंचे पाय धरले आणि माफी मागितली. असे अनेक चमत्कार श्रीतुकामाईंनी केले.

प.पू.सद्गुरू श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदावलेकर हे वयाच्या १२ व्या वर्षी एका लंगोटीवर सद्गुरू शोधार्थ बाहेर पडले. प्रथम ते हरिपूर येथील श्रीराधाबाईअक्का यांचेकडे गेले. तेथून ते मिरजेचे श्रीअण्णाबुवा, सटाण्याचे देवमामलेदार, अक्कलकोटचे स्वामी समर्थमहाराज, हुमणाबादचे दत्तावतारी श्रीमाणिकप्रभू महाराज इ. संतांकडे गेले. पण तिथे अनुग्रहाचे काम झाले नाही. तेथून ते अबू पहाडावर गेले. तेथून ते काशीमध्ये तेलंगस्वामी, नंतर बंगाल-कलकत्ता येथे श्रीरामकृष्ण परमहंसांपर्यंत गेले. पण सद्गुरू भेट झाली नाही. तेथून ते दक्षिण हैद्राबाद येथे आले असतानाच अचानक एकदम त्यांच्या समोर श्रीसमर्थ संप्रदायातील श्रीरामकृष्ण

प्रगट झाले आणि त्यांनी सांगितले की, ''बाळ तू येहळेगावला श्रीतुकाराम चैतन्यांकडे जा. तेथे तुझे काम होईल.'' त्याप्रमाणे श्रीगोंदवलेकरमहाराज तेथून पैठण, औरंगाबाद, जालना, नांदेड मार्गे येहळेगावला निघाले. याच सुमारास श्रीतुकामाईंचे भेटीसाठी लोणीचे श्रीसखाराममहाराज आलेले होते. त्यांनी तुकामाईंस सांगितले की, 'गोंदवलेकर मुलगा तुझ्याकडे येईल, त्याला गुरूमंत्र देऊन पावन करा.' श्रीगोंदवलेकरमहाराज येण्याच्या अगोदर तुकामाई सारखे ओरडत असत की, 'अरे चोर येणार आहे आणि सगळे लुटून नेणार आहे. सांभाळा रे सांभाळा.' श्रीगोंदवलेकरमहाराज येहळेगावला सकाळी ९-१० चे दरम्यान पोहोचले. तुकामाईंची चौकशी केली पण लोक म्हणाले, ''तुकामाई आत्ता कोठे असतील हे सांगता येत नाही.'' श्रीगोंदवलेकरमहाराजांनी गावात बराचवेळ शोध घेतला आणि संध्याकाळी तुकामाईंच्या घराजवळ येऊन थांबले. एवढ्यात तुकामाई आरडाओरडा करत घरी आले. कमरेला लंगोटी, डोक्याला टोपडे, एका हातात चिलीम आणि दुसऱ्या हातात उसाचे कांडे अशा वेशात गोंदवलेकरमहाराजांसमोर आले. दोघांची दृष्टादृष्ट होताच, 'थांब तुझा मी खून करतो' असे श्रीतुकामाईंनी उच्चारले. हे ऐकून श्रीगोंदवलेकरमहाराज म्हणाले, 'महाराज तुम्ही माझा खून करावा म्हणूनच मी तुमच्याकडे आलो आहे.' श्रीगोंदवलेकरमहाराजांनी श्रीतुकामाईंचे पाय धरले. तुकामाईंनी त्यांना उठवून पोटाशी धरले आणि प्रेमाश्रूंचा वर्षाव केला. नऊ महिने गोंदवलेकरमहाराज येहळेगावला होते. याकाळात तुकामाईंनी त्यांची अनेकप्रकारे परीक्षा पाहिली. एकदा त्यांना वडाच्या झाडाची पाने तोडायला लावली आणि परत तोडलेली पाने जिथल्या तिथे लावायला सांगितले. पाच-पंचवीस ऊसाची मोळी केली आणि ती मोळी श्रीगोंदवलेकरमहाराजांचे डोक्यावर देऊन आपल्या मागे कधी चालायला, तर कधी पळायला लावले. एकदा एका शिष्याने उत्तम जातीचे २५ आंबे तुकामाईंचे समोर ठेवले. त्या आंब्यांपैकी एक आंबा फारच सुरेख होता. गोंदवलेकरमहाराजांच्या मनात आले की तो आंबा तुकामाई आपल्या हातून खातील कां? हा विचार तुकामाईंनी ओळखला आणि एक एक आंबा श्रीगोंदवलेकरमहाराजांचे अंगावर फेकायला सुरवात केली. श्रीगोंदवलेकरमहाराज यांना जो आंबा आवडला होता तो सोडून बाकीचे सर्व आंबे त्यांच्या अंगावर फेकले. शेवटी तो आंबा तुकामाईंनी आपल्या हातात घेतला आणि म्हणाले, गणू मी हा आंबा खाणार. हे वाक्य ऐकल्यावर गोंदवलेकरमहाराजांना अत्यानंद झाला आणि तो आंबा श्री.गोंदवलेकरमहाराजांनी चिरून दिला. त्यापैकी २ फोडी तुकामाईंनी खाल्या आणि उर्वरीत फोडी कुत्र्याला घातल्या.

एकदा सकाळी १० च्या सुमारास श्रीतुकामाई श्रीगोंदवलेकरमहाराजांसह नदीवर गेले. तेथे गावातील काही लहान मुले खेळत होती. तुकामाईंनी श्रीगोंदवलेकरमहाराजांना एक मोठा खड्डा काढणेस सांगितले. याप्रमाणे खड्डा काढला. तुकामाईंनी स्वतः त्या मुलांना त्या खड्ड्यात टाकले आणि वर वाळू पसरून त्यांना त्यात पुरले. मग श्रीगोंदवलेकरमहाराजांना त्या खड्ड्यावर सिद्धासन घालून बसण्यास सांगितले. तसेच कोणाशीही बोलायचे नाही आणि आपले आसन सोडायचे नाही असे सांगून, दूरवर एका झाडाखाली बसले. काही वेळानी त्या मुलांचे आई-वडील मुलांना शोधत आले. गोंदवलेकरमहाराजांना आपल्या मुलांबद्दल

विचारले असता, तेही काही बोलेनात. मग इकडे-तिकडे बघितले असता झाडाखाली श्रीतुकामाई बसलेले दिसले. त्यांच्याकडे जाऊन मुलांची चौकशी केली, तेव्हा महाराज म्हणाले, 'खड्डयावर जो मुलगा बसलाय नां, त्यालाच विचारा. तो नाही बोलला तर त्याला चांगले मारा.' त्याप्रमाणे ते आई-वडील श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या जवळ आले व त्यांना विचारु लागले. पण ते काही केल्या बोलेनात. कां तर, तुकामाईंची आज्ञा होती की, कोणाशीही बोलायचे नाही. ते न बोललेले पाहून त्या लोकांनी त्यांना चोप दिला. तरीपण ते बोलेनात. हे बघून श्रीतुकामाईंचे अंतःकरण द्रवले. ते धावत आले आणि म्हणाले, 'अरे याला दूर ढकला, यानेच या खड्डयात तुमची मुले पुरून टाकली आहेत आणि यावर बसला आहे.' हे ऐकून त्या लोकांनी श्रीगोंदवलेकरमहाराजांना बाजूला सारले आणि वाळू उकरुन जो बघतात तो ती मुले खड्डयात मृत अवस्थेत दिसली. हे बघितल्यावर मात्र त्या लोकांचा अधिकच पारा चढला आणि श्रीगोंदवलेकरमहाराजांना मारण्यास ते सरसावले. हे बघून एकदम श्रीतुकामाई ओरडले, 'अरे, त्याला उगाच कां मारता? तुमच्या मुलांना काय झाले आहे? ती तर चांगली जीवंत आहेत.' असे म्हणताच ती मुले हसत हसत खड्डयातून वर आली आणि आपल्या आईवडिलांना बिलगली. श्रीतुकामाई श्रीगोंदवलेकरमहाराजांजवळ गेले आणि अक्षरशः त्यांना आपल्या पोटाशी धरले व म्हणाले, 'अरे गणू, मी तुला मार देवविला, पण भगवान याचे फळ तुला दिल्याशिवाय राहणार नाही.' अशा बऱ्याच परीक्षा श्रीतुकामाईंनी बघितल्या आणि शेवटी त्यांच्यावर आपण कृपा केली पाहिजे असा विचार त्यांच्या मनात आला. लवकरच रामनवमी आली. तुकामाईंच्या सोबत जी मंडळी होती, त्यांना त्यांनी उत्सवासाठी उमरखेडला पाठवले. त्यानंतर तुकामाई श्रीगोंदवलेकरमहाराजांना स्वयंपाक घराजवळील बारवान (पाय विहीर) असलेल्या मोठ्या कोनाड्यात घेऊन गेले आणि तेथे त्यांचेवर प्रथम अनुग्रह केला. त्यानंतर पुन्हा दुपारी १२ वाजता विहिरीवर दोघांनी स्नान केले व तेथून एका अशोक वृक्षाखाली तुकामाईंनी श्रीगोंदवलेकरमहाराजांना हाताला धरून आपल्यासमोर बसविले आणि म्हणाले, ''पूर्वी वसिष्ठ ऋषींनी जे रामचंद्राला दिले तेच मी तुला आज देतो.'' असे म्हणून श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या मस्तकावर हात ठेवताच त्यांना समाधी लागली. बराच वेळाने समाधी उतरली. तेव्हा तुकामाईंनी त्यांचे 'ब्रह्मचैतन्य' असे नामकरण केले आणि 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्रयोदशी मंत्राचा उपदेश करून, रामोपासना करावी अशी आज्ञा केली व अनुग्रह द्यायचा अधिकार दिला. यानंतर तुकामाई श्रीगोंदवलेकरमहाराजांना सोबत घेऊन उमरखेड या आपल्या गुरूगृहाकडे गेले. त्यांना चिन्मयानंदांच्या समाधीचे दर्शन करविले आणि परत येहळेगावी आले. नंतर श्रीगोंदवलेकरमहाराज आपल्या मूळ गावी गोंदवल्यास परत आले.

गोंदवलेपासून अंदाजे १५ कि.मी.अंतरावर वावरहिरे हे एक छोटे गाव आहे. हे श्रीगोंदवलेकरमहाराजांचे मूळ गाव आहे. या गावी श्रीहनुमंतमहाराज घुगरदरे या नावाचे साक्षात्कारी संत होऊन गेले. श्रीहनुमंतमहाराज हे १३ वर्षांचे असताना श्रीबाणलिंग (शिव)मंदिरात पिंडीतून श्रीतुकामाई प्रगटले आणि त्यांनी श्रीहनुमंतमहाराजांचे मस्तकावर हात ठेऊन त्यांना अनुग्रह दिला. श्रीतुकामाईंनी आपले बरोबर काखेतून कुत्र्याचे पिल्लू आणले होते.

ते पिल्लू त्यांनी श्रीहनुमंतमहाराजांच्या अंगावर टाकले आणि पूर्वजन्मीचे श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे चरित्र लिही म्हणून आज्ञा केली. त्याप्रमाणे श्रीहनुमंतमहाराजांनी ८३९७ ओव्या असलेले 'स्वानंद सुधाकर' हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र लिहिले.

पाटोद्याच्या सीतारामपंतांचे चिरंजीव श्री बापू हे एक दिवस तुकामाईंची किर्ती ऐकून दर्शनाला आला. त्याने तुकामाईंकडून अनुग्रह घेतला व येहळेगावीच त्यांची सेवा करून राहू लागला. एक दिवस भर उन्हाळ्यात तुकामाईंनी या बापूला मठाबाहेर काढले आणि सर्वांना सांगितले की याला कोणीही भिक्षा वाढू नये, घातली तर त्याचा वंशक्षय होईल. त्यामुळे बापू शेवाळे या गावी भिक्षा मागण्यास जाई. पण तुकामाईंची सेवा त्याने सोडली नाही. एकदा द्वादशी दिवशी बापू देवपूजा करीत बसला असताना तुकामाई त्याच्या जवळ आले आणि त्याच्या डोक्यात काठी मारली व पूजा करीत असलेले सगळे देव विहीरीत टाकून दिले. बापूच्या डोक्यातून भळभळा रक्त येऊ लागले. पण तो एका क्षणात समाधी अवस्थेत पोहोचला. त्या दिवसापासून त्याची अवस्थाच बदलून गेली. तुकामाईंचे नुसते नांव घेतले की त्याच्या डोळ्यातून अश्रुधारा वहात. त्याची भक्ती बघून तुकामाईंना वाटले की याच्या भक्तीचे ऋण माझ्यावर फारच झाले. ऋण फेडण्यासाठी माझ्याजवळ आता काहीच उरलेले नाही.

एक दिवस तुकामाईंनी बापूला बोलावले आणि म्हणाले, 'बापू आता आम्ही परलोक गमन करणार.' त्याला आपली छाटी व पादुका दिल्या आणि सांगितले, 'तू आता श्रीचिन्मयस्वामींचा उत्सव करत जा.' पुढची सर्व व्यवस्था त्याला आखून दिली. ज्येष्ठ शु.५ शके १८०९ इ.स.१८८७ रोजी श्रीतुकामाईंनी संन्यास दीक्षा घेतली आणि ब्रह्मानंद हे नाव धारण केले. संन्यास दीक्षेनंतर ते तीनच दिवस राहिले. त्यानंतर ज्येष्ठ शु.८ शके १८०९ इ.स.१८८७ वार शुक्रवार रात्रीच्या प्रहरी आपले सद्‌गुरू श्रीचिन्मयानंद स्वामी यांच्या पादुकांसमोर पद्मासन घालून, येहळेगावी वयाच्या ७४व्या वर्षी त्यांनी महाप्रयाण केले.

***

# प.पू.सद्‌गुरू श्रीरामचंद्र दत्तात्रेय रानडे ऊर्फ गुरूदेव रानडे

जन्म
आषाढ शु.२, शके १८०८
शनिवार दि.३.०७.१८८६

निर्याण
ज्येष्ठ शु.१० शके १८७९
दि.०६.०६.१९५७

श्री.दत्तात्रेय नारायणराव रानडे या नावाचे सद्‌गृहस्थ जामसंडे, ता. देवगड येथे रहात होते. त्यांना जमखंडीचे संस्थानिक श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन यांनी जमखंडीला बोलावून घेतले. त्याप्रमाणे ते जमखंडीला आले. सरकारांनी त्यांना संस्थानात मामलेदारी दिली. श्री. दत्तात्रेय रानडे यांचा विवाह झाला. त्यांना यथावकाश तीन अपत्ये झाली. थोड्याच दिवसात त्यांच्या पत्नी निवर्तल्या. म्हणून त्यांनी सौ. पार्वतीबाई नामक कन्येशी दुसरा विवाह केला. या दांपत्याला एक कन्यारत्न झाले. तिचे नाव 'भागूअक्का' ठेवणेत आले. या कन्येनंतर या दांपत्याला १२ वर्षे अपत्य झाले नाही. त्यामुळे त्यांनी सोमवारचे कडक उपवास केले. त्याची फलप्राप्ती होऊन या दांपत्याचे पोटी आषाढ शु.२ शके १८०८ शनिवार दि.०३.०७.१८८६ रोजी पुत्ररत्न जन्माला आले. बारशादिवशी या मुलाचे नाव 'रामचंद्र' ठेवणेत आले. हा रामचंद्र म्हणजेच आमचे प्रो. रामचंद्र दत्तात्रेय रानडे ऊर्फ गुरूदेव रानडे.

श्रीगुरुदेवांना त्यांच्या मातोश्री सौ. पार्वतीबाई या आपले गुरू श्रीशंभुलिंगस्वामी यांचेकडे घेऊन गेल्या आणि गुरूदेवांना त्यांचे चरणावर घातले. तेव्हा स्वामी म्हणाले, 'माई, भविष्यकाळात तुमचा मुलगा एक मोठा सत्पुरुष होणार आहे. त्यामुळे माझे नमन असो.' हे ऐकून त्या दिवशी मातोश्रींनी गुरूदेवांच्या (आपल्या मुलाच्या) पायावर मस्तक ठेऊन नमस्कार केला.

श्रीगुरूदेवांचे सुरवातीचे शिक्षण त्यांच्या भगिनी भागूअक्का यांनीच करवून घेतले. त्यानंतर त्यांनी शाळेत प्रवेश घेतला. मराठी दुसरीत असताना त्यांना श्रीमंत बाळासाहेब कुरूंदवाडकर यांच्याकडून महिना पाच रूपये याप्रमाणे तीन वर्षे शिष्यवृत्ती मिळाली. प्राथमिक शिक्षणानंतर त्यांनी माध्यमिक शिक्षणासाठी जमखंडीच्या परशुरामभाऊ हायस्कूलमधे प्रवेश घेतला. श्रीगुरूदेवांची बुद्धि तल्लख असल्याने ते प्रत्येक वर्षी पहिल्या-दुसऱ्या नंबरने पास व्हायचे. श्रीगुरूदेवांचा कल्लू भोकरे नामक मित्र होता. तो श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकरांचा शिष्य होता. तो गुरूदेवांना पोहायला शिकविणेसाठी घेऊन गेला. श्रीगुरूदेवांना पाठीला भोपळा बांधला होता. तो अचानक सुटला. तेव्हा श्रीगुरूदेव पाण्यात बुडू लागले. तेव्हा या कल्लू भोकरे याने श्रीगुरूदेवांना वाचवले. यामुळे श्रीगुरूदेवांचा त्याच्याशी स्नेहभाव जागृत झाला. कल्लू भोकरे श्रीगुरूदेवांना घेऊन श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचेकडे आला. श्रीगुरूदेवांनी वैकुंठ चतुर्दशी कार्तिक शु. १४ शके १८२३ दि. २५.११.१९०१ रोजी जमखंडी येथे श्रीभाऊसाहेबमहाराजांकडून अनुग्रह घेतला. यावेळी श्रीगुरूदेव हे इंग्रजी सहावीत शिकत होते. म्हणजेच फक्त १५ वर्षांचे होते.

श्रीभाऊसाहेबमहाराजांनी अनुग्रह देतेवेळी केलेल्या उपदेशानुसार श्रीगुरूदेवांनी नामस्मरण करण्यास सुरवात केली. पुढे श्रीगुरूदेव मॅट्रिकच्या परीक्षेस बसले. परीक्षा देऊन घरी आले. जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती

आपल्याला जर मिळाली तर आपले गुरू खरे आहेत असा विचार त्यांच्या मनात आला आणि खरेच आश्चर्याची गोष्ट म्हणजे, श्रीगुरूदेवांना जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळाली. हे यश बघून जमखंडीकर सरकारांनी हत्तीवरून साखर वाटली.

कॉलेज शिक्षणासाठी ते इ.स. १९०३ साली पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये दाखल झाले. इंटरपर्यंत संस्कृत आणि तत्त्वज्ञान हे विषय त्यांनी घेतले. यातही त्यांनी यश मिळविले. इ.स.१९०७ साली ते गणित विषय घेऊन बी.ए. झाले आणि तत्त्वज्ञान विषय घेऊन एम.ए. झाले. यावेळी त्यांचा इंग्लिश शिक्षकांशी जवळचा संबंध आला.

श्रीगुरूदेवांची श्रीभाऊसाहेबमहाराज यांचेवर अढळ निष्ठा होती, विश्वास होता. एकदा ॲनी बेझंट बाईंनी श्रीगुरूदेवांना विचारले, ‘तुम्ही गुरू केला आहे का?’ तेव्हा श्रीगुरुदेव ‘हो’ म्हणाले. बेझंट बाईंनी, ‘तुमच्या गुरूंचा फोटो दाखवा’ असे सांगितल्यावर श्रीगुरूदेवांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांचा फोटो दाखवला. तेव्हा बेझंट बाई म्हणाल्या, ‘तुम्ही सुरक्षित छत्राखाली आहात.’ हे ऐकल्यावर श्रीगुरूदेवांची निष्ठा अधिकच दृढावली.

एम.ए. झाल्यानंतर श्रीगरूदेवांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये ग्रंथालयाचे प्रमुख म्हणून काही दिवस काम पाहिले. इ.स. १९१९ साली त्यांची फर्ग्युसन कॉलेजात इंग्रजीचे शिक्षक म्हणून नेमणूक झाली. ही नोकरी त्यांनी १९२० पर्यंत केली. इ.स.१९२० ते १९२४ पर्यंत त्यांनी सांगली येथील विलिंग्डन कॉलेजमधे प्राध्यापक म्हणून काम केले आणि पुढे १९२७ ते १९४६ पर्यंत ते अलाहाबाद विद्यापीठात प्राध्यापक व कुलगुरू म्हणून होते. इ.स.१९१० साली श्रीगुरूदेवांची श्रीअंबुरावांची भेट झाली. भेट झाल्यावर दोघांना अतिशय आनंद झाला. दोघांना एकमेकांची पारमार्थिक योग्यता कळली. इ.स.१९१३ च्या सुमारास श्रीमती शिवलिंगव्वा यांची भेट झाली.

दि. ०१.०६.१९२२ रोजी श्रीगुरूदेवांचा सौ. सीताबाई यांचेशी विवाह झाला. श्रीभाऊसाहेबमहाराजांनी अनुज्ञा दिल्यामुळे श्रीगुरूदेवांनी लग्न केले. १९२४ साली डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजीनामा देऊन श्रीगुरूदेव निंबाळला आले. तेथेच त्यांनी आपले अध्यात्म विद्यापीठ स्थापन केले. इ.स. १९२७ पासून अलाहाबाद विद्यापीठात श्रीगुरूदेवांनी सुमारे २० वर्षे नोकरी केली. शेवटी कुलगुरू म्हणून ते निवृत्त झाले. श्रीगुरूदेव हे अलाहाबाद विद्यापीठाचे एक भूषण होते. म्हणून १९४७ साली अलाहाबाद विद्यापीठाने त्यांना डी.लीट ही पदवी देऊन गौरविले.

श्रीगुरूदेवांनी ज्ञानेश्वर वचनामृत, संतवचनामृत, तुकाराम वचनामृत, रामदास वचनामृत, एकनाथ वचनामृत असे पाच ग्रंथ प्रकाशित केले. यातून त्यांनी परमार्थच उघड केला. यानंतर त्यांनी बरेच ग्रंथ वेगवेगळ्या भाषेत लिहिले.

श्रीभाऊसाहेबमहाराजांनी देह ठेवल्यावर श्रीगुरूदेव हे श्रीअंबुरावमहाराजांना गुरूस्थानी मानत, त्यांचे मार्गदर्शन घेत. श्रीगुरूदेवांना अनेक नामे ऐकू येऊ लागल्यावर, श्रीअंबुरावमहाराजांनी श्रीगुरूदेवांना नाम

देणेविषयी आज्ञा केली. तेव्हा 'आपण असेपर्यंत हे काम मी करणार नाही' असे नम्रतापूर्वक त्यांनी श्रीअंबुरावमहाराजांना सांगितले. श्रीअंबुरावमहाराजांनी देह ठेवल्यावर १९३५ साली नेमास बसले असताना श्रीभाऊसाहेबमहाराजांनी श्रीगुरूदेवांना नाम देणेची आज्ञा केली. तेव्हापासून श्रीगुरुदेव नाम देऊ लागले.

इ.स.१९४७ साली नामसप्ताहाच्या निमित्ताने श्रीगुरूदेव सांगलीस आले. तेव्हा त्यांना पटवर्धन सरकारांनी घरी अगत्याने बोलावले. तेव्हा त्यांनी सांगली येथे अध्यात्म विद्या मंदिर ही संस्था स्थापन केली. श्रीगुरूदेव ज्या ज्या वेळी सांगलीस यायचे, त्या त्या वेळी ते आमच्या घरी आल्याशिवाय राहिले नाहीत. एकदा तर श्रीगुरूदेव रात्री ११ वाजता सांगलीत पोहोचले. पोहोचल्या पोहोचल्या त्यांनी पटवर्धन सरकारांना मला श्रीबापूराव केळकरांकडे जायचे आहे, सेवकाला निरोप द्यायला पाठवा असे सांगितले. यावेळी आमचे मामा (बापूराव) हे मंदिरात झोपण्याच्या तयारीत होते. ते एकदम उठले आणि अंथरूण गोळा करू लागले. त्यांना एकाने विचारले, मामा आत्ता अंथरूण का गोळा करता? तेव्हा मामा म्हणाले, आता श्रीगुरूदेव येणार आहेत! हे वाक्य बोलून होतेय ना होतेय तो सरकारांचा माणूस श्रीगुरूदेव येणार असल्यासंबंधी निरोप घेऊन आला. श्रीगुरूदेव आले. आमच्या घरी अर्धा तास होते. आमचे मामा त्यांना म्हणाले, एवढ्या रात्री कशासाठी आलात? उद्या आला असता तरी चालले असते. तेव्हा श्रीगुरूदेव म्हणाले, 'बापूराव मागच्या वेळेला तुम्हाला मी शब्द दिला होता की मी सांगलीत आलो की आधी तुमच्याकडे येईन. त्याप्रमाणे मी तुमच्याकडे आलो आहे.'

असेच श्रीगुरूदेव एकदा सांगलीकर सरकारांच्या गणपती मंदिरातील एका खोलीत बसले होते. आमच्या मामांचा रोज गणपतीला जाण्याचा नेम होता. त्याप्रमाणे मामा गणपतीला गेले असता, श्रीगुरूदेवांनी मंदिर परिसरात श्रीमामांना पाहिले. त्यांनी श्री. दादासाहेब देशपांडे यांना सांगितले की, 'बापूराव जाताना दिसताहेत, त्यांना मी बोलावले आहे म्हणून सांगा.' त्याप्रमाणे श्री. दादासाहेब मामांना बोलवायला आले. पुढे गणपतीला न जाता मामा तडक श्रीगुरूदेवांचेकडे गेले. मामांनी श्रीगुरूदेवांना नमस्कार केला. लगेच श्रीगुरूदेवांनी मामांना नमस्कार केला. तेव्हा मामा म्हणाले, 'गुरूदेव, हे उलटे होतंय.' तेव्हा श्रीगुरूदेव म्हणाले, 'बापूराव हे उलटे नाही सुलटेच आहे. कां तर तुम्ही पुण्यपुरुष आहात.' श्रीगुरूदेवांनी आमच्या मामांना पुण्यपुरूष म्हणणे यातच मामांचा अधिकार कळून येतो. श्रीगुरुदेव मामांना म्हणाले, 'बापूराव, कीर्तन करता कां?' इतर कोणाताही विचार न करता मामा म्हणाले, 'करतो की.' आणि मामांनी लगेच श्रीगुरुदेवांसमोर दीड ते दोन तास अस्खलित कीर्तन केले. हे कीर्तन ऐकल्यावर श्रीगुरूदेव म्हणाले, 'देवाकरता कीर्तन करणारे एकटे बापूराव आहेत.' श्रीगुरूदेवांचा आणि माझे आजोबा श्रीदासराममहाराज केळकर यांचाही खूप स्नेह होता. आमच्या श्रीदादांनी माळबंगल्यावर श्रीगुरूदेवांपुढे 'ज्ञानदेव तेहेत्तीशी'वर प्रवचन केले होते. हे ऐकून श्रीगुरुदेव दादांच्यावर बेहद्द खूष झाले होते. एकदा आमचे दादा श्रीगुरूदेवांना म्हणाले, 'गुरूदेव, अंबुराव महाराज म्हणायचे की, आपल्या एका नामाला सहा नामे फुटली आहेत.' हे ऐकून श्रीगुरूदेव म्हणाले,'अहो रामभाऊ (दासराममहाराज) तुमच्या एका नामाला ६६ पदे फुटली आहेत (६६ पदांची गुरूलिंग गीता)'.

शेवटी श्रीगुरूदेवांची तब्येत हळूहळू विकल होत चालली होती. १९५६ च्या डिसेंबर महिन्यात त्यांना रक्तीआव होऊन त्रास झाला. त्यामुळे त्यांना जास्तच अशक्तपणा आला. इतके असूनसुद्धा ते धारवाडला व्याख्यानासाठी गेले. येताना ते निंबरगी व इंचगेरी येथे जाऊन आपल्या सद्‌गुरूंच्या समाधीचे दर्शन घेऊन आले.

ते परत अलाहाबादला गेले. तेथे गेल्यावर वादळी वाऱ्यासह जोराचा पाऊस झाला. श्रीगुरूदेवांच्या बंगल्याजवळ वीज पडली. यापूर्वीही निंबाळचे घरावर वीज पडली होती. त्यांची आठवण त्यांना झाली. 'ही वीज काय माझी पाठ सोडत नाही' असे ते म्हणाले. त्या दिवसापासून त्यांना ताप व खोकला सुरू झाला. 'माझ्या वस्तुमधील तेज कमी झालेले दिसत आहे' असे ते बोलून गेले. डॉ. पदकी आले. त्यांनी तब्येत बघताच क्षयाच्या अखेरच्या अवस्थेचे हे लक्षण आहे असे सांगितले. तपासणी केली असता डॉक्टरांना क्षयाचा एकही जंतू आढळला नाही. अलाहाबादमधील आवडती ठिकाणे श्रीगुरूदेव बघून आले आणि तेथून ते निंबाळला परत यायला निघाले. वाटेत मुंबई, नाशिक करत ते पुण्यात आले. पुण्यातून निंबाळला निघाल्यावर त्यांना श्रीभाऊसाहेब महाराजांच्या पत्रांची पेटी जवळ दिसली नाही. तेव्हा त्यांना ती पेटी दुसऱ्या डब्यात ठेवल्याचे सांगितले. पण याची खात्री करण्याकरता ते ज्या डब्यात ही पेटी होती तिथपर्यंत गेले आणि ती पेटी पाहूनच परत आले. गुरूंची पत्रे ही वेदवचनेच आहेत अशी त्यांची श्रद्धा होती.

निंबाळला पोहोचल्यावर श्रीगुरूदेव निरवानिरवीची भाषा करू लागले. तब्येत जास्तच बिघडत चालली होती. त्यांना तपासायला डॉ. तुळपुळे व डॉ. अजगावकर आले होते. या स्थितीतच श्रीगुरूदेवांनी या दोघा डॉक्टरांना नाममंत्र दिला. पुढे त्यांनी भेटणे-बोलणे-चहापाणी-अन्न वर्ज्य केले. केवळ श्वासावर लक्ष ठेऊन होते. नेहमीप्रमाणे सकाळी नेम केला. इंचगिरीकडे हात जोडून श्रीभाऊसाहेबमहाराजांना वंदन केले आणि घरी आल्यावर खुणेनेच पत्नी सौ. सीताबाईंना, 'माझी पूर्वतयारी झाली आहे' असे सांगितले. ते उपस्थित मंडळींना म्हणाले, 'हे पहा आता तुमच्यावर मोठी जबाबदारी आहे. सर्वांशी गोड बोलावे. पण आपले अंतःकरण मात्र कोणाला देऊ नये.' त्यांनी रात्रीचे भजन सुरू करा म्हणून सांगितले आणि भजनाअंती कापूर लावून विठ्ठल गर्जना होत असतानाच, नेमाच्या अनुसंधानात श्रीगुरूदेवांनी निंबाळ येथे ज्येष्ठ शु.१० शके १८७९ दिनांक ०६.०६.१९५७ रोजी रात्रौ १० वा. ३२ मिनिटांनी वयाच्या ७१ व्या वर्षी महाप्रयाण केले.

***

कसा तेवतो ज्ञान भक्ती प्रदीप । सुमार्गी जनी साधुसंती अधीप ।

असे थोर विद्वन्मणी रामचंद्र । महाभूषणा वंदू होवोनी नम्र ।।

-- श्रीदासराममहाराज

# प.पू. श्री. ग. वि. तथा श्रीकाकासाहेब तुळपुळे

**जन्म**
**दि.२०.०२.१८९०**

**निर्याण**
ज्येष्ठ शु.११ शके १९०४,
दिनांक ०२.०६.१९८२

प.पू. श्रीकाकासाहेब तुळपुळे यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील वडगाव येथे दि.२०.०२.१८९० रोजी झाला. ते वयाच्या ९ व्या वर्षापर्यंत आपल्या चुलत्याकडे वडगाव येथे रहात होते. गावातच एक ग्रामदैवत भैरवाचे मंदिर आहे. या मंदिरात ते दर्शनाला जात असत. १० व्या वर्षी ते इंग्रजी शिकण्यासाठी पुण्यास गेले. तेथे त्यांनी वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत शिक्षण घेतले. तेथून ते साताऱ्याला शिक्षणासाठी आले. तेथे श्री. देवधरमास्तर म्हणून एक शिक्षक होते. हे देवधरमास्तर भावनेपेक्षा बुद्धिला आणि त्यातून मनुष्याच्या तर्काला श्रेष्ठ मानणारे होते. या त्यांच्या अशा शिकवणुकीमुळे श्रीकाकासाहेबांची देवावरील श्रद्धा कमी होऊन बुद्धितील बळ हेच श्रेष्ठ आहे अशी मानसिकता निर्माण झाली.

कोणतेही ध्येय गाठण्यास त्या ध्येयाकडे जाणाऱ्या एकाद्या आदर्श व्यक्तीची आवश्यकता असते. त्याप्रमाणे श्रीकाकासाहेब हे आदर्श व्यक्तीच्या शोधास लागले. परंतु त्यात त्यांना लवकर यश आले नाही. इ.स.१९०८ साली श्रीकाकासाहेब मॅट्रिकची परीक्षा पास झाले व त्यांनी पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि या कॉलेजमध्येच श्रीकाकासाहेबांचा श्रीगुरूदेव रानडेसाहेबांशी प्रथम परिचय झाला. गुरूदेवांचे सरळ जीवन, त्यांच्या बुद्धिची तीक्ष्णता आणि विचारांची खोली हे पाहून श्रीकाकासाहेब हे प्रभावीत झाले आणि आपण ज्याप्रकारच्या आदर्श व्यक्तीच्या शोधात होतो, ती व्यक्ती आपल्याला मिळाली असे त्यांना वाटले. त्यांचा त्यांना सहवास लाभू लागला आणि श्रीगुरुदेवांवरील त्यांची श्रद्धा दिवसेंदिवस दृढ होऊ लागली.

श्रीकाकासाहेबांचा मुळातच संशयवादी स्वभाव होता. परंतु श्रीगुरूदेवांचा सहवास लाभल्यावर त्यांच्या स्वभावात फरक पडला. अध्यात्म ध्येयाकडे ते वळले. गुरूदेवांना आदर्श पुरूष मानून त्यांच्यासारखे आपण व्हावे असा विचार त्यांच्या मनात यायला लागला. श्रीगुरूदेवांना प.पू.सद्गुरू श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचा अनुग्र होता. त्यामुळे श्रीगुरूदेवांनी श्रीकाकासाहेबांना श्रीभाऊसाहेबमहाराजांकडून अनुग्रह घ्या असे सांगितले. श्रीगुरूदेवांच्या सांगण्यावर दृढ विश्वास ठेऊन ते अनुग्रह घेण्यासाठी हिंचगेरीस गेले. हिंचगेरीला गेल्यावर मठात सगळे खेडवळ वातावरण, शांत परिसत बघून काकासाहेब मोठे आश्चर्यचकित झाले आणि पुण्याची मंडळी आली आहेत असे एकानी श्रीभाऊसाहेबमहाराजांना कळविले.

एवढ्यात प.पू.श्रीअंबूरावमहाराज तेथे आले आणि श्रीअंबूरावमहाराज या काकासाहेबांना महाराजांपाशी घेऊन आले. श्रीभाऊसाहेबमहाराजांनी श्रीकाकासाहेबांना बघितल्यावर महाराज म्हणाले, ''मी जटा वाढविलेल्या नाहीत, भगवी वस्त्रे घालीत नाही, मग मी साधु असे तुम्हाला कसे कळले?'' हे ऐकून श्रीकाकासाहेब म्हणाले,

''आपण साधू आहात हे मला कळले नाही. परंतु डेक्कन कॉलेजमध्ये श्रीरामभाऊ रानडे आमच्या वर्गाला संस्कृत शिकवित असत. त्यावेळी माझा आणि त्यांचा परिचय झाला आणि त्यांचेविषयी प्रेमादर वाढू लागला. पुढे त्यांचेशी बोलताना माझ्या ध्यानात आले की ते आपणाला देवाप्रमाणे मानतात. तेव्हा मी मनारशी एक त्रैराशिक मांडले की, श्रीरामभाऊ ज्यांना देव मानतात ते किती थोर असतील? या त्रैराशिकाचे उत्तर घेऊन मी आपणाकडे आलो आहे.''

अनुग्रह घेण्यापूर्वी महाराजांना आपली मनाची धारणा सांगावी म्हणून ते महाराजांना म्हणाले, ''मी संशयवादी आहे. देवावर माझा विश्वास नाही.'' हे ऐकून महाराज म्हणाले, ''ज्याला तुम्ही पाहिले नाही, त्यावर तुमचा विश्वास कसा बसणार?'' आणि एकदा पाहिल्यावर देव नाही म्हणून सांगितले नाही, त्याला तुम्ही कबूल करणार नाही. पण आम्ही सांगतो तसे वर्ष सहामहिने करण्याची आपली तयारी पाहिजे. यावर काकासाहेब म्हणाले, मी प्रयत्न करीन, शक्ती आपण द्यावी. तेव्हा महाराज म्हणाले, प्रयत्न तुम्ही करा, शक्तीचे मी पाहीन. याप्रमाणे श्रीभाऊसाहेबमहाराजांनी इ.स. १९११ साली दत्तजयंतीच्या दिवशी काकासाहेबांना अनुग्रह दिला.

अनुग्रह झाल्यावर श्रीकाकासाहेबांची गुरूदेवांची भेट झाली. अध्यात्माबद्दल श्रीगुरूदेव त्यांचेशी मोकळेपणाने बोलले. श्रीकाकासाहेबमहाराजांनी सांगितलेले साधन जोमाने करु लागले आणि त्यांचा सद्गुरूवरील भक्तीभाव वाढला.

यादरम्यान गांधीवादमय वातावरण निर्मा झाले. याकडे श्रीकाकासाहेबांनी मनायी ओढ होऊ लागली. परंतु श्रीगुरूदेवांनी त्यांना स्पष्ट शब्दात मार्गदर्शन केले. त्यामुळे श्रीकाकासाहेब गांधीवादाच्या विकारातून बाहेर पडले.

इ.स. १९१३ साली श्रीकाकासाहेबांचा विवाह झाला. यानंतर श्रीकाकासाहबांनी ७-८ महिने जळगाव व धुळे येथे शिक्षक म्हणून नोकरी केली. त्यानंतर ते अजमेरला सरकारी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. ही नोकरी सोडून ते पोस्ट खात्यामध्ये रुजू झाले. इ.स.१९४५ मध्ये श्रीकाकासाहेब पोस्ट खात्यातून निवृत्त झाले.

सेवानिवृत्त झाल्यावर गुरूदेवांच्या अनुमतीने श्रीकाकासाहेब हे सांगलीस रहावयास आले. सांगलीत राहूनच श्रीकाकासाहेबांनी कठोर नामसाधना केली. अध्यात्म तत्त्वांचे चिंतन, ग्रंथलेखन व श्रीगुरूदेवांच्या अनुमतीने प्रवचन सेवा केली.

इ.स.१९७५ सालानंतर श्रीकाकासाहेबांची प्रकृतीची तक्रार सुरू झाली. इ.स. १९८० सालापर्यंत त्यांच्यावर दोन शस्त्रक्रीया झाल्या. एक दिवस श्रीकाकासाहेबांच्या अंगाला एकदम घाम सुटला आणि अंगातील सरदा ओलाचिंब झाला. काही वेळाने घाम कमी होऊ लागला आणि हुषारी येऊ लागली. यावेळी झालेल्या परिस्थितीविषयी

श्रीकाकासाहेब सांगतात की, मला घाम सुटल्याचे माहित होते. घाम जसजसा जास्त झाला तसा अशक्तपणा वढू लागला. मरणाची मला भीती नव्हती. मला दीर्घायुष्य देऊन देवानी माझ्यावर उपकार केल्याची जाणीव मला होती. मी बेचैन होण्याचे वेगळे कारण आहे. मी अत्यंत खीण झालो असे वाटू लागले. माझ्या अनुभवास आलेल्या रुपाकडे पहावे म्हटले तर रूप दिसेना. नाद काही ऐकत पडावे म्हटले तर तोही बंद झाला होता. मी घाबरलो, इतक्या वर्षांची प्रचिती एकदम बंद झाली. विशेष म्हणजे नाम तरी आठवत पडावे म्हटले तर तेही आठवेना. इतक्यात माझ्या दृष्टीसमोर चित्रविचित्र घाणेरडी रुपे दिसू लागली. अशा अवस्थेत जगण्यापेक्षा मेलेले काय वाईट असे मनात आले. नामस्मरणाशिवाय जीवन जगायचे कशाला? असे मनात आले. थोडावेळ मी येथे नाही असे वाटल्यागत झाले. अशा कळवळलेल्या अंतःकरणाने नामाची आठवण करण्याचा प्रयत्न सुरू केला. इतक्यात बारीक नाद सुरू झाला. नाम आठवले, नेहमीचे रूप दिसू लागले.

अशा श्रीकाकासाहेबांनी ज्येष्ठ शुद्ध ११ शके १९०४, म्हणजेच, दिनांक ०२.०६.१९८२ रोजी आपली कन्या सौ. कुसूमताई नगरकरांचे घरी, वयाच्या ९२ व्या वर्षी, मुंबई येथे देह ठेवला.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीकाकासाहेब तुळपुळे यांची आरती**

आरती काकासाहेबा ।<br>
तुम्हाजवळी नाम मेवा ।<br>
दिगंत कीर्ती तुझी ।<br>
तोषविले भाऊरावा ।।ध्रु।।<br>
भाऊराव गुरू तुमचे ।<br>
जगी धन्य झाला ।<br>
**दासराम** आरती करी ।<br>
तोषविले सकळा ।।१।।

# प.पू. श्रीमहादबामहाराज पाटील (धुळगावकर)

**जन्म**
**आश्विन शु.१३, शके १८३८**
**सोमवार दि.९.१०.१९१६**

**निर्याण**
**ज्येष्ठ शु.१५ शके १९०४ वटपौर्णिमा**
**रविवार दि.६.६.१९८२**

श्री. बाबगोंडा पाटील हे धुळगाव (सोनी) ता. तासगाव, जि. सांगली येथे रहात होते. त्यांचा सौ. बायाक्कामाता यांचेशी विवाह झाला. श्रीबाबगोंडा पाटील यांच्या घराण्यात पाटीलकी होती. तसेच यांच्या घराण्यात दत्तभक्ती होती. श्री. बाबगोंडा पाटील यांनी ४० वर्षे अखंड पायी नृसिंहवाडीची पायी वारी केली. अशा या दांपत्याच्या पोटी आश्विन शु. १३ शके १८३८, सोमवार दि.०९.१०.१९१६ रोजी पुत्र जन्माला आला. त्याचे महादबा असे नाव ठेवण्यात आले. हेच आमचे श्रीमहादबामहाराज पाटील होत.

बालपणापासूनच श्रीमहादबामहाराजांना वाचासिद्धी होती. जन्मतःच ते सिद्धपुरुष होते. महाराज येणाऱ्या लोकांना कायम सांगत की, 'मी शिकून आलोय.' त्यामुळे त्यांना इतर शिकायची गरज नव्हती.

खटाव (नांद्रे) येथील परमाधिकारी संत प.पू. श्रीरामानंदमहाराज खटावकर यांचा अनुग्रह श्रीमहादबामहाराजांना झाला. त्यांनी सांगितल्याप्रमाणे ते उपासना करीत असत. त्यांनी उभ्या आयुष्यात पैशाला स्पर्श केला नाही. ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणेकरिता, येणाऱ्या भक्ताबरोबर सायकल, बैलगाडी, मोटरसायकल व काहीवेळा पायीसुद्धा जात असत. श्रीमहाराज हे राजयोगी होते. भक्तांना ते ज्ञानेश्वरी, दासबोध किंवा इतर एखाद्या ग्रंथातील कोणत्याही ओव्या काढून वाचायला सांगत असत आणि त्याचा ते उदाहरणासह अर्थ सांगत.

श्रीमहाराजांची रहाणी अगदी साधी होती. धोतर, शर्ट, करवतकाठी उपरणे, निळा कोट, डोक्याला लालचुटुक रुमाल, हातात वेताची काठी आणि पायात कापडी बूट असा त्यांचा पोशाख होता. नृसिंहवाडीस ते शुद्ध चतुर्दशीला येत आणि दत्ताची पौर्णिमा करून पुढे जात असत.

श्रीमहादबामहाराज सांगलीला आले की आमच्या घरी म्हणजे श्रीरामनिकेतनमध्ये न चुकता येत असत. बऱ्याच वेळेला ते सायकलवरून भक्ताबरोबर आलेले मी पाहिलेले आहे. मलाही त्यांचा आशीर्वाद प्राप्त झालेला आहे. श्रीमहादबामहाराज हे आमच्या श्रीदासराममहाराजांच्या कीर्तनाला येत असत. काहीवेळा कीर्तनात ते इतके रंगून जात व म्हणत की, 'रामभाऊ, तुमचे कीर्तन ऐकून (कानावर हाताने मारल्याची खूण करून) माझ्या कानात ठणठण होते' कानात ठणठण होणे म्हणजे यावेळेला त्यांना अनुहताचा नाद ऐकायला येत असे. श्रीमहादबामहाराजांचे आमच्या श्रीदासराममहाराजांच्यावर निरतिशय प्रेम होते.

माधवनगर येथे ह.भ.प. श्रीवासुदेवराव जोशी यांचे कीर्तन सुरू होते आणि त्या कीर्तनाला श्रीमहादबामहाराज पाटील हे उपस्थित होते. एकदम श्रीमहादबामहाराज मधेच उठले आणि म्हणाले, 'आत्ता

पावसला स्वामी स्वरूपानंदांनी देह ठेवला.' आणि आश्चर्य असे की काही वेळातच आकाशवाणीवर स्वामींनी देह ठेवल्याची बातमी प्रसारीत झाली.

श्रीमहादबामहाराजांकडे अनेक भक्त, अडी-अडचणी घेऊन येत. श्रीमहाराजांचे खिशात अंगाऱ्याची डबी असे. त्या डबीतील अंगारा ते त्या भक्ताला लावत आणि खरेच त्या भक्तांच्या अडचणी दूर होत.

श्रीमहाराज असतानाच त्यांनी नृसिंहवाडी येथे मठ बांधला होता. या मठाच्या व्यवस्थेसाठी त्यांनी ट्रस्ट स्थापन केला. श्रीमहाराजांनी १९८१-८२ च्या दरम्यान समाधी घेणेचे ठरविले. याबाबत त्यांनी काही शिष्यांना बोलूनही दाखविले होते. समाधी कोठे बांधायची ती जागासुद्धा महाराजांनी निश्चित करून दाखवून ठेवली होती आणि विश्वस्तांना त्याठिकाणी मला समाधिस्त करा अशी आज्ञाच देऊन ठेवली होती. तसेच त्यांनी मठाच्या विश्वस्तांना सांगून ठेवले होते की, माझ्या समाधीवर पुण्यतिथी दिवशी सांगलीच्या श्रीरामरायांना (श्रीदासराममहाराज केळकर) यांना बोलवा आणि त्यांचे हातून माझे समाधीवर फुले अर्पण करा. याप्रमाणे श्रीमहादबामहाराजांनी समाधी घेतल्यानंतर श्रीदासराममहाराज हे दरवर्षी न चुकता पुण्यतिथी सोहळ्यास जात असत. यावेळी श्रीदासराममहाराज हे 'पाटीलमहाराज दत्तगुरू । पाटीलमहाराज दत्तगुरू ।' हे भजन म्हणत. तेव्हापासून हे भजन आजतागायत म्हटले जाते.

अशा या श्रीमहादबामहाराजांनी सर्वांना वर्षभर आधी, आता तुम्ही येथून पुढे वाडीस भेटावयास, दर्शनास या असे सांगून ठेवले होते. याप्रमाणे श्रीमहाराजांनी ज्येष्ठ पौर्णिमा (वटपौर्णिमा) शके १९०४, रविवार दि.०६.०६.१९८२ रोजी सकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी वयाच्या ६६व्या वर्षी देह ठेवला व ते दत्तरूप झाले.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीमहादबा पाटीलमहाराज यांची आरती**

आरती संतराजा । महादबा महाराजा ।
साधुसंत मुग्ध होती । पाहुनिया भक्तीकाजा ।।ध्रु।।
नरसोबावाडी क्षेत्र । जगी थोर पवित्र ।
तेथेची वास केला । ख्याती झाली सर्वत्र ।।१।।
पाटील महाराज । दत्तगुरू गजर ।
विभुती लाविताची । थोर होय चमत्कार ।।२।।
सुख दुःख विसरले । घडताचि दर्शन ।
अनुभव सज्जनांचा । करी **दासराम** गान ।।३।।

# प.पू.मातोश्री सौ.लक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेबमहाराज कोटणीस

जन्म
इ.स.१८७०

निर्याण
ज्येष्ठ व.०५ शके १८३४
दि.५.६.१९१२

श्री. व्यंकट लक्ष्मण गदगकर सत्तिगिरीकर यांचे पोटी इ.स.१८७० मध्ये कन्यारत्न जन्माला आले. त्यांचे बारसे दिवशी 'तुळसाबाई' हे नाव ठेवण्यात आले.

तुळसाबाई या ११ वर्षाच्या असतानाच त्यांचा विवाहयोग जमून आला. इ.स.१८८१ च्या वैशाख महिन्यात मध्यरात्रीच्या मुहूर्तावर श्रीतात्यासाहेबमहाराज यांचेशी त्यांचा विवाह झाला. त्यांचे सासरी नाव 'लक्ष्मी' ठेवणेत आले. या लक्ष्मी म्हणजेच आमच्या मातोश्री सौ.लक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेबमहाराज कोटणीस. यांच्या डोळ्यातील बाहुल्या उलट्या होत्या. सौ. लक्ष्मीबाई कोटणीस यांना इ.स.१८८६ साली आषाढ शुद्ध एकादशीला चिमडच्या श्रीरामचंद्ररावजीमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह प्राप्त झाला. त्यांना घरी 'आईसाहेब' म्हणत असत.

सौ. लक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेब कोटणीसांना दि.२९.०३.१८८८ रोजी एक कन्यारत्न झाले. या मुलीच्या आधी त्यांना एक मुलगा व दोन मुली झाल्या होत्या. पण हा मुलगा व दोन मुली अल्पवयातच निवर्तले. जन्माला आलेल्या कन्येचे नाव कल्लव्वा (धोंडूताई) असे ठेवण्यात आले. इ.स.१८९० साली दि.२९ ऑक्टोबर रोजी मुधोळ येथे पुन्हा एक कन्यारत्न झाले. तिचे 'गंगा' असे नाव ठेवणेत आले. यानंतर सौ.लक्ष्मीबाईंना दि.१५.५.१८९३ रोजी अजून एक कन्यारत्न झाले. तिचे नाव 'भागूबाई' असे ठेवणेत आले.

आईसाहेब कोटणीस या महान पतिव्रता होत्या. त्या श्रीतात्यासाहेबांबरोबर चिमडला रथोत्सवाला जायच्या. इ.स.१८९५ साली त्या चिमडला गेल्या होत्या. त्यावेळी चिमड येथे श्रीलक्ष्मीबाईअक्का होत्या. श्रीलक्ष्मीबाईअक्कांना एका रात्री बहिर्दिशेस जायचे होते, म्हणून त्यांनी सौ. आईसाहेब कोटणीस यांना सोबतीस घेतले. अंधारी रात्र असलेने आणि लक्ष्मीबाईअक्का ह्या कंदिल न घेता निघाल्याने सौ. आईसाहेब अक्कांना म्हणाल्या, 'अक्का, अंधारातून कसे जायचे?' हे ऐकल्यावर लक्ष्मीबाईअक्का म्हणाल्या, 'तुला उजेड पाहिजे होय? थांब तुला आमचा उजेड दाखवते.' असे म्हणून श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी सौ.आईसाहेब कोटणीसांच्या डोळ्यावरून हात फिरविला. त्याबरोबर एकदम शेपन्नास चंद्रांचा उदय झाल्याप्रमाणे दिव्य चांदणे त्यांच्या दृष्टीस पडले. बहिर्दिशेस जाऊन मठात परत येईपर्यंत ते चांदणे त्यांच्या नजरेसमोरुन हलले नाही. 'झालेला प्रकार कोणाला सांगू नको' असे अक्कांनी त्यांना बजावले. त्याप्रमाणे त्यांनी आपल्या पतीलाही ही घटना सांगितली नाही.

इ.स.१८९६ साली श्रीतात्यासाहेबमहाराज हे मित्राच्या घरी मुंजीसाठी गेले होते. तेथून परत येण्यास त्यांना बराच उशीर झाला. मुंजीचा सोहळा पाहिल्यावर, 'आपणास जर पुत्र असता तर आपल्याही घरी असाच मुंजीचा सोहळा झाला असता,' असा विचार घरी परत येताना त्यांच्या मनात आला. या विचाराने महाराजांचे मन विषण्ण झाले. घरी आल्यावर सौ. आईसाहेबांनी उशीराचे कारण विचारले. तेव्हा महाराज म्हणाले, 'आम्हा फकिराचे काय, मागे नाही पुढे नाही. केव्हाही जेवले तरी सारखेच' हे वाक्य ऐकताच सौ.आईसाहेबांनी आपल्याला पुत्र संतान नाही याचे शल्य आपल्या पतीराजांना डाचत आहे हे ओळखले. पुढे आराधनेच्या निमित्ताने सौ. आईसाहेब या चिमडला आल्या होत्या. तेव्हा त्यांनी श्रीलक्ष्मीबाईअक्कांकडे, 'आपणास पुत्र संतती द्या' अशी कळकळीने प्रार्थना केली. हे ऐकून, 'साधुमहाराजांना विचारून उद्या काय ते सांगते,' असे श्रीलक्ष्मीबाईअक्का म्हणाल्या. दुसरे दिवशी याबाबत पुन्हा विचारल्यावर श्रीलक्ष्मीबाईअक्का म्हणाल्या, 'बाई गं, साधुमहाराज म्हणतात, तुझ्या नशिबी पुत्रसंतान नाही.' हे ऐकून श्रीआईसाहेब म्हणाल्या, अक्का, संतांना कर्तुंअकर्तुम सामर्थ्य असते असे म्हणतात. मग श्रीसाधुमहाराजांना एवढे सामर्थ्य नाही का?' हे वाक्य ऐकल्यावर श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी श्रीसाधुमहाराजांना भीड घातली. 'तेव्हा श्रीसाधुमहाराज म्हणाले, 'या बाईला चांगली चांगली मुले होतील पण त्यांची तब्येत कायम बिघडलेली राहील.' श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी त्यांना विचारले,'लक्ष्मी, यातील तुला काय पाहिजे?' त्यावेळेस सौ. आईसाहेब म्हणाल्या 'अक्का, माझी प्रकृती बिघडली तरी चालेल, पण मला चांगली मुले होऊन कोटणीसांचा वंशवेल बहरला पाहिजे.' याप्रमाणे सौ. आईसाहेबांना अनेक चांगले पुत्र झाले.

सौ. आईसाहेब या सुशील आणि पतीसेवापरायण होत्या. पतीच्या (श्रीतात्यासाहेबांच्या) मनाविरुद्ध एकही गोष्ट त्यांच्या हातून घडली नाही. सौ. आईसाहेबांनी आपल्या पतीबरोबर दारिद्र्याचे चटकेही सोसले आणि वैभवाचे दिवसही पाहिले. परंतु या दोन्ही काळात त्यांची वागणूक ही साधी, ममताळू आणि निराभिमानी राहिली. सौ.आईसाहेबांची प्रकृती थोडी अशक्तच होती. परंतु श्रीतात्यासाहेबमहाराजांचे त्यांच्यावर अखेरपर्यंत निरतिशय प्रेम होते. यांच्यामुळेच आपला प्रपंच सुखाचा चालला आहे ही जाणीव श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या मनात कायम होती. सासूबाई सौ. बहिणाबाई कोटणीस यांचेही या सौ.आईसाहेबांच्यावर पोटच्या मुलीसारखे प्रेम होते. सासूबाईंनी जेव म्हटल्याशिवाय यांनी कधीही अन्नग्रहण केले नाही आणि खा म्हटल्याशिवाय एखादा पदार्थ कधीही उष्टावलाही नाही. अशा या महान साध्वी होत्या.

सौ.आईसाहेबांना दि.३१.१२.१८९९ साली पुत्ररत्न झाले. त्याचे नाव 'रघुनाथ' ठेवणेत आले. यावेळी त्यांची प्रकृती बिघडलेली होती. पण महाराजांच्या कृपेने त्या यातून बाहेर पडल्या. यानंतर सौ.आईसाहेबांना इ.स.१९०२ साली श्रीगोविंदराव, इ.स. १९०४ साली श्रीलक्ष्मणराव, १९०७ साली श्रीरंगनाथ व नोव्हेंबर

१९११ मध्ये श्रीराजाराम असे पुत्र झाले. परंतु इ.स. १९१२ साली एप्रिल महिन्यात हे राजाराम निवर्तले. याचा सौ.आईसाहेबांना यांना मानसिक धक्का बसला आणि त्यांची प्रकृती ढासळली. ४ जून, १९१२ या तारखेपर्यंत सौ. आईसाहेब यांची प्रकृती ठीक होती. परंतु दुसरे दिवशी म्हणजे ५ जून रोजी पहाटे सौ. आईसाहेबांना रेच झाले. पण लगेच औषधोपचार केल्यावर ते थांबले. दुपारच्या भोजनानंतर त्यांनी आपल्या सासूबाई सौ. बहिणाबाई कोटणीस यांना हाक मारली आणि 'आपल्या मुलांना सांभाळा' असे सांगितले. संध्याकाळी त्यांनी श्री. नानबा फडणीस यांना 'श्रीतात्यासाहेब कोर्टातून आले आहेत का?' असे विचारले. श्रीतात्यासाहेबमहाराज आले आहेत असे कळल्यावर त्यांनी आपल्या पतींना हाक मारली. त्यांचे एकदा नखशिखांत अवलोकन केले आणि त्यांच्या पायावर डोके ठेऊन, 'येते हं' असे म्हणून, ज्येष्ठ वद्य पंचमी शके १८३४ दि.०५.०६.१९१२ रोजी सायंकाळी या साध्वीने (सौ.लक्ष्मीबाई ऊर्फ सौ.आईसाहेबमहाराज कोटणीस यांनी) वयाच्या अवघ्या ४२ व्या वर्षी महाप्रयाण केले.

***

# श्रीशिवरामबुवा ब्रह्मचारी

निर्याण
ज्येष्ठ व.१२ शके १८४७
इ.स.१९२५

शिवरामबुवा हे चांगले उंचेपुरे व गोरेपान असून बालब्रह्मचारी होते. त्यांनी चिमडच्या रामभाऊमहाराजांकडून अनुग्रह घेतला आणि अतिशय साधन करून अत्युच्च पदवी प्राप्त करुन घेतली. ते बुवासाहेब या नावाने ओळखले जात. चिमडच्या महाराजांच्या आज्ञेने, चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर ते चिमडमठात पूजा अर्चा करीत. कोरान्न मागून उदरनिर्वाह करीत. एक लाकडी गाडा होता, त्या गाड्यात बसून ते साधन करीत. चिमडचे महाराज या शिवरामबुवांकरवीही नाम देत असत. म्हैसूर संस्थानचे दिवाण सर टी. माधवराव हे त्यांचे शिष्य होते. शिवरामबुवा म्हैसूरला गेले असता या सर टी.माधवराव यांचे घरातील मोर मरून पडला. तो मोर शिवरामबुवांनी पुनः जीवंत केला.

अशा या शिवरामबुवांनी आपण आता देह ठेवणार आहे असे जाहीर केले. याबाबत त्यांनी धारवाड येथील दीक्षित नावाच्या शिष्याला कल्पना दिली. तेव्हा दीक्षित पती-पत्नी म्हणाले, 'महाराज तुम्ही धारवाडला आमच्याकडे या. आम्ही आपली सेवा करू.' त्याप्रमाणे शिवरामबुवा धारवाडला गेले. तेथे गेल्यावर त्यांनी आपले गुरूबंधू श्री. वामनभटजी बाळेकुंद्रीकर यांना तिथे बोलवून घेतले आणि त्यांना सांगितले की, 'माझ्या मृत्यूनंतर माझ्या वस्तू चिमडमठात नेऊन ठेवा आणि माझ्या अस्थी चिमडमठाच्या आसपास फेकून द्या' या शिवरामबुवांनी ज्येष्ठ वद्य १२ शके १८४७ इ.स. १९२५ रोजी महाराजांच्या स्मरणात देह ठेवला आणि त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थि श्रीचिमडमठाच्या परिसरातच रहाव्यात यादृष्टीने कालांतराने त्यांची चिमड मठामध्ये समाधी बांधणेत आली.

***

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीशिवरामबुवा ब्रह्मचारी यांची आरती**

आरती शिवरामा । जगी अगाध महिमा ।
दिगंत कीर्ती तुझी । काय न कळे आम्हा ।।ध्रु।।
चिमड महाराजे । तुवा अनुग्रह केला ।
साधन निरंतर । करोनिया धन्य झाला ।।१।।
म्हैसुरी राहुनिया । मार्ग प्रसिद्ध केला ।
मोर हा उठविला । तुझी अगाध लीला ।।२।।
म्हणुनी[१] **दासराम** । तुवा पायी लागला ।
महिमा न कळेची । वंदितसे निजभाळा ।।३।।

# श्रीवासुदेवानंद सरस्वती टेम्बेस्वामीमहाराज

जन्म
श्रावण व.५ शके १७७६
रविवार दि.१३.०८.१८५४

निर्याण
आषाढ शु.०१ शके १८३६
मंगळवार इ.स.१९१४

रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडीपासून आठ-नऊ मैलावर माणगाव म्हणून एक लहानसे गाव आहे. गाव लहान आहे व निसर्गसुंदरही आहे. या गावात श्री. हरिभट्ट टेम्बे या नावाचे नावाजलेले वैदिक ब्राह्मण रहात होते. या हरिभट्टांना पुत्र झाला. त्याचे नाव गणेशभट्ट. वडिलांची वैदिक अध्ययनाची परंपरा यांनीही सुरू ठेवली. श्रीगणेशभट्ट हे दत्तात्रेयांचे परम भक्त होते. श्रीगणेशभट्ट यांचा कोनकर आडनावाच्या कुटुंबातील रमा नामक कन्येशी विवाह झाला. परंतु श्रीगणेशभट्टांनी गाणगापुरात राहून बारा वर्षे कडक ब्रह्मचर्य पाळले आणि तपोमय जीवन जगले. यानंतर यांना साक्षात् दत्तात्रेयांनी स्वप्न दृष्टांत दिला की, 'तू घरी परत जा आणि संसार कर.' या आज्ञेप्रमाणे गणेशभट्ट हे माणगावी परतले. यथावकाश श्रीगणेशभट्ट व रमाबाई या दांपत्याचे पोटी श्रावण व.५ शके १७७६, रविवार दि.१३.०८.१८५४ रोजी पुत्ररत्न जन्माला आले. बारशादिवशी या मुलाचे नाव 'वासुदेव' असे ठेवणेत आले. हे वासुदेव म्हणजेच आमचे 'श्रीवासुदेवानंद सरस्वती टेम्बे स्वामीमहाराज' होत.

लहानपणापासून त्यांना वैदिकशास्त्राचे शिक्षण देणेत आले. अध्ययनासाठी ते श्री. शंभूशास्त्री नामक ब्राह्मणाकडे जात होते. परंतु खरी विद्या त्यांना आपले आजोबा हरिभट्ट आणि वडिल श्री. गणेशभट्ट यांचेकडूनच मिळाली. मुंजीचे वय झाल्यावर त्यांची मुंज करणेत आली. टेम्बेस्वामी जरा मोठे झाल्यावर पुनः त्यांचे वडिल गाणगापुरला गेले व आजोबांचे काही दिवसातच देहावसान झाले. त्यामुळे टेम्बेस्वामी हे आपल्या चुलत्यासोबत राहू लागले. वैदिक विद्याध्ययन झाल्यावर गावातील लोक यांना वासुदेवशास्त्री म्हणू लागले.

कालांतराने या श्रीवासुदेवशास्त्रींचा गावातील गोडे कुटुंबातील अन्नपूर्णा नामक कन्येशी विवाह झाला. श्रीवासुदेवशास्त्री हे विरक्त, ब्रह्मचारी व संन्यासी म्हणून जगण्याची इच्छा बाळगलेले, पण ईश्वरी इच्छेनुसार ते संसारी झाले. थोडे दिवसात श्रीवासुदेवशास्त्री हे गोवा प्रांतात यात्रेसाठी गेले असता, इकडे गाणगापुरी यांच्या वडिलांनी देहत्याग केला. टाकोटाक ते गोव्याहून गाणगापुरला आले. श्रीवासुदेवशास्त्रींची पत्नी सौ. अन्नपूर्णा यांनी आपल्या पतीची, पत्नी या नात्याने सेवा केलीच, पण स्वयंस्फूर्तीने तिने आपल्या पतीचे शिष्यत्व पत्करले आणि पुराण व व्यवहारातील मार्गदर्शक ठरणारे शास्त्रांचे सिद्धांत समजून घेतले. श्रीवासुदेवशास्त्री हे एक दिवस नृसिंहवाडी येथे एकटेच आले आहेत हे बघून दत्तात्रेयांनी त्यांना दृष्टांतात सांगितले की, 'तुम्ही माणगावात परत जावा. मी माणगावीच तुमच्याजवळ असेन.' याप्रमाणे ते नरसोबावाडी

सोडून माणगावला परत निघाले. वाटेत त्यांना कागल गावात एक सोनार भेटला आणि त्याने स्वतः तयार केलेली दत्तात्रेयांची मूर्ती त्यांना भेट दिली. ती मूर्ती घेऊन श्रीवासुदेवशास्त्री माणगावला आले आणि तेथे छोटेखानी देऊळ बांधून श्रीदत्तप्रभूंची प्रतिष्ठापना केली.

यथावकाश श्रीवासुदेवशास्त्रींना एक पुत्र झाला. पण तो जास्त दिवस राहिला नाही. यानंतर परत श्रीवासुदेवशास्त्रींना पुत्र झाला. पण तोही अल्पायुषी ठरला आणि पुत्र गेल्यावर त्यांच्या पत्नी सौ.अन्नपूर्णाबाई या आजारी पडल्या. जोरदार ताप आला आणि त्यातच त्यांना उत्तर यात्रेची आज्ञा झाली. यानुसार हे दोघे गंगाखेड गावी गेले. ताप उतरेना व बरे व्हायची चिन्हे दिसेनात. अशा अवस्थेत सौ. अन्नपूर्णाबाईंचे देहावसान झाले.

जीवनाचे सगळे आशापाश तुटल्यानंतर श्रीवासुदेवशास्त्रींनी नरसोबावाडी गाठणेचे ठरविले. तेव्हा त्यांना साक्षात् दत्तगुरूंचा दृष्टांत झाला. 'आता नृसिंहवाडीला जा व गोविंदस्वामींची भेट घे. पुढचे सर्व काही ते ठरवतील.' याप्रमाणे श्रीवासुदेवशास्त्री वाडीला गेले आणि श्रीगोविंदस्वामीची गाठ पडली. त्यांना पहाताच श्रीगोविंदस्वामी म्हणाले, 'ये खरोखर मी तुझीच वाट पहात होतो.' याप्रमाणे काही दिवस श्रीवासुदेवशास्त्री हे श्रीगोविंदस्वामींचे सहवासात राहिले. श्रीगोविंदस्वामींनी श्रीवासुदेवशास्त्रींना ब्रह्मविद्या शिकविली व आपली गूढशक्ती त्यांच्या हाती दिली. आपल्या पत्नीच्या निधनानंतर १४ व्या दिवशी प्रत्यक्ष दत्तात्रेय, श्रीगोविंदस्वामींच्या रूपाने श्रीवासुदेवशास्त्रींच्या स्वप्नात आले व त्यांनी श्रीवासुदेवशास्त्रींच्या कानात प्रणवमंत्राचा उच्चार केला व संन्यासदीक्षा दिली. श्रीवासुदेवशास्त्री स्वप्नातून जागे होऊन पहातात तो, खरोखर एक दिव्य तेजस्वी संन्याशी त्यांचेकडे आला व त्याच्या देखरेखीखाली दीक्षा देणेचा सर्व विधी पार पडला. श्रीवासुदेवशास्त्रींनी संन्यासाश्रम स्विकारल्यामुळे 'वासुदेवानंद' हे नाव त्या दीक्षा देणाऱ्या संन्याशाने त्यांना दिले. यानंतर श्रीगोविंदस्वामींनी स्वप्नात येऊन तीर्थयात्रा करा असा आदेश दिला. याप्रमाणे ते तीर्थयात्रेला बाहेर पडले. प्रथम ते उज्जैनीस आले. तेथे त्यांची 'श्रीनारायणानंदसरस्वती' या नावाच्या यतींची भेट झाली. श्रीवासुदेवानंदांनी त्यांना दंड ग्रहण करून पूर्ण संन्यासदीक्षा द्यावी अशी प्रार्थना केली. त्यानुसार श्रीनारायणानंदांनी श्रीवासुदेवानंदांना दंड देऊन संन्यासदीक्षा दिली व त्यांनी श्रीवासुदेवानंदांचे 'वासुदेवानंदसरस्वती' असे नामकरण केले व याच नावाने ते प्रसिद्ध झाले.

श्री. गांडामहाराज, श्रीरंगावधूत, योगीराज श्रीगुळवणीमहाराज, श्रीसीताराममहाराज, श्रीदीक्षितस्वामी, श्रीनानामहाराज तराणेकर, श्रीदत्तमहाराज अष्टे इ. अधिकारी शिष्य श्रीवासुदेवानंद सरस्वतींनी निर्माण केले. यांच्याद्वारे आपला संप्रदाय चालविला. श्रीदत्तमहात्म्य, त्रीशती गुरुचरित्र, द्विसहस्री श्रीगुरुमहात्म्य, दत्तचम्पू यासारखे संस्कृत ग्रंथ तसेच अनेक मराठी ग्रंथ निर्माण केले. तसेच अनेक स्तोत्रे लिहिली.

इ.स.१९१४ च्या वैशाख महिन्यात श्रीवासुदेवानंदसरस्वतींना अतिसार रोगाने पछाडले. त्यामुळे देह दिवसेंदिवस क्षीण होत चालला. महाराजांना आराम पडावा म्हणून भक्तांनी नरसोबावाडीस देवावर संततधार अनुष्ठान सुरू केले. महाराजांना हे समजताच त्यांनी भक्तांना कळविले की 'उगाच देवाला त्रास देऊ नका. हे शरीर अल्पावधीतच पडणार आहे.' ज्येष्ठ अमावस्येस महाराजांना फारच क्षीणता आली. त्या दिवशीसुद्धा त्यांनी नित्यकर्म करणेचा प्रयत्न केला. पण आचमनाचे पाणी हातामधे राहिना. श्री. धोंडोपंत कोपरकर नामक व्यक्तीस महाराजांनी सांगून ठेवले होते की, 'अमावस्या संपल्यावर हा देह सोडायचा आहे.' त्याप्रमाणे अमावस्या संपून प्रतिपदा लागताच ते सिद्धासन घालून बसले, देवाकडे बघून त्राटक लावले, श्वास निरोध करून दीर्घ प्रणवोच्चार करीत, आषाढ शु. प्रतिपदा शके १८३६ मंगळवार इ.स.१९१४ साली वयाच्या ६० व्या वर्षी गरुडेश्वर येथे महाप्रयाण केले. महाराजांच्या इच्छेनुसार दुसऱ्या दिवशी सकाळी मोठ्या समारंभाने महाराजांच्या देहावर पुष्पमाला घालून षोडशोपचारे पूजा केली. त्यांचा देह पुष्पासनावर बसवून वाजत गाजत नर्मदा तीरावर आणण्यात आला. तेथे परत अंतिम पूजाविधी व विसर्जनाचे शास्त्रीय संस्कार करून, महाराजांचा देह हा नर्मदा नदीत विसर्जित करणेत आला. त्यांची समाधी गुजरातमधील गरुडेश्वर येथे नर्मदा किनारी आहे.

***

# प.पू. श्रीदत्तदिगंबर श्रीअण्णाबुवामहाराज

निर्याण
आषाढ शु.०४ शके १७९४
मंगळवार दि.९.६.१८७२

मौजे मंडपाळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे श्री. विश्वंभरपंत कुलकर्णी या नावाचे सदाचारी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण रहात होते. त्यांच्या पत्नीचे नांव अनसूया होते. या दांपत्याच्या पोटी महान पुत्र जन्माला आला. बारशादिवशी या मुलाचे नांव 'दत्तदिगंबर' असे ठेवण्यात आले. हेच आमचे श्रीअण्णाबुवामहाराज होत. लहानपणीच श्रीअण्णाबुवांचे डोळे चांगले मोठे होते. त्यांच्या डोळ्यातील तेज तर चांगले झळकत होते. श्रीअण्णाबुवांच्या विशाल अशा कपाळावर मधोमध एक रेखीव चिन्ह होते. जणू काही तिसरा डोळाच असावा असे ते चिन्ह होते. श्रीअण्णाबुवांच्या कोवळ्या कंठनाळावर तीळच तीळ होते, जणू काही नीळकंठच भूतलावर अवतरून आला आहे असे वाटत होते. श्रीअण्णाबुवा हे अजानबाहू होते.

असे श्रीअण्णाबुवा ५ वर्षांचे झालेनंतर वडिलांनी त्यांचे हातात धूळपाटी दिली. एका वयोवृद्ध पंतोजींकडे ते शिकायला जाऊ लागले. पंतोजींनी श्रीअण्णाबुवांना ''श्रीगणेशायनमः, ॐ नमःसिद्धम्'' ही परममंगल अक्षरावळी शिकवली. लहानपणी बोबडी असणारी वाणी या पंतोजींच्या शिकविण्याने अधिकाधिक स्पष्ट व प्रगल्भ होत गेली, हे पाहून पंतोजीसुद्धा आश्चर्यचकित झाले.

पण, पुढे पुढे गुरूजींनी शिकविलेली विद्या श्रीअण्णाबुवा ग्रहण करेनात. विद्यालयात बसल्या ठिकाणी ते भगवद्भजनच करत बसायचे. त्यांना या विद्येपेक्षा अध्यात्मविद्याच जास्त आवडायला लागली. श्रीअण्णाबुवा शाळेतून बाहेर पडल्यावर तपोवनात जाऊन एकांतात बसू लागले. घरी वाटायचे की अण्णाबुवा हे शाळेतच बसून विद्या ग्रहण करत आहेत. असे एकदा श्रीअण्णाबुवा शाळेत जातो म्हणून बाहेर पडले आणि संध्याकाळपर्यंत घरी परत आले नाहीत. श्रीअण्णाबुवांच्या आईने बरीच शोधाशोध केली. पण श्रीअण्णाबुवांचा पत्ता लागेना. शेवटी काही गुराख्यांची मुले आईला भेटली. त्यांनी श्रीअण्णाबुवांचा पत्ता सांगितला. श्रीअण्णाबुवा एका विशाल आंब्याच्या झाडाखाली पद्मासन घालून साधनेत मग्न होते. हे बघून आईसुद्धा आश्चर्यचकित झाली. त्यानंतर आई श्रीअण्णाबुवांना घरी घेऊन आली.

श्रीअण्णाबुवांचे मुंजीचे वय झाल्यावर आईवडिलांनी मुंज करणेचे ठरविले. मुहूर्त ठरला. सगळे स्त्री-पुरुष मुंजीसाठी आले होते, पण श्रीअण्णाबुवा मुंजीला तयार होईनात. बऱ्याच नातेवाईकांनी श्रीअण्णाबुवांची समजूत काढणेचा प्रयत्न केला, पण ते तयार होईनात. श्रीअण्णाबुवा सर्वांना म्हणाले, ''आपण साक्षात् परब्रह्मच आहोत. ब्रह्म निर्गुण निराकार आणि स्वतंत्र असते. तेच मी आहे. ब्रह्म मुळातच व्रतस्थ आहे. मग त्याचा व्रतबंध कसला आपण मांडता? निराकार ब्रह्माला अवयव नाहीत. त्यामुळे अवयव झाकण्यासाठी टिचभर लंगोटीची गरजच काय? ब्रह्माला जातीबंध नाही.'' हे सर्व ऐकल्यावर आलेले भटजी लोक मंडपाबाहेर

जाऊ लागले, एवढ्यात एक वृद्ध गृहस्थ तेथे आला आणि त्याने श्रीअण्णाबुवांची कशीबशी समजूत काढली आणि श्रीअण्णाबुवांची मुंज झाली. मुंज झाल्यावर वडिलांनी श्रीअण्णाबुवांना वैदिक शिक्षण शिकण्यासाठी पाठशाळेत घातले. पण तिथेही त्यांचे मन लागेना. असे असले तरी गुरुजी जे पाठ देत ते ते लगेच आत्मसात करून पाठ करत. त्याचवेळी त्यांचे बरोबरचा सहाध्यायी म्हणताना चुकला तर त्यांची ते टर उडवीत. ही सगळी श्रीअण्णाबुवांची अवस्था बघून आई-वडिल त्यांना नृसिंहवाडीला घेऊन आले. तेथे काही सेवा करावी आणि श्रीअण्णाबुवांसाठी दत्तात्रयांपुढे साकडे घालावे हा हेतू होता. नृसिंहवाडीला लोक श्रीअण्णाबुवांना बघून हा वेडा आहे असे समजू लागले. पण श्रीअण्णाबुवा हे वेडे नव्हते. जीवशिवापलीकडे गेलेले, अशी त्यांची अवस्था होती.

श्रीअण्णाबुवांच्या आई-वडिलांना पहाटेच्या सुमारास एक स्वप्न पडले. स्वप्नात श्रीगुरुदत्तात्रेयांनी साक्षात दर्शन दिले आणि म्हणाले, 'तुम्ही उभयतांनी केलेल्या अनुष्ठानामुळे मी तुमच्यावर प्रसन्न झालो आहे. या अभिनव बाल दत्तात्रेयाच्या रुपाने मीच तुमच्या पोटी अवतरलो आहे. मागे मंडपाळ्यात व आत्ता या वाडीत माझ्या सोबत राहून माझे संगोपन करून तुम्ही दोघे कृतार्थ झाला आहात.' सकाळी उठल्यावर दोघांच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले. हे पाहून श्रीअण्णाबुवांनी विचारले, की आपण का रडत आहात? पण नंतर श्रीअण्णाबुवा स्वतःच मोठ्याने खदखदून हसून दोघांकडे पहात शांत झाले. अशा या श्रीअण्णाबुवांची ते विदेही असलेने, बरेच लोकांनी वेगवेगळ्या पद्धतीने परीक्षा बघितली.

नृसिंहवाडीतील एका चांडाळ चौकडीने श्रीअण्णाबुवांना घरी बोलाविले आणि त्यांना भरपूर हिरवी मिरची खायला घातली. त्यामुळे श्रीअण्णाबुवांचा चेहरा हळू हळू अग्निकुंडातील निखाऱ्याप्रमाणे लाल होत चालला. डोळ्याद्वारे ज्वाळा ओसंडून वाहू लागल्या. हे पाहून त्या चांडाळ चौकडीने तेथून पलायन केले. रात्र झाली. बिछान्यावर चांडाळ चौकडी झोपली. डोळा लागतो न लागतो तोच त्यांच्या अंगावर वेताच्या छड्यांचा भडिमार सुरू झाला. अंगावर सगळीकडे वळच वळ उठले आणि खडा आवाज ऐकू आला. तो आवाज विचारू लागला की, 'बोला, या वाडीच्या गुरुदेवांचे पिढीजात पुजारी ते आपणच नां? दत्तगुरुंच्या पादुकांची पूजा करणारे हेच का तुमचे हात? त्या पोरक्या मुलाला बोलावून बळजबरीने मिरच्या खायला लावल्या. तुमच्या टाळूत कोणी एकाने बळजबरीने उरावर बसून वीष ओतले तर ते तुम्हाला सोसवेल काय? आता मी तुम्हाला बजावून ठेवतो की, नरसोबावाडी आणि या आसमंतात फिरणारा हा बालदत्त दिगंबर कोणी उपेक्षित भिकारी आहे असे समजाल, त्याचा छळ कराल, त्याची निंदा कराल तर ती एक माझीच विभूती आहे, त्याला वेळीच नीट ओळखा' असे सांगून तो आवाज एकदम अंतर्धान पावला.

अशा श्रीअण्णाबुवांनी अनेक लीला केल्या. शेवटी गावोगावी भ्रमण करुन थकवा येऊ लागला. त्यांचे पायही दुखू लागले. शेवटी त्यांनी देह ठेवण्याचे ठरविले आणि श्रीअण्णाबुवांनी आषाढ शु.४ शके १७९४, मंगळवार दि.९.०६.१८७२ रोजी मिरज येथे सकाळी १० वाजता देह ठेवला.

***

# गु.भ.प. श्रीगोपाळकाका कोटणीस

जन्म
इ.स.१८७५

निर्याण
आषाढ शु.०७ शके १८७०
इ.स.१९४८

श्रीवामनराव कोटणीस हे मुधोळ या गावी वास्तव्याला होते. ते मुधोळ संस्थानात नोकरीला होते. श्रीवामनरावांना इ.स. १८७५ साली पुत्र झाला. त्याचे नांव 'गोपाळ' ठेवणेत आले. हा गोपाळ म्हणजेच आमचे गु.भ.प. श्रीगोपाळकाका कोटणीस.

श्रीगोपाळकाका कोटणीस हे लहानपणापासूनच विरक्त होते. त्यांनी मुधोळ संस्थानात काही वर्षेच नोकरी केली. पण ती त्यांच्या निस्पृह वृत्तीस मानेनाशी झाल्याने, त्यांनी कायमची सोडली. श्रीगोपाळकाका यांचे वडील श्रीवामनराव हे चिमडच्या श्रीरामचंद्रावजीमहाराजांचे शिष्य होते. याप्रमाणेच इ.स.१८८७ साली श्रीगोपाळकाकांनाही आषाढ शु. एकादशीला श्रीचिमडच्या महाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला. श्रीचिमडच्यामहाराजांना रेवकाबाई नावाची कन्या होती. या मुलीचे लग्न श्रीगोपाळकाकांशी व्हावे अशी इच्छा त्यांनी श्रीवामनराव कोटणीसांपाशी बोलून दाखविली. त्यांनाही फार आनंद झाला आणि त्यांनी या लग्नास लगेचच होकार दिला. लग्न म्हणजे जवळ पैसे हवेत या चिंतेत श्रीवामनराव होते. लग्नासाठी अगदी आवश्यक खर्चसुद्धा कसा करायचा अशी त्यांना फिकिर पडली. याबाबत ते श्रीचिमडच्यामहाराजांशी खुल्या मनाने बोलले. तेव्हा श्रीचिमडचेमहाराज म्हणतात, 'बाबारे, ही साधुबुवांची योजना आहे. त्यामुळे याची चिंता करण्याचे तुम्हा आम्हा कारण नाही. साधुमहाराज हे तुमच्या परमार्थाचे धनी आहेत आणि श्रीमंत मुधोळकर सरकार हे प्रपंचाचे धनी आहेत. या दोघांना तुम्ही आमंत्रण पत्रिका पाठवा म्हणजे सर्व काही ठीक होईल.' श्रीचिमडच्यामहाराजांच्या आज्ञेने श्रीवामनरावांनी महाबळेश्वराला आमंत्रणपत्रिका पाठविली. यावेळी श्रीमुधोळकर सरकार हे श्रीतात्यासाहेबमहाराज व श्रीगोपाळराव दीक्षितांना घेऊन महाबळेश्वरला गेले होते. ही पत्रिका श्रीमंतांच्या हातात पडल्यावर त्यांनी श्रीतात्यासाहेबांना हाक मारली आणि म्हणाले, 'हणमंतराव, तुमच्या बंधूचे लग्न ठरले असून, त्याची निमंत्रणपत्रिका आली आहे. तुमच्या लग्नाला अंदाजे किती खर्च येतो?' असा प्रश्न केला. तेव्हा श्रीतात्यासाहेब म्हणाले, सरकार अंदाजे कमीत कमी ५०० रुपये खर्च येत असावा. हे ऐकून मुधोळकर सरकारांनी तात्यासाहेबांना, 'वामनराव कोटणीसांना ५०० रुपये अदा करणेबाबत ट्रेझरीला हुकूम लिहून आणा' असा आदेश दिला. त्याप्रमाणे श्रीतात्यासाहेबांनी हुकूम लिहून आणला व त्यावर सरकारांनी सही केली. या मदतीमुळे श्रीगोपाळकाकांचे लग्न अत्यंत थाटात संपन्न झाले. त्यांच्या पत्नीचे सौ. राधाबाई हे नाव ठेवणेत आले. श्रीगोपाळकाका हे विरक्त असलेने त्यांना मूलबाळ झाले नाही.

श्रीगोपाळकाकांनी श्रीचिमडच्यामहाराजांच्या आज्ञेने अफाट साधन केले. इ.स. १९१८ सालातील ऑक्टोबर महिन्यात श्रीगोपाळकाका हे श्रीतात्यासाहेबमहाराजांचे घरी वास्तव्याला होते. येथे असताना ते एन्फ्ल्युएन्झाने आजारी पडले. जवळ जवळ २ आठवडे ते आजारी होते. परंतु श्रीचिमडच्यामहाराजांच्या कृपेने

त्यांचे तब्येतीला उतार पडला. या दुखण्यातून उठल्यावर त्यांनी 'संप्रदाय-सिंधू' (सुमारे १० हजार ओव्या) हा ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला आणि तो यथावकाश पूर्ण केला.

इ.स.१९२० साली श्रीगोपाळकाका हे कोल्हापूर जिल्ह्यातील सिद्धगिरी या काडसिद्धांचे स्थानी जाऊन राहिले. तेथे त्यांनी २१ दिवस काडसिद्धांसमोर कठोर अनुष्ठान केले. श्रीगोपाळकाका हे याठिकाणी कोणासही न सांगता आले होते. त्यामुळे सांगलीत आणि चिमडात बरीच शोधाशोध झाली. काही दिवसांनी हे सिद्धगिरी येथे आहेत हे कळले. त्याप्रमाणे चिमडहून श्रीमाईसाहेबमहाराज त्यांना भेटण्यासाठी सिद्धगिरीस गेल्या. तेथे अनुष्ठानाचे उद्यापन करून त्या श्रीगोपाळकाकांना चिमडला घेऊन आल्या.

इ.स.१९२२ साली श्रीतात्यासाहेबमहाराज हे सांगलीहून निंबरगी यात्रेस गेले होते. त्यांचे बरोबर बरीच शिष्यमंडळी होती. याबरोबरच चिमड येथूनही काही शिष्यमंडळी निंबरगीला जाणेस निघाली. या दोघांची तिकोटे येथे भेट होणार होती. या चिमडच्या शिष्यमंडळीत श्रीगोपाळकाका होते. ते चिमडपासून पायी चालत आले होते. चिमडपासून निंबरगीपर्यंत (अंदाजे १५० कि.मी.) अंतर पायी चालूनच जायचे असा श्रीगोपाळकाकांनी संकल्प केला होता आणि तो संकल्प त्यांनी अंमलात आणला.

इ.स. १९२३ सालातील एप्रिल महिन्यात श्रीगोपाळकाका हे अकस्मात कोणाला न सांगता परगावी निघून गेले. त्यामुळे चिमड, मुधोळ, सांगली येथे चिंता निर्माण झाली. श्रीगोपाळकाका हे अहमदनगर जवळील भिंगार नावाच्या शहराजवळ तिसगाव नावाचे गाव आहे, या गावात वृद्धेश्वराचे पुरातन मंदिर आहे. हे मंदिर पूर्वी निर्जन वस्तीत होते. या मंदिरात राहून श्रीगोपाळकाकांनी नुसत्या थोड्याश्या दुधावर २१ दिवस खडतर अनुष्ठान केले. २१ व्या दिवशी त्यांना सगुण साक्षात्कार झाला. यानंतर ते सांगलीस येऊन राहिले.

इ.स.१९२४ साली पौष व. षष्ठीला श्रीतात्यासाहेबमहाराजांनी निर्याण केले. श्रीगोपाळकाकांना हे निर्याण सहन झाले नाही. त्यांचा श्रीतात्यासाहेबांचेविषयी काय भाव होता हे त्यांनी त्यांच्यावर केलेल्या आरतीवरून जाणवल्याशिवाय रहाणार नाही. ही आरती मुद्दाम येथे देत आहे :-

गुरुभक्तीलागी अवतरूनी जगती । अखंड सेवा करुनी सुखविसी गुरूमूर्ती । माया ममता कधिही धरिली ना चित्ती । वाहिले गुरूपदी प्रेमे तनुमन संपत्ती ।।ध्रु.।। जय देव जय देव जय श्रीहनुमंता । आरती ओवाळू आर्ते गुणवंता ।।१।। रंगुनि कीर्तनी स्वये भाविक रंगविले । मूढ जनही बोधे सांप्रदायी केले । गूढ ज्ञान तत्त्व सुगम जना केले । गुरुभजनी मन हे अखंड रमविले ।।२।। तरुनी स्वये निजकुळ उद्धरिले । परमार्थाचे बीज जगात पेरियले ।सत्पद चित्पद दोनी आनंदी मिळविले । गोपाळनाथ पदी ऐक्य साधीले ।।३।।

श्रीगोपाळकाका हे साधनेचेवेळी जवळ आरसा ठेवून बसायचे. लोकांना वाटायचे साधनाला बसल्यावर देखील आपला चेहरा पाहण्यासाठी यांना आरसा लागतो काय? व्यवहारी जगाला व्यवहारापरते काय दृष्टिस पडणार! पण ते आपली दृष्टी ही साधनेमध्ये लागली आहे का नाही हे ते आरशातून पहात व लकब आली नाही असे वाटले तर, ती दृष्टी लागेपर्यंत साधनास बसत. श्रीगोपाळकाका हे उत्तम कीर्तन करायचे, पुराण सांगायचे.

त्यांचा आवाज फार चांगला होता. श्रीगोपाळकाकांची विरक्तवृत्ती आणि कीर्तनावर खूष होऊन मुधोळकर सरकारांनी त्यांना महिना २० रुपयांची बैठी तैनात करून दिली.

श्रीगोपाळकाका यांचा आमच्या प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांच्यावर आत्यंतिक लोभ होता. ते श्रीमामांना पूर्ण जाणून होते. ते एकदा भक्तमंडळींसमोर म्हणाले की, 'बापूरावजी (श्रीमामा) हे कोणी साधी व्यक्ती नसून सत्पुरुष आहेत. यांचे जगावर अनंत उपकार आहेत. त्यांनी श्रीतात्यासाहेबांचे आज्ञेप्रमाणे भरपूर सेवा केली आहे.'

श्रीगोपाळकाकांचे आमच्या घरी गुरूतृतीयेच्या तीन दिवसाच्या उत्सवात कीर्तन होत असे. त्यांची आमचे घरी कीर्तन व्हावे अशी बरीच दिवसापासून इच्छाही होती. एका कीर्तनात ते म्हणाले, 'बापूरावजींच्यावर (श्रीमामा) अलोट गुरुकृपा असल्याशिवाय त्यांच्यासारखी तपश्चर्या होणार नाही. श्रीतात्यासाहेबांच्या पाठीमागे यांनीच त्यांच्या शिष्यांमधे खरी कर्तबगारीची कामगिरी केली आहे.' हे कीर्तन ३ तास सुरू होते. एकही श्रोता जागचा हालला नाही.

इ.स.१९३८ साली श्रीमामांचा 'रामपाठ' प्रकाशित झाला. या रामपाठाला श्रीगोपाळकाकांची प्रस्तावना आहे. या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'या कलीयुगात गु.भ.प. बापूरावांसारखे नित्यकीर्तन, नामस्मरण, काही मोबदला न घेता, आपण परम आवडीने व भक्तीने करून, लोकांना सन्मार्ग दाखविणारे फारच थोडे लोक समाजात आढळून येत आहेत. नित्यनेमाने कीर्तन, गुरुभजन, काया वाचा मने करून फावल्या वेळेत स्वयंस्फूर्तीने व प्रासादिक वाणीने लोकसंग्रहाकरिता गाईलेले श्रीरामपाठाचे प्रेमळ अभंग, समाजाला खरोखर परम उपकारी होतील यात संदेह नाही. आपण आधी करून, मग तसे करण्यास समाजाला शिकविणारे श्रीबापूरावांसारखे प्रेमळ गुरूभक्त फारच थोडे सापडतील. बत्तीस अभंगांचे त्यांचे हे पुस्तक आकाराने लहान पण प्रभावाने फारच मोठे आहे. त्याचे मोल करणे म्हणजे श्रीप्रभूरामरायांचे मोल केल्याप्रमाणे होणार आहे.'

श्रीगोपाळकाकांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात पुढीलप्रमाणे वाङ्मय लिहिले.

१. संप्रदाय क्रम सिंधू (सुमारे १० हजार ओव्या)
२. अद्वैत भूमानंद (सुमारे ५ हजार ओव्या)
३. स्फूट पदे (अंदाजे ७००)
४. रामस्तुती शतक
०५. घंटाकर्णाख्यान
६. सिद्धदर्शनातुरता
७. हृदय निवेदन
८. मनाचे श्लोक
९. मनोजय इ. स्फूट प्रकरणे

तसेच इतरही काही स्फूट श्लोक व अभंग आहेत.

अशा या तपस्वी श्रीगोपाळकाकांनी चिमड येथे आषाढ शु.७ शके १८७० इ.स. १९४८ साली वयाच्या ७३ व्या वर्षी देह ठेवला.

***

# प. पू. श्रीनरसाप्पा शापेटी

जन्म
इ.स.१८३०

निर्याण
आषाढ शु.०८ शके १८५७
मंगळवार दि.९.७.१९३५

श्री. नरसाप्पा शापेटी यांचा जन्म अंदाजे इ.स. १८३० साली झाला. श्री. नरसाप्पा हे मालगार जातीचे होते. त्यांचा वडिलोपार्जित गवंडीकामाचा व्यवसाय होता. तोच त्यांनी वयाच्या ९५व्या वर्षापर्यंत केला. श्री. नरसाप्पा यांनी श्रीनिंबरगीकरमहाराज यांचेकडून अनुग्रह घेतला. अनुग्रह घेतलेल्या दिवसापासून ते महाराजांनी सांगितल्याप्रमाणे साधन करु लागले. श्रीनिंबरगीकरमहाराज त्यांना ''कडेहट्टमगा'' असे म्हणत. याचा अर्थ हे श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या शिष्यातील शेंडेफळ (सर्वात शेवटचा पुत्र) होते.

ते निंबरगीची वारी करीत. निंबरगीजवळ ओढा आहे, त्या ओढ्याजवळ आले की ते ''विठ्ठला, शिवशिवा, सद्गुरु महिमा अगाध हो'' असा मोठ्याने पुकारा करीत. एकदा नरसाप्पा व श्रीनिंबरगीकरमहाराज ओढ्याच्या काठी बसले होते. तेवढ्यात नरसाप्पांना जाणवले की महाराज कुणातरी अदृश्य व्यक्तीशी बोलत आहेत. महाराज म्हणत होते, 'अग ए, इकडून जायचे नाही.' असे म्हणून त्यांनी त्या व्यक्तीला शेजारच्या मेंढ्यांच्या कळपाकडून जाणेस सांगितले. मग ते नरसाप्पांना म्हणाले, 'अरे, नरसाप्पा ती मरीआई (कॉलरा) होती, म्हणून मी तिला तिकडून जा म्हटले.' दुसऱ्या दिवशी त्या कळपातील मेंढ्या मरून गेल्या.

एकदा नरसाप्पांना घेऊन श्रीनिंबरगीकरमहाराज चिमड गावाकडे जात होते. रस्त्यात रात्र झाली म्हणून त्या दोघांनी शेतातील एका खोपटीत आसरा घेतला. तेथे गेल्यावर महाराज साधनाला बसले. रात्रीचे ३ वाजले तरी महाराज हे साधनेलाच बसलेले नरसाप्पांनी पाहिले. शेवटी पहाट झाली. झुंजुरते दिसायला लागले. नरसाप्पांनी महाराजांना पाहिले, तो महाराजांच्या अंगावर काळे कापड पांघरल्यासारखे दिसले. जवळ जाऊन पहातात तो महाराजांच्या अंगावर सुरवंट चढले होते. नरसाप्पांनी हाक मारली, महाराज! हाक ऐकून महाराज देहभानावर आले. तो सगळे सुरवंट गळून पडले. नरसाप्पा महाराजांना विचारतात की महाराज, सुरवंटांमुळे तुमच्या शरीराला काही अपाय झाला की नाही? तेव्हा महाराज म्हणतात, नरसाप्पा तू विचारलेस म्हणून सांगतो की, मी देहावर असलो तरच्या या गोष्टी आहेत.

असेच एकदा नरसाप्पा श्रीनिंबरगीकरमहाराजांचे पाय चेपत बसले होते. काही काळाने त्यांना महाराजांचे पाय गार पडले आहेत असे जाणवले. काय करावे ते सुचेना. असाच अर्धा तास गेला. परत महाराजांचे अंग गरम होत असलेचे जाणवले. एवढ्यात महाराज देहावर आले. नरसाप्पा म्हणाले, 'महाराज गेला अर्धा तास तुमचे पाय गार पडले होते. मी तर घाबरलो होतो.' हे ऐकून महाराज म्हणाले, 'आज मुंबईत श्री. मलकाप्पा

पाटलाच्या पाटीलकीच्या खटल्याचा निकाल होता. मुंबईला जाऊन, मलकाप्पाच्या बाजूने निकाल लावून आलो.' पुढे यथावकाश मलकाप्पा पाटील निंबरगीला आले. त्यांनी लोकांना सांगितले, 'खटल्याच्या निकाला दिवशी मला न्यायाधीशांच्या मागे महाराज दिसत होते. त्यांच्यामुळेच माझ्या सारखा निकाल लागला.'

महाराजांना एकदा नरसाप्पा म्हणाले, 'महाराज, तुम्ही सांगितलेप्रमाणे मी साधन करतो, पण अजून 'सोऽहंहंसाचा' अनुभव येत नाही.' हे ऐकून महाराज थोडे रागावले. त्यांनी तोंडावर बोट ठेवले आणि म्हणाले, 'नरसाप्पा चूप. नाक, कान, डोळे, तोंड बंद' आणि त्याच क्षणी नरसाप्पांचे नाक, कान, डोळे, तोंड एकदम बंद झाले आणि श्री.नरसाप्पांना महाराजांनी आतल्या आत 'सोऽहंहंसः' ची प्रचिती दिली.

श्री. नरसाप्पा एकदा साधनेला बसले होते. साधनेत त्यांना असे दृश्य दिसले की, एक महाल आहे आणि त्या महालात महाराज रत्नजडित सिंहासनावर आरूढ झालेले आहेत आणि त्यांच्यापुढे ८८ सहस्र ऋषीश्वर हात जोडून उभे आहेत. श्री. नरसाप्पांनी त्या महालात आत वाकून बघितले. एवढ्यात श्रीनिंबरगीकरमहाराजांचे नरसाप्पांकडे लक्ष गेले आणि त्यांनी हाताच्या खुणेने आत बोलविले. पण नरसाप्पांनी विचार केला की, 'मी यःकश्चित गवंड्याचे काम करणारा. महाराजांनी बोलविले आणि लगेच आत जावे काय!' अशा विचाराने ते आत गेले नाहीत. श्रीनिंबरगीकरमहाराज दररोज भीमरायाच्या मंदिरात पुराण सांगायचे. ते ऐकण्यासाठी श्री. नरसाप्पा गेले. गेल्या गेल्या महाराज नरसाप्पांना म्हणाले, 'अरे नरसाप्पा, तुला मी आत बोलवत असताना तू आत का नाही आलास? आत आला असतास तर तुला महादेवापुढचा नंदी करून बसविला असता.' हे वाक्य ऐकल्यावर महाराज आपल्याला आत का बोलवत होते हे नरसाप्पांना कळले.

श्री. नरसाप्पांचा रोज ओढ्यावर स्नान करायचे व स्नान झालेवर श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या घरी जायचे आणि त्यांचे पाय चेपायचे असा नेम होता. असेच एकदा ते ओढ्यावरून स्नान करून श्रीमहाराजांचे घरी जात असताना आपले आंघोळीचे गवाळे ओढ्यावर विसरले. नरसाप्पा महाराजांचे घरी गेले व त्यांचे पाय चेपू लागले. नंतर महाराज म्हणतात, 'अरे नरसाप्पा, तुझे ओढ्यावरचे गवाळे मी किती वेळ सांभाळू?' असे महाराजांनी म्हणताच, नरसाप्पा ओढ्यावर गेले. गवाळे ओढ्यावर तसेच होते. महाराजांनी सांभाळल्यावर गवाळे कोठे जाणार?

वयाची ९५ वर्षे उलटल्यानंतर त्यांना गवंड्याचे काम होईनासे झाले. त्यांना एक मुलगी होती. ती निंबरगीजवळ मसळी म्हणून गाव आहे, तिथे दिलेली होती. श्री.नरसाप्पा हे विजापूर येथे रहात असत. घरात कोणी बायका मुले नसल्यामुळे त्यांनी भिक्षावृत्ती पत्करली. एका घरी एक चतकोर पेक्षा अधिक भाकरी ते घेत नसत व कोणी पैसे दिले तर एक दिडकीपेक्षा जास्त घेत नसत. याप्रमाणे ११ रुपये जमले म्हणजे ते

विजापूरहून निंबरगीस पायी जाऊन, तेथे महाराजांचे समाधीस नैवेद्य करून, तेथील साधक मंडळींना प्रसाद भोजन करीत असत. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी देह ठेवल्यानंतर त्यांची निंबरगी येथे समाधी बांधणेत आली. श्री. नरसाप्पा हे ती समाधी चेपायचे. शेवटी शेवटी श्री. नरसाप्पांना गुरूदेव रानडेसाहेबांनी आपल्या आश्रमात बरेच दिवस ठेऊन घेतले. आजारपणामुळे श्रीगुरूदेव फक्त चहा व दुधावर होते. हे पाहून श्रीनरसाप्पांना फार वाईट वाटले. जेव्हा श्री. नरसाप्पा निंबरगीला गेले, तेव्हा त्यांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या समोर हात टेकून, 'देवा तुझी कीर्ती वाढावी म्हणून तो अहर्निश झटतो आहे. त्याच्या मुखात अन्नाचा घास जायला नको का? मी मेल्यावर तुझा हात धरून त्याला जेवायला घालायला लावतो बघ' असे म्हणाले. आणि आश्चर्य श्री. नरसाप्पांनी देह ठेवल्यावर त्याच दिवसापासून श्रीगुरूदेव थोडे अन्न खाऊ लागले.

शेवटी श्री. नरसाप्पा, मसळी (जि. विजापूर) येथे आपल्या मुलीकडे रहावयास गेले आणि त्यांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या स्मरणात आषाढ शु. ८ शके १८५७ मंगळवार दि.०९.०७.१९३५ रोजी वयाच्या १०५ व्या वर्षी देह ठेवला. त्यांची समाधी मसळी येथे आहे.

***

# संत श्रीकूर्मदास

निर्याण
आषाढ शु.१०

संत कूर्मदास हे पैठणचे रहिवासी होते. ते जन्मतःच अपंग होते. दोन्ही हात आणि दोन्ही पाय नव्हते. पण बुद्धि आणि स्मरणशक्ती अतिशय तल्लख होती. मंदिरात कीर्तन - प्रवचन ऐकण्याकरता ते गडबडा लोळत त्याठिकाणी जात असत.

एक दिवस कूर्मदासांनी आपल्या आईला हाक मारली आणि म्हणाले, 'आई ये, चल लवकर - कीर्तनाची वेळ झाली.' हे ऐकून त्यांची आई वैतागाने म्हणाली, 'कीर्तन - कीर्तन -- रोज कीर्तन म्हणतोस, गुडघ्यापासून तुला पाय नाहीत आणि कोपरापासून हात नाहीत. कोण नेईल रोज तुला कीर्तनाला. बरं लहान नाहीस आता --- २२ वर्षांचा मोठा झालास. आता तुला कडेवरून न्यायला मला जमत नाही.' हे ऐकून कूर्मदास म्हणतात, 'आई तू म्हणतेस ते खरयं. मी २२ वर्षांचा घोडा झालोय, पण तुझ्या काहीच उपयोगाला आलो नाही. माझ्या वडिलांनी झुरून झुरून प्राण सोडला आणि मी जीवंत राहिलो. बिन हाताचा, बिन पायाचा... लंगडा, लुळा. त्यात माझा काय गं दोष आई.' कूर्मदास पुढे म्हणतात की, 'आई फक्त आजच्याच दिवस घेऊन चल मला कीर्तनाला. उद्या मी नाही म्हणणार तुला.' हे ऐकून आई गहिवरली आणि आईच्या डोळ्यात पाणी आले. शेवटी आईच ती. आईने कूर्मदासांना पाठीवर घेतले आणि कीर्तनाच्या ठिकाणी त्यांना सोडले आणि ती घरी परत आली.

नाथमहाराजांचे पणजोबा श्रीभानुदासमहाराज पैठणकर यांचे कीर्तन सुरू होते. कीर्तनाला भरगच्च गर्दी झालेली. कूर्मदासाला चालताही येत नव्हते, परंतू कूर्मदास लोटांगण घालत घालत माणसातून रस्ता काढत, पोटावर फरपटत समोर आले आणि पहिल्या रांगेत बसले. गळ्यात तुळशीमाळ आणि कपाळी टिळा लावलेल्या कूर्मदासांकडे भानुदासमहाराजांचे लक्ष गेले. महाराज म्हणाले, 'आलास कूर्मदासा' कूर्मदास म्हणाले, 'हो महाराज आलो.' अरे कुणाबरोबर आलास? कूर्मदास म्हणाले, 'आईने मला आणून सोडले.' महाराज म्हणतात, अरे, आईला कशाला त्रास दिलास? आता कीर्तनानंतर तू घरी कसा जाणार? तेव्हा कूर्मदास म्हणाले, 'आता मला घरी जायचे नाही.' हे ऐकून महाराज म्हणतात, 'अरे कूर्मदासा, आज हे काल्याचे कीर्तन संपले की, आम्ही निघालो पंढरीच्या वारीला, मग तू कुठे जाणार?' हे ऐकल्यावर कूर्मदास म्हणाले, 'महाराज मी पण येऊ कां पंढरीला?' महाराज म्हणाले, 'अरे कूर्मदासा, पंढरपूर फार लांब आहे.' हे ऐकून कूर्मदास म्हणतात, 'महाराज तुम्ही फक्त हो म्हणा, पहा मी येतो का नाही पंढरीला!' महाराज हसत हसत विनोदाने 'हो ये' म्हणाले.

रात्री सर्व वारकरी झोपलेले पाहून कूर्मदास उठले, स्नान केले व फरपटत फरपटत लोटांगण घालत त्यांनी पंढरीचा रस्ता धरला. थोडे अंतर गेल्यावर कूर्मदास पंढरीचा रस्ता विचारायचे. लोक सांगायचे, इथून पुढे जा. त्याप्रमाणे लोळत लोळत कूर्मदासांनी सकाळी १० वाजेपर्यंत बीड गाठले. मागून भानुदासमहाराजांची दिंडी यायला लागलेली होती. वेशीवर मारुतीचे मंदिर होते. त्या मंदिराजवळ कूर्मदास गेले आणि ओरडू लागले, 'ऐका हो ऐका, भानुदासमहाराजांची दिंडी पंढरपूरच्या वाटेवर आहे.' कुणी भाकरी आणाव्या, कुणी कालवण आणावे. याप्रमाणे महाराजांची दिंडी येईपर्यंत जेवणाची सोय झाली. तोपर्यंत दिंडी आली आणि भानुदासमहाराजांनी या कूर्मदासांना पाहिले आणि आश्चर्याने विचारले, 'कूर्मदासा, इथे कसा आलास रे?' तेव्हा कूर्मदास म्हणाले, 'तुमच्या 'हो' नं मला आणले.' त्या दिवशी महाराजांचे कीर्तन झाले. हरिपाठ झाला आणि रात्री महाराजांनी जाहीर केले की उद्याचा दिंडीचा मुक्काम मांजरसुंबा. हे कूर्मदासांनी ऐकले आणि कूर्मदासा मध्यरात्री उठले आणि लोळण घेत निघाले आणि काही वेळात पहाटे मांजरसुंबा गाठले. याप्रमाणे जात जात कूर्मदासांच्या अंगाची चाळण झाली होती. परंतु कूर्मदासांचे एकच ध्येय होते, पांडुरंगाची भेट.

येरमाळा, बार्शी करत करत लऊळगाव आले. कुर्डुवाडीच्या पुढे ७ कि.मी. हे गाव आहे. इथपर्यंत महाराजांची दिंडी आली. कूर्मदास एका कोपऱ्यात विव्हळत पडले होते. हे भानुदासमहाराजांनी बघितले आणि त्यांच्याजवळ आले व म्हणाले, 'कूर्मदासा, आता फक्त एकच मुक्काम राहिला आहे. मग तू तुझ्या विठुरायाला भेटशील.' हे ऐकून कूर्मदास म्हणाले, 'नाही महाराज, आता मी नाही येवू शकणार पंढरीला.' हे ऐकून महाराज म्हणाले, 'एवढ्या लांब आलास आणि आता फक्त एक मुक्कामावर आलीय पंढरी.' कूर्मदासांना बोलणेसुद्धा असह्य झाले होते. ते पालथे होते, ते उताणे झाले. त्यांचे सगळे पोट सोलून निघाले होते. त्यांच्या शरीरावर प्रचंड जखमा झाल्या होत्या. त्या जखमात असंख्य खडे रुतलेले होते. अंगातून रक्त वहात होते.

निघाल्यापासून कूर्मदासांच्या पोटात अन्नाचा कण नव्हता. सगळ्या दिंडीसाठी त्यांनी अन्न गोळा केले, परंतु स्वतःच्या पोटात अन्नाचा कण नव्हता. महाराजांनी याचे कारण विचारल्यावर कूर्मदास म्हणाले, 'महाराज, माझे मलमूत्र कोण धुणार? घरी माझी आई धुवत होती. इथे कोण धुणार?' हे कूर्मदासांचे बोलणे ऐकल्यावर भानुदासमहाराजांचे डोळे डबडबले. कूर्मदास, काय केलेस हे? तेव्हा कूर्मदास म्हणतात, 'महाराज, घरी राहून काय केले असते--- निदान पंढरीच्या वाटेवर तरी आलो. महाराज आता फक्त एकच करा. पंढरपूरला गेल्यावर पांडुरंगाला माझा नमस्कार सांगा आणि त्याला सांगा, हे पांडुरंगा, तुझ्या पायाजवळ यायला या कूर्मदासाचे पुण्य थोडे कमी पडले. या जन्मात नाही पाहता आले पांडुरंगा, एवढा माझा निरोप द्या', असे म्हणत तिथेच विव्हळत पडले. हे सर्व ऐकून भानुदासमहाराजांचे पाय आता जड झाले. जड पावलांनी कूर्मदासाला सोडून महाराज पंढरपूरात आले. चंद्रभागेचे स्नान केले आणि पांडुरंगासमोर येऊन उभे राहिले आणि पांडुरंगाला आपला व कूर्मदासांचा नमस्कार केला व कूर्मदासांचे हृद्गद पांडुरंगाला सांगितले.

पांडुरंग रुक्मिणीमातांना म्हणाले, 'तू आता वारी सांभाळ. मी माझ्या भक्ताला - कूर्मदासाला लऊळगावाला भेटायला चाललो.' पांडुरंगाने गरूडाला आज्ञा केली आणि विठ्ठल परमात्मा कूर्मदासांजवळ आला. कूर्मदास निपचित, शुद्ध हरपून वाळवंटात पडले होते. शरीरातून रक्त वहातच होते. विठ्ठलाने हाक दिली, 'कूर्मदासा! अरे डोळे उघड बघ मी आलोय तुझ्यासाठी.' हे ऐकल्यावर कूर्मदासांनी अर्धवट डोळे उघडले. पाहता तो प्रत्यक्ष पांडुरंग परमात्मा समोर उभा होता. विठ्ठलाला बघितल्यावर, 'विठ्ठला माझ्या पांडुरंगा' म्हणत कूर्मदास पुन्हा विठ्ठलाच्या दिशेने फरपटत लोटांगण घेऊ लागले. हे बघून पांडुरंगाने कूर्मदासांकडे धाव घेतली. त्याचे शिरकमल आपल्या मांडीवर घेतले आणि म्हणाला, 'कूर्मदासा तू जिंकलास. तुझे ध्येय, तुझी मनोकामना पूर्ण झाली.' हे ऐकून कूर्मदास म्हणाले, ''पांडुरंगा, हीच माझी पंढरी.'' कूर्मदासांनी डोळे भरून पांडुरंगाला पाहिले आणि नमन केले आणि पांडुरंगाच्या मांडीवरच प्राण सोडला. धन्य धन्य ते कूर्मदास. धन्य धन्य त्यांची भक्ती आणि धन्य धन्य त्यांचा निर्धार.

यातील आणखी महत्वाचे म्हणजे कूर्मदास हे जातीने मुस्लिम होते. म्हणून आजही त्यांची लऊळगाव येथे कबर आहे आणि त्या कबरीसमोर विठ्ठलाची गोजिरवाणी मूर्ती आहे.

***

## शिवभक्त प.पू. श्रीअनंत गंगाधर केळकर

जन्म
इ.स.१८६०

निर्याण
आषाढ शु.१२ शके १८५६
सोमवार दि.२३.७.१९३४

श्री. गंगाधरपंत केळकर हे आचरे, ता. मालवण जि.सिंधुदुर्ग येथील रहाणारे होते. वयाच्या १५व्या वर्षी ते पायी प्रवास करत कोल्हापूर मार्गे सांगलीला आले. हा काळ अंदाजे १५० वर्षांपूर्वीचा आहे. त्यांचेबरोबर त्यांचे पुतणे श्रीनारोपंत केळकर व देवगड तालुक्यातील मोंड या गावाचे श्री.गोविंदपंत बोडस सांगलीस आले. यावेळी प्रत्येकाजवळ फक्त २५ रुपये होते. येथे आल्यावर उद्योगाचे काय? असा प्रश्न उभा राहिला. तेव्हा त्यांचा सांगलीतील प्रसिद्ध सोने-चांदीचे व्यापारी श्री. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ यांचेशी संपर्क आला. त्यांनी या तिघांना कवड्यांचा व्यापार करण्यास उद्युक्त केले. या व्यापारात त्यांना चांगला नफा झाला. या व्यापाराचे पुढे सावकारीत रूपांतर झाले.

अशा या श्रीगंगाधरपंतांचा 'पार्वती' नामक कन्येशी विवाह झाला. या दांपत्याचे पोटी इ.स. १८६० साली एक पुत्र जन्माला आला. त्याचे 'अनंत' असे नाव ठेवणेत आले. या अनंताला 'नाना' या उपनावाने लोक संबोधू लागले. हे अनंत ऊर्फ नाना म्हणजेच, माझे खापरपणजोबा शिवभक्त श्री. अनंत गंगाधर केळकर होत.

श्रीनानांचे शिक्षण मराठी व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत झाले होते. शिक्षणानंतर ते सांगली संस्थानातील एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या कार्यालयात नोकरीस लागले. पुढे ते हेडक्लार्क झाले. त्यांनी एकंदर ३० वर्षे नोकरी केल्यानंतर पेन्शन घेतली. तसेच या काळात नाना हे थोडीफार सावकारीही करत होते.

सांगलीचे पहिले राजे श्रीआबासाहेब पटवर्धन यांनी सध्या जुनी सांगली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात हवी तेवढी जागा घ्या आणि त्यावर घरे बांधा असा आदेश काढला होता. त्यानुसार श्रीनानांचे वडील श्री.गंगाधरपंतांनी फार मोठी जागा ताब्यात घेतली. या जागेवर पुढे श्रीनानांनी घर बांधले. या जागेत एक पडकी विहीर होती. आपली आई सौ. पार्वतीबाई यांनी देह ठेवल्यावर तिचे स्मरणार्थ माघ व.४ शके १८१३ म्हणजेच इ.स.१८९१ साली श्रीनानांनी या विहीरीचा जीर्णोद्धार केला. याच सुमारास श्रीनानांनी गणपती देवस्थानास चार बिघे जमीन दिली.

श्रीनाना हे सत्वशील आणि धार्मिक प्रवृत्तीचे होते, शिस्तप्रिय होते. त्यांचा हिशोबात हातखंडा होता. दानधर्म वाटेल तेवढा करतील, पण हिशोबात एक पैही सुटणार नाही अशी बाणेदार वृत्ती होती. श्रीनाना एकदा बेळगावला शेतीच्या कामाकरिता गेले असताना, तेथील एकाचे एक पै द्यायचे राहिले होते. तेव्हा श्रीनाना सांगलीत आल्यावर त्यांनी एक पै चे पावती तिकीट पोस्टाच्या पाकीटात घालून त्याला ते

पाठवून दिले, इतके ते व्यवहाराला पक्के होते. श्रीनाना हे थोर मातृभक्त होते. त्यांच्या आईला भात फार आवडे. म्हणून त्यांनी शहापूर बेळगावजवळील कलखांबा येथे भाताची शेती खरेदी केली.

श्रीनानांनी सांगली येथील वे.शा.संपन्न श्रीलक्ष्मण दीक्षित यांचेकडून पार्थिवपूजेचे व्रत घेतले होते. त्यामुळे ते सकाळी स्नान संध्या झाल्यावर पार्थिवपूजा करीत. सोमवारचा उपवास करीत तसेच 'ॐ नमः शिवाय' या शंकराच्या षडाक्षरी मंत्राचा बारा हजार जप दररोज करीत. काही दिवस त्यांनी घरी वैश्वेदेवही केला. आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे श्रीनानांची श्रीज्ञानेश्वरमहाराजांवर निष्ठा होती. ते 'चांगदेव पासष्टी' हे प्रकरण दररोज पठण करीत असत. त्यांनी स्वहस्ते लिहिलेली 'चांगदेव पासष्टी' आजसुद्धा आमचेकडे उपलब्ध आहे. श्रीलक्ष्मण दीक्षित यांचे वय झालेने त्यांना पार्थिव लिंग करता यायचे नाही म्हणून, आमचे नाना त्यांना पार्थिव लिंग करून द्यायला जायचे. त्यांना चालायला येत नव्हते, म्हणून आमचे नाना हे श्रीलक्ष्मण दीक्षितांना पाठीवरून कृष्णास्नानाला घेऊन जायचे. तेथे त्यांना स्नान घालायचे, संध्येची तयारी करून द्यायचे व पार्थिवपूजा करणेसाठी पार्थिव लिंग करून द्यायचे व त्यांना परत घरी आणून सोडायचे. कालांतराने वे.शा.सं. श्रीलक्ष्मण दीक्षित यांनी देह ठेवला, तेव्हा आमच्या श्रीनानांनी त्यांची समाधी विष्णुघाटावर बांधली. त्याची पूजा ते नित्यनेमाने करीत असत. श्रीलक्ष्मण दीक्षितांची पुण्यतिथी श्रीनाना हे श्रीदीक्षितांच्या घरी जाऊन साजरी करत. श्राद्धाला ब्राह्मण बसले की ते स्वतः, स्वतःचे रचलेले श्रीलक्ष्मण दीक्षितांचे पद्यमय चरित्र म्हणून दाखवत व नंतर आपण प्रसाद घेत. श्रीलक्ष्मण दीक्षितांचे नुसते नाव जरी काढले तरी त्यांच्या डोळ्यात अश्रु उभारत. श्रीदीक्षितांच्या घरातील लहान मुलास त्यांनी कधी अरे म्हणून हाक मारली नाही. एखादेवेळेस त्यांचा लहान मुलगा आपल्या घरी आला तर, त्याला ते नमस्कार करीत असत.

श्रीनानांचा हरीपूर येथील 'यमू फडके' या कन्येशी विवाह झाला. लग्नानंतर यमूचे नाव 'राधा' ठेवणेत आले. यथावकाश या दांपत्याला एक कन्यारत्न झाले. तिचे नांव 'गंगा/गंगू' असे ठेवणेत आले. गंगा लग्नायोग्य झालेवर तिचा श्री. लक्ष्मण पटवर्धन यांचेशी विवाह लावून दिला. परंतु लग्न झाल्यानंतर थोडे दिवसात गंगाच्या पतीचे निर्वाण झाले. याचे श्रीनानांना फार वाईट वाटले आणि श्रीनानांनी या मुलीला झालेल्या दोन मुलांचा शेवटपर्यंत प्रपंच पाहिला. त्यांच्या मुंजी व शिक्षण श्रीनानांनी स्वखर्चाने केले.

एकदा श्रीनाना हे सौ.राधाबाईंना, त्या गर्भवती असताना शेतीच्या कामानिमित्त कलखांबला घेऊन गेले होते. तेव्हा सौ. राधाबाईंना सातवा महिना होता. तेथे असतानाच, सौ. राधाबाईंना फाल्गुन शु. दशमी शके १८१० म्हणजेच इ.स. १८८८ साली पुत्ररत्न झाले. एका जुन्या गोठ्यात पडदा लावून प्रसूती झाली. म्हणून या मुलाचे नाव 'गोविंद' ठेवणेत आले. हा 'गोविंद' म्हणजेच आमचे श्रीबापूराव ऊर्फ श्रीमामामहाराज केळकर. परंतु गोविंद लहान असतानाच सौ. राधाबाई यांना अकाली मरण आले. यानंतर श्रीनानांनी दुसरा विवाह केला. दुसऱ्या पत्नीचे नाव 'सौ.लक्ष्मीबाई ऊर्फ माई' असे होते. त्या श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या शिष्या होत्या.

श्रीनाना हे नरसोबावाडी येथे श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराज व त्यांचे शिष्य श्रीदीक्षितस्वामी यांचे दर्शनास जात असत. त्यांचे श्रीनानांवर फार प्रेम होते. त्यांनी श्रीनानांना प्रसाद म्हणून एकेक रुपाया दिला होता. तो रुपाया आजही आमच्या घरात आहे.

श्रीनाना हे श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या कीर्तनाला जावू लागले. श्रीतात्यासाहेबमहाराज कीर्तनात विशिष्ट व्यक्तींना विशिष्ट पद म्हणायचे फर्मान करायचे. यात आमच्या नानांना पद म्हणा म्हटले की श्रीनाना, 'मौज दिसती रे' हे श्रीमहिपतींचे पद म्हणायचे आणि कीर्तनात मौजच मौज व्हायची. श्रीनानांनी शके १८३७ म्हणजेच इ.स. १९१५ साली विभूती मासातील कृष्ण षष्ठीला सोमवारी श्रीतात्यासाहेबमहाराजांकडून अनुग्रह घेतला.

श्रीतात्यासाहेबमहाराजांनी देह ठेवल्यानंतर आमच्या श्रीमामांनी अखंड कीर्तन करण्यास सुरवात केली. श्रीमामांचे कीर्तनात श्रीनाना हे मोठ्या खड्या आवाजात व ठेक्यात पदे म्हणत. केव्हा केव्हा झांज घेऊन साथ करीत. श्रीमामा हे कोठे गावी गेले तर एक-दोन वेळा घरी श्रीनानांनी कीर्तन केले होते. 'आमचे श्रीनानांनी येवढे घर बांधून ठेवले म्हणून मला कीर्तन करण्याची सोय झाली' असे श्रीमामा कीर्तनात वारंवार म्हणत असत.

श्रीनानांना आपला अंतकाळ समजलेला होता. एक वर्ष अगोदर ते निरवानिरवीची भाषा करू लागले. आपल्या मुलीचा मुलगा श्रीनारायणराव यांना बोलावून घेतले आणि त्याला, 'तुझा तू आता व्यवहार बघ' असे सांगितले. तेव्हा श्रीनानांची कन्या सौ. गंगाबाई म्हणाल्या, नाना, असे कां म्हणता? तेव्हा नाना म्हणाले, 'माझा आता नेम नाही.' श्रीनानांनी या वर्षात भरभर हिशोब चुकता केला. आपल्या इच्छेला येईल तेवढा दानधर्म केला. वे.शा.सं. छत्रे गुरुजी, वे.शा.सं.श्रीअर्जुनवाडकर अशा मोठमोठ्या जाणत्या विद्वान लोकांना हजार-पाचशे तरी दानधर्म केला. श्रीनानांना घशाचा कॅन्सर झालेला होता. औषधपाणी व सेवा शुश्रुषा श्रीमामा आणि सौ. इंदिराबाई यांनी फार उत्तमपणे केली, असे श्रीनानांनी उद्गार काढले. श्रीबाबूरावजी करमरकर म्हणून एक नानांवर लोभ असणारे गृहस्थ येत होते. त्यांना 'बापूकडे (मामामहाराजांकडे) लक्ष ठेवा' असे सांगितले. गु. शंकरभटजी दीक्षित हे श्रीलक्ष्मण दीक्षितांचे नातू होते. ते नानांना बघायला आले होते. त्यावेळी त्यांना दूध प्यावयास दिले व त्यातील थोडे दूध वगळणेस सांगून ते 'शेष प्रसाद' म्हणून त्यांनी ग्रहण केले.

दि.२२.०७.१९३४ चा दिवस उजाडला. यावेळी पहिली आषाढी एकादशी होती. सायंकाळी श्रीमामांचे कीर्तनात ते 'शंकरा अंत करावा बरवा' हे पद मी म्हणणार म्हणून म्हणू लागले व त्यांनी ते म्हटले :-

शंकरा अंत करावा बरवा । निशीदिनी पाही ।<br>
हेचि मागणे । पूर्ण कृपेने घडवा ।।ध्रु.।।

सुकृत काही गाठी नसे मम । संसारामधे केले बहु श्रम ।
खंती वाटे या कृत वा वा ।।१।।
साठावरी ही वसाया गेली । अंतकाळीची दृष्टी प्रगटली ।
यास्तव नमितो श्रीमहादेवा ।।२।।

अंतकाळी ज्या कठिण यातना । भीती उपजली बघुनी मन्मना ।
भोळ्या शंकरा करि बा कणवा ।।३।।

अंतकाळ हा पाठी लागला । गडबडले मन धीर सुटला ।
हात देऊनी भवभय हरवा ।।४।।

इंद्रियलोलुप आजवरी जाहलो । स्वहित बुडाले सहजचि फसलो ।
कृतापराध हा क्षमा करावा ।।५।।

जप-तप-साधन काहीच नेणे । वयसा गेली काही न होणे ।
म्हणुनी दास्यपथ धरिला बरवा ।।६।।

रात्री जे निजले तेथून त्यांची तब्येत जास्तच खालावत चालली होती. रात्री डॉ. जोशी प्रकृती पहाणेसाठी आले. त्यांना नाना म्हणाले, 'मला फक्त बापूचे कीर्तन ऐकावे एवढीच इच्छा होती, पण येतो आता.' असे म्हणून डॉक्टरांना नमस्कार केला. यावेळी त्यांचेजवळ श्री.अनंतराव म्हसकर हे बसले होते. श्री.अनंतराव म्हसकरांनी नानांना प्रश्न केला, 'काय नाना, स्मरण आहे नां?' तेव्हा नाना म्हणाले, 'तेच चालले आहे' म्हणून त्यांनी मोठ्याने 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र उच्चारून दाखविला. पहाटे ३ वाजेपर्यंत त्यांच्या हातातील माळ चालूच होती. पुढे त्यांना घोर लागला आणि सकाळी ६ वाजता हातातील माळ एकदम गळून पडली. परंतु श्वासोश्वास चालू होता आणि दुसरी आषाढी एकादशी म्हणजेच आषाढ शु. १२ शके १८५६, सोमवार दि.२३.०७.१९३४ रोजी सकाळी ८ वाजता, वयाच्या ७४ व्या वर्षी भ्रूमध्यावर दृष्टी स्थिर करून, श्रीनानांनी शिवस्मरणात महानिर्वाण केले.

***

# प. पू. श्रीकल्याणस्वामी

जन्म
शके १५५८ इ.स.१६३६

निर्याण
आषाढ शु.१३ शके १६३६
इ.स.१७१४

श्रीकृष्णाजीपंत कुलकर्णी हे मूळचे नाशिकचे होते. त्यांच्या पहिल्या पत्नीच्या निधनानंतर ते तीर्थयात्रा करत कोल्हापूर येथे आले. कोल्हापूर येथे पाराजीपंत (बरवाजीपंत) कुलकर्णी हे रहात होते. त्यांची रखुमाबाई ही बहीण होती. या बहिणीशी श्रीकृष्णाजीपंतांचा दुसरा विवाह झाला. या दांपत्याला ३ मुले झाली. पहिला मुलगा बाभळगाव येथे शके १५५८ इ.स.१६३६ रोजी झाला. त्याचे नांव 'अंबाजी' ठेवणेत आले. दुसरा मुलगा दत्तात्रय व त्यानंतर एक मुलगी झाली.

समर्थ रामदासस्वामी कीर्तनाकरिता कोल्हापूर येथे आले होते. तेव्हा पाराजीपंतांनी आपली बहिण व तिच्या मुलांसह समर्थांचा अनुग्रह घेतला. त्यानंतर अंबाजी, दत्तात्रय व त्यांच्या मातोश्री या समर्थांच्या बरोबर तीर्थयात्रेस बाहेर पडल्या. वाटेत शिरगाव येथे समर्थांनी दत्तात्रय यांना मठ स्थापन करून दिला आणि त्यांचे 'दत्तात्रयस्वामी' असे नामकरण केले. त्यांच्याबरोबर त्यांच्या मातोश्री तेथेच राहिल्या. अंबाजीला मात्र समर्थ आपले बरोबर तीर्थयात्रेस घेऊन गेले.

समर्थांनी मसूर येथे रामनवमी दिवशी रामाचा रथ काढला. वाटेत एका झाडाची फांदी आडवी आलेली होती. त्यामुळे रथ पुढे जात नव्हता. समर्थांनी फांदी तोडण्याची आज्ञा केली. पण कोणीही पुढे येईना. कारण जी फांदी आडवी गेलेली होती, त्या फांदीखाली गडदर (पडकी विहीर) होती. त्यामुळे फांदी तोडताना खाली गडदरीत पडण्याची जास्त शक्यता होती. तेव्हा एका क्षणाचाही विलंब न लावता अंबाजी पुढे आला आणि म्हणाला, 'समर्थ, मी तोडतो फांदी.' अंबाजीनी फांदी तोडली, पण अंबाजी खाली गडदरीत पडला. शिष्य समर्थांना याबाबत सांगणेस आले. समर्थ गडदरीजवळ आले आणि वाकून खाली बघत म्हणाले, 'अंबाजी, कल्याण आहे ना?' तेव्हा अंबाजीने खालून उत्तर दिले, 'स्वामी आपल्या कृपेने कल्याण आहे.' तेव्हापासून समर्थांनी अंबाजीचे नाव 'कल्याण' ठेवले आणि ते 'कल्याणस्वामी' म्हणून प्रसिद्ध झाले.

एकदा सज्जनगडावर एका कड्याच्या टोकाशी समर्थ उभे राहिले असताना त्यांची छाटी (वस्त्र) वाऱ्याने उडून खाली गेली. समर्थ एकदम म्हणाले, ''कल्याणा, छाटी उडाली'' हे ऐकताच कल्याणस्वामींनी त्या कड्यावरून खाली उडी मारली. ती छाटी हवेत झेलली. ती जागा आजही सज्जनगडावर आहे.

समर्थांनी कल्याणस्वामींची अनेकप्रकारे परीक्षा बघितली. पण कल्याणस्वामी सर्व परीक्षेत उत्तीर्ण झाले. समर्थ सज्जनगडावर असताना कल्याणस्वामी हे स्नानासाठी उरमोडी नदीतून मोठ्या हंड्यातून पाणी वर घेऊन येत असत. ते हंडे आजही सज्जनगडावर आहेत. ते हंडे बघितले असता, कल्याणस्वामींकडे शारीरिक बळ किती होते हे कळल्याशिवाय रहाणार नाही.

समर्थांचे सर्व साहित्य त्यांनी स्वहस्ते लिहून काढले. शिवथरघळ येथे समर्थांनी 'दासबोध' सांगितला. तो कल्याणस्वामींनकडून लिहून घेतला. या बरोबरच समर्थांनी कल्याणस्वामींना दासबोधाचे तात्विक सार सांगितले. ते 'सोलीव सुख' या नावाने प्रसिद्ध आहे. कल्याणस्वामींचे गुरूबंधू श्रीअनंत कवी लिहितात, ''स्वामींचा कविता समुद्र अवघा कल्याण लिहितसे.''

सन १६७८ मध्ये समर्थांनी कल्याणस्वामींना डोमगावला जाण्याची आज्ञा केली. समर्थांनी १६८१ मध्ये समाधी घेतली. तेव्हा कल्याणस्वामी डोमगावला होते. गुरूंच्या विरहाने व्याकूळ होऊन ते सज्जनगडावर आले. तेव्हा समाधी दुभंगून समर्थांनी त्यांना दर्शन दिले.

श्रीकल्याणस्वामी हे रोज १२०० सूर्यनमस्कार घालत असत. त्यामुळे त्यांची शरीरयष्टी बलदंड होती. ते हुरमुंजी रंगाची वस्त्रे धारण करीत. सर्वांगाला भस्म लावलेले असल्याने त्यांना योगीराज उपाधीने संबोधले जायचे. त्यांच्या पायात मोजपट्टा बांधलेला असायचा. ते चांगले चित्रकार होते. महाराष्ट्, कर्नाटक व आंध्रप्रदेश या भागात त्यांनी २५० पेक्षा जास्त रामदासी मठांची स्थापना केली. ते उत्तम कीर्तन करीत.

श्रीकल्याणस्वामींनी पुढीलप्रमाणे साहित्य रचना केली - १) महावाक्य पंचीकरण (७०० ओव्या). २) ध्रुवाख्यान - १४ ओव्या, ३) रुक्मिणी स्वयंवर (हिंदी ३४ ओव्या), ४) श्रीशुकाख्यान (१८ ओव्या). याशिवाय अनेक स्फुट प्रकरणे व पदे.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनी १६८१ मध्ये समाधी घेतली. त्यांच्या अस्थी चाफळ येथील वृंदावनामध्ये ठेवणेत आल्या होत्या. त्यांची पूजाअर्चा कल्याणस्वामींचे शिष्य श्रीकेशवस्वामी करीत असत. श्रीसमर्थांच्या अस्थी बरेच वर्षे विसर्जन केलेल्या नसल्यामुळे, एके दिवशी श्रीकेशवस्वामी समर्थांच्या अस्थी विसर्जन करण्यासाठी जेव्हा वृंदावनातून बाहेर काढत होते, त्याचवेळी परांडा येथे श्रीकल्याणस्वामींनी रामकथा सांगून पूर्ण केली व वयाच्या ७८ व्या वर्षी आपला देह ठेवला. तो दिवस होता आषाढ शु. त्रयोदशी, शके १६३६ म्हणजेच इ.स. १७१४. यावरून श्रीसमर्थ व श्रीकल्याणस्वामी यांची एकरूपता लक्षात येते. त्यांची समाधी डोमगाव येथे आहे. यथावकाश श्रीकेशवस्वामींनी श्रीसमर्थ व श्रीकल्याणस्वामी या दोघांच्याही अस्थी गंगेत एकाच वेळी विसर्जन केल्या.

***

विरक्ताग्रणी सद्‌गुरू रामदासा । जये सद्‌गुरू मोहिले शिष्य ऐसा ।

दुजा ना जगी एकला धन्य झाला । नमस्कार कल्याण-पादांबुजाला ।।

-- श्रीदासराममहाराज

# ह.भ.प. वै.श्रीमामासाहेब दांडेकर (सोनोपंत)

जन्म
वैशाख शु.७, शके १८१८
सोमवार दि.२०.०४.१८९६

निर्याण
आषाढ शु.१४ शके १८९०
मंगळवार दि.९.७.१९६८

श्री. गणेश रामराव दांडेकर या नावाचे परोपकारी, सत्त्वसंपन्न पुरुष पालघर या गावी रहात होते. या श्री. गणेशरावांना तीन मुलगे होते. १) सखाराम (बापूसाहेब) २) केशव (आप्पासाहेब) आणि ३) वामन (भाऊसाहेब).

यापैकी श्री. वानमराव (भाऊसाहेब) हे शेती व सावकारीचा व्यवसाय करीत. त्यांचे वास्तव्य माहिम येथे होते. ते वृत्तीने धार्मिक व दानशूर होते. त्यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई होते. अशा या दांपत्याच्या पोटी वैशाख शु. ७ शके १८१८, सोमवार दि. २०.०४.१८९६ रोजी पुत्र जन्मास आला. त्याचे नांव शंकर ठेवणेत आले. हा शंकर म्हणजेच आमचे श्रीमामासाहेब ऊर्फ सोनोपंत दांडेकर.

श्रीमामांच्या वडिलांचा ज्योतिषावर विश्वास होता, म्हणून त्यांनी गावातील विद्वान ज्योतिषी श्रीदामलेशास्त्री यांना मामांची कुंडली दाखविली. कुंडली बघून दामलेशास्त्री म्हणाले, ''दादासाहेब, तुमचा मुलगा असामान्य भगवद्भक्त होईल. या मुलासारखी कुंडली क्वचितच पहायला मिळते. अगदी हजारोंमध्ये एखादी.''

श्रीमामांचे नाव जरी शंकर ठेवले असले तरी, घरी सर्वजण त्यांना 'सोनू' म्हणत. सोनूचा सोन्या आणि पुढे सोनोपंत झाले. श्रीमामा हे ४ वर्षांचे असल्यापासून श्रीमुरलीधर, विठोबा-रखुमाई यांच्या मूर्तींची न चुकता रोज पूजा करीत. मुंजीचे वय झाल्यावर त्यांची मुंज झाली. सकाळ व संध्याकाळची संध्या ते नियमितपणे करीत. श्रीमामांनी माहिमच्या मराठी शाळेत शिक्षणास सुरवात केली. शाळेमध्ये श्रीमामांचा कायम पहिला किंवा दुसरा नंबर येत असे. मामांच्या वडिलांच्या मनात आले की श्रीमामांना इंग्रजी शिक्षण द्यावे. म्हणून त्यांनी श्रीमामांना इंग्रजी शिक्षणासाठी पुण्यास पाठविले. ते नूतन मराठी विद्यालय या शाळेत जाऊ लागले. मॅट्रिकमधे त्यांचा पहिला नंबर आला आणि त्यांना 'जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिप' मिळाली. श्रीमामांचे उच्च शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले. या कॉलेजमध्ये प्रख्यात तत्त्ववेत्ते प्रा. रा. द. तथा श्रीगुरुदेव रानडे हे विद्वान प्रोफेसर होते. त्यांचा संबंध श्रीमामासाहेबांशी आला. श्रीगुरुदेवांनी श्रीमामासाहेबांना तत्त्वज्ञान हा विषय शिकवला. श्रीमामासाहेबांनी पुढे बी.ए. व एम.ए. पर्यंत शिक्षण घेतले.

श्रीमामासाहेब शिक्षणासाठी पुण्यात आल्यावर ते आपल्या आजोळी म्हणजे सोहनी यांच्या घरी रहात असत. त्यांचे घराशेजारीच वै . विष्णुबुवा जोगमहाराज हेही रहात होते. यामुळे श्रीमामासाहेबांची व या श्रीजोगमहाराजांची भेट झाली आणि पुढे श्रीमामांनी त्यांचे शिष्यत्वही पत्करले. वै.श्रीजोगमहाराज एकदा सगळ्या शिष्यांना म्हणाले की, तुम्ही माझे होते नव्हते ते सगळे घेतले, पण माझे ब्रह्मचर्य व्रत आहे, ते पुढे कोण

घेणार? तेव्हा श्रीमामासाहेब पुढे आले आणि महाराजांना म्हणाले, 'मी घेतो.' तेव्हापासून ते शेवटपर्यंत नैष्ठिक ब्रह्मचारी व्रताने राहिले.

श्रीमामासाहेब हे दरवर्षी सांगली येथील प.पू.सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या पुण्यतिथीकाळात कीर्तन सेवेसाठी येत असत. शेवटपर्यंत त्यांनी तेथे कीर्तनसेवा केली. श्रीमामासाहेबांचा माझे पणजोबा ती.पपू.सद्गुरु श्रीमामामहाराज केळकर यांचेशी घनिष्ठ संबंध होता. ते सांगलीला आले की, आमचे घरी वेळात वेळ काढून येत असत. एकदा श्रीमामासाहेब आमच्या पणजोबांना (श्रीमामामहाराज केळकर यांना) म्हणाले, 'बापूराव, तुम्हीही कीर्तन करता, आम्हीही कीर्तन करतो, पण आमची तब्येत समजा बरी नसेल तर, आम्ही कीर्तनास ८ दिवस सुट्टी घेतो. पण बापूराव तुमचे तसे नाही. तुमची नॉनस्टॉप गाडी आहे, एकदाच थांबणार.'

असेच एकदा श्रीमामासाहेब हे श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या पुण्यतिथी महोत्सवात सांगलीला आले होते. श्रीकोटणीसमहाराजांचे ज्या जागी दहन केले, त्या जागी त्यांच्या शिष्यांनी समाधी बांधली व मंदिर बांधले. याला सध्या 'हनुमान समाधी मंदिर' असे संबोधिले जाते. याठिकाणी पुण्यतिथी पर्वकाळ कीर्तन करण्याचा केळकर घराण्याचा मान आहे. तेथे प.पू. श्रीमामामहाराज केळकर यांचे कीर्तन सुरू होते. एवढ्यात श्रीमामासाहेब तेथे येताच, त्यांना आलेले बघितल्यावर आमच्या श्रीमामामहाराजांनी आपले कीर्तन आटोपते घेतले आणि आता सोनोपंत चार शब्द सांगतील असे म्हणाले. श्रीसोनोपंत नाईलाजाने बोलायला उभे राहिले. ते सुरवातीला म्हणाले, 'मी खरे तर येथे जेवायला आलो होतो, पण बापूसाहेबांनी (श्रीमामामहाराज) मला वाढायलाच लावले. बापूसाहेबांची केवळ आज्ञा म्हणून मी चार शब्द बोलतो.'

वै.श्रीजोगमहाराज यांनी आळंदी येथे वारकरी शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेत मुलांना शिकविण्यासाठी ते काही काळ पुण्याहून सायकलने आळंदीस जात व परत येत. शेवटपर्यंत श्रीमामासाहेबांनी या वारकरी शिक्षण संस्थेची धुरा सांभाळली.

सन १९६८ सालापासून श्रीमामासाहेबांची प्रकृती बिघडू लागली. त्यांना न्युमोनिया झाला. त्यानंतर त्यांना हार्टअॅटॅक आला. दिवसेंदिवस प्रकृती बिघडू लागली. त्यांना डॉ. फाटक यांच्या दवाखान्यात दाखल केले होते. याचवेळी आळंदीहून श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पालखीचे प्रस्थान झाले होते आणि पालखी पुण्यात येणार होती. त्यामुळे वारकरी मंडळी पुण्यात जमू लागली. त्यांना श्रीमामासाहेबांची प्रकृती ठीक नाही हे कळल्यावर, वारकरी मंडळी हॉस्पिटलजवळ गर्दी करु लागली. ही गोष्ट श्रीमामासाहेबांना कळली. त्यांनी बाहेरील सर्व वारकऱ्यांना निरोप पाठवला की आषाढी एकादशी होईपर्यंत मी जात नाही, तुम्ही वारी करून या. याप्रमाणे श्रीमामासाहेबांनी आषाढ शु. १४ शके १८९०, मंगळवार दि.९ जुलै, १९६८ रोजी, वयाच्या ७२व्या वर्षी देह ठेवला आणि श्रीमामासाहेब हे स्वरूपाकार झाले. त्यांच्या अंतयात्रेला हजारो लोक जमले होते. दुतर्फा गर्दी झाली होती. तेव्हा प्रचंड पाऊस पडत असूनही कोणीही जागचे हालले नाही. शेवटी त्यांचेवर आळंदी येथे श्रीजोगमहाराजांच्या समाधीसमोरील मैदानात अंत्यसंस्कार करण्यात आले. नंतर त्या जागी त्यांची समाधी स्थापन केली आहे. अशा या महान संतशिरोमणीला कोटी कोटी प्रणाम!

***

# श्रीरामरावमहाराज फडणीस - तिकोटेकर

**निर्याण**
**आषाढ व.०४ शके १८७२**
**(संकष्टी चतुर्थी) इ.स.१९५०**

विजापूर (सध्याचे विजयपूर) जिल्ह्यात तिकोटे नावाचे एक गाव आहे. या गावी श्री. कृष्णाजी फडणीस या नावाचे पुण्यवंत व धार्मिक वृत्तीचे गृहस्थ रहात होते. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. राधाबाई. या दांपत्याच्या पोटी एक पुत्र जन्माला आला. त्या मुलाचे नांव रामराव असे ठेवणेत आले. हा रामराव म्हणजेच आमचे श्रीरामरावमहाराज फडणीस तिकोटेकर. या श्रीरामरावमहाराजांचे मूळ आडनाव फडणीस आहे. पण ते तिकोटे गावी रहाणारे, म्हणून ते श्रीरामरावमहाराज तिकोटेकर या नावे प्रसिद्ध झाले.

श्रीरामरावमहाराज यांचा लहानपणापासून जप, अनुष्ठान करणे, गायत्रीचा जप करणे, गोसेवा करणे इ. नित्यक्रम होता. त्यांनी ऐन तारुण्य बहारात असताना ब्रह्मचारी रहाणेबाबत भीष्मप्रतिज्ञा केली आणि तसे ते शेवटपर्यंत राहिले. लहानपणी श्रीरामरावमहाराज हे विजापूर येथील श्रीरुक्मांगदमहाराज पंडित यांच्या समाधीची पूजा करीत असत. एकदा श्रीभाऊसाहेबमहाराज तिकडे गेले असताना त्यांनी श्रीरामरावमहाराजांना अत्यंत मनोभावे पूजा करीत असलेचे पाहिले. पूजा झाल्यावर श्रीरामरावमहाराज मंदिरातून बाहेर आले. श्रीभाऊसाहेबमहाराज त्यांना म्हणतात, 'तू पुण्यवान आहेस. तू किती उत्तम पूजा करतोस!', असे म्हणून श्रीभाऊसाहेबमहाराजांनी श्रीरामरावमहाराजांना नमस्कार केला आणि 'माझ्या डोक्यावर हात ठेव' असे म्हणाले. श्रीरामरावमहाराजांनी लगेच श्रीभाऊसाहेबमहाराजांच्या डोक्यावर हात ठेवला. ही त्यांची निरागसता पाहून त्यांनी त्याची घरची चौकशी केली. तेव्हा त्यांना, यांची घरची परिस्थिती गरिबीची असून या पूजेवर त्यांचा उदरनिर्वाह चालतो हे कळले. तेव्हा श्रीभाऊसाहेबमहाराजांनी त्यांना ''माझ्या बरोबर येतोस का?'' असे विचारले. यांनी लगेचच होकार दिला. हे श्रीभाऊसाहेबमहाराजंबरोबर राहू लागले. श्रीभाऊसाहेबमहाराज हे गावोगावी सप्ताह करणेसाठी जात. त्यांचेबरोबर ते श्रीरामरावमहाराजांनाही नेत असत. गावातील लोक त्यांना 'रामभाऊ मुत्या' म्हणत.

श्रीभाऊसाहेबमहाराजांचा सर्व स्वयंपाक श्रीरामरावमहाराज करीत. त्यामुळे महाराज त्यांना प्रेमाने ''मातोश्री'' म्हणत. 'नेमाची (साधनाची) काळजी तू करू नकोस. मी तुझा नेम करतो' असे श्रीभाऊसाहेबमहाराज त्यांना म्हणत. अशी सेवा बघून श्रीभाऊसाहेबमहाराजांनी त्यांना अनुग्रह दिला. श्रीभाऊसाहेबमहाराजांचा मधला मुलगा श्रीरामराव हे काही कारणानी निवर्तले आणि ते गेल्यावर हे श्रीरामरावमहाराज त्यांच्या आश्रयाला आले, तेव्हा महाराज म्हणाले, 'तो राम रामामागे गेला आणि हा रामराव आला'. श्रीरामरावमहाराज हे महाराजांचे पुत्रच होते.

श्रीभाऊसाहेबमहाराजांचे, ''अकरा मारुती'' होते. अकरा मारुती म्हणजे ११ निष्ठावान सत्शिष्य होते. त्यांच्याकडून महाराजांनी भक्तीप्रसारासाठी तन-मन-धन वेचणेची प्रतिज्ञा घेतली होती. या अकरा मारुतींना महाराजांनी गणवेश, हातात सोन्याचे कडे व दंडात मारुतीची पेटी दिली होती.

श्रीरामरावमहाराज हे सकाळी स्नान-संध्या झाली की नेमाला बसत. त्यावेळी त्यांचे मौन असे, म्हणून त्यांना काही लोक ''मौनी आजोबा'' म्हणत. त्रिकाळ भजन, त्रिकाळ नेम, त्रिकाळ दासबोध वाचन व बारा अभंगांचे पठण हे नित्यनेमाने करीत असत. श्रीरामरावमहाराज हे बरेच ठिकाणी दासबोधावर प्रवचने करीत असत. त्यानंतर श्रीरामरावमहाराज हे अनुग्रह देऊ लागले.

त्यांच्या शिष्यांपैकी सौ. लक्ष्मीबाई वेलणकर व सौ. गोडबोले अक्का या दोघीजणी सांगली येथे रहात होत्या. त्यामुळे त्यांना वरचेवर श्रीरामरावमहाराजांच्या दर्शनासाठी जाता येत नसे. या दोघींना स्वप्न दृष्टांत झाला आणि स्वप्नात श्रीरामरावमहाराज तिकोटेकर आले. त्यांनी सांगितले की, 'तू सांगली येथील श्रीबापूराव केळकरमहाराजांच्या दर्शनाला जात जा. त्यांचे दर्शन घेतले की माझे दर्शन घेतल्याप्रमाणेच आहे. ते आणि मी एकच आहोत.' या स्वप्नदृष्टांतानुसार या दोघी आमचे घरी नित्यनेमाने दर्शनास येऊ लागल्या.

श्रीगुरूदेव रानडेसाहेब हे श्रीरामरावमहाराजांना ''प्राज्ञिक'' म्हणून संबोधित असत. श्रीभाऊसाहेबमहाराजांनी देह ठेवल्यानंतर, श्रीगुरुदेव रानडेसाहेब श्रीरामरावमहाराजांना निंबाळ येथे वसती करा, असे सतत सांगत होते. पण ते तेथे क्वचितच राहिले.

श्रीरामरावमहाराजांनी देह ठेवण्याचे ठरविले. ते सोलापूरला आले. सोलापुरात त्यांची शिष्यमंडळी भरपूर होती. सोलापूर येथील हाजीभाई चौकातील विठ्ठल मंदिरात ते राहिले. तेथे त्यांनी आपल्या शिष्यांना बोलावले आणि 'आजपासून आठवे दिवशी आपण जाणार', असे त्यांना सांगून टाकले. त्याप्रमाणे त्यांनी आठवे दिवशी म्हणजे विकृतीनाम संवत्सर आषाढ व. ४ (संकष्टी चतुर्थी) शके १८७२ म्हणजे इ.स. १९५० रोजी दुपारी ४ वाजता महाप्रयाण केले आणि श्रीभाऊसाहेबमहाराजांच्या स्वरूपात विलीन झाले.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीरामरावमहाराज तिकोटेकर यांची आरती**

आरती रामरावा । धन्य महानुभावा ।
साधनावरी भक्ती । जय जय मौनीबाबा[१] ।।ध्रु।।
थोर तुम्ही ब्रह्मचारी । लक्ष गुरूसेवेवरी ।
गुरूभक्ती काय वानू । घडली हनुमंतापरी ।।१।।
अखंड मौन तुमचे । लोक म्हणती साधु प्रेमे ।
परमार्थ सदैव हा । वंदियले **दासरामे** ।।२।।

# संत श्रीसावता माळी

**जन्म**
**इ.स.१२५०**

**निर्याण**
**आषाढ व.१४ शके १२१७**
**दि.२५.०७.१२९५**

संत सावता माळी हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रभावळीतले ज्येष्ठ संत होते. संत सावता माळी यांचा जन्म इ.स.१२५० साली झाला. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अरण हे सावता माळींचे गाव होते. दैवू माळी हे सावता माळींचे आजोबा होते. ते पंढरीचे वारकरी होते. त्यांना दोन मुले होती. पुरसोबा आणि डोंगरोबा. यातील पुरसोबा हे धार्मिक वृत्तीचे होते. शेतीचा व्यवसाय करून ते भगवंताची सेवा करीत असत. या पुरसोबांच्या पोटी सावतोबांचा जन्म झाला. या घराण्याचे मूळ गाव मिरज संस्थानामधील औसे होय. पण सावता माळींचे आजोबा श्री. दैवू माळी हे अरण या गावी स्थायिक झाले.

सावता माळींचा विवाह जनाई या नावाच्या मुलीशी झाला. या दांपत्यानी उत्तम संसार केला. या दांपत्याला विठ्ठल आणि नागाताई अशी दोन अपत्ये झाली.

सावता माळींना लहानपणापासूनच विठ्ठलभक्तीमध्ये रस होता. फुले, फळे, भाज्या आदि पिके काढण्याचा त्यांचा पारंपारिक व्यवसाय होता. पिकाला पाणी देत असताना, खुरपताना मुखाने अखंड हरिनाम घेत असत. पिकांची मशागत करावी, गाई गुरांना प्रेमाने सांभाळावे, चांगले भरघोस पिक काढावे, आडलेल्यांना मदत करावी, हीच खरी पांडुरंगाची भक्ती आहे अशी त्यांची मनाची धारणा होती. ते शेतीमधे रमत असत. त्यामुळे ते शेती सोडून कुठेच गेले नाहीत, पंढरपुरलासुद्धा गेले नाहीत.

एक दिवस पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांची दिंडी त्यांच्या शेताजवळच्या रस्त्यावरून चालली होती. सावता माळी यांना टाळ, पखवाजाचा आवाज आला, म्हणून ते शेतातून बाहेर आले. सगळ्या वारकऱ्यांना आपल्या शेतात बोलावले. त्यांची प्रसादाची व्यवस्था केली आणि त्या वारकऱ्यांची पूजा केली. वारकरी निघाले म्हटल्यावर त्यांनी त्यांच्या पायावर डोके टेकवले आणि वारकऱ्यांना म्हणाले, 'पंढरपूरला निघाला आहात, पांडुरंगाला माझाही नमस्कार सांगा.' हे वाक्य ऐकून वारकरी चकित झाले. त्यांना वाटले की, अरण हे गाव तर पंढरपूरच्या वाटेवर आहे, जवळ आहे. मग ते आमच्या बरोबर पंढरपूरला कां येत नाहीत? ही शंका त्यांना सावता माळींसमोर प्रगट केली. तेव्हा सावता माळी म्हणाले, 'मी कसा येऊ? मी आलो तर देव माझ्यावर रुसेल, मला रागावेल.' हे ऐकल्यावर वारकरी म्हणाले, देव कां रागवेल? तेव्हा सावता माळी म्हणाले, 'अहो पांडुरंग माझ्या या शेतातच राहतो. शेतात -मळ्यात राबणे, भाजीपाला पिकवणे, येणाऱ्या जाणाऱ्यांना अन्न पाणी देणे हीच माझी विठ्ठलभक्ती आहे. हा मळा हेच माझे पंढरपूर आहे. असे असताना मी पंढरपूरला येऊन काय करू?' हे वाक्य ऐकल्यावर वारकरी खजील झाले. पांडुरंग केवळ मूर्तीत नाही तर आपण जे शुद्धभावाने कर्म करतो त्यातही पांडुरंग आहे. तिथेच पांडुरंगाची भेट होते असा संदेशच सावता माळींनी

त्यांना दिला. म्हणून सावता माळी म्हणतात :-

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ।।१।।**
**लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी ।।२।।**
**मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।३।।**
**सावत्याने केला मळा । विठ्ठल पायी गोविला गळा ।।४।।**

श्रीनामदेवमहाराजांना अहंकार झाला होता, की मीच खरा पांडुरंगाचा भक्त आहे आणि मीच एकटा भगवंताचा लाडका आहे. हा अहंकार काढून घेण्याकरिता भगवंतांनी एक युक्ती काढली. पांडुरंग परमात्मा म्हणाला, 'नाम्या मी पळून जातो आणि तू मला हुडकून दाखव' असे म्हणून भगवान पळून गेले. श्रीनामदेवमहाराजांच्या बरोबर श्रीज्ञानेश्वरमहाराज होते. भगवंताने काय केले? तर वाटेत जाताना माळा, फुले अशा खुणा टाकत गेले. त्यायोगे श्रीनामदेवमहाराज त्यानुसार मागे येतील.

याप्रमाणे भगवान सावतोबांच्या मळ्यात थांबले. सावतोबांना भगवंताने मिठी मारली आणि म्हणाले, 'सावतोबा माझ्या मागे दोन चोर लागले आहेत, पटकन तू मला कोठेतरी लपव.' हे ऐकून सावतोबा म्हणाले, 'भगवंता अशी कोणती जागा आहे, जेथे तू कुणाला दिसणार नाहीस?' तेव्हा भगवान म्हणाले, 'सावतोबा तू मला तुझ्या उदरात लपव.' याप्रमाणे सावतोबांनी खुरप्याने आपले पोट फाडले आणि त्यात भगवंताला लपविले.

इकडे भगवंतांचा शोध घेत घेत नामदेवमहाराज व ज्ञानेश्वरमहाराज मळ्यात आले आणि म्हणाले, 'आमचा देव पाहिला कां हो तुम्ही?' नामदेवमहाराजांना भगवंताचा विरह सहन होईना. ते रडू लागले आणि भगवंताला म्हणू लागले, की भगवंता तू मला सोडून कां गेलास?

नामदेवमहाराजांचे रडणे बघून सावता माळींनी त्यांना जवळ घेतले. मुखावरून हात फिरवला आणि विचारले, 'नाम्या कां रडतोस? तुला काय झाले ते मला सांग.' तेव्हा नामदेवमहाराज म्हणाले, 'देव मला सोडून पळून गेले आहेत. माझे काय चुकले म्हणून देव मला सोडून गेले' असे म्हणत नामदेवमहाराजांनी सावतोबांच्या पायाला मिठी मारली आणि म्हणाले, 'सावतोबा तुम्ही मला त्याची भेट घडवून द्या.'

श्रीनामदेवमहाराजांचा अहंकार गेला याची जाणीव सावतोबांना झाली आणि त्यांनी नामदेवमहाराजांना अक्षरशः पोटाशी धरले. यावेळी त्यांना सावतोबांच्या पोटातून भगवंताचा शेला बाहेर आलेला दिसला. श्रीनामदेवमहाराजांनी ओळखले आणि भगवान सावतोबांच्या पोटातून बाहेर आले. श्रीनामदेवमहाराजांनी भगवंताला कडकडून मिठी मारली.

श्रीसावता माळींनी देह ठेवायचे ठरविले. अंगात ताप आला होता.

**उठोनी प्रात:काळी करुनिया स्नान । घालूनी आसन यथाविधी ।।१।।**
**नवज्वरे देह पिडीला अत्यंत । परी मनी आर्त विठोबाचे ।।२।।**
**प्राणायाम करुनी कुंभक साधिला । वायू निरोधिला मूळतत्त्वी ।।३।।**
**शके बाराशे सतरा शालीवाहन शक । मन्मथनाम संवत्सर असे ।।४।।**
**ऋतु ग्रीष्म कृष्ण आषाढ चतुर्दशी । आला उदयासी सहस्रकर ।।५।।**
**सावता पांडुरंग स्वरूपी मिनला । देह समर्पिला ज्याचा त्यासी ।।६।।**

अशा या सावता माळींनी आपल्या मळ्यातच अरव येथे आषाढ वद्य चतुर्दशी शके १२१७ दि.२५ जुलै, १२९५ रोजी देह ठेवला.

आषाढी यात्रा सोहळा झाल्यावर विठ्ठलाची पालखी सावता माळींच्या भेटीला जाते व पुण्यतिथी दिवशी दोघांची अनोखी भेट होते. असा सावता माळींचा अधिकार होता.

सावता माळींचा अत्यंत महत्वाचा अभंग :-

**नामाचिया बळे न भिऊ सर्वथा । कळीकाळाच्या माथा सोटे मारु ।।१।।**
**वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी । विठ्ठल गाऊनी नाचो रंगी ।।२।।**
**सुखाचा सोहळा करुनी दिवाळी । प्रेमे वनमाळी चित्ती धरू ।।३।।**
**सावता म्हणे ऐसा भक्तीमार्ग धरा । तेणे भक्तीद्धारा ओळंगती ।।४।।**

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीसावता माळी यांची आरती**

आरती सावता माळी । गुरुकृपा लाभली ।
साधन साधुनिया । जगी कीर्ती लाभली ।।ध्रु।।
देवाचा मळा केला । ऊस तेथे पिकविला ।
जाई जुई शेवंतीला । बहु बहार आला ।।१।।
ऐसे हे सावताजी । सर्व संतांसी मान्य ।
म्हणून **दासराम** । तयालागी शरण ।।२।।

# प.पू.श्रीदासराममहाराज केळकर

जन्म
श्रावण व. ६ शके १८४२
दि.०६.०८.१९२०

निर्याण
श्रावण शु. ६ शके १९२३
दि.२५.०७.२००१

श्री. गंगाधरपंत केळकर हे आचरे, ता. मालवण जि.सिंधुदुर्ग येथील रहाणारे होते. वयाच्या १५व्या वर्षी ते पायी प्रवास करत कोल्हापूर मार्गे सांगलीला आले. या श्रीगंगाधरपंतांचा 'पार्वती' नामक कन्येशी विवाह झाला. या दांपत्याचे पोटी इ.स. १८६० साली एक पुत्र जन्माला आला. त्याचे 'अनंत' असे नाव ठेवणेत आले. या अनंताला 'नाना' या उपनावाने लोक संबोधू लागले. हे अनंत ऊर्फ नाना म्हणजेच, माझे खापरपणजोबा शिवभक्त श्री. अनंत गंगाधर केळकर होत. यांचा हरीपूर येथील 'यमू फडके' या कन्येशी विवाह झाला. लग्नानंतर यमूचे नाव 'राधा' ठेवणेत आले. यथावकाश या दांपत्याला एक कन्यारत्न झाले. तिचे नांव 'गंगा/ गंगू' असे ठेवणेत आले. परंतू ही गंगू अल्पवयी ठरली.

एकदा श्रीनाना हे सौ.राधाबाईंना, त्या गर्भवती असताना शेतीच्या कामानिमित्त कलखांबला घेऊन गेले होते. तेव्हा सौ. राधाबाईंना सातवा महिना होता. तेथे असतानाच, सौ. राधाबाईंना फाल्गुन शु. दशमी शके १८१० म्हणजेच इ.स. १८८८ साली पुत्ररत्न झाले. एका जुन्या गोठ्यात पडदा लावून प्रसूती झाली. म्हणून या मुलाचे नाव 'गोविंद' ठेवणेत आले. हा 'गोविंद' म्हणजेच आमचे श्रीबापूराव ऊर्फ श्रीमामामहाराज केळकर. आमचे मामा जन्मजात विरक्तच होते. लहानपणापासून त्यांना परमार्थाची आवड होती. आमचे मामांना लहानपणापासून ज्ञानेश्वरमहाराजांचे जबरदस्त आकर्षण होते. २-२ तास ते 'महाराज ज्ञानेश्वर माऊली' हा जप ते दररोज करत असत. श्रीमामामहाराजांचा इंदिरा नामक कन्येशी विवाह झाला. सुरवातीला आमच्या मामांचे पोटी कन्यारत्न झाले. तिचे 'लक्ष्मी' नाव ठेवणेत आले. पण ही लक्ष्मी जास्त काळ भूतलावर राहिली नाही. लवकरच निवर्तली. हा काळ साधारणतः १९१३ सालचा होता.

यानंतर मामा व इंदिरामाता यांना बरेच दिवस अपत्य झाले नाही. ७ वर्षांपर्यंत श्रीमामांना संतती झाली नाही. या कालावधीत आमच्या नानांना फारच चिंता लागून राहिली. शेवटी त्यांना व्रतवैकल्य करावे अशी अंतःस्फूर्ती झाली. त्याप्रमाणे स्वतः ते शंकरभटजी नातू यांचेकडे गेले आणि त्यांना याबाबत विचारले. तेव्हा शंकरभटजींनी आमच्या नानांना '**उपमन्युकृत शिवस्तवाचा पाठ**' करणेस सांगितले. याप्रमाणे आमच्या नानांनी हा शिवस्तवाचा पाठ माघ शु.८ शके १८४१ म्हणजेच इ.स.१९१९ सालापासून सुरू केला. तसेच आमचे नाना स्वतः मामांना व इंदिरामातेला घेऊन श्रीरामेश्वरला जाऊन आले आणि रामेश्वरांनाही त्यांनी पुत्रप्राप्ती व्हावी अशी कळकळीची प्रार्थना केली. या शिवस्तवाचे आणि श्रीरामेश्वरकृपेचे फलीत म्हणजे आमच्या इंदिरामाता या गरोदर राहिल्या. या गरोदर अवस्थेतच त्यांना भ.स.श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला आणि गर्भातच आमच्या दादांचे ठिकाणी नाम हे कोचले गेले.

बाळंतपणासाठी आमच्या इंदिरामाता या कुरूंदवाडला गेल्या. आमच्या इंदिरामातेचे मामा हे औरवाडच्या वजीरबाबांचे भक्त होते. ते त्यांच्या दर्शनाकरिता औरवाडला गेले असता, वजीरबाबांनी या मामांचे हाती एक

खारीक दिली आणि हा खारकेचा प्रसाद तुझ्या भाचीला ग्रहण करायला सांग. 'तिच्या पोटी महान विष्णुभक्त अवतीर्ण होणार आहे,' असा आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे इंदिरामातेनी ती प्रसाद खारीक ग्रहण केली आणि सातव्या महिन्यातच इंदिरामातेच्या पोटी श्रावण व.६, दि.०६.०८.१९२० साली आमचे दादा रात्री २ वा.१० मिनिटांनी या भूतलावर अवतीर्ण झाले.

याच दरम्यान आमचे भ.स.श्रीतात्यासाहेबमहाराज हे कुरुंदवाडला कीर्तनाकरिता आले होते. आमचे नाना त्यांना भेटायला गेले आणि त्यांना म्हणाले, 'महाराज, मला कुरूंदवाडमधे नातू झाला आहे. तुम्ही त्याला बघायला याल का?' महाराज म्हणाले, 'जरूर येतो.'

त्याप्रमाणे महाराज रानडेंच्या घरी आले. दादांना श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या मांडीवर देणेत आले. महाराजांनी दादांच्या अंगावरून/डोक्यावरून हात फिरविला आणि 'हा आमचाच आहे' असे उद्‌गार काढले. 'हा लहानपणापासून कीर्तन करायला लागेल' असा आशीर्वाद दिला आणि स्पर्शद्वारे/नेत्रद्वारे दादांना वयाच्या १४ व्या दिवशी श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह झाला. त्यावेळी जो स्पर्श झाला तो स्पर्श आजही मला जाणवतो असे दादा वयाच्या ७० व्या वर्षीही सांगत. कां तो जाणवत होता? तर तो अस्पर्शाचा (चैतन्याचा-दैवी) स्पर्श होता म्हणून.

महाराजांनी नानांना विचारले, अंताजीपंत, या बाळाचे नांव काय ठेवले आहे? तेव्हा नाना म्हणाजे, महाराज अजून याचे बारसे व्हायचे आहे. तेव्हा तात्यासाहेबमहाराज म्हणाले, 'याचे **राम** हे नाव ठेवा.' याप्रमाणे बारश्यादिवशी दादांना पाळण्यात घालण्यात आले आणि राम हे नाव ठेवणेत आले. हे राम म्हणजेच आमचे 'श्री. रामराय गोविंद केळकर तथा **श्रीदासराममहाराज**' होत. या दासराममहाराजांना लोक प्रेमाने '**दादा**' असे म्हणत असत.

श्रीदादा हे वयाच्या ५ व्या वर्षापासूनच ब्रह्म व माया या विषयावर कीर्तन करु लागले. तसेच साधनही करु लागले. वयाच्या ७ व्या वर्षी त्यांना आत्मयाची काव्यस्फूर्ती होऊन त्यांनी '**गुरूचा पंखा असावा वरती**' हे पद लिहिले. वयाच्या ९ व्या वर्षी अध्यात्मिक गूढ अर्थ स्पष्ट करणारा '**रामदासबोध**' हा १६९ ओव्यांचा ग्रंथ लिहिला. असे त्यांचे जीवन अद्‌भुत घटनांनी भरलेले आहे. त्याचा प्रत्यय पुढेही आपणास लक्षात येईल. लौकिकार्थाने श्रीदादांचे शिक्षण शाळा नं.२ व सिटी हायस्कूलमध्ये झाले. परंतु मुळातच अध्यात्मिक साक्षात्कारी पिंड असल्याने त्यांचे या भूतलावर येणे हेच वेगळ्या कारणासाठी होते. तरी देखील काही वर्षे त्यांनी ट्रेझरी व पुरवठा खात्यात सरकारी नोकरी केली. परंतु तेथे त्यांचे मन रमले नाही. नोकरीमध्ये त्यांची बदली तासगांव येथे झाली. तेथील कामकाज न रुचल्याने त्यांनी त्यागपत्र दिले.

वयाच्या १९व्या वर्षी चिमड संप्रदायाचे मूळपुरूष प.पू.भगवान सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज साक्षात् श्रीदादांचे समोर प्रगट झाले व त्यांनी श्रीदादांना कानडीतून बोध केला. ते पद असे होते 'येनू इल्लदानू याक्क नीन्न नीनू' व हा दिवस होता पौष शु.९ इ.स. १९३९. त्यानंतर त्यापुढेही श्रीदादांना श्रीनिंबरगीकरमहाराजांनी अनेक कानडी पदांतून बोध केला. या पदांमधील काही पदे श्रुत झाली, काही अंतर्यामी स्फुरली व काही प्रकाशरूपाने दिसली. अशा सर्व पदांचा ग्रंथ म्हणजेच '**श्रीगुरूलिंगगीता**' होय. श्रीगुरूलिंगगीता म्हणजे

आजच्या जगातील एक आश्चर्यच म्हणावे लागेल. श्रीगुरूलिंगजंगममहाराज यांनी देह ठेवल्यावर सुमारे ५५ वर्षांनी श्रीदादांसमोर प्रगट होऊन हा मौलिक बोध केला. यावरून श्रीदासराममहाराज हे थोर साधननिष्ठ परमार्थातील अधिकारी होते हे स्पष्ट होते. गुरूलिंगगीतेत अनेक ठिकाणी, श्रीदादांचे साधन पूर्ण झाले आहे, ते शिवरूप आहेत, नाद-बिंदू-कला-ज्योती या साऱ्यांचा त्यांना अनुभव आला आहे, अशा श्रीदादांच्या साक्षात्कारी अवस्थेचे वर्णन आले आहे.

आमच्या श्रीदादांचा विवाह इचलकरंजी येथील गोवंडे कुळातील चि.मालती या कन्येशी इ.स.१९४२ साली झाला. विवाहानंतर त्यांचे नांव 'सीता' असे ठेवणेत आले. यांचाही अधिकार फार मोठा होता. यांना 'सीतावहिनी' असेच सर्वजण संबोधत असत. या दांपत्याचे पोटी चंद्रशेखर, सूर्यकांत, अनल व अनिलप्रभू असे चार सुपुत्र जन्माला आले. वास्तविक त्यावेळची परिस्थिती तशी प्रतिकूल होती. तरी देखील सौ.सीतावहिनींनी आपल्या मुलांचे कोडकौतुक केले. त्याचबरोबर येणाऱ्या सर्व मुलांवर आपल्या मुलांप्रमाणेच प्रेम केले. श्रीरामनिकेतनमधील येणाऱ्या सर्व भक्तांची त्या आपुलकीने चौकशी करीत असत.

श्रीदासराममहाराज यांचा अध्यात्मिक अधिकार उच्च कोटीचा होता. साहजिकच श्रीदादांनी अनेक संतवाङ्मयावर अनेक प्रकारचे लेखन केले. यामध्ये संतचरित्रे, गद्य व पद्य टीका, लेख, आरत्या, श्लोक, अभंग-पदे असे विविध प्रकारचे लेखन समाविष्ट आहे. त्यांच्या काही प्रमुख ग्रंथांची नावे अशी - श्रीदासरामगाथा, चांगदेव पासष्टी टीका, ज्ञानदेव तेहेत्तिशी टीका, अमृतानुभव टीका, ज्ञानेश्वरी सहाव्या अध्यायावरील टीका, श्रीएकनाथमहाराजांच्या वाङ्मयावरील टीका व अर्थ, आनंदानुभव, आरती संग्रह, श्लोक रचना इ. विशेष म्हणजे इतके व्यापक लेखन त्यांनी आपल्या २५व्या वयापर्यंत केले आहे. त्यांची कीर्तने, निरूपणे, प्रवचने ही देखील एक वेगळ्या पद्धतीची वैशिष्ठ्यपूर्ण व उच्च अध्यात्मिक पातळीवरची असत. श्रीगुरूदेव रानडेसाहेब, श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर, श्रीनारायणमहाराज मळणगांवकर, विदेही संत श्रीगुंडुबुवा, श्रीदावीदबाबा अशा अनेक संप्रदायातील अनेक संतांनी श्रीदादांचा अधिकार वेळोवेळी मान्य केला आहे व त्यांचे विषयी गौरवोद्गार काढले आहेत.

श्रीदासराममहाराज यांची अनेक भक्तगण पाद्यपूजा करीत असत. परंतु त्यावेळी ते सर्वांना सांगत की, 'ही पाद्यपूजा दासरामाची नसून श्रीगुरूलिंगजंगममहाराजांची आहे.' तसेच अनुग्रह देतानाही ते आवर्जून सांगत की, 'हा अनुग्रह दासरामाचा नसून श्रीगुरूलिंगजंगममहाराजांचा आहे.'

श्रीमामामहाराजांनी देह ठेवल्यावर, पितृआज्ञेप्रमाणे आपल्या घराण्यातील अखंड नित्यकीर्तनाची परंपरा श्रीदादांनी अत्यंत निष्ठेने चालविली. त्याबरोबरच त्यांची अनेक ठिकाणी कीर्तने, प्रवचने, निरुपणे होत असत. श्रीदादांचा भक्तगण मोठा होता. ते मुळातच विश्वकुटुंबी होते. आमच्या श्रीदादांचा अधिकार जाणून पंचक्रोशीतील अनेक ठिकाणी अनेक भक्त त्यांना प्रवचन, कीर्तन, वीणापूजन, उद्घाटने, मूर्तीस्थापना इ. अध्यात्मिक कार्यक्रमास आवर्जून बोलावित असत. श्रीदादा हे अनेक भक्तांना मार्गदर्शी, आधार देणारे, उर्मी देणारे व अध्यात्म पटवून देणारे असे श्रेष्ठ सद्गुरू होते.

सौ.सीतावहिनींनी फाल्गुन शु. दशमी इ.स. १९८३ साली अचानक देह ठेवला. तरीसुद्धा श्रीदादा

स्थितप्रज्ञ राहिले व त्यांनी वहिनींचे अंत्यसंस्कार झाल्यानंतर घरी येऊन नित्याचे कीर्तन केले. ही कीर्तननिष्ठा अवर्णनीय आहे. श्रीदादांनी केळकर घराण्यातील अखंड कीर्तन परंपरा ३९ वर्षे सांभाळली. श्रीदादांचे नित्यकीर्तन म्हणजे सर्व श्रोत्यांना मोठी पर्वणीच होती. सर्वांनाच श्रीदादांच्या कीर्तनाचे जबरदस्त आकर्षण होते. आमचे श्रीदादा हे सहजयोगी आणि राजयोगीही होते. पण त्यांचा राजयोग, '**जीवा-शिवाचा संयोग । हाचि माझा राजयोग ।।**' अशाप्रकारचा होता. आमच्या कुटुंबातील सर्वांच्या प्रेमाने व भक्तांच्याही प्रेमाने श्रीदादांचे 'साठीशांत' 'एक्काहत्तरी' 'पंचाहत्तरी' व 'सहस्रचंद्रदर्शन' असे सोहळे अत्यंत थाटात पण घरगुती वातावरणात साजरे झाले. प्रत्येक सोहळ्यात एक सात्विकता, पवित्रता व अवर्णनीय आनंद होता. श्रीदादा मात्र या सोहळ्याच्या प्रसंगी आत्मानुसंधानी निमग्नच असलेलेच दिसले. '**हे मजचिस्तव जाहले । परि म्या नाही केले। ऐसे जेणे जाणितले । तो सुटला गा ।।**' अशी त्यांची अलिप्त अवस्था होती.

श्रीदादांनी वयाच्या ८१व्या वर्षी देह ठेवण्याचे ठरविले. परंतु त्याचा कोणासही मागमूस लागून दिला नाही. दिनांक २३ जुलै, २००१ या दिवशी त्यांना अशक्तपणा जाणवू लागला. दोन दिवस त्यांना पित्त वाढल्याने उलट्या होत होत्या. दुसरे दिवशी सायंकाळी नित्यकीर्तनाची वेळ होत आल्यावर, कीर्तन करण्यासाठी मंदिरात न्या असे ते सारखे सांगू लागले. पण अशक्तपणा असलेने त्यांना पडूनच रहावे लागले. परंतु निजलेले असूनसुद्धा श्रीदादा अखंड कीर्तनाच्या अनुसंधानात होते. श्रीअण्णांनी पडवीत त्यांचे कीर्तन वाचून दाखविले. श्रीदादांनी कीर्तनाची आरती घेतली व पडवीत पंचपदी सुरू झाली. इतक्यात श्रीदादांनी एकदम मान वर केली व त्यांची प्रकृती ठीक वाटेना म्हणून ताबडतोब डॉक्टरांना बोलवण्यात आले. डॉक्टर वैद्य व डॉ. परांजपे तपासण्यासाठी आले. डॉक्टरांच्या चेहऱ्यावर निराशा दिसून आली. त्यांना विचारले असता, काही क्षणापूर्वीच सारे संपले आहे असे ते म्हणाले. हृदयक्रिया संथ होत होत बंद पडली, असे डॉक्टरांचे शेवटचे शब्द होते. याचाच अर्थ आमच्या श्रीदासराममहाराजांनी, श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या '**का झाकलिया घटीचा दिवा। नेणिजे काय झाला केव्हा । या रिती जो पांडवा । देह ठेवी ।।**' या उक्तीप्रमाणे कोणासही कळू न देता, श्रावण शुद्ध ६ शके १९२३ म्हणजेच दि.२५ जुलै, २००१ या दिवशी सायंकाळी ७.४० वा. अत्यंत शांतपणे महानिर्याण केले.

'**हातावरी हात मारुती जातो तुका । परि कोणा एका उमगेना ।।**' असेच हे महानिर्याण होते. श्रीदादा हे मरणाच्या पलीकडे गेले होते, हे पुढील गोष्टीवरून लक्षात येईल. श्रीदादांचे कलेवर जवळ जवळ १२ तास दर्शनासाठी श्रीरामनिकेतन येथे ठेवणेत आले होते. तरी त्यांच्या चेहऱ्यावरील तेज तसूभरही कमी झाले नव्हते. सकाळपर्यंत कपाळास घाम येत होता. दुसरे दिवशी म्हणजे दि.२६.०७.२००१ रोजी त्यांची फार मोठी अंत्ययात्रा काढण्यात आली. हजारो भक्तगण यावेळी उपस्थित होते.

***

# प.पू.सद्‌गुरू श्रीनागप्पाण्णामहाराज नीलवाणी

जन्म
शके १८१३ इ.स.१८९१

निर्याण
श्रावण व.०२ शके १८७५
बुधवार दि.२६.८.१९५३

प.पू.सद्‌गुरू श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर यांना श्रीभीमाण्णा नावाचे पुत्र होते. या श्रीभीमाण्णामहाराज व सौ. सिदव्वा या दांपत्याचे पोटी इ.स. १८९१ मध्ये पुत्ररत्न जन्माला आले. या मुलाचे नाव 'नागप्पा' ठेवणेत आले. हे 'नागप्पा' म्हणजेच आमचे प.पू.सद्‌गुरू श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी होत.

श्रीनागाप्पाण्णांना लहानपणापासून देवपूजा करणे, भजन करणे, आरती करणे इ. ची मनापासून आवड होती. त्यांचे शालेय शिक्षण बेताचेच झाले.

श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी इ.स.१९०१ साली प.पू.श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचेकडून अनुग्रह घेतला होता. सद्‌गुरूंनी सांगितल्याप्रमाणे ते त्रिकाळ नेम, भजन करीत असत. श्रीभाऊसाहेबमहाराजांचे बरोबर हे गावोगावी जात. श्रीभाऊसाहेबमहाराज त्यांना दासबोध वाचायला सांगत आणि त्यातील एखाद्या ओवीवर प्रवचन करीत. श्रीनागाप्पाण्णामहाराज हे श्रोतृवर्ग कोणत्या प्रकारचा आहे हे हेरून, त्या श्रोत्यांना आवडेल असा नेमका समास काढून वाचत.

श्रीनागाप्पाण्णामहाराजांचा आवाज फार सुरेल होता. ते वाद्य गायनात निष्णात होते. वाद्य गायनात त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. म्हणून त्यांना श्रीगुरुदेवांच्या नित्यनेमावलीत पंचसमासीमध्ये 'वाद्यगायनी निष्णात गंधर्व ऐसे' असे संबांधिले आहे.

श्रीनागाप्पाण्णामहाराजांना मूळव्याधीचा विकार झाला होता. त्यावर उपाय म्हणून प्रा. गजेंद्रगडकर यांनी त्यांना शीर्षासन करणेस सांगितले. त्याप्रमाणे ते शीर्षासन घालून साधन करू लागले. प्रा. गजेंद्रगडकर यांना बरेच दिवस मूलबाळ होत नव्हते. त्यांनी याबाबत काय करावे यासाठी श्रीनागाप्पाण्णामहाराजांना विचारले. तेव्हा श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी त्यांना 'श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या समाधीपुढे नंदादीप लावा, तुम्हाला मूल होईल' असे सांगितले. याप्रमाणे प्रा. गजेंद्रगडकर यांनी तसे केले असता, त्यांना वर्षाच्या आत मुलगा झाला. श्रीशिवलिंगव्वाक्का यांनी श्रीनागाप्पाण्णामहाराजांना एक उपदेशपर पत्र लिहिले आहे. त्यात त्यांनी जो उपदेश केला आहे, तो त्यांच्याकरता आहेच, पण आपल्यासारख्या साधकांच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. या पत्रकातील आशय 'निंबरगी संप्रदायाच्या इतिहासातील सोनेरी पाने' या पुस्तकात पृष्ठ क्र. ७२-७३ वर आहे. याठिकाणी शब्दमर्यादा असलेने देता आला नाही. पण तो आपण जरूर वाचावा.

श्रीगुरूदेव रानडेसाहेब अलाहाबादहून निंबाळला आले की ते, श्रीनागाप्पाण्णामहाराजांना निंबाळला बोलावून घेत आणि आपला मुक्काम असेपर्यंत ते श्रीनागाप्पाण्णामहाराजांना सोडत नसत. श्रीगुरुदेव रानडेसाहेबांच्या विनंतीवरून श्रीनागाप्पाण्णामहाराज हे अनुग्रह देऊ लागले. 'ही अध्यात्मविद्या तुमचे घरची आहे. तुम्ही अनुग्रह देत चला' असे श्रीगुरुदेव त्यांना वरचेवर म्हणत असत. श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी संप्रदायातील महत्वाचे कागद किंवा वस्तू जीवापाड जतन करून ठेवल्या होत्या. श्रीनिंबरगीकरमहाराजांचे कापूर लावण्याचे पितळी कमळ, चिलीम, चंची इत्यादि जतन करून ठेवलेल्या वस्तू आजही त्यांच्या वंशजांकडे पहावयास मिळतात.

श्रीक्षेत्र चिमड येथे गुरूद्वादशीपासून पांडवपंचमीपर्यंत सप्ताह असतो. या सप्ताहासाठी श्रीनागाप्पाण्णामहाराज येत असत. श्रीनागाप्पाण्णामहाराजांना श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांच्या दहनस्थानावरील  वटवृक्षाजवळ थांबविले जायचे, तेथे त्यांची नारळावर कापूर लावून आरती केली जायची. नंतर त्यांना श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर हे वाजंत्री लाऊन मठात थाटाने आणत असत. या काळात श्रीनारायणमहाराज हे अनुग्रह देत नसत. अनुग्रहासाठी कोण आले तर, ते श्रीनागाप्पाण्णामहाराजांना अनुग्रह द्यायला सांगत. चिमडला पहाटे ३.४५ वाजता काकड आरती असते. या काकडा आरतीचेवेळी श्रीनागाप्पाण्णामहाराज सुरेल आवाजात पदे म्हणत, तेव्हा बाहेर नाग डोलत असायचे.

इ.स.१९३९ साली श्रीनागाप्पाण्णामहाराज चिमडच्या रथोत्सवास आले असता श्रीदासराममहाराज केळकर तेथे गेले होते. श्रीदासराममहाराजांनी श्रीनागाप्पाण्णामहाराजांना काही पारमार्थिक शंका विचारल्या. काही शंकांचे निरसन स्वतः श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी केले, पण उरलेल्या शंकांचे निरसन स्वतः श्रीनिंबरगीकरमहाराज तुम्हाला करतील असे सांगितले. त्यांच्या वचनाप्रमाणे श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीदासराममहाराजांना साक्षात दर्शन देऊन श्रुती-प्रकाश-रुपाने 'श्रीगुरूलिंगगीता' दिली.

श्रीनागाप्पाण्णामहाराज एकदा आमचे श्रीमामामहाराज केळकर यांचे घरी आले होते. दुपारी भोजन वगैरे झाल्यावर श्रीनागाप्पाण्णामहाराज विश्रांती घेत होते. हे बघून श्रीमामामहाराजांनी हातात हातपंखा घेतला आणि त्यांना उकडू नये म्हणून वारा घालू लागले. हे बघितल्यावर श्रीनागाप्पाण्णामहाराज म्हणाले,'अहो बापूराव, हे काय करताय?' तेव्हा श्रीमामामहाराज म्हणाले, 'महाराज, तेवढीच माझे हातून सेवा घडते.' विश्रांतीनंतर जेव्हा श्रीनागाप्पाण्णामहाराज निरोप घेऊन टांग्यात बसले असता घोडे पाय पुढे टाकेना. हे बघून श्रीनागाप्पाण्णामहाराज म्हणाले, 'बापूराव, तुमचे आमच्यावर किती प्रेम आहे बघा, हे घोडे सुद्धा पाय पुढे टाकत नाही.'

श्रीनागाप्पाण्णामहाराजांना श्रीगुरुसिद्धप्पा नावाचे अधिकारी चिरंजीव होते. श्रीगुरुसिद्धप्पामहाराज हे

चार वर्षाचे असताना डोळे मिटून बसत असत. हे बघून एकाने त्यांना विचारले, अरे आम्ही डोळे मिटून बसलो की तूही डोळे मिटून बसतोस. मग तुला काय दिसते? तेव्हा श्रीगुरुसिद्धप्पा म्हणाले, मला प्रकाश दिसतो, चक् चक् होते. हे ऐकून ते गृहस्थ म्हणाले, आम्ही नेम करुन सारा जन्म घालवला, पण आम्हाला काहीसुद्धा दिसत नाही आणि तुला प्रकाश दिसतो. हे ऐकून श्रीनागाप्पाण्णामहाराज म्हणाले, 'गवयाचे पोर रडले तरी सुरातच रडणार, यापैकीच हे आहे.' श्रीगुरुसिद्धप्पामहाराजांना तीन भाऊ व चार बहिणी होत्या.

अशा या श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी श्रावण वद्य २ शके १८७५, बुधवार दि.२६.०८.१९५३ रोजी वयाच्या ६२ व्या वर्षी निंबरगी येथे देह ठेवला.

***

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीनागाप्पाण्णा यांची आरती**

आरती नागाप्पाण्णा । जय तपोनिधाना ।
दिगंत कीर्ती तुझी । जय जया साधना ।।ध्रु।।
साधन बहु केले । तेणे झाला विख्यात ।
भाऊसाहेबे कृपा केली । जगी झाला विख्यात ।।१।।
गुरुलिंगरूप तुम्ही । तुम्ही आमुचे स्वामी ।
**दासराम** शरण आला । मन रमले नामी ।।२।।

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीनागाप्पाण्णा यांचा निर्याणाचा अभंग**

शालिवाहन शके अठराशे पंचाहत्तर । विजयनाम संवत्सर दक्षिणायन ।।१।।
नागाप्पाण्णामहाराजांनी ठेवियेला देह । श्रावण वद्य द्वितीये बुधवारी ।।२।।
दिवसा प्रथम प्रहरी तृतीय तासी निर्याय । नारायणी तल्लीन ऐक्य झाले ।।३।।
ऐक्य सहज साधने दिवस गोड झाला । भक्तजना दिधला सिद्धानंद ।।४।।
गुरूलिंगगीता स्वरूपी मिळाले । कीर्तीरुपे उरले दासापाशी ।।५।।

# प.पू.श्रीबाबामहाराज ऊर्फ रावसाहेब सहस्रबुद्धे

जन्म
कार्तिक शु.१५ शके १८०५
(त्रिपुरी पौर्णिमा) दि.१४.११.१८८३

निर्याण
श्रावण व.०४ शके १८७६
इ.स.१९५४

श्री. नारायण विठ्ठल सहस्रबुद्धे हे इचलकरंजी संस्थानात नोकारीस होते. त्यानंतर ते कुरूंदवाड जि. कोल्हापूर येथे रहावयास आले. नंतर ते अभियांत्रिकी खात्यात ओव्हरसियर होते. नोकरी निमित्त ते कोकणातून हुबळीस गेले. हुबळीस असताना कार्तिक शु. १५ (त्रिपुरी पौर्णिमा) शके १८०५ दि.१४.११.१८८३ रोजी त्यांना पुत्ररत्न झाले. बारशादिवशी या मुलाचे नाव 'रामचंद्र' ठेवणेत आले. हे रामचंद्र म्हणजेच आमचे 'श्रीबाबामहाराज ऊर्फ रावसाहेब सहस्रबुद्धे' होत.

श्रीबाबामहाराजांचे वयाच्या ५ वर्षापर्यंत कानडीमध्ये शिक्षण झाले आणि त्यानंतर त्यांचे पुणे, कोल्हापूर, कुरुंदवाड येथे पुढील शिक्षण मराठीत झाले. इ.स.१८९८ साली ते मॅट्रिक झाले. त्यानंतर त्यांनी विल्सन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व तेथे त्यांनी एल.सी.ई. ही इंजिनिअरिंग मधील पदवी प्राप्त केली. श्रीबाबामहाराजांचे ज्येष्ठ बंधू श्रीकृष्णराव यांनी श्रीरावसाहेबमहाराजांचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरी करून, ते इ.स.१९२८ साली निवृत्त झाले.

इ.स.१९०४ साली त्यांच्या मातोश्री सौ. लक्ष्मीबाई यांना देवाज्ञा झाली. मातृछत्र हरपले. अशा उदास अवस्थेत ते श्रीरामचंद्रमहाराज बीडकर यांचेकडे आकर्षित झाले. श्रीरावसाहेबांनी लग्न करावे म्हणून घरच्या मंडळींनी श्रीबीडकरमहाराजांकडे आग्रह धरला. केवळ गुर्वाज्ञा म्हणून इ.स.१९१० साली पुण्याजवळील जुन्नरचे बोडस यांची कन्या 'दुर्गाताई' यांचेशी त्यांनी विवाह केला. विवाहानंतर त्यांचे नाव 'सीताबाई' असे ठेवले. पण संसारात त्यांची संपूर्ण विरक्ती होती.

इ.स.१९११ साली श्रीरामानंदमहाराज बीडकर यांनी श्रीबाबामहाराजांच्या डोक्यावर हात ठेऊन त्यांना अनुग्रह दिला व म्हणाले, 'मी तुला पर्मनंट (कायम) केले आहे.' अनुग्रहानंतर श्रीबाबामहाराजांची विचारांची दिशाच बदलली. ते विदेही अवस्थेतच राहू लागले. यानंतर श्रीबाबामहाराजांनी खडतर साधना केली. साधनाकाळातली त्यांची अवस्था पाहून लोक त्यांना वेडे समजू लागले आणि लोकांनी चक्क त्यांना वेड्याच्या इस्पितळात दाखल केले. तेथे सुमारे १ वर्ष इस्पितळात काळ कंठल्यावर ते दि.२३.०३.१९२७ रोजी घरी आले. आपल्या विदेही अवस्थेतील पतीची सौ. सीताबाई यांनी खडतर सेवा केली. इ.स.१९२५ साली श्रीबाबामहाराजांना एक कन्या झाली होती. तिचे नाव 'शकुंतला'. या मुलीचा विवाह इ.स.१९४१ साली श्री.नीळकंठ श्रीधर खरे यांचेशी झाला.

श्रीबाबामहाराज यांच्या पत्नी सौ. सीताबाई यांना दि.२७.०७.१९४४ रोजी देवाज्ञा झाली. श्रीबाबामहाराजांचा प्रपंच इथेच संपला. श्रीबाबामहाराजांना तीर्थयात्रा करण्याची भारी आवड होती. आपले शिष्य आणि पत्नी सौ. सीताबाई यांचेसमवेत त्यांनी अनेक तीर्थयात्रा केल्या. श्री.नाना जोगळेकर हे श्रीबाबामहाराजांच्या दर्शनाला गेले होते. श्री. नाना जोगळेकर हे सांगली येथील श्रीमामामहाराज केळकर यांचे शिष्य होते. श्री. जोगळेकरांनी श्रीबाबामहाराजांचे दर्शन घेताच ते त्यांना म्हणाले, 'ज्यांचे तुम्ही पाय धरले आहेत, ते तुम्ही शेवटपर्यंत सोडू नका'.

श्रीबाबामहाराजांनी प्रकृतीची पर्वा न करता ध्यानधारणा व उपासना चालूच ठेवली. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत केवळ उघड्या डोळ्यांनी सूर्याकडे एकटक पहाण्याची उपासना (त्राटक) त्यांनी सलग २१ दिवस केली. आपले सर्व आयुष्य त्यांनी श्रीबीडकरमहाराजांचे चरणी अर्पण केले. ते आलेल्या भक्तांना सांगत की, 'आकाशाकडे पहा, ताऱ्यांकडे पहा, साधनेत रत रहा. जोपर्यंत दृष्टी आहे, तोपर्यंत ध्यानमग्न रहा. मला पुनश्च सत्ययुग आणायचे आहे.' श्रीबाबामहाराज म्हणायचे, 'मी श्रीबीडकरमहाराजांचा प्रसादी भक्त आहे. मला अज्ञानाने घेरले आहे. मला सर्व काही शिकायचे आहे. गुरू मिळतील, पण श्रीबीडकरमहाराजांसारखा सद्‌गुरू मिळणे विरळा.' तर 'श्रीरावसाहेबमहाराज माझा मोतीदाणा आहे' असे म्हणून, श्रीबीडकरमहाराज श्रीबाबामहाराज ऊर्फ श्रीरावसाहेबांचे कौतुक करत असत. श्रीबाबामहाराजांना मूळव्याधीची व्याधी होती. एक दिवस त्यांचे धोतर रक्ताने माखले होते. हे बघून एका शिष्याने, 'रक्त कोठून आले?' असा प्रश्न केला. तेव्हा श्रीबाबामहाराज म्हणाले, 'त्या रक्तालाच विचारुन पहा.'

श्रीबाबामहाराजांनी इ.स.१९५३ साली प.पू.श्रीविठ्ठल गणेश जोशी तथा श्रीदिगंबरदासमहाराज यांना अनुग्रह दिला. त्यांनाच श्रीबाबामहाराजांनी आपल्या संप्रदायाची धुरा सांभाळणेस सांगितले.

श्रीबाबामहाराजांना अयोध्येमध्ये शरयू नदीत जलसमाधी घेण्याची इच्छा होती. त्यासाठी शिष्यांना घेऊन ते अयोध्येस गेले. पण शरयूनदीत सर्वत्र केवळ गुडघाभर पाणी होते. हे पाहून ते म्हणाले, 'आपणाला इथे स्थान दिसत नाही. चला पुण्यालाच परत जाऊ.' पुण्याला परतल्यावर त्यांनी सुमारे वर्षभरांनी म्हणजेच श्रावण व.४ शके १८७६ इ.स.१९५४ साली वयाच्या ७१ व्या वर्षी, गुरूस्मरण करीत आपला देह ईश्वरचरणी समर्पित केला.

***

# प.पू.श्रीजनीजनार्दनमहाराज

जन्म
श्रावण शु.सप्तमीयुक्त गोकुळाष्टमी
शके १४४०, इ.स.१५१८

निर्याण
श्रावण व.०८ शके १५२३
इ.स.१६०१

श्री. वसुदेवपंत या नावाचे गृहस्थ भूम जि. उस्मानाबाद (धाराशिव) या गावी रहात होते. हे श्री. वसुदेवपंत विजापूर येथे अली आदिलशहाच्या दरबारी कमाविसदार म्हणून नोकरीला होते. या श्री. वसुदेवपंतांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचे नांव श्री. जनाबाई होते. त्यांचे पोटी सप्तमीयुक्त गोकुळाष्टमी या दिवशी, अंदाजे शके १४४० म्हणजेच इ.स. १५१८ मध्ये पुत्ररत्न जन्माला आले. बारशादिवशी या मुलाचे नाव जनार्दन असे ठेवणेत आले. हा जनार्दन म्हणजेच आपले संत 'श्रीजनीजनार्दन' होत.

श्री. जनार्दनांचे शिक्षण पूर्ण होताच त्यांचे वडील श्री. वसुदेवपंत यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर बादशहाने वडिलांच्या जागेवरच कमाविसदार म्हणून श्री. जनार्दन यांची नेमणूक केली. पुढे बिदर येथे मोठा दुष्काळ पडला, तेव्हा बादशहाने श्रीजनीजनार्दनांची बिदर येथे अन्नमंत्री म्हणून नेमणूक करुन धान्य कोठाराचा ताबा दिला. दुष्काळामुळे या गावातील जनता अन्नावाचून उपाशी राहू लागली आणि हे दृश्य बघून श्रीजनार्दनांना अतीव दुःख झाले. जनतेची अवस्था त्यांना बघवेना. शेवटी त्यांनी बादशहाच्या परवानगीची वाट न पहाता, सगळी धान्याची कोठारे जनतेकरिता खुली केली. सर्व जनतेने ती कोठारे लुटली आणि ही बातमी बादशहाला कळली. बादशहाने ताबडतोब जनार्दनपंतांना दरबारात हजर राहणेचा आदेश दिला आणि या केलेल्या कृत्याबद्दल त्याने जनार्दनपंतांना हत्तीच्या पायाखाली तुडवून ठार मारणेची शिक्षा फर्मावली. शिक्षा ऐकून तेथील उपस्थित लोक चकित झाले आणि तेथे अनेक लोक जमा झाले. शिक्षा देतेवेळी अनेकांचे श्वास थांबले. सगळे लोक भगवंताचा धावा करु लागले. हत्ती आला. त्याचे समोर श्री. जनार्दनपंतांना उभे केले. पण हत्तीची आणि जनार्दपंतांची दृष्टादृष्ट झाली मात्र, हत्तीने या जनार्दनपंतांना तुडवले तर नाहीच, पण सोंडेत धरले आणि सरळ माहुताच्या समोर बसवले. हत्तीकडे अतिंद्रिय शक्ती असते, त्यामुळे समोरच्या व्यक्तीची वृत्ती तो ओळखू शकतो. हत्तीने जनार्दनपंतांना पायाखाली न तुडवता माहुतासमोर बसवलेले पाहून, बादशहा शरण आला. त्याने हात जोडले आणि जनार्दनपंतांची माफी मागितली व पूर्वीप्रमाणे आपण आपली अन्नमंत्री म्हणून नोकरी करावी असेही तो म्हणाला. हे ऐकून श्रीजनार्दनपंत म्हणाले, 'राजा, झाली तेवढी नोकरी पुरी झाली.' त्यांनी नोकरीचा त्याग केला आणि आत्मशोधाकरिता बाहेर पडल. तेथून ते पंढरपूरला आले. विठ्ठलाचे दर्शन घेतले. श्रीजनार्दनांच्या स्वप्नामधे विठ्ठल आले आणि त्यांनी आदेश दिला की, 'गंगामसला या बीड जिल्ह्यातील गावामध्ये गणेशाचे मंदिर आहे, तेथे तू जा.' याप्रमाणे ते पंढरपूरहून मजल दरमजल करत गंगामसल्याला आले. तेथे गोदावरी नदी वाहते. तेथे गणेशाचे मंदिर पाहून १२ वर्षे तपश्चर्या केली. गणेशाची

उपासना चालू केली. १२ वर्षे झाल्यानंतर लाल रंगाच्या स्वरूपात श्रीगणेश साक्षात् प्रगट झाले आणि त्यांनी, 'बाळा जवळ ये,' असे म्हणत जनीजनार्दनांना जवळ घेतले आणि साक्षात् गणेशांनी कानामधे मंत्र दिला व वर्णदीक्षा, वेधदीक्षा आणि कलादीक्षा या तीन दीक्षा दिल्या. यानंतर सांगितले की, 'तू येथून पुढे बीडला जा. गाणपत्य संप्रदायाचा प्रसार कर.' या आदेशाप्रमाणे श्रीजनार्दनपंत हे बीडला आले. त्यानंतर तेथून फिरत फिरत ते काशीला गेले आणि तेथे त्यांनी संन्यास घेतला व परत बीडला आहे. बीडमध्ये आल्यावर श्री. नारोजी सिद्धोजी देशमुख यांनी त्यांना दर्ग्यामधे पाहिले आणि त्यांना गावात आणले. त्यांच्या बागबगीच्यामध्ये श्रीजनार्दनपंतांची राहणेची व्यवस्था केली. या जागेलाच पाटांगण म्हणतात. श्रीजनार्दनपंतांनी आपली पत्नी, मुलगा नारायण व मुलीलाही बीडला आणले. मुलीचा विवाह करुन दिला. यानंतर मुलगा नारायण याचाही विवाह झाला. त्याच्या पत्नीचे नांव पद्मावती ठेवणेत आले.

जनार्दनपंत हे नाथपंथीय होते. आदिनाथ-कंठडीनाथ - धुंडीनाथ -जनार्दनपंत अशी ही परंपरा आहे. येथे आल्यावर त्यांचे अनेक शिष्य झाले. यात एकनाथ नावाचे एक शिष्य होते. जनार्दनपंतांचा मुलगा श्रीनारायण यांनीही संन्यास घेतला आणि ते तीर्थयात्रेला बाहेर पडले आणि तिकडेच त्यांना देवाज्ञा झाली. हे ऐकून मात्र श्रीजनार्दनपंतांना अत्यंत वाईट वाटले. लोकांनी यावेळी त्यांना विचारले की, 'काय हो जनार्दनपंत, तुम्हाला पुत्र विरहाने दुःख नाही का झाले?' हे ऐकून जनार्दनपंत म्हणाले, 'तुम्ही अक्षता डोक्यावर टाकून बघा.' त्याप्रमाणे अक्षता डोक्यावर टाकताच त्यांच्या लाह्या झाल्या. योगसामर्थ्याने दुःख पचवायची ताकद कशी असते हे त्यांनी यावेळी दाखवून दिले. श्रीनारायणस्वामींनी देह ठेवलेचे ऐकल्यावर त्यांची पत्नी सौ. पद्मावती यांनी विहिरीत उडी मारुन आपली जीवनयात्रा संपविली, म्हणून या विहिरीला 'पद्मावतीतीर्थ' म्हणतात.

जनीजनार्दन हे १५ व्या शतकातील बहिमनी काळातील संत होते. हाच काळ श्रीएकनाथमहाराजांचा होता. जसे 'ज्ञानेश्वर पंचायतन', 'नाथपंचायतन', 'समर्थ पंचायतन' आहे, तसे त्या काळात 'संत पंचायतन' होते. यामध्ये रामाजनार्दन, जनीजनार्दन, एकनाथमहाराज, विठोरेणुकानंदन, दासोपंत असे हे 'संतपंचायतन' होते.

शांतीब्रह्म श्रीएकनाथमहाराज हे एक दिवस श्रीजनार्दनपंतांना भेटायला आले. त्यावेळी श्रीजनार्दनपंतांना चौधारी थंडी यायची. म्हणजे दर चार दिवसाला थंडी यायची. त्यामुळे ते झोपून होते. त्यांना कळले की श्रीएकनाथमहाराज हे आपल्या भेटीला आले आहेत. पण झोपून असलेने आपण त्यांना भेटू शकणार नाही. या विचाराने त्यांनी थंडीला गोधडीमधे बसायला सांगितले. याप्रमाणे थंडी गोधडीत बसली आणि गोधडी उडायला लागली. हे नाथमहाराजांनी बघितले आणि विचारले, 'जनार्दनपंत ही गोधडी कशी काय उडती आहे?' तेव्हा जनार्दनपंत म्हणाले, 'थंडीला गोधडीत ठेवलेने, ती उडती आहे.' हे बघून नाथमहाराजांनाही

आश्चर्य वाटले. ही गोधडी आजही तेथे आहे. पुण्यतिथी दिवशी या गोधडीची पूजा केली जाते.

जनीजनार्दनांचे अनेक शिष्य झाले. त्यांचा शिष्य परिवार कर्नाटकात, अगदी कुंभकोण नगरीपर्यंत जाऊन पोहोचला आहे.

जनीजनार्दनांनी 'चौरीक लीला' हा ८० ओव्यांचा ग्रंथ लिहिला. याचबरोबर ११ व्या स्कंधावर आधारित ७१६ ओव्यांचा 'निर्विकल्प' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ तत्त्वज्ञानात्मक आहे. यानंतर त्यांनी 'जानकी स्वयंवर' हा ग्रंथ लिहिला. तसेच काही पदेही लिहिली.

जनीजनार्दनांचे बाबत श्रीमोरोपंत आपल्या सन्मविमाला या प्रकरणात म्हणतात, '**ज्याते जनी जनार्दन ऐसे बहु साधु जाणते म्हणती । त्या कारणे असोत श्रीकृष्णाकारणे जशा प्रणती** ।।१।।

असे हे जनीजनार्दनमहाराज शेवटी आपल्या आजोळी म्हणजे भूम या गावी गेले. आपली मुले, शिष्य, नातू यांचे उपस्थितीत, त्यांनी श्रावण व. अष्टमी (गोकुळाष्टमी दिवशी) शके १५२३, इ.स. १६०१ साली संजीवन समाधी घेतली.

***

# प.पू. सद्‌गुरू श्रीकृष्णसरस्वती दत्तमहाराज (कुंभारस्वामी)

जन्म
माघ व. ५ शके १७५७
दि.०७.०२.१८३५

निर्याण
श्रावण व. १०, शके १८२२
दि.२०.०८.१९००

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात नांदणी हे गाव आहे. या नांदणी गावात अप्पा भट नावाचे सदाचारी ऋग्वेदी ब्राह्मण रहात होते. यांचेकडे गावातील जोशीपण होते. पौरोहित्याचे काम करुन ते आपला उदरनिर्वाह करीत असत. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. अन्नपूर्णा. या दांपत्याला देवाधर्माची आवड होती. येणाऱ्या अभ्यागतांना ते यथाशक्ती आनंदाने अन्नदान करीत असत. दर पौर्णिमेला आणि शनिवारी हे दोघे नरसोबावाडी येथे दत्त दर्शनाला जात असत. इतके करुनसुद्धा आपल्याला पुत्र संतान नाही याचे सौ. अन्नपूर्णा यांना वाईट वाटे. याबाबत त्या पतीराज अप्पा भट यांचेशी बोलत असत. अप्पा भट त्यांना म्हणायचे, अगं तू काळजी करु नको. योग्य वेळ आली की आपल्याला पुत्र संतान होईल. काही दिवसांनी हे अप्पा भट नरसोबावाडीस गेले असता, त्यांचा तेथे मुक्काम पडला आणि त्याच रात्री एक साधुपुरूष त्यांचे स्वप्नात प्रगट झाले आणि म्हणाले, 'हे ब्राह्मणा, मी तुझ्या मनातील इच्छा जाणतो. तू काळजी करु नकोस, मी स्वतःच तुझा पुत्र म्हणून तुझ्या उदरी येईन.' हे ऐकताच, श्रीअप्पा भट यांना जाग आली. त्यांना अत्यानंद झाला आणि ही घडलेली घटना आपण आपल्या पत्नीला केव्हा एकदा सांगतो असे झाले. तेथून अप्पा भट नांदणीला आले आणि झालेला स्वप्नदृष्टांत त्यांनी आपल्या पत्नीला सांगितला. पत्नीलाही खूप आनंद झाला. यथावकाश सौ. अन्नपूर्णा या गर्भवती राहिल्या आणि माघ वद्य पंचमी, शके १७५७, रविवार दि.०७.०२.१८३५ रोजी नांदणी येथे पुत्ररत्न अवतीर्ण झाले. यावेळी सुतिकागारात प्रकाश दाटून राहिला होता. बाराव्या दिवशी बारशामधे 'श्रीकृष्ण' असे नांव ठेवणेत आले. हा श्रीकृष्ण म्हणजेच आमचे 'श्रीकृष्णसरस्वतीमहाराज' होत.

वयाच्या ८ व्या वर्षी श्रीकृष्णसरस्वतीमहाराजांची मुंज झाली. त्यानंतर श्रीमहाराजांनी आपले आईजवळ कुलस्वामी श्रीखंडेराय यांचे दर्शन घेण्यासाठी मंगसुळीला जायची परवानगी मागितली. आई बराचवेळ परवानगी देईना. पण शेवटी आईची परवानगी घेऊन महाराज मंगसुळीला निघाले. बेडग गावाजवळ एक विहीर होती. त्या विहिरीजवळ बसून आईने बरोबर दिलेली शिदोरी खावी असा विचार त्यांचे मनात आला. त्याप्रमाणे ते विहिरी जवळ आले. स्नान करून शिदोरी भक्षण करावी या विचाराने ते तेथेच शिदोरी ठेऊन स्नानाला गेले. तोवर इकडे एका कुत्र्याने ती शिदोरी भक्षण केली. तेथून ते मंगसुळीला आले. तेथे त्यांनी स्तुतीस्तोत्रे गायली व खंडेरायाला दर्शन द्यावे अशी प्रार्थना केली. जो पर्यंत दर्शन देत नाही, तो पर्यंत अन्न ग्रहण करणार नाही असा पण त्यांनी केला आणि लिंबाच्या झाडाखाली आसन घालून बसले. त्यांची प्रार्थना ऐकून तेथे एक ब्राह्मण प्रगट झाला आणि थोड्या वेळात भोळे शंकर पार्वतीसह प्रगट झाले. त्यांनी महाराजांच्या मस्तकावर हात ठेवला आणि म्हणाले, 'तू माझाच अंश आहेस. मी काय सांगतो ते नीट ऐक. दीन दुबळे यांचा उद्धार करणे करिता तू हा अवतार घेतला आहेस. तू अक्कलकोटला जा. तेथे नृसिंहभान नावाचे प्रसिद्ध स्वामी आहेत. त्यांना शरण जा आणि अनुग्रह घे. तेच तुझे सद्‌गुरू आहेत,' असे बोलून भगवान शंकर अदृश्य झाले. यानंतर महाराज घरी आले आणि घडलेला सगळा वृत्तांत आपल्या आईला सांगितला. आईलाही खूप आनंद झाला.

झालेल्या साक्षात्कारानुसार/आज्ञेनुसार महाराज आपले आईकडे अक्कलकोटला जाणेस परवानगी मागू लागले. त्याप्रमाणे आईचा निरोप घेऊन महाराज मजल दरमजल करत अक्कलकोटला आले. इकडे माझा कृष्णा (महाराज) येणार म्हणून स्वामी समर्थ सकाळपासून महाराजांची वाट बघत होते. महाराजांची व स्वामींची भेट झाल्यावर स्वामींनी महाराजांना आलिंगन दिले आणि एका एकांतस्थळी घेऊन गेले. एका झाडाखाली असलेल्या शिळेवर स्वामी बसले आणि त्यांचे समोर कृष्णसरस्वतीमहाराज बसले आणि महाराज स्वामींची स्तुती करु लागले. हे बघून स्वामी समर्थ म्हणाले, 'कृष्णा, तू आणि मी एकच आहे. तुला जे शरण येतील त्यांची दुःखे निवारायचे तू काम कर,' असे म्हणून स्वामी समर्थांनी श्रीकृष्णसरस्वतींचे मस्तकावर हात ठेवला आणि अनुग्रह केला. आजपासून तुझी 'श्रीकृष्णसरस्वती' अशी ओळख सगळ्यांना होईल असे सांगितले. याप्रमाणे श्रीकृष्णसरस्वतींनी अक्कलकोट येथे बरेच दिवस वास्तव्य करून स्वामींची सेवा केली.

यानंतर स्वामीसमर्थ श्रीकृष्णसरस्वतीमहाराजांना म्हणाले की, 'मी आता गाणगापुरी ३ महिने जाणार आहे. तुमच्याकडे एक गृहस्थ येईल. त्याला बरोबर घेऊन तुम्ही करवीर नगरीत जावे. तोपर्यंत येथे रहावे.' याप्रमाणे एक गृहस्थ श्रीकृष्णसरस्वतींकडे आला. त्याला घेऊन महाराज करवीर क्षेत्री आले आणि राममंदिरात वस्ती केली. तेथे त्यांनी एका स्त्रीची संमंधबाधा नाहीशी केलेने फडणवीस नावाच्या गृहस्थाची महाराजांवर श्रद्धा बसली. त्याने महाराजांना आपले घरी नेले. महाराजांनी अशा अनेक लीला केल्या.

ताराबाई शिर्के नावाची कोल्हापूर येथील कुंभार आळीत राहणारी गणिका होती. ती दत्तभक्त होती. तिला पोटशूळ झालेला होता. पण ती नित्यनेमाने पौर्णिमेला नरसोबावाडी येथे जात होती. तिने दत्तात्रेयांना पोटशूळ जाणेबाबत आर्त प्रार्थना केली आणि वाडीतच मुक्काम ठोकला. त्या दिवशी रात्री साक्षात् दत्तात्रेय तिच्या स्वप्नात गेले आणि म्हणाले, 'मी तुझ्या सेवेवर प्रसन्न असून काही दिवसातच मी तुझ्या घरी रहाणेस येईन. तुझी व्यथा आता संपली. त्यामुळे तू आता येथे येऊ नकोस. तू त्वरीत म्हैसाळ गावी जा, तेथे तुला गुरू भेटतील. गुरूला घेऊन घरी ये आणि सर्व सुखाची प्राप्ती करून घे.' एवढ्यात ताराबाईना जाग आली. लगेच ती करवीरला गेली आणि विलंब न लावता म्हैसाळला गेली. म्हैसाळकरांच्या घरी येताच तिने श्रीकृष्णसरस्वतीमहाराजांना साष्टांग वंदन केले आणि म्हणाली, 'गुरूमहाराज आपण माझ्या घरी चलावे.' त्याप्रमाणे श्रीकृष्णसरस्वतीमहाराजांनी या ताराबाईचे घरी २५ ते ३० वर्षे वास्तव्य केले. श्रीकृष्णसरस्वतीमहाराज हे नेहमी बालभावात असत. अनेकांना दत्तांनी दृष्टांतात सांगितले की, 'मी करवीर येथे कुंभारस्वामी या नावाने अवतार घेतला आहे. तेथे तुम्ही जावे.' महाराज हे कोल्हापुरातील कुंभार आळीत राहिले, म्हणून त्यांना 'कुंभारस्वामी' म्हणून लोक ओळखू लागले. श्रीकृष्णसरस्वतीमहाराजांनी संपूर्ण आयुष्यात अनेक लीला केल्या. अनेकांना रोगमुक्त केले. अनेकांना संसारापाशातून सोडविले. अनेकांना बाधामुक्त केले.

इ.स.१९०० चे सुमारास ताराबाई शिर्के यांचे देहावसान झाले. तिने स्वामींची अनन्यभावे सेवा केली. त्या बाईंना स्वामी 'आई' म्हणून संबोधायचे. त्यांच्या अंतयात्रेला स्वतः स्वामी येऊन त्यांनी दहनाची जागा निश्चित केली. काय त्या ताराबाईचे भाग्य! येथून पुढे स्वामींनाही चैन पडेना. उदासीनता आली. आषाढानंतर श्रावण महिन्यातील गोकुळाष्टमी आली. शिर्के वाड्यात स्वामी मोठ्या प्रमाणात गोकुळाष्टमी साजरी करत असत. याही

वर्षी सगळ्या भक्तांनी उत्सव साजरा केला. याप्रसंगी स्वामींची तब्येत बरी नव्हती. तरी ते काही काळ आपल्या सिंहासनावर येऊन बसले. कृष्णजन्माष्टमीचे भजन सुरू होते. सर्वांना गुलाल, फुले उधळण्याकरिता दिली गेली. पण स्वामींनी जन्मकाळाच्या वेळेआधीच फुले व गुलाल उधळला आणि ते आपल्या पलंगावर जाऊन निजले. स्वामींची ही कृती सगळ्या भक्तांना वेगळी वाटली.

पुढे काही दिवसांनी स्वामींना संग्रहणी या रोगाने ग्रासले. यात ते दोन आठवडे झोपून होते. आषाढ महिन्यात त्यांनी हिंडणे फिरणे सोडले. पलंगावरच झोपून राहू लागले. अन्नावरची वासना उडाली आणि अंग तापाने फणफणू लागले. यातही ते भक्तांना नामस्मरण करा, असा उपदेश करत होते. स्वामींना तपासण्यासाठी घाटे नामक वैद्य आला. त्याला आपल्या वैद्यकीचा अहंकार होता. तो म्हणाला, 'हा हा म्हणता स्वामींचा ताप पळवून लावतो.' याप्रमाणे तो स्वामींना तपासू लागताच स्वामी म्हणाले, 'अरे उगाचच वैद्यकीचा अहंकार धरू नको. चूर्णाने इतर रोग बरे होत असतील, पण मीपणा जातो काय? ते सांग.' यानंतर इंग्लिश डॉक्टर स्वामींना तपासण्यासाठी आला. तो म्हणाला, 'महाराजांना नळी (थर्मामीटर) लावून बघतो.' तेव्हा स्वामी त्याला म्हणतात, 'नळीला यमराज भितो का?' नुसते इंजेक्शन करुन त्याची यमास जाचणी होते कां?' स्वामींचे अंग एकदम गरम होई आणि एकदम थंड होई. स्वामींची नाडी लागेना. स्वामी म्हणाले, दोन घडीचा खेळ शिल्लक आहे. दिवसेंदिवस प्रकृती क्षीण होत चालली. श्रावण व.अष्टमी चे दिवशी सगळ्या भक्तांनी रात्र जागून काढली. स्वामींचा परमभक्त नामदेव हा गाणगापूरक्षेत्री गेला होता. तिकडे त्याच्या स्वप्नात जाऊन त्यास स्वामींनी लवकरात लवकर ताराबाईच्या घरी येणेस सांगितले. त्यानुसार नामदेवही टाकोटाक निघून करवीरक्षेत्री ताराबाईंचे घरी पोहोचला. श्रावण व. दशमीची पहाट उजाडली. हलक्या आवाजात स्वामींनी आपला लाडका शिष्य नामदेव याला 'नामा' म्हणून हाक मारली. नामदेव म्हणाला, स्वामी काय आज्ञा आहे? त्यावेळेलाच महालक्ष्मी अंबामातेच्या मंदिरातील पहाटे चारच्या काकड आरतीचा घंटानाद ऐकू येऊ लागला. त्यावेळीच स्वामींनी नामदेवास, 'कापूर लावून माझी आरती करा' असे सांगितले. याप्रमाणे कापूरआरती लावून, ओवाळून घेऊन, श्रीकृष्णसरस्वतीस्वामीमहाराजांनी श्रावण वद्य दशमी शके १८२२ दि.२०.०८.१९०० या दिवशी कोल्हापूर येथे ताराबाई यांचे घरी वयाच्या ६५ व्या वर्षी महाप्रयाण केले.

ताराबाईचे घराला वैराग्यमठी असे संबोधिले जाते. या मठीतच स्वामींना समाधी देणेत आली. नंतर शिष्यमंडळींनी भजनासाठी दुसरी मठी निर्माण केली. ती गंगावेस जवळ असून तिला निजबोध मठी किंवा व्यास मठी असे संबोधिले जाते.

***

# प.पू.स्वामी स्वरूपानंद

जन्म
मार्गशीर्ष व.१२, शके १८२५
दि.१५.१२.१९०३

निर्याण
श्रावण व.१२ शके १८९६
दि.१५ ऑगस्ट,१९७४

रत्नागिरी जिल्ह्यातील पावस या गावी श्री. विष्णुपंत परशुरामपंत गोडबोले नावाचे सद्गृहस्थ रहात होते. यांना रखमाबाई नावाच्या धर्मपत्नी होत्या. या दांपत्याला चार मुली व तीन पुत्र अशी एकूण सात अपत्ये झाली.

या अपत्यांपैकी मार्गशीर्ष व. १२ शके १८२५ दि.१५.१२.१९०३ रोजी एक पुत्ररत्न अवतीर्ण झाले. बारशादिवशी या पुत्राचे नाव 'रामचंद्र' ठेवणेत आले. हे रामचंद्र म्हणजेच आमचे 'प.पू.स्वामी स्वरूपानंद' होत.

प.पू.स्वामींना, 'रामभाऊ' अथवा 'अप्पा' या नावानेही लोक संबोधित असत. प.पू.स्वामींचे प्राथमिक शिक्षण हे पावस येथे झाले. वयाच्या ८ व्या वर्षी त्यांची मुंज झाली. त्यानंतर त्यांनी १९१४ साली रत्नागिरीच्या नागू हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला. तेथील शिक्षण पूर्ण होताच ते पुढील शिक्षणासाठी इ.स.१९१९ साली मुंबईतील आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या आंग्रेवाडीतील विद्यालयात गेले. त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण हे पुण्यातील टिळक महाविद्यालयात झाले. घरातील सांप्रदायिक वातावरणामुळे पारमार्थिक संस्कार हे लहानपणापासून झाले होते. अलौकिक बुद्धिमत्तेमुळे स्वामी विविध विषयात पारंगत होत होते. यावेळी आपल्या भारत देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होते. तरूण पिढी याकडे आकृष्ट होऊ लागली होती. यावेळी महात्मा गांधींनी ब्रिटीश सत्तेविरुद्ध असहकार आंदोलन पुकारले. या आंदोलनात स्वामींनी हिरीरीने भाग घेतला आणि त्यामुळे शाळा सोडावी लागली. स्वामींनी पावसमधे जनजागृतीचे काम सुरू केले. स्वामींनी १९२३ साली 'स्वावलंबनाश्रम' नावाची शाळा स्थापन करून, तरुणांना विविध प्रकारचे शिक्षण देण्यास प्रारंभ केला. विद्यार्थ्यांना सूत कताई, हातमागावर खादी विणणे इ. शिक्षणाबरोबरच मल्लखांब, लाठी चालवणे, व्यायाम, खेळ इ. प्रकारचे शिक्षण देण्यास प्रारंभ केला. याबरोबरच स्वामींनी तरुणांना एकत्र करून राष्ट्रीय मेळे, प्रवचने, प्रबोधनपर गाणी व संवाद लिहून उद्युक्त केले.

इ.स.१९२९ च्या काळात स्वामींना सद्गुरूकृपेची तळमळ निर्माण झाली. यावेळी स्वामींचे मामा श्रीकेशवराव गोखले हे स्वामींना प.पू.श्रीगणेशनाथ ऊर्फ श्रीबाबामहाराज वैद्य या सत्पुरुषाकडे घेऊन गेले आणि स्वामींना इ.स.१९२३ साली श्रीबाबामहाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला. श्रीबाबामहाराजांनी त्यांना

नाथपंथाची अनुग्रह दीक्षा दिली. तसेच सोहंदीक्षाही दिली. श्रीबाबामहाराजांनी त्यांचे 'स्वरुपानंद' हे नामकरण केले. श्रीबाबामहाराज हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या परंपरेतील नाथसांप्रदायिक आत्मसाक्षात्कारी पुरुष होते. त्यांच्या अनुग्रहामुळे स्वामींची अध्यात्मिक प्रगती वेगाने झाली. स्वामी स्वरूपानंदांनी स्वहस्ते ज्ञानेश्वरी लिहून सद्गुरूंना अर्पण केली.

स्वामींचे स्वावलंबनाचे कार्य १९२७ सालांपर्यंत सुरू होते. पावसमधील काही नाठाळ लोकांनी 'स्वामींच्या राष्ट्रीय शाळेत मुलांना पाठवाल तर इंग्रज सरकारचा रोष ओढवेल. त्या मुलांना नोकऱ्या मिळणार तर नाहीतच, पण आज ज्या नोकऱ्या आहेत त्यासुद्धा जातील, जमीन जुमला, घरदार सगळे जाईल.' अशा प्रकारच्या अफवा पसरवण्यास प्रारंभ केला. यामुळे स्वामींच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या हळूहळू कमी झाली. यामुळे स्वामींनी 'स्वावलंबनाश्रम' शाळा बंद केली व उर्वरीत विद्यार्थ्यांसह ते पुढील शिक्षणासाठी पुण्याला गेले. तेथे स्वामींनी 'वाङ्मयविशारद' ही पदवी प्राप्त करून घेतली. महात्मा गांधींच्या आचार, विचार, तत्त्वज्ञानाने स्वामी गांधीजींकडे खेचले गेले. इ.स.१९३२ च्या मिठाच्या सत्याग्रहात स्वामींनी भाग घेतला. त्यामुळे त्यांना अटक होऊन तुरुंगवास भोगावा लागला. त्यांना येरवड्याच्या तुरूंगात ठेवणेत आले. या तुरूंगवासात त्यांचा श्री.एस.एम.जोशी, श्री. आचार्य जावडेकर, श्री. शंकरराव देव इ. प्रभृतींशी संबंध आला. या तुरुंगवासात स्वामींनी 'नवरत्नहार' ही ओवीरचना केली. या तुरूंगवासातच श्री. एस.एम.जोशी यांनी स्वामी स्वरूपानंदांना 'स्वामी' म्हणून संबोधले. यामुळे पुढे ते स्वामी म्हणूनच प्रसिद्ध झाले.

काही कालांतराने स्वामींना मलेरिया झाला. त्यांचा हा आजार चार महिने होता. अंगातील सर्व शक्ती कमी झाली होती. त्यामुळे त्यांच्या ठायी परमात्म्याबद्दल दृढतम भक्तीभाव निर्माण झाला. जीवदशा नष्ट होऊन आत्मप्रचिती प्राप्त झाली होती. याचे अनुभव त्यांनी त्यांच्या 'अमृतधारा' या स्फुट काव्याद्वारे प्रगट केले. या आजारपणात त्यांचे सहकारी डॉ. बाबा देसाई यांनी त्यांची शुश्रुषा केली. पुढील काळात स्वामींना अनेक संतसत्पुरुष भेटून गेले. त्यात प्रामुख्याने श्रीधरस्वामी, श्रीभालचंद्रमहाराज कणकवली, श्रीकाकासाहेब तुळपुळे, श्रीगोळवलकर गुरूजी इत्यादिंचा समावेश होता.

स्वामी स्वरूपानंदांनी इ.स.१९३४ ते १९७४ पर्यंत म्हणजे ४० वर्षे पावस येथील श्री.देसाईंच्या 'अनंत निवास' मधील एका खोलीत वास्तव्य केले. इ.स. १९४२ साली त्यांना साक्षात महाविष्णूचा साक्षात्कार झाला. ज्या रुपात विष्णू दिसले, त्या रुपात त्यांनी चित्र काढून घेतले. या चित्राच्या हजारो प्रती सांगली येथील पु.ना.गाडगीळ सराफ पेढीचे मालक श्री. हरिभाऊ गाडगीळ यांनी काढल्या व त्यावर माझे आजोबा ती. प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांची स्वाक्षरी घेऊन अनेक साधकांना वितरीत केल्या. या ४० वर्षाच्या काळातच स्वामींनी 'श्रीमत् अभंग ज्ञानेश्वरी', 'श्रीभावार्थगीता', 'श्री अभंग अमृतानुभव', 'संजीवनी गाथा',

'चांगदेव पासष्टी' इ. प्रासादिक अनुवादीत ग्रंथ निर्माण केले.

स्वामी स्वरूपानंदांनी आमच्या पणजोबांना म्हणजे प.पू.श्रीमामामहाराज यांना कधीही पाहिलेले नाही आणि आमच्या श्रीमामांनीही स्वामींना कधीही पाहिलेले नाही. पण स्वामी पावस येथे म्हणत की, 'रामभक्ती कशी करावी हे आचरून दाखवण्याकरता श्रीमामा केळकरांचा अवतार आहे' आणि श्रीमामा सांगली येथे म्हणत की, 'निखळ स्वरूप म्हणजे स्वामी स्वरुपानंद आहेत.' शेवटी संतच संतांना जाणतात हेच खरे.

स्वामी स्वरूपानंदांचे अनेक शिष्य झाले. पण त्यामध्ये प.पू.स्वामी अमलानंद आणि प.पू.स्वामी माधवनाथ हे प्रमुख शिष्य झाले आणि या दोन प्रमुख शिष्यांना स्वामींनी संप्रदायाचा विस्तार करणेची आज्ञा केली.

स्वामींना हार घालून घेणे, पादसंवाहन करणे, पाद्यपूजा करून घेणे इ. बाह्य उपचारी गोष्टी आवडत नसत. साधकाने भावातीत, गुणातीत होऊन निर्गुणापर्यंत जाऊन स्वरूप प्राप्ती करून घ्यावी अशी त्यांची मनोकामना असे.

शेवटी स्वामींची देहातील शक्ती क्षीण होत गेली. वयोमानानुसार ते शारीरिकदृष्ट्या दुर्बल होत गेले पण अध्यात्मिक बळ, तेज हे त्यांच्या चेहऱ्यावर शेवटपर्यंत विलसत होते. अशा स्वामी स्वरुपानंदांनी पावस येथे श्रावण व.१२ शके १८९६ दि.१५ ऑगस्ट, १९७४ या दिवशी वयाच्या ७१ व्या वर्षी महासमाधी घेतली.

'रामनाम बीजमंत्र । स्वामी जपे अहोरात्र ।।'

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत स्वामी स्वरूपानंद यांचा निर्याणाचा अभंग**

शालिवाहन शके अठराशे शहाण्णवात । आनंद संवत्सरात दक्षिणायन ।।१।।
श्रावण वद्य द्वादशी आणि गुरूवार । दिवसा प्रथम प्रहर तिसरे तासी ।।२।।
योग साधियेला गुरूपुष्यामृत । झाले समाधिस्थ स्वरूपानंद ।।३।।
हृदयामाजी उठे सोऽहं सोऽहं नाव । ऐसे स्वतःसिद्ध स्वामीराव ।।४।।
सोऽहंस्वरूप जे स्वरूपासी आले । सोऽहंरूप झाले सोऽहं नादे ।।५।।
स्वामी स्वरूपानंद स्वरूपाकार झाले । कीर्तीरूपे उरले दासापाशी ।।६।।

# प.पू. श्रीहनुमंतमहाराज वावरहिरेकर

**जन्म**
**फाल्गुन अमावस्या शके १८५५**
**गुरुवार दि.१५.०३.१९३३**

**निर्याण**
**श्रावण व.१५, शके १८८३**
**शनिवार दि.०९.०९.१९६१**

सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात दहिवडी-शिखरशिंगणापूर मार्गावर मध्यावर वावरहिरे हे गाव आहे. या गावामध्ये श्री. दत्तात्रय हरि घुगरदरे (कुलकर्णी) या नावाचे सद्गृहस्थ रहात होते. यांना प.पू.सद्गुरू श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर यांचा अनुग्रह होता. यांचे शिक्षण व लग्नकार्य स्वतः महाराजांनी केले. श्री. दत्तात्रय हे सुरवातीला सोलापूर, तेथून नातेपुते व तेथून वावरहिरे येथे आले. ते शाळेमध्ये फर्स्ट असिस्टंट मास्तर होते. तसेच त्यांचा ज्योतिषाचा अभ्यास चांगला होता. श्री. दत्तात्रय घुगरदरे यांनी श्री. गोंदवलेकरमहाराजांचे चरित्र लिहिले होते. त्याचे प्रकाशन इ.स.१९२१ साली झाले होते. त्याचे पुनःप्रकाशन इ.स.२०१३ साली झाले. श्री. दत्तात्रय यांचा सौ. चंद्रभागा या मुलीशी विवाह झाला. या दांपत्याला यथावकाश श्री. विष्णु, श्री. नरहरी, श्री. रघुनाथ, श्री.भालचंद्र ही चार मुले झाली. यानंतर परत सौ. चंद्रभागा या गर्भवती राहिल्या. श्री. दत्तात्रय व सौ. चंद्रभागा हे दोघे पतीपत्नी गोंदवले येथे श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या दर्शनाला गेले. तेथे गेले असता श्री. दत्तात्रयांचे मनात आले की, 'आपल्यासारखा (महाराजांसारखा) पुत्र मला व्हावा'. हे श्रीगोंदवलेकरमहाराजांनी मनातील ओळखले आणि आशीर्वाद दिला, 'तुझ्या मनासारखे होईल.' याप्रमाणे नातेपुते या गावी फाल्गुन अमावस्या शके १८५५, गुरूवार दि.१५ मार्च, १९३३ रोजी या दांपत्याचे पोटी पुत्ररत्न जन्माला आले. जन्माला येताच या बालकाने श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या फोटोला स्पर्श केला. १२ व्या दिवशी या बालकाला पाळण्यात घालणेत आले आणि 'हनुमंत' हे नांव ठेवणेत आले. हा हनुमंत म्हणजेच आमचे '**प.पू. श्रीहनुमंतमहाराज वावरहिरेकर**' होत.

श्रीहनुमंतमहाराजांचे प्राथमिक शालेय शिक्षण नातेपुते येथे झाले. ते मॅट्रिकपर्यंत शिकले. वयाच्या ८ व्या वर्षी त्यांचा उपनयन संस्कार झाला आणि त्यानंतर म्हणजे ८ ते ९ वर्षांपासून त्यांचा अध्यात्मिक भाव जागृत झाला. वयाच्या ९ व्या वर्षीपासून ते प्रवचन करू लागले. अनेकांना त्यांच्या पूर्वीच्या आणि पुढे घडणाऱ्या घटना ते सहजरित्या सांगू लागले. श्रीहनुमंतमहाराजांवर समर्थ संप्रदायाचा पगडा होता.

वयाच्या ९ व्या वर्षी म्हणजे इ.स. १९४२ साली श्रीहनुमंतमहाराजांनी 'श्री पद्यात्मक बालरामायण' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ अवलोकन केला असता, या ग्रंथामध्ये सद्गुरूंचे महत्व व ज्ञानप्राप्तीसाठी सद्गुरूकृपा किती आवश्यक आहे याचा उहापोह केला आहे. तसेच प्रामुख्याने नवविधा भक्तीपैकी नामस्मरण या भक्तीचे महत्व या ग्रंथात सांगितलेले आहे. या ग्रंथात सात कांडे आणि सदतीस अध्याय आहेत. एकूण ओवीसंख्या ५१८७ आहे. 'पद्यात्मक बालरामायण' या ग्रंथनामावरून आपल्याला वाटते की रामायणातील बालकांडाशी

याचा काही संबंध आहे कां? पण तसे नाही. महाराजांनी लहान वयात लिहिले म्हणून 'बालरामायण' असे नामकरण केलेले आहे.

श्रीक्षेत्र वावरहिरे हे गाव प.पू.श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या घराण्याचे मूळ गाव आहे. या गावास पौराणिक महात्म्य देखील आहे. महाभारतातील श्रीकृष्णअवतारात बाणासूर नावाचा राक्षस होता. त्याने शंकरांची उपासना केली/तपस्या केली. या तपस्येवर प्रसन्न होऊन भगवान शंकर वावरहिरे येथे प्रगट झाले. प्रगट झालेल्याची खूण म्हणजे तेथे श्रीशंकरांच्या दोन एकत्रित पिंडी आहेत आणि त्याभोवती कायम पाणी वहात असते. बाणासूराच्या तपस्येमुळे पिंड प्रगट झाली म्हणून या पिंडीस 'बाणलिंग' असे नाव होते. कालांतराने शब्दाचा अपभ्रंश होऊन ते स्थान 'पाणलिंग' या नावाने ओळखले जाते. श्रीगोंदवेकरमहाराज येथे येऊन गेले या स्थानाचे दर्शन घेत असत.

श्रीहनुमंतमहाराज हे या पाणलिंग मंदिरात शिवलीलामृत ग्रंथाचे पारायण करीत होते. त्यावेळी श्रीतुकामाईमहाराज येहेळगाव, हे पाणलिंग पिंडीतून प्रगट झाले आणि त्यांनी श्रीहनुमंतमहाराजांच्या मस्तकावर हात ठेवला आणि 'ये हृदयीचे ते हृदयी घातले' या ज्ञानेशोक्तीप्रमाणे अनुग्रह केला आणि श्रीहनुमंतमहाराजांना पावन केले. त्यामुळे श्रीमहाराजांना नामावाचून दुसरे कर्तव्यच उरले नाही आणि श्रीतुकामाईंनी त्यांना स्वानंद (स्व चा आनंद) प्राप्त करून दिला व ते समाधान पावले. श्रीतुकामाईंनी यावेळी प्रगट होताना काखेतून एक कुत्र्याचे पिल्लू आणले होते. ते पिल्लू त्यांनी श्रीहनुमंतमहाराजांच्या अंगावर टाकले आणि श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांचे चरित्र लिही असे सांगितले. यावेळी श्रीहनुमंतमहाराजांचे वय १३ वर्षांचे होते. इ.स. १९४६ साली श्री हनुमंतमहाराजांनी तुकामाईंच्या आज्ञेप्रमाणे चरित्र लेखनास प्रारंभ केला. चरित्र लेखनाचेवेळी श्रीतुकामाई हे हनुमंतमहाराजांना 'स्वानंद' समाधान देत होते. त्यामुळे श्रीतुकामाईंनी हनुमंतमहाराजांना वासनारहित केले आणि चरित्र लेखनाला प्रारंभ झाला. सद्गुरू हे स्वानंद देणारे सुधाकर आहेत आणि त्यांनीच मला स्वानंद प्राप्त करून दिला, म्हणून या ग्रंथाचे नांव '**स्वानंद सुधाकर**' असे ठेवणेत आले. अशा आशयाची ओवी श्रीमहाराजांनी या ग्रंथामध्ये समाविष्ट केली आहे. 'स्वानंदसुधाकर' हे श्रीगोंदवलेकरमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र आहे. श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या आयुष्यात ज्या घटना घडल्या, त्या सगळ्या घटना चरित्रात लिहिताना श्रीगोंदवलेकरमहाराजांनी श्रीहनुमंतमहाराजांना प्रत्यक्ष डोळ्यापुढे दाखवल्या आणि त्यानुसार श्रीहनुमंतमहाराजांनी या ग्रंथात लिहिलेल्या आहेत. **'अहो ज्या ज्या गोष्टी घडल्या । त्या त्या दृष्टीपुढे दिसल्या । मागुती लेखनी रेखाटल्या। त्यांचेनि कृपे झाल्या लिहीत।। दशक १३ समास १० ओवी २१।।'** तसेच श्रीतुकामाईंनी श्रीहनुमंतमहाराजांना ब्रह्मचैतन्यरुपाशी तद्रुपता घडवून दिली, म्हणून मी हे चरित्र लिहू शकलो असाही उल्लेख या चरित्रात आहे. चरित्राचा शेवट करेपर्यंत श्रीब्रह्मचैतन्यमहाराजच सर्व बोलत होते आणि मी लिहित होतो, यात माझा एकही शब्द नाही असेही एका ओवीद्वारे श्रीमहाराजांनी सांगितले आहे.

या चरित्रातील एक घटना अत्यंत महत्वाची आहे. कारण ही घटना श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या इतर लिखित चरित्रात आल्याचे आढळत नाही, म्हणून येथे मुद्दाम दिली आहे. श्रीगोंदवलेकरमहाराज हे कलकत्याहून निघून नेपाळ येथे गेले. तेथे वसुंधरराज नामक राजा राज्यावर होता. त्याने श्रीगोंदवलेकरमहाराजांची किर्ती ऐकली होती, म्हणून त्याने महाराजांना घरी बोलवून दर्शन घेऊन आपले कुळ धन्य करावे असा विचार केला आणि त्याप्रमाणे त्या राजाने श्रीमहाराजांना काठमांडूच्या शेजारी असणाऱ्या राजबगीचातील तळ्याशेजारी बोलावले. महाराजांची सतेज गौरकाया आणि विदेही अवस्था बघितल्यावर त्या राजाने श्रीमहाराजांचे पाय धरले आणि, 'महाराज आमचेवर कृपा करा' अशी विनवणी केली. त्याप्रमाणे श्री.गोंदवलेकरमहाराजांनी या वसुंधरराजाच्या मस्तकावर हात ठेवला व कानात गुरूमंत्र सांगितला आणि ब्रह्मानंदाची प्राप्ती करुन दिली. त्या राजाचा आनंद गगनात मावेना. तेथून श्रीमहाराज नैमिषारण्याकडे जाणेकरिता नेपाळमधून बाहेर पडले. जाऊन चार दिवस झाले आणि इकडे या वसुंधरराजाने देह ठेवला. त्याचा आत्मा परमात्मस्वरूपात विरून गेला आणि तो ब्रह्मरूप होऊन श्रीगोंदवलेकरमहाराजांचा पहिला शिष्य ठरला असा उल्लेख, श्रीहनुमंतमहाराजांनी दशक ५ समास ४ ओवी क्र.२८ ते ४२ यामधे केलेला आहे.

असे हे १३ दशक १३० समास आणि ८५९० ओव्यांचे श्रीगोंदवलेकरमहाराजांचे चरित्र (स्वानंदसुधाकर) श्रीहनुमंतमहाराजांच्या वयाच्या १९ व्या वर्षी म्हणजे माघ शु.१२ शके १८७४ म्हणजे इ.स.१९५२ साल पूर्ण झाले.

श्रीब्रह्मानंदमहाराजांनी कानडी भाषेत श्रीगोंदवलेकरमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र लिहिले आणि श्रीगोंदवलेकरमहाराजांचे समोर अर्पण केले. हे चरित्र बघून श्रीगोंदवलेकरमहाराज म्हणाले, 'ब्रह्मानंदबुवा तुम्ही चरित्र लिहिण्याचा उगीचच शीण घेतला. आमचे चरित्र लिहिण्यासाठी आम्हीच परत जन्म घेणार आहे. त्यामुळे तुम्ही लिहिलेले चरित्र माणगंगेत अर्पण करा.' याप्रमाणे श्रीब्रह्मानंदमहाराजांनी ते स्वतः लिहिलेले चरित्र गुरूआज्ञा मानून माणगंगेत विसर्जन केले व तेथील तीर्थ घेऊन परत आले.' श्रीब्रह्मानंदमहाराजांप्रमाणेच इतर दोघा तिघांनी चरित्र लिहून श्रीगोंदवलेकरमहाराजांना दाखविले. ते चरित्र बघून ते हसले आणि म्हणाले, **'चरित्र लिहिणार असे निराळा । त्याचे दृष्टीपुढे दिसेल भाग सगळा। तो आमुचे सारखा परि दिसे वेगळा । तुम्ही त्या मार्गाला नका जाऊ ।।'** चरित्र लिहिणारा निराळा म्हणजेच ते श्रीहनुमंतमहाराज वावरहिरेकर.

श्रीहनुमंतमहाराजांचा विवाह १९ व्या वर्षी सौ. मैनावती नामक कन्येशी ठरला. श्रीहनुमंतमहाराजांचे वडील हे उत्तम ज्योतिषी होते. त्यामुळे त्यांनी सौ.मैनावती यांची पत्रिका बघितली. पत्रिका बघितली असता या मुलीची पत्रिका चांगली जुळत आहे, पण या मुलीच्या पत्रिकेत लवकर वैधव्य योग आहे असे सांगितले. त्यामुळे ही मुलगी आपल्या मुलाला नको असे ते म्हणाले. हे ऐकून श्रीहनुमंतमहाराज म्हणाले, 'हे सगळे आम्हाला ज्ञात आहे. पण आमचे पुढचे जगदोद्धाराचे कर्म करण्यास हीच वधू योग्य आहे.' आणि त्याप्रमाणे श्रीमहाराजांचा सौ.मैनावती नामक कन्येशी मार्गशीर्ष शु.१० शके १८७४ बुधवार दि.२६.११.१९५२ रोजी

माधवनगर सांगली, येथील विठ्ठल मंदिरात विवाह झाला. विवाहानंतर या कन्येचे सौ.लीलावती असे नाव ठेवणेत आले.

यानंतर श्रीमहाराजांनी वयाच्या २०व्या वर्षी १८७६ ओव्या असणारा '**श्रीभावार्थ रामगीता**' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये गुरूशिष्य संवाद आहे. अध्यात्मरामायणातील उत्तरकांड, पाचवा सर्ग हा 'श्रीरामगीता' या नावाने ओळखला जातो. यात एकूण ६१ श्लोक आहेत. श्रीरामावतारात श्रीरामाने श्रीलक्ष्मणाला सांगितलेली ही गीता आहे. श्रीलक्ष्मण हे रामाला प्रश्न विचारत आहे आणि श्रीरामप्रभू प्रश्नांना उत्तरे देत आहेत, असा आशय आहे. या रामगीतेचा भावार्थ श्रीहनुमंतमहाराजांनी सांगितला आहे. या ग्रंथात चित्ताची एकाग्रता कशी साधावी व कुंडलिनी जागृत झाल्यावर होणारी अवस्था यांचे वर्णन व महत्व महाराजांनी सांगितले आहे. हा ग्रंथ, विजयनाम संवत्सर माघ व.१ शके १८७५ , इ.स.१९५३ मध्ये लिहून पूर्ण झाला.

श्रीहनुमंतमहाराजांना यथावकाश सौ. कालिंदी ही कन्या व श्री. शिवदास व श्री.कल्याण असे दोन पुत्र झाले.

श्रीहनुमंतमहाराजांना शेवटी मॅनेन्जायटीस हा आजार झालेला होता. तो आजार बळावला आणि श्रावण वद्य अमावस्या, शके १८८३ शनिवार दि. ०९.०९.१९६१ रोजी दुपारी २ वा. ३५ मिनिटांनी वयाच्या २७ व्या वर्षी श्रीहनुमंतमहाराजांनी देह ठेवला.

श्रीमहाराज हे त्यांचे लग्न ठरतेवेळी एक वाक्य बोलून गेले होते की, सौ. लीलावती याच आमचे कार्य पुढे सुरु ठेवण्यासाठी योग्य आहेत. याप्रमाणे सौ.लीलावती ऊर्फ आईसाहेब यांनी श्रीमहाराजांचे कार्य अत्यंत निष्ठेने पुढे सुरू ठेवले. आईसाहेबांनी वावरहिरे येथे श्रीहनुमंतमहाराजांची समाधी बांधली. तसेच श्रीराममंदिराचीही स्थापना केली. श्रीहनुमंतमहाराजांच्या ग्रंथसंपदेचे प्रकाशन केले. त्यात महत्वाचा ग्रंथ म्हणजे श्रीहनुमंतमहाराजांनी त्यांच्या भक्तांना मार्गदर्शनपर केलेल्या बोधाचा संग्रह - 'अमृत घुटका' हा होय. अमृत घुटके म्हणजे खरेच महाराजांनी केलेला मार्मिक बोध होय. हा ग्रंथ वाचला असता आपल्याला याची कल्पना येईल.श्रीमहाराजांचा जयंती व पुण्यतिथी उत्सव सुरू केला. तसेच भक्तधाम बांधले. या पद्धतीने वावरहिरे येथे श्रीमहाराजांचे पश्चात आईसाहेबांनीच खरा परमार्थ वाढविला असे म्हटले तर गैर होणार नाही. आईसाहेबांच्या पश्चात त्यांचे दोन चिरंजीव श्री. शिवदास व श्री. कल्याण हे वावरहिरे येथील मंदिराची व्यवस्था बघतात.

***

# प.पू.सद्‌गुरू श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर

जन्म
शके १८०२ इ.स.१८८०

निर्याण
भाद्रपद शु.०३ शके १८२२
दि.२८.०८.१९००

प.पू.सद्‌गुरू श्रीचिमडमहाराज हे विटे येथे नोकरीसाठी रहात होते. श्रीनिंबरगीकरमहाराज व श्रीसाधुमहाराज यांनी त्यांना चिमडगावी रहावयास जाणेची आज्ञा केली. त्याप्रमाणे श्रीचिमडमहाराज, त्यांच्या पत्नी सौ. माईसाहेब, मुलगी देवका व बसपराप्पा मुत्तुर या नावाच्या आपल्या विश्वासू सेवकाबरोबर विटे सोडून चिमड येथील स्मशानामध्ये रहायला आले. तेथे ते पर्णकुटी बांधून रहायला लागले.

येथे रहायला आले असताना इ.स. १८८० साली श्रीमहाराजांना पुत्ररत्न झाले. हा पुत्र जन्माला आला तेव्हा बाळंतीणीच्या खोलीत लख्ख प्रकाश पडला होता. उपजताच या मुलाच्या डोक्यावर केस होते आणि ते एखाद्या जटाधारी तपस्वी पुरुषाच्या केसांप्रमाणे भरपूर आणि लांबसडक होते. इतके की त्या केसाखाली मुलाचे डोळे झाकून गेले होते. तेव्हा मुलाला डोळेच नाहीत की काय? अशी सर्वांना शंका आली. डोळ्यावरील केस बाजूला केल्यावर त्या मुलाचे पाणीदार आणि तेजस्वी डोळे सर्वांना दिसले. हा मुलगा जन्माला येण्यापूर्वीच श्रीनिंबरगीकरमहाराजांनी सांगितले होते की, 'हा मुलगा जन्माला आल्यापासून १० दिवसापर्यंत आईपाशी फारसा नेऊ नका.' त्याप्रमाणे १० दिवस या मुलाचा सांभाळ प.पू.श्रीलक्ष्मीबाईअक्का यांनी केला. बाराव्या दिवशी बारशावेळी या मुलाचे नांव 'रघुनाथ' असे ठेवणेत आले.

हे मूल लहानपणी फार रडवे होते, म्हणून त्याला घेऊन श्रीचिमडमहाराज सहकुटुंब निंबरगीला गेले. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी या मुलाला आपल्या मांडीवर घेतले आणि मस्तकावरून आपला वरदहस्त फिरविला. यावेळी सौ. माईसाहेबमहाराज या श्रीनिंबरगीकरमहाराजांना म्हणाल्या, 'महाराज, हा मुलगा वाजवीपेक्षा जास्त रडतोय, काय करावे?' तेव्हा श्रीनिंबरगीकरमहाराजांनी 'या मुलाचे नांव काय ठेवले आहे?' असे विचारले. तेव्हा सौ. माईसाहेब म्हणाल्या, 'महाराज या मुलाला 'रघुनाथ' हे साधुमहाराजांचे नांव ठेवले आहे.' हे ऐकून श्रीनिंबरगीकरमहाराज म्हणाले, सीताबाई, आता असे करा, 'मुलाला रघुनाथ नावाने हाक न मारता, त्याला 'दाजीबा' या नावाने हाक मारीत जा. म्हणजे त्याचे जादा रडणे बंद होईल.' मुलगा महाराजांच्या मांडीवर असतानाच महाराज म्हणाले, 'काय दाजीबा, शेष साधन पूर्ण करण्याकरिताच या पृथ्वीतलावर अवतरलास काय?' असे म्हणताच श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या मुखाकडे पाहून हे मूल हसू लागले. हे रघुनाथ ऊर्फ दाजीबा म्हणजेच आमचे प.पू.सद्‌गुरू श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर.

श्रीनिंबरगीकरमहाराजांचे श्री. दाजीबा देशपांडे नावाचे एक अनुग्रहित होते. ते उमदी येथे रहात होते. त्यांच्या पत्नी निवर्तल्या. त्यानंतर ते निंबरगी येथे महाराजांच्या दर्शनास आले. त्यावेळी श्रीलक्ष्मीबाईअक्का तेथे होत्या. श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी दाजीबांना विचारले, 'कुटुंब (पत्नी) खुशाल आहे ना?' तेव्हा त्यांनी

आपल्या हस्तसंकेताने कुटुंब निवर्तले म्हणून सांगितले. नंतर श्रीदाजीबांनी महाराजांच्या पायावर मस्तक ठेवले आणि विनंती केली की 'आजपर्यंत मी आपल्या आश्रयाखाली होतो. आता मी एकलकोंडा राहिलो आहे. आता मजकडून जगात रहावत नाही. कृपा करून मला जाणेची आज्ञा द्या.' असे दाजीबा म्हणताच महाराज म्हणाले, 'बरे, उद्या जा' आणि आश्चर्य म्हणजे, दुसरे दिवशी दाजीबा निवर्तले. ही वार्ता निंबरगीस आली, तेव्हा निंबरगीतील साधक मंडळी हळहळली. तेव्हा महाराज म्हणाले, 'दाजीबाचे निम्मे साधन झाले असून, शेष साधन पूर्ण करणेकरिता तो पुन्हा कर्मभूमीवर येणार आहे. त्याबद्दल काळजी का करता?' जवळची मंडळी बोलली की या दाजीबांचे कुटुंब, सासूसासरे सर्वच मंडळी चांगली माणसे होती. अशी माणसे पुनः कशी मिळतील? हे ऐकून महाराज म्हणाले, 'अशीच चांगली माणसे पुढे मिळतील. पुढे जगून वाचून राहतील, ती माणसे याची प्रचिती पाहतील.' हेच दाजीबा पुढे श्रीचिमडच्या महाराजांच्या पोटी जन्माला आले. तेच ते श्रीदाजीसाहेबमहाराज.

इ.स. १८८८ मध्ये श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांना कन्यारत्न झाले. तिचे नाव 'कल्लव्वा' ठेवणेत आले. ही 'कल्लव्वा' ५ महिन्यांची असताना तिची प्रकृती बिघडून ती अत्यवस्थ झाली. तेव्हा श्रीतात्यासाहेबांचा चिमड येथे मुक्काम होता. सर्वजण चिंताग्रस्त झाले. श्रीतात्यासाहेबांच्या मातोश्रींनी आपली नात अत्यवस्थ आहे असे श्रीचिमडच्या महाराजांच्या कानावर घातले आणि तिच्यावर कृपा करावी अशी विनंती केली. हे ऐकून श्रीचिमडमहाराज हसून म्हणाले, 'अहो या मुलीला कोण अपाय करणार? ही मुलगी तर आमची सून आहे.' चिमडच्या महाराजांच्या कृपेने कल्लव्वांची तब्बेत सुधारली.

इ.स. १८९१ साली श्रीदाजीसाहेबमहाराजांना १० वे वर्ष पूर्ण होऊन ११ वे वर्ष सुरू झाले होते. श्रीचिमडच्या महाराजांनी यांचे लग्न उरकून घ्यावे असा विचार केला. ही बातमी श्रीतात्यासाहेबमहाराजांना कळली. ते चिमडला आले आणि चिमडच्या महाराजांना म्हणाले, 'मागे माझी मुलगी अत्यवस्थ असताना तुम्ही ही मुलगी माझी सून आहे असे म्हणाला होतात, त्याप्रमाणे ही माझी मुलगी तुमच्या मुलाला म्हणजे दाजीसाहेबांना देणार आहे.' तेव्हा चिमडचेमहाराज म्हणाले, 'अरे हणमंता, तेव्हा तुझ्या मुलीला बरे वाटावे म्हणून मी तसे बोललो होतो. तू तुझी मुलगी माझ्या मुलाला देऊ नको, तो अल्पायुषी आहे.' हे ऐकूनसुद्धा श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणाले, मी माझी मुलगी तुमच्या मुलाला देणार. केवढी ही गुरूनिष्ठा! या निष्ठेला जगात तोड नाही. याप्रमाणे श्रीदाजीसाहेब आणि कल्लव्वा यांचा वैशाख शु. ८ इ.स.१८९१ रोजी विवाह पार पडला.

इ.स.१८९१ मध्ये श्रीचिमडच्या महाराजांनी देह ठेवला. इ.स. १८९३ च्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात श्रीतात्यासाहेबमहाराज हे श्रीलक्ष्मीबाईअक्का, श्रीदाजीसाहेबमहाराज व कल्लव्वा यांना घेऊन निंबरगीस गेले. तेथे गेल्यावर या बालदांपत्याने (श्रीदाजीसाहेब व कल्लव्वा) श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या समाधीची जोडीने पूजा केली. या दरम्यान श्रीदाजीसाहेबमहाराज हे जरुरीपुरते इंग्रजी व संस्कृतचे शिक्षण घेण्यासाठी बेळगावला श्रीतात्यासाहेबमहाराजांकडे राहिले.

श्रीचिमडच्या महाराजांनी देह ठेवणेपूर्वी श्रीलक्ष्मीबाईअक्कांना सांगितले होते की, 'माझे पश्चात या संप्रदायाची सूत्रे तुम्ही श्रीदाजीबाला द्या.' याप्रमाणे श्रीदाजीसाहेबमहाराजांना संप्रदायाची सूत्रे श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी दिली. श्रीनिंबरगीकरमहाराजांचे सुपुत्र श्रीभीमाण्णामहाराज यांनी श्रीदाजीसाहेबांना अनुग्रह दिला. श्रीलक्ष्मीबाई अक्कांनी इ.स.१८९७ मध्ये देह ठेवला. त्यानंतर श्रीदाजीसाहेब मठाधिपती झाले. ज्ञानेश्वरी, दासबोध व इतर तत्सम ग्रंथावर प्रवचन करू लागले. श्रीदाजीसाहेबमहाराजांनी पुढीलप्रमाणे श्रीसाधुमहाराजांवर श्लोक रचना केली. :-

**'रघुनाथप्रियं स्वामिशिष्यं नारायणात्मकम् । तं श्रीसाधुमहाराजं वन्देऽहं गुरुरूपिणम् ।।१।।'**

श्रीदाजीसाहेबांच्या जातकानुसार ते अल्पायुषी होते. श्रीलक्ष्मीबाईअक्कांचे नंतर त्यांनी ३ वर्षे मठाचा कारभार चोखपणे सांभाळला. श्री. शंकरराव फडणीस यांना श्रीदाजीसाहेबांचा अनुग्रह होता. श्री. शंकरराव फडणीस यांना श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या कीर्तनात बुक्का लावण्याचा मान होता.

इ.स.१९०० सालच्या ऑगस्ट महिन्यात श्रीदाजीसाहेबांना बारीक ताप येऊ लागला. तथापि त्यांनी स्नान, आन्हिक, पुराणवाचन इ. रोजची कर्मे चालू ठेवली होती. त्यांच्यावर प्रथम काही दिवस घरगुती औषधोपचार चालू होते. पण त्याचा परिणाम झाला नाही. २० ऑगस्ट नंतर त्यांची प्रकृती अधिकच बिघडली आणि खाकऱ्यातून रक्त पडू लागले. श्रीदाजीसाहेब अत्यवस्थ आहेत ही बातमी सांगलीला श्रीतात्यासाहेबांना कळाली. त्यांनी आपले बंधू श्रीपुंडलिकराव व श्री. नानबा फडणीस या दोघांना तातडीने चिमडास पाठविले. ते दोघे चिमडास जाऊन पोचतात तो श्रीदाजीसाहेबांची प्रकृती त्यांना फारच बिघडलेली दिसली. तेथून लगेच ते सांगलीला परत आले आणि त्यांनी ही बातमी श्रीतात्यासाहेबांना सांगितली. आपल्या जावयाची स्थिती गंभीर आहे हे लक्षात येताच, ते सांगलीचे सुप्रसिद्ध राजवैद्य श्री.आबासाहेब सांभारे यांना घेऊन चिमडला पोहोचले. श्री. आबासाहेबांनी श्रीदाजीसाहेबमहाराजांची प्रकृती बघितली, त्यांना श्रीदाजीसाहेबांच्या प्रकृतीचे चिन्ह ठीक दिसले नाही पण ही गोष्ट उघड बोलून न दाखवता, ते ताबडतोब औषध पाठवून देतो असे सांगून, तेरदाळला निघून गेले. त्याच रात्री श्रीदाजीसाहेबांची प्रकृती आणखीनच बिघडली. पहाटेच्या सुमारास ऊर्ध्व लागला आणि भाद्रपद शु. ३ शके १८२२ दि.२८.०८.१९०० रोजी सकाळी ९ वाजता वयाच्या २० व्या वर्षी श्रीदाजीसाहेबमहाराजांनी देह ठेवला. या दिवशी सकाळी मठाच्या परिसरातील, श्रीसाधुमहाराज व श्रीचिमडमहाराज यांचे नावाने लावलेल्या दोन वृक्षांवरील सर्व पाने अकस्मात गळून पडली होती. अशाप्रकारे श्रीदाजीसाहेबांच्या अधिकाराची प्रचिती आली.

***

पहा दाजिबा सुत रामप्रभूचे । कृपाछत्र त्यांचेवरी सद्गुरूचे ।
मनी आठवी श्रीगुरूराज याला । नमस्कार साष्टांग माझा तयाला

--श्रीदासराममहाराज केळकर

# प.पू.श्रीशंकरमामा शिपूरकर

जन्म
दि.०९.११.१९०९

निर्याण
भाद्रपद शु.०३ शके १९०३
दि.१२.०९.१९८०

श्रीगोविंदपंत घोसरवाडकर हे घोसरवाड ग्रामी रहात होते. ते श्रीहालसिद्धनाथांचे उपासक होते. त्यांचे ठिकाणी हालसिद्धांचा संचार व्हायचा. प.पू.श्रीदासराममहाराज केळकर हे गोविंदपंतांना दहावे नाथ म्हणत असत. श्रीगोविंदपंतांना तीन पुत्र झाले. श्रीबाबूरावअण्णा, श्रीशंकरमामा व श्रीआप्पाराव हे ते तीन बंधू होत. यापैकी श्रीशंकरमामांचा जन्म घोसरवाड मुक्कामी दि.०९.११.१९०९ रोजी झाला. लहानपणी एकदा त्यांची आई श्रीशंकरमामांना देवाचे चरणावर घालणेसाठी नृसिंहवाडी येथे गेली होती. त्यावेळी परमहंस परिव्राजकाचार्य श्रीटेंबेस्वामीमहाराज तेथे आले होते. त्यांनी श्रीशंकरमामांचे अंगावर हात फिरवून आशीर्वाद दिला.

श्रीगोविंदपंत घोसरवाडकर हे मुलांच्या शिक्षणासाठी इ.स.१९१८ साली सांगलीला रहायला आले. यावेळी ते पांजरपोळाजवळ रहात होते. श्रीशंकरमामांना लहानपणापासून देवाचा छंद होता. पालखी काढणे, देवपूजा करणे, तलवारीसारखा खेळ खेळणे इ. त्यांचे आवडते छंद होते. त्यांचेकडे हालसिद्धनाथांचा बाण होता. त्याची ते नित्यनेमाने पूजा करीत. अचानक हा बाण हरवला. शोधाशोध केली, पण तो सापडला नाही. श्रीशंकरमामांनी नवीन मूर्ती घेऊन देण्याचा वडिलांकडे हट्ट धरला. त्याप्रमाणे श्रीगोविंदपंतांनी त्यांना मूर्ती आणणेकरिता पैसे दिले, श्रीशंकरमामा मूर्ती घेऊन आले आणि या मूर्तीची उपासना करू लागले. ती मूर्ती आजसुद्धा त्यांचे वंशजांच्या पूजेत आहे.

आर्थिक परिस्थितीपुढे श्रीमामांना दुसरीतच शाळा सोडावी लागली. मुंजीचे वय झाल्यावर त्यांची पांजरपोळात मुंज झाली. यथावकाश त्यांनी काही दिवस एका प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नोकरी केली. तेथून ते आपल्या मूळ गावी म्हणजे घोसरवाडला आले आणि इ.स.१९३२ साली श्रीशंकरमामा हे त्यांच्या आत्या गंगूबाई यांना दत्तक गेले. त्यामुळे त्यांचे नाव आता श्रीशंकरमामा शिपूरकर झाले. इ.स.१९३३ साली श्रीमामांचा विवाह करणेचे ठरले. त्याकरिता मुलगी बघण्यासाठी म्हणून ते किर्लोस्करवाडीला चालले होते. रेल्वेने प्रवास करत असताना त्यांच्या समोरच्या बाकावर एक गृहस्थ बसले होते. ते एकसारखे श्रीमामांकडे टक लावून पहात होते. त्या गृहस्थांनी श्रीशंकरमामांचा हात बघितला आणि विचारले, 'बाळ तू दत्तक आहेस का?' तेव्हा श्रीशंकरमामा म्हणाले 'होय'. दुसरा प्रश्न विचारला, 'बाळ, तू आत्ता मुलगी बघायला चाललास काय रे?' हा प्रश्न ऐकून श्रीशंकरमामा अवाक् झाले आणि 'हो' म्हणाले. त्या गृहस्थांची चौकशी ऐकल्यावर ते गृहस्थ म्हणजे मास्टर दीनानाथ मंगेशकर होते. मास्टर दीनानाथ हे एक निष्णात ज्योतिषी होते. श्रीशंकरमामांना या मास्टर दीनानाथांपासूनच ज्योतिषशास्त्राची स्फूर्ती मिळाली, त्याप्रमाणे त्यांनी त्याचा अभ्यास सुरू केला व श्रीशंकरमामाही पुढे निष्णात ज्योतिषी झाले. श्रीशंकरमामांना ज्योतिषशास्त्राचा नाद लागला. लोकांचे हात

बघून, चेहरा बघून किंवा कुंडली बघून ते भविष्य सांगत असत. त्यांनी सांगितलेले भविष्य तंतोतंत खरे व्हायचे.

श्रीशंकरमामांची शिपूर येथे जमीन होती. त्या जमीनीचा वाद सुप्रीम कोर्टापर्यंत गेला होता. श्रीहालसिद्धनाथांची यात्रा सुरू झाली. कोर्टातील केसची तारीख आणि घुमटासमोर भाकणुकीची तारीख ही एकच आली. श्रीशंकरमामांसमोर पेच निर्माण झाला. परंतु श्रीशंकरमामांनी ठरविले की, वाटेल ते झाले तरी देवाची भाकणूक चुकवायची नाही. कोर्टात त्या केसमध्ये दत्तकाचा अर्ज करणेबाबतचा पुरावा दाखल करणे जरुरीचे होते. तो पुरावा रातोरात मिळणे आवश्यक होते. यावेळी श्रीशंकरमामांच्या नातेवाईकांनी पराकाष्ठा करून तो पुरावा मिळवला. तो पुरावा कोर्टात दाखल करताच, मामांच्या बाजूने निकाल लागला आणि इकडे आप्पाच्या वाडीत देवाने संचारात सांगितले की, 'उद्या सकाळी ११.०० वाजता कोर्टात जातो आहे रे! काळजी करू नका.' देवाच्या आशीर्वादाने श्रीमामांचे ताब्यात ५० एकर जमीन आली.

श्रीशंकरमामांचा आणि प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. श्रीशंकरमामांनी आपला थोरला मुलगा प.पू.श्रीमधुकरपंत यांना श्रीदासराममहाराजांनी अनुग्रह द्यावा अशी इच्छा प्रगट केली होती. त्यानुसार श्रीदासराममहाराजांनी प.पू.श्रीमधुकरपंतांना अनुग्रह दिला. इ.स. १९७६ साली श्रीशंकरमामांनी घोसरवाड ग्रामी मोठा उत्सव साजरा केला. या उत्सवात प.पू.श्रीदासराममहाराजांचे रसाळ कीर्तन झाले.

श्रीशंकरमामांचा मेडिकल ॲस्ट्रॉलॉजीचासुद्धा अभ्यास होता. एका गृहस्थाला एक दुर्धर रोगाने पछाडले होते. डॉक्टरांनी त्याला ऑपरेशन करणेस सांगितले. तो गृहस्थ श्रीशंकरमामांच्याकडे आला व ऑपरेशनबाबत माहिती दिली. श्रीशंकरमामा त्याला म्हणाले, 'मी सांगितलेल्या दिवशी व वेळी, तू ऑपरेशन कर. तू त्यातून चांगला बरा होशील.' याप्रमाणे त्या गृहस्थाने त्या डॉक्टरांना सांगून त्या दिवशी व त्यावेळी ऑपरेशन केले. तो त्या दुर्धर रोगातून मुक्त झाला. तो पुढे कित्येक वर्षे आप्पाच्या वाडीला येत होता.

१९८० साली श्रीशंकरमामांना, वयोमानानुसार रूटीन चेकअप करण्यासाठी, श्रीमधुकरपंत दवाखान्यात घेऊन आले. तब्येत तपासल्यावर बाकी सर्व व्यवस्थित होते, पण हार्ट थोडे मोठे झाले होते. डॉक्टर म्हणाले, बाकी सर्व ठीक आहे, हे ऐकून श्रीशंकरमामा म्हणाले, 'तुम्ही ठीक आहे म्हणता हे ठीक आहे, पण माझी शाश्वती संपली आहे, हे मी पूर्ण जाणून आहे. त्यानंतर अमावस्या आली. श्रीशंकरमामा उत्साहाने श्रीआप्पाच्या वाडीला गेले. तेथे लोकांशी बोलताना ते सहज 'ही माझी शेवटची अमावस्या असेल' असे बोलून गेले.

एक दिवस श्रीमधुकरपंत हे श्रीशंकरमामांची तब्येतीची चौकशी करून, इस्त्रीचे कपडे आणण्यासाठी बाहेर पडले. श्रीशंकरमामांचा धाकटा मुलगा डॉ. अविनाश हे दवाखान्यात गेले. जवळ त्यांच्या दोन नाती होत्या. श्रीमामांनी आपल्या पत्नीला झोपेतच विचारले, 'वाजले किती?' पत्नीने 'दहा वाजले' असे सांगितले.

पत्नीने श्रीशंकरमामांना 'जेवणार का?' असे विचारले. श्रीशंकरमामांना पिठले फार आवडायचे. त्यामुळे श्रीशंकरमामा म्हणाले, 'पिठले कर म्हणजे मी जेवतो.' त्यांच्या पत्नी स्वयंपाकघरात पिठले करायला गेल्या आणि ही वेळ श्रीशंकरमामांनी बरोबर साधली. श्रीशंकरमामांच्या पत्नी बाहेर येऊन पहातात तो, त्यांची मान उशीवरून घसरून गादीवर टेकली होती. असे का झोपले आहात? असा प्रश्न श्रीमामांच्या पत्नीने केला व त्यांची मान सरळ केली. परंतु सगळे संपलेले होते. श्रीशंकरमामांनी श्रीहालसिद्धनाथांच्या अनुसंधानात भाद्रपद शु.३ शके १९०२, दि.१२.०९.१९८० रोजी, वयाच्या ७१व्या वर्षी देह ठेवला.

श्रीशंकरमामांनी आधीच सांगून ठेवले होते की, 'माझी राख गंगेत, कृष्णेत अगर कोणत्याही नदीत न टाकता, ती आप्पाचीवाडी आणि घोसरवाडच्या रस्त्यावर टाका. नाथभक्तांची पायधूळ लागली तर मला मोक्ष मिळणार आहे.' त्याप्रमाणे त्यांची रक्षा या दोन गावांच्या रस्त्यावर पसरली.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीशंकरमामा शिपूरकर यांची आरती**

आरती शिवशंकरा । तुझ्या हाती भंडारा ।
हालसिद्ध नाम घोषे । होसी सकळा सोयरा ।।ध्रु।।
जनक पिता गुरू । धन्य गोविंदनाथ ।
संचारी वर्तनाची । जगी झाले विख्यात ।।१।।
दत्तोपंत करवी देवे । चिमडपंथ दाविला ।
भजन चिमडाचे । बहु आवडे देवाला ।।२।।
बाबूराव अण्णा ऐसे । श्रेष्ठ बंधु लाभले ।
परंपरा चालवोनी । ज्यांनी नाव राखिले ।।३।।
**गोविंदसुत राम** । आठविती नाथलीला ।
अखंड कीर्तनाचा । वर देवे दिधला ।।४।।

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीशंकरमामा शिपूरकर यांचा निर्याणाचा अभंग**

शालिवाहन शके एकोणीसशे दोनीत । भाद्रपद शुद्धात तृतीयेसी ।।१।।
रुद्रशंकर हे रौद्र संवत्सरेसी । झाले नाथवासी दक्षिणायनी ।।२।।
याचा घेता शोध मनी होय बोध । भेटी झाली सिद्ध देव भक्ता ।।३।।
गोविंद स्वरूपी मिळोनिया गेले । कीर्तीरूपे उरले दासापाशी ।।४।।

# प.पू.सद्‌गुरू श्रीदादामहाराज कोटणीस

जन्म
दि.३१.१२.१८९९

निर्याण
भाद्रपद शु. ६, शके १८९५
रविवार दि.०२.०९.१९७३

प.पू.सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा विवाह चि.सौ.कां.तुळसाबाई या वधूशी वैशाख महिन्यात मध्यरात्रीच्या मूहूर्तावर इ.स.१८८१ साली झाला. वधूचे सासरचे नांव 'लक्ष्मी' असे ठेवणेत आले. या दांपत्याच्या पोटी दि.३१.१२.१८९९ रोजी पुत्र जन्माला आला. त्याचे नांव 'रघुनाथ' असे ठेवणेत आले. हा रघुनाथ म्हणजेच आमचे प.पू.सद्‌गुरू श्रीरघुनाथ हणमंत कोटणीस ऊर्फ श्रीदादामहाराज कोटणीस होत. महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का यांच्या कृपाशीर्वादाने यांचा जन्म झाला. चिमड मठातील मातोश्री प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांच्या सूचनेप्रमाणे श्रीदादामहाराजांचा व्रतबंध वैशाख शु.१ शुक्रवार दि.०१.०५.१९०८ रोजी चिमडमठात पार पडला. त्यांचे जरुरीपुरते शिक्षण सांगली आणि पुणे येथे झाले.

श्रीदादामहाराजांना गुरूवार दि.२०.०७.१९१६ साली श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला. पुढे ते आपल्या पितृदेवांच्या देखरेखीखालीच वकिलीचा अभ्यास करू लागले. त्यांचे लग्नाचे वय झाले म्हटल्यावर लग्नाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. त्याप्रमाणे अथणी येथील वकील श्री. अनंत श्रीनिवास दातार यांची कन्या सुभद्राबाई यांचेशी त्यांचा विवाह सांगली येथील कुंटेवाड्यात झाला. या विवाहाला कुरुंदवाडचे पटवर्धन सरकार जातीने उपस्थित होते. सासरी मुलीचे नांव 'जानकीबाई' असे ठेवणेत आले. त्यांना पुढे सर्व लोक 'जानकीवहिनी' म्हणू लागले. विवाहानंतर कुरुंदवाड येथे वकिलीची सनद काढून तेथे श्रीदादामहाराजांनी वकिली सुरू केली. सौ.जानकीवहिनींनी आपले श्वशूर श्रीतात्यासाहेबमहाराज यांचेकडून अनुग्रह घेतला.

आपल्या चिमड संप्रदायाची पंचपदी पुस्तकरूपाने प्रकाशित करणेचा विचार श्रीदादामहाराजांच्या मनात आला आणि तो त्यांनी आपले पितृदेवांसमोर प्रगट केला. त्यानुसार श्रीतात्यासाहेबमहाराजांनी या पंचपदीबरोबरच त्यात इतर साधुसंतांची काही निवडक पदे घालावीत असे सुचविले. या पदांची निवड श्रीतात्यासाहेबमहाराजांनी केली. पंचपदी व इतर संतांची पदे असे मिळून, इ.स.१९२१ च्या जुलै महिन्यात हे पुस्तक 'कैवल्य वैभव' या नावाने प्रसिद्ध झाले. हा 'कैवल्य वैभव' हा ग्रंथ आपल्या संप्रदायाचा 'ग्रंथसाहेब' आहे, असे माझे आजोबा प.पू.श्रीदासराममहाराज केळकर म्हणत. इ.स. १९२२ साली श्रीदादामहाराज हे आपल्या पितृदेवांसमवेत निंबरगी यात्रेला गेले. श्रीदादामहाराज आणि सौ. जानकीबाई या दांपत्याच्या पोटी ३१.०३.१९२३ रोजी पुत्र जन्माला आला. पण हा मुलगा अल्पायुषी होता. लवकरच तो निवर्तला. श्रीतात्यासाहेबमहाराजांनी प्रसाद म्हणून श्रीदादामहाराजांना चांदीच्या पादुका दिल्या.

श्रीतात्यासाहेबमहाराजांनी पौष व.६ इ.स.१९२४ साली महाप्रयाण केले. त्यांच्या महाप्रयाणानंतर

श्रीदादामहाराज कोटणीस यांनी त्यांची कीर्तनपरंपरा पुढे चालू ठेवली. श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या निर्याणानंतर श्रीदादामहाराजांनी आपल्या राहत्या घरी महाराजांची चलसमाधी केली आणि सांप्रदायिक परंपरेप्रमाणे आराधना उत्सव सुरू केले. तसेच ज्या व्यासपीठावर बसून तात्यासाहेबमहाराज कीर्तन करीत, त्यावर तात्यासाहेबमहाराजांच्या पादुका ठेऊन, त्यांच्या पूजेचे तीर्थ तात्यासाहेबांच्या पादुकांवर पडेल अशी व्यवस्था करुन श्रीतात्यासाहेबांची एक इच्छा पूर्ण केली.

श्रीदादामहाराजांना अचानक एक स्फूर्ती झाली की आपण श्रीरामदासस्वामींच्या दासबोधाची एक प्रत आपल्या हस्ते लिहून काढावी. त्याप्रमाणे ती त्यांनी लिहून काढली. यानंतर श्रीदादामहाराजांना काही पारमार्थिक अनुभव आले. हे वर्णन करणारा 'स्फूर्तीदशक' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. निंबरगी येथे निंबरगीकर महाराजांचे स्मारक म्हणून एक वृंदावन होते. हे वृंदावन हालवून त्याजागी श्रीदादामहाराजांनी निंबरगीकरमहाराजांची सुंदर समाधी बांधवून घेतली.

श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या निर्याणानंतर काही वर्षांनी घरमालक सोवनसी यांनी श्रीदादामहाराजांना आपले बिऱ्हाड - वाडा सोडून जाणेस सांगितले. त्यामुळे त्यांनी नवीन वास्तु उभारणेचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी सांगलीच्या एस.टी.स्टॅण्डजवळ जागा घेतली. बांधकामाचा मोठा प्लॅन केला, पण पैशांची अडचण निर्माण झाली. ही गोष्ट त्यांच्या पत्नी सौ. जानकीवहिनी यांच्या कानावर गेली. सौ. जानकीवहिनींना त्यांचे लग्नात त्यांचे मामंजी श्रीतात्यासाहेबमहाराजांनी सोन्याने नखशिखांत मढवले होते. हा सोन्याच्या दागिन्यांचा डबा त्यांनी श्रीदादामहाराजांचे समोर ठेवला आणि याला सराफकट्टा दाखवा म्हणून सांगितले. या पैशातूनच खऱ्या अर्थाने वास्तू उभी राहिली. या वास्तूला 'कैवल्यधाम' असे नामकरण केले. आमचे आजोबा प.पू.श्रीदासराममहाराज याबाबत म्हणत असत की, 'कैवल्यधाम' हे जानकीवहिनींच्या त्यागाचे प्रतिक आहे. अशा जानकीवहिनींनी इ.स. १९४२ मध्ये देह ठेवला. त्यांना मूलबाळ नव्हते, म्हणून लोकांच्या आग्रहास्तव श्रीदादामहाराजांनी मिरज येथील श्री. म. के. कुलकर्णी यांच्या मैना नामक कन्येशी दुसरा विवाह केला. त्यांचेही नाव जानकीवहिनीच ठेवणेत आले व यांचे पोटी प.पू.श्रीगुरुनाथमहाराज, प.पू.श्रीश्रीकांतमहाराज व कन्या सौ. लीला अशी अपत्ये झाली.

श्रीदादामहाराजांनी तात्यासाहेबांच्या निर्याणानंतर कीर्तनसेवा सुरू केली आणि या सेवेला १९४९ साली २५ वर्षे पूर्ण म्हणून रौप्यमहोत्सव साजरा करणेत आला. यावेळी ७ दिवसांचे संतसंमेलन भरविण्यात आले. यावेळी श्रीधुंडामहाराज देगलूरकर, श्रीसोनोपंत दांडेकर, श्रीगुंडामहाराज, पैठणचे भैय्यासाहेबमहाराज इ. संत उपस्थित होते. १९५८ साली श्रीदादामहाराजांचा शष्ठ्यब्दपूर्ती समारंभ साजरा झाला.

इ.स.१९७० मध्ये श्रीदादामहाराजांना ७१ वे वर्ष लागले. त्यानिमित्ताने त्यांच्या शिष्यवर्गाने त्यांचा अमृतमहोत्सव साजरा केला. अमृतमहोत्सवानंतर हळूहळू श्रीदादामहाराजांची प्रकृती बिघडत चालली.

पूर्वीपासून त्यांना रक्तदाबाचा त्रास होता. त्यांचे पुतणे डॉ.माधवराव कोटणीस यांचे औषध त्यांना सुरू होते. श्रीदादामहाराज कोटणीस हे वारंवार आमचे आजोबा श्रीदासराममहाराज केळकर यांना घरी बोलवू लागले. त्याप्रमाणे श्रीदासराममहाराज हे त्यांचेकडे जात असत. घरची मंडळीही म्हणत की, तुम्ही ती. दादांजवळ बसला म्हणजे त्यांना बरे वाटते. तुमच्यापाशी जितके ते मनमोकळे बोलतात, तसे ते आमच्याशी बोलत नाहीत. तुम्ही येऊन त्यांच्याजवळ बसत जा. याप्रमाणे श्रीदासराममहाराज वेळ मिळेल. त्याप्रमाणे त्यांचेकडे जाऊन बसू लागले. श्रीदादामहाराजांची प्रकृती इतकी व्याकुळ होती की त्यामुळे जास्त वेळ त्यांचेजवळ बसणेचे धैर्य श्रीदासराममहाराजांना होत नव्हते. एक दिवस श्रीदादामहाराज श्रीदासराममहाराजांना म्हणाले, 'रामभाऊ, आता या जगाचा निरोप घ्यावा असे वाटते. या देहाचा कंटाळा आला आहे. परस्वाधीन किती दिवस रहायचे?' हे ऐकल्यावर श्रीदासराममहाराज म्हणाले, 'दादा, तुम्ही असे का म्हणता? आजपर्यंत महाराजांनी तुम्हाला काय कमी केले आहे? राजैश्वर्याने सर्व काही व्यवस्थित आहे आणि घरातील सर्वजण आपल्या तब्येतीची काळजी घेतात. दादा तुम्ही असे म्हणू नका. शिवाय आपल्या संप्रदायात तुमचे सारखी मोठी माणसे आहेत तरी कोण? मला तरी आमचे मामांनंतर तुमचाच खरा आधार आहे. तुम्ही असे म्हणू नका. त्यापेक्षा मीच आता बेता-बेतानेच येईन म्हणजे झाले.' हे ऐकल्यावर श्रीदादामहाराज म्हणाले, 'रामभाऊ, तुम्ही असे करु नका. तुम्ही आला म्हणजेच खरे मला औषधाशिवाय बरे वाटते. फक्त मी एवढ्याकरताच म्हटले की, जगात आता मजा राहिली नाही. जगाला अनिष्ट वळण लागलेले आहे आणि याच काळात परमेश्वराने आम्हास जन्मास घातले आहे.' हे ऐकून श्रीदासराममहाराज म्हणाले, 'दादा, यात देवाचा काहीतरी हेतू आहे. आपणच या परिस्थितीशी मुकाबला करणेस योग्य असलो तर?' हे ऐकल्यावर मात्र श्रीदादामहाराज हसू लागले व म्हणाले, 'रामभाऊ, मी आपले उगीच म्हटले.'

श्रीतात्यासाहेबमहाराजांचे निःस्सीम भक्त श्रीगंगाधरराव दीक्षित एकदा श्रीदासमहाराजांना म्हणाले, 'मी आता लवकरच श्रीतात्यासाहेबांची समाधी उत्तम तयार करवून त्यात पादुकांची स्थापना श्रीदादामहाराजांचे हस्ते करणार आहे. पाहुया कसे जमते ते.' ही मोठ्या आनंदाची गोष्ट असलेने श्रीदासराममहाराजांनी ही गोष्ट श्रीदादामहाराजांना सांगितली. हे ऐकून श्रीदादामहाराज म्हणाले, 'रामभाऊ, आता ते काय होणार? आता आमची हाडे समाधीत जातील.' या बोलण्याचाच आशय श्रीदासराममहाराजांना उमगला नाही. पण हे बोललेले खरे घडले.

श्रीदादामहाराजांनी आपले आयुष्यात अनेक ग्रंथ लिहिले व काही संपादित करुन प्रकाशित केले. यात प्रामुख्याने कैवल्यकुसुम, कैवल्यबोध, कैवल्यमार्ग, कैवल्यवैभव दुसरी आवृत्ती, कैवल्य पुरूष खंड १ व कैवल्य पुरुष खंड २, कैवल्य मनोबोधिनी, कैवल्य विधी असे इतर अनेक ग्रंथ होत.

इ.स.१९७३ च्या वैशाख-ज्येष्ठ-आषाढ या तीन महिन्यांचे अवधीत श्रीदादामहाराजांना दृष्टांत झाले. त्याचा उच्चार श्रीदादामहाराजांनी कुणाजवळच केला नाही, पण मुद्दाम श्रीदासराममहाराजांना बोलावून हे

दृष्टांत सांगितले. हे दृष्टांत उपलब्ध आहेत. पण विस्तारभयास्तव हे येथे दिले नाहीत. इ.स.१९७३ मधील भाद्रपद महिना उजाडला. भाद्रपद शु.३ ला प.पू.सद्‌गुरू श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर यांची आराधना होती. या वेळेस श्रीदादामहाजारांची तब्येत बरी नव्हती. यामुळे श्रीदासराममहाराजांनी कैवल्यधाममध्ये जाऊन ती आराधना केली. आराधना झाल्यावर श्रीदासराममहाराज हे श्रीदादामहाराजांच्या दर्शनास गेले. त्यावेळी श्रीगुरूनाथमहाराजांनी श्रीदादामहाराजांना सांगितले की, आज श्रीदाजीसाहेबांची आराधना श्रीदासराममहाराजांनी केली. हे ऐकून श्रीदादामहाराजांच्या डोळ्यातून अश्रुधारा सुरू झाल्या. शुक्रवार, शनिवारचा दिवस गेला. त्यारात्री लक्षण काही बरे दिसेना. श्री.माधवराव कोटणीस यांना भजन म्हणायला सांगितले. ते ऐकून श्रीदादामहाराजांना फार आनंद झाला आणि दर गुरुवारी भजन करीत जा म्हणून सांगितले. श्रीगुरूनाथमहाराजांना जे सांगावयाचे होते, ते ते या आधीच श्रीदादामहाराज यांनी सांगून ठेवले होते. श्रीदादामहाराजांना आपल्या प्रकृतीचा भरवसा वाटेनासा झाला. भाद्रपद शु.पंचमी, शनिवार या दिवशी श्रीदादामहाराजांनी आपले चिरंजीव श्रीगुरूनाथमहाराज कोटणीस यांचेकडे आपली परंपरा सुपूर्त केली. भाद्रपद शुद्ध ६ चा दिवस उजाडला. सकाळी श्रीगुरूनाथमहाराज व त्यांच्या सौभाग्यवती सौ. उषाताई यांनी श्रीदादामहाराजांचे मुखात चिमडचे तापनाशी तीर्थ घातले. श्रीदादामहाराजांच्या थोरल्या भगिनी ती.कल्लव्वाक्कांना श्रीदादामहाराजांची भेट घालून दिली. भाद्रपद शु.६ शके १८९५ रविवार दि.०२.०९.१९७३ या दिवशी सकाळी ७.०० वाजता वयाच्या ७४व्या वर्षी श्रीदादामहाराजांनी महाप्रयाण केले.

यानंतर त्यांची मोठी अंत्ययात्रा निघाली आणि कृष्णाकाठी असणाऱ्या प.पू.सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे समाधीचे मागील जागेत श्रीदादामहाराजांचे दहन करणेत आले. या दहन जागेवर डॉ. श्री. माधवराव कोटणीस यांनी वृंदावन स्थापन केले आणि या वृंदावनात श्रीदादामहाराजांच्या पादुकांची स्थापना ह.भ.प. श्रीगोपाळराव रिसबूड यांचे अध्यक्षतेखाली व गु.भ.प. श्री.आर.एन.जोशी यांचे हस्ते झाली. श्रीदादामहाराज एकवेळ श्रीदासराममहाराजांना म्हणाले होते की, 'मी आता कुठला समाधीत येतोय, आता माझी हाडेच समाधीत जाणार.' हे वाक्य खऱ्या अर्थाने खरे झाले. खरेच श्रीदादामहाराजांनी आपल्या तीर्थरूपांचे व सद्‌गुरूंचे स्थानात अखेरची विश्रांती घेतली.

***

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीदादामहाराज कोटणीस यांचा निर्याणाचा अभंग**

शालिवाहन शके अठराशे पंच्याण्णवात । प्रमादि संवत्सरात दक्षिणायन ।।१।।
भाद्रपद शुद्ध षष्ठी रविवार । प्रथम प्रहर दुसरे तासी ।।२।।
रघुनाथराये केलेसे निर्याण । स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ।।३।।
ऐक्य झाले तेणे दिवस गोड झाला । जनी या जोडला नारायण ।।४।।
हनुमंतरूपी मिळोनिया गेले । कीर्तीरूपे उरले दासापाशी ।।५।।

# प.पू. श्रीगणपतरावमहाराज कन्नूर

जन्म
भाद्रपद शु.४, शके १८३१
सोमवार, इ.स. १९०९

निर्याण
भाद्रपद शु.०७ शके १९२६
सोमवार दि.२०.०९.२००४

कर्नाटक राज्यात विजापूर जिल्ह्यात, कन्नूर हे गाव आहे. या गावात श्री.सदाशिवराव कन्नूर नावाचे सुशील, धार्मिक गृहस्थ रहात होते. त्यांचेकडे गावचे कुलकर्णीपद होते. त्यांच्या पत्नीचे नाव सौ. गंगाबाई. या दांपत्यांना दादा, शिवरामपंत व गुंडू असे तीन सुपुत्र झाले.

यापैकी श्रीशिवरामपंत हे वैदिक धर्मनिष्ठ होते. तसेच ते एक सात्विक वृत्तीचे कर्तबगार अधिकारी होते. ते दररोज संध्या, देवपूजा, वैश्वदेव करून गुरूचरित्र वाचत असत. यांच्या पत्नीचे नाव सौ. सरस्वतीबाई. या दांपत्याच्या पोटी भाद्रपद शु. चतुर्थी शके १८३१, सोमवार दि.१९०९ साली पहाटे ब्राह्ममुहुर्तावर पुत्र जन्माला आला. गणेश चतुर्थीदिवशी बाळाचा जन्म झाला म्हणून या बाळाचे नांव 'गणपती' ठेवणेत आले. लहानपणापासूनच पूजा, स्तोत्र म्हणणे, देवपूजा करणे इ. संस्कार हे वडिलांमुळे त्यांच्यावर झाले. हा गणपती म्हणजेच आमचे प.पू.श्रीगणपतरावमहाराज कन्नूर होत.

शाळेचे वय झाल्यावर महाराजांना विजापूर येथील म्युनिसिपल शाळेत घातले. महाराजांची बुद्धि कुशाग्र होती. ते हुशार होते. त्यामुळे त्यांचा वर्गात पहिला नंबर असे. शिष्यवृत्ती परीक्षेत ते विजापूर जिल्ह्यात प्रथम आले. शाळेत ते 'आदर्श विद्यार्थी' म्हणून प्रसिद्ध होते. त्यामुळे ते शाळेचे भूषण होते.

इ.स. १९१९ साली गाणगापूर येथे महाराजांचे मौजीबंधन झाले. कन्नड चौथीपर्यंतचे शिक्षण झाल्यावर महाराजांना विजापूर येथील श्रीकृष्ण पाठशाळेत घातले. महाराज लहान असतानाच त्यांची आतेबहीण ती. रुक्माक्का यांनी सद्गुरू शरणागतीचे महत्त्व पटवून दिले होते. यामुळे लहानवयातच त्यांना सद्गुरूभेटीची तळमळ निर्माण झाली. इ.स. १९२९ साली जून महिन्यात, स.स.श्रीसिद्धरामेश्वरमहाराज हे मुंबईहून विजापूरला आले होते. यावेळी श्रीगणपतमहाराजांना श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांचा अनुग्रह झाला. श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांनी त्यांना सकाळी २ तास व सायंकाळी २ तास ध्यान करणेची आज्ञा केली. याप्रमाणे महाराज ध्यान करू लागले.

इ.स. १९२७ साली महाराज चांगल्या गुणांनी मॅट्रिक परीक्षा पास झाले. यामुळे वडिलांनी त्यांना कॉलेज शिक्षणासाठी सांगली येथील विलिंग्डन कॉलेजमध्ये घातले आणि त्यांना इ.स.१९३२ साली बी.एस्सी. पदवी प्राप्त झाली. १९३६ साली स. स. श्रीसिद्धरामेश्वरमहाराज यांनी देह ठेवला. श्रीसिद्धरामेश्वर महाराजांनी देह ठेवल्यानंतर इंचगेरी मठातील त्यांच्या शाखेची सर्व जबाबदारी श्रीगणपतरावमहाराजांनी स्विकारली. इ.स.१९६९ साली श्रीगणपतरावमहाराजांचा षष्ठ्याब्दी सोहळा साजरा करणेत आला. श्रीगणपतरावमहाराजांनी साधन सिद्धतेकरिता बरेच भ्रमण केले, ध्यानधारणा केली आणि गुरूपदवी प्राप्त करून घेतली. आवडीने

येणाऱ्या साधकांना ते अनुग्रह देऊ लागले. श्रीमहाराज हे आपल्या कन्नूर येथील शेतावर कायमचे वास्तव्यास आले. त्यामुळे त्यांचे दर्शनासाठी, बोध ऐकण्यासाठी शिष्यमंडळी त्यांचेकडे येऊ लागली. या शिष्यांच्या सोयीसाठी महाराजांनी सुरवातीला ३ खोल्या बांधल्या आणि हळूहळू याचा विस्तार होत, त्याचे मठात रुपांतर झाले. या त्यांच्या मठालाच ''शांतीकुटीर आश्रम'' म्हणतात. या आश्रमातच महाराजांनी सगळे सप्ताह सुरू केले. इ.स.१९७५ साली श्रीगणपतरावमहाराजांचा अमृतमहोत्सव (७५ वर्षे) साजरा करणेत आला. यावेळी त्यांना स.स.श्रीकाडसिद्धेश्वरस्वामीमहाराज यांचे समवेत हत्तीवर बसविले होते व मिरवणूक काढली होती.

प.पू.श्रीदासराममहाराज व प.पू.श्रीगणपतरावमहाराज यांचे खूप स्नेहसंबंध होते. ते अनेकदा श्रीरामनिकेतन येथे येऊन गेले आहेत. दोघांच्या भेटीत अध्यात्मिक चर्चा होत असे.

अशा या श्रीगणपतरावमहाराजांनी भाद्रपद शु.सप्तमी, शके१९२६ सोमवार दि.२०.०९.२००४ रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी विजापूर येथील कन्नूर हाऊसमध्ये देह ठेवला.

***

# प.पू. श्रीनारायणमहाराज मळणगावकर

जन्म
ज्येष्ठ शु.१४, शके १८१४
इ.स. १८९२

निर्याण
भाद्रपद शु.०९ शके १८६५
इ.स. १९४३

प.पू.श्रीनारायणमहाराज मळणगावकर यांचा जन्म मळणगाव येथे ज्येष्ठ शु.१४ शके १८१४ म्हणजे इ.स.१८९२ मध्ये झाला. श्रीनारायणमहाराजांनी श्रीभानुदासमहाराजांकडून अनुग्रह घेतला होता.

श्रीनारायणमहाराज हे उत्कृष्ट निरूपण करीत. पटवर्धन सरकारांच्या गणपती मंदिरामध्ये, तसेच राजवाड्यातील दरबार हॉलमधे त्यांची निरुपणे होत असत. प.पू.श्रीदादासाहेबमहाराज कोटणीस यांनी त्यांचे कैवल्यधामामधे निरुपण ठेवले होते. तेव्हा त्यांनी '**रंगी रंगे नारायणा । उभा करितो कीर्तना ।।१।। हाती घेऊनिया वीणा । कंठी राहे नारायणा ।।२।। देखिलीसे मूर्ती । माझ्या हृदयीची विश्रांती ।।३।। तुका म्हणे देवा । देई कीर्तनाचा हेवा ।।४।।**' या श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगावर निरुपण केले. त्या निरूपणाला फारच रंग चढला होता. श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. श्रीनारायणमहाराजांचा सगळ्या संस्थानिकांशी संबंध होता. ते राजयोगी होते. त्यांचा पलंग, सोन्याच्या जरीची टोपी व पर्शियन कोट बघितला म्हणजे आपणास याची कल्पना येईल. या सर्व वस्तू त्यांच्या सांगली येथील गवळी गल्लीतील मठात पहावयास मिळतात.

कोल्हापूरच्या छत्रपती श्रीशाहूमहाराजांनी श्रीनारायणमहाराजांना दरबारात बोलावले. हे खरे संत आहेत का ? हे पहाण्याचा त्यांचा उद्देश होता. श्रीनारायणमहाराजांचेवर प्रेम करणाऱ्या प्रेमीजनांनी, आपण जाऊ नये अशी विनंती केली. पण श्रीनारायणमहाराज म्हणाले, 'आपण काय होते ते पाहू या.' याप्रमाणे ते छत्रपतींच्या विनंतीनुसार कोल्हापूरला गेले. छत्रपतींनी छाती एवढ्या उंचीची दोन शिकारी कुत्री राजवाड्याच्या दारात बांधून ठेवली होती. महाराजांनी राजवाड्यात प्रवेश करताच त्यातील एका कुत्र्याला 'छू' म्हणून महाराजांच्या अंगावर सोडले. त्या कुत्र्याची व महाराजांची दृष्टादृष्ट होताच ते कुत्रे महाराजांचे पाय चाटू लागले. हे पाहून छत्रपतींसह सर्वजण थक्क झाले. छत्रपती महाराजांवर प्रसन्न झाले व काय वाटेल ते मागा म्हणाले. महाराज म्हणाले, 'मला बाकीचे काही नको, हे माझ्या अंगावर सोडलेले कुत्रे तेवढे द्या.' त्याप्रमाणे ते कुत्रे छत्रपतींनी महाराजांना दिले. ते घेऊन महाराज सांगलीला आले. महाराजांनी देह ठेवल्यावर बरोबर तीन दिवसांनी त्या कुत्र्यानेही निर्याण केले.

श्रीगुंडुबुवा, श्रीनारायणमहाराज मळणगावकर व श्रीशंकरमहाराज मिरीकर हे समकालीन होते. त्यांची कधीही एकमेकांशी भेट नसायची. पण ते तिघेही एकमेकांना पूर्ण जाणून होते. ''**साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले । अवघे मिळोनी एकचि झाले । देहातीत वस्तु ।।७.२.३१।। दासबोध**''

संतमहात्मे देहाने वेगळे दिसत असले तरी, अंतर्यामी स्वरूपी मिळून गेलेले असल्याने एकच असतात. हे तिघेही अक्कलकोट स्वामी समर्थांच्या परंपरेतील होते. श्रीगुंडुबुवा एखाद्याला म्हणत की, 'नाऱ्या, (नारायणमहाराज) पंढरपूरच्या विठोबासमोर नाचतोय बघ' आणि नारायणमहाराज हे सांगलीत मठात व पंढरपूरच्या विठोबापुढेही नाचत आहेत हे दृश्य भाविकांनी पाहिले आहे. इकडे श्रीनारायणमहाराज म्हणत,

गुंडुबुवाला त्रासून बुधगावकर सरकारनी त्याला कुठेही नेऊन कोंडले तरी तो पुन्हा बुधगावात येणारच. याप्रमाणे गुंडुबुवांना सरकारांनी पंढरपूर, पाटगाव वगैरे कोठेही नेऊन सोडले तरी ते पुन्हा बुधगावला येऊन राजवाड्यासमोर नाचल्याचे लोक श्रीनारायणमहाराजांना सांगत. तेव्हा ते हसायचे आणि म्हणायचे, 'अरे तो अवलिया आहे., तुम्हाला कळणार नाही.'

श्रीनारायणमहाराज हे एकदा आळंदी येथे गेले होते. आळंदीच्या घाटावर उभारलेले होते. आळंदीतील डोहामध्ये देवच मासे होऊन राहिले आहेत अशी त्या काळात भक्तांची श्रद्धा होती. त्यामुळे दरवर्षी उपस्थित संतमहात्मे हे इंद्रायणीमधील माशांना लाह्या घालायचे. त्या लाह्या खाण्यासाठी सर्व मासे उड्या मारुन वर यायचे. पण यावर्षी लाह्या टाकूनसुद्धा मासे वर यायला तयार नाहीत. तेव्हा तेथील एकजण म्हणाले, आता असे करा की, श्रीनारायणमहाराज यांच्या हातून लाह्या माशांना टाका. याप्रमाणे श्रीनारायणमहाराजांनी माशांना लाह्या टाकल्या मात्र सगळे मासे उड्या मारत लाह्या खाण्यासाठी वर आले. तेव्हा तेथील उपस्थित संतमहात्म्यांना श्रीनारायणमहाराजांचा अधिकार कळला.

श्रीनारायणमहाराजांचे एका ठिकाणी निरुपण होते आणि त्यांच्या पेटीच्या साथीला श्री. मोरबा कुलकर्णी बसले होते. अभंग वाजवताना मोरबांचा पेटीचा सूर चुकला. हे बघून श्रीनारायणमहाराजांनी कीर्तनातच त्यांच्या थोबाडीत मारली. थोबाडीत मारली म्हणून मोरबा रागावलेही नाहीत आणि नाराज होऊन पेटी सोडूनही गेले नाहीत. श्री. मोरबा म्हणायचे की, श्रीनारायणमहाराजांकडून थोबाडीत खाल्ली म्हणून मी चांगली पेटी शिकलो व त्यांचेमुळेच मी भजनपटू झालो.

बुरूडगल्लीमधे श्रीनारायणराव सुपेकर यांचे वडील रहात होते. त्यांना २००/- रुपयांची नड होती. म्हणून ते श्रीनारायणमहाराज यांना मागायला गेले. श्रीनारायणमहाराज पलंगावर बसले होते. ते त्यांना म्हणाले, मी बसलेल्या पलंगाच्या खाली एक पेटी आहे. त्या पेटीतले २००/- रुपये घे आणि तुझी काय नड आहे ती भागव. त्याप्रमाणे श्री. सुपेकरांनी ती पेटी उघडताच पेटी नोटांनी गच्च भरलेली होती. त्यांनी त्यातील २००/- रुपये काढले आणि घेऊन गेले. त्यांचे काय काम होते ते त्यांनी केले आणि काही वेळाने ते परत पैसे देणेकरता महाराजांचेकडे आले. महाराजांनी सांगितले ज्या पेटीतून पैसे घेतलेस, त्या पेटीत ठेव. श्री. सुपेकर त्या पेटीत पैसे ठेवणेकरिता जातात तो पेटी पूर्ण रिकामी होती.

श्रीमळणगावकरमहाराज यांनी दोन बी.ए.च्या विद्यार्थ्यांना, तुम्ही उत्तम पास व्हाल असा आशीर्वाद दिला. या दोघांनी हा आशीर्वाद खोटा करण्याकरिता अभ्यासच केला नाही. परीक्षेस बसले आणि चांगले पास झाले. मग त्यांना आशीर्वादाचे महत्व कळले.

श्रीनारायणमहाराज मळणगांवकर हे मळणगावी गेले होते. सुगंधाबाई प्लेगने अत्यवस्थ होती. महाराजांचे दर्शन व्हावे, आपण तर जाणारच असे त्या भोळ्या बाईला वाटले. लोकांनी महाराजांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा महाराज म्हणाले, 'अरे ती मरत नाही.' लोक म्हणाले, महाराज तुम्ही चेष्टा करीत आहात, पण तिचा जीव चालला आहे. मग महाराज त्या बाईजवळ आले व काय होत आहे तुला? असे म्हणाले. तेव्हा तिच्या मुलाने सांगितले, 'तिला प्लेगच्या ७ गाठी उठल्या आहेत.' तेव्हा महाराज म्हणाले, 'कुठे आहेत बघुया.' महाराजांनी पांघरूण बाजूला केले व त्या गाठींवरून हात फिरवताच, गाठी नाहिशा झाल्या. १५ मिनिटात बाई

उठून बसली. सर्व लोक महाराजांना शरण आले. सांगलीच्या राजेसाहेबांचा हत्ती रोज सकाळी नगर प्रदक्षिणेच्यावेळी मळणगावकरमहाराजांच्या मठासमोर येत असे व सोंड वर करून नमस्कार करीत असे.

श्रीतात्यासाहेबमहाराजांनी देह ठेवल्यावर पहिल्या वर्षीच पुण्यतिथीला श्रीनारायणमहाराज मळणगांवकर आपणहोऊन सांगलीस येऊन श्रीहनुमान समाधी मंदिरात आले व 'सद्‌गुरूवाचोनी सापडे ना सोय ।' या अभंगावर त्यांनी नाचत निरूपण केले. त्यांना देहभान राहिले नाही. किती वाजले याचा हिशोबच नाही. हे भक्ती-प्रेम पाहून सर्वांना आश्चर्य वाटले.

असेच एकदा श्रीनारायणमहाराज हे त्यांचे गुरू श्रीभानुदासमहाराज यांच्या दर्शनाकरिता हिमालयात गेले. नाथषष्ठीला ते कीर्तन करीत असत. ते इथे नसलेने त्यांनी आपल्या शिष्यांना श्रीदासराममहाराज केळकर यांचे निरूपण ठेवा म्हणून सांगितले. त्याप्रमाणे आमच्या श्रीदादांचे, श्रीमळणगावकरमहाराजांचे मठात निरूपण झाले. निरूपण झालेवर काही दिवसांनी आमचे घरी हिमालयातून तार आली. ती तार श्रीनारायणमहाराजांनी पाठविली होती. त्या तारेत महाराजांनी लिहिले होते की, 'रामभाऊ, तुमचे निरूपण ऐकून मला खूप आनंद झाला.'

हिमालयातून परत आल्यावर श्रीनारायणमहाराजांनी पुन्हा एकदा त्यांच्या मठात श्रीदादांचे निरूपण ठेवले. एका शिष्याला दरबारी हार आणायला लावला. तो हार श्रीदादांच्या गळ्यात घालायला लागले. तेव्हा दादा म्हणाले, महाराज मी गळ्यात हार घालून घेत नाही. तेव्हा महाराज म्हणाले, 'रामभाऊ, तुम्हाला या मठाचा सगळा चार्ज देतोय. इथून सगळी निरुपणे तुमची व्हायची आहेत.' एवढा श्रीनारायणमहाराजांचा दादांवर लोभ होता. त्यानंतर दरवर्षी श्रीनारायणमहाराजांच्या पुण्यतिथीला व एकनाथ षष्ठीला आमच्या दादांनी अंदाजे ४०-४५ वर्षे तेथे कीर्तन केले.

श्रीनारायणमहाराज मळणगावकर यांनी आपल्या शिष्यांना सांगितले की, यापुढे तुम्हास जर परमार्थातील शंका विचारावयाच्या असतील तर त्या तुम्ही रामभाऊ केळकरांना विचारीत चला. ते तुमचे समाधान करतील असे त्यांनी कित्येकवेळा शिष्यांना सांगितले होते, असे त्यांच्या अवधूत नावाच्या शिष्याने श्री.मुकुंदराव सहस्रबुद्धे यांना सांगितले. श्री.गणपतराव माने, श्री.गणपतराव माळी वगैरे मंडळी व पांडोबांना असेच सांगितले होते.

श्रीनारायणमहाराज यांचा चोपदार एकाएकी गेला. लोक हळहळले व महाराजांना म्हणाले, महाराज चोपदार गेल्याचे ऐकून वाईट वाटले. हे ऐकून महाराज म्हणाले, मी त्याला पुढे माझे तिकीट काढायला पाठविले आहे श्रीनारायणमहाराज मळणगावकर यांनी विचारले, सरकारी गणपती विसर्जन झाला का? लोकांनी सांगितले, आज संध्याकाळी विसर्जन झाला. मळणगावकरमहाराज त्यावेळी फारच आजारी होते. त्यांना यातना असह्य झाल्या होत्या. ते म्हणाले, मग आम्हाला आता जाणेस मोकळीक झाली. यापूर्वी महाराजांचे निरूपण प्रत्येकवर्षी गणपतीपुढे मोठ्या थाटाने होत असे. यावर्षीच परिस्थितीमुळे त्यांचे निरूपण झाले नव्हते. आश्चर्य असे की, दुसरेच दिवशी म्हणजे भाद्रपद शु. ९ शके १८६५ इ.स.१९४३ साली, वयाच्या ५१ व्या वर्षी महाप्रयाण केले. राजेसाहेबांनी वाड्यासमोर अंत्ययात्रेच्यावेळी मोठा पुष्पहार त्यांना अर्पण केला. अंत्ययात्रा मोठ्या समारंभाने झाली. हजारोनी माणसे जमली होती.

***

# प.पू. श्रीवामनभटजी बाळेकुंद्रीकर

निर्याण
भाद्रपद शु.०९

श्रीवामन भटजी बाळेकुंद्रीकर हे शहापूरला रहात होते. त्यांनी चिमडच्या श्रीरामचंद्रावजी महाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह घेतला होता. त्यांनी सांगितल्याप्रमाणे ते साधन करत होते.

चिमडला रथोत्सवाचे वेळी कोठीची व्यवस्था ते पहात असत. त्यांचे काम अत्यंत चोख होते.

एक दिवस चिमडमहाराज त्यांचेकडे जाणार होते. पण अचानक महाराजांचा रबकवीला मुक्काम पडला. एका बाईला पोटशूळ झाला होता. त्या बाईने महाराजांचे पाय धरले व म्हणाली, 'महाराज, माझा पोटशूळ बरा करा, तोवर मी तुमचे हे पाय सोडणार नाही.' कितीही समजूत घातली तरी ती बाई महाराजांचे पाय सोडेना. शेवटी महाराज म्हणाले, 'बाई उठा, तुमचे दुखणे बरे झाले.' आणि आश्चर्य असे की त्या बाईचा पोटशूळ बरा झाला. पण पुढे शहापूरला जाण्याचा महाराजांचा बेत राहिला.

इकडे मात्र वामनभटजी महाराजांची वाट पहात होते. चिमडमहाराज एकदम वामन भटजींसमोर प्रगट झाले आणि म्हणाले, 'भटजी, आम्ही आता तुमच्याकडे येत नाही, पुढे कधीतरी येतो' असे सांगून चिमडमहाराज अदृश्य झाले.

चिमडमहाराजांच्या अंतिम आजारात वामनभटजींनी त्यांची फार सेवा केली. ते शेवटपर्यंत रथोत्सवाला चिमडला येत असत. साधुमहाराजांच्या विहिरीला प्रदक्षिणा घालताना त्यांना अनेकदा चिमडमहाराजांचे दर्शन झाले.

अशा श्रीवामनभटजी बाळेकुंद्रीकर यांनी भाद्रपद शु.९ ला चिमडमहाराजांचे स्मरण करीत देह ठेवला.

***

# प.पू.श्रीनिरंजन रघुनाथ

जन्म
कार्तिक शु.८ शके १७०४
इ.स.१७८२

निर्याण
भाद्रपद शु.११ शके १७७७
इ.स. १८५५

परळी वैजनाथ जवळ बालाघाटी वांजरा नदीच्या तीरावर कळंब हे गाव आहे. तेथे श्रीधरपंत श्रोत्री या नावाचे गृहस्थ रहात होते. त्यांचेकडे कुलकर्णीपद होते. श्रीधरपंत यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई होते. श्रीधरपंत हे कौशिक गोत्री अश्वालायन शाखी देशस्थ ब्राह्मण होते. या दांपत्याच्या पोटी कार्तिक शुद्ध अष्टमी, शके १७०४ इ.स.१७८२ या दिवशी पंच-पंच उषःकाली पुत्ररत्न जन्माला आले. या मुलाचे बारशादिवशी 'अवधूत' असे नामकरण करणेत आले. हा 'अवधूत' म्हणजेच आमचे 'निरंजन रघुनाथस्वामी' होत.

अवधूताचे बालपण हे कळंब या गावीच गेले. विवाहाचे वय झाल्यावर त्यांचा भगवतीबाई नामक कन्येशी विवाह झाला. विवाहानंतर ते सपत्नीक पुण्याला आले. पुण्याला त्यांनी नष्टे या नावाच्या हुंडेकऱ्याच्या दुकानात कारकूनाची नोकरी पत्करली. पण या नोकरीत त्यांचे मन रमेना. उद्विग्नता निर्माण झाली. ही मनःस्थिती असताना शके १७३३ म्हणजे इ.स.१८११ साली बेलबागेत असणाऱ्या विष्णुमंदिरात ते गेले. तेथे ठाकूरदास नामक प्रसिद्ध कीर्तनकारांचे कीर्तन सुरू होते. हे कीर्तन ऐकल्यावर अवधूताची वृत्ती पालटली आणि अचानक वैराग्य निर्माण झाले. ठाकूरदासबाबांचे दर्शन घेतले आणि त्यांनी आशीर्वाद दिला, 'तू नारायण होशील'. रात्री अवधूत घरी गेलाच नाही. पुणे सोडले. पुण्याहून चिंचवड येथे आले आणि पुढे ते देहूला आले. सकाळी इंद्रायणीत स्नान करून हातात पाणी घेतले आणि 'आजपासून एक वर्ष सात दिवसात परमेश्वराचा सगुण साक्षात्कार झाला नाही तर प्राणत्याग करीन.' अशी सूर्याकडे पाहून व श्रीतुकाराममहाराजांना साक्षी ठेऊन घोर प्रतिज्ञा केली. तो दिवस होता भाद्रपद व.४ शके १७३३ म्हणजेच इ.स.१८११.

अवधूतने देहूगाव सोडले आणि भिक्षा मागत पदयात्रा सुरू केली. अखंड दत्तचिंतन आणि नामस्मरण करीत चालला होता. करता करता तो ब्राह्मणवाडे या गावी आला. तेथे एका दत्तभक्ताची गाठ पडली आणि त्याने सांगितले की, 'अवधूता, तू काठेवाडात गिरनार पर्वतावर जा, तेथे तुला दत्तगुरूंचे प्रत्यक्ष दर्शन होईल.' तेथून हा अवधूत पुढे निघाला. अकोला गावी आला. त्यागावी एका रात्री स्वप्नात साक्षात् श्रीदत्तात्रेयांचा साक्षात्कार झाला. श्रीदत्तगुरूंनी अवधूताला आपल्या हृदयाशी धरले आणि कानात अष्टाक्षरी मंत्राचा बोध केला. हा साक्षात्कार पाहून अवधूताला प्रत्यक्ष दत्तगुरूंच्या दर्शनाची प्रचंड ओढ निर्माण झाली.

नंतर अवधूत हा नाशिक येथे आला. नाशिक येथे श्री. रघुनाथस्वामी (भडजी) नामक सत्पुरूषांची भेट झाली. श्रीरघुनाथस्वामींनी कार्तिक व.३० शके १७३३ इ.स.१८११ साली अवधूताला गुरूपदेश दिला. अवधूताने या रघुनाथस्वामींकडून अपरोक्ष साक्षात्कार करून घेतला आणि योगविद्या प्राप्त केली. तेथेच अवधूत गुरूसेवेत दंग झाला. रघुनाथस्वामींनी अवधूताचे नांव बदलून 'निरंजन' असे ठेवले. हा निरंजन म्हणजेच आमचे 'निरंजन रघुनाथ' होत.

परमार्थदृष्ट्या निरंजनस्वामींना गुरूपदेश मिळाल्याने ते कृतकृत्य झाले. पण श्रीदत्तात्रेयांच्या सगुण दर्शनाची इच्छा त्यांना सतत डाचत होती. त्यामुळे त्यांनी रघुनाथस्वामींच्या आज्ञेने नाशिक सोडले आणि तेथून ते त्र्यंबकेश्वरला आले. मजल दरमजल करत करत ते काठेवाड गिरनार पर्वताजवळ आले. अद्याप त्यांच्या प्रतिज्ञापूर्तीस बराच कालावधी होता. त्यामुळे ते गिरनार पर्वताला प्रदक्षिणा घालून, प्रतिज्ञापूर्तीची मुदत भरायला ३ दिवस बाकी असताना पर्वतावर पोहोचले. भाद्रपद व.८ शके १७३४ इ.स.१८१२ या दिवशी ते पर्वतावरील दत्तात्रेयांच्या पादुकांजवळ धरणे धरून बसले. पहिल्या रात्री सोसाट्याचा वारा सुरू होऊन मुसळधार पाऊस सुरू झाला. निरंजनस्वामींची दातखिळी बसून त्यांना मूर्च्छा आली. मूर्च्छा आली असतानाच एका सुवासिनीने त्यांना खिचडी आणून दिली. दुसऱ्या दिवशी रात्री त्यांना स्वप्न पडले आणि स्वप्नात त्यांना एक पिवळे वस्त्र आणि रुमाल मिळाला. निरंजनस्वामींना जाग आली आणि पहातात तो स्वप्नात मिळालेली वस्त्रे खरोखरीच त्यांच्याजवळ असल्याचे दिसून आले. तिसऱ्या रात्री निरंजनस्वामी दत्तात्रेयांपुढे बसले आणि दत्ताची प्रार्थना करू लागले व दर्शन देण्यासाठी हट्टच धरला. दत्तात्रेयांपुढे एक मोठा दगड ठेवला आणि त्या दगडावर डोके आपटून प्राणत्यागाची तयारी केली. तिन्ही रात्री निघून गेल्या. प्रतिज्ञेची मुदत संपली असे पाहताच निरंजन स्वामींनी निराश होऊन त्या दगडावर आपले डोके आपटले. भळाभळा रक्त वहायला लागले. निरंजन स्वामी बेशुद्ध पडले. अशा स्थितीत आपल्या तोंडात कोणीतरी कमंडलूतील पाणी घातल्याचा निरंजनस्वामींना भास झाला, आणि बघतात तो आपल्यापुढे श्रीदत्तमहाराज सगुणरूपाने उभे आहेत, असे दिसले. साक्षात् सहा हातांची एकमुखी दत्ताची मूर्ती होती. दत्तात्रेयांचे दर्शन होताच निरंजन कृतार्थ झाले. दत्तात्रेयांनी निरंजनस्वामींच्या मस्तकावरून हात फिरविला. हात फिरवताच निरंजनांच्या मस्तकाला झालेली जखम भरून आली. ही जखम झालेली खूण निरंजनस्वामींच्या कपाळावर शेवटपर्यंत होती. हे दर्शन निरंजनस्वामींना भाद्रपद व. ११ शके १७३४ सोमवार इ.स.१८१२ रोजी झाले.

अशाप्रकारे गिरनारहून निरंजनस्वामी प्रभासतीर्थ आणि सोमनाथक्षेत्र या ठिकाणी गेले आणि नंतर समुद्रमार्गाने ते मुंबईस आले. त्यानंतर ते गुरूदर्शनासाठी नाशिकला आले. तेथे सद्‌गुरूंजवळ राहून स्वात्मप्रचिती व 'साक्षात्कार' ही दोन प्रकरणे लिहून त्यांनी सद्‌गुरूंना (रघुनाथस्वामींना) अर्पण केली व नाशिक येथे कुटुंबियांसोबत राहिले. येथे काही दिवस राहून तेथून ते जुन्नर या गावी येऊन राहिले. इथे राहिलेले असताना अचानक राहत्या घराला आग लागली आणि त्यांनी लिहिलेले ग्रंथ आगीत जळून खाक झाले. या ग्रंथांची राख घेऊन निरंजनस्वामी हे सप्तशृंगी गडावर गेले. पाच दिवस उपास केला आणि दत्तात्रेयांची प्रार्थना केली. आश्चर्य असे की पाचव्या दिवशी रात्री दत्तात्रेयांनी त्यांचा ग्रंथसंग्रह त्यांना पूर्ववत करून दिला. या प्रसंगाला अनुसरून त्यांनी एक पद रचले आहे. ते लिहितात, हे दत्तात्रेया,

**तुझे आज्ञेवरुनी वदलो कविता । पद आणि ग्रंथा करोनिया ।।१।।**
**तेथे जाळे विघ्न जळाली कविता । रक्षा आली हाता मुष्टीभरी ।।२।।**
**तेचि रक्षा आता बांधूनी शिदोरी । सप्तशृंगावरी आलो स्वामी ।।३।।**

**निरंजन म्हणे धावोनिया यावे । ग्रंथ उठवावे जळाले ते ।।४।।**
**तुझे कीर्तीगुण वर्णिले ज्या ग्रंथी । त्यांची रक्षा माती व्हावी काय? ।।५।।**
**जागे होवोनिया रक्षेसी पाहिले । तव ते ग्रंथ झाले पहिल्यावाणी ।।६।।**
**निरंजन म्हणे धन्य आजि झालो । आनंद पावलो गुरूकृपे ।।७।।**

याच सप्तशृंगी गडावर त्यांनी संक्रांतीचा सण साजरा केला. आपली पत्नी सौ. भगवती हिला निरंजनस्वामी म्हणाले, 'अगं, संक्रांतीला बायका काहीतरी वस्तु लुटतात ना? आपले सर्व संसारी सामान यंदा लुटून देतीस कां?' हे ऐकून भगवतीने होकार दिला आणि अनेक बायकांना त्यांनी त्यांचे सर्व सामान, वस्त्रे, भांडी सर्व काही लुटून टाकले. यादरम्यान श्रीनिरंजनस्वामींना यथावकाश चार अपत्ये झाली. १)रामकृष्ण २) योगीराज ३) विष्णु ४) वासुदेव.

सर्वसंग परित्याग करून ते पत्नी व मुलांसह आळंदीला आले. तेथे ज्ञानेश्वरमहाराजांच्या दृष्टांतानुसार त्यांनी 'अमृतानुभव पदबोधिनी' हा अमृतानुभवावरील टीकाग्रंथ लिहिला. नंतर शके १७६७ म्हणजे इ.स.१८४५ मध्ये ते कोल्हापूर प्रांतातील वळवडे या गावी गुरूबंधू श्रीमंत वासुदेव पंडित तथा भाऊमहाराज यांचेपाशी सहकुटुंब जाऊन राहिले.

श्रीनिरंजनस्वामींची कीर्ती मिरज संस्थानचे अधिपती श्रीमंत गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांचे कानावर गेली व त्यांनी निरंजनस्वामींना मिरजेस आणले आणि श्रीमंतांनी निरंजनस्वामींचा अनुग्रह घेतला. निरंजनस्वामींची वृत्ती विरक्त असलेने त्यांनी श्रीमंतांकडून मठ किंवा इनाम जमीन वगैरे काही घेतले नाही, पण श्रीमंतांनी त्यांचे चिरंजीव श्रीयोगीराज यांना मिरज येथे मठ बांधून इनाम जमीनीची सनद दिली. मिरज मुक्कामी निरंजनस्वामींनी ज्ञानेश्वरीवर टीका, गीतेवरील शांकरभाष्याची टीका, रघुनाथचरित्र, आत्मबोधप्रकाशिनी, आत्मचरित्र, केनोपनिषद टीका, मांडोक्यउपनिषद टीका, महावाक्य टीका, पद-पदांतरे इ. ग्रंथरचना केली. मिरज येथील किल्ल्यात त्यांनी स्वतः सहा हातांची एकमुखी दत्ताची मूर्ती स्थापन केली. ती मूर्ती अद्यापही तेथे आहे.

प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधून आपण आपले ध्येय साध्य केले. आता या जीवनात मिळवण्याजोगे काही राहिले नाही, आपले जीवीत कार्य संपले असे समजून निरंजनस्वामींनी संन्यास दीक्षा घेतली आणि सहा महिन्यांनी म्हणजेच भाद्रपद शु.११ शके १७७७ इ.स. १८५५ या दिवशी वयाच्या ७३व्या वर्षी, निरंजन रघुनाथांनी कृष्णाबाईच्या उदरात म्हणजेच जलप्रवाहात जलसमाधी घेतली. त्यावेळी त्या भागात धन्योऽहं! धन्योऽहं! धन्योऽहं! असे आवाज निनादले.

***

# ज्ञानेश्वरकन्या तथा प्रज्ञाचक्षू प.पू.श्रीगुलाबरावमहाराज

**जन्म**
**आषाढ शु. दशमी शके १८०३**
**दि.०६.०७.१८८१**

**निर्याण**
**भाद्रपद शु.१२ (वामनद्वादशी),**
**शके १८३७ दि.२०.०९.१९१५**

महाराष्ट्रात वऱ्हाड प्रांतात अमरावती जिल्ह्यातील लोणी टाकळी या गावी श्री. गोंदूजी राणोजी मोहोड या नावाचे एक सदाचारसंपन्न आणि सत्शील गृहस्थ रहात होते. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. आलोकाबाई. मोहोड घराणे हे मूळचे राजस्थानमधले. पण पुढे ते उत्तर प्रदेश, मराठवाडा प्रवास करत ते वऱ्हाडातील माधान या गावी स्थायिक झाले. श्री. गोंदूजी मोहोड आणि सौ. आलोकाबाई या दांपत्याच्या पोटी आषाढ शु. दशमी शके १८०३ दि.०६.०७.१८८१ रोजी पुत्ररत्न जन्माला आले. बारश्यादिवशी या मुलाचे नाव गुलाब ठेवणेत आले. हा गुलाब म्हणजेच आमचे 'श्रीगुलाबरावमहाराज' होत.

श्रीगुलाबरावमहाराज हे आठ-नऊ महिन्यांचे असताना त्यांचे डोळे आले व जंतुसंसर्ग झाला. त्यावर उपाय म्हणून शेजारच्या एका म्हाताऱ्या स्त्रीने त्यांच्या आईला आयुर्वेदाचे औषध सुचविले. त्याप्रमाणे तेथील एका वैदूने त्यांच्या डोळ्यात झाडपाल्याचा रस घातला. त्यामुळे त्यांना डोळे उघडता येईनात आणि या औषधाने डोळे बरे होण्याऐवजी, त्यांचे डोळे कायमचेच गेले आणि अंधत्व आले. बालपणीच अंधत्व आलेने त्यांच्या आईने अत्यंत कष्टाने त्यांचा सांभाळ केला. डोळे नसले तरी महाराज हे सर्वसामान्य मुलाप्रमाणे सगळ्यांच्यात खेळायचे, मस्ती करायचे असा क्रम सुरू होता. श्रीगुलाबरावमहाराज यांच्या पाठीवर रंगी नावाची एक बहीण जन्माला आली, पण या बाळंतपणात इ.स.१८८५ मध्ये महाराजांच्या मातोश्रींचे निधन झाले आणि पाठोपाठ काही दिवसांनी बहिणीचेही निधन झाले. यावेळी महाराजांचे वय फक्त चार वर्षे होते. सांभाळ करणारी आईच निघून गेलेने महाराजांचा सांभाळ कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला. यावेळी महाराजांना सांभाळणेची जबाबदारी त्यांच्या आजीने (आईची आई) घेतली. आजीच्या मायेखाली बाळपण सुखात जात असतानाच, महाराजांचे वयाचे १० वे वर्षी आजीचे निधन झाले. परत त्यांच्यावर दुःखाचे आभाळ कोसळले. लहान वयातच श्रीमहाराजांना श्रीकृष्णाचे दर्शन झाले. जेवता जेवता त्यांनी दोन्ही हात वर केले. हे एकाने बघितले आणि विचारले, गुलाब हे काय हात वर करतो आहेस? यावर गुलाबरावमहाराज म्हणाले, 'एक सुंदर लेकरू पुढे आले, त्याला चार हात होते. कपाळाला केशरी गंध होते आणि कानात कुंडलेही होती.'

लहानपणापासूनच श्रीगुलाबरावमहाराजांना ध्यानधारणेची आवड होती. पोथ्या, पुराणे, आरत्या, अभंग, स्तोत्रे इत्यादिंची विशेष आवड होती. स्मरणशक्ती दांडगी असलेने जे एकदा कानावर पडले ते पाठ व्हायचे. हटयोगातील सिंहासनमुद्रा आणि अन्य क्रिया ते सहजपणे करीत असत. एकादशी व सोमवार हे व्रत ते निष्ठेने करीत असत. रात्री सर्वजण झोपले की तोंडावर पांघरूण घेऊन महाराज ध्यानाला बसत असत आणि त्यातच ते समाधी अवस्थेत जात असत. सकाळपर्यंत ते त्याच अवस्थेत असत. वयाच्या ११-१२ व्या वर्षी त्यांनी शिवलीलामृताचा ११वा अध्याय आणि व्यंकटेश स्त्रोत्र पाठ केली. श्री. लक्ष्मणभट्ट जोशी नावाचे एक

पुरोहित होते. त्यांच्याकडून ते म्हणवून घेत असत आणि ऐकून पाठ करत असत. मुसलमानांच्या कुराणातील आयतीसुद्धा त्यांनी दुसऱ्याकडून वाचून घेऊन, त्या त्यांनी पाठ केल्या. अशा अलौकिक आणि असामान्य बुद्धिचे श्रीगुलाबरावमहाराज होते.

श्रीगुलाबरावमहाराज यांच्या मातोश्रींनी लवकर देह ठेवलेने त्यांच्या वडिलांनी दुसरा विवाह केला. या सावत्र मातेबरोबर एकदा ते त्यांच्या सावत्रमामाकडे गेले. या मामाच्या कानावर महाराजांच्या अलौकिकत्वाच्या गोष्टी आल्या होत्या. पण त्याचा अशा गोष्टींवर विश्वास नव्हता. महाराज समोर दिसल्यानंतर तो मामा यांना नाही नाही ते बोलू लागला. पण महाराजांनी त्याच्या बोलण्याकडे कानाडोळा केला. थोड्या वेळाने महाराज भोजनाला बसले. परत त्यांना त्या दिवशी भोजन करताना बाळकृष्णाचे साजिरे गोजिरे रुप दिसले. महाराज दोन्ही हात पुढे करून त्या बाळकृष्णाला धरायचा प्रयत्न करु लागले. हे बघून मामाला यांचा वेडेपणा वाटला. याबाबत त्याने महाराजांना विचारले, तेव्हा महाराज म्हणाले, तुला सांगितले तर तुला पटणार नाही. तेव्हा तेथील एक जण कुत्सितपणे म्हणाला, अहो, हा साधुपुरूष आहे, आला असेल देव त्याच्या ताटातील खायला. हे ऐकून तेथील उपस्थित लोक हसू लागले. मामा म्हणाला, 'हा कसला साधु? हा खोटा साधु आहे. गोठ्यातले शेणसुद्धा खाईल असा हा वेडा आहे.' हा झालेला अपमान महाराजांना सहन झाला नाही. महाराज ताटावरून उठले. गोठ्यात गेले आणि शेण भक्षण केले आणि त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले - ''या कुटुंबावर अवकृपा झाली आहे. या कुटुंबाचा निर्वंश होईल. अगदी गोठ्यातल्या गुरांची शेपटीसुद्धा शिल्लक रहाणार नाही.'' असे म्हणून महाराज तेथून बाहेर पडले आणि परत माधानला आले. पुढे काही दिवसातच मामाच्या कुटुंबाची वाताहात झाली. सगळी गुरे गेली, घरातील माणसे एकापाठोपाठ दगावली. सगळे कुटुंब उध्वस्त झाले. अशा अनेक घटना महाराजांच्या आयुष्यात घडल्या.

श्रीमहाराजांचा फाल्गुन व. ५ इ.स. १८९६ रोजी पूर्णा नामक कन्येशी विवाह झाला. विवाहानंतर तिचे नांव मनकर्णिका ठेवणेत आले. आपल्या लग्नाच्या दिवशी वादळ होऊन पाऊस पडेल असे भाकीत श्रीगुलाबरावमहाराजांनी वर्तविले होते. तसेच झाले. पावसाळ्याचे दिवस नसतानाही गडगडाटासह पाऊस पडला. श्रीमहाराजांची ही अचाट वाचासिद्धी पाहून पूर्वी एकदा त्यांची आजी त्यांना म्हणाली, 'गुल्या, तू काही बोलू नकोस. गप्प बसत जा. कारण तू बोलतोस ते खरे होते. त्यामुळे लोक तुला 'काळ जीभ्या' म्हणतात आणि आजीच्या लाडाने वाया गेला म्हणतात.' हे ऐकून गुलाबरावमहाराज म्हणाले, 'आजी, मला जसे दिसते तसे मी बोलतो. उगाच द्वेषाने बोलत नाही.' त्यानंतरही महाराजांनी कित्येकांना जे भाकित सांगितले, ते तंतोतंत खरे ठरले.

श्रीगुलाबरावमहाराज हे लोणी येथे आपल्या आजोळी गेले होते. तेथे त्यांची कारंजकरबुवा यांचेशी गाठ पडली. ते महानुभाव संप्रदायातील महंत होते. या संप्रदायासच 'मानभावी' संप्रदाय असेही संबोधले जात असे. त्या काळात हे लोक श्रीशंकराची निंदा करत असत. महाराजांच्या आजोळचे लोक या पंथाचे अनुयायी होते. या लोणी मुक्कामातच महाराजांनी या संप्रदायाची दीक्षा घेतली व यथाविधी कारंजकरबुवांकडून मंत्र घेतला. सामवेदातल्या ऋचा बिनचूक म्हणून दाखविल्या. श्रीमहाराज हे महानुभावी सांप्रदायिक झाले हे त्यांच्या चुलत्यांना कळले. ते लोणीला आले आणि ते महाराजांना माधानला घेऊन आले. खरे तर महाराजांनी

दीक्षा घ्यायचे कारण वेगळे होते. त्या संप्रदायातील विचारसरणी कशी चुकीची आहे हे त्यांना दाखवून द्यायचे होते. म्हणून त्यांनी दीक्षा घेतली. त्याचा रीतसर अभ्यास केला आणि महानुभाव पंथीयांच्या अपप्रचाराला प्रत्युत्तर देण्यासाठी ते सिद्ध झाले. त्यांनी या पंथाचे सर्व ग्रंथ वाचून घेतले आणि त्यातील आक्षेपांना उत्तर देऊन खंडन केले. त्यावर काही लेखही लिहिले. यामुळे या पंथातील भल्या भल्या लोकांची तोंडे बंद झाली.

इ.स. १९०१ साली आपली पत्नी सौ.मनकर्णिका यांचेसह ते आळंदी येथे श्रीज्ञानेश्वरमाऊलींच्या दर्शनासाठी आले. लहानपणापासूनच ते ज्ञानेश्वरीचा अभ्यास करत असत. त्यामुळे माऊलींबाबत त्यांचे अंतरात ओढ होती. माऊलींच्या समाधी मंदिरात प्रवेश करताच त्यांच्या डोळ्यातून घळा घळा अश्रु वाहू लागले. महाराज समाधी समोर पद्मासन घालून ध्यानस्थ बसले. त्याच अवस्थेत चार दिवस होते. माऊलींनी त्यांना साक्षात् समोर येऊन अनुग्रह द्यावा अशी त्यांनी मनोमन इच्छा होती. हा भाव बघून श्रीज्ञानेश्वरमहाराज त्यांचेसमोर प्रगट झाले आणि त्यांनी मस्तकावर हात ठेऊन अनुग्रह केला. नाममंत्र दिलेल्या दिवसापासून ते स्वतःला 'ज्ञानेश्वर कन्या' संबोधू लागले. 'संप्रदायसुरतरु' या ग्रंथात त्यांनी या महादीक्षेचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात, 'माझा सद्गुरू करुणाघन । आळंदीपती कल्याण निधान।।१।।जेणे आपुलीया नामाचा मंत्र देऊन। कृतार्थ केले मजलागी ।।२।।'

इ.स.१९०३ मध्ये म्हणजे वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी अमरवाती येथील शुक्लेश्वर वाठोडा येथे श्रीमद् भागवतातील दशम स्कंधात सांगितल्याप्रमाणे त्यांनी कात्यायनी दीक्षा/व्रत घेतले. हे व्रत गोपींनी श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी केले होते. याप्रमाणे त्यांनी हेमंत ऋतुमध्ये या व्रताची दीक्षा सुरू केली. पुढे ३३ दिवस गोपीभाव धारण करून श्रीकृष्ण चिंतनात मग्न राहून व्रत केले. यानंतर महाराज स्वतःला कृष्णपत्नी समजू लागले. आणि त्यांनी स्त्रीवेष धारण केला. मंगळसूत्र, भाळी कुंकू, वेणी,बांगड्या इ. स्त्री शृंगार त्यांनी परिधान करणेस सुरवात केली. रासक्रीडेचा अधिकार हा कात्यायनी व्रताने प्राप्त होतो. गोपींनी जी भक्ती साधली, ती माधुर्यभक्ती साधली. मधुराभक्ती हा भक्तीतील सर्वोच्च प्रकार आहे. परमेश्वराबरोबर पती-पत्नीचे नाते असणे असा हा भाव आहे. या नात्यामध्ये समर्पण हा भाव असतो. म्हणून मधुरभाव महत्त्वाचा आहे.

श्रीगुलाबरावमहाराज यांनी लग्न झाल्यापासून आपल्या पत्नीस वैषयिक भावनेने स्पर्शसुद्धा केला नव्हता. एवढेच नाही तर पत्नीला संयमाचे धडे दिले होते. एकदा श्रीमहाराज हे चांदुरबाजार येथे कुर्याभाई यांचे घरी गेले आणि दारात उभे राहूनच 'भाकर वाढ गं माय' असे ओरडले. या कुर्याभाई दांपत्याचे महाराजांवर पुत्रवत प्रेम होते. कुर्याभाई यांच्या पत्नीने महाराजांना अचानक विचारले, 'मला जे हवे आहे ते द्याल का?' तेव्हा महाराज म्हणाले, 'देतो माय, पण काय पाहिजे ते सांगा.' तेव्हा पत्नी म्हणाल्या 'वचन दिलेत तर सांगेन' हे ऐकून महाराज म्हणाले, 'दिले वचन, काय ते सांगा.' तेव्हा या कुर्याभाईच्या पत्नीने मागणी केली की, आपली पत्नी सौ.मायबाई ऊर्फ मनकर्णिका हिची पुत्रप्राप्तीची इच्छा पूर्ण करा. बाकी माझे काही मागणे नाही. हे मागणे ऐकल्यावर महाराज एकदम गप्प झाले. याबाबतीत ते श्री. कुर्याभाई यांचेशी वाद करू लागले, पण शेवटी कुर्याभाईंचे म्हणणे मान्य करून अनिच्छेने दिलेले वचन पूर्ण करण्याचे मान्य केले. याप्रमाणे यथावकाश श्रीमहाराजांच्या पत्नी सौ.मनकर्णिका या गर्भवती राहिल्या आणि इ.स.१९०५ साली त्यांना मुलगा झाला. या मुलाचे नांव 'अनंत' ठेवणेत आले.

इ.स. १९०५ मध्ये श्रीमहाराज हे निरुपणाकरिता नागपूरला गेले होते. तेथे त्यांनी श्रुतिवाक्यावर निरूपण केले. हे श्रुतिवाक्य कोणत्या ग्रंथातील आहे ? असा प्रश्न एकाने केला. तेव्हा महाराज म्हणाले, 'नारद पंचरात्र' या ग्रंथातील आहे. हे ऐकून प्रश्न करणारा गृहस्थ म्हणतो, या नावाचा ग्रंथ आम्ही ऐकलेला नाही. हा कोठे मिळेल? तेव्हा महाराज म्हणाले, 'हा ग्रंथ छापलेला नाही. याच्या लेखी प्रती दोनच आहेत. एक मथुरेत चौब्यांकडे आहे आणि दुसरी भोसले सरकारांच्या वाड्यात आहे.' हे ऐकल्यावर काही उत्साही मंडळी भोसले वाड्यावर गेली आणि वाड्यातील वाचनालयाच्या कारकुनाला घेऊन आली आणि त्याला या ग्रंथाबाबत विचारले. तेव्हा तो कारकून म्हणाला, आहे. इतक्या रात्री हा ग्रंथ कसा शोधणार, उद्या सकाळी शोधून देतो. पण हे नाव मी ऐकलेले नाही. यावर श्रीमहाराज पटकन म्हणाले, 'शोधण्याची गरजच नाही. ती पोथी अमुक अलमारीच्या अमक्या खणात ठेवलेली असून, त्यावर अमक्या रंगाचे वेष्टन आहे. तिच्या खाली आणि वर अमुक अमुक ग्रंथ आहेत. दोन ग्रंथांच्या मधे ती पोथी असल्याचे दिसेल.' याप्रमाणे कारकुनाने शोध घेतला असता त्याच जागी पोथी सापडली. ग्रंथ सापडल्यावर अमक्या पृष्ठावर ती श्रुती आहे असे महाराजांनी सांगितले. तसे करताच ती सापडली.

याच सुमारास प.पू.श्री. ल. रा. पांगारकर आणि श्रीगुलाबरावमहाराज यांची भेट झाली. त्यांच्यासह ते एकदा श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या दर्शनास आळंदीला गेले होते. तेथे श्री. पांगारकरांनी माऊलींच्या समाधीवर पंचामृत अभिषेक केला. श्रीगुलाबरावमहाराज त्यावेळच्या प्रथेप्रमाणे बाहेरील मंडपात बसले होते. श्री. पांगारकर पंचामृत माऊलींच्या पादुकांना चोळत असताना,श्रीगुलाबरावमहाराज बाहेरून ओरडले, 'अहो पांगारकर, तुमच्या बोटातल्या अंगठ्या काढा. त्या ज्ञानेश्वरमाऊलींना टोचत आहेत.' हे ऐकून सर्वजण चकित झाले. पांगारकरांनी बोटातल्या अंगठ्या ताबडतोब काढल्या. यावरून श्रीगुलाबरावमहाराज प्रज्ञाचक्षू होते हे सिद्ध होते.

इ.स.१९०६ साली सौ. मनकर्णिका यांची प्रकृती वारंवार बिघडू लागली. आम्लपित्ताचा विकार जडला होता. श्री. नानाजी कविमंडन यांचे उपचार त्यांचेवर सुरू होते. त्यांना महाराज सतत म्हणत, 'मनकर्णिकेला औषध दे. तिची तब्येत बिघडणार आहे. ती मेली तर मी जबाबदार नाही.' याप्रमाणे या नानाजींचे उपचार सुरू होते. पण श्रावण व. चतुर्थी इ.स. १९०६ साली सौ.मनकर्णिका यांनी इहलोकीची यात्रा संपविली. यावेळी सगळ्या लोकांना महाराजांनी वेदांत बोध केला आणि शोक करु नका, अनंत तुमच्यासाठी आहे. त्याच्याकडे लक्ष द्या असे सांगितले. पत्नीचे और्ध्वदेहिक कर्म स्वतः महाराजांनी केले. पत्नी निधनाचे दुःख महाराजांनी 'पत्नीप्रेमपराग' या आर्यावृत्तात रचलेल्या काव्यातून उतरवले आहे. माधुर्यभक्तीत पत्नीभाव अत्यंत महत्वाचा आहे. सर्वप्रकारची भक्ती या एका भावात येते हे त्यांनी या काव्याने दाखवून दिले. वैराग्यसंपन्न, ब्रह्मज्ञानसंपन्न, योगाचार्य संत असूनही पत्नी मनकर्णिकेवर त्यांनी अपार प्रेम केले. तिला विवाहाचेवेळी 'परमार्थसंधी शपथ' घेवविली. पत्नीला त्यांनी लिहिणे-वाचणे शिकवलेच, पण भागवतही सहज समजेल एवढी संस्कृतची तयारी करून घेतली. लौकिक पुत्रमोहातून विलक्षणरितीने सोडून अलौकिक वैराग्यपूर्ण भक्तिप्रेम पत्नीला प्रदान केले.

श्रीगुलाबरावमहाराजांनी १२३ अभंग रचना केल्या. २२४४ पदरचना (राग-ताल-चाल यासह), संस्कृतमधे ४१ पदे, हिंदी ३०४ पदे, संस्कृत व मराठी श्लोक एकूण १०००, ओवीसंख्या २३०००, गद्य व पद्य पत्रे ११८,

संस्कृत पत्रे ११, एकूण १४० ग्रंथ लिहिले. यातील संस्कृत ३२ व हिंदी २ ग्रंथ आहेत.

श्रीगुलाबरावमहाराजांनी प्रामुख्याने १) धर्म समन्वयाचे ९ प्रकार सांगितले २) सर्व धर्माच्या उत्पत्तीची मूळ प्रक्रिया सांगितली ३) इस्लाम व ख्रिश्चनादि धर्मांचे साम्य वैदिक धर्माशी कसे आहे हे दाखवले. ४) भागवत, सांख्यसूत्रे, योगसूत्रे यावर भाष्य तसेच षड्दर्शनावर भाष्य केले ५) तत्त्वमसि या महावाक्याने अद्वैत ज्ञानानंतरच्या पराभक्तीचे विवेचन केले ६) भक्तीचे १६ प्रकार सांगितले ७) सांख्य आणि योग, सांख्य आणि वेदांत, परस्परपूरक कसे आहेत हे दाखवून समन्वय केला ८) अनेक नवनवीन योग प्रक्रियांची निर्मिती केली ९) नवीन योग-सूत्र संहिता निर्माण केली १०) आयुर्वेदावर ६ ग्रंथ लिहिले. ११) संगीतशास्त्रावर २ ग्रंथ लिहिले. यात संगीतशास्त्र निर्माण केले, संगीत चतुष्टय सांगितले, संत संगीताला मार्गी-वैदिकांचा दर्जा प्रदान केला १२) आर्य शब्दाचा अर्थ सुसंस्कृत मनुष्य एवढाच आहे, वंशवाचक नाही हे सिद्ध केले. आर्य बाहेरून भारतात आले या मताचे त्यांनी खंडन केले. तीन हजार वर्षांपूर्वी जगात एक आर्य संस्कृतीच होती हे सप्रमाण सिद्ध केले. पाश्चात्यांनी केलेले हिंदू संस्कृतीचे विकृतीकरण संपवण्यासाठी मार्गदर्शन केले १३) ब्रह्म-वृत्ती-स्फुरणातून विश्वाची उत्पत्ती ही मूलभूत विश्वनिर्मितीच प्रक्रिया प्रकट केली १४) ॲटम थिअरीचे खंडन, डार्विनच्या उत्क्रांत वादाचे खंडन, स्पेन्सरच्या संशयवादाचे खंडन, थियॉसॉफिचे खंडन, नास्तिकवादाचे खंडन, जडवादाचे खंडन करुन सर्वचेतनवाद सिद्ध केला १५) कीर्तनात पूर्वरंग व उत्तररंग कसे असावेत हे सांगितले. संस्कृतमधे कीर्तन केले १६) संस्कृत-मराठी-वऱ्हाडी-हिंदी-व्रज भाषेत लेखन केले. गुलाबरावमहाराजांनी निर्मिलेला मोक्षपट हा अफलातून खेळ आहे. २८५ स्थाने, तत्त्वे असलेल्या साप शिडीच्या या खेळामध्ये वेदोपनिषद, पुराणे आणि गीता यामधील अनेक उदाहरणे दिली आहेत. कोणत्या कर्माचे कोणते फळ मिळते हे खेळताना कळते. खेळामधून परमार्थाकडे नेणारा हा जगातला पहिला खेळ असावा १७) स्वतः सर्वज्ञ असूनही लोकांना प्रमाणपूर्वक समजावून देणेसाठी स्वतःच्या डोक्यावर पुस्तकांची पेटी घेऊन फिरणारे हे एकमेव संत होते.

श्रीगुलाबरावमहाराज रेल्वेने प्रवास करत असताना, त्यांना शेगावला उतरून श्रीगजानन महाराजांना भेटायला जावे असे वाटले आणि त्याप्रमाणे शेगाव येताच महाराज केस नीट बांधून तडक खाली उतरले आणि चालू लागले आणि गजाननमहाराज यांचे स्थानी पोहोचले. श्रीगुलाबरावमहाराजांनी हसून नमस्कार केला. श्रीगजाननमहाराज पाठमोरे बसले होते. ते वळलेसुद्धा नाहीत. त्यांनी तसाच हात वर केला. गुलाबरावमहाराज लगेच निघाले आणि शेगाव स्थानकाची वाट धरली. स्थानकात गाडी उभीच होती. गुलाबरावमहाराज जेव्हा खाली उतरले, तेव्हा त्या रेल्वेत तांत्रिक बिघाड झाला होता. महाराज गाडीत चढताच तो दूर झाला आणि महाराज पुढे गेले. इकडे गजाननमहाराजांना भक्तांनी विचारले, महाराज आपण गुलाबरावमहाराजांकडे वळून पाहिलेसुद्धा नाही. ते आपल्या दर्शनासाठी आले होते. आपण उठून त्यांचे स्वागतही केले नाही. यावर श्रीगजाननमहाराज म्हणाले, ‘अरे, तो आमचा बंधु नेहमी स्त्रीवेषात असतो. त्या गोपीसमोर मी हा असा नागवा जाऊ काय?’ हे ऐकल्यावर एक भक्त म्हणाला, ‘महाराज, ते तर आंधळे आहेत.’ हे ऐकल्यावर श्रीगजाननमहाराज म्हणाले, ‘अरे तो बाह्य चक्षूंनी आंधळा वाटतो, पण त्याच्याइतका डोळस कुणीच नाही. अरे आमची भेट झाली.’ ‘गण गण गणात बोते’ असे म्हणत गजाननमहाराज भजन करु लागले.

इ.स. १९१४मध्ये त्यांना श्रीनिवृत्तीनाथमहाराजांचा दृष्टांत झाला. श्रीगुलाबरावमहाराज हे 'समन्वयमहर्षी' आहेत असे भारतातील प्रसिद्ध परमसंगणककार डॉ. श्री. विजय भाटकर म्हणतात, तर आचार्य गोविंददेवगिरी (किशोरजी व्यास) हे त्यांना 'जगद्‌गुरू' संबोधितात.

श्रीगुलाबरावमहाराज हे शिवभक्त असलेने पार्थिव लिंग तयार करुन त्याची पूजा करणे हा त्यांचा नित्यनेम होता. एके दिवशी तशी पूजा करत असताना त्यांच्या हातातले शिवलिंग भंगले. लगेच महाराज ओरडले, 'आजपासून माझा क्षय झाला. आता माझे जायचे दिवस जवळ आले.' त्यावेळी महाराजांचे वय चौतीस वर्षे होते. लाखपुरीला असताना गुलाबरावमहाराजांचे स्वप्नात नारदमुनी आले होते. त्यांनी महाराजांना सांगितले, तुझा अवतार आता संपला. निजधामाला जाण्याची तयारी कर. हे स्वप्न त्यांनी त्यांच्या शिष्यांना सांगितले होते. यामुळे सगळे शिष्य चिंतेत पडले. श्रीमहाराजांचे सततचे उपवास आणि पत्नी गेल्यापासून स्वतःच्या खाण्यापिण्याकडे झालेले दुर्लक्ष यामुळे अवघ्या ३४ व्या वर्षी त्यांना क्षयरोगाची व्याधी जडली. या व्याधीवर आयुर्वेदिक उपचार सुरू होते. पण तब्येतीत फरक पडत नव्हता. मला माझा देह माझ्या गुरुचरणी ठेवायचा आहे. म्हणून त्यांनी आपल्या शिष्यांना आळंदीला नेण्याचा आग्रह केला. आळंदीला दर्शन घेऊन पुण्यातच त्यांच्यावर उपचार सुरू होते. पण फायदा झाला नाही. यावेळी श्रीबाबाजीमहाराज पंडित यांनी महाराजांची उत्कट सेवा केली. त्यामुळेच महाराजांनी त्यांना आपल्या ''ज्ञानेश्वर मधुराद्वैत'' संप्रदायाचे उत्तराधिकारी नेमले. इ.स.१९१५ मधील श्रावण महिन्यातील श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव अत्यंत थाटात पार पडला. पण त्यानंतर नवमी आणि दशमी हे दोन दिवस काळजीत गेले. एकादशीचा दिवसही तसाच गेला. श्रावण व. द्वादशी या दिवशी महाराजांनी प्रेमाने श्रीबाबाजीमहाराज पंडित यांना जवळ बोलावले आणि त्यांना म्हणाले, 'मी तुला काहीच शिकवलेले नाही. काही दिलेसुद्धा नाही. पण आता जाताना एवढेच सांगतो की, तू माझ्या सर्व ग्रंथांचे वाचन कर. तुला ते सहज समजतील. त्या ग्रंथातील विषय समजून घेण्यासाठी तुला अन्य कोणाची मार्गदर्शनाची गरज भासणार नाही.'

अशा या अवतारी पुरूष श्रीगुलाबरावमहाराजांनी भाद्रपद शु. द्वादशी (वामनद्वादशी) शके १८३७ दि.२०.०९.१९१५ रोजी पुणे येथे चाकण ऑईल मिलच्या परिसरातील वास्तूत, सूर्यादयाच्यावेळी वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी महाप्रयाण केले.

अशा या महान विभूतीचरणी कोटी कोटी प्रणाम!

***

**प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीगुलाबरावमहाराज यांची आरती**

आरती गुलाबरावा । जय महानुभावा ।
सदैव कीर्ती तुमची । जय देवाधिदेवा ।।ध्रु।।
ज्ञानेश्वर सुत म्हणोनी । जगी कीर्तीमान झाला ।
दर्शन मामांनाही । **दासराम** ठेवी भाळा ।।१।।

## प. पू. सद्गुरू श्रीविनयानंदमहाराज, मौजे वडगांव

जन्म
दि.१२ जानेवारी, १९५३

निर्याण
भाद्रपद शु.१२ शके १९४२
दि. ३०.०८.२०२०

श्री. दशरथ व सौ. हौसाबाई धनवडे हे सदाचारी, सत्वशील, धर्मशील व कुटुंबवत्सल कुटुंब मांगूर, जि. बेळगाव येथे आनंदाने संसार करत होते. या दांपत्याच्यापोटी १२ जानेवारी १९५३ रोजी रात्री ११ वा.२० मिनिटांनी एक पुत्ररत्न जन्मास आले. बारश्या दिवशी या मुलाचे नांव 'कृष्णात' असे ठेवणेत आले. हा कृष्णात म्हणजेच आमचे 'श्री.कृष्णा दशरथ धनवडे तथा प.पू.स्वामी विनयानंद' होत.

बालपणापासून त्यांना व्यायामाची आवड होती. व्यायामासाठी ते तालमीत जात. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सुदृढ, आखीव, रेखीव, तेजस्वी बनले. लहानपणापासूनच ते अत्यंत कुशाग्र, मर्मग्राही, हुशार होते. त्यांचे शिक्षण एस.एस.एल.सी.पर्यंत झाले. पुढे ते श्रीहनुमान दूध उत्पादक सहकारी संघ, यळगूड येथे नोकरीस लागले. नोकरीच्या काळात त्यांनी आपल्या कार्याचा ठसा सहकार क्षेत्रात उमटविला. सदर संस्थेत दूध संकलन कर्मचारी, अकौंटंट ते सेक्रेटरी पदापर्यंत त्यांनी काम केले. ४२ वर्षे त्यांनी अखंड सेवा केली. यामध्ये त्यांनी कधीही सुट्टी घेतली नाही. यळगूड संस्थेत त्यांनी संगणकीय प्रणाली उभारली व कार्यान्वित केली. स्टाफ व इतर सेवकांना शिस्त लावली. अनेकांचा उद्धार केला. श्रीविनयानंदमहाराजांच्या सुविद्य पत्नीचे नांव सौ. अंजना असून, त्यांना विवेक हा एकुलता एक सदाचारी सुपुत्र इंजिनिअर आहे.

श्रीविनयानंदमहाराज यांना, १९७३ साली म्हणजे वयाच्या २०व्या वर्षी प.पू.सद्गुरू निरंजनमहाराज (ढवळी,मिरज) यांचा अनुग्रह प्राप्त झाला. वेदांत, उपनिषदे, सिद्धांत, पंचीकरण, बसवपुराण, कुराण इत्यादी ग्रंथ त्यांनी आत्मसात केले होते. यातील सार ते अत्यंत सोप्या शब्दात व परिणामकारकरित्या मांडत. त्यामुळे श्रोते, भक्तगण मंत्रमुग्ध होऊन जात. पुढे एप्रिल १९९४ या मंगल दिवशी त्यांचे सद्गुरू त्यांच्या निवासस्थानी आले आणि त्यांनी मंत्रसामर्थ्याने अभिमंत्रित केलेल्या दुधाचा कप स्वतः थोडा पिऊन, उरलेला प्रसादरूपी भाग कृष्णांना सेवन करण्यास सांगितले व 'ये हृदयीचे ते हृदयी घातले'. त्यामुळे संप्रदायाचा ज्ञानशक्ती प्रवाह कृष्णांच्या अंतःकरणात प्रवाहित झाला. दि.१२.०१.१९९८ या मंगलदिनी कृष्णांना 'दीक्षा अधिकार पत्र' सर्वांसमक्ष प्रदान करणेत आले व कृष्णा हे सद्गुरूपदी विराजमान झाले व त्यांचे 'विनयानंद' असे नामाभिधान करणेत आले.

एकदा हैद्राबाद येथे रामकृष्ण आश्रमात ध्यानाला बसले असताना प्रत्यक्ष भगवान श्रीरामकृष्णांची मृण्मयमूर्ती चिन्मय स्वरूपात त्यांच्याशी बोलू लागली. ठाकूरजी म्हणाले, 'मुला, पुढे बैस. तुझ्याकडे एक महत्वाची जबाबदारी द्यायची आहे.' पुढील निरंजन आश्रमाचे कार्य ठाकूरजींच्या कृपाशीर्वादाने पूर्ण झाले.

प.पू.श्रीनिरंजनमहाराजांचे उत्तराधिकारी व मठाधिपती म्हणून श्रीविनयानंदांनी सेवा केली. त्यांनी आपल्या संप्रदाय परंपरेचा शोध घेऊन, उज्जैनी सद्धर्म सिंहासन शाखा सप्रमाण संदर्भासहित सिद्ध केली. या कामी त्यांना सांगलीचे प्रा. के. वा. आपटे यांच्या '**चिमडसंप्रदाय**' या ग्रंथाचा खूप उपयोग झाला. श्रीमरुळाचार्य महाराज, श्रीसिद्धलिंगमहाराज, श्रीसिद्धेश्वरमहाराज, श्रीकल्मेश्वरमहाराज, श्रीनिरंजनमहाराज अशी त्यांची थोर सद्गुरू परंपरा आहे.

प्रजापिता ब्रह्मकुमारी, वारकरी संप्रदाय, चिन्मय मिशन, रामकृष्ण मिशन, चिमड संप्रदाय अशा सर्व संप्रदायातील अनेक संतांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. माझे पितृदेव ती.अण्णामहाराज व ती. विनयानंदमहाराज यांचा फार स्नेह होता. जेव्हा जेव्हा त्यांची भेट होत असे, तेव्हा तेव्हा अष्टसात्विकभाव जागृत होऊन, दोघांच्याही नेत्रांमधून अश्रूधारा ओघळत असत. त्यांचे अंतःकरण एकमेकांवर असलेल्या प्रेमाने उचंबळून येत असे. या दोघांमध्ये स्वभाव, राहणी, मार्गदर्शनाची पद्धत अशा अनेक गुणांमध्ये खूपच साधर्म्य होते. सर्व संप्रदायातील संतांचा उचित गौरव व्हावा यासाठी श्रीविनयानंदमहाराजांनी निरंजन आश्रम, मौजे वडगाव येथे संत रोहिदास जयंती, महावीर जयंती, बसवेश्वर जयंती, आद्य शंकराचार्य जयंती, बुद्ध जयंती, ख्रिसमस, कबीर जयंती, गुरुनानक जयंती साजरी करण्याचे नियोजन केले व सर्वधर्म समन्वय साध्य केला.

दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाशी ते अत्यंत विनयाने वागत. 'मी महाराज वगैरे कोणी नाही. मी सामान्य माणूस आहे. तुम्ही मला या पदावर बसवले आहे, म्हणून मी बसलो आहे. मला काही ज्ञान नाही. आपण भगवंताचे, सद्गुरूंचे दास आहोत', असे ते सारखे म्हणत. 'आपण गुणग्राहक असले पाहिजे. दोषांकडे दुर्लक्ष करा, न्यायाने जगा. दोष सोडून गुणग्राकतेचा विचार ठेवला तर आपले अंतःकरण शुद्ध होईल, वृत्ती शांत राहतील. कुणाचा द्वेष, तिरस्कार करू नका. सर्वजण आपले बंधू-भगिनी आहेत असा भाव मनात ठेवून ज्ञानदृष्टीने सर्वांकडे पहा', असा त्यांचा उपदेश असायचा. प्रत्येकाला ते वाकून नमस्कार करायचे. लहान मुलांशीही ते अत्यंत प्रेमाने वागायचे, बोलायचे. साधी रहाणी, साधा पोशाख असायचा. ते सदैव आत्मानंदात निमग्न असायचे.

धर्मातील खरे तत्त्व कळावे यासाठी त्यांनी मार्गदर्शक ठरणारे अनेक दुर्मिळ ग्रंथ प्रकाशित केले. यामध्ये पॅसिव्ह योगा, गुरूगीता, विवेकचूडामणी, आत्मबोध, आत्माराम, सिद्धांत शिखामणी, सिद्धांत संहिता, प्रस्थानत्रयी, दासबोध, अज्ञेय मीमांसा, निजात्मस्वरूप, अष्टावक्र गीता, ब्रह्मसूत्र, उपनिषदे, भगवद्गीता, तुकारामगाथा, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी अशा १५० ग्रंथांचा समावेश आहे. हे सर्व ग्रंथ **vchindia.com** या संकेतस्थळावर त्यांनी विनामूल्य उपलब्ध करुन दिले. १५० ग्रंथांचे अवलोकन करुन शांभवी ज्ञान माहिती संदर्भासहित साधकांना उपलब्ध करुन दिली. त्यांनी साधारणपणे २०० शिष्यांना दीक्षा प्रदान केली. प्रत्येकाच्या साधनेची प्रगती पाहिली. इ.स. १९९२ ते २०२० अखेर प्रत्येक रविवारी सकाळी १० ते १ या वेळेत हुपरी येथील आपल्या '**कैवल्य**' या घरी त्यांनी साधकांना अध्यात्मज्ञान निरूपण केले.

मौजे वडगाव येथे दोन एकर जागेवर त्यांनी सद्‌गुरू निरंजनमहाराजांचा प्रशस्त आश्रम, ध्यान मंदिर, अन्नछत्र व कल्याणमंडप या इमारतींचे निर्माण केले व त्याची सर्व व्यवस्था लावून दिली. त्यांनी अनेक ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. काव्यरचना केल्या. विविध ट्रस्ट व सेवाभावी संस्थांकडून त्यांना मानाचे पुरस्कार प्राप्त झाले. इ.स. २०११ मध्ये जगद्‌गुरू श्रीशंकराचार्य, करवीरपीठ यांच्याकडून पुरस्कार प्राप्त झाला.

त्यांनी इ.स. १९९८ ते २०१७ पर्यंत २० वर्षे आश्रमाचे मठाधिपती हे पद अत्यंत समर्थपणे भूषविले व आपले उत्तराधिकारी म्हणून प.पू.सद्‌गुरू श्रीआदिनाथमहाराज डूम यांना नेमून ते या जबाबदारीतून मुक्त झाले.

अत्यंत प्रसन्न व्यक्तिमत्व, कुशाग्र बुद्धिमत्ता, अलौकिक प्रतिभा, भविष्याचा वेध घेण्याची क्षमता, गुरूचरणांवर प्रगाढ श्रद्धा, सेवाभाव व कमालीचा विनमप्रणा असलेल्या अशा प.पू.विनयानंदमहाराजांनी वयाच्या ६७व्या वर्षी, भाद्रपद शु.१२ शके १९४२ दि.३०.०८.२०२० रोजी सकाळी ८.०० वाजता साधनमग्न अवस्थेत महानिर्वाण केले.

***

# प. पू. श्रीरघुनाथाचार्य आद्य

जन्म
अक्षय तृतीया शके १७८३
इ.स.१८६१

निर्याण
भाद्रपद शु.१४ शके १८१८
(अनंतचतुर्दशी)२०.०९.१८९६

श्रीरघुनाथाचार्य आद्य यांचा जन्म आद्य नावाच्या घराण्यात आगरखेड येथे अक्षयतृतीया शके १७८३ इ.स. १८६१ रोजी झाला. ते मॅट्रिक पास होते. प.पू. श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे वडीलबंधू श्री.नानासाहेब यांची मुलगी श्रीरघुनाथाचार्यांना दिली होती. या पती पत्नींना श्रीनिंबरगीकरमहाराजांचा अनुग्रह होता.

श्रीनिंबरगीकरमहाराज हे दासबोधावर प्रवचने करीत. ते ऐकून त्यांची शिकवण श्रीरघुनाथाचार्यांनी लिहून काढली होती. त्यांचे अक्षर अत्यंत सुंदर होते. त्यांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांची वचने पोथीरूपाने देवनागरी लिपीत लिहून काढली. या पोथीवरूनच '**बोधसुधा**' हा ग्रंथ निर्माण झाला.

महाराजांचा अनुग्रह होताच श्रीरघुनाथाचार्यांना परमात्म्याचे विराट दर्शन झाले. ते गडबडून गेले. तेव्हा महाराजांनी सांगितले, रघुनाथा, घाबरू नकोस. तुझी योग्यता मोठी म्हणून तुला पहिल्यांदा दर्शन झाले. पुढे श्रीरघुनाथाचार्यांचा साधनाभ्यास वाढत गेला. ते रात्री साधनेस बसले की त्यांचे शरीर हे आसनासकट वरच्या आढ्याला जाऊन टेकत असे व पुनः खाली येत असे. हे दृश्य सोलापूरच्या श्रीप्रभाकरस्वामीमहाराजांनी कित्येकवेळा पाहिले.

श्रीरघुनाथाचार्य यांचे संसाराकडे विशेष लक्ष नव्हते. ते कायम साधनमग्न असायचे. म्हणून श्रीभाऊसाहेबमहाराजांनी त्यांना संसार करून परमार्थ करण्याचा उपदेश केला. हे श्रीनिंबरगीकरमहाराजांना कळले. तेव्हा महाराज भाऊसाहेबमहाराजांना म्हणाले, ''भाऊराया, तू रघुनाथाचार्यांच्या व्यवहारात पडू नकोस. पडलास तर जळून खाक होशील''.

श्रीरघुनाथाचार्यांनी आपली सर्व मालमत्ता विकून, श्रीनिंबरगीकरमहाराजांना चांदीचा मुखवटा करून दिला होता. श्रीनिंबरगीकरमहाराज समाधिस्थ झाल्यावर, त्यांच्या समाधीची पूजाअर्चा त्यांनी एकनिष्ठपणे आमरण चालविली.

आपले आगरखेड येथील घरदार, शेतीभाती, सर्व काही मी देतो, पण श्रीनिंबरगीकरमहाराजांची समाधी ज्या थोड्या जागेवर आहे, तेवढी जागा तुम्ही मला द्या, असे ते जमीनमालकांना म्हणत असत. पण ती जागा गुरवांनी दिली नाही. त्यांची ही निःसीम भक्ती पाहून, ''तुला महाराजांपुढे मी नंदी करून बसवितो''

असे श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर त्यांना म्हणाले होते.

श्रीरघुनाथाचार्य हे भीमरायाच्या देवळातील भीमाबाईच्या ओवरीलगत असणाऱ्या ओवरीत आपल्या बहिणीसह रहात होते. अंतकाळी त्यांना वाटले की आपण श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या समाधीजवळ देह ठेवावा. म्हणून ते आपल्या मंडळींना समाधीकडे घेऊन जाण्यास सांगू लागले. पण हे आजारी असलेने लोक त्यांना तिकडे घेऊन जाईनात. मग सगळ्या लोकांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा श्रीभाऊसाहेबमहाराज म्हणाले, ''भीमरायाच्या मंदिरातच त्यांना राहू द्यावे, म्हणजे श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या समाधीजवळ देह ठेवावा असा ध्यास लागून, सद्गुरूस्मरणातच त्यांचे देहावसान होईल. समाधीजवळ आणले तर हा ध्यास त्यांना राहणार नाही.''

याप्रमाणे श्रीरघुनाथाचार्य आद्य यांनी भाद्रपद शु. १४ अनंतचतुर्दशी शके १८१८ दिनांक २०.०९.१८९६ रोजी, वयाच्या ३५ व्या वर्षी पहाटे देह ठेवला. त्यांच्या इच्छेनुसार त्यांची समाधी श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या समाधीसमोर बांधली गेली.

***

# प.पू.श्रीगोविंद तुळशीराम ढेरे ऊर्फ सूरदास

निर्याण
भाद्रपद शु.१४ शके १९१२
इ.स.१९९०

श्री. तुळशीदास पांडुरंग ढेरे हे सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील कुची गावचे रहिवासी होते. त्यांच्या पत्नीचे नांव अनुसया. त्यांचा शेती व्यवसाय होता. ते नेमनिष्ठ वारकरी होते. त्यांच्या पोटी एक पुत्ररत्न जन्माला आले. या मुलाचे नांव 'गोविंद' असे ठेवले. हे गोविंद म्हणजेच गोविंद तुळशीराम ढेरे ऊर्फ सूरदास होत.

वयाच्या ५ व्या वर्षी सूरदासांना कुचीतील शाळेत घातले. सूरदासांना लहानपणापासून अध्यात्माची आवड होती. आई-वडिलांबरोबर ते वारीला जायचे. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांच्या कानावर विठूचा गजर येत होता. घरातील गरीब परिस्थितीमुळे सूरदासांना शाळा अर्ध्यावरच सोडावी लागली.

सूरदासांच्या घरात भाऊबंदकीचे वाद होऊ लागले. या वादाला कंटाळून सूरदास कुची गाव सोडून बाहेर पडले आणि सांगलीला आले. सांगलीला आल्यावर उदरनिर्वाहाचे काय? असा प्रश्न त्यांचेसमोर उभा राहिला. परंतु योगायोगाने त्यांना धनी वेलणकरांच्या श्रीगजानन मिलमध्ये नोकरी मिळाली. सकाळी उठायचे, कृष्णाबाईत स्नान करायचे, कुठेतरी अन्न सेवन करायचे, नोकरी करायची, सायंकाळी एखाद्या देवळात भजनाला जावे हा नित्यक्रम सुरू झाला. काही दिवसानंतर सूरदासांवर एक दैवी घाला आला. अल्पशा आजाराचे निमित्त होऊन सूरदासांची दृष्टी गेली. त्यांना दिसेनासे झाले. अंधत्वामुळे, मिळालेली नोकरी सुटली. आकाशच अंगावर कोसळल्यासारखे झाले. कुणाचा तरी आधार घेऊनच चालावे लागे. कुणी काही दिले तर खावे, नाहीतर नुसते पाणी पिऊन दिवस काढावे.

एक दिवस सूरदास कोणाचा तरी आधार घेत सांगली येथील पंचमुखी मारुतीरोडवरून चालले होते. पंचमुखी मारुती मंदिरातील घंटा वाजली. सूरदासांचे पाय थबकले. आत गेले नमस्कार केला. तेव्हा त्या मंदिरात प्रेमयोगी प.पू. श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांचे भजन सुरू होते. भजन झाल्यावर सूरदासांनी श्रीपांडुरंगमहाराजांचे घट्ट पाय धरले. त्यावेळी त्यांचेवर श्रीपांडुरंगमहाराजांचा कृपाहस्त आला. श्रीपांडुरंगमहाराजांनी सूरदासांचा अंगिकार केला आणि मार्गदर्शन केले. सद्गुरूभेट ही दुःख आणि दैन्य दूर करणारी असते. त्याप्रमाणे सूरदासांच्या जीवनात प्रकाश आला. श्रीपांडुरंगमहाराजांच्या भजनात सूरदास जाऊ लागले, पेटी वाजवू लागले. सुरेल आवाजात पदेही म्हणू लागले. सूरदासांचे शुद्ध आचरण, निगर्वी स्वभाव, शांती असल्याने ते सगळ्यांनाच आपलेसे वाटू लागले. बरेच भक्तगण त्यांना आपल्या घरी भोजनाला नेऊ लागले.

इ.स.१९३८-३९ साली दुपारी ३ ते ३.३० चे दरम्यान श्रीपांडुरंगमहाराज सूरदासांना घेऊन श्रीरामनिकेतनमध्ये, श्रीदासराममहाराज केळकर यांचेकडे आले आणि म्हणाले, 'रामभाऊ, हे एक माझं लेकरू तुमच्या पदरात घालत आहे. त्याच्यावर कृपाछत्र धरा. त्याला आपल्या पदरात घ्या. तुमच्या इथूनच

भवसागरातून तरून जाणेचा मार्ग त्याला सापडणार आहे.' एवढे बोलून श्रीपांडुरंगमहाराज सूरदासांना म्हणाले, 'तुला जर जन्ममरणाची वारी चुकवायची असेल तर इथली वारी चुकवू नकोस, सर्व तीर्थे इथे त्यांच्या पायाशी आहेत. तेच तुझे रक्षणकर्ते आहेत.' हे ऐकल्यावर सूदरासांनी पेटीवर सूर धरला आणि जनाबाईंचे 'येरे येरे माझ्या रामराया ।' हे पद म्हणायला सुरवात केली. यानंतर 'तू माय मी लेकरू । हे रामराया तुला कसा विसरू ।।' हा अभंग म्हटला. हा अभंग म्हटल्यावर प.पू.श्रीदासराममहाराजांना गहिवरून आले आणि म्हणाले, 'अहो सूरदास तुम्ही आमचेच आहात. तुम्हाला आम्ही कसे विसरू? अहो, सूरदास म्हणजे सुरांचा दास नव्हे, तर सूर ज्याचे दास झाले आहेत असे तुम्ही आहात' आणि याप्रमाणे श्रीदासराममहाराजांनी त्यांचे 'सूरदास' हे नामकरण केले. पुढे लोक त्यांना गोविंद ढेरे ऐवजी 'सूरदास' या नावानेच ओळखू लागले व तेच नाव रूढ झाले.

प.पू.श्रीपांडुरंगमहाराजांच्या आज्ञेने सूरदास एकदा जे श्रीदासराममहाराजांकडे आले, ते रामरूपच झाले. सूरदास श्रीदासराममहाराजांना फार मानत. 'मला जमीनीवर स्वर्ग त्यांचेमुळे दिसला. ती दीनांची माऊली मला भेटली नसती तर हे लेकरू दूर कोठे तरी भरकटलं असतं,' असे ते अभिमानाने सांगत असत.

आपल्या वडिलांची पंढरीच्या वारीची परंपरा त्यांनी चालू ठेवली. पंढरपूरात कितीही गर्दी असो, ते दर्शन घेतल्याखेरीज कधीही परत आले नाहीत. नंतर नंतर तर, सूरदास हे श्रीरामनिकेतनमध्ये एकटे यायचे. एकाने त्यांना विचारले, 'अहो सूरदास, तुम्ही एकटे कसे काय येता?' तेव्हा त्यांनी सांगितले की, माझ्या एका बाजूला श्रीपांडुरंगमहाराज असतात व एका बाजूला श्रीदासराममहाराज असतात, असे दोन दिव्य पुरूष माझ्या दोन्ही बाजूला असतील तर मी दुसऱ्या वाटेला जाईनच कसा?

सांगलीत ज्या ज्या ठिकाणी विठ्ठल मंदिरात नामसप्ताह असायचा, तेथे सूरदास हे जाणारच! चार-सहा तास वीणा गळ्यात अडकवून पहारा देत असत. सूरदासांनी अनेक लोकांना भक्तीमार्गावर आणणेचे काम केले. प.पू.श्रीदासराममहाराजांकडून अनेकांना मार्गदर्शन घ्यायला लावले. पंढरपुरात ताकपिठ्या विठोबाचे मंदिरात श्रीमामामहाराज रचित 'श्रीरामपाठ' सूरदासांमुळे नित्य म्हटला जातो. श्रीकैकाडीमहाराज एकदा कीर्तनात उत्स्फूर्तपणे म्हणाले की, 'सांगलीत केळकरमहाराजांचे अखंड कीर्तन सुरू आहे. सूरदासांचे भाग्य आहे की त्यांना दररोज कीर्तन श्रवणाचा लाभ होतो.'

गुढीपाडव्याला बरडे विठ्ठलमंदिरात नामसप्ताह सुरू होता. पहाटेच्यावेळी तिथे सूरदास हे भजनात तल्लीन झाले होते. देवळातील इतर मंडळी स्नान करून येऊन मग काकड आरती करावी या विचाराने, देवळाला कुलूप लावून गेली. आत सूरदास होते. एवढ्यात एक बाई हातात भला मोठा हारांचा हारा घेऊन आल्या. तो हारा सूरदासांना देत त्या बाई म्हणाल्या, 'अहो सूरदास, मी पंढरपूराहून हे हार भगवंताला आणले आहेत. घाला बरं का?' त्यावर सूरदासांनी तो हारा घेतला आणि आत ठेवला. थोड्या वेळांनी विश्वस्त मंडळी काकडारतीला मंदिरात आली. मंदिरात आल्यावर सूरदासांनी तो हारा विश्वस्तांकडे सुपूर्त केला. मंदिराला कुलूप होते याची कल्पना सूरदासांना नव्हती. तो हारांचा हारा बघून विश्वस्त एकदम अवाक् झाले. त्यांनी विचार केला की मंदिराला कुलूप असताना त्या बाई आत आल्या कशा? आणि त्यांनी हारा दिला कसा? बंद असलेल्या देवळात पंढरपूरहून रखुमाईशिवाय कोण येणार!

एकवेळ सूरदास गणपतीपुळ्याला पायी जाऊन आले. तेथे गेल्यावर त्यांना गणपतीची आरती स्फुरली. ती आरती मुद्दाम येथे देत आहे :-

**गौरीनंदना जय गजानना । आरती ओवाळू तव चरणा ।।१।।**
**करी टाळ विणा घेऊन रंगून । मृदंग वाजे दणा दणा ।।२।।**
**ठंण ठंण ठंण ठंण घंटा वाजे । मंदिर गर्जे दणा दणा ।।३।।**
**झन झन झन झन टाळ वाजे । गुंऽऽ गुंऽऽ करी वीणा ।।४।।**
**डमडमडमडम डमरू वाजे । शिवपार्वती गजानना ।।५।।**
**नंदीवरूनी आली स्वारी । आनंद झाला त्रिभुवना ।।६।।**
**भ भ भक्ती म म मुक्ती । सूरदास दासरामी लागे चरणा ।।७।।**
**भक्तजन जे आरती करिती । फलप्राप्ती देती क्षण त्या लागेना ।।८।।**

सूदरासांनी या आरती व्यतिरिक्त अनेक काव्य रचना केल्या. या काव्य रचनेत भक्तिभाव ओथंबलेला असायचा. त्यातील एक रचना मला फार भावली म्हणून ती खाली देत आहे :-

होईन मी भिकारी । रामनिकेतनचा वारकरी ।।१।। हाचि माझा नेमधर्म । मुखी रामदादांचे नाम ।।२।।
हीच माझी उपासना। लागणे रामदादांच्या चरणा।।३।। सूरदास म्हणे दादामाऊली । नित्य धरा भक्तावरी कृपेची साऊली।।४।।

अशा या सूरदासांना पोटाचा त्रास सुरू झाला. पोटात दुखणे सुरू झाले. श्री. दत्तात्रय कर्णेकर म्हणून श्रीदादांचे शिष्य आहेत. ते त्यांना गोळ्या आणून द्यायचे. पण पोटात दुखणे हे तेवढ्यापुरते थांबायचे. मग श्रीकर्णेकर सूरदासांना घेऊन श्रीदासराममहाराजांकडे आले. सकाळ होती. नित्यक्रम चाललेला होता. नित्यक्रम झाल्यावर श्रीदादांनी श्री. कर्णेकरांना श्रीसूरदासांना आत घेऊन या म्हणून सांगितले. त्यांना कॉफी दिली व खिशात हात घालताच जेवढे पैसे हातात येतील, तेवढे पैसे काढले व श्री.कर्णेकरांचे हातावर ते ठेवले आणि सांगितले, 'कर्णेकर, सूरदासांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये घेऊन जा.' याप्रमाणे श्री. कर्णेकरांनी सूरदासांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. परंतु दुखणे काही कमी होत नव्हते. शेवटी सूरदासांच्या कुची या गावी त्यांच्या नातेवाईकांना बोलावणेत आले. त्याप्रमाणे सूरदासांची आई व नातलग लगोलग आले. श्रीसूरदास त्यांना म्हणाले, या माझ्या झांजा आहेत. त्या श्री. कर्णेकरांना द्या व मी गेलो तरी मला तुम्ही कुचीला नेऊ नका. फक्त आमच्या श्रीदादांच्यात कळवा. अशा या श्रीसूरदासांनी भाद्रपद शु.१४ (अनंत चतुर्दशी) शके १९१२ इ.स. १९९० साली श्रीदादांचे स्मरणात देह ठेवला.

देह ठेवल्यानंतर सूरदासांना श्री लाळगे विठ्ठल मंदिरात अंत्यदर्शनासाठी ठेवले होते. श्रीदादा स्वतः हार घेऊन श्रीविठ्ठल मंदिरात आले आणि त्यांनी सूरदासांच्या पार्थिवावर हार अर्पण केला. सूरदासांची अंत्ययात्रा श्रीरामनिकेतनवरून गेली. सूरदासांच्या पार्थिवाला श्रीअण्णांनी खांदा दिला होता.

***

# प.पू. सद्गुरू दाजीसाहेबमहाराज तथा श्रीबळवंतभारतीमहाराज

जन्म
दि.२३.१०.१९३७

निर्याण
भाद्रपद व. ७, शके १९३१
दि.११.०९.२००९

श्री.रामचंद्र पांडुरंग गावडे व सौ. सावित्रीबाई रामचंद्र गावडे हे सत्शील, भाविक दांपत्य गोटखिंडी, जि. सांगली येथे रहात होते. शेती व शेळ्या, मेंढ्या पाळणे हा त्यांचा व्यवसाय होता. गोटखिंडीच्या डोंगरावर श्रीसंतोषगिरी या संतांचे समाधीस्थान आहे. श्री. रामचंद्र हे नित्यनेमाने तेथे जाऊन समाधीचे दर्शन घेत. पुढे काही कारणास्तव गोटखिंडीची शेती व घर विकून हे कुटुंब कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील आळते या गावी राहण्यास आले व तेथेच दि. २३.१०.१९३७ रोजी प्रातःकाळी त्यांना पुत्रप्राप्ती झाली. हे पुत्र म्हणजेच आमचे ‘श्रीबळवंतभारतीमहाराज’ होत. त्यांच्या जन्मावेळी बाहेर धो धो पाऊस पडत होता. एक जैन साधू त्यांच्या घराच्या वळचणीला उभे होते. या जैन साधूंनी गावडे कुटुंबियांना ‘हा बाळ पुढे महापुरूष होईल व अनेकांच्या मोक्षासाठी प्रयत्न करेल’ असे सांगितले होते.

पुढे यथावकाश हे कुटुंब आळते सोडून सांगलीला आले. श्री. रामचंद्रपंतांनी भाड्याने घर घेतले व शेळ्या-मेंढ्यांचा व्यवसाय सुरू केला. त्याचबरोबर दुसऱ्याच्या शेतावर रोजंदारीसाठीसुद्धा ते जाऊ लागले. काही दिवसातच दाजीसाहेबांच्या वडिलांना देवाज्ञा झाली. नंतर आईने काबाडकष्ट करून आपल्या सर्व मुलांना सांभाळले. सांगली नगरपालिका शाळा नं.१६ मध्ये दाजीसाहेबांचे शिक्षण सुरू झाले. दाजीसाहेबांची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने, त्यांचे परममित्र श्री. श्रीपती घोंगडे त्यांना सर्वतोपरी मदत करत. दाजीसाहेब हे कुशाग्र बुद्धिचे व अभ्यासात हुशार होते. ते मॅट्रिक (रात्रीच्या शाळेमध्ये) पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नंतर त्यांची दि.०१.०५.१९५७ रोजी अंकलखोप, जि. सांगली येथे खादी ग्रामोद्योग खात्यात सर्कल गाईड म्हणून नेमणूक झाली. यथावकाश त्यांचा कसबे डिग्रज येथील श्री. विठोबा वसगडे यांची कन्या पद्माताई यांच्याशी विवाह झाला. सर्व नोकरी त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे, निर्भिडपणे केली. त्यांनी सांगली, सातारा, पुणे येथे नोकरीच्या काळात काम केले व महाराष्ट्र सरकारच्या खादी ग्रामोद्योग खात्यातून पर्यवेक्षक पदावरून दि.३०.०९.१९८९ रोजी त्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली.

कौटुंबिक संकटे, दुःखे यामुळे त्यांचे मन अध्यात्माकडे वळले. शिर्डीच्या साईबाबांचे ते भक्त झाले. प.पू.सद्गुरू नीळकंठभारती महाराज सांगलीवाडीत श्री. विष्णु थोरबोले, श्री. शाम पवार यांचेकडे येत असत. श्री. शाम पवार व श्रीदाजीमहाराज एकाच खात्यात काम करत असल्याने, श्री. शाम पवार यांच्या आग्रहास्तव श्रीदाजीमहाराज श्रीनीळकंठमहाराजांच्या दर्शनास व त्यांची रामायण कथा ऐकण्यास आले. त्यांचे दर्शन घेताच व त्यांची अमृतवाणी कानी पडताच दाजीसाहेबांची सर्व इंद्रिये एकाग्र झाली व ते मंत्रमुग्ध होऊन त्यांचे प्रवचन ऐकू लागले. श्रीनीळकंठबाबांचे तेज बघून त्यांचा व श्रीसाईबाबांचा काहीतरी संबंध असावा असे

त्यांच्या मनात आले. प्रवचनानंतर श्रीदाजीसाहेबांनी श्रीनीळकंठबाबाना प्रश्न विचारला, 'तुम्ही देव पाहिला आहे का?' तेव्हा श्रीबाबा त्यांना लगेच म्हणाले, 'होय, अगदी मी जसे तुम्हाला पहातो आहे, तसेच देवालाही पाहिले आहे. किंबहुना त्याहीपेक्षा स्पष्ट देव अनुभवला आहे. पण देवाला कोण पाहू इच्छितो? सगळ्यांना देव सोडून सगळे पाहिजे आहे.' हे ऐकून श्रीदाजीसाहेब भारावून गेले. 'अनुग्रह द्या' असे म्हटल्यावर, सात दिवसांचे रामायणाचे पारायण झाल्यावर अनुग्रह घेता येईल, असे सांगितले. पारायणाची सांगता गुरूवारी होणार होती. त्याच दिवशी श्रीनीळकंठमहाराजांनी श्रीदाजीसाहेब व त्यांच्या पत्नी सौ. पद्माताई यांना अनुग्रह दिला. दाजीसाहेब रंगाने काळेसावळे असून त्यांचा शरीरबांधा एखाद्या पहिलवानासारखा होता. तीन बटणांचा भगवा नेहरू सदरा व भगवी लुंगी हा त्यांचा पोशाख होता. नीळकंठबाबांच्या पश्चात् ७-८ वर्षे खादी ग्रामोद्योग खात्यात नोकरीसुद्धा त्यांनी याच पोशाखात केली.

श्रीमद्भागवताच्या आधारे श्रीनीळकंठबाबांनी बायोगॅस संशोधन श्रीदाजीसाहेब यांच्या हस्ते करविले. त्याला आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त झाले. सरकारी दरबारी त्याचे मूल्यमापन होऊन, श्रीदाजीसाहेबांना चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातून 'हरीमालिनी पुरस्कार' तत्कालीन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. मनमोहनसिंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. श्रीदासराममहाराजांनी विस्तृत पत्र पाठवून श्रीदाजीसाहेबांचा गौरव केला. गुजरातमध्ये बार्डोलीला दाजीसाहेबांना गोबर गॅस संशोधन स्नेहसंमेलनात भाग घेण्याचे निमंत्रण आले. त्यावेळी ते आपल्याबरोबर आपले सद्गुरू श्रीनीळकंठबाबांना घेऊन गेले. स्नेहसंमेलनासाठी ३०/४० टक्के परदेशी लोक आले होते. त्यांच्यासमोर इंग्रजीतून भाषण करणे भाग होते. दाजीसाहेबांना तर इंग्रजी फारसे येत नव्हते. त्यांनी ही गोष्ट श्रीनीळकंठबाबांच्या कानावर घातली. श्रीनीळकंठबाबा म्हणाले, 'आपला पाठीराखा पांडुरंग असल्याने त्याला आपली काळजी आहे. आपण निश्चिंत असावे.' दुसरे दिवशी सकाळी उठताच ते दाजीसाहेबांना म्हणाले, 'आपले काम फत्ते होणार. देवाने संकेत दिला आहे.' ठरल्यावेळी दाजीसाहेबांना व्यासपीठावर बोलावण्यात आले. दाजीसाहेब व्यासपीठावर गेल्यावर त्यांना असे जाणवले की, या आपल्या देहातून दुसरा असाच एक देह बाहेर पडला व तो डायसवर जाऊन ३० मिनिटे इंग्रजीमध्ये भाषण देत आहे व आपण ते साक्षीरुपाने पहात आहोत. भाषण व प्रश्नोत्तरे संपल्यावर ती आकृती पुन्हा पूर्वीच्या शरीरामध्ये येऊन अंतर्धान पावली व दाजीसाहेब भानावर आले. तोपर्यंत प्रेक्षकातून टाळ्यांचा कडकडाट ऐकू येत होता. दाजीसाहेबांनी नीळकंठबाबांना साष्टांग लोटांगण घातले. 'सद्गुरूसारिखा असता पाठीराखा। इतरांची लेखा कोण करी ॥' हेच खरे.

श्रीदाजीसाहेबांनी सांगलीवाडी, येळावी, राजापूर (ता.तासगांव) येथे संतबाळूमामा महाराजांच्या मंदिर उभारणेसाठी सर्वतोपरी मदत केली. तेथील मूर्ती व कळस स्थापना त्यांच्याच हस्ते झाली. तसेच संगमेश्वर येथील श्रीस्वामीसमर्थ मूर्तीची स्थापना दाजीसाहेबांच्या हस्तेच झाली. विठ्ठलवाडीला तपोवना

शेजारी पडकी विहीर होती. श्रीदाजीसाहेबांनी कित्येक लोकांच्या विरोधाला न जुमानता विहीरीतील गाळ काढला व विहिरीला भरपूर पाणी लागले. त्या पाण्यावर विठ्ठलवाडीच्या माळावर, जेथे कुसळसुद्धा उगवत नव्हते तेथे सर्व प्रकारच्या भाज्या, आले इ. उत्पन्न येऊ लागले. आणि सर्व क्षेत्राचा कायापालट झाला. १९८४ मध्ये श्री.श्रीकांत शेटजींच्या खाजगी मंदिरात श्रीगुरूदत्तात्रेय मूर्ती प्रतिष्ठापना नियोजनामध्ये त्यांनी पुढाकार घेऊन, मूर्ती प्रतिष्ठापना श्रीदादांच्या हस्ते केली. अत्यंत अविस्मरणीय असा भव्य दिव्य कार्यक्रम झाला.

दि. १७ नोव्हेंबर १९८३ रोजी सद्‌गुरू श्रीनीळकंठबाबांनी समाधी घेतली. त्यानंतर भव्य अशा समाधी मंदिराचे काम श्रीदाजीसाहेबमहाराजांनी पूर्ण केले.

प.पू.श्री.श्रीपतीबुवा घोंगडे या त्यांच्या परममित्रामुळे दाजीसाहेब श्रीरामनिकेतनमध्ये आले. दाजीसोबांची प.पू.दासराममहाराजांच्यावर अपार श्रद्धा होती. दर गुरूपौर्णिमेला ती.स्वरूप श्रीचंद्रशेखर अण्णांचे बरोबर दाजीसाहेब भल्या पहाटे श्रीदादांना स्नान घालत. प.पू.दासराममहाराज व प.पू.नीळकंठबाबा हे वेगळे नाहीत, अशीच दाजीसाहेबांची धारणा होती. श्रीरामनिकेतनमधील उत्सवात श्रीदाजीसाहेब पडेल ते काम करत. त्याकाळी महाप्रसादाचेवेळी पंगतीत खाली वाकून वाढावे लागे. जेवणे झाल्यावर पत्रावळी गोळा करुन पाटीत भरून, त्या डोक्यावर घेऊन नदीकाठी टाकण्याचे काम ते अगदी आनंदाने, उत्साहाने करत.

श्रीदाजीसाहेबांनी शिवस्वरोदय शास्त्राचाही खूप अभ्यास केला होता. या शास्त्राचा फायदा त्यांना चित्तशुद्धी होण्यासाठी झाला. याशिवाय त्यांनी रेकी विद्येचाही अभ्यास केला. ते रेकीमास्टर होते. वास्तुशास्त्र, ज्योतिष, पंचांग याचे ज्ञानसुद्धा त्यांना अवगत होते. काही वनौषधींचा प्रयोग कसा करावा हेही ते जाणून होते.

इ.स.१९८१ मध्ये श्रीनीळकंठबाबा हे श्रीदाजीसाहेब, श्री. घोंगडेबुवा यांचेबरोबर प्रथम श्रीरामनिकेतनमध्ये आले. श्रीरामनिकेतनच्या वाड्याच्या उंबऱ्यात पाऊल टाकताच श्रीनीळकंठबाबांनी 'अरे हा तर चित्तशुद्धीचा कारखानाच आहे व ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात वर्णन केलेला निगूढ मठ आहे' असे सांगितले व दाजीसाहेबांना 'आपण दररोज श्रीदादांच्या कीर्तनास जावे' अशी गुरूआज्ञाच केली. त्यांच्या आज्ञेप्रमाणे श्रीदाजीसाहेबांनी श्रीदादांच्या नित्यकीर्तन श्रवणाचा नेम केला. श्रवण, मनन ते करु लागले. काही शंका आल्यास दुपारच्या वेळेत दादांच्याकडे जाऊन अध्यात्मचर्चा करून, शंका निरसन करुन घेऊ लागले. त्याचा परिणाम म्हणून त्यांची बुद्धि परमात्मविचाराने भरून जाऊन, श्रद्धेचे निष्ठेमध्ये रुपांतर झाले. श्रीदादा त्यांना म्हणायचे, 'गेल्या जन्मी तुमचा मोक्ष थोडक्या कारणासाठी चुकला आहे, आतापर्यंत जरी बराच काळ गेला असला, तरी तुम्ही माझे पाचवे पुत्र आहात, म्हणूनच श्रीनीळकंठबाबांनी तुम्हाला मजकडे सोपवले आहे.'

श्रीनीळकंठमहाराजांनी देह ठेवल्यानंतर, श्रीनीळकंठमहाराज तीन वेळा श्रीदादांकडे आले व आपली अपूर्ण कार्ये पूर्ण करावीत अशी विनंती केली. पहिले कार्य म्हणजे, 'नीळकंठबाबांची पादत्राणे, जी दाजींनी आपल्या घरी कपाटात सुरक्षित ठेवली होती, त्याचे सिंहासन बनवून ते आपल्या स्वहस्ते दाजींच्या घरी

स्थापन करावे.' त्याप्रमाणे श्रीदादांनी सिंहासन तयार करून, त्याची स्थापना केली. दुसरे म्हणजे, 'दाजीसाहेबांना गादीवर बसवून, आपण स्वतः अधिकार प्रदान सोहळा श्रीरामनिकेतनध्ये करावा.' तोही सोहळा श्रीदादांनी स्वतः सर्व नियोजन करुन गीताजयंती, मार्गशीर्ष शु.११ शके १९०५, शुक्रवार दि. १६.१२.१९८३ रोजी संपन्न केला.

तिसरी गोष्ट म्हणजे, 'दाजीसाहेबांना नामस्मरणाचे महत्व पटवून, आपण त्यांच्याकडून नामस्मरण करून घ्यावे.' त्याप्रमाणे श्रीदादांनी दाजीसाहेबांना बोलावणे पाठविले. दाजीसाहेबांना येण्यास थोडा विलंब झाल्यावर श्रीदादा रागाचा आव आणून म्हणाले, 'काय हो दाजी, असा का विलंब झाला, काय माझ्यावर उपकार करताय का मला भेटण्यासाठी?' दाजीसाहेबांनी क्षमायाचना केल्यावर श्रीदादांनी विचारले, 'काय हो, आपण दररोजचे नामस्मरण किती करता ते सांगता का जरा?' तेव्हा दाजीसाहेबांनी सकाळपासून रात्रीपर्यंतची त्यांची दिनचर्या, नोकरीचा व्याप वगैरे सांगितले व त्यामुळे नामस्मरण होत नसल्याचे सांगितले. श्रीदादांनी सर्व ऐकून घेतले व मोजक्या शब्दात दादा बोलले, 'सबब चालणार नाही. परमार्थात नामाशिवाय काहीच होत नाही, ते केल्याशिवाय परमार्थ नाही. तुमच्या श्रीबाबांनी हा निरोप द्यायला सांगितला आहे. तेव्हा कसे काय करणार ते आत्ताच सांगा.' तेव्हा दाजीसाहेब म्हणाले, 'चालेल, आत्ताच सुरवात करतो.' 'नक्की करणार का' असे दादांनी दोनदा विचारले. त्याला 'करतो' असेच उत्तर दाजीसाहेबांनी दिले. शेवटी दाजीसाहेब उठले व दादांना साष्टांग नमस्कार घालून, 'हे आपल्याला अभिप्रेत असलेले, नामस्मरण माझ्याकडून घडेल असा आपण आशीर्वाद द्यावा, त्याशिवाय मी हे पाय सोडणार नाही.' अशी कळवळून प्रार्थना केली. त्यावर प्रसन्न अंतःकरणाने, तोंड भरून श्रीदादांनी 'घडेल' असा आशीर्वाद दिला. तेव्हापासून दाजीसाहेबांनी नामस्मरणाचा सपाटाच लावला. दिवसरात्र साधना केली व या दरम्यान त्यांना अनेक दिव्य अनुभव आले. एकदा साधनाला पहाटे ३ वाजता बसलेले असताना, तीन ते चार दरम्यान सहज डोळे उघडले गेले असता, संपूर्ण पडवीमध्ये डाव्या बाजूला दोन फूट उंचीच्या अग्निज्वाळा दिसायला लागल्या. विस्मयाने ते पहातच राहिले. कुतुहलाने अग्नि पोळतोय का हे पाहण्याच्या उद्देशाने त्यांनी त्यात बोट घालताच, एकदम थंड विजेचा तरंग संपूर्ण शरीरभर पसरल्याचे त्यांना स्पष्ट जाणवले. पुढे सांगलीस आल्यावर 'आपली साधना पूर्ण झाली आहे' असे श्रीदादा त्यांना म्हणाले व या अनुभवाची आठवण करून दिली.

विठ्ठलवाडीच्या मठात मंदिराचे बांधकाम दाजीसाहेबांनी सुरू केले. आर्थिक स्थिती बिकट व खेडेगावात दळणवळणाच्या सोयी फारशा नसल्याने, खूपच अडचणी येत होत्या. काही वेळा तर बांधकाम बंद पडते की काय अशी परिस्थिती निर्माण व्हायची. असेच एकदा दाजीसाहेब दादांकडे भेटायला आले असताना, दादांनी त्यांना मंदिराच्या बांधकामाबद्दल विचारले. तेव्हा दाजीसाहेबांनी त्यांना सर्व परिस्थिती सांगितली. श्रीदादांनी दाजीसाहेबांना १ रुपया प्रसाद म्हणून दिला. तेव्हा दाजीसाहेबांना अत्यंत आनंद झाला. शिष्यांनी विचारल्यावर

दाजीसाहेब म्हणाले, 'सदर रुपयावर मठातील बांधकाम पूर्ण होणार आहे' आणि खरोखरच त्यानंतर देणगीरूपाने मठात आवश्यक ती सर्व मदत आली व मठातील मंदिर व मंडपाचे काम व्यवस्थित पूर्ण झाले.

श्रीदाजीसाहेबांनी आपले सद्‌गुरू श्रीनीळकंठबाबांप्रमाणेच आपल्या सहवासात येणाऱ्या समाजातील सर्व स्तरांतील लोकांना अडी अडचणीत सर्वतोपरी मदत करून, त्यांना नामस्मरणाचा उपदेश करून, भक्तीमार्गात आणले व अनेक जीवांचा उद्धार केला.

इ.स.२००८ पासून त्यांच्या तब्येतीच्या तक्रारी सुरू झाल्या. आपले निर्याण जवळ आले आहे हे त्यांनी ओळखले व हळू हळू सर्व जबाबदारी आपले नियोजित उत्तराधिकारी श्रीसोऽहंनिरंजनमहाराज यांचेवर सोपविली.

अशा या प.पू.सद्‌गुरू दाजीसाहेबमहाराज तथा महंत बळवंतभारती यांनी भाद्रपद कृ. सप्तमी दि.११.०९.२००९ रोजी सकाळी ९.३० वाजता, वयाच्या ७२ व्या वर्षी सद्‌गुरूस्मरणात महानिर्वाण केले व ते नीळकंठस्वरूपात विलीन झाले. त्यानंतर एक वर्षातच इ.स.२०१० मध्ये त्यांची समाधी असलेल्या जागेवर भव्य ध्यानमंदिर उभारले गेले. या ध्यानमंदिराची वास्तूशांत व दाजीसाहेबमहाराजांच्या पादुका प्रतिष्ठापनेचा सोहळा, शास्त्रशुद्ध विधीने प.पू.सद्‌गुरू श्रीचंद्रशेखरअण्णांच्या हस्तेच झाला.

***

# प.पू.श्रीगोविंदमहाराज उपळेकर

**जन्म**
**माघ शु.२ शके १८०९**
**दि.१५.०१.१८८८**

**निर्याण**
**भाद्रपद व.८ शके १८९६**
**दि.०८.१०.१९७४**

उपळेकर घराणे हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक गावचे. या घराण्यात श्रीरामचंद्र उपळेकर या नावाचे सुशील आणि सुसंस्कृत गृहस्थ होते. ते फलटण या गावी वकिलीचा व्यवसाय करत. या श्री.रामचंद्रराव यांचा विवाह सौ. अंबाई या कन्येशी झाला. या दांपत्याच्या पोटी माघ शु. २ शके १८०९ दि.१५.०१.१८८८ रारेजी पुत्ररत्न अवतीर्ण झाले. बाराव्या दिवशी या मुलाचे नांव 'गोविंद' असे ठेवणेत आले. हा गोविंद म्हणजेच आमचे 'प.पू.श्रीगोविंदमहाराज उपळेकर'.

या गोविंदमहाराजांना पाच भाऊ आणि दोन भगिनी होत्या. श्रीगोविंदमहाराजांना ''काका'' या उपनावाने संबोधिले जायचे. श्रीगोविंदमहाराजांचे प्राथमिक शालेय शिक्षण फलटणच्या मुधोजी हायस्कूलमध्ये झाले व पुढील माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी प्रशालेत (नूमवि) झाले.  त्यांना वैद्यकशास्त्राची आवड असल्याने त्यांनी उच्च शिक्षणासाठी बी.जे.मेडिकल कॉलेज, पुणे येथे प्रवेश घेतला. योग्य तो कोर्स पूर्ण करून ते १९१० साली एल.पी.सी.एस.ही परीक्षा उत्तीर्ण झाले.  इ.स. १९१३ साली श्री. दादोजी कोंडदेव यांच्या वंशातील दुर्गा नामक कन्येशी त्यांचा विवाह झाला. लग्नानंतर पत्नीचे नांव सौ. रुक्मिणी असे ठेवणेत आले.

विवाहानंतर श्रीगोविंदमहाराज सेनादलातील (इंडियन मेडिकल सर्व्हिस) वैद्यकीय सेवेचे कमिशन मिळवून, उच्च पदावर सेनादलात दाखल झाले म्हणजेच सैन्यात शुश्रुषा विभागात दाखल झाले. त्यावेळी पहिल्या महायुद्धाचा काळ होता. इ.स.१९१४ मधील पहिल्या जागतिक महायुद्धात ते इंग्लंडमधे दाखल झाले. तेथे त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आणि सचोटीने सेवा केली. इंग्लंडमधील श्रीगोविंदमहाराजांची कामगिरी बघून सर्जनच्या तोडीची सेवा केल्याने, इंग्रज सरकारने त्यांचा दोन सुवर्णपदके आणि तीन रौप्यपदके देऊन सन्मान केला. महायुद्ध समाप्तीनंतर रावळपिंडी येथे त्यांची नेमणूक झाली.

युद्धभूमीवर दररोज मरणोन्मुख व घायाळ झालेल्या जवानांवर त्यांना शस्त्रक्रिया कराव्या लागत. हे बघून त्यांना आपले जीवन कसे क्षणभंगूर आहे याची जाणीव झाली व त्याची बोच सतत बोचत राहिली. ऑपरेशनच्या तंबूबाहेर महाराज येऊन बसत आणि आकाशाकडे सतत पहात बसत. एक दिवशी असेच आकाशाकडे बघत बसले असताना त्यांना समाधी अवस्था प्राप्त झाली आणि त्या अवस्थेत हातात पळी घेतलेली एक दिगंबर मूर्ती त्यांना स्पष्ट दिसली. प्रत्यक्ष या दिगंबर मूर्तीचे दर्शन आपल्याला केव्हा होणार ही एकच आस त्यांच्या मनात घर करून राहिली.

इ.स. १९२० साली रावळपिंडीहून महाराज रजा घेऊन फलटणला आले. फलटणला आल्यावर निवासी रावसाहेब श्री. गोविंदराव रानडे या आपल्या स्नेह्याबरोबर पुसेसावळी या गावी आले. पुसेसावळी हे गाव सातारा जिल्ह्यात आहे. पुसेसावळीला आल्यावर त्यांच्या समोर दिगंबर अवस्थेत श्रीकृष्णदेवमहाराज आले. महाराजांनी या श्रीकृष्णदेवमहाराजांना पाहिले मात्र, ते एकदम अचंबित झाले. समाधीअवस्थेत दिसलेली दिगंबरमूर्ती आणि श्रीकृष्णदेवमहाराज हे एकच आहेत ही खूण पटली. श्री गोविंदमहाराज मिलिटरीच्या वेषात सुटाबुटात होते. हा वेष पाहून श्रीकृष्णदेवमहाराज म्हणाले, 'हे नाटकी ध्यान इकडे कशाला आले.' हे वाक्य ऐकल्यावर श्रीगोविंदमहाराजांच्या (काकांच्या) मनात पालट झाला आणि त्याचक्षणी त्यांनी ठरविले की आपण नोकरी आणि संसार सोडायचा आणि गुरूसेवेत रहायचे. आणि त्याप्रमाणे त्यांनी केले. राहत्या घरी गडबड झाली. गोविंदमहाराजांचे वडील बंधू पुसेसावळीला आले आणि जबरदस्तीने गोविंदमहाराजांना घेऊन चालले. हे बघून श्रीकृष्णदेवमहाराज म्हणाले, 'गोविंदा, लवकर ये रे'. वडिलबंधूंनी घरी आल्यावर गोविंदमहाराजांना समजवायचा फार प्रयत्न केला, पण त्यांना गुरूचरणसेवेचा ध्यास लागला होता. गोविंदमहाराज ऐकत नाहीत म्हटल्यावर, यांना वेड लागलंय म्हणून त्यांना बांधून त्यांचे बंधू वेड्याच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. तेथील डॉक्टर म्हणाले, 'हे बघा, सुरवातीला मी या रुग्णाशी स्वतः बोलेन आणि दाखल करावे वाटले तर दवाखान्यात दाखल करून घेईन.' डॉक्टरांनी गोविंदमहाराजांना वेगवेगळे प्रश्न विचारले. त्यांची महाराजांनी समर्पक उत्तरे दिली. ही उत्तरे एकूण डॉक्टर म्हणाले, यांना वेड लागलेले नाही. यांना घरी घेऊन जावा. याप्रमाणे ते सर्वजण घरी आले. घरी आल्यावर काही दिवसातच काका घरातून पळून जाऊन, चालत पुसेवावळीला आले (अंतर ६० ते ७० कि.मी.) आणि त्यांनी श्रीकृष्णदेवमहाराजांची सेवा सुरू केली. सद्गुरू सांगतील ती सेवा महाराजांनी केली. काहीवेळा सद्गुरूंनी दिवस दिवस डोहात बसणे, अन्नपाण्याविना डोंगर चालायला लावणे, निवडुंगाच्या वनात चालायला लावणे, गरम वाळूवर चालायला लावणे, भर उन्हात उताणे झोपणे, गुरूचरणास हात लावायला सांगणे, हात लावताच लाथाबुक्यांचा वर्षाव करणे अशा कठोर परीक्षा घेतल्या. या सर्व कसोट्यांमध्ये गोविंदमहाराज उतरले हे बघून, श्रीकृष्णदेवमहाराजांनी त्यांच्यावर कृपा केली व पुन्हा जाऊन संसार करण्याची आज्ञा केली. महत्वाची गोष्ट अशी आहे की, श्रीगोविंदमहाराज आणि श्रीकृष्णदेव यांचा सहवास फक्त ३ वर्षांचा होता. पण या कालखंडात जे मिळवायला पाहिजे ते श्रीगोविंदमहाराजांनी मिळविले.

कालांतराने भाद्रपद व.१३ इ.स. १९२९ साली श्रीकृष्णदेवमहाराजांनी डोहात बुडी मारुन देहत्याग केला. ही वार्ता कळताच श्रीगोविंदमहाराज परत पुसेसावळीला आले आणि ३ दिवस आक्रोश करत बसले. शेवटी श्रीकृष्णदेवमहाराज प्रगट होऊन त्यांनी त्यांना शांत केले.

इ.स.१९२३ ते इ.स.१९३३ या दहा वर्षात गोविंदमहाराज अज्ञातवासात गेले. त्यांनी विविध तीर्थयात्रा केल्या. शेवटी १९३३ साली ते नगर जिल्ह्यातील वृद्धेश्वर येथे आले आणि तेथून ते परत फलटणला आले. परत

संसार  सुरू केला आणि त्यादरम्यान अध्यात्मिक लेखनही सुरू केले. श्रीज्ञानेश्वरी सुबोधिनी, श्रीहरिपाठ सांगाती, प्रशस्ती, भावार्थी इ. ग्रंथाद्वारे लेखन केले.

श्रीगोविंदमहाराज एकदा सांगली जिल्ह्यातील माधवनगर या गावी आले होते. माधवनगरला श्री.नातूशेठ म्हणून गृहस्थ होते. त्यांची कॉटनमील होती. या कॉटनमीलमध्ये त्यांनी १०८ सत्यनारायण योजिले होते. या कार्यक्रमाला श्रीगोविंदमहाराज आले होते. या कार्यक्रमामध्ये माझे पणजोबा प.पू.सद्गुरू श्रीमामामहाराज केळकर यांचे कीर्तनही ठेवलेले होते.  'सत्यवाचे नारायण । तोचि सत्यनारायण ।।' या अभंगावर श्रीमामांचे कीर्तन झाले. या कीर्तनात असा रंग भरला की, कीर्तन ऐकता ऐकता श्रीगोविंदमहाराज हे 'ओ ज्ञानेश्वर, ओ ज्ञानेश्वर' असे म्हणत आमच्या मामामहाराजांजवळ आले आणि त्यांनी श्रीमामांना अक्षरशः मिठी मारली. या अवस्थेत ते बराचकाळ होते.

श्रीदासराममहाराज केळकर कीर्तनात सांगत की, श्रीगोविंदमहाराज हे विदेही सत्पुरुष होते. देहाची जरा जरी जाणीव झाली तरी हात तोडा, पाय तोडा, डोके तोडा असे म्हणायचे.

अशा या श्रीगोविंदमहाराजांनी देह ठेवायच्या आधी दीड दोन महिने निर्वाणीची भाषा सुरू केली. जवळच्या व्यक्तींना ते ओरडून सांगत की, ''आता आमची आवराआवर चाललेली आहे.'' तब्येत बरी नसली तरी त्यांनी आपला नित्यक्रम चुकविला नाही. भाद्रपद व. ८ चा दिवस उगवला. त्या दिवशी त्यांना पहाटे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन झाले. सकाळचे नित्यकर्म आवरले. मात्र दिवसभर ते काही बोलले नाहीत आणि अखेर भाद्रपद व. ८ शके १८९६ मंगळवार दि.०८.१०.१९७४ रोजी संध्याकाळच्या वेळेला फलटण येथे वयाच्या ८६ व्या वर्षी सद्गुरू श्रीकृष्णदेव यांचे स्मरणात त्यांनी महाप्रयाण केले.

श्रीगोविंदमहाराजांचा देह हा ज्ञानमय देह होता, म्हणून सर्वानुमते त्यांच्या देहावर अग्निसंस्कार न करता, त्यांना सदेह समाधी देण्यात आली.

***

**प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीगोविंदमहाराज उपळेकर यांचा निर्याणाचा अभंग**

शालिवाहन शके अठराशे शहाण्णवात । आनंद संवत्सरात दक्षिणायन ।।१।।
भाद्रपद वद्य अष्टमीचा दिस । प्रथम प्रहरास प्रातःकाळी ।।२।।
ज्ञानेश्वर दर्शन घेवोनिया आले । सांगोनी मिळाले आत्मरूपी ।।३।।
साधु उपळेकर ब्रह्मरूप झाले । कीर्तीरूपे उरले दासापाशी ।।४।।

# प.पू.श्रीकृष्णदेवमहाराज पुसेसावळी

निर्याण
भाद्रपद व.१३ शके १८७१
इ.स. १९४९

सातारा जिल्ह्यात खटाव तालुका आहे. या तालुक्यात पुसेसावळी हे गाव आहे. या गावाचे श्री.सावळेश्वर हे ग्रामदैवत आहे. या गावात भजनाचे आखाडे प्रसिद्ध होते. या गावात श्री.विठ्ठलराव परीट या नावाचे सद्गृहस्थ रहात होते. यांच्या पत्नीचे नाव भागिरथी होते. या दांपत्याच्या पोटी एक पुत्ररत्न अवतीर्ण झाले. बाराव्या दिवशी याचे नाव 'श्रीकृष्ण' ठेवणेत आले. हा श्रीकृष्ण म्हणजेच 'श्रीकृष्णदेवमहाराज' होत.

श्रीकृष्णदेवमहाराज हे जन्मतःच विरक्त होते. आपल्या सवंगड्यांसोबत ते खेळ खेळत, पण त्या खेळात ते असून नसल्यासारखे असायचे. पण हे वागणे मात्र इतरांना विचित्र वाटायचे. या वागण्याची त्यांच्या आई-वडिलांना चिंता लागून राहिली. अशातच गावात एक विचित्र घटना घडली. गावातील ढोर व्यवसाय करणाऱ्या एका कुटुंबामध्ये गैरसमजातून बाप-लेकामध्ये वाद निर्माण झाला आणि त्यातून त्यातील एकाने रापीने आपले पोट चिरून घेतले आणि कोथळा बाहेर आला. हे दृश्य श्रीकृष्णदेवांनी पाहिले आणि त्यांचे मनावर विपरीत परिणाम झाला. तेथून ते घरी न येता जंगलाच्या दिशेने निघून गेले. कालांतराने ते परत आले, पण ते जनमानसामध्ये रमेनात. एकांतात राहू लागले. दिवसरात्र अनेक काळ ते उपाशी राहू लागले. हे बघून त्यांच्या आई-वडिलांना अपार वेदना होत असत. मनात येईल तेथे भटकायचे, वाटले तर खायचे, अंगावरील कपडे काढून निवडुंगाच्या फड्यावर पांघरावे आणि आपण उघडेच फिरावे असा त्यांचा दिनक्रम सुरू होता. त्यामुळे त्यांची गावातील मुले थट्टा करू लागली. त्यामुळे गोड बोलून आई-वडिलांनी श्रीकृष्णदेवांना घरी आणले.

श्रीकृष्णदेव हे विदेही होते. काही काळ मौन पाळायचे तर लगेचच रागाला यायचे, तर केव्हा केव्हा दुसऱ्याला शिव्या द्यायचे, तर लगेच एका विशिष्ट भावावस्थेत जायचे. देहाची जाणीव पूर्णपणे सुटलेली होती. गावातील आंब्या-जांभळीच्या झाडाखाली झोपायचे, तर कधी गावातील मारुती देवळात विसावा घ्यायचे. पावसामधे दोन-तीन तास भिजतच रहायचे. रणरणत्या उन्हात अनवाणी पायी चालत जायचे, तर कधी तापलेल्या वाळूत निजून रहायचे. ही सर्व अवस्था बघून गावातील लोकांना त्यांच्यातील देवत्व जाणवले आणि गावातील लोक त्यांना 'श्रीकृष्णदेव' या नावाने संबोधू लागले.

पलूसचे प.पू.श्रीधोंडीबुवामहाराज हे एकदा एकाएकी पुसेसावळीत अवतीर्ण झाले आणि त्यांची व श्रीकृष्णदेवांची भेट झाली. श्रीधोंडीबुवामहाराजांनी त्यांच्यावर कृपा केली. एकदा पुसेसावळी येथील श्री. मारुती सरडे हे पलूसला श्रीधोंडीबुवामहाराजांच्या दर्शनाला गेले. त्यांना बघून श्रीधोंडीबुवा म्हणाले, 'अरे मी

रोज तुझ्यासोबत भोजन करतो, मग तू इथे कशासाठी आलास? तुझ्या नित्यक्रमामध्ये तू बदल करु नकोस.' हे वाक्य ऐकताच श्री. सरडे परत पुसेसावळीला आले आणि त्यांनी श्रीकृष्णदेवांचे पाय धरले. व त्यांची शेवटपर्यंत सेवा केली.

पलूसच्या श्रीधोंडीबुवांचे श्रीकृष्णदेवांवर विलक्षण प्रेम होते. ते म्हणत की, 'तो आणि मी एकच आहोत.' समाधीस्थ होण्याआधी एक दिवस श्रीधोंडीबुवा पलूसमधील मंडळींना म्हणाले की, 'पुसेसावळी येथील कृष्णदेव परीट नामक इसमाला माझ्या गादीवर बसवा. कारण ती माझीच विभूती आहे.' कालांतराने प.पू.श्रीधोंडीबुवांनी देह ठेवला. या दरम्यान गुजरात प्रांतातील काठीयावाड गावातील लल्लू भाट या नावाचा एक ब्राह्मण फिरत फिरत पलूसला आला. त्याने काही काळ पलूसला वास्तव्य केले आणि श्रीधोंडीबुवांच्या उक्तीनुसार श्रीकृष्णदेव हेच गादीचे वारसदार आहेत म्हणून तो पुसेसावळीला आला. श्रीकृष्णदेवांकरता त्याने उत्तम पोशाख आणला होता. श्रीकृष्णदेवांची त्याने यथासांग पूजा करुन, त्यांना पोशाख अर्पण केला. याचा श्रीकृष्णदेवांनी स्वीकार केला. श्रीकृष्णदेवांना बरोबर घेऊन लल्लू भाट हा पलूसला आला आणि त्याने श्रीकृष्णदेवांना श्रीधोंडीबुवांचे गादीवर बसवले. मोठा सोहळा झाला. तो पोशाख श्रीकृष्णदेवांनी काही काळ परिधान केला. पण एक दिवस रात्रीचेवेळी श्रीकृष्णदेव हे पोशाखादी सामान तेथेच ठेवून दुसऱ्याना न कळता मूळ रूपात पुसेसावळीला आले.

श्रीकृष्णदेव हे विदेही असलेने त्यांची स्नानाची पद्धतच वेगळी होती. एकदा का नदीत किंवा ओढ्यात बुडी मारली की ते तासन्‌तास पाण्यातच रहात असत. ते बराचकाळ मौनावस्थेतच असायचे. कधी कधी ते मातीचे ढेकूळ घेऊन, त्या मातीने स्वतःचे दात घासायचे. बराचवेळ भोजन करत बसायचे. एक दिवस पायाच्या पोटरीपाशी पाण्यासारखा एक फोड आला. तो फोड फुटून आतला दोर लोंबत आला तरी श्रीकृष्णदेवांना देहाचे भान नव्हते. पण त्यावर त्यांनी कधीही उपचार करुन घेतले नाहीत. एकदा श्रीकृष्णदेवांचे गुदस्थानातील अंग बाहेर आले. याचा त्यांना बसताना फार त्रास होत होता. पण ते शांत होते. पुढे पुढे त्या अंगावर माशा बसू लागल्या. सूज आली. पण याचा त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही. औषधोपचार करणेकरिता गावातील लोकांनी त्यांना दवाखान्यात नेले. पण त्यांनी उपचार करून घेतले नाहीत. शेवटी त्या जखमेत आळ्या झाल्या. हे बघून एका भक्ताने त्या काढायचा प्रयत्न केला. पण त्या भक्ताला त्यांनी त्या आळ्या काढून दिल्या नाहीत. ते म्हणाले, 'खाऊ दे त्यांना, त्यांचे खाद्य आहे ते.' शेवटी त्यांचे पट्ट शिष्य डॉ. गोविंदकाका उपळेकर यांनी त्यांच्यावर उपचार करून त्यांना बरे केले.

अशा या श्रीकृष्णदेवांनी आपले अवतार कार्य संपवणेचा विचार केला. भाद्रपद महिना होता. एक दिवस त्यांनी आपल्या रामभाऊ नामक शिष्याला सांगितले, 'उद्या आपला महाळ (महालय पक्ष) कर.' त्याप्रमाणे श्रीरामभाऊंनी तयारी केली. हे बघितल्यावर श्रीकृष्णदेव त्याला म्हणाले, 'आम्ही उद्या जाणार!'

त्याप्रमाणे सकाळ झाली. श्रीकृष्णदेवांनी चहा घेतला आणि रामभाऊ व उपस्थित शिष्यगणांना आंघोळीला जाणेस सांगितले. श्रीकृष्णदेव तेथून एका भक्ताच्या घरी आले. तेथे थोडा वेळ थांबले आणि तेथून थेट नदीपात्रापाशी आले. त्यांचे मागोमाग काही भक्तही आले. श्रीकृष्णदेवांनी या उपस्थित असणाऱ्या भक्तांना हात जोडून नमस्कार केला आणि त्यांनी नदीत बुडी मारली. ते बराचवेळ पात्राबाहेर आलेच नाहीत. हे बघून तेथील उपस्थित भक्तमंडळी गावात आली आणि त्यांनी घडलेला प्रसंग गावातील भक्तांना सांगितला. सगळेजण नदीकाठी आले. यातील काही भक्तांनी, श्रीकृष्णदेवांनी जिथे बुडी मारली, तेथे उड्या मारल्या आणि डोहामध्ये असणाऱ्या श्रीकृष्णदेवांना वरती आणले. पण या आधीच श्रीकृष्णदेवांनी आपला देह हा अर्पण केलेला होता. तो दिवस होता भाद्रपद व.१३ शके १८७१ इ.स. १९४९. या दिवशी श्रीकृष्णदेवमहाराजांनी महाप्रयाण केले आणि एका विलक्षण विदेही महात्मा मुक्त झाला.

यानंतर श्रीकृष्णदेव यांचा देह श्रीहैबतबुवांच्या मठानजीक आणून, एका भिंतीला टेकून बसलेल्या अवस्थेत ठेवणेत आला. त्यांच्या मस्तकावर बुक्का आवणयात आला, गळयात तुळशीच्या माळा घालण्यात आल्या. त्यांचे दर्शन घेणेकरिता सारा गाव गोळा झाला. अशा या श्रीकृष्णदेवमहाराजांची सुंदर समाधी पुसेसावळी येथे आहे.

***

## श्रीब्रह्मानंदमहाराज बेलधडीकर

जन्म
माघ शु.१०, शके १७८०
दि.२७.०२.१८५९

निर्याण
भाद्रपद व.१५ शके १८४०
(सर्वपित्री अमावस्या) इ.स.१९१८

कर्नाटक राज्यातील बागलकोट जिल्ह्यात जालिहाळ नावाचे गाव आहे. या गावात श्री. रामभट्ट गाडगोळी या नावाचे ऋग्वेदी विद्वान ब्राह्मण रहात होते. या श्री. रामभट्टांचे पोटी तीन पुत्र जन्मले. थोरले श्री. लक्ष्मणभट्ट, मधले श्री. बाळंभट्ट व धाकटे श्री. शिवंभट्ट.

श्रीब्रह्मानंदमहाराजांचे आजोबा श्रीरामभट्ट हे निष्णात ज्योतिषी होते. त्यांनी शास्त्राधारे ''बाळंभटाच्या (ब्रह्मानंदांचे वडील) पोटी महान भगवद्भक्त जन्माला येईल व आपल्या कुळाचा उद्धार करील असे भविष्य वर्तविले होते.''

श्रीब्रह्मानंदमहाराजांचे वडील श्रीबाळंभट्ट हे नदीवर स्नानास गेले असता, त्यांचेपुढे एक भोपळा वहात आला. त्यांनी तो उचलला. त्या भोपळ्याबरोबर रेशमी वस्त्रात गुंडाळलेले गाठोडे त्यांना मिळाले. ते उघडून पहाता, त्यांना त्यात श्रीअनंताचा पवित्र आणि मंगलप्रद लाल दोरक मिळाला. या दोरकाची त्यांनी अनंतचतुर्दशीला पूजा केली व पुढे ते दरसाल पूजा करू लागले. या श्रीअनंताच्या कृपेनेच श्रीबाळंभट्ट आणि जिऊबाई यांचे पोटी माघ शु. १० शके १७८० दि. २७.०२.१८५९ रोजी पुत्र जन्माला आला, म्हणून त्याचे नाव अनंत असे ठेवणेत आले. हे अनंत बाळंभट्ट गाडगोळी म्हणजेच श्रीब्रह्मानंदमहाराज होत.

अनंताचे शालेय शिक्षणात लक्ष नव्हते. त्यामुळे श्रीबाळंभट्टांनी आपला मुलगा अभ्यास करणार नाही हे जाणून, परंपरागत आलेल्या वैदिक विद्येचाच अभ्यास त्याच्याकडून करून घेणेस सुरवात केली. अनंताची कुशाग्रबुद्धि आणि स्पष्टोच्चार पाहून श्रीबाळंभट्टांनी स्वतः रोज त्याला वेदमंत्राचे पाठ देणेस सुरवात केली.

घरात काही कुरबुर झाल्याने देहत्याग करावा म्हणून, वयाच्या १४ व्या वर्षी अनंत हा घरातून बाहेर पडला आणि तो बदामी येथील श्रीबनशंकरीच्या देवळात पोहोचला. तेथे तो देवीच्या महाद्वाराजवळ झोपला असता, त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात श्रीबनशंकरी (शाकंबरी) देवी आली आणि तिने ''तुझ्या हातून अनेक सत्कार्ये घडायची आहेत, म्हणून मीच तुला, तुझ्या या अघोरी कृत्यापासून निवृत्त केले आहे. प्रातःकाल होताच तू येथून निघून कोठेतरी जा व विद्या संपादन कर. तुझे कल्याण होईल. तुला माझा पूर्ण आशीर्वाद आहे.'' असे सांगितले.

याप्रमाणे अनंत विद्याभ्यासासाठी मूळगुंद या गावी आला. तेथे वेदांतादि शास्त्रातील जाडे विद्वान जंतली श्री. गुरुनाथशास्त्री यांचेकडे आला व तेथे त्याने विद्याभ्यासास सुरवात केली. वेदातील सर्व अभ्यास

पूर्ण झाल्यावर तो 'अनंतशास्त्री' या नावाने संबोधिला जाऊ लागला. श्री. गुरुनाथशास्त्रींनी या अनंतशास्त्रींना, यांचा आचार बघून पुराण सांगण्याची आज्ञा केली. श्रीमद्‌भागवत हा त्यांचा आवडता ग्रंथ असल्याने, ते बहुतांशी भागवत सांगत.

श्रीअनंतशास्त्री यांचे लग्नाचे वय झाले म्हटल्यावर त्यांना स्थळे येऊ लागली. परंतु यांचेकडे कडकडीत वैराग्य होते. यांच्या अंगावर कोड होता. त्यामुळे मला तुम्ही मुलगी देऊ नका, लग्न न करण्याचा माझा संकल्प आहे, असे ते वधुपित्यांना सांगू लागले. इंद्रियसुख हे मृगजळाप्रमाणे विनाशी आहे व आत्मसुख हे अविनाशी आहे, मग त्याला आपण बळी पडणे म्हणजे आत्मघात नव्हे काय? असे त्यांचे मत होते. विषयमोहाला बळी पडल्यास अनीती वाढते व कर्तव्यच्युती पदरी येते. एकदा का या संसारचक्रात सापडलो तर परमात्म्याकडे व पर्यायाने परमार्थाकडे लक्ष देण्यास बिलकुल वेळ मिळणार नाही अशी त्यांच्या मनाची धारणा होती. त्यामुळे त्यांनी शेवटपर्यंत ब्रह्मचर्यव्रत सांभाळले.

यथावकाश ते श्रीवेंकटपूरला श्रीवेंकटेशाच्या मंदिरात सेवेसाठी राहिले. अनन्य निष्ठा निर्माण झाली. श्रीवेंकटेशाने त्यांना 'तू गुरूला अनन्य भावाने शरण जा, तोच मार्ग दाखविणारा असतो. त्याची तू भक्तिभावाने सेवा कर,' असा आदेश दिला.

या आदेशाप्रमाणे श्रीअनंतशास्त्री हे सद्‌गुरू शोधार्थ बाहेर पडले. प्रथम ते बेटगिरीला गगनाचार्य या सत्पुरुषांकडे गेले. सेवा केली. पण मनाचे समाधान होईना. तेथून ते हुबळीला कृष्णानंद या नावाच्या यतिपुरुषांकडे गेले. तेथेही समाधान होईना. शेवटी ते इंदूरला गेले असता, तेथे त्यांची श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर यांची गाठ पडली. श्रीमहाराजांनी श्रीअनंतशास्त्रींना इ.स.    रोजी अनुग्रह दिला. अनुग्रह झाल्या झाल्या श्रीअनंतशास्त्रींना अहंकाराचा वारा लागू नये म्हणून त्यांचेकडून त्यांनी मिळविलेली शाल वगैरे मानाच्या वस्तू दान करण्यास सांगितल्या. श्रीमहाराजांनी या श्रीअनंतशास्त्रींची अनेकप्रकारे परीक्षा बघितली. पण सर्व परीक्षेत श्रीअनंतशास्त्री हे उत्तीर्ण झाले. महाराजांनी सांगितलेले साधन त्यांनी निष्ठेने केले.

यानंतर श्रीअनंतशास्त्री हे श्रीॐकारेश्वरला आले. तेथे ते दररोज नमन, पूजाअर्चा करायचे. असेच एकदा पूजा करत असताना या ॐकारेश्वराच्या देवालयातील महेश्वराच्या लिंगातून श्रीब्रह्मचैतन्यमहाराज प्रगट झाले आणि मुखाने रामनामाचा उच्चार करत श्रीअनंतशास्त्रींच्या मस्तकावर त्यांनी वरदहस्त ठेवला आणि महाराजांनी या श्रीअनंतशास्त्रींना 'ब्रह्मानंद' म्हणून हाक मारली. डोळे उघडून पहातात तो, महेश्वराच्या लिंगात प्रत्यक्ष महाराज प्रगट झालेले होते.

यानंतर काही वेळाने श्रीमहाराजांनी श्रीअनंतशास्त्रींना हृदयाशी घट्ट धरून दृढ आलिंगन दिले. महाराज म्हणाले, ''तुझा दृढनिश्चय व तुझे कठोर तप पाहून मी परम संतुष्ट झालो आहे. तुझ्यावर मी पूर्णानुग्रह केला आहे. आता तू कृतार्थ झाला आहेस. तू ज्या ब्रह्मानंदसुखाचा अनुभव घेतलास, त्याच सुखाचे चिरंतन सेवन करून जगदोद्धाराचे कार्य कर. आजपासून 'ब्रह्मानंद' या नावाने तू प्रसिद्धी पावशील'' असा आशीर्वाद दिला.

यानंतर श्रीब्रह्मानंदांनी बरेच ठिकाणी जप-जाप्य अनुष्ठान केले, तीर्थयात्रा केल्या. विविध ठिकाणी मंदिर उभारणी केली व उपासना सुरू केली.

अशा या श्रीब्रह्मानंदमहाराजांना वयाचे साठावे वर्ष लागले होते. अशक्तपणा भरपूर आला होता. वैद्यांना बोलावण्यात आले. त्यांनी तपासले असता, सर्व नाड्या बंद झाल्या आहेत व त्यांचा निर्याणकाल जवळ आला आहे असे सांगितले.

श्रीब्रह्मानंदमहाराजांच्या मुखात श्रीरामरायाचे चरणतीर्थ घातले व कानात तुळशीपत्र ठेवले. उशाजवळ भगवत्‌गीता ठेवली. श्रीब्रह्मानंदांना खाली निजवण्यासाठी जमीन शेणाने सारवून घेतली व त्यावर रांगोळी घालून कांबळे अंथरण्यात आले. त्यावर श्रीब्रह्मानंदांना निजवण्यात आले. यावेळी सकाळचे १० वाजले होते. १०.३० वाजता श्रीब्रह्मानंदांनी छातीवर ठेवलेले हात काढून खाली ठेवले. पुढे काही सेकंदातच झोपेतून जागे व्हावे त्याप्रमाणे डोळे उघडून आपल्या भक्तांकडे प्रेमदृष्टीने पाहिले आणि मुखाने ‘श्रीराम’ असा उच्चार करून श्रीब्रह्मानंदांनी भाद्रपद वद्य अमावस्या (सर्वपित्री अमावस्या) दि. .१०.१९१८ रोजी वयाच्या ६०व्या वर्षी सकाळी १० वाजून ४० मिनिटांनी देह ठेवला व ते ब्रह्मचैतन्यस्वरूप झाले.

श्रीब्रह्मानंदमहाराजांनी देह ठेवणेचे आधी सांगितल्याप्रमाणे, जलसमाधीची तयारी सुरू झाली. भक्तमंडळी तोंडाने ‘रघुपती राघव राजाराम । पतीत पावन सीताराम ।।’ हे भजन म्हणत होती. सामानाची सर्व तयारी होताच, श्रीब्रह्मानंदांना त्याच मंचावर बसवून स्नान घालण्यात आले. कोरड्या धूत वस्त्राने त्यांचा देह पुसण्यात आला. कपाळाला गंध व कुंकू लावण्यात आले. नवीन कफनी, टोपी व गळ्यात हार घालण्यात आला. आरती करण्यात आली. मंचाच्या चारी कोपऱ्यास प्रत्येकी एक अशी चार मातीची मडकी बांधण्यात आली व अंतयात्रा श्रीकृष्णानदीकडे निघाली. कृष्णाकाठी वाळेश्वराच्या देवळासमोर येताच, श्रीब्रह्मानंदांना खाली उतरवून पूर्वाभिमुख बसवण्यात आले आणि त्यांची पूजा केली. नामघोष करीत त्यांना पात्रातील भोवऱ्यापर्यंत नेण्यात आले. तेथे मंच खाली दाबताच, मडक्यात पाणी शिरू लागले. मडके पाण्याने भरताच, श्रीब्रह्मानंदांचा देह भोवऱ्याच्या तळाशी जाऊन पोहोचला आणि पाण्याचे बुडबुडे वर आले आणि पुन्हा एकदा सर्व भक्तांनी श्रीब्रह्मानंदांचा जयघोष केला.

***

# एकादशी महात्म्य

एकादशी हे आपल्या हिंदुधर्मातील एक महत्वाचे व्रत आहे. एकादशी हा हिंदू पंचांगाप्रमाणे प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या पंधरवड्यातला अकरावा दिवस असतो. प्रत्येक महिन्यात दोन, अशा वर्षभरात एकंदर २४ एकादशा येतात. प्रत्येक एकादशीला स्वतंत्र नांव आहे आणि त्याचे महात्म्यही आहे. तसेच अधिक महिन्यातील एकादशींनाही दोन वेगवेगळी नावे आणि महात्म्यही आहे. एकादशी व्रत हे आरोग्य, अंतःशुद्धी आणि अध्यात्मसाधना या दृष्टीने करावयाचे व्रत आहे. त्या संदर्भाने या एकादशी व्रताच्या संबंधाने पौराणिक कथाही आहेत.

एकादशी व्रत आचरायचे असल्यास दशमी तिथीच्या दिवसापासून काही विधीनिषेध पाळावे लागतात. चणे, मसूर, मध, पालेभाजी, उडीद, परान्न, मैथुन इ. दहा गोष्टींपासून दूर रहावे लागते. दशमी दिवशी सकाळी जमिनीवरील माती उजव्या हातात एक मंत्रोच्चार उच्चारत आपल्या कपाळी लावायची असते आणि मग स्नान करायचे. याबाबतचा श्लोक व इतर खुलासा पद्मपुराणातील एकादशी या भागात दिला आहे. दशमीच्या दिवशी नारायणाची पूजा-अर्चा आणि रात्री जागरण करून भागवत पठण, श्रवण व भक्तीपूर्ण कीर्तनाचे कार्यक्रम करायचे असतात.

एकादशी दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करायचे आणि प्रथम विधिवत् पूजा अनुष्ठानाने या दिवसाचा पुढीलप्रमाणे संकल्प सोडायचा :- ''हे अच्युता, मी एकादशीचा उपवास करून दुसऱ्या दिवशी उपवास सोडेन. तू मला शक्ती दे, मी तुला शरण आलो आहे.'' संकल्प केल्यावर एकादशी दिवशी अकरा कुकर्मांपासून दूर रहायला लागते. चोरी, हिंसा, क्रोध, पत्नीसेवा, जुगार, दंतमार्जन, खोटे भाषण, दुसऱ्याची कुचेष्टा, निंदा, निद्रा, तांबूल सेवन इ. अकरा कुकर्मे वर्ज्य करायला सांगितली आहेत.

एकादशीचा उपवास म्हणजे फराळाचे खाणे नव्हे. एकादशी उपवास हा निराहारी सांगितला आहे. दिवसभर न खाता राहिल्यास, आपल्या पोटाला विश्रांती मिळते आणि पचनक्रिया सुधारते. पण आपण या उलट म्हणजे दुप्पट खाऊन एकादशी उपवास करतो. उपवास याचा अर्थ :- उप म्हणजे सन्निध आणि वास म्हणजे वसती करुन रहाणे असा आहे. म्हणजेच भगवंताच्या सन्निध राहून, भगवत् नामस्मरण करणे म्हणजे तो उपवास आहे. याचा खुलासा श्रीतुकाराममहाराजांनी '**व्रत एकादशी करीन उपवासी । गाईन अहर्निशी नाम तुझे ।।**' या एका चरणात केला आहे. उपाशी आणि उपवासी यात फरक आहे.

एकादशीमध्येसुद्धा दोन भेद आहेत. १) स्मार्त एकादशी २) भागवत एकादशी. स्मार्त संप्रदाय हा वैदिक हिंदूधर्मातील एक सर्वधर्मसमन्वयी पंथ आहे. विष्णुंना मानणारे ते वैष्णव, शिवाला मानणारे ते शैव व देवीला शक्ती मानून तिची उपासना करणारे ते शाक्त. पण या पंथांपेक्षा स्मार्त पंथ हा वेगळा आहे. स्मार्त म्हणजे स्मृती (मनुस्मृती नव्हे) आणि शास्त्र मानणारे हिंदू. थोडक्यात सांगायचे झाल्यास श्रुती (वेदांवर) आधारित ज्या स्मृती आहेत, त्यांना मानणारे ते स्मार्त. म्हणून स्मृतींना मानणारे, 'स्मार्त एकादशी' पाळतात. स्मार्त एकादशी म्हणजे

काय? तर दशमी तिथी संपून एकादशी तिथी सुरू होताना, त्या तिथीने सूर्यादय पाहिला नाही पण तो दिवस नव्या तिथीच्या नांवे सुरू झाला असेल तर, त्याला '**स्मार्त किंवा दर्श एकादशी**' म्हणतात. तर भागवत एकादशी म्हणजे, एकादशी आदल्या दिवशी सुरू झालेली असली तरी, तिने जर दुसऱ्या दिवशीचा सूर्योदय पाहिला असेल तर ती '**भागवत एकादशी**' होय. थोडक्यात काय तर स्मार्तवाले जिथून तिथी सुरू झाली, ती मानतात व भागवतवाले ज्या एकादशी तिथीने सूर्योदय पाहिला, ती मानतात. म्हणून विष्णुभक्तांनी स्मार्त एकादशीला विष्णुपूजा करावी, मात्र व्रताचे पालन भागवत एकादशीस करावे असे शास्त्राने सांगितले आहे.

एकादशी दिवशी अन्न व पाणी ग्रहण करायचे असत नाही. पण जे लोक एकादशी दिवशी अन्न ग्रहण करतात व पाणी पितात, त्यांचे ते भोजन कुत्र्याची विष्ठा खाल्ल्यासारखे आहे, असे श्रीतुकाराममहाराजांनी एका अभंगाद्वारे सांगितले आहे. ते म्हणतात की, 'जे लोक नियमाने एकादशी व्रत करतात व त्या दिवशी हरिकीर्तन करतात आणि ऐकतात, ते विष्णुसमान आहेत.' श्रीतुकाराममहाराज म्हणतात, एकादशी बरोबर सोमवार पण केला पाहिजे. हरिहरांचे ऐक्य या ठिकाणी अधोरेखित होते. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, जो एकादशी व्रत करत नाही, तो मनुष्य त्रैलोक्यात प्रेतासमान आहे. काळ त्याचे वय (आयुष्य) नित्य मोजत असतो व रागाने त्याच्यावर करकरा दात खात असतो. ते पुढे म्हणतात, पंधरा दिवसातून एकदा एकादशी येते, असे असूनही तू ती का करत नाहीस? अरे, सर्व व्रतात एकादशी व्रत श्रेष्ठ आहे. एक दिवस न खाता-पिता राहिलास, तर काय मरतोस काय? असा प्रश्न करतात. असे सगळे एकादशीचे महत्व संतांनी वर्णन केलेले आहे. द्वादशीला पारणे करून एकादशी व्रताची सांगता करायची असते.

आमच्या प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांनी या एकादशीचे महात्म्य वेगळ्या पद्धतीने सांगितलेले आहे. ते म्हणतात :-

'**एकादशी व्रतसार । करिता धन्य होय नर ।।१।। खरी साधी एकादशी । जेणे भेटे श्रीहरिसी ।।२।। दहा इंद्रिये आणि मन । नामामाजी करी लीन ।।३।। तेथे घडे उपवास । एकादशीचा दिवस ।।४।। उपवास घडता पाही। देव साक्षात्कार होई ।।५।। देव अंतरी निजेला । दास म्हणे पाही त्याला ।।६।।**'

श्रीमामामहाराज म्हणतात, जो एकादशी व्रत विधीवत् करतो, त्याला धन्यता प्राप्त होते. खरी एकादशी साधली तर श्रीहरीची भेट होते. दशेंद्रिये आणि मन हे नामात लीन झाले की उपवास घडतो. तो उपवास करणे महत्वाचे आहे. मनात कोणताही विचार न आणता, नामस्मरणात मन ठेवणे हा खरा उपवास आहे. असे एक दिवस तरी घडावे म्हणून एकादशी आहे. असा एकादशीचा उपवास घडला तर, परमात्म्याचा साक्षात्कार निश्चित होईल. परमात्मा निजत्वात कोणस्थानी आहे, तो निजेला म्हणजे निजत्वात अनुभवास येतो.

एकदशा प्राप्त होणे म्हणजे ती एकादशी आहे. आता कोणती एकदशा ? तर जीवदशा नाहिशी होऊन, ब्रह्मदशा प्राप्त होणे, ही एकादशी आहे. या करता नामान्न ग्रहण करणे आवश्यक आहे.

# एकादशी उत्पत्ति कथा

कुश नावाच्या राक्षसास भगवंताने मारल्यामुळे त्याचा बंधू मुरू हा क्रोधायमान झाला. त्याने सुडाच्या उद्देशाने अनेक वर्षे तपश्चर्या करून भगवान शंकरास प्रसन्न करुन घेतले व जगातील कोणत्याच पुरुषाकडून माझा मृत्यू होऊ नये असा वर मागून घेतला. शंकर 'तथास्तु' म्हणाले. पुढे तो त्या वराने उन्मत्त होऊन विष्णुभक्त, साधु, ब्राह्मण यांना अतोनात पीडा देऊ लागला. हा सर्व प्रकार साधु-ब्राह्मणांनी भगवान विष्णुस सांगितला. तेव्हा भगवंतांनी त्या मुरूशी अनेक वर्षे युद्ध केले. तरी तो मरेना. तेव्हा आता काय करावे? असा विचार श्रीविष्णु करीत बसले असताना, त्यांच्या श्वासातून एक कन्या निर्माण झाली. तिच्या अंगावर श्वेत वस्त्र होते. तिच्या एका हातात ढाल, एका हातात तलवार आणि दोन हातात धनुष्यबाण होते. तिने भगवंतांना विचारले, 'मी आपली काय सेवा करू?' तेव्हा भगवंत म्हणाले, 'मुरू या दैत्याचा वध कर.' त्याप्रमाणे तिने मुरू दैत्याचा वध केला. ही कन्या प्रगट झाली त्या दिवशी एकादशी तिथी होती. म्हणून तिचे नाव एकादशी पडले. भगवंतांनी तिला वर मागण्यास सांगितले. तेव्हा एकादशी म्हणाली, 'हे भगवंता, तुमचीही भक्ती वाढावी व माझी कीर्ती व्हावी असा वर द्या.' तेव्हा भगवंत म्हणाले, 'जो एकादशी व्रत करेल, तो माझा आवडता भक्त होऊन शेवटी त्याला वैकुंठ प्राप्ती होईल.' एकादशी व्रत हे सर्व व्रतात श्रेष्ठ व्रत आहे. या व्रतानेच रुक्मांगदाने अयोध्या नगरी वैकुंठास नेली. '**व्रत एकादशी रुक्मांगद करी । वैकुंठा नगरी नेली त्याने।।**' (श्रीएकनाथमहाराज).

# एकादशीचे महत्त्व व अर्थ सांगणारे प.पू.श्रीमामामहाराज यांचे अभंग

एकादशी व्रतसार । करिता धन्य होय नर ।।१।।
खरी साधी एकादशी। जेणे भेटी श्रीहरीसी ।।२।।
दहा इंद्रिये आणि मन । नामामाजी करी लीन ।।३।।
तेथे घडे उपवास । एकादशीचा दिवस ।।४।।
उपवास घडता पाही । देव साक्षात्कार होई ।।५।।
देव अंतरी निजेला । दास म्हणे पाही त्याला ।।६।।

समजता नेम व्रत एकादशी । तया ऋषिकेशी जवळीच।।१।।
नाम वर्म थोर ओळखावे सार । भजन साचार अंतरीचे ।।२।।
गुरूकृपे सर्व कळोनिया येई । चरणी शरण जाई दास म्हणे ।।३।।

हरिनामी हरिदिनी । थोर साधीली संतांनी ।।१।।
करिता एकादशी व्रत । देव भेटेल अनंत ।।२।।
हरिदिनी उपवासी । वर्म पुसावे संतासी।।३।।
बाह्याचारही साधेना । दास म्हणे नाम घे ना ।।४।।

हरिनाम वाणी हेचि हरिदिनी । साधिली सज्जनी साधुसंती।।१।।
सद्‌विचार अन्न घेती तये दिनी । आचार साधनी साधिताती।।२।।
एकविध मन श्रीहरि चरणी । घडे हरिदिनी दासालागी ।।३।।

## चैत्र शुद्ध ११ कामदा एकादशी

चैत्र महिन्यातील शुद्ध पक्षातील एकादशी तिथीला **कामदा एकादशी** म्हटले जाते.

जी एकादशी देवी तिच्या ऐकण्यात आलेल्या निष्ठावान भक्ताच्या हृदयात सत्कामना निर्माण करते आणि त्याला नेहमी मुक्तीलाभाच्या मार्गावर नेते ती श्रीकामदा एकादशी होय.

राजा पुंडरिक याचे राज्य होते. हे राज्य खूप वैभवशाली होते. हा राजा विष्णुभक्त अणि धार्मिक स्वभावाचा होता. अप्सरा, गंधर्व आणि किन्नर या राज्यात रहायचे. या गावात ललिता नावाची एक सुंदर अप्सरा देखील होती. तिचा पती ललितही तेथेच रहात होता. ललित हा नाग दरबारात गाणी गात असे आणि नृत्य करून सर्वांचे मनोरंजन करीत असे. ललित आणि ललिता यांचे एकमेकांवर खूप प्रेम होते.

राजा पुंडरिक याने एकदा ललितला, त्याचे दरबारात गाणे आणि नृत्य करणेचे आदेश दिले. नृत्य आणि गायन करताना ललित हा आपली अप्सरा पत्नी ललिताला आठवू लागला. त्यामुळे त्याच्या नृत्य आणि गाण्यात चुका झाल्या. हे नृत्य बघायला कर्कोटक नावाचा एक सर्प देवता उपस्थित होता. त्याने या झालेल्या चुकीबद्दल पुंडरिक राजाला माहिती दिली. या गोष्टीमुळे पुंडरिक नाराज झाला आणि त्याने ललितला राक्षस होण्याचा शाप दिला.

यानंतर ललित अत्यंत विचित्र दिसणारा राक्षस बनला. यामुळे त्याची पत्नी ललिता खूप दुःखी झाली. तो पत्नीसह डोंगरदऱ्यातून फिरत असताना ते विंध्य पर्वतावर आले. तेथे ऋष्यमूलक ऋषी रहात होते. त्यांचे दोघांनी दर्शन घेतले आणि शापित पतीच्या उद्धाराचा मार्ग ललिताने त्या ऋषींना विचारला. या दोघांची दया येऊन त्या ऋषींनी 'कामदा एकादशी' चे व्रत करायला सांगितले. तेथून हे दोघे परत आपल्या राज्यात आले आणि त्यांनी मनोभावे कामदा एकादशीचे व्रत केले. या व्रतामुळे त्याला पूर्वरूप पुन्हा मिळाले.

म्हणून वसिष्ठमुनी सांगतात की या कामदा एकादशीचे जे साधक निष्ठापूर्वक आणि शास्त्रशुद्धपणे पालन करतील ते सर्व पापातून मुक्त होऊन दिव्यधामी गमन करतील.

***

# चैत्र वद्य ११ वरूथिनी एकादशी

चैत्र महिन्यातील वद्य पक्षातील एकादशी तिथीला **वरुथिनी एकादशी** म्हणतात. भारताच्या उत्तराखंडात याच एकादशीला श्रीवृद्धा एकादशी असे संबोधतात.

या एकादशी दिवशी भगवान श्रीविष्णुंच्या वराह अवताराचे पूजन केले जाते. वरुथिनी एकादशी व्रत करणाऱ्यांना भगवान विष्णुंचे कवच मिळते, असे म्हटले जाते. वरुथिनी याचा अर्थ कवच किंवा प्रतिरक्षक असा होतो.

या एकादशीचा विशेष अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला जातो :- जी एकादशीदेवी आपल्या एकनिष्ठ भक्तांचे षड्रिपूंच्या प्रभावापासून रक्षण करते व सतत त्याच्यापाशी राहून सुरक्षा कवचाचे काम करते आणि त्या भक्ताच्या जीवनरूपी रथाला चांगल्या मार्गावरून नेऊन मुक्ती प्रदान करते, ती **श्रीवरूथिनी एकादशी देवी** होय.

यमराज आणि यमलोकाच्या भयापासून मुक्त होण्यासाठी वरुथिनी एकादशीचे व्रत अत्यंत आवश्यक आहे असे भगवान श्रीकृष्णाने युधिष्ठिराला सांगितले होते. ही एकादशी सर्व पाप नष्ट करणारी आणि शेवटी मोक्ष प्रदान करणारी आहे. वरुथिनी एकादशीच्या प्रभावानेच मांधाता राजा स्वर्गाला गेला होता. कुरूक्षेत्रात सूर्यग्रहणावेळी एक मण सुवर्ण दान केल्याचे जे पुण्य मिळते/फळ मिळते, ते फळ वरुथिनी एकादशी केल्याने प्राप्त होते.

प्राचीन काळी रेवा अर्थात् नर्मदा नदीच्या काठावर मांधाता नावाचा परोपकारी व तपस्वी राजा राज्य करत होता. हा राजा जेव्हा जंगलात तपस्या करत होता, तेव्हा तिथे एक जंगली अस्वल आले. त्याने राजाच्या पायाचा चावा घेतला आणि त्याने त्या राजाला जंगलात खेचून आणले. यावेळी राजा मांधाताने श्रीविष्णुंची प्रार्थना केली. प्रार्थना ऐकून भगवान विष्णु तेथे प्रगट झाले आणि त्यांनी त्या अस्वलाचा वध केला. पण तोपर्यंत इकडे त्या अस्वलाने या राजाचा एक पाय खाल्लेला होता. भगवान विष्णुंनी या राजाला मथूरेस जाणेस आणि वराह अवताराची पूजा करुन, वरुथिनी एकादशीचे व्रत करणेस सांगितले. त्या व्रताच्या प्रभावाने तुझा पाय बरा होईल असे सांगितले. या पायाची ही अवस्था पूर्वजन्मी घडलेल्या गुन्ह्याने झाली असल्याचे सांगितले. याप्रमाणे राजा मांधाता मथुरेला आला आणि त्याने भक्तीभावाने वरूथिनी एकादशीचे व्रत केले. त्यामुळे गमावलेला पाय त्याला प्राप्त झाला. ही कथा अर्जुनाने भगवान गोपाळकृष्णांना विनंती केल्यानुसार, स्वतः गोपाळकृष्णांनी सांगितली आहे.

***

# वैशाख शुद्ध ११ मोहिनी एकादशी

जी एकादशी देवी आपल्या शरणागत भक्ताच्या मनातील अज्ञानरूपी अंधःकारापासून म्हणजे जगातील मायामोहाच्या प्रभावापासून त्याचे रक्षण करते आणि त्याला मोक्ष प्रदान करते ती मोहिनी एकादशी देवी होय.

समुद्रमंथनातून प्राप्त झालेल्या अमृताला दानवांपासून वाचवण्यासाठी भगवान विष्णूंनी मोहिनीचे रूप धारण केले आणि दानवांपासून अमृतकलश घेऊन ते देवतांना दिले. ज्या दिवशी ही घटना घडली त्या दिवशी वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी होती. तेव्हापासून या एकादशीला मोहिनी एकादशी म्हणून ओळखले जाते.

प्राचीन काळी सरस्वती नदीकाठच्या भद्रावती नगरात चंद्रवंशीय राजा द्युतिमान रहात होता. या राज्यात धृष्टबुद्धि नावाचा अधार्मिक गृहस्थ रहात होता. त्याचे वडील धर्मपाल हे निःसिम विष्णुभक्त होते. हा अधार्मिक असलेने राज्यातील सगळ्यांनी मिळून त्याला राज्यातून हद्दपार केले. हद्दपार केल्यानंतर तो जंगलात आहार निद्रेशिवाय भरकटत फिरू लागला. शेवटी त्याला वाटेत कौंडिण्य मुनींचा आश्रम लागला. त्या आश्रमात तो गेला. तेव्हा कौंडिण्यमुनी नुकतेच स्नान करून आले होते. यामुनींना याने आपली पापी जीवनाची गोष्ट सांगितली. हे ऐकून कौंडिण्यांनी त्याला अभय देऊन मोहिनी एकादशीचे व्रत करायला सांगितले. हा उपदेश ऐकल्यावर धृष्टबुद्धिने अत्यंत भक्तीने आणि निष्ठेन व्रतपालन केले. यामुळे तो दिव्यदेह धारण करून तो पापकर्मातून मुक्त झाला व तो शेवटी गरूडावर बसून विष्णुलोकी गेला.

***

## वैशाख वद्य ११ अपरा एकादशी

वैशाख महिन्याच्या कृष्णपक्षातील एकादशी तिथीला अपरा एकादशी म्हणतात. अपरा या शब्दाचा अर्थ अविद्या असा आहे. जी एकादशीदेवी आपल्या भक्ताच्या मनातील अविद्या आणि प्रतिकूल अवस्थेपासून त्याचे रक्षण करून त्याला परम आनंदधामी पोहोचवते, तिला 'अपरा'एकादशी देवी म्हणतात.

वेगवेगळ्या मतानुसार याच एकादशीला पंजाब प्रांतात 'भद्रकाली एकादशी' म्हणतात. आणि ओरीसा प्रांतात या एकादशीला जलक्रीडा, अचला, पांडव, वैष्णव, गांधारी, प्रभूती एकादशी म्हणतात.

प्राचीन काळात महीध्वज नावाचा एक धर्मात्मा राजा होता. त्याचा लहान भाऊ वज्रध्वज अत्यंत क्रूर, अनितीमान व अन्यायी होता. त्याला आपल्या भावाचा द्वेष होता. एके दिवशी त्या पापी भावाने आपल्या मोठ्या भावाची हत्या करून त्याचा देह एका जंगलात पिंपळाच्या झाडाखाली दफन केला. दफन केल्यामुळे हा राजा प्रेतात्मा रूपात त्या पिंपळावर राहू लागला. अनेक अनेक उत्पात करू लागला. एक दिवस अचानक धौम्य नावाचे ऋषी तिकडून जात होते. त्यांनी हा प्रेतात्मा बघितला. त्यांनी आपल्या शक्तीद्वारा या प्रेतात्म्याची हिंसा का झाली हे कारण समजून घेतले.

ऋषींनी प्रसन्न होऊन त्या प्रेताला पिंपळाच्या झाडावरून खाली आणले व परलोक विद्येचा उपदेश केला. या दयाळू धौम्य ऋषींनी राजाला प्रेतयोनीतून मुक्त करण्यासाठी स्वतः अपरा (अचला) एकादशीचे व्रत केले आणि त्याला अगतीपासून सोडवण्यासाठी त्या व्रताचे पुण्य त्या प्रेतासाठी खर्ची घातले. या पुण्यप्रभावामुळे राजाला प्रेतयोनीतून मुक्ती मिळाली.

या अपरा एकादशीबाबत भगवान श्रीकृष्ण पांडवांना सांगतात, 'ह्या अपरा एकादशीच्या व्रताच्या पालनाने वाईट कर्म करणारा माणूसही मुक्त होतो.' जे लोक सर्व धर्मच्यूत, गुरुजनांची निंदा करणारे, प्रतिज्ञेचा भंग करणारे आहेत, त्यांचेही परम कल्याण होते. तीर्थक्षेत्री वा अमृतयोगावर जी दान-दक्षिणा दिली जाते त्याहूनही हे व्रत महान आहे. भक्ति आणि निष्ठेने या अपरा एकादशीचे व्रत केल्यास कोणताही मानव देवलोकी जाऊ शकतो.

***

# ज्येष्ठ शुद्ध ११  निर्जला एकादशी

ज्येष्ठ महिन्यातील शुद्ध पक्षाच्या एकादशी तिथीला '**निर्जला एकादशी**' असे म्हणतात.

वर्षातील सर्व २४ एकादशींपैकी ही एकादशी अत्यंत महत्वाची आहे. ही एकादशी अन्न व पाणी न ग्रहण करता करावी लागते, म्हणून महत्वाची आहे. या एकादशीचा विशेष अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला जातो ः- 'जी एकादशीदेवी आपली कृपा असलेल्या सज्जन व्यक्तीला, निर्जला म्हणजे विशुद्ध ऐश्वर्ययुक्त सत्ता प्रदान करून, त्याला परमार्थाच्या मार्गावर नेते आणि मुक्ती देते ती **निर्जला एकादशी** देवी होय.'

निर्जला एकादशीच्या संदर्भात विष्णुपुराणात सांगितले आहे की, वर्षभर जर तुम्ही एकादशीचे व्रत करु शकत नसाल, तर या निर्जला एकादशीचे व्रत केलेने सर्व एकादशींच्या उपवासाचे समान फळ मिळते. जो श्रद्धेने आणि पवित्र अंतःकरणाने ही एकादशी करतो, तो सर्व पापातून मुक्त होतो. या एकादशीला दान-धर्म करावा असे सांगितले आहे. या एकादशीला पिवळी फुले, पिवळी फळे आणि पिवळे वस्त्र भगवान विष्णुंना अर्पण केले जाते.

सत्यवतीनंदन महर्षी व्यास एकदा भीमाला (भीमसेन - पाच पांडवांपैकी एक) म्हणाले, 'अरे भीमा, तू निर्जला एकादशीचे व्रत कर. त्यामुळे तुला सगळ्या एकादशींचे फळ मिळेल.' कुंती, द्रौपदीसह राज परिवारातल्या सगळ्यांनी हे निर्जला एकादशी व्रत केले. पण भीमाने हे व्रत करणेस असमर्थता दाखविली, कारण भीमाकडे अधिक क्षुधा व तृष्णा होती. त्याच्या पोटात वृक् नावाचा अग्नि सदैव प्रज्वलित असल्यामुळे तो अधिक आहार केल्याशिवाय राहू शकत नव्हता. पण व्यासमुनींनी भीमाला अभय दिले आणि या एकादशीचे महत्व त्याला पटवून दिले. तेव्हा भीमाने हे निर्जला एकादशीचे व्रत केले. म्हणून या एकादशीला **भीमा एकादशी** असेही संबोधतात.

भगवान श्रीकृष्ण एक दिवस पांडवाना म्हणाले, 'निर्जला एकादशी व्रताचे पालन केल्यास, जगाचे पालन करणारे भगवान विष्णु अतिशय संतुष्ट होतात आणि आपल्या अंतसमयी विष्णुदूत येऊन या व्रत करणाऱ्याला वैकुंठात घेऊन जातात.'

***

# ज्येष्ठ वद्य ११ योगिनी एकादशी

ज्येष्ठ महिन्यातील वद्य पक्षाच्या एकादशी तिथीला 'योगिनी एकादशी' असे म्हणतात.

जी एकादशीदेवी भक्तिमान साधकाला मनःसंयमाची अर्थात् चित्तवृत्तिनिरोधाची शक्ती देऊन त्याला कैवल्यधामी पोहोचवते ती आहे 'योगिनी एकादशी'.

✼ योगिनी एकादशी सर्व पाप दूर करते आणि व्रत करणाऱ्या व्यक्तिला कौटुंबिक आनंद देते.

✼ या व्रतामुळे सर्वप्रकारचा उपद्रव नाहिसा होतो आणि आयुष्यात आनंद मिळतो.

✼ योगिनी एकादशी व्रत केल्यास समृद्धी प्राप्त होते.

✼ योगिनी एकादशी व्रत केल्याने ८८००० ब्राह्मणांना अन्नदान केल्याचे पुण्य मिळते.

✼ ही एकादशी सर्व रोग आणि आजारांचा नाश करते आणि सुंदर स्वरूप, गुण आणि प्रसिद्धी मिळते.

अलकापुरीचा राजा यक्षराज कुबेर याच्याकडे हेम नावाचा एक माळी काम करायचा. त्या माळ्याचे काम म्हणजे दररोज भगवान शिवाची पूजा करणे, मानससरोवरातून पाणी आणणे, फुले आणणे. एके दिवशी तो आपल्या पत्नीबरोबर फिरायला गेलेला असल्यामुळे त्याला फुले आणायला उशीर झाला. त्यामुळे तो उशीरा कुबेरांच्या सभेत पोहोचला. यामुळे रागावलेल्या कुबेराने त्याला कुष्ठरोगी होण्याचा शाप दिला.

शापाच्या परिणामामुळे हेम माळी इकडे-तिकडे भटकत राहिला. परंतु हेम माळीचा भगवान शिवांवर अत्यंत विश्वास होता. इकडे तिकडे भटकत असताना तो मार्कंडेय मुनींच्या आश्रमात पोहोचला. योगसामर्थ्याने मार्गंडेयांनी त्याच्या दुःखाचे कारण जाणून घेतले व त्याला सांगितले की जर तू 'योगिनी एकादशी'चे व्रत केलेस तर तुला शापातून मुक्तता मिळेल. हेम माळ्याने योगिनी एकादशीचे व्रत विधवत पूर्ण केले आणि या व्रताच्या परिणामी हेम माळीचा कुष्ठरोग संपला.

असे हे एकादशी व्रत साधकाला सर्व पापातून मुक्त करून त्याला निजधामी घेऊन जाते.

✼✼✼

# आषाढ शुद्ध ११  देवशयनी एकादशी

आषाढ महिन्यातील शुद्ध पक्षातील एकादशी तिथीला '**देवशयनी एकादशी**' असे म्हणतात. या एकादशीलाच आषाढी एकादशी, हरिशयनी एकादशी, महा एकादशी, प्रथम एकादशी, देवयनी एकादशी किंवा श्रीविष्णुशयनी एकादशी अशी अनेक नावे आहेत. या एकादशीचा एक अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला जातो तो असा :- 'जी एकादशीदेवी आपल्या एकनिष्ठ भक्ताच्या मनातील तमोविकार (मिथ्या-स्वप्न-आळस-निद्रा) दूर करते आणि त्या भक्ताला मुक्ती प्रदान करते ती **देवशयनी एकादशी** होय.'

या आषाढी एकादशी तिथीपासून कार्तिक महिन्याच्या शुद्धपक्षाच्या एकादशीपर्यंत, भगवान विष्णु (श्रीहरि) चार महिने क्षीरसमुद्रात शेषनागावर योगनिद्रेसाठी जातात, म्हणून या एकादशीला देव(हरि)शयनी एकादशी म्हणतात. या चार महिन्यांच्या कालावधीला चातुर्मास म्हणतात. या काळात कोणतेही शुभकार्य केले जात नाही. कां केले जात नाही? याचे उत्तर असे आहे की, देवशयनी एकादशीनंतर चार महिने सूर्य, चंद्र आणि निसर्गाचे तेज कमी होते. देवशयन झालेले असते असे मानले जाते. जेव्हा शुभशक्ती कमकुवत होतात/असतात, तेव्हा या अंतरात केलेल्या कामांचे फळही शुभ नसते. त्यामुळे चातुर्मासात शुभकाम केले जात नाही.

देवशयनी एकादशीचे वैज्ञानिक महत्वही आहे. या एकादशीपासून मान्सून सक्रिय होतो. या महिन्यामध्ये आर्द्रता वाढल्यामुळे अनेक प्रकारचे सूक्ष्म जीव निर्माण होतात आणि ते जीव मानवी शरीराला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या हानी पोहोचवू शकतात. त्यामुळे या काळात काही नियम सूचित केलेले आहेत. या काळात आहार विहाराचे बंधन सांगितले आहे.

सूर्यवंशात मांधाता नावाचा राजा राज्य करत होता. तो सत्यवादी आणि पराक्रमी होता. त्याची प्रजा समृद्ध आणि सुखी होती. एकदा त्याच्या राज्यात तीन वर्षे पाऊस पडला नाही, दुष्काळ पडला, अन्न मिळेना अशी अवस्था झाली. राज्यातील यज्ञ-याग थांबले. राजाला वाटले की बहुदा तो राज्यातील देव आणि ब्राह्मण पंडितांची यथायोग्य सेवा-पूजा करु शकला नाही. त्यामुळे राज्यातल्या दुष्काळाबद्दल आणि एकूण दुर्दशेबद्दल तोच जबाबदार आहे. असे वाटून,  त्याने राज्याचा त्याग केला. अनेक प्रतिकूल परिस्थितीतून जात जात तो जवळ जवळ अर्धमृत अवस्थेत, ब्रह्मदेवाचे पुत्र महर्षी अंगिरस यांच्या आश्रमात आला. आल्यावर त्याने ऋषींना राज्याची सर्व परिस्थिती सांगितली. यावेळी अंगिरस ऋषींनी त्याला या शयनी एकादशीचे व्रत पालन करणेस सांगितले. या व्रताच्या प्रभावाने तुझ्या राज्यात पाऊस पडेल आणि प्रजा सुखी होईल असेही सांगितले. याप्रमाणे हा मांधाता राजा आपल्या नगरात आला आणि त्याने या एकादशीचे शास्त्रोक्त पद्धतीने व्रत आचरले. परिणामी राज्याचे चांगले दिवस परत आले. पाऊस पडला, सुखसमृद्धी परत आली आणि विशेष म्हणजे या राजाने अंतकाळी विष्णुलोकी गमन केले.  आषाढी वारीसाठी निरनिराळ्या ठिकाणांहून अनेक संतांच्या दिंड्या संपूर्ण महाराष्ट्रातून पंढरपूरला येण्यासाठी निघतात व आषाढी एकादशी दिवशी पंढरपूरला दाखल होतात. त्यासोबत लाखो वारकरी पायी चालत येतात. टाळ, मृदंगाच्या घोषात पांडुरंगाचा गजर अखंड चालू असतो. पंढरपूरचा सर्व परिसर हरिनामाने दुमदुमून जातो. त्यामुळे प्रचंड उत्साह व अवर्णनीय आनंद सगळीकडे ओसंडून वहात असतो.

# आषाढ वद्य ११ कामिका एकादशी

आषाढ महिन्यातील वद्य पक्षातील एकादशी तिथीला '**कामिका एकादशी**' असे म्हणतात.

या एकादशीला तुळशीदळाला फार महत्व आहे. जे लोक या एकादशीला भगवान विष्णुंना तुळशीदळ अर्पण करतात, ते या जगातील सर्व पापातून मुक्त होतात असे याचे महत्व आहे. जे या एकादशीच्या रात्री देवाच्या मंदिरात दिवा लावतात, त्यांचे पूर्वज स्वर्गात अमृत प्राशन करतात आणि जे लोक तूप आणि तेलाचा दिवा लावतात, ते शंभरकोटी दिव्यांनी प्रकाशित झाल्यानंतर सूर्यजगतात जातात, असे महत्व आहे.

या एकादशीचा विशेष अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला जातो :- जी एकादशीदेवी आपल्याला शरण आणि आश्रयाला आलेल्या भक्तांच्या मनातील विषयवासना दूर करते व त्यांना दिव्य चैतन्य प्रदान करते, ती **'कामिका एकादशीदेवी'** होय.

भगवान नारदांनी ब्रह्मदेवाना या एकादशीचे महात्म्य विचारले. तेव्हा ब्रह्मदेव म्हणाले, 'नारदा, ब्रह्महत्या आणि भ्रूणहत्या केल्याने जे पाप निर्माण होते, ते पाप नाश करण्याकरता ही कामिका एकादशी करणे आवश्यक आहे. या एकादशीने या पापाचा नाश होतो. तसेच या कामिका एकादशीच्या व्रताची कथा जो श्रवण करतो, तोही सर्व पापातून मुक्त होऊन विष्णुलोकाला जातो.

एका गावामधे एक शूर आणि वीर असा क्षत्रिय रहात होता. काही कारणाने या क्षत्रियाचे एका ब्राह्मणावरोबर भांडण झाले आणि झटापट होऊन तो ब्राह्मण मृत्यमुखी पडला. आपल्या हातून ब्राह्मणाची हत्या झालेली पाहून, त्याने या ब्राह्मणाचा अंत्यविधी करण्याची इच्छा इतर ब्राह्मण मंडळीं समोर प्रगट केली. परंतु इतर ब्राह्मणांनी त्याला परवानगी दिली नाही. ते म्हणाले, 'तुझे हातून ब्रह्महत्या झालेली आहे. तू दोषी आहेस.' यावर तो क्षत्रिय म्हणाला, 'या दोषातून मुक्त होण्यासाठी काय केले पाहिजे?' तेव्हा इतर ब्राह्मण म्हणाले, 'या पापाचे प्रायश्चित्त घे.' मग पापातून मुक्त झाल्यावर आम्ही तुझ्या घरी भोजनाला येऊ. हे ऐकल्यावर त्या क्षत्रियाने या पापातून मुक्त होण्याचा मार्ग विचारला. तेव्हा ब्राह्मणांनी सांगितले, आषाढ मासातील वद्य पक्षातील एकादशीला भक्तीभावाने श्रीविष्णुंचे पूजन आणि व्रत कर. ब्राह्मणांना अन्नदान आणि दक्षिणा देऊन आशीर्वाद प्राप्त करुन घे, म्हणजे तुला पापातून मुक्ती मिळेल. याप्रमाणे या त्या क्षत्रियाने कामिका एकादशीचे व्रत केले. रात्री भगवान विष्णुंनी त्याला दर्शन देऊन, ब्रह्महत्येतून तुला मुक्ती मिळालेली आहे असे सांगितले.

***

## श्रावण शुद्ध ११ - पुत्रदा एकादशी

श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला **पुत्रदा एकादशी** म्हणतात. पुत् धातूपासून पुत्र हा शब्द बनला आणि पुत्र या शब्दापासून पुत्रदा सारखे बरेच शब्द निर्माण झाले.

जी एकादशीदेवी नित्यानित्यवस्तु विचार करून आपल्यापाशी आलेल्या भक्ताच्या मनात वैराग्याला जन्म देते आणि मातेप्रमाणे नेहमी जवळ राहून अध्यात्मिक चढउतारापासून त्याचे रक्षण करून त्याला नित्यधामी पोहोचविते तीच आहे **''श्री पुत्रदा एकादशीदेवी''.** या एकादशीलाच वैकुंठ प्रभृती एकादशी असेही संबांधतात.

हे व्रत आपल्या मुलांचे दीर्घारोग्य, सुखसमृद्धी आणि याबरोबरच पुत्रप्राप्तीसाठी आचरले जाते. या दिवशी भगवान गोपाळकृष्णाच्या बालस्वरूपाची पूजा केली जाते. या पूजेला पिवळे फळ, पिवळे फूल, तुळशी आणि पंचामृत इत्यादि साहित्य लागते. या एकादशीला भगवान गोपाळकृष्णाचा जप करावा.

भद्रावती राज्यामध्ये सुकेतुमान नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या पत्नीचे नाव शैव्या होते. राजाजवळ सगळे ऐश्वर्य होते, पण पुत्रसंतान नव्हते. अशामुळे राजा व राणी कायम चिंतेत असायचे. राजच्या मनात देहत्याग करावा असा विचार येऊ लागला. परंतु याने पाप लागेल म्हणून त्याने हा विचार सोडून दिला. राजाचे मन आपल्या रोजच्या दरबारातील कामकाजामध्ये लागत नव्हते. त्यामुळे तो जंगलामध्ये रहायला गेला.

जंगलात फिरता फिरता त्याला एक तलाव दिसला. त्या तलावाच्या किनाऱ्यावर त्याला एका ऋषींचा आश्रम दिसला. राजा आश्रमात गेला. राजाला बघितल्यावर ऋषी प्रसन्न झाले आणि राजाला म्हणाले, 'राजा, काय इच्छा आहे' असा प्रश्न केला. राजाने आपली पुत्रप्राप्तीची इच्छा ऋषींना बोलून दाखविली. तेव्हा ऋषी म्हणाले, 'राजा, तू पुत्रदा एकादशीचे व्रत कर.' त्या दिवशीच पुत्रदा एकादशी होती. त्याने पुत्रदा एकादशीचे यथासांग व्रत केले आणि दुसरे दिवशी द्वादशीचे पारणे केले. या पुत्रदा एकादशीच्या व्रताने राणीला गर्भधारणा होऊन राजाला सुंदर पुत्र झाला.

ही एकादशी वर्षातून दोनदा असते. पौष शुद्ध एकादशी हीसुद्धा पुत्रदा एकादशी असते.

***

## श्रावण वद्य ११ - **अजा एकादशी**

जी एकादशीदेवी आपल्या अनुरागी भक्तांच्या अंतःकरणात अजारुपाने (आद्यशक्तीरूपाने) विराजीत राहून त्यांना सदैव नित्यधामाच्या मार्गावर पुढे जाण्यासाठी शक्ती देत असते ती आहे श्रावण मासातील कृष्ण पक्षातील एकादशी तिथीला **अजा एकादशी** म्हणतात.

या एकादशीला पद्मा, पार्श्व, पद्मिनी, वामन, कर्मा, पद्मनाभा, स्वर्गावती या नावानेही भारतात इतरत्र संबोधिले जाते.

आषाढी एकादशीपासून भगवान् विष्णु शयन करतात म्हणून त्या एकादशीला देवशयनी एकादशी म्हटले जाते. या दिवसापासून चातुर्मास सुरू होतो. हा काळ कार्तिकी एकादशीपर्यंत किंवा वैकुंठ चतुर्दशीपर्यंत समजला जातो. भाद्रपद महिन्यातील शुद्ध पक्षात येणाऱ्या या एकादशीला भगवान विष्णु शयनावस्थेत असताना कूस बदलतात. डाव्या कुशीवरून उजव्या कुशीवर होतात. त्यामुळे स्थानात परिवर्तन होते. म्हणून या एकादशीला परिवर्तिनी एकादशी म्हणतात.

परिवर्तिनी एकादशीचे व्रत केल्याने वाजपेय यज्ञ केल्याचे फळ प्राप्त होते. या एकादशीला श्रीविष्णु पूजन केल्याने मोक्षप्राप्ती होते.

त्रेतायुगामध्ये बली नावाचा एक दैत्य होता. तो भगवान विष्णुंचा परम भक्त होता. विविध प्रकारच्या वेदसूक्तांनी तो भगवंताची पूजा करायचा. तसेच नित्य ब्राह्मणपूजन व यज्ञांचे आयोजन करायचा. यामुळे तो बलशाली झाला आणि त्याने इंद्राला पराजित केले आणि स्वर्गाचा राजा झाला. सारे देवदेवता व ऋषीमुनी भगवंताकडे आले व यातून मार्ग काढावा अशी विनंती केली. या विनंतीला अनुसरून भगवंतानी वामनावतार घेतला आणि राजा बळी जेथे यज्ञ करत होता तेथे पोहोचले. तेथे पोहोचतानाच भगवान विष्णुंनी बलीराजाकडे तीन पाऊले भूमी मागितली. हे ऐकून यापेक्षाही अधिक भूमी घ्या असे बळी भगवंताला सांगू लागला. तेव्हा भगवंतांनी मला ३ पावलेच भूमी पाहिजे असे निर्धाराने सांगितले. तेव्हा बळीराजाने कोणताही विचार न करता भगवंताला तीन पाऊले जमिन दान दिली. हे बघून भगवंताने विराट रूप धारण केले आणि एका पावलामध्ये सप्त पाताळ घेतले व दुसऱ्या पावलामध्ये आकाशासह ७ लोक घेतले. आणि तिसऱ्या पावलासाठी जागेची मागणी केली. तेव्हा बळी राजाने नम्रतेने स्वतःचे मस्तक पुढे केले. त्याच्या या नम्रतेने प्रसन्न होऊन नित्य त्याच्या समवेत राहात असल्याचे सांगितले आणि बळीराजाला परिवर्तिनी एकादशीचे व्रत करणेस सांगितले. याप्रमाणे त्याने हे परिवर्तिनी एकादशीचे व्रत केले आणि सर्व पापातून त्याची मुक्ती झाली.

हा बळीराजा म्हणजे विष्णुभक्त प्रल्हादाचा नातू आणि प्रल्हादपुत्र विरोचनाचा पुत्र होय.

***

## भाद्रपद शुक्ल - ११ **परिवर्तनी एकादशी**

भाद्रपद मासातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला **परिवर्तनी एकादशी** म्हणतात.

या एकादशीला पद्मा, पार्श्व, पद्मिनी, वामन, कर्मा, पद्मनाभा, स्वर्गावती या नावानेही भारतात इतरत्र संबोधिले जाते.

आषाढी एकादशीपासून भगवान् विष्णु शयन करतात म्हणून त्या एकादशीला देवशयनी एकादशी म्हटले जाते. या दिवसापासून चातुर्मास सुरू होतो. हा काळ कार्तिकी एकादशीपर्यंत किंवा वैकुंठ चतुर्दशीपर्यंत समजला जातो. भाद्रपद महिन्यातील शुद्ध पक्षात येणाऱ्या या एकादशीला भगवान विष्णु शयनावस्थेत असताना कूस बदलतात. डाव्या कुशीवरून उजव्या कुशीवर होतात. त्यामुळे स्थानात परिवर्तन होते. म्हणून या एकादशीला परिवर्तिनी एकादशी म्हणतात.

परिवर्तिनी एकादशीचे व्रत केल्याने वाजपेय यज्ञ केल्याचे फळ प्राप्त होते. या एकादशीला श्रीविष्णु पूजन केल्याने मोक्षप्राप्ती होते.

त्रेतायुगामध्ये बली नावाचा एक दैत्य होता. तो भगवान विष्णुंचा परम भक्त होता. विविध प्रकारच्या वेदसूक्तांनी तो भगवंताची पूजा करायचा. तसेच नित्य ब्राह्मणपूजन व यज्ञांचे आयोजन करायचा. यामुळे तो बलशाली झाला आणि त्याने इंद्राला पराजित केले आणि स्वर्गाचा राजा झाला. सारे देवदेवता व ऋषीमुनी भगवंताकडे आले व यातून मार्ग काढावा अशी विनंती केली. या विनंतीला अनुसरून भगवंतानी वामनावतार घेतला आणि राजा बळी जेथे यज्ञ करत होता तेथे पोहोचले. तेथे पोहोचतानाच भगवान विष्णुंनी बलीराजाकडे तीन पाऊले भूमी मागितली. हे ऐकून यापेक्षाही अधिक भूमी घ्या असे बळी भगवंताला सांगू लागला. तेव्हा भगवंतांनी मला ३ पावलेच भूमी पाहिजे असे निर्धाराने सांगितले. तेव्हा बळीराजाने कोणताही विचार न करता भगवंताला तीन पाऊले जमिन दान दिली. हे बघून भगवंताने विराट रूप धारण केले आणि एका पावलामध्ये सप्त पाताळ घेतले व दुसऱ्या पावलामध्ये आकाशासह ७ लोक घेतले. आणि तिसऱ्या पावलासाठी जागेची मागणी केली. तेव्हा बळी राजाने नम्रतेने स्वतःचे मस्तक पुढे केले. त्याच्या या नम्रतेने प्रसन्न होऊन नित्य त्याच्या समवेत राहात असल्याचे सांगितले आणि बळीराजाला परिवर्तिनी एकादशीचे व्रत करणेस सांगितले. याप्रमाणे त्याने हे परिवर्तिनी एकादशीचे व्रत केले आणि सर्व पापातून त्याची मुक्ती झाली.

हा बळीराजा म्हणजे विष्णुभक्त प्रल्हादाचा नातू आणि प्रल्हादपुत्र विरोचनाचा पुत्र होय.

***

# भाद्रपद वद्य - ११ **इंदिरा एकादशी**

भाद्रपद मासातील वद्य पक्षातील एकादशी तिथीला **इंदिरा एकादशी** म्हणतात.

ही एकादशी पितृपक्षात येते. या एकादशीचे भक्तीभावाने व्रत आणि उपासना केली तर, आपल्या पितरांनाही मोक्ष प्राप्त होतो व आत्म्याला शांती प्राप्त होते. इंदिरा एकादशीचे व्रत करणाऱ्याने श्राद्धाचे काही नियम पाळावेत असे शास्त्रात सांगितले आहे. व्रत सुरू करणेपूर्वी, दशमी तिथीला पवित्र नदीत तर्पण अर्पण करावे व स्नान करून ब्राह्मण भोजन घालावे असे सांगितले आहे. दशमी तिथीला सूर्यास्तानंतर अन्न खाऊ नये असेही सांगितले आहे. दुसऱ्या दिवशी एकादशी तिथीला सकाळी लवकर स्नान करून, व्रताचा संकल्प करावा.

या एकादशीचा आणखी एक प्रकारे अर्थ सांगितला जातो. तो असा :- 'जी एकादशीदेवी आपल्या शरणागत भक्तांच्या हृदयात मातृरुपाने राहते व त्यांना अध्यात्मिक ऐश्वर्य प्रदान करून गौरवान्वित करते, ती **इंदिरा एकादशीदेवी** होय.'

प्राचीनकाळी सत्ययुगात महिष्मतीपूर नावाच्या नगरात इंद्रसेन नावाचा राजा राज्य करत होता. इंद्रसेन हा विष्णुभक्त होता. त्यामुळे या राजाला कशाचाही अभाव नव्हता. असेच एक दिवस देवर्षी नारद या राजाकडे आले. देवर्षी आले आहेत असे म्हटल्यावर राजाने त्यांना बसायला रत्नसिंहासन दिले व सादरपूर्वक प्रणाम केला. यानंतर नारदांनी संतुष्ट होऊन राजाला तुझी सात अंगे चांगली कार्यरत आहेत का? असा प्रश्न केला. (सात अंगे :- राजा - मंत्री - राष्ट्र - किल्ले - खजिना - सेना - पार्षद (मित्र)). तुमच्या कृपेने माझ्या राज्यात सर्वजण अत्यंत चांगल्या पद्धतीने कार्य करीत आहेत, असे राजाने नारदांना सांगितले. यानंतर राजाने नारदांना तुमच्या आगमनाचे कारण सांगा? असा प्रश्न केला. तेव्हा नारद म्हणाले, ' हे राजा इंद्रसेन, तुझे वडील यमलोकात अत्यंत यातना सहन करीत आहेत. त्यांनी अवेळी एकादशीव्रताचा भंग केला आहे. (उपवास मोडला आहे). त्यामुळे ते यमलोकवासी आहेत. त्यांची माझी भेट झाली असून ते मला म्हणाले आहेत की, माझ्या पुत्राने माझ्या करता इंदिरा एकादशीचा उपवास केला तर मला स्वर्गप्राप्ती होऊ शकते.'

हे ऐकल्यावर इंद्रसेन राजाने नारदांना या इंदिरा एकादशीव्रताची पद्धत विचारली. त्याप्रमाणे नारदांनी त्याला व्रताची पद्धत सांगितली. याप्रमाणे इंद्रसेन राजाने आपल्या प्रजेसोबत इंदिरा एकादशीचा उपवास केला. तेव्हा आकाशातून फुलांचा वर्षाव झाला आणि या राजाचे वडील वैकुंठलोकी गेले आणि कालांतराने इंद्रसेन राजाला या व्रताचे फळ प्राप्त होऊन, आपल्या पितृदेवांप्रमाणेच तोही वैकुंठलोकी गमन करता झाला.

***

# दिनविशेष

## वैशाख शुद्ध ३ - अक्षय्य तृतीया, परशुराम जयंती, बसवेश्वर जयंती

वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षय्य तृतीया म्हणतात. याच दिवशी परशुराम जयंती व बसवेश्वर जयंतीही असते.

**अक्षय्य तृतीया :** हा वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त आहे असे शास्त्र सांगते. या दिवशी जप, होम, पितृतर्पण, दान इ. जे काही करावे ते सर्व अक्षय्य होते. ही तृतीया रोहिणी नक्षत्रयुक्त बुधवारी आल्यास महापुण्यकारक असते असे मानले जाते. या दिवशी त्रेतायुगास प्रारंभ झाला असे महाराष्ट्रात मानतात तर उत्तर हिंदुस्थानात या दिवशी सत्ययुगाचा प्रारंभ झाला असे मानले जाते.

परमार्थदृष्टीने अक्षय्य तृतीयेचे महत्व प.पू.श्रीमामामहाराज व प.पू.श्रीदासराममहाराज यांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे :-

जीव-शिवापलीकडे । अक्षय्य रूप ते चोखडे ।।१।।
जीव वंध्यापुत्र पाही । शिव व्यापक सर्वाठायी ।।२।।
गोविंद म्हणे परमात्मा । तृतीय रुप निरुपमा ।।३।।

अक्षय्य सुख म्हणजे ज्याला क्षय - नाश नाही असे चिरकाल टिकणारे सुख होय. हे सुख नरदेहामध्ये गुरूकृपेने व सद्गुरूंनी दिलेल्या साधनेने तृतीय स्थानात साधकाला प्राप्त होते. तृतीय स्थान म्हणजेच जीव व शिव या पलिकडील स्थान. मी व तू या व्यवहार पातळीच्या पलिकडे तृतीय पुरूषी परमात्मा भेटतो व चिरसुखाची प्राप्ती होते. अक्षय्य तृतीया हे खरे नाणे असून, हे खऱ्या अर्थाने आपल्याला कायम उपयोगी पडणारे आहे. त्यासाठी नरदेहात भक्ती करून अखंड आनंद लुटावा असे या महात्म्यांनी सांगितले आहे.

---

**परशुराम जयंती :** विष्णुच्या अवतारांपैकी एक अवतार व वैदिक ऋषी तसेच सात चिरंजीवांपैकी एक म्हणून श्रीपरशुराम यांना ओळखले जाते. भृगुकुलातील जमदग्नी ऋषी व इक्ष्वाकु वंशीय राजाची कन्या रेणुका यांच्या पोटी नर्मदा नदीतीरी श्रीजमदग्नी ऋषींच्या आश्रमात वैशाख शु.३ या दिवशी परशुराम यांचा अवतार झाला. म्हणून या दिवसास परशुराम जयंती असेही म्हणतात. भृगुकूलोत्पन्न म्हणून यांना भार्गवराम असेही संबोधिले जाते. परशुराम हे विष्णुचे अवतार व शंकरांचे भक्त होते.

**अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरंधनुः ।**
**इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।१।।**

**चार वेद मुखोद्गत (संपूर्ण ज्ञान) आणि पाठीवर बाणासह धनुष्य आहे (शौर्य) म्हणजेच ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज, दोन्ही असल्याने शाप आणि शस्त्र अशा दोन्ही गोष्टींचा उपयोग जो जाणतो, तो परशुराम.**

श्रीपरशुरामांनी पित्याकडून वेदविद्येचे ज्ञान मिळविले. नंतर गंधमादन पर्वतावर जाऊन तप केले व शंकरांना प्रसन्न करून घेतले. श्रीशंकरांनी त्यांना शस्त्रविद्या शिकविली व परशु दिला. परशुराम हे धर्नुविद्येत विशेष निष्णात होते. एकदा चित्ररथ गंधर्वास पाहून परशुरामांची आई रेणुका यांचे मन विचलीत झाले. त्यामुळे जमदग्नी ऋषी रागावले व त्यांनी आपल्या पाचही मुलांना रेणुकेचा वध करण्याची आज्ञा केली. त्यापैकी एकट्या परशुरामाने पित्याची आज्ञा पाळली व आईचा शिरच्छेद केला. त्यामुळे जमदग्नी ऋषी परशुरामवर संतुष्ट झाले व त्यांनी त्यास वर मागणेस सांगितले. परशुरामांनी आईस जिवंत करण्याचा वर मागितला आणि जमदग्नींनी तो दिला. त्यामुळे रेणुकामाता जिवंत झाल्या.

श्रीरामांनी जनक राजाकडे असलेले शिवधनुष्य मोडले म्हणून परशुरामांना राग आला. त्यांनी श्रीरामांना आपले धनुष्य देऊन त्यास बाण लावण्यास सांगितले. पण श्रीरामांनी सहजगत्या धनुष्य हातात घेऊन त्यास बाण लावला. हे दृश्य पाहून आपला पराभव आहे असे समजून परशुराम महेंद्र पर्वतावर तप करण्यास निघून गेले. पुढे द्वापार युगात परशुरामांनी द्रोणाचार्य कर्ण, अर्जुन यांना धनुर्विद्या शिकविली.

एकदा कार्तवीर्याने वसिष्ठांचा आश्रम जाळला. तेव्हा वसिष्ठांनी त्याला शाप दिला की, भार्गव कुलोत्पन्न परशुराम तुझा वध करील. त्यामुळे जमदग्नी, परशुराम यांचे कार्तवीर्याशी वैर अधिक तीव्र झाले. एकदा कार्तवीर्य जमदग्नींच्या आश्रमात गेला व त्याने त्यांची कामधेनू पळविली. त्यामुळे परशुरामांनी कार्तवीर्यास युद्ध करून ठार मारले. ही बातमी समजताच कार्तवीर्याच्या मुलाने परशुराम नसल्याचे पाहून जमदग्नींवर हल्ला केला आणि जमदग्नींना ठार मारले. हे परशुरामांना समजताच ते खूप दुःखी झाले. पित्याच्या अंत्यविधीच्यावेळी सर्व पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा परशुरामांनी केली. या प्रतिज्ञेप्रमाणे परशुरामांनी आपल्या दिव्य पराक्रमाने विविध देशातील राजांचा संहार केला. पण परशुरामांनी फक्त दुष्ट राजांनाच मारले असेही सांगितले जाते. त्यांनी २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली. या साऱ्या हत्येचे पातक दूर होण्यासाठी परशुरामांनी यज्ञ आरंभला. यज्ञातील प्रमुख ऋत्विज कश्यप यांना यज्ञ दक्षिणा म्हणून आपल्या ताब्यात आलेली सर्व पृथ्वी दान केली. यानंतर कश्यप परशुरामांना म्हणाले, 'आता ही सर्व भूमी माझ्या मालकीची झाली आहे. तू दक्षिणेकडे जा.' ही आज्ञा मान्य करून परशुराम महेंद्र पर्वतावर वास्तव्यासाठी निघून गेले. पुढे कश्यपाने काही क्षत्रिय राजवंशांचा शोध करून पुन्हा राज्ये निर्माण केली व विस्कळीत झालेली समाजघडी बसविली.

दान केलेल्या भूमीवर कसे रहायचे म्हणून परशुरामांनी दक्षिणेस सागरतीरी वरुण देवांची प्रार्थना केली. वरुण देवांनी त्यांना भूमी दिली. परशुरामांनी आपल्या पराक्रमाने समुद्र मागे हटविला व प्रदेश निर्माण केला. या भूमीस पुढे परशुरामक्षेत्र असे नाव मिळाले. येथे परशुरामांनी काही वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण व इतर काही लोकांना बोलावून वस्ती वसवली. त्यानंतर ते महेंद्र पर्वतावर तपश्चर्येस निघून गेले. परशुरामांनी वसविलेल्या प्रदेशालाच सध्या कोकण किनारपट्टी म्हणतात.

**श्रीबसवेश्वर जयंती** : शालीवाहन शके १०व्या शतकात, इ.स.११०५ साली कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-नागेवाडी येथे वीरशैव कुटुंबात श्रीबसवेश्वर यांचा जन्म झाला. हा जन्म वैशाख शु.३ म्हणजेच अक्षय्य तृतीयेदिवशीच झाला. म्हणून या दिवसास बसवेश्वर जयंती असेही म्हणतात. श्रीबसवेश्वर हे समाज सुधारक होते. त्यांनी निर्गुण, निराकार, एकेश्वरवादी मताचा पुरस्कार केला.

संत बसवेश्वर यांनी महिलांवरील अत्याचार संपविण्यासाठी लढा दिला. त्या काळातील उच्च-नीच भेदभाव कमी करण्यासाठीही जातीवादाच्या विरोधात लढा दिला, लिंगायत नावाचा नवा पंथ स्थापन केला. मठ आणि मंदिरांमधील वाईट प्रथा, अंधश्रद्धा या श्रीबसवेश्वरांनी दूर केल्या. लिंग, जात, सामाजिक स्थिती याचा विचार न करता सर्व लोकांना समान संधी देण्याचे बसवेश्वरांनी सांगितले.

***

# वैशाख शुद्ध १४ -नृसिंह जयंती

नृसिंह अवतार हा विष्णुंच्या दशावतारांपैकी चौथा अवतार मानला जातो. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू हे दोघे सख्खे भाऊ होते. त्यांच्या क्रूरतेमुळे सर्व देव देवता त्रासून गेले होते. यामुळे भगवान विष्णूंनी हिरण्याक्षाचा वराह अवतार घेऊन वध केला. आपल्या प्रिय लहान भावाचा वध झालेला पाहून, हिरण्यकश्यपू अत्यंत संतापला. त्याने सर्व सभेसमोर आपले शूळ वर उचलले व सर्व दानवांना आज्ञा केली की, 'तुम्ही पृथ्वीवर जा आणि जो जो दान, तप यज्ञ याद्वारे विष्णुची आराधना करेल, त्याचा नाश करा.' तसेच त्याने त्यावेळी शपथ घेतली की, 'मीसुद्धा जेव्हा आपल्या शूळाने त्या विष्णुचा कंठ फोडून त्याच्या रक्ताने माझ्या प्रिय बंधूचे तर्पण करीन, तेव्हाच माझ्या मनाला शांती होईल.' त्याची आज्ञा मानून सर्व दानवांनी पृथ्वीवर धुमाकूळ घातला.

हिरण्यकश्यपूने अमरत्व मिळविण्यासाठी मंदार पर्वतावर खडतर तपश्चर्या करण्यास प्रारंभ केला.एका निर्जन दरीमध्ये पायाच्या एका अंगठ्यावर उभे राहून, हात वर करून तपश्चर्या सुरू केली. काही दिवसांनी त्याच्या मस्तकातून धूर निघू लागला. भूमिला थरकाप सुटला. सर्व देवांनी ब्रह्मदेवाकडे धाव घेतली व विनवणी करु लागले. तेव्हा ब्रह्मदेव हिरण्यकश्यपूकडे गेले. त्यावेळी त्याचे शरीर वारूळ, गवत, वेळूची बेटे यांनी आच्छादून गेले होते. त्याचे शरीरातील रक्त, मांस किड्या-मुंग्यांनी खाऊन टाकले होते. ही त्याची तपश्चर्या पाहून ब्रह्मदेवांनी वर मागण्यास सांगितले व त्यांनी कमंडलूतील पाणी त्याच्या अंगावर शिंपडले. यामुळे त्याचे शरीर पूर्ववत झाले. त्याने नमस्कार केला. तेव्हा ब्रह्मदेव म्हणाले, 'कोणताही वर मागून घे.' असे म्हटल्यावर त्याने ब्रह्मदेवांकडे, 'हे भगवान, तुम्ही उत्पन्न केलेल्या भूतांपासून मला मृत्यू प्राप्त होऊ नये, घरात अथवा बाहेर, दिवसा अथवा रात्री, ना अस्त्राने ना शस्त्राने, भूमीवर अथवा आकाशात, प्राण्यांकडून, मनुष्यांकडून, देवांकडून, दानवांकडून, पशू यांच्यापासून मला मृत्यू प्राप्त होऊ नये' असा वर मागितला. ब्रह्मदेवांनी तसा वर त्याला दिला.

पुढे हिरण्यकश्यपू व कयाधू या दांपत्याच्या पोटी प्रल्हाद अवतीर्ण झाला. प्रल्हाद कयाधूच्या उदरात असताना, नारदमुनी कयाधूला बोध करत होते व गर्भातून प्रल्हाद हुंकार देत होता. यावेळीच प्रल्हादाला नामाची प्राप्ती झाली. नाम हे प्रल्हादाचे ठिकाणी कोचले गेले, बिंबले गेले आणि प्रल्हाद 'नारायण नारायण' म्हणतच अवतीर्ण झाला. तो परम विष्णुभक्त होता. लहान असल्यापासून त्याला नारायण नामाचेच वेड होते. परंतु हे हिरण्यकश्यपूला आवडत नव्हते. म्हणून तो 'नारायण' नाम उच्चारू नको, म्हणून त्याला मारहाण करायचा. परंतु प्रल्हादाने ते नाम कधीही सोडले नाही. हिरण्यकश्यपूने त्याला शिक्षणाकरिता शाळेत घातले. तेथील शिक्षकांनाही हिरण्यकश्यपूने या मुलाच्या मुखातून नारायण नाव येता उपयोगाचे नाही, अशी तंबी दिली होती. परंतु हा राजपुत्र असल्याने शिक्षक बाहेर गेले की, प्रल्हाद सगळ्या मुलांना घेऊन फेर धरून खालीलप्रमाणे पद म्हणणेस सांगायचा,

**'गड्यांनो घ्या हरीच्या नामा । लिहिता कशासी ओनामा ।।ध्रु।। सांगतो ऐका एक वर्म । दुर्लभ हे मानुषजन्म । यास्तव करावे सत्कर्म । पहावा भागवती धर्म । दुःख से प्राप्त होय शर्म । यत्न कशास रे परम । न पावे हरि वाचुनी क्षेमा । लिहिता कशासी ओनामा ।।१।। शरण सद्गुरूला जावे । हरि भजनी नच लाजावे। हरिचे सगुण रूप पहावे । निर्मळ भावे पुजावे । हृदयी पदपद्म घ्यावे । सर्व हरि असेच समजून । सांडुनि हृदयातील कामा । लिहिता कशासी ओनामा ।।२।। आपुल्या हृदयी बसता । न लगे प्रयास त्या भजता । धन सुत जायेची ममता । चरणांबुज नमिता । विठ्ठल नेईल निजधामा । लिहिता कशासी ओनामा ।।३।।'**
(श्री.विठोबाअण्णा दप्तरदार )

शिक्षकांनी बरेच प्रयत्न करुनही त्याने नारायण नाम सोडले नाही, हे हिरण्यकश्यपूला कळले. म्हणून त्याने आपल्या पुत्राचा वध करण्याचे ठरविले व सेवकांना त्याने प्रल्हादाला उंच कड्यावरून फेकून देण्याची आज्ञा केली. त्यावेळी सेवकांनी तसे केले असता, श्रीविष्णुंनी प्रल्हादाला आपल्या कुशीत झेलले.

**न मरे यास्तव नेला पर्वत शिखरासी लोटिला खोली ।**
**परि तो निर्भय चित्ती वाहे नारायणासी लाखोली ।। (श्री.मोरोपंत)**

कडेलोट करूनही प्रल्हाद जीवंत परत आलेला बघून, हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला हत्तीच्या पायाखाली दिले, तसेच मोठ्या सर्पांच्या कोठडीत कोंडले, परंतु काही उपयोग झाला नाही. शेवटी हिरण्यकश्यपूने आपल्या कयाधू या पत्नीला वाटीभर विष या कारट्याला पाज, अशी आज्ञा केली.

**वाटीभरी विष दिले प्रल्हादासी । परि तो मानसी निर्भयचि ।।१।।**
**भोक्ता नारायण केलेस प्राशन । झालेसे जीवन तुझ्या बळे ।।२।।**
**नामाच्या चिंतने विषाचे ते आप । जहाले देखत नारायण ।।३।।**
**तुका म्हणे तुझे ऐसे बडीवार । सीणला फणिवर वर्णवेना ।।४।।**

त्याप्रमाणे विष पाजले तरीही त्याचा काहीही परिणाम प्रल्हादावर झाला नाही. कां, तर विष्णुंनीच ते विष प्राशन केले.

विष पाजूनही मरण येत नाही म्हटल्यावर, प्रल्हादाला एका झोपडीत डांबले व झोपडी पेटवून दिली. तरीही प्रल्हाद जीवंतच राहिला.

**'अग्नि जाळे परि न जळे प्रल्हाद । हृदयी गोविंद म्हणोनिया ।।'**

एवढे करुनसुद्धा प्रल्हाद मरत नाही म्हटल्यावर, हिरण्यकश्यपूने आपली बहीण होलिकाला प्रल्हादाला अग्नित जाळून टाकण्याची आज्ञा केली. होलिकेला ब्रह्मदेवाने वर दिला होता की, अग्नि तिचे काहीही नुकसान करू शकणार नाही. परंतु तिने या वराचा अयोग्य गोष्टीसाठी वापर करू नये. केला तर तो निष्फळ होईल. याप्रमाणे होलिकेने प्रल्हादाला मांडीवर घेतले व बाजूने अग्नि लावणेस सांगितले. आपल्या वराचा अयोग्य वापर झाल्याने, तीच शेवटी या अग्नित भस्मसात झाली व प्रल्हाद आहे तसा राहिला. हा दिवस म्हणजे होळी पौर्णिमा. हे ऐकल्यावर मात्र हिरण्यकश्यपू जास्तच क्रोधायमान झाला. त्याने सेवकांना प्रल्हादाला दरबारात

घेऊन येण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे प्रल्हाद दरबारात आला. हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला विचारले, तुझा विष्णु कोठे आहे?

**कोपोनिया पिता पुसे प्रल्हादासी । सांग ऋषिकेशी आहे कोठे ।।१।।**

**येरी वदे काष्ठी पाषाणी सकळ । आहे घननीळ सारिखाची ।।२।।**

हा प्रश्न ऐकल्यावर प्रल्हाद म्हणतो, '**त्वयस्तिच मयस्तिच ।**' तुमच्यात आहे, माझ्यात आहे, सगळीकडे आहे. हे ऐकून हिरण्यकश्यपू त्याला विचारतो, 'ह्या खांबात आहे का तुझा नारायण?' तेव्हा प्रल्हाद म्हणतो, 'हो, खांबातसुद्धा नारायण आहे.' हे ऐकल्यावर हिरण्यकश्यपूने त्या खांबाला लाथ मारली.

**खांबावरी लाथ मारिता दुर्जने । स्तंभी नारायण प्रगटला ।।३।।**

**तुका म्हणे कैचा खांब कडाडला । ब्रह्मा दचकला सत्यलोकी ।।४।।**

लाथ मारताच खांब दुभंगला आणि त्या खांबातून अतिभयंकर आवाज बाहेर आला व त्यातून नृसिंहरूप प्रगट झाले. हिरण्यकश्यपूला ब्रह्मदेवाकडून मिळालेल्या वरापेक्षा हे रूप वेगळे होते. त्याला धड मनुष्याचे व तोंड सिंहाचे होते. असे उग्र रूप अवतीर्ण झाले. त्याने हिरण्यकश्यपूकडे धाव घेतली व त्याला आपल्या मांडीवर घेतले. आपल्या नखांनी त्याचे हृदय विदीर्ण केले व त्याचा वध केला. हिरण्यकश्यपूला दिलेल्या वरानुसार, जमिनीवर किंवा आकाशात मरण येऊ नये म्हणून नृसिंहाने मांडीवर घेतले. मनुष्य, देव, दानव अथवा पशूंकडून मरण येऊ नये म्हणून नृसिंहाचे रूप धारण केले. शस्त्राने किंवा अस्त्राने मरण येऊ नये म्हणून आपल्या नख्यांनी त्याचा वध केला. तसेच घरात अथवा बाहेर मरण येऊ नये म्हणून उंबऱ्यावर व दिवसा अथवा रात्री मरण येऊ नये म्हणून सायंकाळी वध केला.

परंतु हे अवतीर्ण झालेले उग्ररूप शांत कसे व्हायचे असा प्रश्न देव व दानवांना पडला. ते सगळे पुन्हा ब्रह्मदेवांकडे गेले. ब्रह्मदेव म्हणाले, 'हे माझ्यासारख्याचे काम नाही.' मग सगळे विष्णुंच्याकडे आले. तेव्हा विष्णु म्हणाले, 'असले रूप मला पाहूनसुद्धा माहिती नाही.' शेवटी शंकरांकडे आले. शंकर म्हणाले, 'आम्ही रुद्र, तर ते अतिरुद्र आहेत.' शेवटी विष्णु म्हणाले, 'ज्या प्रल्हादाकरिता हा अवतार झाला आहे, त्यालाच पुढे करा म्हणजे हे रूप शांत होईल.' त्याप्रमाणे प्रल्हादाला पुढे केले. यावेळी नृसिंह विचारतात, 'प्रल्हादा, आणखी काय इच्छा आहे?' तेव्हा प्रल्हाद म्हणतो, 'सद्‌गती प्राप्त हो मम पितया ।' एवढे वडिलांनी लहानपणापासून छळूनसुद्धा प्रल्हादाने वडिलांना सद्‌गती प्राप्त व्हावी अशी इच्छा प्रगट केली.

***

## वैशाख व.७ - श्रीगुरुलिंगगीता जयंती

प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज हे इ.स.१९३९ साली श्रीसाधुमहाराजांच्या रथोत्सवासाठी चिमड या गावी गेले, त्यावेळी प.पू.श्रीमाईसाहेबमहाराजांच्या आदेशानुसार चिमडेच मठाधिपती प.पू.सद्गुरू श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांनी कार्तिक प्रतिपदेला श्रीदादांचे कीर्तन आयोजित केले. या कीर्तनात श्रीनिंबरगीकरमहाराजांचे अधिकारसंपन्न नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज उपस्थित होते. श्रीदादांचे कीर्तन ऐकल्यावर 'हा खरोखरच प्रल्हाद आहे' असे उद्गार त्यांनी काढले. पुढे श्रीनागाप्पाण्णामहाराजांना श्रीदादांनी काही पारमार्थिक प्रश्न विचाले. त्यांनी काही प्रश्नांची उत्तरे दिली व बाकीचा खुद्द भाग हा प्रत्यक्ष श्रीनिंबरगीकरमहाराजच तुम्हाला सांगलील असे ते बोलले. यावेळी श्रीनिंबरगीकरमहाराज विद्यमान नव्हते.

चिमड गावाहून श्रीदादा सांगलीस परत आले आणि १-२ महिने गेले असतील, एक चमत्कार घडला. इ.स. १९३९ च्या पौष महिन्याच्या शुद्ध नवमीला संध्याकाळचे वेळी म्हणजे ६ वाजता श्रीनिंबरगीकरमहाराज श्रीदादांच्या समोर प्रगट झाले. लांडे-लुटके धोतर नेसलेले, डोक्याला पागोटे, खांद्यावर कांबळे व हातात काठी या रुपात ते प्रगट झाले. श्रीदादांना या दिवशी ताप आला होता म्हणून ते एका अंधाऱ्या खोलीत बिछान्यावर पहूडले होते. तोच बरोबर ६ वाजता त्या खोलीतील पश्चिमेकडच्या भिंतीतील खांबापुढे श्रीनिंबरगीकरमहाराज प्रगट झाले. श्रीदादांना त्यांनी ''राम'' अशी हाक मारली. दादा जागे झाले आणि निंबरगीकरमहाराजांनी कानडी भाषेत एक पद सावकाश चालीत म्हणण्यास सुरवात केली :-

**येनु इल्लदानु याक नन्न नीनू । सत्य चिदानंदनू आत्मारामा ।।१।।**<br>
**बंदिलला जीवात्मा नोडगे वळगे । नाद बिंदु तोरिसी तम्मा ।।२।।**<br>
**हिंग हिंग रामा कुडी गुरूनामा । गुरूपदकमळदल्ली भृंग चंद्रमा ।।३।।**

श्रीदादांना कानडी अजिबात येत नसलेने त्यांना त्या पदाचा अर्थ कळला नाही. पण तो अभंग त्यांनी उच्चारानुसार देवनागरी लिपीत लिहून काढला. श्रीदादांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या चरणावर मस्तक ठेऊन नमस्कार केला आणि ते मान वर करून पहातात, तो महाराज अदृश्य झालेले होते. दर्शन झाल्याचा दृक्प्रत्यय म्हणजे श्रीदादांचे अंगातील ताप उतरला होता. या अभंगापासून श्रीदादांना श्रीगुरुलिंगगीता श्रुत होण्यास प्रारंभ झाला. यानंतर श्रीदादांना नादरुपाने, प्रकाशरुपाने, अक्षररुपाने, पदे प्राप्त होत गेली. इ.स.१९४१ साली मिळालेल्या ''जगवू मुट्टीवू'' आणि ''जगदानुद्धरणादौ'' या पदात 'शेष' साधन राहिल्याचे सांगून श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना जगदोद्धर करण्याची आज्ञा केली. श्रीनिंबरगीकरमहाराज ही पदे केव्हा श्रुत करतील याचा भरवसा नसे. गुरूवार दि.०२.१०.१९४१ रोजी श्रीदादा मामांच्या कीर्तनात पेटीची साथ करीत असताना, त्यांना ''समाधान शांतीवू'' हे पद ऐकू आले. दिनांक २०.०९.१९४१ ते ३०.०९.१९४१ या काळात दादांना कानडीतील ८ पदे ऐकू आली. या पदांचा मराठी अर्थही श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांच्या मनात स्फुरवला. या आठ पदांपैकी 'जगवू मुट्टीवू' या पदात महाराजांनी श्रीदादांना सांगितले, 'सर्व जगाला हरिनामाचे मार्गाने पोचव' तर 'जगदानुद्धरणादौ' या पदात महाराज म्हणतात, 'हे रामा, तुझे साधन जवळ जवळ परिपूर्ण झाले असून पूर्ण साधनापैकी 'शेष' साधन राहिले आहे.' तेव्हा तू जगाचा उद्धार करावयास पाहिजे आहेस. या दोन्ही वाक्याचा मतितार्थ असा की

श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना मुमुक्षूंना उपदेशानुग्रह करण्याचा अधिकार दिला. त्याप्रमाणे श्रीदादांनी सर्वप्रथम श्री. माणिक गोसावी यांना अनुग्रह दिला. यानंतर श्रीदादांना ट्रेझरीमध्ये व पालघरमध्ये काही पदे श्रुत झाली. सिद्धानंदरुपाने येऊन महाराजांनी ही पदे श्रुत केली. अशाप्रकारे इ.स.१९४८ पर्यंत श्रीगुरूलिंगगीतेची एकूण ६५ पदे झाली. ही ६५ पदे श्रीदादा रोज म्हणत. या गुरुलिंगगीतेतील पदांविषयी श्रीदादा आपल्या अभंगात सांगतात, '**नागाप्पांचे वचनापरी। येवोनिया माझे घरी ।।१।। आपुला हा प्रसाद मेवा । दिला आम्हा जी बरवा।।२।। तोचि राहो माझे कंठी। नित्य नेमे नाचो ओठी ।।३।। हीच सेवा जन्मोजन्मी । दासरामा देई स्वामी ।।३।।**'

श्रीनिंबरगीकरमहाराजांचे पणतू श्रीगुरुसिद्धप्पामहाराज हे इ.स.१९४८ च्या मे महिन्यात श्रीदादांचेकडे आले होते. त्यावेळी श्रीदादांनी त्यांना सांगितले, महाराज आता गुरुलिंगगीतेची ६५ पदे झाली आहेत. हे ऐकून श्रीगुरूसिद्धप्पामहाराजांना आनंद झाला. ते म्हणाले, 'रामभाऊ, तुम्ही भाग्यवान आहात, म्हणून महाराज तुम्हाला बोध करत आहेत.' यानंतर ते श्रीदादांना म्हणाले, 'रामभाऊ, निंबरगीकमहाराजांचे संदर्भात मला एक पद स्फुरले, पण ते काही पुरे झालेले नाही.' तेव्हा श्रीदादा म्हणाले, 'महाराज, तुम्ही ते पद मला म्हणून दाखवा. मला वाटते की ते पद निंबरगीकरमहाराजांचे कृपेने आज पुरे होईल.' याप्रमाणे श्रीगुरुसिद्धप्पामहाराजांनी ते अपूर्ण पद श्रीदादांना म्हणून दाखविले. श्रीदादांनी महाराजांची प्रार्थना केली आणि श्रीमहाराजांच्या प्रेरणेने श्रीदादांचे हातून ते खाालील पद पूर्ण झाले :-

**'नमोनमोगुरुलिंगजंगमेशा ।।ध्रु।।**
**नामरहितने । नारायण महात्मने । भवकडिसोबेगने । निजधामने ।।१।।**
**करवीरवाशा । श्रीगुरुकाडसिद्धेशा । भक्तर भाव दोळवाशा । सर्वेशा ।।२।।**
**प्रिय रघुवारदाता । बेडिदवरव कोडुवाता । चिम्मड मठ दोळिरुवाता । गुरूनाथा ।।३।।**
**साधुपुरुषने । श्रीगुरुरामचंद्रने । साधुराज शिष्यने । चिमडवासने ।।४।।**
**हिंचगिरीशा । भाऊराव गुर्वेशा । श्रीगुरूनाम निवाशा । साधकेशा ।।५।।**
**श्रीनागापाण्णा गुरुसाधनराणा । चरणी गुरुसिद्धण्णा । निरंजना ।।६।।'**

हे पद निंबरगीकरमहाराजांच्या प्रेरणेने आणि श्रीदादांच्या इच्छेप्रमाणे शनिवार दि.२९.०५.१९४८ वैशाख व.६ शके १८७० रोजी पूर्ण झाले. श्रीदादांना अचानक काय वाटले कोणास ठाऊक, ते श्रीगुरुसिद्धप्पामहाराजांना म्हणाले, 'महाराज, हे पद गुरुलिंगगीतेत घालणेस आपण अनुमती द्यावी.' याप्रमाणे महाराजांनी आनंदाने अनुमती दिली आणि दुसरे दिवशी म्हणजे रविवार वैशाख व.७ शके १८७० दि.३०.०५.१९४८ रोजी रामराज्याभिषेक दिन होता. या शुभ दिवशी श्रीदादांच्या गुरुलिंगगीतेच्या स्वहस्ते लिहिलेल्या वहीत हे पद, श्रीगुरूसिद्धप्पामहाराजांनी स्वहस्ते कानडी लिपीत लिहून दिले.

यानंतर श्रीदादांच्या मनात उर्मी आली की यापुढे आपण 'गुरुलिंगगीता जयंती दिन' साजरा करावा आणि तो सुद्धा वैशाख व. सप्तमी या दिवशी. म्हणून ते श्रीगुरुसिद्धप्पामहाराजांना म्हणाले, 'महाराज, यापुढे आम्ही गुरुलिंगगीतेचा जयंती दिवस साजरा करावयास लागू. आज आपण वैशाख व. सप्तमी आपले पद माझ्या वहीत लिहिले असलेने वैशाख व. सप्तमी हाच गुरुलिंगगीता जयंती दिन मानावा अशी मला प्रेरणा झाली आहे. माझ्या या प्रेरणेस आपण संमती द्यावी.' श्रीदादांच्या या प्रेरणेस श्रीगुरुसिद्धप्पामहाराजांनी आनंदाने अनुमती दिली.

त्याप्रमाणे इ.स. १९४९ च्या वैशाख व.सप्तमीपासून गुरुलिंगगीता जयंती साजरी होऊ लागली आणि आजतागायत ती चालू आहे.

अशी ही गुरुलिंगगीता नित्यनेमाने पठण करणारे असंख्य आहेत. या गुरुलिंगगीता पठणाची फलश्रुती सुद्धा श्रीनिंबरगीकरमहाराजांनी सांगितली आहे. ते म्हणतात, 'जर या प्रसाद वचनांचे तू पठण करशील तर, अगणित पुण्य मिळवून तू जगतात धन्य होशील' (गुरुलिंगगीता १७.६)

इ.स. १९४८ सालानंतरही श्रीदादांना कानडी, इंग्रजी, आर्ष, संस्कृत आणि मराठी या भाषांतून पदे श्रुत होत गेली. इ.स. १९८५ पर्यंत ही पदे एकूण २२८ झाली. याप्रमाणे गुरुलिंगगीता ही या काळातील श्रुती-स्मृती असून, या जगातील हे आठवे आश्चर्य आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**ॐ जय गुरुलिंगन गीता ।।ध्रु।।**
**यंथाद प्रसादनु कोडुत नादवू नागाप्पा वचनेथा ।**
**प्रल्हादा निनवयावतारदवा नारायण सत्ता ।।१।।**

'गुरुलिंगगीतेचा जयजयकार असो. नागप्पाण्णांचे या वचनाप्रमाणे म्हटलेला नादरूप प्रसाद दिला. प्रल्हादा, हा तुझ्याकरताच अवतार झाला असून, ही नारायणाची सत्ता आहे.'

***

**प्रा.डॉ. के. वा. आपटे कृत श्रीगुरुलिंगगीतेची आरती**

**निंबरगीश्वर जंगम गुरुलिंगप्रभुनी ।**
**सिद्धानंदरूपाने गगनी येवोनी ।**
**प्रल्हादाचे साठी हृदयी प्रगटोनी ।**
**तेजोनादे केला बोध तया कर्णी ।।१।।**
**गुरुलिंगप्रसादगीते गुरुलिंगगीते ।**
**मामुद्धर मामुद्धर मामुद्धर माते ।।ध्रु।।**
**जंगमप्रसादगीता श्रीगुरुलिंगगीता ।**
**बोध अमृताची त्रिवेणी सरिता ।**
**ब्रह्मस्वरूपा ती निरतिशय पूता ।**
**केशवचित्ती राहो ज्ञानप्रसन्नता ।।२।।**

# ज्येष्ठ शु. १ - गंगोत्सव किंवा दशहरा

ज्येष्ठ शु.प्रतिपदेपासून दशमीपर्यंत गंगानदीच्या काठी जो उत्सव साजरा केला जातो, त्याला गंगोत्सव असे म्हणतात. या गंगोत्सवालाच 'दशहरा' असेही संबोधिले जाते.

इक्ष्वाकू कुळातील सुप्रसिद्ध राजा भगीरथ याने गंगानदी आपल्या देशात आणली. या वंशात 'सगर' नावाचा एक प्रख्यात राजा होता. त्याने अश्वमेध यज्ञ करण्याचे ठरविले. अश्वमेध यज्ञ हा सार्वभौमत्व म्हणजे चक्रवर्ती राजा बनणेकरिता करायचा असतो. या यज्ञाकरिता त्याने एक अश्व योजला व त्याला देशोदेशीच्या राजांकडून आपले सार्वभौमत्व मान्य (कबूल) करविण्यासाठी सेनेसह संचारार्थ पाठवून दिले. पण हा अश्व बराच काळ परत आलाच नाही. हे पाहून सगर राजाने त्याचे ८००० पुत्र अश्वशोधार्थ बाहेर पाठविले. पण तेही पुत्र परत आले नाहीत. हे पाहून सगर राजाचा नातू अंशुमन हा आपल्या वडिलांना व चुलत्यांना शोधण्याकरिता बाहेर पडला. पूर्व दिशेस जाता जाता त्याला कपिल ऋषींच्या आश्रमाजवळ तो अश्व सापडला. तेथून तो कपिलऋषींकडे गेला व त्याने त्यांचेकडे आपले वडिल व चुलत्यांची चौकशी केली. तेव्हा कपिलऋषी म्हणाले, तुझे वडिल व चुलते माझ्या रोषामुळे येथेच भस्म होऊन पडले आहेत. आता यावर उपाय काय? असा प्रश्न अंशुमनाने कपिलऋषींना विचारला. तेव्हा कपिलऋषी म्हणाले, त्यांचा उद्धार होण्यास एकच मार्ग मोकळा आहे आणि तो म्हणजे गंगेचा पवित्र ओघ त्यांच्या रक्षेवरून वाहून जाईल असे काही केले पाहिजे. अंशुमन तो अश्व बरोबर घेऊन परत सगर राजाकडे आला आणि अश्वमेध यज्ञाची पूर्तता त्याने केली.

पण कपिलऋषींनी सांगितल्याप्रमाणे तो अंशुमन आपल्या वडिलांच्या व चुलत्यांच्या उद्धारकार्यासाठी परत बाहेर पडला. गंगामातेची अत्यंत खडतर उपासना केली. प्रार्थना केली, पण गंगेला त्यास प्रसन्न करुन घेता आले नाही. हे बघून अंशुमनचा पुत्र दिलीप यानेही प्रयत्न केला, पण तोही असफल झाला. त्यानंतर या दिलीपचा पुत्र भगीरथ याने मात्र शिकस्तीचे प्रयत्न केले व शेवटी भगीरथाच्या प्रयत्नांना यश आले आणि गंगा नदी प्रसन्न झाली. गंगा नदीला प्रसन्न करुन घेण्याकरिता भगीरथाला असंख्य अडचणी आल्या. नानाप्रकारची विघ्ने, अपरिमित क्लेश, स्वकार्याचा त्याग करण्याचा प्रसंग अनेक वेळा भगीरथावर आला. तथापि त्याने या सगळ्यावर मात करुन नेटाने प्रयत्न केला व त्यात त्याला यश आले. म्हणून 'भगीरथ प्रयत्न' हे शब्द 'परमावधीचे प्रयत्न' या अर्थी वापरले जातात. भगीरथाच्या प्रयत्नांमुळे गंगा अवतीर्ण झाली. त्यामुळे गंगेस 'भागीरथी' हे नांव पडले.

गंगेने अवतीर्ण होण्यापूर्वी भगीरथास प्रश्न केला की, 'मी भूमीवर अवतरले तर लोक माझ्या पाण्यात स्नान करुन, पापक्षालन करून मला मलीन करतील. यावर उपाय काय?' तेव्हा भगीरथाने उत्तर दिले, 'तू

साधुसंतांच्या समागमामुळे निर्मळ होशील.'

याप्रमाणे भगीरथाने सांगितल्यावर गंगा स्वर्गातून निघाली आणि भगवान विष्णुंच्या चरणावर आली. परंतु तिचा प्रवाह मृत्यूलोकाच्या मानाने अतिप्रचंड असल्याने तो मानवांना सहन न होता, त्यांचा विनाश झाला असता, म्हणून गंगेने प्रार्थना केल्यानंतर भगवान शंकरांनी तो प्रवाह आपल्या मस्तकावर जटांमध्ये धारण केला व आपली केवळ एकमात्र जटा उघडून तो प्रवाह पृथ्वीवर सोडला आणि पृथ्वीवर गंगा अवतीर्ण झाली. खाली पृथ्वीतलावर वहात वहात ती हरिद्वार (देवप्रयाग), वाराणसी इ. स्थानांवरून पूर्व समुद्रास जाऊन मिळाली. सगरांच्या पुत्रांचा तिने उद्धार केला आणि ज्येष्ठ शु. १०, भौमवारी हस्त नक्षत्रावर भागीरथीने या भूलोकावर आगमन केले, म्हणून या दिवशी गंगोत्सव साजरा केला जातो. गंगास्नानाच्या योगाने १० पातकांचे क्षालन होते असे सांगितले आहे, म्हणून गंगेस 'दशहरा' असे म्हणतात.

कठोर भाषण, असत्य भाषण, चहाडी(चुगली किंवा लावालावी), वृथा वल्गना, चौर्यकर्म, हिंसा, अनीतिकारक विषयांचे भोग, परापहार, अनिष्टचिंतन व दुराग्रह (हट्ट) यांची १० पातकात गणना केली आहे.

पद्मपुराणात श्रीसनत्कुमारांनी नारदमुनींना दशअपराध सांगितले आहेत. ते नाहीसे करुन/वर्ज्य करुन नामस्मरण, शुद्ध आचरण, आणि गंगास्नान यायोगे भगवंताला संतुष्ट करायचे. हे अपराध खालीलप्रमाणे आहेतः- १) संतांनी नाममहिमा वाढविला म्हणून संतांची निंदा करणे २) हरिहरात भेद करणे ३) सद्गुरूंची अवज्ञा करणे ४) वेदशास्त्रपुराणांनी नामाचा महिमा गाईला म्हणून वेदांची निंदा करणे ५) नाममहिमा ही नुसती प्रशंसा आहे असे म्हणणे ६) नामाने पाप जाते मग पाप करणेस काय हरकत आहे असे समजून पाप करणे ७) व्रत-दान-यज्ञ नामासमान मानणे, ८) अभाविकास दाटून उपदेश करणे ९) नाममहिमा ऐकून प्रीती उत्पन्न न होणे १०) सत्संगती न करणे. हे दोष गेले की दशहरा साधतो.

***

## भाद्रपद वद्य ६ - श्रीज्ञानेश्वरी जयंती

भाद्रपद वद्य षष्ठी ही तिथी श्रीज्ञानेश्वरीजयंती म्हणून साजरी केली जाते. अर्थात् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी हा ग्रंथ या दिवशी लिहून पूर्ण केला असा काहींचा समज आहे, पण तसे नाही. शांतीब्रह्म श्रीएकनाथमहाराजांनी इ.स.१५८४ साली आजच्या तिथीला या ग्रंथाची शुद्ध प्रत तयार करून पूर्ण केली.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी इ.स.१२९६ मध्ये संजीवन समाधी घेतली आणि कालांतराने श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या गळ्याभोवती अजान वृक्षाची मुळी लागली. ही मुळी काढण्याच्या निमित्ताने श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीएकनाथमहाराजांना स्वप्नात दृष्टांत दिला आणि आळंदीला बोलावून घेतले.

**श्रीज्ञानदेवे येऊनी स्वप्नात । सांगितली मात मजलागी ।।१।।**
**दिव्य तेजःपूंज मदनाचा पुतळा । परब्रह्म केवळ बोलतसे ।।२।।**
**अजानवृक्षाची मुळी कंठास लागली । येऊनी आळंदीस्थळी काढ वेगी ।।३।।**
**ऐसे स्वप्न होता आलो अलंकापुरी । तव नंदी माझारी देखिले द्वार ।।४।।**
**एका जनार्दनी पूर्व पुण्य फळले । श्रीगुरू भेटले ज्ञानेश्वर ।।५।।**

याप्रमाणे नाथमहाराज आळंदीला आल्यावर त्यांना माऊलींची समाधी सापडेना. परिसरात चौकशी केली तर खात्रीलायक कोणी सांगेना. माऊलींच्या समाधीचा परिसर काट्याकुट्यांनी व्यापलेला होता. आपल्या बरोबर आलेल्या भक्तमंडळींना इंद्रायणी नदीच्या तीरावर थांबायला सांगून नाथमहाराज तेथील जंगल सदृश्य परिसरात गेले. त्या परिसरात अनेकानेक समाध्या होत्या. मग यातील नेमकी माऊलींची समाधी कोणती? असा प्रश्न त्यांना पडला. मग नाथमहाराजांनी एका स्थानावर बसून माऊलींचा धावा सुरू केला. ज्या स्थानावर नाथमहाराज बसले, ती जागा सध्या माऊलींच्या मंदिर परिसरात असून, तो 'शांतीब्रह्म एकनाथमहाराज पार' म्हणून ओळखला जातो. नाथमहाराजांचा धावा ऐकून ज्ञानेश्वरमहाराजांनी त्यांना नंदीखालील द्वारातून आत येणेस सांगितले. तेथे गेल्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा दिव्य तेजःपूंज मदनाचा पुतळा बघून नाथमहाराज हरखून गेले. त्यांना आनंद झाला.

श्रीज्ञानेश्वरमहाराज नाथांना म्हणाले की, 'नाथ, ज्ञानेश्वरीत काही आगंतुक ओव्या आहेत. यात योग्य ती सुधारणा करणेसाठी अधिकार संपन्न व्यक्तीची आवश्यकता होती. याप्रमाणे तुम्ही आहात, म्हणून मी तुम्हाला बोलावून घेतले आहे.' या ज्ञानेश्वरीच्या संबंधाने नाथांचा माऊलींबरोबर ३ दिवस संवाद चालला होता.

तीन दिवस झाले तरी नाथमहाराज परत न आल्याने बरोबर आलेल्या भक्तमंडळींच्या मनात घालमेल सुरू झाली. या भक्तांचे हाल होऊ नयेत म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वाण्याचे रूप घेतले.

**झाले ज्ञानदेव वाणी । आले सामुग्री घेऊनी ।।१।।**

**पर्वकाळ द्वादशी । दिली सामुग्री आम्हासी ।।२।।**

**ज्ञानदेवाच्या चरणी । शरण एका जनार्दनी ।।३।।**

याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वाण्याचे रूप घेऊन शिधापाण्याची व्यवस्था केली. समाधी स्थानातून बाहेर आल्यावर सर्व भाविकांना माऊलींच्या समाधीचे दर्शन घडावे या हेतूने नाथमहाराज या सर्वांना त्या स्थानी घेऊन आले आणि या सर्वांना दर्शन घडविले. समाधीचा शोध लागल्यानंतर नाथांनी समाधीचा जीर्णोद्धार केला, मूळ गाभारा बांधला. मंदिर परिसर सुशोभित केला आणि आळंदीची कार्तिकी यात्रा सुरू केली.

यानंतर नाथमहाराज परत पैठणला आले आणि वर्षभरातच नाथांनी ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार केली. त्याची पूर्णता ज्या दिवशी झाली, तो दिवस म्हणजे आजचा भाद्रपद वद्य षष्ठी आणि हाच दिवस 'ज्ञानेश्वरी जयंती' म्हणून ओळखला जातो.

याची आठवण म्हणून श्रीनाथमहाराजांनी या ज्ञानेश्वरीच्या शेवटी चार ओव्या लिहून ठेवल्या.

**शके पंधराशे साहोत्तरी । तारणनाम संवत्सरी ।**

**एका जनार्दने अत्यादरी । गीता ज्ञानेश्वरी प्रति शुद्ध केली ।।१।।**

**ग्रंथ पूर्वीच अती शुद्ध । परी पाठांतरी शुद्ध अबद्ध ।**

**तो शोधोनिया एवंविध । प्रति शुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ।।२।।**

**नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका । जयाची गीतेची वाचिता टीका ।**

**ज्ञान होय लोका । अति भाविका ग्रंथार्थिया ।।३।।**

**बहूकाळ पर्वणी गोमटी । भाद्रपद मास कपिलाषष्ठी ।**

**प्रतिष्ठानी गोदातटी । लेखन कामाठी संपूर्ण जाहली ।।४।।**

**ज्ञानेश्वरीपाठी । जो ओवी करील मराठी ।**

**तेणे अमृताचे ताटी । जाण नरोटी ठेविली ।।५।।**

***

| अ.क्र. | संतांचे नाव | जन्म तिथी व सन | निर्याण तिथी व सन |
|---|---|---|---|
| ०१. | प.पू.श्रीगुंडुबुवामहाराज | इ.स.१९०२ | चैत्र शु.१ गुढीपाडवा, इ.स.१९४४ |
| ०२. | प.पू.श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज | शके १७५१, इ.स. १८२९ | चैत्र शु.३ शके १८०१, इ.स. १८७९ |
| ०३. | प.पू.श्रीसोहिरोबानाथ आंबिये | शके १६३६, इ.स.१७१४ | चैत्र शु.९ शके १७१४, इ.स. १७९२ |
| ०४. | प.पू.श्रीसाधुमहाराज खंदारकर | --- | चैत्र शु.११शके १७३४, इ.स. १८१२ |
| ०५. | प.पू.श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर | चैत्र शु.१५ शके १७१२ इ.स.१७९० | चैत्र शु.१२ शके १८०७, इ.स.१८८५ |
| ०६. | प.पू.छत्रपती शिवाजीमहाराज | --- | चैत्र शु.१५ शके १६०२, इ.स. १६८० |
| ०७. | प.पू.श्रीधरस्वामीमहाराज | मार्गशीर्ष शु.१५ शके १८३०, इ.स.१९०८ | चैत्र व. २ शके १८९५, इ.स. १९७३ |
| ०८. | प.पू.श्रीनानामहाराज तराणेकर | श्रावण शु.५ शके १८१८, इ.स.१८९६ | चैत्र व. १० शके १९१५, इ.स.१९९३ |
| ०९. | प.पू.श्रीवेण्णास्वामी | अंदाजे इ.स.१६२७-२८ | चैत्र व. १४ शके १६००, इ.स. १६७८ |
| १०. | प.पू.स्वामी अमलानंद | पौष शु.८ शके १८२५, इ.स.१९०३ | वैशाख शु.१ शके १९१०, इ.स.१९८८ |
| ११. | प.पू.श्रीपंडितरावमहाराज | फाल्गुन शु.७ शके १८४६, इ.स.१९२४ | अधिक वैशाख शु.५ शके १९३२, इ.स.२०१० |
| १२. | प.पू.श्रीशंकरमहाराज मिरीकर | --- | वैशाख शु.८ शके१८६९, इ.स.१९४७ |
| १३. | प.पू.श्रीधोंडीराजमहाराज पलूस | इ.स.१८२० चे दरम्यान | वैशाख शु.९ शके १८३०, इ.स.१९०८ |
| १४. | प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर | --- | वैशाख शु.१३ |
| १५. | प.पू.श्रीआद्य शंकराचार्य | वैशाख शु.५ शके ७१०, इ.स.७८८ | वैशाख शु.१५ शके ७४२, इ.स.८२० |
| १६. | प.पू.गौतमबुद्ध | वैशाख शु.१५ इ.स.पूर्व ५६३ | वैशाख शु.१५ इ.स.पूर्व ४८३ |
| १७. | प.पू.श्रीदिगंबरदासमहाराज जोशी | आश्विन शु.८ शके १८३४, इ.स.१९१२ | वैशाख व.१, शके १९११, इ.स.१९८९ |
| १८. | प.पू.श्रीसंत चोखामेळा | --- | वैशाख व. ५ शके १२५०, इ.स.१३३८ |
| १९. | प.पू.श्रीगोविंदपंत घोसरवाडकर | कार्तिक शु.११ शके १७७९, इ.स.१८५७ | ज्येष्ठ शु.३ शके १८६४, इ.स. १९४२ |
| २०. | प.पू.श्रीतुकामाई येहेळगांव | फाल्गुन व.५ शके १७३४, इ.स.१८१३ | ज्येष्ठ शु.८ शके १८०९, इ.स.१८८७ |

| अ.क्र. | संतांचे नाव | जन्म तिथी व सन | निर्याण तिथी व सन |
|---|---|---|---|
| २१. | प.पू.श्रीगुरूदेव रानडे | आषाढ शु.२ शके १८०८, इ.स.१८८६ | ज्येष्ठ शु.१० शके १८७९, इ.स.१९५७ |
| २२. | प.पू.श्री.ग. वि. तथा काकासाहेब तुळपुळे | शके १८१२ इ.स.१८९० | ज्येष्ठ शु. ११ शके १९०४, इ.स.१९८२ |
| २३. | प.पू.श्रीमहादबामहाराज पाटील | आश्विन शु.१३ शके १८३८, इ.स.१९१६ | ज्येष्ठ शु.१५ वटपौर्णिमा शके १९०४, इ.स.१९८२ |
| २४. | प.पू.श्रीलक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेबमहाराज कोटणीस | शके १७९२ इ.स.१८७० | ज्येष्ठ व.५ शके १८३४, इ.स.१९१२ |
| २५. | प.पू.श्रीशिवरामबुवा ब्रह्मचारी | --- | ज्येष्ठ व. १२ शके १८४७, इ.स.१९२५ |
| २६. | प.पू.श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी | श्रावण व.५, शके १७७६, इ.स.१८५४ | आषाढ शु.१ शके १८३६, इ.स.१९१४ |
| २७. | प.पू.श्रीअण्णाबुवामहाराज | --- | आषाढ शु.४ शके १७९४, इ.स. १८७२ |
| २८. | प.पू.श्रीगोपाळकाका कोटणीस | शके १७९७ इ.स.१८७५ | आषाढ शु.७ शके १८७०, इ.स.१९४८ |
| २९. | प.पू.श्रीनरसाप्पा शापेटी | अंदाजे शके १७४२ इ.स.१८३० | आषाढ शु.८ शके १८५७, इ.स.१९३५ |
| ३०. | प.पू.श्रीकूर्मदास | --- | आषाढ शु.१० |
| ३१. | प.पू.श्रीअनंत गंगाधर केळकर | शके १७८२ इ.स.१८६० | आषाढ शु.१२ शके १८५६, इ.स. १९३४ |
| ३२. | प.पू.कल्याण स्वामी | शके १५५८, इ.स.१६३६ | आषाढ शु.१३ शके १६३६, इ.स.१७१४ |
| ३३. | प.पू.श्रीमामासाहेब दांडेकर | वैशाख शु.७ शके १८१८, इ.स.१८९६ | आषाढ शु. १४ शके १८९०, इ.स.१९६८ |
| ३४. | प.पू.श्रीरामरावमहाराज फडणीस तिकोटेकर | --- | आषाढ व. ४ शके १८७२, इ.स. १९५० |
| ३५. | प.पू.संत सावतामाळी | शके ११७२, इ.स.१२५० | आषाढ व.१४ शके १२१७, इ.स. १२९५ |
| ३६. | प.पू.श्रीदासराममहाराज केळकर | श्रावण व.६ शके १८४२ इ.स.१९२० | श्रावण शु.६ शके १९२३, इ.स. २००१ |
| ३७. | प.पू.श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी | शके १८१३, इ.स.१८९१ | श्रावण व.२ शके १८७५, इ.स. १९५३ |
| ३८. | प.पू.श्रीबाबामहाराज ऊर्फ रावसाहेब सहस्रबुद्धे | कार्तिक शु.१५ शके १८०५ इ.स.१८८३ | श्रावण व.४ शके १८७६, इ.स.१९५४ |
| ३९. | प.पू.जनीजनार्दनमहाराज | शके १४४०, इ.स.१५१८ | श्रावण व.८ शके १५२३, इ.स. १६०१ |

| अ.क्र. | संतांचे नाव | जन्म तिथी व सन | निर्याण तिथी व सन |
|---|---|---|---|
| ४०. | प.पू.श्रीकृष्णसरस्वती दत्तमहाराज (कुंभारस्वामी) | माघ व.५ शके १७५७, इ.स.१८३५ | श्रावण व.१० शके १८२२, इ.स.१९०० |
| ४१. | प.पू.स्वामी स्वरूपानंद | मार्गशीर्ष व.१२ शके १८२५, इ.स.१९०३ | श्रावण व.१२ शके १८९६, इ.स. १९७४ |
| ४२. | प.पू.हनुमंतमहाराज वावरहिरेकर | फाल्गुन व.१५ शके १८५५, इ.स.१९३३ | श्रावण व.१५ शके १८८३, इ.स.१९६१ |
| ४३. | प.पू.श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर | शके १८०२, इ.स.१८८० | भाद्रपद शु.३ शके १८२२, इ.स.१९०० |
| ४४. | प.पू.श्रीशंकरमहाराज शिपूरकर | शके १८३१, इ.स. १९०९ | भाद्रपद शु.३ शके १९०२, इ.स.१९८० |
| ४५. | प.पू.श्रीदादामहाराज कोटणीस | शके १८२१, इ.स. १८९९ | भाद्रपद शु.६ शके १८९५, इ.स.१९७३ |
| ४६. | प.पू.श्रीगणपतरावमहाराज कन्नूर | भाद्रपद शु.४ शके १८३१ इ.स. १९०९ | भाद्रपद शु.७ शके १९२६, इ.स.२००४ |
| ४७. | प.पू.श्रीनारायणमहाराज मळणगांवकर | ज्येष्ठ शु.१४ शके १८१४, इ.स.१८९२ | भाद्रपद शु.९ शके १८६५, इ.स.१९४३ |
| ४८. | प.पू.श्रीवामनभटजी बाळेकुंद्रीकर | --- | भाद्रपद शु.९ |
| ४९. | प.पू.श्रीनिरंजनरघुनाथ | कार्तिक शु.८ शके १७०४, इ.स. १७८२ | भाद्रपद शु.११ शके १७७७, इ.स.१८५५ |
| ५०. | प.पू.श्रीगुलाबरावमहाराज | आषाढ शु.१०, शके १८०३, इ.स.१८८१ | भाद्रपद शु.१२ शके १८३७, इ.स. १९१५ |
| ५१. | प.पू.श्रीविनयानंदमहाराज | शके १८७५, इ.स. १९५३ | भाद्रपद शु.१२ शके १९४२, इ.स. २०२० |
| ५२. | प.पू.श्रीरघुनाथाचार्य आद्य | वैशाख शु.३ शके १७८३, इ.स.१८६१ | भाद्रपद शु.१४ शके १८१८, इ.स.१८९६ |
| ५३. | प.पू.श्रीगोविंद तुळशीराम ढेरे ऊर्फ सूरदास. | --- | भाद्रपद शु.१४ शके १९१२, इ.स. १९९० |
| ५४. | प.पू.श्रीदाजीसाहेबमहाराज तथा बळवंतभारती | शके १८५९, इ.स.१९३७ | भाद्रपद व.७ शके १९३१, इ.स. २००९ |
| ५५. | प.पू.श्रीगोविंदमहाराज उपळेकर | माघ शु.२ शके १८०९, इ.स.१८८८ | भाद्रपद व.८, शके १८९६, इ.स. १९७४ |
| ५६. | प.पू.श्रीकृष्णदेवमहाराज पुसेसावळी | --- | भाद्रपद व.१३ शके १८७१, इ.स. १९४९ |
| ५७. | प.पू.श्रीब्रह्मानंदमहाराज बेलधडीकर | माघ व.१० शके १७८०, इ.स.१८५९ | भाद्रपद व.१५ शके १८४०, इ.स. १९१८ |

# साधकोपयोगी ग्रंथ

(खालील यादीतील ग्रंथ हे श्रीदासराम ग्रंथमाला पुष्पयादी व्यतिरिक्त

१. श्रीहनुमद्-गुरू-चरित्र-बोध-सार (श्रीमामामहाराज केळकर लिखित श्रीकोटणीसमहाराजांचे चरित्र)

२. श्रीगोविंद चरित मानस (प.पू.श्रीमामामहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)

३. श्रवणी पाजुनी अमृतवाणी (प.पू.मामामहाराजांचे निवडक अभंगांचे विवरण)

४. नित्य नवा दिस जागृतीचा (श्रीदादांच्या ३६५ वचनांचे चिंतन)

५. श्रीहनुमत् गुरूचरित्र (न.दा.दिवेकर कृत श्रीकोटणीसमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)

६. श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)

७. संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)

८. श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह

९. श्रीनित्यपाठामृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)

१०. साधन संध्या (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)

११. चिन्मय नित्यपाठ (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)

१२. अमृतवाणी (प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा अभंग गाथा)

१३. सन्मार्ग दीप (चिमड मठ प्रकाशित)

१४. श्रीनारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या (प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची कीर्तने)

१५. श्रीगुरुलिंग गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)

१६. श्रीदासराम गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)

१७. श्रीदासराम वचनामृत (श्रीदादांची वचने)

| श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा | |
|---|---|
| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
| १ | नासदीय सूक्तावरील ओविबद्ध टीका |
| २ | श्रीदासरामगाथा (अभंग गाथा) |
| ३ | श्रीरामदासबोध (ओवीबद्ध) |
| ४ | संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह) |
| ५ | श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला (ओवीबद्ध टीका) |
| ६ | श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह |
| ७ | ग्रंथत्रयी (आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी) |
| ८ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग |
| ९ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन |
| १० | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (३६५ वचने) |
| ११ | श्रीगुरुमहिमा |
| १२ | श्रीदासरामगाथा पुरवणी |
| १३ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र |
| १४ | श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना |
| १५ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) |
| १६ | रामदासस्वामीकृत आत्माराम (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १७ | श्रीगुरुलिंगगीता (२२८ पदे) |
| १८ | श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १९ | श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे |
| २० | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र (श्रीदासरामलिखित) |
| २१ | श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी |
| २२ | श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन |
| २३ | श्रीदासराममहाराज यांची प्रवचने (१०८) |
| २४ | समर्थ रामदासकृत करुणाष्टके (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) |
| २५ | श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ) |
| २६ | श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध (विवरणासह) |
| २७ | ज्ञानेश्वरी ६वा अध्याय (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) |
| | श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) |

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| २९ | श्रीएकनाथकृत आनंदानुभव (श्रीदासरामकृत टीकेसह) |
| ३० | परमार्थ प्रश्नोत्तरी |
| ३१ | श्रीदासराम चिंतनिका (श्रीदासराममहाराज लिखित लेख संग्रह) |
| ३२ | श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) |
| ३३ | अक्षरे चैतन्याची भाग-१ (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३४ | अक्षरे चैतन्याची भाग-२ (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३५ | ज्ञानगंगा (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) |
| ३६ | अक्षरधारा (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) |
| ३७ | श्रीरामपाठांमृत (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) |
| ३८ | श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने) |
| ३९ | श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र (श्रीदासराम लिखित) |

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |
| २२ | श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका) | २०११ |
| २३ | श्रीरामनिकेतनमधील आराधना | २०११ |
| २४ | ग्रंथत्रयी(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |
| २५ | श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | अभंगदरबार (आवृत्ती १) | २०११ |
| २७ | सद्‌बोध दशक (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण) | २०११ |
| २८ | श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र | २०११ |
| २९ | श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०११ |
| ३० | प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ३१ | पाठांतर सुलभ भगवत्‌गीता | २०११ |
| ३२ | श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे | २०११ |
| ३३ | श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ३५ | महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र | २०११ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ३६ | **तो हा दासबोध** (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | **श्रीदासराममहाराज चरितामृत** | २०११ |
| ३८ | **श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र** | २०११ |
| ३९ | **श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ४० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) | २०११ |
| ४१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** | २०११ |
| ४२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** | २०११ |
| ४३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) | २०१२ |
| ४४ | **प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र** | २०१२ |
| ४५ | **श्रीदासरामगीतम्** (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | **श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** (३६५ वचने) | २०१२ |
| ४७ | **चैतन्यब्रह्म** | २०१२ |
| ४८ | **श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी** (विवरणासह) | २०१३ |
| ४९ | **स.रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) | २०१३ |
| ५० | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) | २०१३ |
| ५१ | **चिमड संप्रदायातील पंचपदी** (विवरणासह) | २०१३ |
| ५२ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१** | २०१४ |
| ५३ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) | २०१४ |
| ५४ | **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** | २०१४ |
| ५६ | **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ** (विवरणासह) | २०१४ |
| ५७ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२** | २०१५ |
| ५८ | **अभंग दरबार** (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध) | २०१५ |
| ६० | **आत्मारामपाठ** (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण) | २०१५ |
| ६१ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |
| ६२ | **श्रीमद्दासबोधातील प्रपंचयोग** | २०१५ |
| ६३ | **अभंग दरबार भाग - २** | २०१५ |
| ६४ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) | २०१६ |
| ६५ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) | २०१६ |
| ६६ | **नासदीयसूक्त विवरण** | २०१६ |
| ६७ | **श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण** | २०१७ |
| ६८ | **पाठांतर सुलभ भगवद्गीता आवृत्ती दुसरी** | २०१९ |
| ६९ | **दासबोधातील परमार्थ योग** | २०१९ |
| ७० | **चांगदेवपासष्टी एक नामकळा** (विवरणासह) | २०१९ |
| ७१ | **परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण) | २०१९ |
| ७२ | **चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ७३ | **श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) | २०१९ |
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७६ | **अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७७ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) | २०२० |
| ७८ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) | २०२० |
| ७९ | **श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका) | २०२० |
| ८० | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) | २०२० |
| ८१ | **नित्यकीर्तनानंदा** | २०२० |
| ८२ | **चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ) | २०२० |
| ८३ | **सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८४ | **अभंग सुधा** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८५ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध)(द्वितीय आवृत्ती) | २०२० |
| ८६ | **आरती संग्रह** (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ८७ | **संजीवन पाठ** (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ८८ | **अमृतवाणी** (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ८९ | **श्रीदासरामायण** (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ९० | **शांतीब्रह्म मामा** (श्री. गणपतराव कानिटकर लिखित) | २०२१ |
| ९१ | **श्रीगोविंदचरितमानस** (ओवीबद्ध)(तृतिय आवृत्ती) | २०२१ |
| ९२ | **कूटार्थ बोधिनी** (कूट अभंगांवरील टीपा व विवरण) | २०२१ |
| ९३ | **अभंग तरंग** (प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर संग्राहित संतांचे अभंग) | २०२१ |
| ९४ | **श्रीरामसुतामृत** (प.पू.श्रीअण्णामहाराज केळकर चरित्र) | २०२२ |
| ९५ | **श्रीदासरामरक्षास्तोत्र** | २०२३ |
| ९६ | **श्रीतात्यासाहेबमहाराज चरित्र** | २०२४ |
| ९७ | **पूर्णकळा** | २०२४ |

।। श्रीराम ।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ९८

ॐ

# आम्ही वैकुंठीचे वासी - भाग १

## (विविध संप्रदायातील १०० संतांची संक्षिप्त चरित्रे)

लेखक

**श्री.दीपक चंद्रशेखर केळकर**

प्रकाशक

**श्री. नारायण नरसिंह जमखंडी**

आवृत्ती पहिली    सांगली    सन २०२४

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र.९८**

# आम्ही वैकुंठीचे वासी - भाग १

**(विविध संप्रदायातील १०० संतांची संक्षिप्त चरित्रे)**

लेखक - श्री. दीपक चंद्रशेखर केळकर

प्रकाशक श्री. नरहर नरसिंह जमखंडी

**प्रथम आवृत्ती इ.स.२०२४**

**प्रकाशन दिन :** १३ फेब्रुवारी,२०२४ माघ शुद्ध चतुर्थी
(श्रीगणेश जयंती) शके १९४५
श्रीरामनिकेतन कीर्तनशताब्दि महोत्सव

© **सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन**

अक्षर जुळणी : **श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे**

मुद्रक : **एस. बी. ऑफसेट प्रिंटर्स, सांगली**

**स्वागत मूल्य** : रु.१००/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :**

**श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकर वाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८/९४२०५७४५७०
ईमेल - kelkarnana@gmail.com

# प्रस्तावना

**आचारः परमो धर्मः आचरः परमं धनम् ।**
**आचारः परमा विद्या आचारः परमा गति ।।**

आचार हाच श्रेष्ठ धर्म आहे, आचार हेच उत्तम धन आहे, आचार हीच श्रेष्ठ विद्या आहे आणि आचार हीच श्रेष्ठ गती आहे. म्हणून आमचे निंबरगीचेमहाराज म्हणतात की, आचरणाचे बळ हे देवापेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणून माणसाच्या आचारावरून त्याची समाजात ओळख होत असते. त्यामुळे समर्थ दासबोधात म्हणतात, 'आधी राखावा आचार । मग पहावा विचार । आचारे विचारे पैलपार । पाविजेतो ।। (१७.१०.२५)' आचारा नंतरचा येणारा विचार हा त्या साधकाला आचारी का विचारी करत नाही. तो आचार विचाराने पैलतीरास जातो. आपले आचरण (चरित्र) हीच माणसाची मोठी पूंजी आहे. कारण आचरण हेच मनुष्याला पूजनीय बनवते. मनुष्याजवळ असणारे धन, सत्ता, व शारीरिक बळ समजा गेले तर काही बिघडत नाही, पण समाजाप्रती असणारे आचरण जर नाहीसे झाले तर, त्याच्यापाशी काहीही शिल्लक रहात नाही.

चरित्र या शब्दाचा अर्थच वर्तन किंवा चरित् असा आहे. चरित् म्हणजे आचरण. चरित् या शब्दापासूनच चरित्र हा शब्द निर्माण झाला आहे. या अर्थाने संतांचे वर्तन अथवा संतांनी आचरलेले आचरण हेच त्यांचे चरित्र असते. म्हणून त्यांचे चरित्र वाचायचे आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न करायचा. '**संतमहात्मे होऊनी गेले चरित्र त्यांचे पहा जरा । आपण त्यांच्या समान व्हावे हाचि सापडे बोध खरा ।।**' ही संतोक्ती अत्यंत सार्थ आहे. म्हणून संतांच्या चरित्रांना अत्यंत महत्व आहे. चरित्र ही दोन प्रकारांनी लिहिली जातात. गद्य व पद्य. पद्य चरित्रे ही पारायणासाठी अत्यंत उपयोगी पडतात, म्हणून अनेक संतांची पद्य चरित्रे सामान्यपणे खूप वाचली जातात. एखादी मनोकामना पूर्ण करणेचे सामर्थ्य हे या संतांच्या चरित्र पारायणात असते.

संतांचे चरित्र हे त्यांच्या कर्मावरून निर्माण होत असते. त्यांचे असणारे सत्कर्म, सदाचरण, स्वभाव व भावनात्मक प्रतिक्रिया यावर ते अवलंबून असते. संत चरित्र हे आपल्याला 'मी कोण आहे?' हे सुचविते. त्यामुळे जेव्हा आपण इतर लोकांचे मूल्यांकन करतो, तेव्हा ते संतचरित्राच्या आधारे करतो. उदाहरणार्थ एखादी व्यक्ती कायम सत्य मार्गाने जात असेल तर, आपण चांगल्या माणसांच्या वर्गामध्ये त्याचे वर्गीकरण करतो. त्या उलट एखादी व्यक्ती जर कायम असत्य मार्गाने जात असेल तर, आपण चांगल्या नसणाऱ्या माणसांच्या वर्गामध्ये त्याचे वर्गीकरण करतो.

या सर्व दृष्टीने मागील वर्षी आपण संतचरित्रे लिहावी असा विचार मनात आला. अनायासे कीर्तनशताब्दि वर्ष सुरू आहे. आपले घरी अखंड कीर्तन सुरू होऊन १०० वर्षे पूर्ण होत आहेत. हा पर्वकाळ साधून १०० संतांची चरित्रे लिहावित असा विचार जोर धरू लागला. '**सत्य संकल्पाचा दाता नारायण**' या उक्तीप्रमाणे प.पू.श्रीदासराममहाराज यांच्या समाधीसमोर उभा राहिलो आणि हा संकल्प त्यांचे समोर प्रकट केला. त्यांचे

आशीर्वादाने चरित्र लिखाण सुरू करायचे ठरविले. आता कोणत्या १०० संतांची चरित्रे लिहायची हा प्रश्न माझेसमोर निर्माण झाला. कारण या जगात हजारो संत आहेत. त्यातील १०० संत कसे व कोणते निवडावेत हाही प्रश्न होताच. तेव्हा मी प.पू.श्रीअण्णांच्या डायरीचा आधार घेतला. वर्षभरात त्यांचे डायरीत ज्या संतांची नोंद आहे, त्यांना अग्रक्रम द्यावा आणि त्यातून काही रहात असतील तर आपल्या भावणाऱ्या संतांची चरित्रे लिहावित हे निश्चित केले आणि चरित्र लेखनाला सुरवात केली. विस्तारभयास्तव आपण ही चरित्रे संक्षिप्त पद्धतीने लिहावित, जेणेकरून ती कीर्तनात थोडक्या वेळेत वाचता यावीत असा हेतू डोळ्यासमोर ठेवला. आता केवळ तीन-चार पानांची मर्यादा असल्यामुळे जन्म, बालपण, शिक्षण, सद्‌गुरूंचा अनुग्रह, काही प्रापंचिक माहिती, अध्यात्मिक कार्य-लेखन आणि शेवटी त्यांनी देह कसा ठेवला या पद्धतीने चरित्राची आखणी ठरविली. त्यातही प्रामुख्याने संतांनी देह कसा ठेवला या विवेचनावरच अधिक भर दिला आहे. कारण '**शूर ओळखावा रणी । साधु ओळखावा मरणी ।।**' या उक्तीप्रमाणे मरणप्रसंगीच संतांची खरी ओळख होत असते. या साऱ्या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथास '**आम्ही वैकुंठीचे वासी**' असे नांव दिले आहे. संतमहात्मे हे खरे तर वैकुंठातीलच रहिवासी असतात, पण आपल्या कल्याणाकरिता या भूतलावर अवतीर्ण होत असतात. अवतार कार्य संपल्यानंतर ते परत वैकुंठातच जात असतात. या १०० संतचरित्रांमध्ये अनेक संप्रदायातील संतचरित्रे समाविष्ट केलेली आहेत. श्रीमामांचे श्रीरामनिकेतन हे '**अद्वैतपीठ**' असलेने त्यास अनुसरूनच ही चरित्रे लिहिली आहेत. हे लेखन करीत असताना मला फार वेगळे अनुभव आले आणि बऱ्याचवेळा मी एका वेगळ्या विश्वामध्ये गेलो असे वाटून गेले. या संतमहात्म्यांच्या समाधीस्थानी जाऊन आपण त्यांच्या समाधीवर आपले मस्तक ठेवावे असे मला पदोपदी वाटून गेले. काही चरित्रे ही थोडी अल्पस्वरूपात, तर काही थोडी मोठी झाली आहेत. पण त्या त्या वेळी ती माझ्याकडून सहज लिहून गेली आहेत. त्यात कोणताही विशिष्ट हेतू नाही. आणखी एक गोष्ट नमूद करतो की, श्रीस्वामी समर्थ, श्रीगजाननमहाराज, श्रीसाईबाबा अशा काही महान संतांच्या चरित्रांचा यात समावेश नाही. कारण ही चरित्रे बहुतेक लोकांना परिचयाची आहेत. पण ज्या संतांची लोकांना फारशी ओळख नाही, अशी संतचरित्रे लिहिण्यावर मी भर दिला आहे. अशी १०० चरित्रे माझेकडून लिहून पूर्ण झाली या गोष्टीवर माझा विश्वासच बसत नाही. प.पू.श्रीदादा व प.पू.श्रीअण्णा यांच्या कृपेनेच ही पूर्ण झाली आहेत हे निश्चित आहे, सत्य आहे. या चरित्रकामी प.पू.श्रीअण्णांचे कृपांकित श्री.रमेशकाका लाळे व श्री. प्रसन्न गोखले यांची मला अतीव मदत झाली. चरित्रे उपलब्ध करून देण्यापासून त्यांनी मला मदत केली आहे. तसेच मुद्रिते तपासण्याचे महत्वाचे कामही त्यांनी केले आहे. श्रीदादांचे अंतरंगातील शिष्य श्री. नारायणराव देशपांडे यांनी या ग्रंथास त्यांचे मनोगत लिहून दिले. त्यामुळे या सर्वांचा मी आभारी आहे.

ही चरित्रे दोन खंडात विभागून प्रकाशित केली आहेत. पहिला खंड चैत्र महिन्यापासून भाद्रपद महिन्यापर्यंत आहे. यामध्ये ५७ चरित्रे समाविष्ट आहेत. दुसऱ्या खंडामध्ये आश्विन ते फाल्गुन या महिन्यातील एकूण ४३ चरित्रे समाविष्ट आहेत. पुढे परिशिष्ट या शीर्षकाखाली प्रत्येक खंडात १२ अशा एकूण २४ एकादशी

व्रतांची थोडक्यात माहिती त्या संदर्भातील कथेसह दिली आहे. तसेच काही दिनविशेषांची माहितीही उधृत केली आहे. यात प्रामुख्याने अक्षय्यतृतीया, श्रीज्ञानेश्वरी जयंती, श्रीभगवत्‌गीता जयंती, शनैश्वर जयंती, श्रीगुरूलिंगगीता जयंती इ. दिनविशेषांचा समावेश आहे.

अशी ही झालेली १०० चरित्रे प.पू.सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, प.पू.सद्‌गुरू श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर, प.पू.सद्‌गुरू श्रीमामामहाराज केळकर, प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज केळकर व माझे पितृदेव प.पू.सद्‌गुरू श्रीअण्णामहाराज केळकर यांचे पवित्र चरणी अर्पण करतो.

**आचार - विचार - उच्चार हेच संतांचे खरे चरित्र आहे.**

**भरोनि सद्‌भावाची अंजुळी । मिया वोविया फुले मोकळी ।**
**अर्पिली अंघ्रियुगुली । विश्वरूपाच्या ।।**

--- ज्ञानेश्वरी ११.७०८

श्रीअण्णांचा कृपाभिलाषी,

दीपक चंद्रशेखर केळकर

# मनोगत

**सगुणचरित्रे परमपवित्रे सादर वर्णावी ।**
**सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी ।।**
**(श्रीएकनाथमहाराज)**

संतमहात्मे हे चालते बोलते देव असतात. ते दैवी गुणांनी संपन्न असतात. सदाचरण, नामसाधना, सद्गुरूभक्ती, सर्व प्राणीमात्रांविषयी जिव्हाळा व सहानुभूती, साधेपणा, अमानित्व व लोकोद्धाराची तळमळ, अशी कांही विशेष लक्षणे त्यांचे ठिकाणी दिसून येतात. अशा संतांनी आपली आत्मचरित्रे/आत्मकथा लिहून ठेवल्या नाहीत. परंतु ज्ञानेश्वरी, दासबोध सारख्या त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या माध्यमातून त्यांचे चरित्रच उघड झालेले असते. त्यामुळे त्यांचा पारमार्थिक कीर्तीसुगंध दिवसेंदिवस पसरतच जात असतो.

हे संत जगात वावरताना आपले ईश्वरीय कार्य करीत असतात. परंतु देहत्यागानंतरही, व्यापक ईश्वररूपाशी समरस होऊन आपले नियोजित कार्य आपल्या भक्ताकरवी करवून घेत असतात. शिष्याकडून होणारे काव्यलेखन, चरित्रलेखन, तात्विक अध्यात्मिक लेखन या सर्वा पाठीमागे सद्गुरूंचीच प्रेरणा असते. गु.भ.प.श्रीदीपकनाना हे सद्गुरू श्रीअण्णामहाराजांचे चिरंजीव आहेत, तसेच ते सद्गुरू श्रीदासराममहाराजांचे अनुग्रहित असे गुरूपुत्र आहेत. त्यामुळे सद्गुरूंनी त्यांचे हातून ही सुबोध संतचरित्रे लिहविली आहेत, हीच यातील वर्माची गोष्ट आहे.

अशा काही संतांच्या पारमार्थिक जीवनाच्या चरित्रकथा लिहिल्या असता, त्या अनेकांना उद्बोधक होतील या हेतूनेच गु.भ.प. श्रीदीपकनाना यांचेकडून अत्यंत सहज व सोप्या भाषेत हे चरित्र लेखनाचे कार्य सद्गुरूकृपेने झाले आहे. '**आम्ही वैकुंठीचे वासी भाग १ व भाग २**' या दोन ग्रंथांमध्ये मिळून १०० संतचरित्रे आहेत. यापैकी '**आम्ही वैकुंठीचे वासी भाग १**' यामध्ये चैत्र ते भाद्रपद या ६ महिन्यांमध्ये ज्यांची पुण्यतिथी येते अशा एकूण ५७ संतांची चरित्रे असून, '**आम्ही वैकुंठीचे वासी भाग २**'मध्ये आश्विन ते फाल्गुन या सहा महिन्यामध्ये ज्यांची पुण्यतिथी येते, अशा एकूण ४३ संतांची चरित्रे आलेली आहेत. याशिवाय दोन्ही ग्रंथांच्या शेवटी असलेल्या परिशिष्टामध्ये, त्या त्या काळात येणाऱ्या एकादशा व त्यांचे महत्व सांगितले आहे. तसेच अक्षय्यतृतीया, नृसिंहजयंती, गुरूलिंगगीता जयंती यासारख्या महत्वाच्या दिनविशेषासंबंधी माहिती दिलेली आहे.

**संतचरित्रांचे स्वरूप** :-

आत्मकथा/चरित्रकथा हा वाङ्मयाचा एक प्रकार आहे. त्यातही संतांच्या आत्मकथांची वैशिष्ट्ये काही वेगळीच असतात. लौकिक व्यक्तीच्या चरित्रात, त्यांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू उलगडून दाखविलेले असतात. त्यांच्या आयुष्याच्या यशापशयाचा लेखाजोखा मांडलेला असतो. पारमार्थिक संतचरित्रांमध्ये मात्र

संतांच्या अलौकिक जीवनाचा पट उलगडलेला असतो. साधारणपणे संतचरित्रांमध्ये त्यांचे बालपण, मुमुक्षत्व, सद्‌गुरूप्राप्ती, साधन व त्यानंतर होणारी आत्मरूपता, तसेच त्यांच्या निर्याणाचा प्रसंग याचे वर्णन आले आहे.

काही सिद्धसंतांच्या चरित्रांमध्ये अलौकिक घटना, चमत्कार यांचा आविष्कार अनेक प्रकारांनी झालेला दिसून येतो. त्यांच्या लौकिक जीवनाचा तपशील हा केवळ साधकाच्या जीवनाची पार्श्वभूमी सांगण्यासाठी असतो. निरंजन रघुनाथ, नरसिंह सरस्वती, टेंब्ये स्वामी यासारख्या संतविभूतींनी आयुष्यात अनेक कठोर परीक्षा दिल्या. त्यांच्यावर अनेक संकटे आली. परंतु या सर्वांवर मात करून त्यांनी देवाची प्राप्ती कशी करून घेतली, याचे वर्णन अशा संतचरित्रातून आलेले आहे. संतांच्या चरित्रामध्ये आत्म्याच्या विकासाचे दर्शन घडत असते. अशा आत्मकथेमध्ये 'आत्मा' हा शब्द महत्वाचा आहे. आत्मरूप/ब्रह्मरूप झालेले सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, सद्‌गुरू श्रीमामामहाराज केळकर, सद्‌गुरू श्रीदासराममहाराज, श्रीगुरूदेव रानडे, श्रीमामासाहेब दांडेकर अशा थोर विभूतींची आत्मकथा सांगताना, त्यांची विलक्षण अशी व्यक्तीचित्रेही सहजपणे, अत्यंत तन्मयतेने उलगडली गेली आहेत.

संतांची चरित्रे ही नेहमीच रसपूर्ण असतात. ईश्वरप्रेमाने त्यांची आयुष्ये ओथंबलेली असतात. असे प्रेमाचे माधुर्य श्रीगोंदवलेकरमहाराज, श्रीकलावतीमाता इ. संतांच्या चरित्रातून पाझरताना दिसून येते. तसेच त्यांच्या जीवनात, विश्वातील प्रत्येक माणसाविषयी करुणेची छाया पसरलेली दिसून येते. श्रीकृष्णसरस्वती, श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांची चरित्रे त्याची उदाहरणे आहेत. सद्‌गुरूभक्ती ही संतांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. कल्याणस्वामी, वेण्णास्वामी, ब्रह्मानंदमहाराज, गुलावरावमहाराज यांच्या चरित्रांमधून सद्‌गुरूभक्ती व सद्‌गुरूनिष्ठा यांची महती प्रकर्षाने वर्णिलेली दिसून येते. याखेरीज श्रीशंकरमहाराज, श्रीमहादबा पाटीलमहाराज, श्रीधोंडिराजमहाराज पलूस व श्रीअण्णाबुवा यांच्यासारख्या काही विदेही संतांची चरित्रेही येथे परिणामकारकरित्या रेखाटण्यात आलेली आहेत.

**संतचरित्रांचा होणारा लाभ** :-

या अशा सत्पुरूषांच्या/संतांच्या चरित्र वाचनातून/ श्रवणातून अनेक महत्वाचे लाभ होत असतात. या चरित्र वाचनातून विविध काळात व विविध ठिकाणी होऊन गेलेल्या संतमहात्म्यांच्या चरित्राबरोबरच, त्यावेळच्या समकालीन संतांची माहिती कळते. त्या काळामध्ये सामाजिक, राजकीय तसेच सांस्कृतिक वातावरण कसे होते याचा अंदाज येतो. ''**साधु दिसती वेगळाले । परि ते स्वस्वरूपी मिळाले ।।**'' या समर्थ वचनानुसार, बाह्यांगांनी वावरणारे संत जरी वेगवेगळे दिसत असले तरी, सर्वसंतांची 'आत्मस्थिती' मात्र सारखीच असते. त्यावेळचे समकालीन संत व त्यांचा एकमेकांशी होणारा संपर्क व त्यांचे परस्परांशी भावात्मक आदान-प्रदान यासंबंधीची माहिती कळते.

अशा ग्रंथांच्या वाचन, चिंतनाने, पारमार्थिक जीवनमूल्ये अधिक ठळक व सुस्पष्ट होतात. प्रपंचाचा त्याग न करता, प्रपंचच कसा परमार्थरूप केला जातो, याची शिकवण अनेक संतांच्या चरित्रातून मिळते. प्रत्येक माणूस आपले जीवन आनंददायी करण्याच्या प्रयत्नात असतो. परंतु जगाच्या व्यवहारातून शाश्वत सुखाचा अनुभव येत नाही. अशी माणसे शुद्ध परमार्थाच्या शोधात असतात. अशावेळी संतचरित्रांचे वाचन परमार्थप्रवण आयुष्याला अत्यंत उपयोगी ठरते. अशा चरित्रवाचनातून/ चिंतनातून, शुद्ध परमार्थाला अनुकूल अशी मनोरचना तयार होते व त्यानंतर पूर्वनियोजित सद्गुरूंची गाठ पडून, त्याच्या पारमार्थिक आयुष्याला योग्य वळण मिळते.

प्रापंचिक व परमार्थ मार्गावर वाटचाल करणाऱ्या साधकांना ही संतचरित्रे सर्वोत्तम व निश्चयात्मक मार्गदर्शन करणारी आहेत. ही चरित्रे नित्य वाचनीय व मननीय आहेत. अशाप्रकारच्या संतचरित्रातील विचार चिंतनाने, मननाने व आचरणाने आपले जीवन कृतार्थ करून घ्यावे, अशीच श्रीसद्गुरू दासराममहाराजांची, श्रीसद्गुरू अण्णामहाराजांची इच्छा असणार आहे. यादृष्टीने गु.भ.प. श्रीदीपकनाना यांनी अत्यंत भावपूर्वक लिहिलेल्या प्रस्तुत संतचरित्रात्मक ग्रंथांच्याकडे पाहिले जावे, अशी अपेक्षा व्यक्त करून येथेच थांबतो.

श्रीदादांचा चरणरज

नारायण देशपांडे

# शब्दसुमने

आमचे श्रीरामनिकेतन हेच मुळी अद्वैत पीठ आहे असे फक्त आम्ही म्हणत नाही, तर येथे जे संत, महंत, सत्पुरुष, अध्वर्यू येतात त्यांचा पंथ, संप्रदाय, जात, धर्म कोणताही असो, त्यांना येथे त्यापलीकडील अत्युच्च अनुभूती - अद्वैत अनुभूती येते ही सत्य वस्तुस्थिती आहे. याचे मुख्य कारण म्हणजे अद्वैत सिद्धी, अद्वैत प्राप्ती, अद्वैत अनुभूती व अद्वैतप्राप्तीचेच साधन अशीच येथील निःखळ परंपरा आहे.

आमचे साक्षात्कारी सद्‌गुरू संतश्रेष्ठ प.पू.श्रीदासराममहाराज यांनी १९८५ साली प.पू.भगवान श्रीनिंबरगीकरमहाराज यांची निर्याणशताब्दि साजरी केली. त्यावेळी या पर्वकाळाच्या निमित्ताने १०० चे वर संप्रदायातील १००० संतांची नांवे संकलित करुन संतसहस्रनामावलीचे पठण केले होते. आत्ता आदरणीय श्रीदीपकनाना यांनी १०० संतचरित्रे लिहिली आहेत. यामध्ये अनेकविध संप्रदायातील व धर्मातील संतांचा समावेश आहे. यावरून परंपरेतील अध्यात्मिक कार्याचा धागा कसा पुढे प्रगट होत रहातो हे स्पष्ट होते.

श्रीरामनिकेतन येथील नित्यकीर्तनात वर्षभरात येणाऱ्या अनेक संतमहात्म्यांच्या पुण्यतिथ्यांचे दिवशी त्यांचे पुण्यस्मरण केले जाते. मग पुण्यस्मरणाबरोबरच त्या त्या संतांचे संक्षिप्त चरित्र सर्वांना ऐकायला मिळाले तर खूप छान होईल या विचाराने, श्रीदीपकनानांनी चिमड संप्रदायातील अनेक संतांबरोबरच इतर संप्रदायातील अनेक संतांची नांवे काढली आणि चरित्रे लिहायचा ध्यासच घेतला. त्यामुळेच गेल्या वर्ष-दोन वर्षांच्या कालावधीत या संकल्पास साकार रूप प्राप्त झाले. तोच हा ग्रंथ '**आम्ही वैकुंठीचे वासी**'. वैकुंठवासी म्हणजे वय कुंठित होणे. हे वैकुंठ प्राप्त करुन घेतलेले संत, वैकुंठनाथ परमात्मा त्यांचे ठिकाणी वास करुन असलेले संत. '**आम्ही हरिहरांच्या दासी । अखंड झालो वैकुंठवासी ।।१।। आम्हा येणे जाणे नाही । आम्हा येथेंचि वैकुंठ पाही ।।२।। पदोपदी ग्रासोग्रासी । नाम घेऊ श्वासोच्छ्‌वासी ।।३।। देव दासाचे दास्य करी । निजानंदे रंग भरी ।।४।।**' (श्रीरंगनाथस्वामी).

संत हे व्यवहारिक जीवन जगताना देखील अलिप्तपणे संसार करतात. तो व्यवहार किंवा संसार त्यांच्या आड कधीच येत नाही. ते अखंड आत्मानुसंधानात /स्वरूपसंधानात, परमात्मानुसंधान साधत असतात. 'सदा स्वरूपानुसंधान हेच साधुचे मुख्य लक्षण' संतचरित्र ही अवलोकन करणेची, अभ्यासणेची गोष्ट आहे. पण त्यासाठी ते समोर तरी हवे ना! त्याचीच सोय श्रीदीपकनानांनी सर्वांसाठी केली आहे असे मला वाटते. '**थोर महात्मे होवूनी गेले चरित्र त्यांचे पहा जरा । आपण त्यांच्या समान व्हावे हाचि सापडे बोध खरा ।।**' याप्रमाणे या '**आम्ही वैकुंठीचे वासी**' या ग्रंथाच्या माध्यमातून श्रेष्ठ आचार, विचार, साधना, अनुभूती, परमार्थ प्राप्तीसाठी दृष्य संसार, देह-शरीर, तहान-भूक, लौकिक सुख या सर्वांवर मिळविलेला विजय व आपल्या ध्येयासाठी कटिबद्ध राहून अलौकिक सुखाची, आनंदाची प्राप्ती कशी करता येते हे आपल्या लक्षात येणार आहे.

सर्व संतांची चरित्रे मिळवून वाचण्याऐवजी, या दोन भागात आपल्याला शत संतचरित्रे घरबसल्या वाचावयास मिळणार आहेत, ही खरोखरीच आपल्या भाग्याची गोष्ट आहे. संतचरित्रांचा खऱ्या अर्थाने अभ्यास व्हावा अशी सद्‌गुरू परंपरेच्या ठिकाणी विनम्र प्रार्थना करुन लोटांगण घालतो व ही शब्दसुमने सद्‌गुरू श्रीदासराममहराज व सद्‌गुरू श्रीअण्णामहाराज यांचे चरणी समर्पित करतो.

श्रीदादांचे लेकरू व श्रीअण्णांचे वासरू

प्रसन्न पां. गोखले

# प्रकाशकाचे मनोगत

**हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।**

श्रीरामनिकेतन येथे मला माझे परममित्र श्री. माधवराव रामकृष्ण बर्वे हे एकदा घेऊन आले. त्यानंतर मला या स्थानाबाबत अत्यंत ओढ व आपुलकी निर्माण झाली. येथे आल्यावर जे समाधान व आनंद वाटतो, तो इतरत्र नाही. प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराजांनी मला जवळ केले ते कायमचेच. त्यांचा कृपानुग्रहही लाभला. ते ते आपल्या पाठीशी सतत आहेतच. आपल्या श्रीरामनिकेतनमध्ये आजपर्यंत अनेक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. साहजिकच आपणही एक ग्रंथ प्रकाशित करावा अशी तीव्र इच्छा मनामध्ये निर्माण झाली. ह्या इच्छेची पूर्तता प.पू.सद्‌गुरू श्रीदासराममहाराज व प.पू.श्रीअण्णामहाराज यांच्या आशीर्वादाने झाली. '**आम्ही वैकुंठीचे वासी भाग - १ व भाग-२**' हे ग्रंथ कीर्तनशताब्दिचे पावन पर्वकाळामध्ये प्रकाशित होत आहेत. त्यापैकी '**आम्ही वैकुंठीचे वासी भाग - १**' ह्या ग्रंथाचे प्रकाशन करण्याची सेवा मला मिळाली याचा खूप आनंद आहे. प.पू.श्रीदीपकनानामहाराज व श्री. प्रसन्न गोखले यांच्या प्रेरणेने मला ही संधी मिळाली, यासाठी मी त्यांचा खूप खूप आभारी आहे. हे सर्व माझे परममित्र श्री. माधवराव बर्वे यांनी मला श्रीरामनिकेतनमध्ये आणले, म्हणून पुढील सर्व गोष्टी घडल्या हे आवर्जून सांगावेसे वाटते. त्यांचे माझ्यावर खूप उपकार आहेत. परममित्र श्री. प्रसन्न गोखले यांनी लिहिलेले प.पू.सद्‌गुरू श्रीदादामहाराजांचे व प.पू.श्रीअण्णामहाराजांचे ओवीबद्ध चरित्रेही त्यांची सतत आठवण करून देतात. यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतलेली आहेच.

श्रीरामनिकेतन येथील कीर्तन शताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने श्रीदीपकनाना यांनी १०० संतांची चरित्रे लिहिण्याचे फार मोठे काम मोठ्या कष्टाने केले आहे व त्यामुळे अनेक भक्तगणांना एकत्रितरित्या विविध संप्रदायातील १०० संतांची चरित्रे वाचण्यास उपलब्ध होत आहेत, ही खूप आनंदाची गोष्ट आहे. या प्रसंगी माझे वडील कै. नरसिंह हरि जमखंडी व माझी आई कै. श्रीमती सुमित्रा नरसिंह जमखंडी यांचेही स्मरण होत आहे. त्यांचे चरणी साष्टांग दंडवत.

या ग्रंथासाठी आमचे आदरणीय श्रीदीपकनाना यांनी सुंदर प्रस्तावना लिहिली आहे तसेच श्री.नारायणराव देशपांडे व श्री. प्रसन्न गोखले यांनी या ग्रंथासाठी मनोगत लिहिले आहे याचा मला आनंद आहे. या ग्रंथाचे टाईप सेटिंगचे काम श्री. भालचंद्र सहस्रबुद्धे यांनी अचुक व सुबक पद्धतीने केले आहे. या ग्रंथाचे प्रुफरिडिंगचे अत्यंत किचकट असे काम श्री. रमेश लाळे काका यांनी अचूकपणे केले आहे. मुखपृष्ठाचे डिझाईन श्री. सागर मोहिते यांनी आकर्षक असे केले आहे. तसेच या ग्रंथाची छपाई एस.बी.प्रिंटर्सचे श्री. अमोल कुलकर्णी यांनी उत्तम पद्धतीने केली आहे. या सर्वांविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो आणि श्रीसद्‌गुरू परंपरेचे चरणी साष्टांग दंडवत घालून येथेच थांबतो.

नारायण नरसिंह जमखंडी
कोल्हापूर.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | संतांचे नाव | निर्याण तिथी | पान नं. |
|---|---|---|---|
| ०१. | प.पू.श्रीगुंडुबुवामहाराज | चैत्र शु.१ गुढीपाडवा | ०१ |
| ०२. | प.पू.श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज | चैत्र शु.३ | ०८ |
| ०३. | प.पू.श्रीसोहिरोबानाथ आंबिये | चैत्र शु.९ | ११ |
| ०४. | प.पू.श्रीसाधुमहाराज खंदारकर | चैत्र शु.११ | १४ |
| ०५. | प.पू.श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर | चैत्र शु.१२ | १८ |
| ०६. | प.पू.छत्रपती शिवाजीमहाराज | चैत्र शु.१५ | २१ |
| ०७. | प.पू.श्रीधरस्वामीमहाराज | चैत्र व. २ | २३ |
| ०८. | प.पू.श्रीनानामहाराज तराणेकर | चैत्र व. १० | २५ |
| ०९. | प.पू.श्रीवेण्णास्वामी | चैत्र व. १४ | २९ |
| १०. | प.पू.स्वामी अमलानंद | वैशाख शु.१ | ३२ |
| ११. | प.पू.श्रीपंडितरावमहाराज | अधिक वैशाख शु.५ | ३५ |
| १२. | प.पू.श्रीशंकरमहाराज मिरीकर | वैशाख शु.८ | ३८ |
| १३. | प.पू.श्रीधोंडीराजमहाराज पलूस | वैशाख शु.९ | ४१ |
| १४. | प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर | वैशाख शु.१३ | ४४ |
| १५. | प.पू.श्रीआद्य शंकराचार्य | वैशाख शु.१५ | ४६ |
| १६. | प.पू.गौतमबुद्ध | वैशाख शु.१५ | ४८ |
| १७. | प.पू.श्रीदिगंबरदासमहाराज जोशी | वैशाख व.१ | ४९ |
| १८. | प.पू.श्रीसंत चोखामेळा | वैशाख व. ५ | ५५ |
| १९. | प.पू.श्रीगोविंदपंत घोसरवाडकर | ज्येष्ठ शु.३ | ५८ |
| २०. | प.पू.श्रीतुकामाई येहेळगांव | ज्येष्ठ शु.८ | ६२ |
| २१. | प.पू.श्रीगुरूदेव रानडे | ज्येष्ठ शु.१० | ६८ |
| २२. | प.पू.श्री.ग. वि. तथा काकासाहेब तुळपुळे | ज्येष्ठ शु. ११ | ७२ |
| २३. | प.पू.श्रीमहादबामहाराज पाटील | ज्येष्ठ शु.१५ वटपौर्णिमा | ७५ |
| २४. | प.पू.श्रीलक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेबमहाराज कोटणीस | ज्येष्ठ व.५ | ७७ |
| २५. | प.पू.श्रीशिवरामबुवा ब्रह्मचारी | ज्येष्ठ व. १२ | ८० |
| २६. | प.पू.श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामी | आषाढ शु.१ | ८१ |
| २७. | प.पू.श्रीअण्णाबुवामहाराज | आषाढ शु.४ | ८४ |
| २८. | प.पू.श्रीगोपाळकाका कोटणीस | आषाढ शु.७ | ८६ |

| अ.क्र. | संतांचे नाव | निर्याण तिथी | पान नं. |
|---|---|---|---|
| २९. | प.पू.श्रीनरसाप्पा शापेटी | आषाढ शु.८ | ८९ |
| ३०. | प.पू.श्रीकूर्मदास | आषाढ शु.१० | ९२ |
| ३१. | प.पू.श्रीअनंत गंगाधर केळकर | आषाढ शु.१२ | ९५ |
| ३२. | प.पू.कल्याणस्वामी | आषाढ शु.१३ | ९९ |
| ३३. | प.पू.श्रीमामासाहेब दांडेकर | आषाढ शु. १४ | १०१ |
| ३४. | प.पू.श्रीरामरावमहाराज फडणीस तिकोटेकर | आषाढ व. ४ | १०३ |
| ३५. | प.पू.संत सावतामाळी | आषाढ व.१४ | १०५ |
| ३६. | प.पू.श्रीदासराममहाराज केळकर | श्रावण शु.६ | १०८ |
| ३७. | प.पू.श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी | श्रावण व.२ | ११२ |
| ३८. | प.पू.श्रीबाबामहाराज ऊर्फ रावसाहेब सहस्रबुद्धे | श्रावण व.४ | ११५ |
| ३९. | प.पू.जनीजनार्दनमहाराज | श्रावण व.८ | ११७ |
| ४०. | प.पू.श्रीकृष्णसरस्वती दत्तमहाराज (कुंभारस्वामी) | श्रावण व.१० | १२० |
| ४१. | प.पू.स्वामी स्वरूपानंद | श्रावण व.१२ | १२३ |
| ४२. | प.पू.हनुमंतमहाराज वावरहिरेकर | श्रावण व.१५ | १२६ |
| ४३. | प.पू.श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर | भाद्रपद शु.३ | १३० |
| ४४. | प.पू.श्रीशंकरमहाराज शिपूरकर | भाद्रपद शु.३ | १३३ |
| ४५. | प.पू.श्रीदादामहाराज कोटणीस | भाद्रपद शु.६ | १३६ |
| ४६. | प.पू.श्रीगणपतरावमहाराज कन्नूर | भाद्रपद शु.७ | १४० |
| ४७. | प.पू.श्रीनारायणमहाराज मळणगांवकर | भाद्रपद शु.९ | १४२ |
| ४८. | प.पू.श्रीवामनभटजी बाळेकुंद्रीकर | भाद्रपद शु.९ | १४५ |
| ४९. | प.पू.श्रीनिरंजनरघुनाथ | भाद्रपद शु.११ | १४६ |
| ५०. | प.पू.श्रीगुलाबरावमहाराज | भाद्रपद शु.१२ | १४९ |
| ५१. | प.पू.श्रीविनयानंदमहाराज | भाद्रपद शु.१२ | १५५ |
| ५२. | प.पू.श्रीरघुनाथाचार्य आद्य | भाद्रपद शु.१४ | १५८ |
| ५३. | प.पू.श्रीगोविंद तुळशीराम ढेरे ऊर्फ सूरदास | भाद्रपद शु.१४ | १६० |
| ५४. | प.पू.श्रीदाजीसाहेबमहाराज तथा बळवंतभारती | भाद्रपद व.७ | १६३ |
| ५५. | प.पू.श्रीगोविंदमहाराज उपळेकर | भाद्रपद व.८ | १६८ |
| ५६. | प.पू.श्रीकृष्णदेवमहाराज पुसेसावळी | भाद्रपद व.१३ | १७१ |
| ५७. | प.पू.श्रीब्रह्मानंदमहाराज बेलधडीकर | भाद्रपद व.१५ | १७४ |

## ✼ एकादशी ✼


| अ.क्र. | एकादशीचे नाव | तिथी | पान नं. |
|---|---|---|---|
| | एकादशी उत्पत्ती कथा | | १७७ |
| ०१. | कामदा एकादशी | चैत्र शुद्ध ११ | १७९ |
| ०२. | वरुथिनी एकादशी | चैत्र वद्य ११ | १८० |
| ०३. | मोहिनी एकादशी | वैशाख शुद्ध ११ | १८१ |
| ०४. | अपरा एकादशी | वैशाख वद्य ११ | १८२ |
| ०५. | निर्जला एकादशी | ज्येष्ठ शुद्ध ११ | १८३ |
| ०६. | योगिनी एकादशी | ज्येष्ठ वद्य ११ | १८४ |
| ०७. | शयनी एकादशी | आषाढ शुद्ध ११ | १८५ |
| ०८. | कामिका एकादशी | आषाढ वद्य ११ | १८६ |
| ०९. | पुत्रदा एकादशी | श्रावण शुद्ध ११ | १८७ |
| १०. | अजा एकादशी | श्रावण वद्य ११ | १८८ |
| ११. | परिवर्तीनी एकादशी | भाद्रपद शुद्ध ११ | १८९ |
| १२. | इंदिरा एकादशी | भाद्रपद वद्य ११ | १९० |


## ✼ दिनविशेष ✼


| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | अक्षय्यतृतीया, परशुरामजयंती, बसवेश्वर जयंती | वैशाख शुद्ध ३ | १९१ |
| ०२. | नृसिंह जयंती | वैशाख शुद्ध १४ | १९४ |
| ०३. | श्रीगुरूलिंगगीता जयंती | वैशाख वद्य ७ | १९७ |
| ०४. | गंगोत्सव - दशहारा | ज्येष्ठ शुद्ध १ | २०० |
| ०५. | श्रीज्ञानेश्वरी जयंती | भाद्रपद वद्य ६ | २०२ |